# मानव विज्ञान शाखेसमोरील आजची आव्हाने आणि संधी


मुख्य संपादक

**संजय नगरकर**

संपादक

**हरिष भैलुमे**





Nature Light Publications

# मानव विज्ञान शाखेसमोरील आजची आव्हाने आणि संधी

संजय नगरकर

हरिष भैलुमे

Nature Light Publications

नेचर लाईट पब्लिकेशन्स

# मानव विज्ञान शाखेसमोरील आजची आव्हाने आणि संधी

© संपादकांसाठी राखीव

**मुख्य संपादक**

संजय नगरकर

**संपादक**

हरिष भैलुमे

9 789349 938458

**ISBN No.- 978-93-49938-45-8**

**नेचर लाईट पब्लिकेशन्स**

३०९, वेस्ट ११, मांजरी VSI रोड, मांजरी बुद्रुक,
हवेली, पुणे – ४१२ ३०७.
वेबसाईट: www.naturelightpublications.com
ई-मेल: naturelightpublications@gmail.com
संपर्क क्रमांक: +९१ ९८२२४८९०४० / ९९२२४८९०४०

*"पुस्तकातील प्रकरण/लेखांमध्ये व्यक्त केलेल्या मौलिकता व विचारांसाठी संपादक/सहसंपादक/प्रकाशक जबाबदार राहणार नाहीत. संबंधित प्रकरण किंवा लेखामध्ये व्यक्त केलेल्या मौलिकता व विचारांसाठी संबंधित लेखक स्वतः पूर्णपणे जबाबदार राहील."*

# मानव विज्ञान शाखेसमोरील आजची आव्हाने आणि संधी

मानव विज्ञान विभाग, अंतर्गत गुणवत्ता सुधार कक्ष आणि
प्रागतिक इतिहास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने
दि. ७ मार्च २०२६ रोजी आयोजित

“मानव विज्ञान शाखेसमोरील आजची आव्हाने आणि संधी”
या राष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने
इतिहास विभागामार्फत संपादित

Nature Light Publications

**मुख्य संपादक**

**संजय नगरकर**
प्राध्यापक आणि प्राचार्य
रयत शिक्षण संस्थेचे,
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, ४१४४०२
जिल्हा- अहिल्यानगर, महाराष्ट्र

**संपादक**

**हरिष भैलुमे**
विभागप्रमुख, इतिहास विभाग
दादा पाटील महाविद्यालय,
कर्जत

**सह-संपादक**

**गौतम राजगुरू**
सहाय्यक प्राध्यापक
इतिहास विभाग

**वंदना घोडके**
सहाय्यक प्राध्यापक
इतिहास विभाग

**मनीषा जगदाळे**
सहाय्यक प्राध्यापक
इतिहास विभाग

रयत शिक्षण संस्थेचे
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत – ४१४४०२
जिल्हा अहिल्यानगर, महाराष्ट्र
भारत

# प्रस्तावना

मानव समाजाच्या विकासामध्ये इतिहास, शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक परंपरा यांचे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीत मानव विज्ञान शाखेसमोरील आव्हाने आणि संधी अधिक व्यापक आणि बहुआयामी स्वरूपात समोर येत आहेत. "मानव विज्ञान शाखेसमोरील आजची आव्हाने आणि संधी" हा संपादित ग्रंथ या विविध पैलूंचा सखोल आणि चिकित्सक अभ्यास मांडणारा एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक प्रयत्न आहे.

या ग्रंथामध्ये समाविष्ट केलेले लेख प्राचीन ते आधुनिक काळातील विविध ऐतिहासिक, सामाजिक आणि शैक्षणिक विषयांचा समावेश करतात. ताम्रपाषाणयुगीन इनामगावमधील आर्थिक जीवन, प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था, मौर्यकालीन बौद्ध धर्म आणि सम्राट अशोक यांची भूमिका यांसारख्या विषयांमधून इतिहासाच्या प्राचीन अंगांचा अभ्यास मांडण्यात आला आहे. यामुळे मानवी समाजाच्या उत्क्रांतीचा आणि विकासाचा सुस्पष्ट आढावा घेता येतो.

ग्रंथातील अनेक लेख महाराष्ट्रातील आणि भारतातील थोर समाजसुधारकांच्या कार्यावर आधारित आहेत. महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, संत गाडगे महाराज, महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, अहिल्याबाई होळकर, महाराज सयाजीराव गायकवाड यांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास या ग्रंथात सादर केला आहे. त्यांच्या कार्यातून सामाजिक समता, शिक्षणाचे महत्त्व, अस्पृश्यता निवारण आणि मानवतावादी मूल्यांची जपणूक यांचे अधोरेखन होते.

याशिवाय, सामाजिक सुधारणा चळवळी, स्त्री सक्षमीकरण, सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि सांस्कृतिक वारसा यांसारख्या विषयांवर आधारित लेख समाजातील बदलत्या प्रवाहांचे सखोल विश्लेषण करतात. वारकरी संप्रदाय, संत परंपरा, तसेच धार्मिक व सामाजिक चळवळी यांचा समाजावर झालेला प्रभावही या ग्रंथातून स्पष्ट होतो.

ग्रंथामध्ये इतिहास लेखनाच्या विविध पद्धती, आर्थिक दृष्टिकोन, प्रसार माध्यमांचा प्रभाव, तसेच जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर इतिहास लेखनातील बदल यांचा अभ्यास करण्यात आला आहे. मराठेकालीन मोडी लिपीतील आर्थिक इतिहासाच्या अभ्यास पद्धती आणि स्थानिक इतिहास अभ्यास यामुळे इतिहास संशोधनाच्या विविध अंगांना चालना मिळते.

पर्यावरण आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध देखील या ग्रंथात महत्त्वपूर्णरीत्या मांडले गेले आहेत. पंढरपूर वारीतील प्रदूषण, जंगल सत्याग्रह, मानव आणि पर्यावरण यांचे ऐतिहासिक संबंध, तसेच शाश्वत विकासाच्या संकल्पना यांवर आधारित लेख आजच्या काळातील पर्यावरणीय जाणीवा अधोरेखित करतात.

तसेच, शिक्षण, मानव विकास, स्त्री शिक्षण, उच्च शिक्षणातील आव्हाने आणि नवीन तंत्रज्ञानाचा इतिहास अध्यापन व संशोधनावर होणारा प्रभाव या विषयांवर आधारित लेख आधुनिक शैक्षणिक परिवर्तनाचे दर्शन घडवतात. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल माध्यमांच्या युगात मानव विज्ञान शाखेची उपयुक्तता आणि महत्त्व या ग्रंथातून प्रकर्षाने पुढे येते. हा ग्रंथ केवळ सैद्धांतिक मांडणीपुरता मर्यादित नसून, तो सामाजिक वास्तवाशी निगडित असून संशोधनात्मक आणि उपयोजित दृष्टिकोन प्रदान करणारा आहे. विद्यार्थी, संशोधक, शिक्षक आणि अभ्यासक यांच्यासाठी हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरेल, असा संपादकांचा विश्वास आहे.

या ग्रंथाच्या निर्मितीत मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व लेखकांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो. तसेच, समीक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेचे सहकार्य याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. हा ग्रंथ वाचकांना नवीन विचारांना प्रेरणा देईल, चिकित्सक दृष्टीकोन विकसित करेल आणि मानव विज्ञान शाखेच्या समृद्धीसाठी मोलाचे योगदान देईल, अशी आम्हाला खात्री आहे.

**डॉ. हरिष भैलुमे**

इतिहास विभाग
रयत शिक्षण संस्थेचे
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत
जिल्हा अहिल्यानगर, महाराष्ट्र
भारत- ४१४४०२

# मानव विज्ञान शाखेसमोरील आजची आव्हाने आणि संधी

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्षक व लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | **थोर समाजसुधारक : महात्मा फुले**<br>*बनसोडे सुवर्णा महादेव* | ०१ – ०५ |
| २ | **ताम्रपाषाणयुगीन इनामगावमधील आर्थिक जीवन : (इ.स.पू.१४०० ते इ.स.पू.१०००)**<br>*डॉ. बाराते राजेश मधुकर* | ०६ – १० |
| ३ | **आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या इतिहासातील एक व्यक्तिमत्व : संत गाडगे महाराज**<br>*शितल विलास आतकर* | ११ – १३ |
| ४ | **मानव विकासातील शिक्षणाची भूमिका**<br>*अजय संजय बुरडे* | १४ – १९ |
| ५ | **बौद्ध धर्म, जैन धर्म आणि गांधी वादाचा शांतता अभ्यास**<br>*अनिल शहाजी बर्डे* | २० – २३ |
| ६ | **मानव विज्ञान शाखेसमोरील आजची आव्हाने व संधी : इतिहास विषयाच्या संदर्भातील चिकित्सक अभ्यास**<br>*डॉ. हरिश पंडितराव भैलुमे* | २४ – २७ |
| ७ | **संत शेख महम्मद बाबा, श्रीगोंदा : जीवन, कार्य आणि विचार**<br>*बिटके कोमल धनाजी* | २८ – ३२ |
| ८ | **महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळ आणि प्रबोधन**<br>*बोडखे शिवानी विजय* | ३३– ३७ |
| ९ | **पंढरपूरच्या वारी व प्रदूषण : एक ऐतिहासिक अभ्यास**<br>*डॉ.चौधरी दत्तात्रय मल्हारी* | ३८ – ४१ |
| १० | **राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक समता कार्य : एक चिकित्सक अभ्यास**<br>*प्रा. सरला ब्रम्हदेव चव्हाण* | ४२ – ४५ |

| | | |
|---|---|---|
| ११ | **प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था: एक अभ्यास**<br>*डॉ. प्रमोद कोंडाजी चव्हाण* | ४६ – ५२ |
| १२ | **मानव्य विद्याशाखेसमोरील आव्हाने आणि संधी (सामाजिक सुधारणांच्या दृष्टिकोनातून)**<br>*डॉ. आसाराम हरिभाऊ देसाई* | ५३ – ५८ |
| १३ | **इतिहास लेखनातील आर्थिक दृष्टिकोन : स्वरूप व महत्त्व**<br>*प्रा. मंगेश माधव देवडे* | ५९ – ६३ |
| १४ | **महिला सक्षमीकरण आणि बदलते प्रवाह**<br>*देवकाते स्वाती चंद्रकांत* | ६४ – ६९ |
| १५ | **महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि त्यांचे राजकीय परिणाम – एक ऐतिहासिक अभ्यास**<br>*प्रा. डॉ. ढगे रामदास बाबू* | ७० – ७३ |
| १६ | **महाराष्ट्रातील किल्ले आणि पर्यटन : ऐतिहासिक, सांस्कृतिक व आर्थिक परिप्रेक्ष्य**<br>*प्रा. बाळासाहेब धांडे* | ७४ – ७७ |
| १७ | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हैद्राबाद मुक्ती लढ्यातील योगदान - एक ऐतिहासिक परिशीलन**<br>*प्रा. डॉ. सचिन अशोक धेंडे* | ७८ – ८३ |
| १८ | **उच्च शिक्षणातील मानव्य विद्याशाखेतील इतिहास विषयातील सद्यकालीन आव्हाने, उपाय व संधी**<br>*प्रा. अभिषेक लक्ष्मण फंड* | ८४ – ८८ |
| १९ | **करमाळा येथील कमलाई देवी : ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक अभ्यास**<br>*श्री. श्रीकेश नागनाथ फरतडे* | ८९ – ९२ |
| २० | **राहुरी आणि ब्राह्मणी येथील बारव ऐतिहासिक विश्लेषण**<br>*प्रा. डॉ. अमोल दिनकर गायकवाड* | ९३ – ९६ |
| २१ | **आधुनिक भारताच्या जडणघडणीत अस्पृश्यता निवारणाकरिता कार्य करणारे थोर समाज सुधारक महात्मा फुले व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य**<br>*गजानन कोंडीबा घोडके* | ९७ – १०१ |

| | | |
|---|---|---|
| २२ | **मानव विज्ञान आणि आधुनिक सामाजिक परिवर्तन: एक चिकित्सक अभ्यास**<br>*डॉ. घोडके वंदना किसन* | १०२ - १०६ |
| २३ | **महात्मा गांधींचे अहिंसेचे विचार आणि त्यांची आजच्या काळातील गरज**<br>*प्रा. आबासाहेब लक्ष्मण गोरे* | १०७ – १११ |
| २४ | **शिक्षण आणि मानव विकास : भविष्यकालीन दिशा**<br>*गोरे सत्यम शरद* | ११२ - ११६ |
| २५ | **जागतिक शांततेसाठी बौद्ध धर्माचे योगदान**<br>*श्री. जाधव शंकर कुलदीप* | ११७ - १२१ |
| २६ | **कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य**<br>*प्रा. डॉ. मनिषा माणिकराव जगदाळे* | १२२ - १२५ |
| २७ | **भारतीय इतिहास लेखनावर प्रसार माध्यमांचा प्रभाव – एक चिकित्सक, अभ्यास**<br>*प्रा. डॉ. किशोर नागनाथ जोगदंड* | १२६ - १२८ |
| २८ | **मराठेकालीन मोडी लिपीतील आर्थिक इतिहासाच्या अभ्यास पद्धती**<br>*प्रा. अक्षय तानाजी काकडे* | १२९ - १३३ |
| २९ | **इंदापूर तालुक्याचा ऐतिहासिक अभ्यास**<br>*डॉ. बाळासाहेब काळे* | १३४ – १३८ |
| ३0 | **आर्थिक इतिहास आणि मानवी जीवन**<br>*प्रा. राहुल विलास कांबळे* | १३९ - १४३ |
| ३१ | **जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर इतिहास लेखनातील बदल: संधी की संकट?**<br>*दिपेश काशिनाथ केकाणे* | १४४ -१४९ |
| ३२ | **कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे वृत्तपत्रातील योगदान : एक अभ्यास**<br>*राणी एकनाथ खळेकर* | १५० -१५४ |
| ३३ | **अहिल्याबाई होळकर यांचे धार्मिक व सामाजिक कार्य**<br>*प्रा. डॉ. रघुराज मुगुटराव कुरुमकर* | १५५ -१५९ |
| ३४ | **इतिहासाचे सहाय्यकारी शास्त्र म्हणून भूगोल: एक अभ्यास**<br>*प्रा. लगड सुरेखा रामदास* | १६० -१६४ |
| ३५ | **ज्ञानप्रकाश वृत्तपत्र आणि असहकार चळवळ**<br>*प्रा. डॉ. चंद्रभान मेंगाने* | १६५ -१६९ |

| | | |
|---|---|---|
| ३६ | **महात्मा जोतीराव फुले यांचे मानवी हक्क आणि सामाजिक सुधारणेतील योगदान**<br>*प्रा. प्रवीण बाळासाहेब मोरे* | १७० -१७४ |
| ३७ | **मलिक अंबर आणि गनिमी युद्धतंत्र: एक चिकित्सक अभ्यास (**1549 **ते** 1626 )<br>*प्रा. डॉ. राम निवृत्ती मोरे* | १७५ -१७८ |
| ३८ | **महाराज सयाजीराव गायकवाड यांचे शेती व उद्योग सुधारणेचे विचार व कार्य**<br>*डॉ. सचिन मोरे* | १७९ -१८३ |
| ३९ | **संगमनेर तालुक्यातील जंगल सत्याग्रह**<br>*श्री. राजेंद्र विठ्ठल पानसरे* | १८४ -१८७ |
| ४० | **मौर्यकालीन भारतातील बौद्ध धर्म : सम्राट अशोक यांची भूमिका**<br>*श्री. रवींद्र पुनाजी पारधी* | १८८ -१९२ |
| ४१ | **मानव आणि पर्यावरण यांचे ऐतिहासिक संबंध:प्राचीन ते आधुनिक काळ**<br>*शाहूराव पवार* | १९३ -१९७ |
| ४२ | **स्त्री शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी काळाची गरज**<br>*डॉ. प्रविण बाळासाहेब पिसे* | १९८ -२०२ |
| ४३ | **मानव्य विद्याशाखेपुढील आव्हाने व संधी: पर्यावरण आणि इतिहास**<br>*श्री. पोटे विशाल छबू,, डॉ. गिरमकर कान्हू लक्ष्मण* | २०३ -२०७ |
| ४४ | **मनोरंजनाचे  माध्यम नाटक : इतिहास, विकास व उपयोजिता**<br>*प्रा. राजगुरु गौतम धनाजी* | २०८ -२१२ |
| ४५ | **सांस्कृतिक वारसा आणि मानवी हक्क**<br>*अश्विनी नानासाहेब शिंदे* | २१३ -२१७ |
| ४६ | **राजर्षी  शाहू महाराज कार्य व योगदान**<br>*प्रा. डॉ. सोनवणे सुजाता रामदास* | २१८ -२२२ |
| ४७ | **शिक्षण, ज्ञान आणि मानवी विकास**<br>*डॉ. जाधव मनीषा विजय* | २२३ -२२५ |
| ४८ | **भारतातील प्राचीन मंदिरांचा आर्थिक इतिहास**<br>*डॉ.  विकास भानुदास टकले* | २२६ -२३० |
| ४९ | **महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्री शिक्षणातील योगदान**<br>*प्रा. रमेश नरसिंग थोरात* | २३१ –२३६ |

| | | |
|---|---|---|
| ५० | **एकोणिसाव्या शतकातील ब्राह्मणेतर चळवळीचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास**<br>*गायकवाड दिपक दगडू* | २३७ -२४० |
| ५१ | **वारकरी संप्रदाय आणि सामाजिक समतेची संकल्पना : एक चिकित्सक अभ्यास**<br>*साळवे अविनाश लिंबाजी* | २४१ –२४४ |
| ५२ | **इतिहास विषयातील अध्यापन व संशोधनावर नव्या तंत्रज्ञानाचा प्रभाव**<br>*डॉ. राजू घोलप* | २४५- २५० |
| ५३ | **महाराष्ट्रातील संत परंपरा व समाज सुधारक एक चिकित्सक अभ्यास**<br>*प्रा. राजेंद्र अरुण गायकवाड* | २५१ -२५३ |
| 54 | **Virtual Museums and the Democratization of Heritage: Challenges in Preserving Material Culture**<br>*Dr. Pramila Dasture* | 254 - 258 |
| 55 | **Economic History and Human Life**<br>*Mr. Gadade Dipak Ganpat* | 259 -262 |
| 56 | **Revolution In Agriculture: Organic Farming**<br>*Prof. Sunita Subhash Satale* | 263 -266 |
| 57 | **Human Creativity and Artificial Intelligence**<br>*Prof. Vasave Kirta O* | 267 -270 |
| 58 | **Humanity in Conflict: Satara District during the 1962 Sino-Indian War**<br>*Dr. Kiran Ganpat Kumbhar* | 271 -275 |
| 59 | **The Analysis of Modern Technology in Agriculture: A Study in Ahilyanagar District**<br>*Prof. Ambika S. Kusalkar* | 276 -281 |

# थोर समाजसुधारक : महात्मा फुले

**बनसोडे सुवर्णा महादेव**

विश्वासराव रणसिंग महाविद्यालय, कळंब वालचंदनगर ता. इंदापूर, जि. पुणे

Email:

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19758047

*DOI: 10.5281/zenodo.19758047*

## प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाज हा जात, धर्म आणि सामाजिक विषमतेच्या गर्तेत अडकलेला होता. समाजरचनेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे वर्ण मानले जात होते. या वर्णव्यवस्थेमुळे समाजात स्पृश्य-अस्पृश्यतेची दरी मोठ्या प्रमाणात निर्माण झाली होती. उच्चवर्णीय लोकांच्या तुलनेत शूद्र-अतिशूद्र समाजाला अत्यंत दुय्यम व अमानवी वागणूक दिली जात होती. त्या काळात महिलांची स्थिती अत्यंत दयनीय होती. महिलांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांना स्थान नव्हते. ब्राह्मण वर्ग वगळता इतर कोणालाही शिक्षणाचा अधिकार नव्हता. शिक्षणाची भाषा संस्कृत असल्यामुळे सामान्य लोकांसाठी शिक्षण मिळविणे अधिक कठीण झाले होते. समाजात बालविवाह, बाल-जरठ विवाह, बहुपत्नीत्व, सतीप्रथा यांसारख्या अनिष्ट प्रथा प्रचलित होत्या. महिलांचे जीवन 'चूल आणि मूल' या चौकटीतच मर्यादित होते. सतीप्रथेच्या ज्वाळांमध्ये असंख्य स्त्रियांचे जीवन संपुष्टात येत होते.

सामाजिक सुधारणेच्या दिशेने काही विचारवंतांनी प्रयत्न सुरू केले. राजाराम मोहन रॉय यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे लॉर्ड विल्यम बेंटिंक यांनी 1829 मध्ये सतीप्रथेवर कायद्याने बंदी घातली. तरीही स्त्रियांचे दुःख पूर्णपणे संपले नव्हते. विधवांचे प्रश्न गंभीर होते आणि केशवपनसारख्या अमानवी प्रथा समाजात रूढ झाल्या होत्या. याच काळात समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी एक महान समाजसुधारक उदयास आले — ते म्हणजे महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले.

गोविंद चिमणाईच्या पोटी
जन्मा आली मोठी असामी!
नाव ठेवले ज्योती,
नावा सम केली क्रांती!!
शतकानुशतकांची भेदून गुलामी
पेटविल्या शिक्षण वाती.

## बालपण आणि शिक्षण

महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांचा जन्म 11 एप्रिल 1827 रोजी पुणे येथे झाला. त्या काळातील प्रथेनुसार त्यांचा विवाह लहान वयातच झाला. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांचा विवाह सावित्रीबाई फुले यांच्याशी झाला. फुले यांच्या शेजारी गफार बेग मुंशी नावाचे मुस्लिम गृहस्थ राहत होते. त्यांनी तसेच लिजिट साहेबांनी जोतिबांना इंग्रजी शाळेत पाठविण्यास प्रोत्साहन दिले. शिक्षण घेत असताना फुले यांच्या मनावर अनेक पाश्चिमात्य विचारवंतांचा प्रभाव पडला. त्यांनी थॉमस पेन यांचे Right of Man हे पुस्तक वाचले. या ग्रंथामुळे त्यांच्यामध्ये स्वातंत्र्य, समता आणि मानवी हक्कांविषयी जागृती निर्माण झाली आणि त्यांनी समाजातील अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याचा निश्चय केला.

## महिलांचे जीवन

त्या काळातील स्त्रियांची अवस्था अत्यंत दयनीय होती. मनुस्मृतीतील खालील श्लोक समाजात प्रचलित होता:

पिता रक्षति कौमारे, भर्ता रक्षति यौवने ।
रक्षन्ति स्थविरे पुत्रा,
न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥

या विचारसरणीनुसार स्त्रीला स्वतंत्र अस्तित्व मानले जात नव्हते. तिचे संपूर्ण जीवन पुरुषांवर अवलंबून मानले जात होते. महिलांचे जीवन 'रांधा, वाढा आणि उष्टी काढा' या चौकटीत बंदिस्त होते. मुली आणि महिलांनी शिक्षण घेतले तर त्या बिघडतील किंवा पतीचे आयुष्य कमी होईल अशा अंधश्रद्धा समाजात प्रचलित होत्या. त्यामुळे महिलांना शिक्षणापासून दूर ठेवले जात होते.

## शैक्षणिक कार्य

महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व खालील शब्दांत स्पष्ट केले आहे:

विद्येविना मती गेली |
मतीविना निती गेली |
नितीविना गती गेली |
गतीविना वित्त गेले |
वित्ताविना शूद्र खचले |
इतके अनर्थ एका अविद्येने केले ||

बहुजन समाज अज्ञानाच्या गर्तेत अडकला असल्याची जाणीव फुले यांना होती. समाजातील जातीय विषमता आणि दारिद्र्य पाहून ते अत्यंत अस्वस्थ झाले. समाजातील अन्याय दूर करण्यासाठी शिक्षण

हेच प्रभावी साधन आहे, हे त्यांनी ओळखले. त्यामुळे त्यांनी सामाजिक आणि शैक्षणिक क्रांतीचे रणशिंग फुंकले.

## मुलींची पहिली शाळा

“जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी” या उक्तीप्रमाणे महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखले. 1848 मध्ये त्यांनी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी भारतातील पहिली शाळा सुरु केली. सुरुवातीला शिक्षक मिळणे कठीण असल्यामुळे त्यांनी स्वतः शिक्षक म्हणून काम केले. त्यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई यांना शिक्षण देऊन त्यांना शिक्षिका म्हणून नेमले. अशा प्रकारे भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून सावित्रीबाई फुले यांचा उदय झाला. 1851 मध्ये त्यांनी चिपळूणकर वाडा, रास्ता पेठ आणि वेताळ पेठ येथे आणखी मुलींच्या शाळा सुरु केल्या. तसेच अस्पृश्य समाजासाठीही शाळा सुरु करून त्यांनी ब्राह्मणी व्यवस्थेला मोठे आव्हान दिले. कर्मठ लोकांकडून दगड, शेण आणि चिखलाचा वर्षाव सहन करूनही सावित्रीबाईंनी शिक्षणाचे कार्य चालू ठेवले. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन मुंबईच्या गव्हर्नरने विश्रामबाग वाड्यात मेजर कँडी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सार्वजनिक सत्कार केला.

## बालहत्या प्रतिबंधक गृह

त्या काळात विधवांची स्थिति अत्यंत दयनीय होती. समाजातील अत्याचारामुळे अनेक विधवा महिलांना आत्महत्या करण्यास भाग पाडले जात होते. या परिस्थितीवर उपाय म्हणून 1863 मध्ये महात्मा फुले यांनी आपल्या घरी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरु केले. येथे गरोदर विधवांना सुरक्षितपणे बाळंतपणाची सोय केली जात होती. काशीबाई नावाच्या एका ब्राह्मण विधवेच्या पोटी जन्मलेल्या मुलाला फुले दांपत्याने दत्तक घेतले आणि त्याचे नाव यशवंत ठेवले.

## जातीभेद निर्मूलन

महात्मा फुले यांनी शूद्र-अतिशूद्र समाजाच्या हक्कांसाठी संघर्ष केला. त्यांनी जातिभेद आणि अस्पृश्यतेविरुद्ध आवाज उठविला. त्यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला. माणसामाणसांतील भेदभाव नष्ट करून समता प्रस्थापित करण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

## सत्यशोधक समाजाची स्थापना

1873 मध्ये पुण्यात महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाज या संघटनेची स्थापना केली. या संघटनेचे उद्दिष्ट सामाजिक विषमता, अन्याय आणि धार्मिक शोषणाविरुद्ध लढा देणे हे होते. पुरोहितांच्या मध्यस्थीशिवाय विवाह आणि इतर धार्मिक विधी करण्याची पद्धत त्यांनी सुरु केली. 25 डिसेंबर 1873 रोजी सत्यशोधक पद्धतीने पहिला विवाह लावण्यात आला. महात्मा फुले यांनी मानवधर्माचा पुरस्कार करून सत्य, समता आणि बंधुता यांवर आधारित समाजव्यवस्थेचा पुरस्कार केला.


*ISBN-978-93-49938-45-8*

## शेतकऱ्यांचे कैवारी

महात्मा फुले यांना भारतीय शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून ओळखले जाते. 1883 मध्ये त्यांनी शेतकऱ्याचा आसूड हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा आणि त्यांच्या शोषणाचे वास्तव मांडले. या ग्रंथाद्वारे त्यांनी सरकार आणि समाजाचे लक्ष शेतकऱ्यांच्या समस्यांकडे वेधले.

## महात्मा फुले यांची ग्रंथसंपदा

महात्मा फुले यांनी अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. त्यांपैकी काही पुढीलप्रमाणे :

- तृतीय रत्न (1855)
- छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा (1869)
- ब्राह्मणांचे कसब (1869)
- गुलामगिरी (1873)
- हंटर आयोगासमोरील निवेदन (1882)
- शेतकऱ्याचा आसूड (1883)
- सत्सार (1885)
- इशारा (1885)
- सत्यशोधक समाज मंगलाष्टके (1887)
- सार्वजनिक सत्यधर्म (मरणोत्तर प्रकाशित)

गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील गुलामगिरीविरुद्ध लढणाऱ्या नागरिकांना अर्पण केला.

## निष्कर्ष

महात्मा फुले यांचे कार्य केवळ भारतापुरते मर्यादित नसून संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी समाजातील विषमता दूर करण्यासाठी शिक्षण, सामाजिक सुधारणा आणि विचारप्रबोधन या माध्यमांचा वापर केला. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायासाठी मोठे कार्य केले. आजही समाजातील अंधश्रद्धा, जातीय विषमता आणि स्त्रीभेद यांसारख्या समस्या अस्तित्वात आहेत. त्यामुळे महात्मा फुले यांच्या विचारांची आवश्यकता आजही तितकीच महत्त्वाची आहे. म्हणूनच महाराष्ट्राला फुले-शाहू-आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळखले जाते.

## *संदर्भ*

१.सागर, के. – महाराष्ट्रातील समाजसुधारक
२.पवार, डॉ. जयसिंगराव – भारतीय स्वातंत्र्य चळवळ

३.गुलामगिरी – महात्मा जोतीराव फुले
४.उगले, जी. ए. – सत्यशोधक दिनमित्रकार मुकुंदराव पाटील
५.शहा, डॉ. जी. बी. – १९ व्या शतकातील महाराष्ट्र


***ISBN-978-93-49938-45-8***

# ताम्रपाषाणयुगीन इनामगावमधील आर्थिक जीवन : (इ.स.पू.१४०० ते इ.स.पू.१०००)

**डॉ. बाराते राजेश मधुकर**

श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय,श्रीगोंदा

Email: barate.rajesh@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19758153

*DOI: 10.5281/zenodo.19758153*

## प्रस्तावना

मानव हा पृथ्वीवरील एक प्राणी आहे परंतु इतर प्राण्याचा तुलनेत वैचारिक बुद्धिमता जास्त असल्याने त्याने बुद्धिमत्तेच्या जोरावरती स्वताची उत्क्रांती घडून आणली, त्यातच एक सांस्कृतिक ओळख निर्माण केली.या सर्व संस्कृती नदी परिसरात निर्माण झाल्या व विस्तारल्या. भारतामध्येही सप्तसिंधू नदी परिसरामध्ये हडप्पा संस्कृतीचा विकास झाला. या संस्कृतीचा ऱ्हासाबरोबर महाराष्ट्रामध्ये जोर्वे संस्कृती, माळवा संस्कृती, सावळदा संस्कृती या संस्कृतीचा उदय झाला. जोर्वे संस्कृतीचे अवशेष प्रथमतः अहमदनगर जिल्ह्यातील जोर्वे या ठिकाणी सापडल्याने तिला जोर्वे संस्कृती म्हटले जाते. नेवासा,दैमाबाद,नाशिक,कोपरगाव,कोरेगाव,चन्दोली,उंबरज,चनेगाव व इनामगाव या ठिकाणी अनेक अवशेष सापडले.इनामगाव उत्खननावरून या प्राचीन स्थळाची माहिती उजेडात आली. ग्रामीण संस्कृती व आद्यकृषी संस्कृती असल्याने  जलसिंचन, पशुपालन, धातुकाम, चुना व्यवसाय, मातीकाम, कारागीर इतर व्यवसायाची माहिती मिळते.तसेच ताम्रपाषाणयुगीन विनिमय पद्धतीचीही कल्पना येते.

## इनामगाव पुरास्थळाचे स्थान

इनामगाव हे स्थळ पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात असून पुणे शहरापासून पूर्वेला ९० कि.मी वर आहे, या ठिकाणी पुराश्मयुगापासून ते ताम्रपाषाणयुगापर्यंतचा सलग पुरावा मिळतो.इनामगाव या ऐतिहासिक स्थळाचा अक्षवृतीय विस्तार १८.३५' उत्तर व रेखावृतीय विस्तार ७४.३२' पूर्व आहे. हे पुरस्थळ स्थळ भिमानदीची उपनदी घोड नदीकाठी असून नदीच्या उजव्या किनाऱ्यावर स्तरीय संदर्भात मध्याश्मयुगीन पुरावा मिळतो,या स्थळापासून १.५ कि.मी अंतरावर ताम्रपाषाणयुगीन स्थळ आहे.

## आद्य कृषी व्यवसाय

ताम्रपाषाणयुगीन आद्यशेतकरी उदरनिर्वाहासाठी शेती,पशुपालन, शिकार व मच्छिमार यावर

अवलंबून होता. महाराष्ट्र हा निमदुष्काळी (४००-१००० मिमी वार्षिक पर्जन्यमान) असल्यामुळे जिरायती शेतीवर अवलंबून होता. परंतु इनामगावमध्ये शेतीला पाणी देण्यासाठी कृत्रिम पाणीपुरवठ्याची व्यवस्था केलेली होती हे तेथील अवशेषावरून दिसून येते.जमिनीची मशागत करण्यासाठी गुरांचा खांद्याचा हाडाचा बनविलेला नांगराचा फाल (वाळकी जि.पुणे) येथे उत्खननात मिळालेला आहे. इनामगाव येथील मातीत मोठ्या प्रमाणावर धान्याचे अवशेष मिळालेले आहेत.प्रमुख पिक हे सातूचे होते. त्याचबरोबर कृत्रिम पाणीपुरवठा करून हिवाळ्यामध्ये गहू पिकवला जात होता, तेथील  शेतकरी रब्बी व हंगामी अशा दोनही हंगामात पिके घेत असत. जोर्वे कालखंडात इनामगाव आणि दायमाबाद या दोन्हीही ठिकाणी ज्वारी मिळालेली आहे,तांदूळ व बाजरी इनामगावमध्ये पिकवली जाई. धान्याचे पीठ करण्यासाठी धान्य भाजून फक्त पाटा-वरवंटा वापरला जाई, सर्वसाधारण हे लोक सातू,गहू,ज्वारी,बाजरीचा रोटी बनवत. दख्खनच्या काळ्या जमिनीत कापसाचे पीकही घेतले जाई म्हणून वस्त्रनिर्माण करण्यात ते परिचित असावेत.

इनामगावातील शेतकरी या धान्याखेरीज हरभरा, मसूर,, वाटणा, उडीद, लारती डाळ हे पीकही घेत असत. याखेरीज शिंदी, बोर, जांभूळ व बेहडा यांचा बिया मिळालेल्या आहेत.जांभूळ व बेहडा जास्त पावसाच्या प्रदेशात असतात,त्यामुळे इनामागावातील लोकांचे बाहेरील प्रदेशाशी व्यापारी संबंध असावेत.

## जलसिंचन व्यवस्था

इनामगाव येथील उत्खननातून मिळालेल्या अवशेषावरून तेथे दोन्ही हंगामात पिके घेतली जात ते कृत्रिम पाणीपुरवठामुळे शक्य झाले होते. पावसाच्या पाण्याचा वापर शेतीसाठी करत होतेच परंतु पावसाळा संपल्यानंतर नदीच्या पाण्याचाही शेतीसाठी वापर करत असत. घोडनदीचे पाणी वळवण्यासाठी त्यांनी खानलेला चर हा ११८ मी. लांब,३.५० मी. खोल व ४ मी. रुंद होता. त्याचबरोबर नदीवरील बंधारा २.४० मी. रुंद व २४० मी. लांबीचा होता.चराला समांतर असणारा बंधारा दगडी राडारोडा मातीत लिंपून बांधलेला होता,चराला वाहून येणारे पाणी ६ मी. रुंद व १२० मी. लांब असलेल्या कालव्यात सोडले होते. या कालव्याचा शोध इनामगाव येथील पुरातन स्थळाच्या हवाई छायाचित्रामुळे लागला. पाण्याच्या स्त्रोताची दिशा गुरुत्वाकर्षण शक्तीवर अवलंबून राहील याची काळजी घेतली होती. पुराचे पाणी साठवण्यासाठी विशेष योजना केली होती. त्यामुळे उन्हाळ्यातही पाण्याची दुर्भिक्ष जाणवत नसावे म्हणजे वैज्ञानिक आधार घेऊन त्यांनी सिंचन व्यवस्था केली होती, यावरून इनामगावमधील जलसिंचन व्यवस्था अत्यंत काटेकोर व आधुनिक स्वरुपाची होती. त्याचबरोबर शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालनाचा व्यवसाय करत असावेत.


*ISBN-978-93-49938-45-8*

### पशुपालन

ताम्रपाषाण इनामगावमधील वसाहतीतील लोक पशुपालनचा व्यवसाय करत त्यामध्ये ते घोडा (eqqus caballus), डुक्कर (cristatus), वशिंडवाला बैल (bos maximus), मेंढी व शेळी पाळत असत तसेच कुत्रा, हत्ती यांसारखे प्राणी हे स्वताजवळ ठेवत असत. उत्खननात सापडलेल्या अवशेषावरून हे लोक शेळी व मेंढी यांचा उपयोग मांसाहारासाठी करत असावेत. त्याचबरोबर कुत्र्याचे हाडे मोठ्या प्रमाणात मिळालेली आहेत. विशेष बाब म्हणजे हाडांवर धारदार शस्त्राचे व्रण दिसतात, म्हणजे कुत्र्याचा मांसाहारही केला जात असावा. यावरून तेथील लोकांची आर्थिक स्थिती नाजूक होती हे दिसते.

ताम्रपाषाण इनामगावमधील वसाहतीतील लोक पशुपालनाबरोबर मासेमारी व शिकारही करत असत. शिकार एकशिंगी गेंडा (rhinoceros unirnis), नीलगाय (boselaphus tragocamelus), म्हैस (bubulus bubalis), चितळ (axis), सांबर (cervis unicolor) आणि बारसिंग (cervus durauceli) यांची करत असावेत. हे हाडांचे अवशेषावरून स्पष्ट होते.

### धातुकाम (तांबे व सोने)

ताम्रपाषाणयुगीन कालखंडामध्ये धातू घडवण्याचे ज्ञान हे प्रथमावस्थेत होते.छीन्या, मणी,मासेमारीचे गळ यांसारख्या तांब्याच्या वस्तू बहुतेक ठोकून बनवत असत. तांबे हे बाहेरून येत असत. पूर्व जोर्वे कालखंडातील इनामगावमधील एक छोटी भट्टी बहुधा तांबे शुद्ध करण्यासाठी वापरली असावी. आणि येथील उत्खननात प्राप्त झालेल्या दोन मुशी कदाचित याच कामासाठी वापरत असावेत.युरोपातील प्रथेप्रमाणे येथेही शुद्ध स्वरूपातले तांबे साठवण्यासाठी त्याची कडी बनवत असत.

ताम्रपाषाणयुगीन कालखंडामध्ये सोने दुर्मिळ असले तरी त्याचा पूर्ण अभावही नव्हता.इनामगाव येथील विविध कारागीरामध्ये सोने कामकरत असावे, येथे मिळालेल्या मुशी व तांब्याच्या चिमट्यानी सूचित होते. इनामगाव येथूनच मोल्यवान खड्यांना छिद्र पाडण्यासाठी वापरात येणाऱ्या सारेच्या दगडाच्या अरया मिळालेल्या आहेत. त्याचबरोबर काही सोन्याचे मणीदेखील सापडले आहेत.

### कुंभारकाम

इनामगावमधील उत्खननामध्ये अनेक अवशेष सापडले आहेत त्याच्यावरून मृतपात्रे बनवण्याचे काम मोठ्या प्रमाणावर चालत होते हे दिसते. मृतपात्रे चाकावर घडवलेली, उत्तम भाजलेली व रंगीत अशी होती.इनामगाव येथे ही मातीची भांडी भाजण्याच्या दोन भट्ट्या सापडल्या आहेत.यातील एक भट्टी पूर्व जोर्वे काळातील तर दुसरी माळवा काळातील आहे. या दोन्ही भट्ट्यामध्ये त्यांचा आकारातील फरक सोडल्यास सारखेपणा आहे. केवळ जोर्वे काळातील भट्टी ही मोठ्या मातीच्या कढईसारखी

आहे. या भट्टीचा व्यास १.७५ मी.असून तीच्या तळाशी बाजूने पन्हाळी व त्याखाली जळण ठेवण्यासाठी खोलगट जागा ठेवलेली असे. तसेच भट्टीचे तोंड मातीच्या चपट्या ठेऊन बंद केलेले असे तसेच माळवा संस्कृतीतील भट्टी ही व्यासाने कमी आहे. त्याचबरोबर इनामगावमध्ये उत्तर जोर्वे कालखंडातील कुंभार व्यासायिक एक 'आवा' सापडला आहे.

उत्खननात सापडलेल्या मृतपात्रामध्ये तांबड्या मातीची भांडी व त्याचावर काळ्या मातीपासून तयार केलेले नक्षी असलेली उंच तोटीची भांडी मोठ्या प्रमाणावर सापडलेली आहेत. तसेच मातीच्या मूर्ती बनवण्याचा व्यवसाय ही चालत असे. यावरून असे स्पष्ट होते की, ताम्रपाषाणयुगीन कालखंडामध्ये इनामगावमध्ये मातीपासून वस्तू तयार करण्याचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत असे .

## चुन्याचा वापर

चुनखडीच्या दगडापासून चुना बनविण्याचे काम जोर्वे संस्कृतीच्या दोन्ही कालखंडामध्ये फार मोठ्या प्रमाणात इनामगाव येथे चालत असे. घोटून चुना तयार करणे, हा येथील लोकांचा प्रमुख व्यवसाय होता.इनामगावच्या उत्तर जोर्वे कालखंडातील एक चुनाभट्टी दगडी रबर वापरुन बांधलेली होती तसेच भट्टीपाशी तयार केलेले लहान-मोठ्या आकाराचे गोळेही मिळाले आहेत. चुना हा शिंपल्यापासूनही बनवत असावेत, चुन्याचा उपयोग जमिनीखालची बडदे सारवण्यासाठी होत असावा तसेच कातडी कमावण्यासाठी देखील त्याचा वापर केला जात असत.वरील व्यवसायाव्यतिरिक्त मूर्ती बनवणारे कारागीर व हस्ती दंतावर कलाकुसर करणारे शिल्पकार ही होते, हे तेथील अवशेषावरुन दिसून येते.

## विनिमय पध्दती

ताम्रापाषणयुगीन लोक त्यांचा समकालीन परंतु भिन्न संस्कृतीचा लोकांशी वस्तूच्या देवाणघेवाण (वस्तूविनिमय) स्वरुपात व्यापार करत असत. ताम्रापाषणयुगीन इनामगावमध्ये वस्तूविनिमय पद्धती चालत होती. उत्खननामध्ये स्थानिक नसणारे अनेक अवशेष मिळालेले आहेत, तेथे अनेक वसाहतीमधून वस्तू विनिमय व्यवस्थेचे एक जाळेच निर्माण झाल्याचे दिसून येते. या कालखंडामध्ये अशी विनिमयाची अनेक केंद्रे निर्माण झाली होती. इनामगाव, दायमाबाद, प्रकाशे या नजीकचा वसाहती वस्तूचा पुरवठ्यावर नियंत्रण करणारी केंद्रेच बनली होती. विनिमय पद्धतीमध्ये शिकार व कंदमुळे गोळा करुन निर्वाह करणाऱ्या भटक्या लोकांचाही अंतर्भाव होता.

ताम्रापाषणयुगीन इनामगावमधील लोक कर्नाटकातून सोने, हस्तिदंत व राजस्थानमधून माळवामार्गे बे आणत असत. ताम्रापाषणयुगीन शेतकऱ्यांनी कदाचित मणी व मातीची भांडी वस्तूचा बदल्यात देऊ केली असावीत. त्याचातही चांडोलीसारख्या छोट्या वस्तीला इनामगावसारख्या मोठ्या केंद्रातून पुरवठा झाला असावा. म्हैसूरजवळील टी.नसरीपुर येथे उत्खननात इनामगाव (जोर्वे संस्कृती) मधील मातीची भांडी सापडली आहेत,यावरुन व्यापार हा दूरवर चालत होता हे दिसून येते. इनामगावमधील


ISBN-978-93-49938-45-8

सापडलेल्या अवशेषावरून तांब्याची काटेरी तीराग्रे निःसंशयपणे सिंधू संस्कृतीचा लोकांकडून आलेले आहेत. तसेच केसांचे सर्पिल चापही सिंधू संस्कृतीचा बनावटीचा चापाची आठवण करून देणारे आहेत.

व्यापार हा नदीमार्गे केला जात असावा, भिमा नदीच्या खोऱ्यातून कर्नाटककडे जाणाऱ्या मार्गावर अनेक जोर्वे संस्कृतीची स्थळे आहेत.यावरून एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जाण्यासाठी ताम्रपाषण लोकांजवळ कोणती साधने होती याची कल्पना मातीच्या भांड्यावरील नक्षीकामामुळे येऊ शकते.नदीमार्गे दळणवळणासाठी होड्यांचा उपयोग केला जात असावा. हे भांड्यावरील चित्रावरून समजून येते, परंतु भांड्यावरील नक्षीत आढळणाऱ्या बिनअरयाची चाके असणाऱ्या गाड्या मात्र दूरचा दळणवळणासाठी नसाव्यात हे स्पष्ट होते.

## *संदर्भ*


1. Ansari Z. D, M.K.Dhavalikar,1988.Burials, Excavations at Inamgaon,(Sankalia,H.D., Z.D.Ansari and M.K.Dhavalikar), vol. I, part I,Pp.263-340, Deccan College post graduate Researech Institute, Pune.
2. Ansari Z.D,M.K.Dhavalikar,1988.Pottery, Excavations at Inamgaon,( Sankalia,H.D., Z.D.Ansari and M.K.Dhavalikar), vol. I, part I,Pp.341-503, Deccan College post graduate Researech Institute, Pune.
3. .Ansari Z.D, M.K.Dhavalikar,1988.OtherArtifacts,Excavations At Inamgaon, (Sankalia,H.D.,Z.D.Ansari and M.K.Dhavalikar), vol. I, part ii,Pp.553-724, Deccan College post graduate Researech Institute, Pune.
4. Dutta,Anwita,2006.A critical Review of the Economy of the Chololithic People of Inamgaon,i.ISSN 2042-5937.
5. Sankalia, H.D., Z.D.Ansari and M.K.Dhavalikar,1973.Inamgaon: A Chalcolithic Settlement in Western india,Asian Perspective, Vol.14, Pp.139-146.
6. Shinde Vasant, 1989.New light on the origin,Settlement System and Decline of the jorwe culture of the Deccan,india,South Asian Studies,Vol.5, Pp.60-72.
7. अन्सारी झेड.डी,ढवळीकर एम.के,सांकलिया एच.डी, महाराष्ट्राचा आद्य शेतकरी,इनामगाव उत्खननामध्ये मिळालेली माहिती , डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रज्युएट अंड रिसर्च इन्स्टिट्यूट ,पुणे.
8. रोमिला थापर ,द पेंग्विन हिस्टरी ऑफ अर्ली इंडिया ,पा.नं,११६.
9. ढवळीकर एम.के,राजगुरु श.न ,पप्पू र.सु,शास्त्री अ.एम,ठोसर एच,मंगलम एस,महाजन एम,पाठक अ,२००२, इतिहास:प्राचीन काळ (खंड १), महाराष्ट्र राज्य गझेटीअर,मुंबई दर्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासन, पा.नं.६१-९३.

# आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाच्या इतिहासातील एक व्यक्तिमत्व : संत गाडगे महाराज

**शितल विलास आतकर**
दादा पाटील महाविद्यालय ता- कर्जत जिल्हा -अहिल्यानगर
Email: Shitalraut95@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19758842
*DOI: 10.5281/zenodo.19758842*

## प्रस्तावना

विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शेंडगावी जानोरकर घराणे होते ह्या घराण्यातील झिंगराजे आणि दापुरे गावचे हंबीरराव कोसळकरांची कन्या सखुबाई यांच्या पोटी डेंगू उर्फ श्री संत गाडगे महाराज यांचा जन्म झाला तेव्हा त्यांचे कुटुंब अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत होते झिंगराजा यांच्या मृत्यूनंतर गाडगे महाराज आणि त्यांचे आई मामाकडे राहायला गेल्या तिथेही कष्टाने त्यांची पाठ सोडली नाही .

## जीवन परिचय

संत गाडगेबाबा यांचे खरे नाव डेंगूजी झिंगराजे जानोरकर होते त्यांचा जन्म 23 फेब्रुवारी 1876 रोजी एका गरीब कुटुंबात झाला लहानपणापासून त्यांना गरिबीचा सामना करावा लागला त्यामुळे त्यांना जास्त शिक्षण घेता आले नाही मात्र त्यांनी जीवनातील अनुभवातूनच मोठे ज्ञान मिळवले पुढे ते समाजसेवक आणि संत म्हणून प्रसिद्ध झाले गाडगेबाबा गावोगावी फिरून कीर्तन करत असत कीर्तनातून ते लोकांना स्वच्छता, शिक्षण ,अंधश्रद्धा निर्मूलन ,व्यसनमुक्ती आणि समाजसेवा याचे महत्त्व सांगत असत ते ज्या गावात जात त्या गावात स्वतः झाडू घेऊन स्वच्छता रस्ते गाव स्वच्छ करत असत त्यामुळे त्यांना स्वच्छतेचे दूत असेही म्हटले जाते भुजी महाराज भिक्षा मागताना हातात नेहमी मातीचे भांडे गाडगे घेऊन फिरत असत त्यामुळे लोक त्यांना गाडगे महाराज म्हणू लागले.

समाजसेवा व कार्य- गाडगे महाराजांनी संपूर्ण महाराष्ट्रात फिरून लोकांना खालील गोष्टीचा उद्देश केला .

१. स्वच्छता ठेवणे.
२. अंधश्रद्धा व जातीभेद नष्ट करणे .

दारू आणि वाईट सवय टाळणे गरीब व गरजूना मदत करणे गाडगे महाराजांनी अनेक ठिकाणी धर्मशाळा विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह आणि गोशाळा उभारल्या त्यांनी शिक्षण आणि मानव सेवा यावर

भर दिला गाडगे महाराजांनी औपचारिक शिक्षण फारसे मिळाले नाही तरीही त्यांनी अनुभवातून आणि लोकांशी संवादातून ज्ञान मिळवले त्यांना समाजातील दुःख गरीबी आणि अंधश्रद्धा पाहून खूप वेदना होत असत त्यामुळे त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी अर्पण केले त्यांनी समाजातील अंधश्रद्धा जादूटोणा आणि ढोंगीपणा यांना कठोर विरोध केला लोकांना सत्य विज्ञान आणि चांगल्या विचारांचा मार्ग दाखवला गाडगे महाराजांनी जातपात आणि भेदभाव यांचा विरोध केला सर्व माणसे समान आहेत असा संदेश दिला

**गाडगे महाराजांची व्यक्तिमत्व**

संत गाडगे महाराज हे महाराष्ट्रातील महान संत समाज सुधारक आणि कीर्तनकार होते त्यांची व्यक्तिमत्व अत्यंत साधे प्रभावी आणि लोकहितवादी होते त्यांनी आपल्या आयुष्यभर समाजातील अंधश्रद्धा स्वच्छता आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध काम केले त्यांनी समाजातील अंधश्रद्धा जातीभेद मद्यपान पशुबळी याचा तीव्र विरोध केला त्यांनी लोकांना शिक्षण स्वावलंबन आणि मानवतेचा मार्ग दाखवला गाडगे महाराजांनी लोकांसाठी अनेक धर्मशाळा वस्तीगृह रुग्णालय गोशाळा उभारण्यासाठी मदत केली ते लोकांकडून मिळालेले पैसा स्वतःसाठी न वापरता समाजसेवेसाठी वापरत असत यांचे कीर्तन अतिशय प्रभावी आणि सोप्या भाषेत असत कीर्तनातून ते लोकांना नैतिकता स्वच्छता आणि चांगले जीवन जगण्याचा संदेश देत असत त्यांची व्यक्तिमत्व परिश्रम आणि चिकाटी दिसून येते ते सतत गावोगावी फिरवून लोकांना चांगल्या गोष्टी शिकवत गाडगे महाराजांचे बोलणे अतिशय सोपे आणि प्रेमळ होत होती त्यामुळे सामान्य लोकांनाही त्यांचे विचार सहज समजत कढी, पिठले लसणाची चटणी त्यावर जवसाचे तेल असे बाबांचे जेवण असे दिवसाचे न झोपता रात्री फक्त  तीन ते चार तास झोपत त्यांना पुरेशी होत असे ते उत्तम नकला करत विनोदी प्रसंग वापरुन श्रोत्यांना हसवीत ते उत्तम कथाकथनकार होते आयुष्यभर चिंतन अंगरखा त्यांनी वापरत स्वतःचे कपडे ते स्वतः धुत असत चट्ट्यापट्ट्याची इजार लुंगी पायात विविध रंगांचे मोजे व कॅनव्हास डोक्यावर रुमाल बांधून गळ्यात घोंगडी चा तुकडा घेत गाडगेबाबांनी कुष्ठरोग यांना वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवर मदत केली आज मेळा वृंदाव वादळ संघ उभारला त्यातून पुढे गाडगे महाराज सेवा संघ स्थापन झाला, ते अखेरपर्यंत कष्ट करीत राहिले, ते म्हणायचे बाबू रे हे शरीर भाड्याने घेतले थोडे आहे, जितके त्याचे लाड कराल तितके ते लाड होते, तिथे त्यांनी रणांगणात धडपडत तितल ते काम करत डिसेंबर 1956 मध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

**स्वच्छतेचे महत्व**

संत गाडगे महाराजांनी समाजात स्वच्छतेचे महत्व खूप प्रभावीपणे पाहून दिले. ते जिथे जिथे जायचे तिथे प्रथम गाव साफ करायचे आणि मगच लोकांना उद्देश करायचे. त्यांचे मते स्वच्छता ही देव

देवतांच्या जवळ नेणारी गोष्ट आहे. स्वच्छता राखल्यामुळे रोगराई कमी होते. घाण कचरा अस्वच्छता यामुळे अनेक आजार पसरतात. स्वच्छ गाव आणि शहरे लोकांना आनंददायी वातावरण देतात. त्यामुळे समाजात प्रगत आणि निरोगी राहतो स्वच्छता केल्याने शिस्त जबाबदारी आणि चांगल्या सवयी विकसित होतात. समाजाची सेवा करण्याचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे स्वच्छता राखणे. घाण आणि कच्यामुळे मलेरिया डेंगू कोलोरा यासारखे रोग पसरतात. स्वच्छता ठेवल्यास अशा आजारांपासून बचाव होतो. ते लोकांना सांगत की आपला कचरा आपणच साफ करावा. दुस्यावर अवलंबून राहू नये. याच कार्यामुळे महाराष्ट्रात स्वच्छतेबद्दल मोठी जनजागृती झाली.

### *संदर्भ*

१.संत गाडगे महाराज जीवन आणि कार्य लेखक -खैरनकार ग.ह

२.संत गाडगेबाबा लेखक -जाधव रा .ग

३.गाडगे महाराज चरित्र -लेखक पवार गो .मा

४.संत गाडगे महाराजांचे- विचार डॉ.आ.ह साळुंखे

५. गाडगेबाबा: एक समाज सुधारक लेखक पाटील स.म


***ISBN-978-93-49938-45-8***

# मानव विकासातील शिक्षणाची भूमिका

**अजय संजय बुरडे**

एम.ए. II, इतिहास विभाग, दादा पाटील महाविद्यालय,कर्जत,

**Email:**

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19758938

*DOI: 10.5281/zenodo.19758938*

## प्रस्तावना

मानव विकासात शिक्षणाचे अनन्य साधारण महत्व आहे. शिक्षण केवळ साक्षरता देत नाही तर ती व्यक्तीची विचारशक्ती आणि निर्णय क्षमता विकसित करून प्रगतीचा पाया रचते. हे आर्थिक सक्षमीकरण सामाजिक समता आरोग्य जागरूकता आणि सामाजिक बदलासाठी एक शक्तिशाली साधन आहे. आपल्या समुदयाप्रती, कुटुंब प्रति आणि देशाप्रती असलेल्या आपल्या जबाबदाऱ्या समजून घेण्यासाठी आणि त्यांचा आदर करण्यासाठी आपापल्या शिक्षणाची आवश्यकता आहे. ते आपापल्या आवश्यक असलेली कौशल्ये, तंत्रे, माहिती आणि ज्ञान देते. परिणामी शिक्षणाचा लोकांच्या जीवनावर मोठा आणि गुंतागुंतीचा प्रभाव पडतो. शिक्षण हे प्रत्येकाच्या जीवनात आवश्यक आहे. कारण ते प्रत्येकाला जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्यासाठी अनुमती देते. शिक्षण नवीन कल्पना आत्मसात करण्यास आणि नवीन संकल्पना शोधण्यास मदत करते. शिक्षणामुळे एखाद्या व्यक्तीची तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता सुधारते. शिक्षण निसंशयपणे तंत्रज्ञान वापरण्यासाठी आवश्यक असलेले तांत्रिक कौशल्य प्रदान करते. परिणामी शिक्षणाशिवाय, गुंतागुंतीची यंत्रसामग्री चालवणे कठीण होईल.

मानव विकासातील शिक्षणाचे प्रमुख पैलू

### 1) वैयक्तिक विकास

शिक्षणामुळे विचारसरणीत सकारात्मक बदल होतो. आत्मविश्वास वाढतो आणि जीवनात योग्य निर्णय घेण्याची क्षमता येते.

### २) आर्थिक सक्षमीकरण

तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणामुळे रोजगाराच्या संधी मिळतात. कौशल्ये विकसित होतात. आणि गरिबीतून बाहेर पडण्यास मदत मिळते.

### ३) सामाजिक आणि नैतिक विकास

शिक्षणामुळे मानवी मूल्यांची जोपासना होते. गुन्हेगारी कमी होण्यास मदत होते. आणि एक सुसंस्कृत समाज घडण्यास मदत होते.

### ४) आरोग्य आणि जीवनमान

शिक्षित व्यक्ती आणि आरोग्य या विषयी अधिक जागृत असतात ज्यामुळे दर्जेदार जीवन जगण्यास मदत होते.

### ५) सामाजिक समानता आणि महिला सक्षमीकरण

शिक्षणामुळे समाजातील रुढी परंपरा मोडून समानता प्रस्थापित होते. विशेषतः महिलांना त्यांच्या हक्कांबद्दल जागृत करून त्यांना मुख्य प्रवाहात आणते.

थोडक्यात शिक्षण हे मानवी भांडवल निर्मितीचे मुख्य साधन आहे. जे व्यक्तीला आणि समाजाला प्रगतीच्या दिशेने नेते.

आजच्या आधुनिक युगात मानवाच्या मुख्य व मूलभूत या पाच गरजा आहेत त्या म्हणजे अन्न, वस्त्र ,निवारा, आरोग्य व शिक्षण या मूलभूत गरजा आहेत त्यामध्ये शिक्षण ही मानवाची मूलभूत गरज आहे या कारणाने  जगात मानवाला शिक्षणाशिवाय जगण्यास कठीण होऊ लागले आहे त्यामुळे शिक्षण ही मानवाची अत्यंत मूलभूत व महत्त्वाची गरज आहे.

### शिक्षणाचे महत्त्व

एखाद्याच्या आयुष्यात, शिक्षण माहिती मिळवण्यास आणि आत्मविश्वास वाढवण्यास मदत करते. तुम्हाला व्यावसायिक आणि वैयक्तिक रित्या प्रगती करण्यास मदत करते. सुशिक्षित व्यक्तीमध्ये समाजात महत्त्वपूर्ण योगदान देण्याची क्षमता असते. ते तुम्हाला जीवनातील सुज्ञ निवडी करण्यास मदत करते. शिक्षणाचे महत्व आपल्याला बालपणापासून सुरुवात करते. आणि ही एक अ जीवन प्रक्रिया आहे. जी आपल्या मृत्यूने संपेल किंवा जर नंतरचे जेवण असेल तर ते तिथेच चालू राहील. सर आपल्या संस्कृतीत शिक्षणाचा अभाव असेल तर आपल्या जगाचे भविष्य उज्वल राहणार नाही.

आधुनिक, विकसित आणि औद्योगिक जगाला चालना देणारी मोटार म्हणजे शिक्षण होय. या स्पर्धात्मक संस्कृतीत टिकून राहण्यासाठी आपल्या सर्वांना मार्ग प्रकाशित करणारी मशाल म्हणून माहितीची आवश्यकता आहे.

सुशिक्षित व्यक्तीची गुन्हेगारी कृत्यांमध्ये सामील होण्याची शक्यता खूपच कमी असते. चांगले शिक्षण घेतलेल्या व्यक्तीला त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीत अधिक जाणीव असते. आणि त्याला फसवण्यासाठी शक्यता कमी असते. आपल्या समाजाच्या आणि देशाच्या गरिबी निर्मूलनासाठी शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहे. गरिबीचा आपल्या संस्कृतीवर मजबूत प्रभाव आहे. आणि तो

आपल्या सर्व समस्यांच्या मूळ कारणांपैकी एक आहे. चांगले शिक्षण असलेली व्यक्ती नोकरी मिळवू शकते. आणि आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करण्यासाठी पुरेसे पैसे कमावू शकते.

शिक्षण सर्वांना शांतता आणि बंधुत्वाचे महत्व शिकवते एकता आणि प्रेम पसरवण्याचे महत्त्व अत्यंत महत्त्वाचे आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि हिंसाचार आणि दहशतवाद रोखण्यासाठी शिक्षण हे आवश्यक आहे.

आपल्या देशातील जनतेला शिक्षित केले पाहिजेत. आणि चांगले राजकीय तत्वज्ञान विकसित करण्यापूर्वी आपल्या देशातील कायदे आणि नियमांचे पालन करण्याचे महत्त्व शिकवले पाहिजे. कायद्यांचे पालन करणारे नागरिक देशाच्या आणि जगाच्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या बळकटीवर आणि देखभालित महत्त्वपूर्ण योगदान देतात.

शिक्षणाचे महत्त्व सर्व भागधारकांनी ओळखले आहे ज्यामध्ये सरकारी संघटना आणि स्वतः विद्यार्थी यांचा समावेश आहे. सर्वसामाजिक आर्थिक स्तरांच्या कुटुंबांमध्ये उच्च गुणवत्तेचे शिक्षण विशेषता उच्चस्तरीय शिक्षण हे विकासाचे मुख्य इंजिन आहे, शिवाय अनेक उद्दिष्टे एकत्रित झाल्याने शिक्षणाचे मूल्य वाढले आहे आणि व्यक्ती पर्यावरण आणि समाजाबद्दल आर्थिक जागरूकता झाल्या आहेत. परिणामी मागील पिढ्यांमध्ये न दिसणारी जागरूकता पातळी निर्माण झाली आहे. जागतिक बँकेच्या ब्लॉग एन्ट्री शिक्षण विकास आणि विकासासाठी मूलभूत आहे प्रभावीपणे हे सरांशी केले आहे. विविध स्वरुपात शिक्षणामध्ये लोकांचे जीवन बदलण्याचे शक्ती आहे.

शिक्षणामुळे व्यक्तीची परिपक्वता वाढते. सुशिक्षित लोकांच्या जीवनशैली सुसंस्कृतपणाचा समावेश असतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिक्षण व्यक्तिमध्ये आत्मविश्वासाचा गुण निर्माण करतो. शिक्षण घेतलेले लोक वेळेच्या मूल्यांबद्दल अधिक जागरुक असतात. सुशिक्षित लोकांसाठी वेळ हा पैशांच्या बरोबरीचा असतो.

शेवटी शिक्षणामुळे व्यक्तींना त्यांचे दृष्टिकोन यशस्वीरित्या व्यक्त करता येतात उच्च शिक्षणाची पातळी असलेले व्यक्ती त्यांचे मत अधिक चांगल्या प्रकारे व्यक्त करू शकतात परिणामी शिक्षित व्यक्ती इतरांना त्यांच्या सहमत होण्यास पटवून देण्याची क्षमता असते.

अशाप्रकारे शिक्षणाचे महत्व सांगता येत आहे.

### मानव संसाधन विकासात शिक्षणाची भूमिका

मानव संसाधन विकासात शिक्षणाची भूमिका खूप मोठी आहे. ते केवळ मुलाखती उत्तीर्ण होण्यासाठी आणि नोकरी मिळवण्यासाठी मदत करत नाही तर आपण कसे विचार करतो आणि गोष्टींवर प्रक्रिया करतो आणि हे आकार देण्यास देखील मदत करते.

शिक्षण हे सामाजिक बदलातील सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. आणि हे वेळोवेळी सिद्ध झाली आहे.

निसंशयपणे ती सामाजिकरणाची एक प्रमुख संस्था आहे. या संदर्भात शिक्षक आणि शैक्षणिक संस्था सामाजिक करण्याचे घटक म्हणून काम करतात.

शिक्षणाची भूमिका नाकारता येत नाही. आणि येथे इच्छुक मुलांना प्रेरित करण्यासाठी शिक्षक खूप महत्त्वाची भूमिका बजावतात.

समाजसुधारकांनी युगान युगे शिक्षणाची मूल्ये सिद्ध केले आहेत. आणि समाजाला जाती निषेध, महिलांची असमानता इत्यादी ज्ञानाशिवाय व्यक्ती पूर्ण होत नाही.

तो,ती अज्ञानाच्या अंधारात हरवून जातो. शिक्षण आणि ज्ञानाशिवाय समाजात काहीही योगदान देऊ शकत नाही.

आधुनिकरण आणण्यासाठी क्षणाचा वापर केला जातो आणि 1960 आणि 1970 च्या दशकापासून त्यावर भर देण्यात आला.

शिक्षणाशिवाय, समाजात कोणताही बदल झाला नसता, ज्यामध्ये सामाजिक वाईट प्रथा आणि कोणत्याही अनावश्यक प्रथा नष्ट करणे समाविष्ट आहे. शेती आणि इतर व्यवसाय पासून ते उद्योगात वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यापर्यंत शिक्षणाने प्रत्येक देश आणि प्रत्येक सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यात मदत केली आहे.

## महिलांचे शिक्षण

1986 च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात महिलांना समानता मिळवता यावी म्हणून महिलांच्या शिक्षणावर भर देण्यात आला आहे. यामुळे नवीन मूल्ये विकसित झाले आहेत. आणि समाजाने महिलांचा पूर्णपणे आदर करण्यास सुरुवात केली आहे.

महिलांची निरक्षरता दूर करण्यासाठी आणि त्यांना शिक्षण सहजतेने घेता यावे यासाठी अडथळे दूर करण्यासाठी हे करण्यात आली आहे. महिला आता कोणत्याही प्रकारच्या अडथळ्याशिवाय व्यवसायिक व तांत्रिक आणि व्यावसायिक व अभ्यासक्रमांमध्ये भाग घेऊ शकतात.

महिलांचे शिक्षण यामध्ये सावित्रीबाई फुले यांचा फार मोठा वाटा आहे त्यांनी मुलींसाठी पुण्यामध्ये 1948 मध्ये भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. तर त्यांनी स्त्री शिक्षण ,विधवा पुनर्विवाह आणि अस्पृश्यता निवारणासाठी मोठे कार्य केले आहे त्या (3 जानेवारी 1831 ते 10 मार्च 1847) या भारतातील पहिल्या शिक्षिका महिला शिक्षिका होत्या व पहिल्या मुख्याध्यापिका आणि एक थोर समाज सुधारक म्हणून त्यांची ओळख आहे.

## मागासवर्गीयांचे शिक्षण

शिक्षण हे निश्चितच समाजाच्या तसेच व्यक्तीच्या विकासाशी संबंधित आहे. भारतात शतकानुशतके शिक्षणाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.


*ISBN-978-93-49938-45-8*

मानव विकासात मागासवर्गीय शिक्षण (ST,SC,NT,OBC) सामाजिक समानता आणि आर्थिक सक्षमीकरण यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.
महाराष्ट्र शासनातर्फे फी प्रतिपूर्ती, शिष्यवृत्ती, शासकीय वसाहतीगृह आणि सारथी व समाज कल्याण विभागामार्फत विशेष सवलती, निवासी शाळांद्वारे दर्जेदार शिक्षण दिले जाते.

## शिक्षणामुळे मानवाचा विकास घडवून आणणारे समाज सुधारक

भारतातील विशेषता महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे मुख्य शास्त्र मानले जाते. महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षण व शुद्रातिशुद्रांच्या शिक्षणासाठी पहिली शाळा सुरु केली. तसेच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'कमवा व शिका' या योजनेतून ग्रामीण शिक्षणाचा पाया रचला. तर महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री शिक्षणासाठी विशेष कार्य केले.

## १) महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले

या समाजसुधारकांनी स्त्री शिक्षण बालविवाह प्रतिबंध कायदा आणि शूद्रा ती शुद्रांना शिक्षणाचा अधिकार मिळवून देण्यासाठी मोठा लढा दिला. 1873 मध्ये त्यांनी 'सत्यशोधक समाज' स्थापन करुन प्रबोधन केले. व त्यांनी महिला शिक्षणासाठी मोठे कार्य केले. पुण्यात मुलींसाठी 1848 मध्ये पहिली शाळा त्यांनी सुरु केले पुनर्विवाह करण्यास मोठा लढा दिला.

## २) कर्मवीर भाऊराव पाटील

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण आणि गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणासाठी 1919 मध्ये 'रयत शिक्षण संस्था' स्थापन केली.
जातिभेद विरहित , मिश्र वसतीगृहे सुरु केले.
खेड्यापाड्यात शाळा नेऊन त्यांनी मागास जाती व अल्प उत्पन्न गटातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. 1942 मध्ये मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र वसतिगृहे स्थापन केले.

## ३) महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे स्त्री शिक्षणातील कार्य

19 शतकाच्या शेवटी स्त्री शिक्षणासाठी आणि विधवांच्या कल्याणासाठी मोठे कार्य केले. पुण्याजवळ हिंगणे येथे 1996 मध्ये स्त्री शिक्षण संस्था विधवा व परिपक्ता महिलांच्या शिक्षणासाठी अनाथ बालिकाश्रम सुरु केले.ज्यांचे रुपांतर पुढे मोठ्या शैक्षणिक संस्थेत झाले.
1916 मध्ये भारतातील पहिले महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना केली.जे स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी एक क्रांतिकारी पाऊल होते.त्यांनी केवळ शिक्षणच दिले नाही तर, विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार करुन त्यांना त्यांना मुख्य प्रवाहात आणले. महिलांना साक्षर व स्वावलंबी

बनवण्यासाठी  हिंगणे येथेच महिला विद्यालय सुरु केले. त्यांनी अनाथ विधवा व महिलांना सन्मानाने जगण्यासाठी केवळ शाळाच नव्हे तर महिलाश्रमाची सोय केली.

### ४) डॉ बाबासाहेब आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे असे सांगत शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे मुख्य शास्त्र मानले जाते. त्यांनी 1945 मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटी स्थापन करून मुंबईत सिद्धार्थ आणि औरंगाबाद मध्ये मिलिंद कॉलेज सुरु केले. वंचित दलित आणि मागासवर्गीयांसाठी त्यांनी शैक्षणिक संस्था, वसतिगृहे आणि ग्रंथालय उभारून शिक्षणाचा पाया रचला.

### समारोप

मानव विकासात शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण असून व्यक्तीचा बौद्धिक,सामाजिक आणि भावनिक विकास घडवून आणण्यासाठी शिक्षण हा पाया मांडला जातो. हे शिक्षण आर्थिक उत्पादकता वाढवते स्त्री पुरुष समानता सुधारवते आणि सक्षम नागरिक म्हणून व्यक्तिमत्व घडवते.

### संदर्भ ग्रंथ सूची

१. कर्मवीर भाऊराव पाटील.आधुनिक भगीरथ, भानू काळे, डायमंड प्रकाशन.

२. कर्मवीर भाऊराव पाटील, रमेश जाधव, साकेत प्रकाशन.

३. महात्मा ज्योतिराव फुले, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, काव्य फुले. सुबोध रत्नकार

४. शिक्षण एवं मानव संसाधन विकास ,वी.के.आर.वी.राव.

५. मानवी हक्क व शिक्षण विकास, डॉक्टर शशिकांत पाटील,आर.के.परदेशी.-चिन्मय प्रकाशन, आवृत्ती दुसरी

६. शिक्षणाची शाळा, संजय टाळगावकर.

७. भारतीय शिक्षणाचा इतिहास आणि विकास ,डॉ अंजली गायकवाड.

८. शिक्षण आणि मानवी जीवनाचे उद्दिष्टे, श्री अरबिंदो, पवित्र प्रकाशन.


ISBN-978-93-49938-45-8

# बौद्ध धर्म, जैन धर्म आणि गांधी वादाचा शांतता अभ्यास

**अनिल शहाजी बर्डे**
एम.ए. II, इतिहास विभाग, दादा पाटील महाविद्यालय,कर्जत,अहिल्यानगर.
Email:
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19759117
*DOI: 10.5281/zenodo.19759117*

## प्रस्तावना

भारतीय तत्त्वज्ञान परंपरेत सत्य, अहिंसा, करुणा आणि नैतिक जीवन यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. प्राचीन काळापासून भारतातील विविध धर्म आणि तत्त्वज्ञानांनी मानवी जीवन अधिक शांततामय, नैतिक आणि सुसंवादी बनवण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. बौद्ध धर्म, जैन धर्म आणि गांधीवादी विचार या तीन महत्त्वपूर्ण विचारप्रणालींनी मानवी समाजाला शांततेचा आणि नैतिकतेचा मार्ग दाखवला आहे.

बौद्ध धर्माचे प्रवर्तक गौतम बुद्ध यांनी करुणा, मध्यम मार्ग आणि अष्टांग मार्गाच्या माध्यमातून मानवाला दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग दाखवला. जैन धर्माचे अंतिम तीर्थंकर महावीर यांनी अहिंसा, अनेकांतवाद आणि अपरिग्रह यांसारख्या तत्त्वांचा पुरस्कार करून आत्मशुद्धीचा मार्ग सांगितला. आधुनिक काळात महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा आणि सत्याग्रहाच्या तत्त्वांवर आधारित सामाजिक व राजकीय परिवर्तनाची दिशा दिली.

या तिन्ही विचारप्रणालींमध्ये काही भिन्नता असली तरी त्यांचा मूलभूत उद्देश एकच आहे—मानवी जीवनात शांतता, सहिष्णुता आणि नैतिकता निर्माण करणे. त्यामुळे बौद्ध धर्म, जैन धर्म आणि गांधी विचार यांचा तुलनात्मक अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

## बौद्ध धर्माची उत्पत्ती

बौद्ध धर्माची स्थापना इ.स.पूर्व सहाव्या शतकात झाली. गौतम बुद्ध यांचा जन्म लुंबिनी येथे झाला. त्यांनी मानवी दुःखाचे कारण शोधण्यासाठी कठोर तपश्चर्या केली आणि अखेरीस बोधगया येथे ज्ञानप्राप्ती केली. त्यानंतर त्यांनी लोकांना दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग सांगितला.

बौद्ध धर्माची शिकवण मुख्यतः चार आर्यसत्ये आणि अष्टांग मार्ग यांवर आधारित आहे.

### चार आर्यसत्ये

१. जीवन दुःखमय आहे.

२. दुःखाचे कारण तृष्णा आहे.

३. तृष्णेचा नाश केल्यास दुःखाचा अंत होतो.

४. दुःखाच्या अंतासाठी अष्टांग मार्ग अनुसरणे आवश्यक आहे.

**अष्टांग मार्ग**

बौद्ध धर्मातील अष्टांग मार्ग नैतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा आधार मानला जातो.

१. सम्यक दृष्टी

२. सम्यक संकल्प

३. सम्यक वाचा

४. सम्यक कर्म

५. सम्यक आजीविका

६. सम्यक व्यायाम

७. सम्यक स्मृती

८. सम्यक समाधी

या मार्गामुळे व्यक्तीच्या जीवनात संतुलन आणि शांतता निर्माण होते.

**बौद्ध धर्मातील शांततेची संकल्पना**

बौद्ध धर्म करुणा, दया आणि अहिंसेवर आधारित आहे. बुद्धांनी सर्व जीवांबद्दल समान दृष्टी ठेवण्याचा उपदेश केला. ध्यान, संयम आणि नैतिक जीवन यांच्या माध्यमातून व्यक्तीला अंतर्मनातील शांतता मिळते.

**जैन धर्माची पार्श्वभूमी**

जैन धर्म हा भारतातील अत्यंत प्राचीन धर्मांपैकी एक आहे. जैन परंपरेनुसार २४ तीर्थंकरांनी या धर्माचा प्रचार केला. त्यांपैकी शेवटचे तीर्थंकर महावीर यांनी जैन धर्माला व्यापक स्वरूप दिले.

जैन धर्माचा मुख्य आधार अहिंसा, अनेकांतवाद आणि अपरिग्रह ही तत्त्वे आहेत.

जैन धर्मातील प्रमुख तत्त्वे

**१. अहिंसा**

जैन धर्मात अहिंसेला सर्वोच्च स्थान दिले आहे. मन, वचन आणि कर्माने कोणालाही दुखावू नये हा त्याचा मुख्य संदेश आहे. जैन धर्मानुसार सर्व जीव समान आहेत आणि त्यांना जगण्याचा समान अधिकार आहे.


*ISBN-978-93-49938-45-8*

### २. अनेकांतवाद

अनेकांतवाद म्हणजे सत्य अनेक दृष्टिकोनातून समजून घेणे. कोणतेही मत पूर्णपणे अंतिम नसते. त्यामुळे इतरांच्या मताचा आदर करणे आवश्यक आहे.

### ३. अपरिग्रह

अपरिग्रह म्हणजे भौतिक वस्तूंचा अनावश्यक संचय टाळणे. लोभ आणि मोह कमी केल्याने मन अधिक शांत आणि संतुलित राहते.

## जैन धर्मातील शांततेची संकल्पना

जैन धर्मात शांतता ही केवळ वैयक्तिक जीवनापुरती मर्यादित नसून ती समाज, निसर्ग आणि सर्व प्राणिमात्रांशी सुसंवादावर आधारित आहे.

## गांधीवादी तत्त्वज्ञान

Mahatma Gandhi यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सत्य आणि अहिंसेचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या मते अहिंसा ही केवळ राजकीय साधन नसून ती जीवन जगण्याची पद्धत आहे.

## गांधीवादातील प्रमुख तत्त्वे

### १. सत्य

गांधीजींच्या मते सत्य हे सर्वोच्च तत्त्व आहे. सत्याच्या मार्गाने चालल्यास समाजात न्याय आणि शांतता निर्माण होते.

### २. अहिंसा

अहिंसा म्हणजे कोणालाही शारीरिक किंवा मानसिक दुखापत न करणे. गांधीजींनी अहिंसेला सर्वात प्रभावी सामाजिक आणि राजकीय शस्त्र मानले.

### ३. सत्याग्रह

सत्याग्रह म्हणजे सत्यासाठी अहिंसक मार्गाने संघर्ष करणे. अन्यायाविरुद्ध शांततेने आणि नैतिकतेने लढणे हा त्याचा उद्देश आहे.

### ४. ग्रामस्वराज्य

गांधीजींनी स्वावलंबी खेड्यांवर आधारित समाजव्यवस्था सुचवली. ग्रामस्वराज्यामुळे सामाजिक समता आणि लोकशाही मजबूत होते.

### ५. सर्वधर्म समभाव

गांधीजींनी सर्व धर्मांचा आदर करण्याचा संदेश दिला. विविध धर्मांमध्ये सहिष्णुता आणि ऐक्य निर्माण केल्याने समाज अधिक शांततामय बनतो.

**बौद्ध धर्म, जैन धर्म आणि गांधी विचार : तुलनात्मक अभ्यास**

| घटक | बौद्ध धर्म | जैन धर्म | गांधी विचार |
|---|---|---|---|
| मूलभूत तत्त्व | मध्यम मार्ग | कठोर अहिंसा | सत्य आणि अहिंसा |
| उद्देश | दुःखातून मुक्ती | आत्मशुद्धी व मोक्ष | सामाजिक न्याय |
| प्रमुख साधन | अष्टांग मार्ग | तपश्चर्या व संयम | सत्याग्रह |
| दृष्टिकोन | करुणा व दया | अनेकांतवाद | सामाजिक परिवर्तन |

तिन्ही विचारप्रणालींचे अंतिम उद्दिष्ट मानवाला शांततामय जीवन जगण्याचा मार्ग दाखवणे हेच आहे.

**आधुनिक काळातील महत्त्व**

आजच्या जागतिक परिस्थितीत युद्ध, दहशतवाद, पर्यावरणीय संकटे आणि सामाजिक असमानता यांसारख्या समस्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत बौद्ध धर्म, जैन धर्म आणि गांधीवादी विचार मानवजातीसाठी अत्यंत उपयुक्त ठरतात.

अहिंसा, सहिष्णुता आणि नैतिकता या तत्त्वांवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी या विचारप्रणालींचा अभ्यास आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

बौद्ध धर्म, जैन धर्म आणि गांधीवादी विचार या तिन्ही तत्त्वज्ञानांनी मानवी जीवनाला शांततेचा आणि नैतिकतेचा मार्ग दाखवला आहे. बौद्ध धर्म करुणा आणि अष्टांग मार्गावर भर देतो, जैन धर्म अहिंसा आणि अपरिग्रहाचा संदेश देतो, तर गांधीवाद सत्याग्रह आणि अहिंसेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग सुचवतो.

आजच्या आधुनिक आणि संघर्षपूर्ण जगात या तिन्ही विचारप्रणालींचे महत्त्व अधिक वाढले आहे. मानवजातीने शांततामय आणि सुसंवादी समाज निर्माण करण्यासाठी या तत्त्वांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

***संदर्भ***

१. B. R. Ambedkar – The Buddha and His Dhamma
२. Sarvepalli Radhakrishnan – Indian Philosophy
३. Mahatma Gandhi – Hind Swaraj
४. जैन आगम साहित्य
५. बौद्ध त्रिपिटक ग्रंथ
६. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ – इतिहास व तत्त्वज्ञान संदर्भ ग्रंथ


*ISBN-978-93-49938-45-8*

# मानव विज्ञान शाखेसमोरील आजची आव्हाने व संधी : इतिहास विषयाच्या संदर्भातील चिकित्सक अभ्यास

**डॉ. हरिश पंडितराव भैलुमे**
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, अहिल्यानगर.
Email: harishbhailume@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19759337
*DOI: 10.5281/zenodo.19759337*

**प्रस्तावना**

मानव विज्ञान ही शाखा मानवी जीवन, अनुभव, मूल्ये, संस्कृती, समाज, विचारप्रणाली, भाषा, कला व इतिहास यांचा समग्र अभ्यास व  विचारप्रवाह, सामाजिक रचना व ऐतिहासिक परिवर्तन यांचा सखोल अभ्यास करणारी शैक्षणिक परंपरा आहे. साहित्य, तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, सांस्कृतिक अभ्यास इत्यादी विषय या शाखेत अंतर्भूत होतात. त्यातील इतिहास हा विषय भूतकाळाच्या अभ्यासाद्वारे वर्तमान समजून घेण्यास व भविष्याची दिशा निश्चित करण्यास सहाय्य करतो. इतिहास हा मानव विज्ञान शाखेचा केंद्रबिंदू मानला जातो, कारण तो मानवी अनुभवाचा कालबद्ध दस्तऐवज आहे. २१ व्या शतकात जागतिकीकरण, तंत्रज्ञानक्रांती, डिजिटल माध्यमे, ओळख-राजकारण, नव-राष्ट्रवाद व बाजारपेठीय शिक्षण व्यवस्थेच्या प्रभावामुळे मानव विज्ञान शाखेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. त्याचबरोबर नव्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत.

आजच्या जागतिकीकरण, डिजिटलायझेशन, बाजारकेंद्री शिक्षणप्रणाली व नव-उदारमतवादी धोरणांच्या पार्श्वभूमीवर मानव विज्ञान शाखा अनेक संधी आणि आव्हानांना सामोरी जात आहे. विशेष करून इतिहास विषयाला राजकीय हस्तक्षेप, ओळख-राजकारण, डिजिटल स्रोतांचा मुबलक उपलब्धता, कृत्रिम बुद्धिमत्ता व जागतिक संदर्भातील इतिहासलेखनातील बदल यांसारख्या नव्या प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. ई.एच. कार आपल्या इतिहास म्हणजे काय या पुस्तकात इतिहासाबाबत म्हणतात, 'इतिहास म्हणजे केवळ भूतकाळातील घटनांची नोंद नव्हे, तर त्या घटनांचे चिकित्सक विश्लेषण होय'.[१] इतिहासकार तथ्यांची निवड करून त्याचे विश्लेषण करतो. अर्थात भूतकाळ व वर्तमान यांच्यातील सातत्याने चालणारा संवाद आहे. व नवीन पुरावे आणि नवीन दृष्टिकोनामुळे इतिहासाचे अर्थ बदलतात. इतिहासाचा अभ्यास समाजातील कालानुक्रमिक बदल,

परंपरा आणि सामाजिक रचना समजून घेण्यासाठी महत्त्वाचा ठरतो. इतिहास हा फक्त भूतकाळाचा अभ्यास नसून वर्तमान समजून घेण्यासाठी व भविष्य घडविण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान देतो. याचा अर्थ इतिहासाचा अभ्यास हा समाजातील बदल समजून घेण्यासाठी अत्यावश्यक आहे.

मानव विज्ञानाची पाळेमुळे प्राचीन ग्रीक व भारतीय परंपरेत आढळतात. ॲरिस्टोटल यांनी मानवी आचार-विचार, राज्यव्यवस्था व इतिहासाविषयी तर्कशुद्ध दृष्टिकोन दिला. भारतीय परंपरेत अर्थशास्त्र, महाभारत व राजतरंगिणी यांसारख्या ग्रंथांतून ऐतिहासिक भान दिसते. आधुनिक मानव विज्ञानाची रचना प्रबोधन काळात झाली. तर्क, वैज्ञानिक दृष्टीकोन, व्यक्तिस्वातंत्र्य व मानवी प्रगती यांवर भर देण्यात आला. या काळात इतिहास हा विषय स्वतंत्र शास्त्र म्हणून विकसित झाला.

इतिहास म्हणजे भूतकाळातील घटनांचा चिकित्सक, स्रोताधारित व संदर्भानुसार अभ्यास होय. इतिहासकार लिओपोल्ड रंके यांनी 'जसे घडले तसे इतिहास लिहिणे'[२] ही संकल्पना मांडली. त्यांच्या मते, No Document No History यामुळे स्रोतसमीक्षा व दस्तऐवजाधारित इतिहासलेखनाला महत्त्व प्राप्त झाले. अर्थात त्याने साधनस्त्रोतांचे महत्व अधोरेखित केले आहे. ई.एच. कार यांनी आपल्या ग्रंथात इतिहासकार व तथ्य यांच्यातील परस्परसंबंध अधोरेखित केला. ते म्हणतात, इतिहास म्हणजे इतिहासकार व तथ्य यांच्यातील संवाद आहे. पुढे मार्क्सवादी, स्त्रीवादी, उपनिवेशोत्तर (Postcolonial), उपेक्षित गटांचा (Subaltern) इतिहास अशा विविध प्रवाहांनी इतिहासशास्त्र समृद्ध केले. रणजित गुहा यांच्या नेतृत्वाखालील वंचितांच्या चळवळीने इतिहासलेखनाला नवा सामाजिक दृष्टिकोन दिला.[३] आज अनेक देशांमध्ये इतिहासाचा वापर राजकीय उद्दिष्टांसाठी केला जातो. यामुळे इतिहासाच्या वस्तुनिष्ठ अभ्यासाला बाधा येते. इतिहासकार रोमिला थापर यांनी इतिहासाच्या राजकीय वापरावर टीका केली आहे.[४]

डिजिटल तंत्रज्ञानामुळे अभिलेखागार, हस्तलिखिते, वृत्तपत्रे, नकाशे तथा दुर्मीळ दस्तऐवज ऑनलाइन उपलब्ध झाले आहेत. डिजिटल मानव विज्ञानाच्या माध्यमातून डेटा ॲनालिटिक्स, GIS मॅपिंग, टेक्स्ट माइनिंग सारख्या पद्धती वापरून इतिहासाचा अभ्यास करता येतो. यामुळे संशोधनाची व्याप्ती वाढली आहे, आंतरशाखीय सहकार्य शक्य झाले तसेच लोकाभिमुख इतिहास विकसित झाल्याचे नाकारता येत नाही.[५] जागतिकीकरणामुळे राष्ट्रकेंद्री इतिहासाऐवजी परस्परसंबंधित इतिहासाचा अभ्यास वाढला आहे. इमॅन्युअल वालरस्टाईन यांच्या विश्व-प्रणाली सिद्धांतामुळे जागतिक आर्थिक-सामाजिक परस्परसंबंधांचा अभ्यास प्रचलित झाला.[६] यामुळे प्राथमिक साधनसामग्रीपर्यंत (Primary Sources) थेट प्रवेश मिळतो. डिजिटल तंत्रज्ञानामुळे इतिहास संशोधनाची व्याप्ती वाढली आहे. अभिलेखागारांचे डिजिटायझेशन, ऑनलाइन हस्तलिखिते, ई-पत्रव्यवहार, डिजिटल नकाशे (GIS) यांच्या साहाय्याने संशोधन सुलभ झाले आहे. डिजिटल माध्यमांमुळे माहितीची सत्यता तपासणे कठीण झाले आहे. चुकीचा तथा खोटा व सोशल मीडियावरील अपप्रचार हे मोठे आव्हान


***ISBN-978-93-49938-45-8***

आहे. विद्यार्थ्यांमध्ये मानव विज्ञान शाखेबाबत रोजगाराविषयी असुरक्षितता आहे.[७] तसेच नागरी सेवा, संशोधन, पत्रकारिता, धोरणनियोजन, सांस्कृतिक व्यवस्थापन या क्षेत्रांत संधी उपलब्ध आहेत.
स्त्री, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक यांचा इतिहास लेखनात समावेश वाढला. रोमिला थापर यांनी प्राचीन भारतीय इतिहासाचा पुनर्विचार करून पुराणकथात्मक इतिहासाला चिकित्सक दृष्टिकोन दिला. संग्रहालये, माहितीपट, चित्रपट, स्मारके व सामाजिक माध्यमे यांद्वारे इतिहास लोकांपर्यंत पोहोचवला जात आहे. गांधी सारख्या चित्रपटांनी ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांचे लोकप्रिय पुनर्निर्माण केले. हवामान बदल, पर्यावरणीय संकटे यांच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण इतिहासाचे महत्त्व वाढले आहे. रामचंद्र गुहा यांचे Environmentalism: A Global History हे पुस्तक पर्यावरण चळवळींचा ऐतिहासिक मागोवा घेते.[८]
आजच्या काळात मानव विज्ञान शाखेची उपयुक्तता काही लोकांच्या दृष्टीने कमी झाली असली तरी प्रत्यक्षात समाजाच्या लोकशाही, सांस्कृतिक ओळख आणि सामाजिक समज यासाठी ही शाखा अत्यंत आवश्यक आहे.

## समारोप

मानव विज्ञान शाखा व इतिहास विषय हे आधुनिक समाजाच्या नैतिक, सांस्कृतिक व बौद्धिक पायाभूत रचनेचे केंद्र आहेत. तंत्रज्ञान, जागतिकीकरण व बदलत्या राजकीय-सामाजिक संदर्भांमुळे या शाखेसमोर अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत. त्याचबरोबर अभूतपूर्व संधी देखील उपलब्ध आहेत. मानव विज्ञान शाखेसमोरील आजची परिस्थिती ही द्वैध स्वरूपाची आहे. एकीकडे निधीअभाव, राजकीय हस्तक्षेप व रोजगाराचे प्रश्न ही गंभीर आव्हाने आहेत. तर दुसरीकडे डिजिटल क्रांती, आंतरविद्याशाखीयता आणि नव्या संशोधन क्षेत्रांमुळे अभूतपूर्व संधी उपलब्ध झाल्या आहेत. इतिहास विषय हा समाजाला बौद्धिक परिपक्वता, चिकित्सक दृष्टी व लोकशाही मूल्ये प्रदान करणारा आहे. म्हणूनच मानव विज्ञान शाखेला केवळ उपयुक्ततेच्या निकषावर न मोजता तिच्या बौद्धिक व सांस्कृतिक योगदानाच्या दृष्टीने पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक आहे.

## *संदर्भ*

1. Carr E. H., 'What Is History?', Macmillan publishers, Cambridge University London, 1961. पृ. क्र. ३०.
2. Ranke Leopold von, Theory and Practice of History, Routledge, 2010 पृ. क्र. ५७.
3. Guha Ranajit (Ed.), 'Subaltern Studies', Vol. I, OUP, 1982. पृ. क्र. ४.
4. Thapa Romila r, 'The Past as Present', Aleph Book Company, 2014, पृ. क्र. २२.
5. Cohen Daniel J. and Roy Rosenzweig, 'Digital History: A Guide to Gathering', Preserving, and Presenting the Past on the Web, University of

Pennsylvania Press, Philadelphia, 2006, पृ. क्र. ५.

6. Wallerstein Immanuel, 'The Modern World-System', Vol. I, Academic Press, New York, 1974, पृ. क्र. १८.
7. Tosh John, The Pursuit of History, 6th ed., Routledge, London, 2015, पृ. क्र. २१५.
8. Guha, R. 'Environmentalism: A Global History'. New Delhi: OUP 2000. पृ. क्र. १२.


*ISBN-978-93-49938-45-8*

# संत शेख महम्मद बाबा, श्रीगोंदा : जीवन, कार्य आणि विचार

**बिटके कोमल धनाजी**
एम.ए. II, इतिहास विभाग, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, अहिल्यानगर.
Email:
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19759411
*DOI:* *10.5281/zenodo.19759411*

## प्रस्तावना

महाराष्ट्रातील संतपरंपरा ही भारतीय भक्ती आंदोलनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. १३व्या ते १७व्या शतकात महाराष्ट्रात अनेक संतांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले. या संतांनी भक्तीमार्गाच्या माध्यमातून सामाजिक समता, बंधुता आणि धार्मिक सहिष्णुतेचा संदेश दिला. या संतांमध्ये संत शेख महम्मद बाबा  यांचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे.

शेख महम्मद बाबा हे मुस्लिम समाजात जन्मलेले असूनही त्यांनी मराठी भाषेत भक्तीपर साहित्य निर्माण केले आणि वारकरी संप्रदायाच्या तत्त्वांचा प्रसार केला. त्यांचे वास्तव्य अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा  येथे होते. त्यांच्या साहित्यामध्ये आध्यात्मिक साधना, आत्मज्ञान, सामाजिक समता आणि सर्वधर्मसमभाव यांचा प्रभाव दिसून येतो.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी

मध्ययुगीन काळात भारतातील सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची होती. जातिभेद, अंधश्रद्धा आणि कर्मकांड यांचा समाजावर मोठा प्रभाव होता. या काळात महाराष्ट्रात भक्ती आंदोलनाचा उदय झाला.या आंदोलनाचे प्रमुख संत म्हणजे संत ज्ञानेश्वर,संत नामदेव ,संत एकनाथ ,संत तुकाराम ,संत गोदड महाराज इ,

या संतांनी भक्तीमार्गाच्या माध्यमातून समाजातील विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. या संतपरंपरेचा प्रभाव शेख महम्मद बाबांवरही पडला.

## जन्म व बालपण

संत शेख महम्मद बाबांचा जन्म अंदाजे इ.स. १५६० च्या सुमारास झाला असे मानले जाते. ते मुस्लिम कुटुंबात जन्मले असले तरी त्यांचे विचार अत्यंत उदार आणि व्यापक होते. त्यांच्या कुटुंबात धार्मिक वातावरण होते. लहानपणापासूनच त्यांना आध्यात्मिक विषयांची आवड होती. त्यांनी कुराणाबरोबरच हिंदू धर्मग्रंथांचा अभ्यास केला. त्यामुळे त्यांच्या विचारांमध्ये दोन्ही धर्मांची समन्वयात्मक छटा दिसून येते.

## संत शेख महम्मद बाबा यांचे कार्य

- **धार्मिक समन्वयाचा प्रचार**

संत शेख महम्मद बाबा यांनी हिंदू आणि मुस्लिम धर्मातील साम्य दाखवून धर्मांमध्ये ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की ईश्वर एकच आहे आणि सर्व धर्म त्याच्याकडे जाण्याचे मार्ग आहेत. त्यामुळे समाजात सहिष्णुता आणि बंधुभाव वाढवण्याचे कार्य त्यांनी केले.

- **अंधश्रद्धा व कर्मकांडाचा विरोध**

त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद आणि अनावश्यक कर्मकांड यांचा विरोध केला. त्यांच्या मते सत्य, प्रेम आणि ईश्वरभक्ती हेच खरे धर्माचे तत्त्व आहे.

- **भक्तीपर साहित्य निर्मिती**

संत शेख महम्मद बाबा हे एक उत्कृष्ट कवी होते. त्यांनी मराठी भाषेत अनेक ग्रंथ आणि अभंग लिहिले. त्यांच्या साहित्यामध्ये भक्ती, नैतिकता आणि समाजसुधारणा यांचा संदेश आढळतो.
त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ: संत शेख महम्मद बाबा हे मराठी संतसाहित्याचे महत्त्वाचे कवी होते. त्यांनी अनेक ग्रंथ आणि अभंग लिहिले. त्यांच्या साहित्यामध्ये योग, अध्यात्म आणि भक्ती यांचा समन्वय दिसून येतो.

**त्यांच्या प्रमुख ग्रंथांमध्ये पुढील ग्रंथांचा समावेश होतो**

- योगसंग्राम
- पवनविजय
- ज्ञानदीप
- भक्तिप्रबंध

### योगसंग्राम

"योगसंग्राम" हा त्यांचा सर्वात प्रसिद्ध ग्रंथ मानला जातो. या ग्रंथात योगसाधना, आत्मज्ञान आणि आध्यात्मिक संघर्ष यांचे सविस्तर वर्णन केले आहे.

### पवनविजय

या ग्रंथात योगमार्गातील प्राणायाम, साधना आणि ध्यान यांचे वर्णन आढळते.

### ज्ञानदीप

या ग्रंथामध्ये आत्मज्ञान आणि ईश्वरभक्तीचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

### समाजप्रबोधन


*ISBN-978-93-49938-45-8*

त्यांनी आपल्या कीर्तन-प्रवचनांद्वारे लोकांना नैतिक जीवन, प्रामाणिकपणा आणि ईश्वरभक्ती यांचे महत्त्व सांगितले. समाजातील सर्व स्तरातील लोकांना त्यांनी समानतेचा संदेश दिला.

### मराठी संत परंपरेला योगदान

संत शेख महम्मद बाबा यांनी मराठी भाषेत अध्यात्मिक विचार मांडून संत साहित्य समृद्ध केले. त्यांच्या विचारांवर वारकरी परंपरेचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे ते मराठी संतपरंपरेतील एक महत्त्वाचे संत मानले जातात.

### वारकरी संप्रदायाचा प्रभाव

महाराष्ट्रातील भक्ती आंदोलनामध्ये वारकरी संप्रदायाला महत्त्वाचे स्थान आहे. या संप्रदायात भक्ती, साधेपणा आणि सामाजिक समतेवर भर दिला जातो.

शेख महम्मद बाबांवर पंढरपूर येथील विठोबा  भक्तीचा मोठा प्रभाव होता. त्यांनी वारकरी संप्रदायाचे तत्त्व स्वीकारून भक्तीमार्गाचा प्रचार केला.

त्यांच्या साहित्यामध्ये विठ्ठलभक्ती, आत्मज्ञान आणि आध्यात्मिक साधनेचे वर्णन आढळते.

### सामाजिक विचार

संत शेख महम्मद बाबांचे विचार अत्यंत प्रगत आणि मानवतावादी होते.

त्यांच्या शिकवणीत पुढील तत्त्वे दिसून येतात – सर्व धर्म समान आहेत- संत शेख महम्मद बाबा मुस्लिम धर्मीय असूनही त्यांनी हिंदू संतपरंपरेतील भक्तीमार्ग स्वीकारला. त्यामुळे त्यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश दिला. त्यांच्या कीर्तन, अभंग आणि प्रवचनांमधून धर्मांमध्ये भेदभाव न करता सर्वांनी एकत्र राहावे हा विचार त्यांनी मांडला. त्यामुळे समाजात धार्मिक सलोखा निर्माण होण्यास मदत झाली. जातिभेद समाजासाठी घातक आहे- त्या काळात समाजात जातिव्यवस्था आणि उच्च-नीचतेचे भेद मोठ्या प्रमाणावर होते. संत शेख महम्मद बाबांनी या अन्यायकारक व्यवस्थेला विरोध केला. त्यांच्या अभंगांमध्ये आणि उपदेशांमध्ये सर्व माणसे समान आहेत हा संदेश स्पष्ट दिसतो. त्यांच्या मते ईश्वर सर्वांचा आहे आणि ईश्वरप्राप्तीसाठी कोणत्याही जाती-धर्माची अट नाही. त्यामुळे त्यांनी समाजात समता, बंधुता आणि मानवतेचा विचार रुजवला.

### ईश्वरप्राप्तीसाठी भक्ती आणि सदाचार आवश्यक आहेत

अंधश्रद्धा आणि कर्मकांड टाळावेत त्या काळात समाजात अनेक अंधश्रद्धा आणि अविवेकी प्रथा प्रचलित होत्या. संत शेख महम्मद बाबांनी या चुकीच्या प्रथांवर टीका केली.त्यांनी लोकांना विवेक, नैतिकता आणि भक्तीचा मार्ग दाखवला. त्यांच्या विचारांमुळे लोकांमध्ये जागृती निर्माण झाली आणि समाजसुधारणेला चालना मिळाली. त्यांनी हिंदू आणि मुस्लिम समाजामध्ये एकात्मता

निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

### समाजातील सर्व घटकांशी संवाद

संत शेख महम्मद बाबा हे सर्व समाजघटकांशी संवाद साधणारे संत होते. गरीब, शेतकरी, कामगार आणि सामान्य लोकांमध्ये त्यांनी आपले विचार पोहोचवले. त्यामुळे त्यांचे कार्य लोकाभिमुख झाले.

### भक्ती आणि नैतिक जीवनाचा प्रसार

संत शेख महम्मद बाबांनी साधेपणा, प्रामाणिकपणा आणि नैतिक जीवन यावर भर दिला.
त्यांच्या मते ईश्वरप्राप्तीसाठी भक्ती, सत्य, करुणा आणि सेवाभाव आवश्यक आहेत. त्यामुळे त्यांनी लोकांना सदाचाराचे जीवन जगण्याची प्रेरणा दिली.

### श्रीगोंदा येथील कार्य

अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे संत शेख महम्मद बाबांचे वास्तव्य होते. येथे त्यांनी अध्यात्मिक साधना केली आणि भक्तीमार्गाचा प्रसार केला.
आजही श्रीगोंदा येथे त्यांची समाधी आहे. येथे दरवर्षी यात्रा भरते आणि अनेक भाविक दर्शनासाठी येतात.

### संतपरंपरेतील स्थान

महाराष्ट्राच्या संतपरंपरेत शेख महम्मद बाबांचे स्थान अनन्यसाधारण आहे. मुस्लिम असूनही त्यांनी मराठी भाषेत भक्ती साहित्य निर्माण केले. त्यामुळे ते हिंदू-मुस्लिम सांस्कृतिक समन्वयाचे प्रतीक मानले जातात.
त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील संतपरंपरेला एक व्यापक सामाजिक आणि धार्मिक दृष्टीकोन प्राप्त झाला.

### निष्कर्ष

संत शेख महम्मद बाबा हे महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील एक महत्त्वाचे संत होते. त्यांनी भक्तीमार्गाच्या माध्यमातून समाजातील समता, बंधुता आणि धार्मिक सहिष्णुतेचा संदेश दिला.
त्यांचे साहित्य मराठी भक्तीपरंपरेला समृद्ध करणारे आहे. आजच्या काळातही त्यांच्या विचारांचे महत्त्व कमी झालेले नाही. समाजात एकता आणि बंधुभाव निर्माण करण्यासाठी त्यांचे विचार प्रेरणादायी ठरतात.

### *संदर्भ*

१. र.चि. ढेरे, महाराष्ट्रातील संतपरंपरा, पुणे.


*ISBN-978-93-49938-45-8*

२. सेतुमाधवराव पगडी , महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास.

३. महाराष्ट्र साहित्य परिषद , मराठी संत साहित्य.

४. स्थानिक इतिहास अभ्यासक – श्रीगोंदा तालुका इतिहास.

५. Government of Maharashtra, महाराष्ट्र राज्य गॅझेटियर – अहमदनगर जिल्हा.

# महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळ आणि प्रबोधन

**बोडखे शिवानी विजय**

*एम.ए. I इतिहास विभाग, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, अहिल्यानगर.*

Email:

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19759514

*DOI: 10.5281/zenodo.19759514*

## प्रस्तावना

जागतिक इतिहासात मध्ययुगीन कालखंड हा अंधकारयुग मानले जाते. या काळात धर्मसत्तेचा राजसत्तेवर निरंकुश प्रभाव निर्माण झाला. धर्मगुरुंनी राजसत्तेवर निरंकुश प्रभाव निर्माण केला. धर्मगुरुंनी, धर्म व धर्मग्रंथांच्या नावाने सामान्य माणसाचे सर्वांगीण शोषण झाले. धर्मगुरुंनी राजसत्तेवर निरंकुश प्रभाव निर्माण केला. धर्मगुरुंनी, धर्म व धर्मग्रंथांच्या नावाने सामान्य माणसाचे सर्वांगीण शोषण केले. प्रस्थापितांच्या विरोधात सत्य सांगण्यासाठी कोणी धाडस करत नव्हते. सत्य सांगणाऱ्यास साधारण शिक्षेपासून मृत्युदंडापर्यंतची शिक्षा दिली जात होती. रुढी, परंपरा, अंधश्रद्धा आणि धर्मगुरूचा प्रभाव वाढलेला होता. राजेशाहीच्या नियंत्रणाखाली आल्यामुळे अनिती व अराजकता निर्माण झालेली होती.

इ. स. पंधराव्या शतकामुळे प्रबोधन किंवा सुधारणा युगाची सुरुवात झाली. प्रस्थापितांच्या विरोधात सत्य सांगण्यासाठी विचारवंत, बुद्धीवादी, विज्ञानवादी लोकांनी पुढाकार घेतला. अनेक युरोपियन राष्ट्रांमध्ये वैचारिक क्रांती घडून धर्मगुरुवर व राजेशाहीच्या विरोधात सत्य सांगण्याचे धाडस होऊ लागले आणि प्रबोधन वैचारिक जागृतीच्या माध्यमातून अनिरुद्ध परंपरा मोडण्यास तरुण पिढी सज्ज झाली. भारतातील सामाजिक सुधारणा चळवळ व प्रबोधन युगाची पहाट एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सुरु झाली. युरोपातील वैचारिक क्रांतीचा प्रचार-प्रसार भारतात पोहोचण्यास जवळपास साडेतीनशे ते चारशे वर्षांचा कालखंड लागला. वैचारिक क्रांतीच्या माध्यमातून बुद्धीवाद, तर्कनिष्ठा, शास्त्रीय, वैज्ञानिक विचारप्रणाली, व्यक्तीवाद, राष्ट्रवाद, मानवतावाद इत्यादी आधुनिक संकल्पना भारतीय समाजामध्ये रुजू लागल्या. मानवी जीवनाकडे पाहण्याचा नवीन आधुनिक दृष्टीकोन विकसित होऊ लागला. आधुनिक दृष्टीकोन व विचारसरणीतून भारतीय समाजव्यवस्थेचे परीक्षण व व पाश्चात्य विचारांच्या तुलनात्मक अभ्यास नवशिक्षित उच्च विद्याविभूषित तरुण पिढी करू लागली. भारताचा सामाजिक, धार्मिक, आर्थिक राजकीय मागासलेपणाबद्दल सविस्तर चर्चा विचार विमर्श होऊ लागली. भारतीय समाजात दीर्घ काळापासून रुजलेल्या अंधश्रद्धा, धार्मिक रुढी-परंपरा, अनीष्ट प्रथा, व्रतवैकल्ये वर्ण वर्ग व जाती व्यवस्था यासारख्या बुरसटलेल्या परंपरांवर वैचारिक हल्ले होऊ


*ISBN-978-93-49938-45-8*

लागले. पर्यायाने आधुनिक विचारकाडे प्रभावित झालेली तरुण पिढी प्रगतीसाठी, विकासासाठी विचारमंथन व संघर्ष करु लागली. सुधारणावाद्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजाच्या प्रगतीचा मार्ग मोकळा झाला. वैचारिक क्रांती व मूलभूत वैचारिक परिवर्तनाचा काळ म्हणजेच भारतीय प्रबोधनाची पहाट किंवा उषःकाल होय.

भारतीय प्रबोधन काळ हा द्वंद्वात्मक प्रक्रियेतून झाला. पाश्चात्य सत्ताधीश व धर्मप्रसारक यांच्याशी झालेल्या परस्पर संस्कृती, जीवनपद्धती, विचारप्रणाली व भौतिक विकासाच्या परिचयामधून सुरुवात झाली. परकीयांनी भारतीय मागासलेले आहेत त्यामुळे सातत्याने वेगवेगळ्या मार्गाने शोषण करून दडपून ठेवण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न केला. त्यामध्ये त्यास यशही मिळाले. यासाठी भारतीय संस्कृती, जीवनप्रणाली आणि अस्मिता व स्वाभिमान यावर प्रहार केल्यामुळे आपण आपले सर्व शोधण्याचा व महानता सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच मध्ययुगीन बुरसटलेल्या मागास विचारांची जागा आधुनिक विचारांनी घेतली. पर्यायाने आधुनिक भारताची वाटचाल सुरु झाली.

भारतीय सामाजिक प्रबोधन व सुधारणा चळवळीसाठी पूरक ठरलेले घटक म्हणजे ब्रिटिश आगमनानंतर मध्यम वर्गाचा उदय, पारंपरिक शिक्षणाऐवजी पाश्चात्य शिक्षणाचे प्रचार व प्रसार, मिशन त्यांचे सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक कार्य होय. भारतीय समाज व्यवस्थेतील दोन समाजगटांमधून ब्रिटिशांच्या भौतिक विकासाने नवीन वर्ग उदयास आला व वर्गाने पारंपरिक चालीरीती, रुढीपरंपरा यामध्ये अडकून न पडता आधुनिक विचार, जीवनमूल्ये, पाश्चात्य ज्ञानाचा अंगीकार केला.

भारतामध्ये दीर्घकाळापासून पारंपरिक शिक्षणाची व्यवस्था होती. परंतु ती कालबाह्य ठरली होती. शिक्षण हे वैचारिक प्रचार प्रसार व समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम होते. परकीय सत्ताधाऱ्यांनी पारंपरिक भारतीय शासन व जीवन पद्धती मोडीत काढली आणि नविन आधुनिक पद्धतीची सुरुवात केली. परस्परांच्या संपर्कामधून त्याच्या प्रभावाचे मूळ आधुनिक विचारप्रणाली, ज्ञानभांडार व भौतिक विकासामध्ये असल्याचे दिसून आले. म्हणून तरुणपिढी पाश्चात्य ज्ञान व शिक्षणाकडे आकर्षित झाली.

पाश्चात्य ज्ञानाचा प्रचार व प्रसाराबरोबरच ख्रिश्चन धर्मगुरु व मिशन त्यांनी भारतीय जनतेस आवश्यक त्या बाबींची पूर्तता करण्यास सुरुवात केली. प्रामुख्याने ब्रिटिश, पोर्तुगीज डच आणि फ्रेंचांच्या ज्याच्या ठिकाणी वसाहती, वखारी होत्या त्या ठिकाणी शाळांची सुरुवात केली. पाश्चात्य विचारवंत अभ्यासकांनी वेगवेगळ्या भारतीय भाषांचा अभ्यास करून पाश्चात्य ज्ञान भारतीयांना उपलब्ध करून दिले. प्राचीन भारतीय ग्रंथांचा अभ्यास करून जागतिक भाषेत प्रकाशित केले. सुरुवातीच्या काळात कंपनीसरकार व कालांतराने आलेले ब्रिटिश सरकारने वेगवेगळे, आयोग, मिशन नेमून पाश्चात्य भाषेतील ज्ञान व तत्वज्ञान भारतीय भाषांमध्ये आणून शिक्षणाचा प्रचार प्रसार केला. वेगवेगळ्या

प्रांतात मिशनऱ्यांनी शाळांची सुरुवात केली. शिक्षण संस्था ही स्थापन केल्या पाश्चात पारंपरिक शिक्षणाचे पुरस्कर्ते सुधारणावादी, पुरोगामी विचारवंत व सुधारक यशस्वी ठरले. पर्यायाचे आधुनिक भारतीय सामाजिक सुधारणा चळवळ गतिमान झाली. ब्रिटिश सरकारने शिक्षण विषयक सुधारणांमध्ये हंटर आयोग (१८८२) लॉर्ड मेकालेटा (१८३३) वुडचा खलिता (१८५४) इत्यादी आयोग नेमले. त्यांची अंमलबजावणी आणि सुधारणा यामधील आढावा घेऊन सुधारणा सुचविल्या.

आधुनिक भारताच्या इतिहासातील एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महत्त्वपूर्ण घटना घडल्या अठराव्या शतकाच्या अखेरीस भारताचे राजकीय विघटन झाले. संपूर्ण भारत शक्तीहीन दुर्बल बनला. भारतीय समाज अंधश्रद्धा, कर्मकांडांचे स्तोम, अंधानुकरण, शब्दसाम्राज्य, परंपरा, जाती, वर्ग, वर्णव्यवस्था विषमता इत्यादी अनिष्ट पद्धतीत अडकला. बुद्धीसाम्राज्य, तर्कनिष्ठा, आधुनिक नवतंत्रज्ञान प्राप्त करण्याची जिज्ञासा, चिकित्सक वैज्ञानिक दृष्टीकोनामुळे प्रगतीची सुरुवात राजकीय व सामाजिक अवनतीच्या काळात आधुनिक विचारप्रणालीचे मानवी जीवनाकडे पाहण्याच्या नवीन दृष्टीकोनामधून वैचारिक जागृतीचा प्रारंभ झाला. यामध्ये भौतिक भूमिका राजाराम मोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा फुले, आगरकर, केशव चंद्रसेन, व्दारकानाथ टागोर, दादोबा पांडुरंग, आत्माराम पांडुरंग, तर्खडकर, विठ्ठल रामाजी शिंदे, डॉ. आंबेडकर इत्यादी विचारवंत, सुधारकांचे योगदान महत्त्वाचे ठरते. भारतात एकोणिसाव्या शतकात वैचारिक क्रांतीमुळे सुधारणायुगाची सुरुवात झाली. सामाजिक सुधारणा चळवळीस वेगवेगळ्या शक्ती प्रेरक ठरल्या. वेगवेगळ्या विचारवंतांची मतांतरे आहेत. व्यापक दृष्टीने विवेचन केल्यास वसाहतवादी शासनाने निर्माण केलेल्या आव्हाना विरुद्धची भारतीयांची प्रतिक्रिया होती. सामाजिक सुधारणा मुख्य उद्देश परंतु परकिय सत्ताधीशांनी भारतीयांच्या आकसनावर आक्रमण केले. ते परतून लावून मानवी समाजात सुधारणा करणे, उच्च शिक्षण प्राप्ती बरोबर, पाश्चात्य व तुलनात्मक अभ्यास करणे, सामाजिक, धार्मिक सुधारणांमधून राजकीय व आर्थिक सुधारणा घडवून आणणे हे प्रमुख कतर्व्य होते. सुधारणावाद्यांमध्ये ही वेगवेगळे वैचारिक प्रवाह होते. परंतु सर्वांचे उद्दिष्टे किंवा ध्येय एकच म्हणजे मागासलेल्या भारतीय समाजाला सर्वांगिण प्रगतीचे साधन करणे, आधुनिक, ज्ञान, तत्वज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान मिळविणे.

भारतीय सामाजिक सुधारणा चळवळीवर पाश्चात्य विचार आणि सुधारकांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. अंतर्गत सुधारणा प्रामुख्याने बंगाल, महाराष्ट्र, पंजाब आणि उर्वरित भारतामध्ये झाल्याचे दिसते. तत्कालीन मुंबई प्रांतात एकोणिसाव्या शतकात मराठा साम्राज्याच्या उत्तरार्धात अर्थात पेशवाई काळात पारंपरिक रुढी परंपरा, बटुवैकल्य दिशाहीन अवस्था आली होती. म्हणून महाराष्ट्रात सामाजिक, धार्मिक सुधारणा करावयाचे असल्यास पाश्चात्य शिक्षण, ज्ञान, विज्ञान तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे गरजेचे असल्याची जाणीव आचार्य बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, आत्माराम, गोपाळ हरी देशमुख, महात्मा फुले, दादाभाई नौरोजी, महर्षि शिंदे तेलंग इ. झाली.


*ISBN-978-93-49938-45-8*

सामाजिक गुणदोषांचा अभ्यास आत्मपरिक्षण यश-अपयश आधुनिक जीवन मूल्यांचा स्वीकार केला. आधुनिक दृष्टीकोनाचा स्वीकार केला. या काळात धर्मांतरीतांना शुध्दीकरण करून स्वधर्मात परत घेणे, मद्यपान विरोध, बालविवाहास विरोध अशाप्रकारचे सुधारणावादी विचारप्रवाह सक्रीय झालेले होते. एखादी संस्था, संघटना वृत्तपत्र साप्ताहिके यांसारख्या प्रभावी प्रसार प्रचार माध्यमातून वैचारिक क्रांती सुरु झाली. कालबाह्य रुढीपरंपरा नाकारणे, अंधश्रद्धेवर परखड विचार मांडणे, पाश्चात्यांच्या मिशनरी शाळा प्रमाणे शाळांची स्थापना करून स्त्रीशिक्षणावर विशेष भर दिला. यमुना पर्यटनमधून बाल विधवेच्या ज्वलंत समस्येवर परखडपणे मांडणी केली. शतपत्रामधून लोकहितवादींनी, महात्मा फुलेंनी वर्ण, वर्ग, जाती व्यवस्थेवर परखड विचार मांडले.

संस्थात्मक कार्याला १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात परहंस मंडळी, प्रार्थना समाज, आर्यसमाज, सत्यशोधन सहयकारी मंडळी इत्यादींच्या माध्यमातून नैतिक मूल्य, धाडसाचा अंगीकार केला. आधुनिक विचारांचा स्वीकार पारसी समाजाने सुध्दा मोठ्या प्रमाणात केला व इतरांना सर्वोतोपरी सहकार्य केले. राष्ट्रीय पातळीवरील सुधारणाबरोबरच प्रांतीक पातळीवरही मोठ्या प्रमाणात सर्वांगिण प्रगती होत असल्यामुळे विचारवंताप्रमाणेच जनतेचा सहभाग वाढला. त्यामुळे यासाठी सरकारी पातळीवरही विविध कायद्यांच्या माध्यमातून सुधारणा युगाची सुरुवात झाली. सुशिक्षितांमध्ये बौध्दीकवाद, मानवतावादी उदारमतवादाचा प्रसार झाला. म्हणूनच समाज, विचार व पारंपरिक रुढींना धार्मिक ग्रंथामध्ये कोणताही आधार किंवा पुरावा नसल्याचे सिध्द झाले. सतीबंदी १८२९, विधवा विवाह संमती १८५६ यासाठी कायदे करण्यात आले. अमानुष, प्रयत्न केले. तर ईश्वरचंद्र विद्यासागरांनी विधवा पुनर्विवाह, महात्मा फुले यांनी केशवपन, आंतरजातीय विवाहासाठी, सामाजिक जागृती प्रबोधन केले. विवाह पद्धतीमुळे कित्येक मुलींवर लहानपणीच वैधव्य येत असे. पारंपरिक सामाजिक बंधनांमुळे जीवन असहाय होत असे. विधवांची समस्या ज्वलंत होती. त्यास दुर्लक्षित, अपमानित, असहाय जीवन जगावे लागे. त्यामुळे पुनर्विवाहाचा पुरस्कार करण्यात आला. मुलगी जन्माला येणे हा कुटुंबाला शाप वाटू लागला. सामाजिक, धार्मिक अडचणीबरोबरच आर्थिक अडचण वाढली विरोधात संपूर्ण भारतात वातावरण निर्मिती झाल्यानंतर कायदा करण्यात आला.

भारतामधील दासप्रथा अनिष्ट होती. गुलामाच्या खरेदी-विक्रीवर बंदी आणली. भारतीयांना उपयुक्त ठरतील अशा स्वरुपाचे कायदे करण्यासाठी कंपनी सरकारने पुढाकार घेतला. पण अत्यंत जागृतपणे सामाजिक स्थितीचे भान ठेवून विशेषत: व्यापारी व आर्थिक लुटीचे मुख्य ध्येय समोर ठेवून सुधारणा केल्या. ब्रिटिश भारतात व्यापारासाठी आले पण प्रत्येक बाबीचे भान ठेवून सर्तकतेने व्यापार विस्तार, वसाहवाद, भांडवलवाद, साम्राज्यवाद, हे दीर्घकाळ ठेवून संपूर्ण संस्था आपल्याला अधिपत्याखाली ठेवण्यासाठी परिस्थिती आढावा घेऊन सामाजिक धार्मिक सुधारणा व कायदे करण्यास सुरुवात केली. पारतंत्र्यातील राजेराजवाडे कायम, स्वातंत्र्य सार्वभौम गमावून बसले,

ब्रिटिशांनी सुध्दा कायम ठेवले. म्हणूनच भारतीयांच्या मनात परकियांच्या विरोधात सशस्त्र क्रांतीचे विचार प्रसार झाले. भारतीय जनतेने सुखा-समाधानाने जगावे, प्रतिकार करु नये, पारतंत्र्याची चीड व स्वातंत्र्याची भावना मनामध्ये येऊ नये यासा पुरेपूर काळजी घेतली.

भारतावर ब्रिटिश साम्राज्याचे दुरगामी परिणाम झाले. इंग्रजी भाषेमुळे वैचारिक प्रसार झाला. वेगवेगळ्या क्षेत्रात ठसा उमटविण्यास संधी निर्माण झाली. पाश्चात्य शिक्षणामुळे सामाजिक, भौतिक विकासाची पायाभरणी झाली. वैचारिक क्रांतीने संपूर्ण अवकाश झाले. सामाजिक प्रबोधनातून स्वातंत्र्य संग्रामाची सुरुवात झाली. भारतात सर्वांगिण परिवर्तन ब्रिटिशांच्या सत्ता सत्तास्थापनेमुळे झ रशियनक्रांती, चीन, जपानमधील आधुनिकीकरणामुळे भौतिक प्रगतीची सुरुवात झाली. रशिया-जपान युदधामुळे स्वातंत्र्याची सु झाली. जागतिक वैचारिक क्रांतीमुळे भारतीय सामाजिक, धार्मिक सुधारणा सुरु झाल्या. पर्यायाने आर्थिक, राजकीय स्वातंत्र्य मि यासाठी पाश्चात्य विचार आणि तत्वज्ञानाचा प्रभाव असल्याचे दिसून येते.

## *संदर्भ*

1. सामाजिक चळवळी आणि सरकार - शहा घनश्याम, डायमंड पब्लिकेशन पुणे - ३० २००२.
2. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास पवार जयसिंगराव, फडके प्रकाशन कोल्हापूर - १९९८
3. आधुनिक भारत - दीक्षीत वी.सी.पिंपळापुरे अँड कं. पब्लीशिअर्स नागपूर - २००३
4. आधुनिक भारताचा इतिहास - नलावडे व्ही. एल. सदेसाई बी. एन फडके प्रकाशन कोल्हापूर - २००४
5. भारतीय इतिहास - प्रा. जोशी स्मिता डायमंड प्रकाशन पुणे ३०-२००७
6. भारताचा इतिहास - डॉ. कोलारकर श. गो. मंगेश प्रकाशन नागपूर - २००३
7. प्राचीन भारताचा इतिहास गायधनी, राहुरकर, डायमंड प्रकाशन पुणे - ३०-१९९८
8. आधुनिक भारताचा इतिहास - बिपीनचंद्र, सुमिता सरकार - के सागर पुणे - २००५
9. आधुनिक भारताचा इतिहास - डॉ. वैद्य समुना डॉ. कोठकर शांता - श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर - १९९८


***ISBN-978-93-49938-45-8***

# पंढरपूरच्या वारी व प्रदूषण : एक ऐतिहासिक अभ्यास

**डॉ.चौधरी दत्तात्रय मल्हारी**

इतिहास विभाग प्रमुख, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर

Email: chaudhridattatray@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19759687

*DOI: 10.5281/zenodo.19759687*

## प्रस्तावना

पंढरपूर हे महाराष्टातील एक प्रमुख धार्मिक तीर्थक्षेत्र आहे. संतांचे माहेरघर वारकरी संप्रदायाचे आध्यपीठ 'दक्षिणकाशी', 'दक्षिणीद्वारका' म्हणून या तीर्थक्षेत्राचा उल्लेख केला जातो. आज महाराष्ट्रात प्रमुख तीर्थक्षेत्र अस्तित्वात आहेत. त्यामध्ये पंढरपूर (जि. सोलापूर), आळंदी (जि. पुणे), देहू (जि.पुणे), पैठण (जि.औरंगाबाद), नाशिक, तुळजापूर (जि.उस्मानाबाद), पिंपळनेर (जि.सोलापू), तेरढोकी (जि.उस्मानाबाद), मंगळवेढा (जि.सोलापूर ), नेवासे (जि.अहमदनगर ) इत्यादी तीर्थक्षेत्राचा समावेश होतो. या सर्व तीर्थक्षेत्रात पंढरपूरचे महात्म्य आगळेवेगळे आहे. या पंढरपूरवर अनेक राजे, राज्य संस्था, प्राचीन काळापासून अस्तित्वात होत्या. काळाच्या ओघात त्या नष्ट झाल्या, पण पंढरपूरच्या विठ्ठलाचे महत्व मात्र प्राचीन काळापासून टिकून असलेले दिसून येते. श्री विठ्ठलाने महाराष्ट्रातील व कर्नाटकातील माणसांच्या हृदयात वेगळे स्थान निर्माण केले.महाराष्टातील संतानी पंढरपूरचे महत्व मुक्तकंठाने गायिले आहे. संतांनी या पंढरपूर तीर्थक्षेत्रास 'भूवैकुंठ' ही संज्ञा दिली. श्री संत नामदेव महाराजांच्या मते 'पंढरीनगर अनादिकालापासून चंद्रभागेच्या तीरी उभी आहे.' या पवित्र तीर्थात स्नान करताच दुःखाची निवृत्ती होते. 'श्री च्या दर्शनाने भक्त भाविक अवघाची सुखरूप होतो, तर श्री संत चोखामेळा म्हणतात, 'पंढरीच्या सुखा अंतपार नाही लेखा.' या चंद्रभागेच्या वाळवंटात श्री संत निवृत्तीनाथ, श्री संत ज्ञानेश्वर, श्री संत सोपानदेव, संत मुक्ताबाई, श्री संत नामदेव महाराज, श्री संत तुकाराम महाराज इत्यादी सर्व संत अभंगात, किर्तनात रंगून गेले. श्री संत नामदेव महाराजांची दासी जनाबाईची भावभक्तिची गाणी येथेच रंगली.श्री संत गोरा कुंभार, श्री संत सावता माळी, श्री संत दामाजीपंत इत्यादी संतानी या पंढरपूर तिर्थक्षेत्राचा अगाध महिमा सर्वत्र वाढविला.

## पंढरपुरातील प्रमुख चार वाऱ्या किंवा यात्रा

पंढरपूरच्या प्रमुख चार वाऱ्या म्हणजे चैत्री वारी , आषाढी वारी , कार्तिकी वारी ,आणि माघ वारी होय. याची माहिती खालीलप्रमाणे—

### चैत्रीवारी ( मार्च )

भारतीय हिंदू संस्कृती प्रमाणे चैत्र महिन्यात ही वारी भरते. लाखों भाविक पंढरपूरात विठ्ठल दर्शनासाठी येतात. चंद्रभागेत स्थान , श्री विठ्ठलदर्शन , क्षेत्र प्रदक्षेणा करून भजनामध्ये भक्त भाविक तल्लीन होऊन जातो. या वारीस आलेले भाविक श्री विठ्ठल दर्शन घेऊन खांद्यावर कावड घेऊन वाजत-गाजत शिखर-शिंगणापूरच्या शंभू महादेवाच्या दर्शनाला जाऊन येतात. ‘ पुंडलिक वरदहरी विठ्ठल ’ या नामघोषाबरोबर ‘ हरहर महादेव ’ ही गर्जना आसमंतात घुमते.[१]

### आषाढी वारी ( जून-जुलै ) :-

वारकरी संप्रदायाचीही अत्यंत महत्वाची वारी मानली जाते. आषाढी ते कार्तिकी या चार महिन्यांचा काळ हा ‘ चातुर्मास ’ म्हणून ओळखतात. या चार महिन्याच्या कालावधीत हजारो वारकरी पंढरपुरात मठ, मंदिरे, धर्मशाळा इत्यादी ठिकाणी राहून भजन, कीर्तन या कार्यक्रमात सहभागी होतात. तसेच भागवत धर्माचा अभ्यास करतात.

या सर्वात मोठ्या यात्रेसाठी सहा ते सात लाख भाविक संतांच्या पालख्यां-समवेत व अन्य मार्गाने पंढरपुरात दाखल होतात. साधारणतः हा काळ वर्षाऋतूचा काळ आहे. शेतकरी वर्ग शेतात पेरणी करून श्री विठ्ठल दर्शनासाठी पंढरपूरात दाखल होतो. या यात्राकाळात भीमा नदी दुथडी भरून वाहते आणि अशाप्रकारे एकंदरीत वातावरण हे आल्हाददायक झालेले असते. वारक-या प्रमाणे अनेक व्यापारी आपल्या मालाची विक्री करण्यासाठी दुकाने मांडून बसतात. अनेक संताच्या पालख्यांचे आगमन होते.[२]

### कार्तिकी वारी ( ऑक्टोबर-नोव्हेंबर )

भारतीय हिंदू संस्कृतिप्रमाणे कार्तिकी महिन्यातील एकादशीस पंढरपुरात मोठी यात्रा भरते. या यात्राकाळात नदीच्या वाळवंटात जागोजागी कीर्तन चालू असतात. पंढरपुरातील मठ , मंदिरांतून , धर्मशाळांतून कीर्तने , भजनाचे कार्यक्रम चालतात. एकादशीच्या दिवशी श्री विठ्ठलाचा रथ नगरप्रदक्षिणेला निघतो आणि पौर्णिमेच्या दिवशी गोपाळकाला आणि दुस-या दिवशी मंदिरात महाव्दार काला होतो. या कार्तिक वारीचे वैशिष्टय म्हणजे या यात्रेस कर्नाटकातून दिंड्यांसह लाखो भाविक पंढरपुरात दाखल होतात.[३]

### माघ वारी : ( डिसेंबर )

पंढरपुरातील ही चौथी वारी होय.भारतातील हिंदू संस्कृतिप्रमाणे माघ महिन्याच्या शुद्ध एकादशीस ही यात्रा भरते. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेशातून मोठ्या प्रमाणात भाविक दाखल होतात. यावरून तामिळ, तेलगू भाविकांमध्येही श्री विठ्ठलाविषयी व भागवत धर्माविषयी किती जिव्हाळा आहे हे दिसून येते. पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या वारीचे सर्वात महत्त्व म्हणजे या वारीच्या निमित्ताने देशाच्या विविध


*ISBN-978-93-49938-45-8*

प्रांतांतील भाषिकांना भागवत धर्माच्या माध्यमातून एकत्र आणण्याचे कार्य होते. लाखो भाविक जात, धर्म, पंथ, भेद विसरून पंढरपुरात श्री विठ्ठलाच्या दर्शनास यात्राकाळात दाखल होतात.[४]

पंढरपूरच्या यात्रे मुळे होणारे प्रदूषण : पंढरपूरचे दैवत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दररोज आणि वर्षातून येणाऱ्या प्रमुख चार वाऱ्यासाठी लाखो वारकरी पंढरपूर मध्ये येत असतात . या मोठ्या यात्रेमुळे धार्मिक उत्साह वाढतो पण त्याच बरोबर पर्यावरणीय प्रदूषणाचा प्रश्न निर्माण होतो . यामध्ये जलप्रदूषण, घनकचरा प्रदूषण ,वायू प्रदूषण , ध्वनी प्रदूषण , इत्यादी होय.

- **जलप्रदूषण:** भीमा ही कृष्णेची प्रमुख उपनदी असून तिची लांबी सुमारे ८६७ कि.मी.व जलवहनक्षेत्र सुमारे ७०,६१३ चौरस कि.मी.आहे. “भीमरथा”, “भीमरथी” ही तिची इतर नावे आहेत.सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर येथे तिचे पात्र चंद्रकोरीप्रमाणे दिसते.त्यामुळे तेथे ती “चंद्रभागा” म्हणून ओळखली जाते. सोलापूर जिल्ह्याच्या आग्नेय दिशेने भीमा नदी वाहते.नदीच्या उजव्या तीरावर पंढरपूर हे धार्मिक तीर्थक्षेत्र वसले आहे. या भीमा नदीला धर्मिकदृष्टीकोनातून महत्वाचे स्थान आहे पंढरपूरमध्ये येणारा वारकरी नदी पात्रात अंघोळ केल्या शिवाय तो विठ्ठल मंदिरात दर्शनाला जावू शकत नाही, त्यामुळे साबण-डिटर्जंट वापरमुळे नदी पत्रातील पाणी दुषित होते. तसेच वारकरी पूजेची सामुग्री नदी पात्रात टाकल्यामुळे तसेच प्लास्टिक व कचरा नदी पात्रात जात असल्यामुळे जलप्रदूषण समस्या निर्माण होते.[५]
- **घनकचरा प्रदूषण:** पंढरपूर धार्मिक तीर्थक्षेत्र असल्यामुळे पंढरपूरमध्ये दररोज हजारों वारकरी विठ्ठल दर्शनाला येत असतात तसेच यात्रेला तर लाखो वारकरी पंढरपूर मध्ये येत असतात.त्यामुळे प्लास्टिक पशव्या पाण्याच्या बाटल्या व थर्माकोल व फुलमाळा , अन्नाचा उरलेला कचरा या मुळे पंढरपूरमध्ये घनकचऱ्याचा प्रश्न निर्माण होतो त्यामुळे पंढरपूर मध्ये घनकचरा प्रदूषणमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येते.[६]
- **वायूप्रदूषण:** पंढरपूर धार्मिक तीर्थक्षेत्र असल्यामुळे पंढरपूरमध्ये दररोज हजारों वारकरी विठ्ठल दर्शनाला येत असतात तसेच यात्रेला तर लाखो वारकरी पंढरपूर मध्ये येत असतात. त्यामुळे पंढरपूरमध्ये वाहनांची मोठी गर्दी दिवसेन दिवस वाढत चालली आहे. त्यामुळे वाहनांतून मोठ्या प्रमाणावर धूर बाहेर पडत आहे तसेच धूळ यामुळे पंढरपूरच्या वायू प्रदूषणात वाढ होत आहे.[७]
- **ध्वनीप्रदूषण:** पंढरपूर धार्मिक तीर्थक्षेत्र असल्यामुळे यात्रेला लाखो वारकरी पालख्या, दिंड्याच्या पंढरपूर मध्ये येत असतात.त्यामुळे मोठ मोठे स्पीकर लावले जातात ढोल ताशे, टाळ मृदंग यामुळे यात्रा काळात ध्वनीप्रदूषण मोठ्या प्रमाणात पंढरपूर मध्ये निर्माण होते .

## प्रदुषणाचे दुष्परिणाम

पंढरपूरच्या यात्रेमुळे धार्मिक उत्साह वाढतो पण त्याच बरोबर पर्यावरणीय प्रदूषणाचा प्रश्न निर्माण

होतो. यामध्ये जलप्रदूषण, घनकचरा प्रदूषण, वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, इत्यादी होय. या प्रदुषणाचे दुष्परिणाम होताना दिसून येतात, भीमा नदीचे पाणी दुषित होवून आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. तसेच शहरात दुर्गंधी व अस्वच्छता दिवसेनदिवस वाढत आहे, तसेच कचरा व प्लास्टिक पिशव्या मुळे प्राणी व पक्षावर त्याचे दुष्परिणाम जाणवतात. तसेच पंढरपूर शहरामध्ये वाहनांची संख्या वाढल्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते तसेच त्याचा शहरातील नागरिकांना त्रास होत असताना दिसून येतो.[८]

## प्रदूषण रोखण्यासाठी खालील उपाययोजना राबविल्या पाहिजेत

पंढरपूर शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी प्लास्टिक कडक अंमलबजावणी केली पाहिजे. स्वयंमसेवा संस्था , नगरपालिका , शाळा व महाविद्यालये यांच्या मदतीने नदी स्वच्छता व शहर स्वच्छता मोहीम राबविली पाहिजे. तसेच नगरपालिकेच्या माध्यमातून कचऱ्याचे व्यवस्थापन केले पाहिजे. तसेच पंढरपूर शहरात नगरपालिकेच्या मध्यमातून सार्वजनिक वाहतूक व पार्किंगचे नियोजन करावे. तसेच पंढरपूर मध्ये येणाऱ्या जनजागृती करणे आवश्यक आहे. तसेच जैवविघटनशील पुजेची सामग्री वापरणे बंधनकारक करावे.[९]

## निष्कर्ष

पंढरपूरची यात्रा हि महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे .लाखो वारकऱ्यांचे  ते श्रद्धास्थान आहे. पंढरपूरचा पर्यावरणाचा प्रश्न दिवसेन दिवस वाढत चाललेंला आहे.  त्यासाठी पर्यावरणाचे रक्षण करणे हि सर्वांची जबाबदारी आहे पंढरपूर नगर परिषद पंढरपूरच्या  माध्यमातून शहर स्वच्छते प्रयत्न केले जातात. सर्व नागरिकांनी व यात्रेकरुंनी  स्वच्छता आणि शिस्त राखल्यास धार्मिक उत्सव आणि पर्यावरण यांचा समतोल साधता येते असे वाटते.

## *संदर्भ*

1. Gazetteer of the Bombay Presidence, Solapur District P.400
2. बेणारे गोपाळ, राणा पंढरीचा, पंढरपूर १९९३, पृ.३२
3. जोशी तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश खंड १२ वा, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९८५, पृ. ५२९
4. जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृत कोश, खंड ६ वा, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे, १९७०, पृ. ५४८
5. ढेरे रा. चिं., विठ्ठल एक महासमन्वय, पुणे १९८४, पृ.६५.
6. सांवजी अ. व्यं., श्री विठ्ठल स्थापनेची मीमांसा, नागपूर १९४८, पृ.१७
7. भिंगारकर कृ. ज्ञा., श्री विठ्ठल महात्म्य, पुणे १९९६, पृ.१६.
8. बहिरट भा. पं. व भालेराव, प. ज्ञा., वारकरी संप्रदाय उदय व विकास, पुणे १९८८, पृ.१४.
9. Delary G.A., The cult of Vithoba, Pune 1960, P.29.


*ISBN-978-93-49938-45-8*

# राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक समता कार्य : एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. सरला ब्रम्हदेव चव्हाण**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा

Email: sarlachavan028@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19759775

*DOI: 10.5281/zenodo.19759775*

**प्रस्तावना**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात कोल्हापूर संस्थानचे राजे राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी आपल्या राज्यकारभाराचा उपयोग केवळ राजवैभवासाठी न करता समाजातील शोषित, वंचित आणि पीडित घटकांच्या उन्नतीसाठी केला. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि आर्थिक क्षेत्रात त्यांनी अनेक क्रांतिकारक सुधारणा करून लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श निर्माण केला. बहुजन समाजाला शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक हक्क मिळवून देण्याच्या कार्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात लोकप्रिय झाले.

शाहू महाराजांनी मा. फुले यांनी सुरु केलेल्या समाजसुधारणेच्या चळवळीला पुढे नेण्याचे कार्य केले. समाजातील पारंपरिक बंधने तोडून बहुजन समाजाला प्रगत बनविणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले. त्यांच्या कार्यामुळे कोल्हापूर संस्थान सामाजिक न्याय आणि समतेचे केंद्र बनले. त्यामुळे ते प्रजाहितदक्ष राजा आणि बहुजन समाजाचे खरे नेते म्हणून ओळखले जाऊ लागले.

भारतामध्ये ब्रिटिश काळात सुमारे ६६४ संस्थाने होती. त्यापैकी बहुतेक संस्थानांचे शासक विलासी जीवन जगत होते. परंतु काही संस्थानांनी लोककल्याणकारी कार्याला प्राधान्य दिले. त्यामध्ये करवीर अर्थात कोल्हापूर आणि बडोदा संस्थानांचा उल्लेख विशेषत्वाने करता येतो. कोल्हापूरचे राजे शाहू महाराज हे ज्योतीराव फुले व डॉ. आंबेडकर यांच्या विचारांना जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरले. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. भारताच्या इतिहासात स्त्रिया, शूद्रातिशूद्रांना समान अधिकार देण्यासाठी प्रस्थापित व्यवस्थेशी संघर्ष करणारे ते एकमेव राजे म्हणून ओळखले जातात.[१]

सन १८९९ च्या ऑक्टोबर महिन्यात शाहू महाराजांच्या आयुष्यात एक महत्त्वाचा प्रसंग घडला. ते पंचगंगा नदीच्या तीरावर कार्तिक महिन्यात पहाटे स्नानासाठी जात असत. त्या वेळी दरबाराकडून वेतन घेणारा नारायण भटजी मंत्र म्हणत असे. परंतु एका प्रसंगी वेदोक्त मंत्र म्हणण्यास नकार देण्यात आल्यामुळे शाहू महाराजांना सामाजिक विषमतेची तीव्र जाणीव झाली. या घटनेमुळे त्यांनी

समाजातील धार्मिक क्षेत्रातील अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचा निर्धार केला [२]
समाजातील देव आणि माणूस यांच्या दरम्यान मध्यस्थ म्हणून कार्य करणाऱ्या भटजी वर्गामुळे बहुजन समाजाची पिळवणूक होत असल्याचे त्यांना जाणवले. यापूर्वी ज्योतीराव फुले यांनी सत्यशोधक समाज स्थापन करून धार्मिक मध्यस्थीला विरोध केला होता; परंतु त्या प्रथेला पूर्णपणे आळा बसला नव्हता. शाहू महाराजांनी ही परिस्थिती बदलण्यासाठी धार्मिक क्षेत्रातील मक्तेदारी मोडण्याचा निर्णय घेतला.

धार्मिक क्षेत्रातील ब्राह्मणांचे वर्चस्व कमी करण्यासाठी शाहू महाराजांनी "मराठा पुरोहित" तयार करण्याचा निर्णय घेतला. १५ जून १९२० रोजी त्यांनी लेखी आज्ञा काढून राजवाड्यातील सर्व धार्मिक विधी मराठा पुरोहितांमार्फतच करण्यात येतील असे जाहीर केले. या कार्यासाठी रावबहादूर डोंगरे आणि मामासाहेब खानविलकर यांना विशेष जबाबदारी देण्यात आली. या निर्णयामुळे धार्मिक क्षेत्रातील एकाधिकार मोडून बहुजन समाजाला धार्मिक अधिकार मिळण्याचा मार्ग खुला झाला.[३]

शाहू महाराजांनी समाजातील वंचित घटकांच्या पुनर्वसनासाठीही अनेक उपाययोजना केल्या. फासेपारधी समाज चोरी-दरोडे का करतो याचा शोध घेताना त्यांना गरिबी आणि बेरोजगारी हे त्यामागील मुख्य कारण असल्याचे लक्षात आले. कटकोल येथे चोरीच्या तक्रारी आल्यावर त्यांनी फासेपारधी लोकांना दरबारात बोलावले. त्यावेळी एका व्यक्तीने "आम्हाला कोणी काम देत नाही म्हणून आम्ही चोरी करतो" असे स्पष्टपणे सांगितले. या उत्तरामुळे शाहू महाराजांना सामाजिक समस्येचे मूळ कारण समजले.[४]

यानंतर त्यांनी फासेपारधी समाजाला रोजगार देण्याचा निर्णय घेतला. काहींना आपल्या छावणीत पहारेकरी म्हणून नेमले, तर इतरांना अन्नधान्य आणि बांधकामांची कामे देण्यात आली. सोनतळी कॅम्पवर विविध कामे उपलब्ध करून देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात आले. प्रेम, सहकार्य आणि विश्वासाच्या आधारे समाज सुधारण्याचा हा एक आदर्श प्रयोग होता.[५]

एकदा त्यांच्या प्रामाणिकतेची परीक्षा घेण्यासाठी शाहू महाराजांनी आपल्या बंधू बापूसाहेबांना सोनतळी कॅम्पवर पाठवले. पहारेकरी असलेल्या फासेपारधीने महाराजांच्या आदेशाचे पालन करून बापूसाहेबांनाही आत प्रवेश दिला नाही. नंतर शाहू महाराज स्वतः बाहेर येऊन त्या पहारेकऱ्याचे कौतुक केले. या घटनेवरून योग्य संधी दिल्यास कोणताही समाज प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ बनू शकतो, हे स्पष्ट झाले.[६]

शाहू महाराजांनी शिक्षणाच्या प्रसारासाठीही मोठे कार्य केले. गारगोटी परिसरात लोकांनी मुलींसाठी शाळा सुरु करण्याची मागणी केल्यावर त्यांनी तात्काळ आदेश देऊन मुलींची शाळा सुरु केली. तसेच त्या भागातील पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर उपाय म्हणून जवळच्या झऱ्याचे पाणी गारगोटीत आणण्याची योजना आखली.


*ISBN-978-93-49938-45-8*

शिरोळ येथे मुक्काम असताना त्यांनी नरसोबाचीवाडी येथे भेट दिली. तेथे श्री दत्त मंदिर नरसोबाचीवाडी परिसरात मोठ्या संख्येने कुष्ठरोगी भिकारी दीनवाण्या अवस्थेत बसलेले पाहून त्यांना अत्यंत दुःख झाले. अंधश्रद्धेमुळे तेथे रोग बरा होतो अशी समजूत असल्याने अनेक रुग्ण तेथे जमा होत होते. ही परिस्थिती पाहून शाहू महाराजांनी त्या लोकांसाठी स्वतंत्र वसाहत उभारण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून त्यांची योग्य काळजी घेता येईल.[७]

राजर्षी शाहू महाराजांच्या कारकीर्दीत सामाजिक न्यायासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सन १९०२ मध्ये त्यांनी मागासवर्गीयांना सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण देऊन भारतातील आरक्षण व्यवस्थेचा पाया घातला. तसेच अस्पृश्यता निवारणासाठी अनेक सामाजिक उपक्रम राबवले. कोल्हापूर संस्थानात १९१७ मध्ये मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण लागू करण्यात आले. विविध जाती-धर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभारण्यात आली.

शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकर यांच्या शिक्षणासाठी आणि 'मूकनायक' या वृत्तपत्रासाठी आर्थिक मदत केली. त्यामुळे दलित समाजाच्या जागृतीस मोठे बळ मिळाले. स्त्री शिक्षणालाही त्यांनी प्रोत्साहन दिले. १ जानेवारी १९१७ रोजी विधवा पुनर्विवाहाला कायदेशीर मान्यता देण्यात आली, तर १९१९ मध्ये आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहाला कायदेशीर मान्यता देणारा कायदा करण्यात आला.[८]

ग्रामीण भागातील आर्थिक स्थिती सुधारण्यासाठीही त्यांनी अनेक उपाययोजना केल्या. जुलमी बलुतेदारी पद्धत बंद करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. दुष्काळाच्या काळात जनावरांसाठी चारा आणि पाण्याची व्यवस्था करण्यात आली. शेतकऱ्यांना कर्ज देऊन त्यांना शेतसाऱ्यात सवलत देण्यात आली. सावकारांच्या तावडीतून जमिनी सोडवून देण्याचे प्रयत्नही करण्यात आले. तसेच गरजूंसाठी अन्नछत्र सुरु करण्यात आले.

एकूणच राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सामाजिक न्याय, समता आणि लोककल्याण यांचा आदर्श निर्माण केला. त्यांनी शिक्षणाचा प्रसार, आरक्षण, अस्पृश्यता निवारण, स्त्री शिक्षण आणि सामाजिक सुधारणा यांद्वारे समाजात समतेची भावना निर्माण केली. ज्योतीराव यांच्या समाजसुधारणेच्या कार्याला त्यांनी पुढे नेले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यालाही पाठबळ दिले.[९]

म्हणूनच राजर्षी शाहू महाराज हे केवळ कोल्हापूर संस्थानाचे राजे नव्हते, तर सामाजिक समतेचे महानायक व दीन-दलितांचे खरे कैवारी होते. त्यांच्या कार्यामुळे आधुनिक महाराष्ट्रात लोककल्याणकारी व समताधिष्ठित राज्यकारभाराचा आदर्श निर्माण झाला. महात्मा ज्योतीराव फुले यांनी सुरु केलेल्या समाजसुधारणेच्या कार्याला पुढे नेण्याचे महत्त्वपूर्ण काम शाहू महाराजांनी केले, तसेच बी.आर. आंबेडकर यांच्या कार्यालाही त्यांनी पाठबळ दिले. त्यांच्या कार्यामुळे बहुजन

समाजाला शिक्षण, स्वाभिमान व सामाजिक हक्क मिळण्याचा मार्ग खुला झाला. त्यामुळे राजर्षी शाहू महाराज हे केवळ कोल्हापूर संस्थानाचे राजे नव्हते, तर सामाजिक समतेचे महानायक, दीन-दलितांचे कैवारी व आधुनिक महाराष्ट्राच्या समाजपरिवर्तनातील एक महत्त्वाचे प्रेरणास्थान होते. त्यांच्या कार्यामुळे भारतात लोककल्याणकारी आणि समताधिष्ठित राज्यकारभाराचा आदर्श निर्माण झाला. आपल्या संस्थानामध्ये सामाजिक समता प्रस्थापित केली.

## *संदर्भ*


1. ओहोळ डी.आर, 'लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज', मुलनिवाशी पब्लिकेशन ट्रस्ट पुणे. प्रथम आवृत्ती २५ वे महाराष्ट्र राज्य अधिवेशन, विशाखापट्टनम, आंध्रप्रदेश, पृ. क्र. १५.
2. कोल्हापूर राज्य दप्तर, शाहू महाराज चरित्र, पृ. क्र. ४५.
3. पवार शिरीष, 'राजषी छत्रपती शाहू महाराज विचार आणि कार्य', सधादी प्रकासन, पुन, प्रथम आवृत्ती २६ जून २०१२ पृ. क्र. १०२.
4. साळुंखे नानासाहेब, 'शाहूंच्या आठवणी', वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती १४ जानेवारी २०१३, पृ. क्र. ११८.
5. राजवाडे वि.का, कोल्हापूर संस्थानाचा इतिहास, राजवाडे संशोधन मंडळ, पुणे पृ. क्र. १५६.
6. शंकरराव खरात, बहुजन चळवळीचा इतिहास, कान्टीनेनटल प्रकाशन पुणे, पृ. क्र. ९२.
7. पवार जयसिंगराव, 'राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य', महाराष्ट्र इतिहास प्रबोधीनी. कोल्हापूर, प्रथम आवृत्ती १ जानेवारी २०१२, पृ. क्र. ३३.
8. जाधव भगवानराव (संपा.), 'राजर्षी श्री. शाहू महाराजांची भाषणे', लोकवाङ्मय गृह, मुंबई, चौथी आवृत्ती मे २००९, पृ. क्र. १२,१६.
9. बागल माधवराव (संपा.), 'सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ १९३०', समता सैनिक दल. नागपूर, पुर्नरप्रकाशन धम्मचक्रप्रवर्तन दिन, २००२, पृ. क्र. १२८.



***ISBN-978-93-49938-45-8***

# प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था: एक अभ्यास

**डॉ. प्रमोद कोंडाजी चव्हाण**
इतिहास विभाग, सह-प्राध्यापक, श्री सद्‌गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट अँण्ड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव
Email: dr.chavanpramod778@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19759955
*DOI: 10.5281/zenodo.19759955*

## प्रस्तावना

प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था ही जगातील सर्वात प्राचीन, समृद्ध आणि मूल्याधिष्ठित शिक्षण व्यवस्थांपैकी एक मानली जाते. प्राचीन भारतीय संस्कृतीत शिक्षणाला अत्यंत उच्च स्थान होते. शिक्षण हे केवळ उपजीविकेसाठी नसून मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी होते. या शिक्षण व्यवस्थेचा मुख्य उद्देश केवळ ज्ञानप्राप्ती नसून आत्मज्ञान, चारित्र्यनिर्मिती, नैतिकता आणि समाजोपयोगी जीवन घडवणे हा होता. गुरु–शिष्य परंपरेवर आधारित गुरुकुल पद्धती, वेद-उपनिषदांचे अध्ययन, तसेच तक्षशिला व नालंदा यांसारखी आंतरराष्ट्रीय कीर्तीची विद्यापीठे ही या शिक्षण व्यवस्थेची वैशिष्ट्ये होती. भारतातील शिक्षण व्यवस्था वेदकाळापासून बौद्धकालापर्यंत सातत्याने विकसित होत गेली. नैतिकता, शिस्त, आत्मज्ञान आणि समाजोपयोगी जीवन ही शिक्षणाची प्रमुख घटक होती. भारतीय शिक्षणाने मानवाच्या सर्वांगीण तसेच शारीरिक, बौद्धिक, नैतिक व आध्यात्मिक या विकासावर भर दिला.

प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था अनेक अंगांनी समृद्ध असली तरी ती सर्वसमावेशक नव्हती. सामाजिक रचना, जातिव्यवस्था, स्त्रियांच्या शिक्षणावरील निर्बंध आणि लिखित शैक्षणिक साधनांचा अभाव यांमुळे शिक्षणाचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत समान रीतीने पोहोचू शकला नाही. त्यामुळे प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्थेला काही महत्त्वाच्या मर्यादा होत्या, ज्या तिच्या विकासाला आणि व्यापक सामाजिक परिवर्तनाला अडथळा ठरल्या. या मर्यादांचा अभ्यास केल्यास प्राचीन शिक्षण व्यवस्थेचे वास्तव स्वरुप समजून घेता येते आणि आधुनिक शिक्षण व्यवस्थेसाठी उपयुक्त धडे घेता येतात.

## प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था

प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था ही जगातील अत्यंत प्राचीन, समृद्ध व मूल्याधिष्ठित शिक्षण व्यवस्थांपैकी एक होती. या शिक्षणाचा मुख्य उद्देश केवळ ज्ञानप्राप्ती नसून मानवाचा शारीरिक,

बौद्धिक, नैतिक व आध्यात्मिक विकास करणे हा हे होते. गुरु–शिष्य परंपरेवर आधारित ही शिक्षणपद्धती भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब निर्माण झालेले होते. गुरुकुल ही प्राचीन शिक्षण व्यवस्थेची मुख्य गाभा होता. विद्यार्थी गुरूच्या आश्रमात राहून शिक्षण घेत असे. गुरु हा केवळ शिक्षक नसून शिष्याचा मार्गदर्शक व पालक मानला जात गुरुगृही राहून शिष्याचे शिक्षण पूर्ण झाल्यावर तो गुरूला गुरुदक्षिणा देत होता. शिस्त, सेवाभाव व संयम यांना गुरुकुल जीवनात विशेष महत्त्व प्राप्त होते. प्राचीन शिक्षणाची ज्ञानग्रहण करण्याची भाषा हि संस्कृत होती त्यात वैदिक शिक्षणासाठी महत्वाची होती तर पाली व प्राकृत हि भाषा बौद्ध शिक्षणासाठी उपयुक्त होती त्यातून विद्यार्थी आपले ज्ञानग्रहण करत असे.

प्राचीन शिक्षण व्यवस्था मौखिक परंपरेवर विशेष भारल दिलेला होती. वेदांचे अध्ययन पाठांतराने केले जाई. श्रवण, मनन व निदिध्यासन या पद्धतींनी ज्ञान आत्मसात केले जाई. शिक्षण जीवनाशी निगडित होते आणि सर्वांगीण विकासावर भर होता. अभ्यासक्रमात धार्मिक व लौकिक दोन्ही प्रकारचे विषय समाविष्ट होते. वेद, उपनिषदे, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान यांसोबतच गणित, खगोलशास्त्र, आयुर्वेद, धनुर्विद्या, संगीत, नृत्य, चित्रकला यांचा अभ्यास केला जात असे. यामुळे विद्यार्थी व्यवहारक्षम व स्वावलंबी बनत असे.

बौद्ध काळात शिक्षण विहार व महाविहारांमध्ये दिले दिसून येते. त्या वेळी शिक्षण सर्वांसाठी खुले होते व ते पाली भाषा मध्ये दिले जात असे. नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला ही बौद्ध शिक्षणाची प्रमुख केंद्रे त्या काळात निर्माण झाली होती. येथे देश-विदेशातून विद्यार्थी शिक्षणासाठी येत. प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्थेची उद्दिष्टे व्यापक व जीवनोपयोगी होती. आत्मज्ञान व आत्मोन्नती, चारित्र्यनिर्मिती, नैतिक मूल्यांची जोपासना, समाजोपयोगी जीवन घडवणे आणि मोक्षप्राप्ती साधणे ही त्यातील प्रमुख उद्दिष्टे होती. शिक्षणाने व्यक्तीला कर्तव्यनिष्ठ, संयमी व सुसंस्कृत बनवावे, असी पद्धत होती.

प्राचीन शिक्षणाचा सर्वात महत्त्वाचा उद्देश म्हणजे स्वतःची ओळख  म्हणजेच आत्मज्ञान करून घेणे असे होते.  उपनिषदांमध्ये मनुष्याने आपल्या देह, इंद्रिये व अहंकारापलीकडे जाऊन आत्मस्वरुपाची ओळख करून घ्यावी. तसेच व्यक्ती स्वतःला केवळ शरीर किंवा व्यक्तिमत्त्व म्हणून न पाहता स्वतःमध्ये ब्रह्मतत्त्वाची अनुभूती करून घेणे, यालाच आत्मज्ञान जागृत करणे यांसारख्या संकल्पनांद्वारे आत्मशोधावर भर देण्यात आला. शिक्षणाच्या माध्यमातून मानवाने आपल्या आत्म्याचा विकास करावा व मोक्षमार्गाकडे वाटचाल करावी, असी प्राचीन शिक्षण पद्धती निर्माण झालेली होती. यानुसार शिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्याला हे जाणवून देणे होता की मानवाचा आत्मा आणि परमात्मा एकच आहेत. त्यामुळे अज्ञान, अहंकार व आसक्ती यांपासून मुक्ती मिळवणे हे शिक्षणाचे ध्येय होते. प्राचीन शिक्षण व्यवस्थेत मानवाच्या आत्मा त्याची उन्नती ही नैतिक, बौद्धिक व आध्यात्मिक उन्नतीशी


ISBN-978-93-49938-45-8

निगडित होती. गुरुकुलात विद्यार्थ्यांना संयम, ब्रह्मचर्य, साधेपणा, सेवा व ध्यान यांचा अभ्यास करूनघेत असे. या माध्यमातून मन शुद्ध होत असे व व्यक्तीचा आत्मिक विकास होत असे. त्याच बरोबर मानवाच्या नैतिक मूल्यांची जोपासना होत असे या सर्व नुसार प्राचीन काळाचा अभ्यास केला असता सत्य, अहिंसा, संयम धर्म, कर्तव्य, सदाचार व अध्यात्म यांचा शिक्षणात समावेश होता. शिक्षणाने व्यक्तीमध्ये नीतीमूल्ये, श्रद्धा व आत्मसंयम विकसित व्हावेत, अशी अपेक्षा होती. त्यामुळे समाजात शांती, सहकार्य व समन्वय टिकून राहिला. गुरुकुल जीवनामुळे विद्यार्थ्यांमध्ये नियमित दिनचर्या, आत्मसंयम, शिस्त व जबाबदारी निर्माण होत. व्यक्तीच्या चारित्र्य घडवणूक हि प्राचीन भारतीय शिक्षणात दिसून येते, चारित्र्याला ज्ञानापेक्षा अधिक महत्त्व दिले गेले आहे. सत्य, अहिंसा, संयम, प्रामाणिकपणा, त्याग व शिस्त या मूल्यांची जोपासना केली जात होती. शिक्षणाचा उद्देश सुसंस्कृत, नैतिक व जबाबदार नागरिक घडवणे हा असल्याचा दिसून येतो मानवाच्या सामाजिक व धार्मिक कर्तव्यांची जाणीव प्राचीन शिक्षणातून होत होती. विद्यार्थ्यांना समाजाशी निगडित जबाबदाऱ्या समजावून सांगितल्या जात असे. समाजसेवा, गुरूसेवा, लोककल्याण, कर्तव्यपालन यांचे शिक्षण दिले जात होते. शिक्षणामुळे व्यक्ती समाजाचा उपयुक्त घटक बनवा हा हेतू होता. समाज्याच्या व्यक्ती कडून असलेल्या अपेक्षा ह्या आपल्याला प्राचीन शिक्षणातून दिसून येतो या नुसार केवळ बौद्धिक विकासावर भर दिला नाही, तर मानवाच्या शारीरिक म्हणजेच योग, व्यायाम, मानसिक-मनन, चिंतन, बौद्धिक-शास्त्रअध्ययन, आध्यात्मिक-ध्यान, साधना, असा संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकास साधण्याचा प्रयत्न केला ह्या दिसून येतो. मनुष्याला जीवन जगात असताना व्यवहारिक व व्यावसायिक ज्ञान मिळणे गरजेचे होते त्यासाठी  प्राचीन शिक्षण व्यवस्था उपयोगी दिसून येते. शेती, व्यापार, हस्तकला, वैद्यक, युद्धकला, संगीत इ. विषय शिकवले जात असे. विद्यार्थ्यांनी स्वावलंबी जीवन जगावे व समाजाच्या गरजांनुसार कार्य करावे, हा हेतू प्राचीन शिक्षणातून दिसून येतो.

### प्राचीन विद्यापीठ पद्धती

प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था ही केवळ गुरुकुलांपुरती मर्यादित नव्हती, तर ती सुव्यवस्थित, संघटित आणि आंतरराष्ट्रीय स्वरुपाच्या विद्यापीठांपर्यंत विकसित झालेली होती. प्राचीन भारतीय विद्यापीठे ही केवळ शिक्षण देणारी केंद्रे नसून ती ज्ञान, संशोधन, संस्कृती व नैतिकतेची केंद्रे होती. या विद्यापीठांनी ज्ञान, संशोधन व तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात भारताला जागतिक ओळख मिळवून दिली. या विद्यापीठांमुळे भारताला जगात “ज्ञानभूमी” म्हणून ओळख मिळाली.

प्राचीन विद्यापीठांमध्ये निवासी शिक्षण पद्धती होती. विद्यार्थी व शिक्षक विद्यापीठ परिसरातच राहत असत. यामुळे शिक्षक–विद्यार्थी यांच्यात जवळचा संवाद निर्माण होत असे व शिक्षण अधिक प्रभावी होत असे. शिक्षण गुरु–शिष्य परंपरेवर आधारित होते. गुरु हा केवळ विषय शिकवणारा नसून चारित्र्यनिर्माता व मार्गदर्शक असे. विद्यार्थ्यांचे बौद्धिक, नैतिक व आध्यात्मिक घडण गुरूच्या

मार्गदर्शनाखाली होत असे. प्राचीन विद्यापीठांमध्ये केवळ धर्मशास्त्र नव्हे तर विविध विषयावर म्हजेच तत्त्वज्ञान, व्याकरण, तर्कशास्त्र, गणित व खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र (आयुर्वेद) ,राजकारण व अर्थशास्त्र, कला व संगीत अशा विविध विषयांचे अध्यापन होत होते. यातूनच ह्या प्राचीन विद्यापीठांमध्ये वाद-विवाद, चर्चा व संशोधनाला विशेष महत्त्व दिले जात असे. विविध मतप्रवाहांवर खुले विचारमंथन केले जाई. यामुळे तार्किक विचारशक्ती व बौद्धिक विकास घडत असे. अध्ययन व अध्यापक यांच्या विकासाच्या योगदाना मध्ये नालंदा, विक्रमशिला यांसारख्या विद्यापीठांमध्ये विशाल व समृद्ध ग्रंथालये भरभराटीला आलेली होती. मुख्य म्हणजे या ग्रंथालयात हजारो हस्तलिखित ग्रंथ उपलब्ध होती, ज्ञानाचा विकास व प्रसार हा ग्रंथालयाच्या माध्यमातून होत होता प्रामुख्याने हि ज्ञान प्रसाराची प्रमुख केंद्रे होती.

भारतीय विद्यापीठांमध्ये जगाच्या अनेक कानाकोपऱ्यातून विद्यार्थी शिक्षणग्रहण करण्यासाठी येत असत. चीन, जपान, कोरिया, तिबेट, श्रीलंका इत्यादी देशांतील विद्यार्थी येथे शिक्षण घेत होते. यामुळे भारतीय शिक्षणाची पद्धत व  कीर्ती जागतिक स्थरावर पोहोचली होती. प्राचीन काळी शिक्षण हे देत असताना अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून अत्यल्प शुल्क घेतले जाई तसेच विद्यापीठ स्थरावर मिळणारा राजाश्रय, दानधर्म व मठव्यवस्थेमुळे शिक्षण मोफत उपलब्ध होते. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांनाही शिक्षणाची संधी मिळत असे.

## प्राचीन भारतीय विद्यापीठांमध्ये तक्षशिलाची भूमिका

तक्षशिला हे प्राचीन भारतातील सर्वात प्राचीन व प्रतिष्ठित शिक्षणकेंद्र मानले जाते. इ.स.पू. ६ व्या शतकापासून तक्षशिलाने भारतीय शिक्षण व्यवस्थेला संघटित, व्यावहारिक व आंतरराष्ट्रीय स्वरूप देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. तक्षशिला हे प्राचीन भारतातील सर्वात जुने व आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षणकेंद्र मानले जाते. हे केवळ एक विद्यापीठ नसून विविध आचार्यांच्या आश्रमांचा समूह होता. इथे भारताबरोबरच परदेशांतील विद्यार्थी शिक्षणासाठी येत असत. तक्षशिलाने भारतात उच्च शिक्षणाची संकल्पना दृढ केली. येथे प्राथमिक नव्हे तर प्रगत विषयांचे शिक्षण दिले जात असे. त्यामुळे तक्षशिला ही भारतातील पहिली “विद्यापीठीय” संकल्पना मानली जाते. तक्षशिलामध्ये आचार्यांच्या आश्रमांमधून शिक्षण दिले जात असे. या पद्धतीमुळे गुरु-शिष्य परंपरा अधिक संघटित व प्रभावी झाली. गुरु केवळ शिक्षक नसून मार्गदर्शक व चारित्र्यनिर्माते होते. चाणक्य व चंद्रगुप्त मौर्य यांसारख्या व्यक्तींमुळे तक्षशिलाने प्रशासन, राजकारण व राज्यशास्त्रातील तज्ज्ञ घडवले. यामुळे मौर्य साम्राज्याच्या उभारणीस वैचारिक अधिष्ठान मिळाले. तक्षशिलामध्ये दिले जाणारे शिक्षण रोजगाराभिमुख होते. वैद्य, योद्धे, प्रशासक, विद्वान घडविण्याचे कार्य येथे झाले. यामुळे शिक्षण समाजोपयोगी ठरले.


*ISBN-978-93-49938-45-8*

## प्राचीन भारतीय विद्यापीठांमध्ये नालंदा विद्यापीठाची भूमिका

नालंदा विद्यापीठ हे प्राचीन भारतातील सर्वात प्रसिद्ध, सुव्यवस्थित आणि जागतिक स्तरावरील शिक्षणकेंद्र होते. प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्थेला आंतरराष्ट्रीय ओळख मिळवून देण्यात नालंदा विद्यापीठाची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. नालंदा विद्यापीठाची स्थापना इ.स. ५ व्या शतकात मध्ये सम्राट कुमारगुप्त या गुप्त वंशाच्या शासकाने बिहार च्या राजगृहाजवळ नालंदा विद्यापीठ स्थापन केले. हे विद्यापीठ ज्ञान, संशोधन व संस्कृतीचे केंद्र मानले जाते. नालंदामध्ये रत्नोदधि, रत्नसागर आणि रत्नरंजक अशी प्रसिद्ध ग्रंथालये होती. हजारो हस्तलिखित ग्रंथ येथे संग्रहित होते. ही ग्रंथालये ज्ञानसंरक्षण व प्रसाराचे प्रमुख साधन होती. नालंदा विद्यापीठाने बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रसार आशिया खंडात केला. येथील विद्वानांनी चीन, तिबेट इत्यादी देशांत जाऊन भारतीय ज्ञानपरंपरा पोहोचवली. नालंदामध्ये शोध, चर्चा व वाद-विवाद यांना विशेष महत्त्व होते. विविध मतप्रवाहांवर खुले विचारमंथन केले जाई. त्यामुळे तार्किक व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित झाला. नालंदा विद्यापीठाच्या माध्यमातून भारतीय भाषा, धर्म, तत्त्वज्ञान व संस्कृतीचा जागतिक स्तरावर प्रसार झाला. भारताला "ज्ञानभूमी" म्हणून प्रतिष्ठा मिळाली. नालंदाची निवासी पद्धत, अभ्यासक्रम, ग्रंथालय व्यवस्था व संशोधन पद्धती यांचा आधुनिक विद्यापीठांवर मोठा प्रभाव पडला. परकीय आक्रमणे (विशेषतः बख्तियार खिलजी) यांमुळे नालंदा विद्यापीठाचा ऱ्हास झाला आणि ही महान ज्ञानपरंपरा नष्ट झाली.

## प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या मर्यादा

प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था ही जगातील अत्यंत प्राचीन, समृद्ध व मूल्याधिष्ठित शिक्षण व्यवस्थांपैकी एक होती. गुरुकुल पद्धती, गुरु-शिष्य परंपरा, आत्मज्ञान, चारित्र्यनिर्मिती व नैतिक मूल्यांवर आधारित शिक्षण ही तिची प्रमुख वैशिष्ट्ये होती. तरीसुधा, ही शिक्षण व्यवस्था सर्वांगसुंदर व सर्वसमावेशक नव्हती. काही सामाजिक, धार्मिक व संरचनात्मक कारणांमुळे या व्यवस्थेला अनेक मर्यादा होत्या. या मर्यादांमुळे शिक्षणाचा लाभ सर्व समाजघटकांपर्यंत समान रीतीने पोहोचू शकला नाही. म्हणूनच प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था अनेक अंगांनी समृद्ध असली, तरी तिच्या काही सामाजिक व संरचनात्मक मर्यादा होत्या. या मर्यादांमुळे शिक्षण सर्व समाजघटकांपर्यंत समान रीतीने पोहोचू शकले नाही.

## स्त्रियांची शिक्षण व्यवस्था

वैदिक काळात स्त्रियांचे शिक्षण अस्तित्वात असलेले दिसून येते. गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा यांसारख्या विदुषींचा उल्लेख ग्रंथांमध्ये आढळतो. पुढे पुढे यात बदल होत गेला आणि उत्तर वैदिक काळानंतर स्त्रियांच्या शिक्षणावर मर्यादा येऊ लागल्या. स्त्रियांचे शिक्षण प्रामुख्याने धार्मिक व घरगुती स्वरुपापुरते मर्यादित राहिलेले दिसून येते प्राचीन काळात गुरु परंपरे मध्ये गुरुकुल व विद्यापीठांमध्ये

स्त्रियांचा प्रवेश फारच कमी प्रमाणात होता. समाजातील काही चालीरीती त्या म्हणजे बालविवाह व सामाजिक रूढीं यामुळे  महिलांच्या शिक्षणात अडथळे निर्माण झाले. याचाच परिणाम म्हणजे स्त्रिया बौद्धिक व शैक्षणिक प्रगतीपासून दूर राहिल्या. यासर्व गोष्टी मुळे समाजाच्या अर्ध्या घटकाचा विकास पूर्णपणे होऊ शकला नाही हे दिसून येते.

### जातीवर आधारित शिक्षण व्यवस्था

प्राचीन शिक्षण व्यवस्थेतील एक मोठी मर्यादा म्हणजे जातीच्या आधारावर शिक्षणाची विभागणी होताना दिसून येते या नुसार प्राचीन काळात असलेले चार वर्ण त्यानुसार ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र या नुसार समाजाची विभागणी केली होती त्या नुसार ब्राह्मणांना वेद व शास्त्रांचे शिक्षण दिले जाता असे, क्षत्रियांना युद्धविद्या व प्रशासन यांचे शिक्षण दिले जाता, वैश्यांना व्यापार व अर्थकारण याचा अभ्यास असे आणि शूद्रांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते. या व्यवस्थेमुळे समाज्यातील सर्वांना समान शिक्षणाची संधी मिळाली नाही यातून समाजावर सामाजिक विषमता वाढीलीस लागली होती. या मुळे समाजात व्यक्तीला व त्याच्या असलेल्या बुद्धीला कमी महत्व दिले जात होते आणि जात येथे महत्वाची ठरली दिसून येते. सर्वांना समान शिक्षणाचा अधिकार राहिला नव्हता. यामुळे शिक्षण समाजपरिवर्तनाचे साधन ठरण्याऐवजी सामाजिक भेद वाढवण्यास कारण ठरले.

### शैक्षणिक लिखित ग्रंथ साधनांचा अभाव

प्राचीन काळात शिक्षण मुख्यत मौखिक परंपरेवर आधारित राहिले आहे. यात वेद, मंत्र व शास्त्रांचे शिक्षण पाठांतराने होत असे. या मध्ये उच्चारशुद्धतेवर अधिक भर दिला जात असे. प्राचीन काळात ग्रंथचे लिखाण कमी प्रमाणात होते व जे ग्रंथ होते ते थोड्याफार प्रमाणात हस्तलिखित स्वरूपात उपलब्ध होते. प्राचीन काळी छपाई तंत्रज्ञानाचा अभाव होता. या गोष्टीचा परिणाम म्हणजे सर्वान पर्यंत ज्ञानाचा प्रसार मर्यादित झाला. मोखिक पद्धती मुळे त्याचा संचय होऊ शकला नाही. लिखित असलेले ग्रंथ नष्ट होण्याची शक्यता जास्त निर्माण झाली होती. स्त्री शिक्षण व जात व्यवस्थेमुळे सर्वसामान्यांना शिक्षण सहज उपलब्ध होणे कठीण होते. त्यातच प्राचीन काळी शिक्षण प्रामुख्याने उच्चवर्णीय व विशिष्ट वर्गापुरते मर्यादित होते. यामुळे ज्ञानाचा प्रसार हा हळू-हळू व मर्यादित होत होता. या सर्व गोष्टी मध्ये महत्वाची गोष्ट म्हणजे धार्मिक व तात्त्विक शिक्षणावर अधिक भर ह्या काळात दिसून येते तसेच प्रयोगाधारित वैज्ञानिक शिक्षण कोठे तरी मर्यादित होते. याचाच परिणाम म्हणजे परकीय आक्रमणांमुळे अनेक मौल्यवान ग्रंथ नष्ट झालेले दिसून येतात.

### निष्कर्ष

प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था ही जगातील अत्यंत प्राचीन, समृद्ध व मूल्याधिष्ठित शिक्षण व्यवस्थांपैकी एक होती. आत्मज्ञान, आत्मोन्नती, चारित्र्यनिर्मिती, नैतिक मूल्यांची जोपासना व


*ISBN-978-93-49938-45-8*

समाजोपयोगी जीवन घडवणे ही या शिक्षणाची प्रमुख उद्दिष्टे होती. गुरु–शिष्य परंपरा, गुरुकुल पद्धती, मौखिक अध्ययन, तसेच तक्षशिला व नालंदा यांसारख्या महान विद्यापीठांमुळे भारताला जागतिक स्तरावर “ज्ञानभूमी” म्हणून ओळख मिळाली. या शिक्षण व्यवस्थेने मानवाच्या सर्वांगीण—शारीरिक, बौद्धिक, नैतिक व आध्यात्मिक विकासावर भर दिला.

प्राचीन शिक्षण या काळातील  शिक्षण व्यवस्थेला काही गंभीर मर्यादाही होत्या. स्त्रियांचे शिक्षण मर्यादित राहणे, जातीवर आधारित शिक्षण व्यवस्था आणि लिखित शैक्षणिक साधनांचा अभाव यांमुळे शिक्षणाचा लाभ सर्व समाजघटकांपर्यंत समान रीतीने पोहोचू शकला नाही. मौखिक परंपरेवर अधिक अवलंबून राहिल्याने ज्ञानसंरक्षण व प्रसार मर्यादित झाला, तसेच अनेक मौल्यवान ग्रंथ काळाच्या ओघात व परकीय आक्रमणांमुळे नष्ट झाले.

म्हणूनच असे म्हणता येईल की, प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्था ही मूल्य, तत्त्वज्ञान व आत्मिक उन्नतीच्या दृष्टीने अत्यंत उच्च दर्जाची होती परंतु सामाजिक समावेशकतेच्या दृष्टीने ती अपूर्ण होती. आधुनिक शिक्षण व्यवस्थेने या प्राचीन शिक्षणातील सकारात्मक तत्त्वे—नीतीमूल्ये, चारित्र्यनिर्मिती व सर्वांगीण विकास स्वीकारुन, त्यातील मर्यादा दूर करत सर्वसमावेशक व समान शिक्षणाची संकल्पना प्रत्यक्षात आणणे आवश्यक आहे.

## *संदर्भ*

1. आळतेकर, अ. स. प्राचीन भारतातील शिक्षण पद्धती पुणे : कॉन्टिनेंटल प्रकाशन.
2. केतकर, शं. गो. भारतीय संस्कृतीचा इतिहास पुणे : केतकर प्रकाशन.
3. शिरवाडकर, ना. रा. भारतीय शिक्षणाचा इतिहास मुंबई : ओरिएंट लॉन्गमन.
4. पेंडसे, वा. ल. प्राचीन भारतीय संस्कृती व शिक्षण पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.
5. दत्त, रामशरण प्राचीन भारताचा इतिहास दिल्ली : नॅशनल पब्लिशर्स.
6. शर्मा, रामशरण भारताचा प्राचीन इतिहास दिल्ली : ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.
7. Altekar, A. S. Education in Ancient India Banaras: Nand Kishore & Bros.
8. Mukherjee, R. K. Ancient Indian Education New Delhi: Motilal Banarsidas.
9. Basham, A. L. The Wonder That Was India London: Sidgwick & Jackson.

# मानव्य विद्याशाखेसमोरील आव्हाने आणि संधी (सामाजिक सुधारणांच्या दृष्टिकोनातून)

**डॉ. आसाराम हरिभाऊ देसाई**
दादा पाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय, आदिनाथनगर, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर
Email: ashokdesai2463@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19760050
*DOI: 10.5281/zenodo.19760050*

## प्रस्तावना

एकविसाव्या शतकात जागतिकीकरण, तांत्रिक क्रांती, हवामान बदल, लोकशाहीची हानी आणि वाढती सामाजिक-आर्थिक विषमता यांसारख्या गुंतागुंतीच्या आव्हानांनी समकालीन समाज व्यापलेला आहे. अशा महत्त्वपूर्ण काळात केवळ तांत्रिक नवोपक्रम किंवा आर्थिक विकासाच्या चौकटीतून या आव्हानांना सामोरे जाणे अपुरे आहे. मानवी मूल्ये, इतिहास, भाषा, संस्कृती, समाजरचना आणि राजकीय प्रक्रियांचा सखोल अभ्यास करणाऱ्या मानव्य विद्याशाखा या आव्हानांचे सर्वांगीण आकलन करून घेण्यासाठी आणि शाश्वत, सर्वसमावेशक सामाजिक सुधारणेचा मार्ग शोधण्यासाठी अपरिहार्य ठरतात. मानव्य विद्याशाखा (Humanities) ही मानवी समाजाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक, नैतिक आणि सामाजिक जीवनाचा अभ्यास करणारी महत्त्वपूर्ण शाखा आहे. आधुनिक जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाच्या युगात विज्ञान व तंत्रज्ञान विषयांना अधिक प्राधान्य दिले जात असताना मानव्य विद्याशाखेला विविध आव्हानांचा सामना करावा लागत आहे. इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान आणि साहित्य या विषयांच्या माध्यमातून मानवी मूल्ये, सामाजिक न्याय, लोकशाही आणि सांस्कृतिक जतन यांची जाणीव निर्माण होते. तसेच या विद्याशाखांचे मूळ लक्ष मानवी अनुभवाच्या गाभ्याशी असलेल्या प्रश्नांवर आहे. आपण कोण आहोत? आपली समाजरचना कशी कार्य करते? न्याय, समता, स्वातंत्र्य म्हणजे काय? आपले भूतकाळातील अनुभव वर्तमानाला कसे आकार देतात? लुंड विद्यापीठाच्या मतानुसार, "अभियंते स्वयंचलित ड्रोन डिझाइन करतात, तर मानव्यविद्याविद्यार्थी विचारतात: ते कोठे उडतील हे कोण ठरवते? व्यवस्थापन अभ्यासक्रम बाजारपेठेचे अनुकरण करतात, तर मानव्यविद्याशाखेतील विद्यार्थी विचारतात: ही अर्थव्यवस्था खरोखर कोणासाठी कार्य करते?" . हे विवरण मानव्य विद्याशाखांचे वैशिष्ट्य अधोरेखित करते. विद्याशाखा केवळ कौशल्ये शिकवत नाहीत, तर समीक्षक दृष्टी, नैतिक मीमांसा आणि सामाजिक परिणामांचे भान विकसित करतात. हेच भान समाजाला अधिक मानवी


*ISBN-978-93-49938-45-8*

आणि न्याय्य बनवण्याच्या दृष्टीने मूलभूत ठरते .

भारतातील सामाजिक सुधारणा चळवळींमध्ये महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आणि राजा राममोहन रॉय यांसारख्या विचारवंतांनी मानवतावादी विचारांचा उपयोग करून सामाजिक परिवर्तन घडवून आणले.

## मानव्य विद्याशाखांसमोरील प्रमुख आव्हाने

गेल्या काही दशकांत, जागतिक स्तरावर मानव्य विद्याशाखा एका गंभीर संकटातून जात आहेत. याला अनेक कारणे आहेत. शिक्षण क्षेत्राचा कल केवळ तांत्रिक आणि व्यावसायिक कौशल्यांकडे झुकल्यामुळे मानवी विद्याशाखांकडे 'दुय्यम' म्हणून पाहिले जाते. त्यामुळे सामाजिक प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदला आहे. सामाजिक प्रश्नाकडे मानवतेच्या दृष्टीने न पाहता व्यावहारिक दृष्टीकोनातून पाहिले जात आहे. संशोधनसाठीच्या निधी वाटपात मानव्य विद्याशाखांना सातत्याने दुर्लक्षित केले जाते. दक्षिण आफ्रिकेसारख्या देशात या विद्याशाखांसमोरील निधीची कमतरता आणि संस्थात्मक अडथळे ही प्रमुख आव्हाने आहेत. युरोपियन संघाच्या संशोधन चौकटीत देखील मानव्य विद्याशाखांना "कमी लेखले" जाते आणि त्यांच्यासाठी स्वतंत्र आणि पुरेसा निधी उपलब्ध नसल्याची टीका केली जाते. तंत्रज्ञानाच्या आक्रमणामुळे पारंपरिक मानवी मूल्ये आणि डिजिटल जगताचा ताळमेळ बसवणे कठीण जात आहे. जगभरातील शिक्षण धोरणे आता 'तात्काळ रोजगारक्षमता' आणि 'आर्थिक वाढ' या निकषांवर केंद्रित झाली आहेत. यामुळे विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या विषयांना प्राधान्य दिले जाते, तर मानव्य विद्याशाखांना 'अमूर्त' किंवा 'अव्यवहार्य' समजून त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. भारतासारख्या देशात अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन शिक्षणाला मिळणारी प्रतिष्ठा ही मानव्यविद्येसमोरील आव्हाने अधोरेखित करते. विद्यापीठांमधील विषयांचे कठोर वर्गीकरण आणि शैक्षणिक पदानुक्रमे हे देखील एक अडथळा आहेत. इतिहासकार आणि स्त्रीवादी विद्वान उमा चक्रवर्ती यांच्या मते, "शैक्षणिक विषयांमधील पदानुक्रमे आणि वर्गीकरणे मानवी अस्तित्वाच्या आणि त्याच्या समस्यांच्या बहुविध पद्धतीने चौकशीला अडथळा आणतात". यामुळे आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाच्या विकासास हानी पोहोचते. समाजात मानव्यविद्येच्या प्रासंगिकतेबद्दल एक व्यापक गैरसमज आहे. तात्कालिक उपयुक्तता न दिसल्याने, या विषयांची सामाजिक प्रतिष्ठा घटत चालली आहे. परिणामी, विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे आणि या विद्याशाखांचे अस्तित्वच धोक्यात येत आहे.

## सामाजिक सुधारणेच्या दृष्टीकोणतुन उपलब्ध संधी

मानव्य विद्याशाखांसमोरील आव्हाने गंभीर असली तरी, मानव्य विद्याशाखांकडे सामाजिक सुधारणेच्या दृष्टिकोनातून अफाट क्षमता आहे. दारिद्र्य, बेकारी, सामाजिक विषमता आणि

असुरक्षितता यासारख्या समस्या केवळ आकडेवारीच्या पातळीवर न राहता, त्या मानवी आयुष्यावर कसा परिणाम करतात, हे मानव्यविद्या अभ्यासक समजून घेतात आणि स्पष्ट करतात . उदाहरणार्थ, दक्षिण आफ्रिकेत वसाहतवादाच्या इतिहासाने निर्माण केलेल्या सामाजिक-आर्थिक विषमता समजून घेण्यासाठी आणि अभ्यासक्रमाचे वसाहतमुक्तीकरण करण्यासाठी मानव्यविद्येचा वापर केला जात आहे. त्यामुळे काही गुंतागुंतीच्या सामाजिक प्रश्नांचे सखोल विश्लेषण करण्यासाठी मानव्यविद्याशाखेची गरज असते. लोकशाहीची हानी, ध्रुवीकरण आणि बनावट बातम्यांच्या युगात, समीक्षक विचारसरणी, ऐतिहासिक स्मृती आणि नैतिक मूल्यांची जोपासना करणे अत्यंत आवश्यक आहे. मानव्य विद्याशाखा नागरिकांमध्ये ही क्षमता विकसित करतात. ते "लोकशाही प्रशासन, सामाजिक समावेश, सांस्कृतिक वारसा, स्थलांतर आणि विविधता" या विषयांवर सखोल संशोधन प्रदान करतात. लुंड विद्यापीठाच्या मते, "माहितीच्या पूराच्या युगात, मानव्यविद्या विद्यार्थ्यांमध्ये समंजसपणा विकसित करेल आणि वाढत्या ध्रुवीकरणाच्या काळात त्यांना सूक्ष्मता आणि गुंतागुंत समजावून देईल". मानव्य विद्याशाखा सर्वसमावेशक असतात. समाजाच्या दुर्लशित समूहांच्या (जसे की दलित, आदिवासी, स्थलांतरित) व्यथा, संघर्ष आणि योगदान समोर आणण्याचे काम मानव्य विद्याशाखा करतात. वर्ल्ड ह्युमॅनिटीज रिपोर्टनुसार, तमिळनाडूतील दलित चळवळ संस्कृती ही केवळ शैक्षणिक ग्रंथांपुरती मर्यादित नसून, ती संगीत, कला आणि लोकाभिनयातून व्यक्त होते. हे ' जगण्याचा अनुभव समाजातील सखोल बदलांची मुळे शोधण्यासाठी आवश्यक आहे. याचप्रमाणे, वेगवेगळया समुदायांचे आयुष्य समजून घेण्यासाठी आणि त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी इतिहास, कायदा आणि समाजशास्त्राचा आंतरविद्याशाखीय अभ्यास मार्गदर्शक ठरु शकतो. हवामान बदल किंवा डिजिटल परिवर्तन यासारख्या जटिल समस्या एकाच विषयाच्या चौकटीत सोडवता येत नाहीत. पर्यावरणीय मानव्यविद्या क्षेत्र साहित्य, इतिहास आणि तत्त्वज्ञान यांचा वापर करून निसर्गाशी असलेल्या मानवी नातेसंबंधाचे आकलन करून देते. तसेच, डिजिटल ह्युमॅनिटीजच्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा समाजावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास केला जातो. डिजिटल माध्यमांवर सुरु असलेला जातिविरोधी आणि स्त्रीवादी संघर्ष हा 'डिजिटल आर्काइव्ह'च नव्हे, तर नव्या सामाजिक चळवळींचे स्वरुप देखील बदलत आहे. मानव्य विद्याशाखांमधील संशोधन हे केवळ शैक्षणिक वर्तुळापुरते मर्यादित न राहता, ते सामाजिक धोरणांनाही दिशा देऊ शकते. ग्रीसमधील संशोधक पापाडाकिस यांच्या मते, मानव्यविद्या आणि समाजशास्त्र 'पुराव्याधारित' प्रतिसाद तयार करण्यास मदत करतात, ज्यामुळे सामाजिक एकसंधता राखली जाऊ शकते आणि वैयक्तिक तसेच सामूहिक कल्याणाला चालना मिळू शकते. उदाहरणार्थ, एक्सेटर विद्यापीठातील संशोधक स्थलांतर धोरणांमध्ये असलेली असमानता अधोरेखित करण्यासाठी इतिहास आणि राज्यशास्त्राचा वापर करतात.


*ISBN-978-93-49938-45-8*

समाजसुधारणांसाठी अंधश्रद्धा आणि जुन्या रूढींना छेद देणे गरजेचे असते. मानवी विद्याशाखा विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यास प्रवृत्त करतात. त्यामुळे मानव्य विद्याशाखेचा अभ्यासकरणे गरजेचे बनते. जागतिकीकरणाच्या काळात वेगवेगळ्या संस्कृतींमधील संघर्ष कमी करण्यासाठी भाषा आणि इतिहासाचा अभ्यास 'पुला'चे काम करू शकतो. कोणत्याही सरकारी योजनेचे यश हे त्या समाजाच्या मानसिकतेवर अवलंबून असते. समाजशास्त्र आणि मानसशास्त्राचा अभ्यास प्रभावी धोरणे आखण्यास मदत करतो.तंत्रज्ञानाचा वापर लोककल्याणासाठी व्हावा की विनाशासाठी, हे ठरवण्यासाठी मानवी विद्याशाखेतील 'नैतिकता' (Ethics) महत्त्वाची ठरते.

मानव्य विद्याशाखा समाजातील अन्याय, असमानता आणि भेदभाव याबद्दल जागरूकता निर्माण करते. इतिहास आणि समाजशास्त्राच्या अभ्यासातून समाजातील बदलांचे स्वरूप समजते. उदाहरणार्थ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्याय, समता आणि मानवी हक्कांच्या विचारांचा प्रभावी प्रसार करून भारतीय समाजात मोठे परिवर्तन घडवून आणले. त्यांनी जातिव्यवस्था, अस्पृश्यता आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध ठामपणे आवाज उठवला. त्यांच्या शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या तत्त्वज्ञानामुळे वंचित आणि दलित समाजात शिक्षणाची आणि स्वाभिमानाची जाणीव निर्माण झाली. भारतीय राज्यघटनेत समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा समावेश करून सर्व नागरिकांना समान हक्क दिले. याशिवाय त्यांनी शिक्षण, कायदे आणि सामाजिक चळवळींच्या माध्यमातून समाजातील अन्यायकारक प्रथा नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे त्यांच्या विचारांमुळे भारतीय समाजात सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने पुढे गेली.

मानव्यविद्याशाखेतील शिक्षण लोकशाही मूल्यांना बळकट करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. इतिहास, राज्यशास्त्र आणि तत्त्वज्ञान या विषयांच्या अभ्यासातून नागरिकांमध्ये लोकशाहीची जाणीव, जबाबदारी आणि सामाजिक सहभागाची भावना विकसित होते. राज्यशास्त्राच्या माध्यमातून नागरिकांना राज्यव्यवस्था, शासनपद्धती, संविधान आणि लोकशाही संस्थांचे स्वरूप समजते. यामुळे नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांची तसेच कर्तव्यांची जाणीव होते. भारताच्या राज्यघटनेच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेली स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता ही तत्त्वे लोकशाही व्यवस्थेचा मूलभूत पाया आहेत. इतिहासाच्या अभ्यासातून समाजातील राजकीय आणि सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया समजते. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासातून नैतिकता, न्याय, मानवाधिकार आणि सामाजिक जबाबदारी यांसारख्या मूल्यांचा विकास होतो. त्यामुळे नागरिक अधिक जागरूक, संवेदनशील आणि जबाबदार बनतात. अशा प्रकारे मानव्य शिक्षण लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करून सशक्त, जागरूक आणि उत्तरदायी नागरिक घडविण्यास मदत करते.

स्त्री अभ्यास (Women's Studies) आणि समाजशास्त्रीय संशोधनाच्या माध्यमातून स्त्री-पुरुष समानतेबद्दल जागरूकता वाढविण्यात मानव्य विद्याशाखेची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. या अभ्यासातून समाजातील लिंगभेद, स्त्रियांची सामाजिक-आर्थिक स्थिती, शिक्षणातील असमानता आणि स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचे विश्लेषण केले जाते. मानव्य विषयांच्या अभ्यासामुळे स्त्रियांच्या हक्कांबद्दल समाजात जागरूकता निर्माण होते आणि लिंगसमानतेच्या संकल्पनेला बौद्धिक आधार मिळतो. विशेषतः इतिहास आणि समाजशास्त्राच्या माध्यमातून स्त्री चळवळींचा इतिहास, स्त्रियांचे योगदान आणि त्यांच्या संघर्षांची माहिती समाजापर्यंत पोहोचते. भारतातील सामाजिक सुधारणा चळवळींमध्ये सावित्रीबाई फुले यांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. त्यांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार करून समाजातील लिंगभेदाला आव्हान दिले आणि स्त्रियांना शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला.

आजच्या आधुनिक ज्ञानव्यवस्थेत विविध शैक्षणिक शाखांमधील परस्पर सहकार्याला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे मानव्य विद्याशाखेचा विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी समन्वय साधून आंतरशाखीय संशोधन करण्याच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. या पद्धतीमुळे एखाद्या सामाजिक किंवा सांस्कृतिक समस्येचा अभ्यास अधिक व्यापक आणि बहुआयामी दृष्टिकोनातून करता येतो.

## निष्कर्ष

अशा प्रकारे भारतातील विविध सामाजिक सुधारणा चळवळी मानव्य विचारांच्या आधारेच पुढे आल्या. शिक्षण, सामाजिक न्याय, स्त्री-पुरुष समानता आणि धार्मिक सुधारणा यांसारख्या क्षेत्रांमध्ये मानव्य विद्याशाखेतील विचारवंतांनी समाजपरिवर्तनासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यामुळे मानव्य विद्याशाखा ही केवळ शैक्षणिक अभ्यासाची शाखा नसून सामाजिक परिवर्तनासाठी एक प्रभावी बौद्धिक साधन आहे. मानव्य विद्याशाखा आज एका गंभीर वळणावर उभ्या आहेत. एकीकडे निधीची टंचाई, स्टेम विषयांचे वाढते वर्चस्व आणि सामाजिक दुर्लक्ष यांसारखी आव्हाने भीषण आहेत, तर दुसरीकडे वाढत्या गुंतागुंतीच्या जागतिक समस्या याच विद्याशाखांची अपरिहार्यता अधोरेखित करतात. ही आव्हाने आणि संधी यांचा सखोल विचार केल्यास असे दिसून येते की, केवळ तांत्रिक नवोपक्रमावर भर देऊन समाज सुधारणा शक्य नाही. त्या नवोपक्रमाला दिशा देणारी, त्याचे सामाजिक, नैतिक आणि सांस्कृतिक परिणाम समजून घेणारी एक समीक्षक दृष्टी मानव्य विद्याशाखाच तयार करतात. त्यामुळे मानवी विद्याशाखा या केवळ अभ्यासाचे विषय नसून त्या समाजाचा आत्मा आहेत. जोपर्यंत आपण मानवी संवेदना आणि सामाजिक बांधिलकी जपत नाही, तोपर्यंत केवळ तांत्रिक प्रगती मानवाचे कल्याण करू शकत नाही. आव्हानांचे रूपांतर संधीत करून


*ISBN-978-93-49938-45-8*

सामाजिक सुधारणांचा मार्ग अधिक सुलभ करणे, ही काळाची गरज आहे.

## *संदर्भ*


1. Kothari, C. R. – Research Methodology: Methods and Techniques.
2. Haralambos, M. – Sociology: Themes and Perspectives.
3. Deshpande, S. – Contemporary India: A Sociological View.
4. Mukherjee, Radhakamal – Social Structure of Values.
5. Ghurye, G. S. – Indian Sociology.
6. Omvedt, Gail – Cultural Revolt in a Colonial Society.
7. Jadhav, Narendra – Dr. Babasaheb Ambedkar: Economic Thoughts and Philosophy.

# इतिहास लेखनातील आर्थिक दृष्टिकोन : स्वरूप व महत्त्व

**प्रा. मंगेश माधव देवडे**

सहाय्यक प्राध्यापक, रयत शिक्षण संस्थेचे रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर (स्वायत्त) जि. अहिल्यानगर

Email: mangeshdevade827@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19760117

*DOI: 10.5281/zenodo.19760117*

## प्रस्तावना

इतिहास हा मानवी समाजाच्या भूतकाळाचा शास्त्रीय अभ्यास असून समाजाच्या सर्वांगीण विकासाची प्रक्रिया समजून घेण्यासाठी विविध घटकांचा विचार करणे आवश्यक ठरते. पारंपरिक इतिहास लेखनात राजकीय घटनांना प्रमुख स्थान देण्यात आले होते; परंतु आधुनिक इतिहास संशोधनाच्या विकासानंतर सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक घटकांचाही सखोल अभ्यास करण्यात येऊ लागला. या संदर्भात आर्थिक इतिहास ही इतिहासशास्त्राची एक महत्त्वपूर्ण शाखा म्हणून विकसित झाली. प्रस्तुत अभ्यासामध्ये इतिहास लेखनात आर्थिक इतिहासाचे महत्त्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. उत्पादन व्यवस्था, शेती, उद्योगधंदे, व्यापार, बाजारपेठा आणि करप्रणाली यांसारख्या आर्थिक घटकांचा समाजाच्या रचनेवर आणि ऐतिहासिक घटनांच्या घडणीत कसा प्रभाव पडतो याचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच विविध ऐतिहासिक कालखंडांतील आर्थिक व्यवस्थेचा अभ्यास करून समाजजीवनातील परिवर्तनांची प्रक्रिया समजावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. शिलालेख, नाणी, महसूल नोंदी, व्यापारी कागदपत्रे आणि इतर ऐतिहासिक साधनांच्या आधारे आर्थिक परिस्थितीचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या अभ्यासातून इतिहास लेखन अधिक व्यापक, समाजाभिमुख आणि वास्तववादी करण्यासाठी आर्थिक इतिहासाचा अभ्यास अत्यंत आवश्यक असल्याचे अधोरेखित होते.

इतिहासकारांनी समाजाच्या केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक अंगांचाही सखोल विचार करण्यास सुरुवात केली. या प्रक्रियेत आर्थिक इतिहास ही इतिहास संशोधनाची एक महत्त्वपूर्ण शाखा म्हणून उदयास आली.

उत्पादन व्यवस्था, शेती, उद्योगधंदे, व्यापार, बाजारपेठा आणि करप्रणाली यांसारखे आर्थिक घटक समाजाच्या घडणीत निर्णायक भूमिका बजावत असतात. आर्थिक परिस्थितीतील बदलांचा परिणाम समाजाच्या सामाजिक रचनेवर, जीवनपद्धतीवर आणि राजकीय घडामोडींवरही होत असतो. त्यामुळे इतिहासाचा सर्वांगीण अभ्यास करताना आर्थिक घटकांचा विचार करणे अपरिहार्य ठरते. आर्थिक


*ISBN-978-93-49938-45-8*

इतिहासाच्या माध्यमातून भूतकाळातील समाजाचे दैनंदिन जीवन, उत्पादनाची साधने, श्रमव्यवस्था आणि आर्थिक संबंध यांचा अभ्यास करता येतो. यामुळे इतिहास केवळ सत्ताधारी वर्गापुरता मर्यादित राहत नाही, तर तो सामान्य लोकांच्या जीवनाशी निगडित असा व्यापक स्वरूप धारण करतो. इतिहासातील अनेक सामाजिक व राजकीय बदलांच्या मुळाशी आर्थिक कारणे कार्यरत असतात, हेही आर्थिक इतिहासाच्या अभ्यासातून स्पष्ट होते.

याच कारणामुळे आधुनिक इतिहास लेखनात आर्थिक इतिहासाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आर्थिक घटकांच्या अभ्यासामुळे इतिहासाचे स्वरूप अधिक वास्तववादी, समाजाभिमुख आणि सर्वसमावेशक बनते. त्यामुळे इतिहास संशोधन आणि लेखन प्रक्रियेत आर्थिक इतिहासाचा अभ्यास अत्यंत आवश्यक मानला जातो.

## उद्दिष्टे

- इतिहास लेखनात आर्थिक घटकांचे महत्त्व स्पष्ट करणे.
- विविध ऐतिहासिक कालखंडातील आर्थिक व्यवस्थेचा अभ्यास करणे.
- आर्थिक घटकांचा सामाजिक व राजकीय घटनांवर होणारा प्रभाव समजावून घेणे.
- उत्पादन व्यवस्था, व्यापार व उद्योगधंद्यांच्या माध्यमातून समाजरचनेचा अभ्यास करणे.
- इतिहास संशोधनात आर्थिक इतिहासाच्या उपयोगितेचे विश्लेषण करणे.

## संशोधन पद्धतीशास्त्र

इतिहास हा मानवी समाजाच्या भूतकाळाचा शास्त्रीय अभ्यास मानला जातो. परंतु इतिहासाचा अर्थ केवळ राजे-महाराजांची कार्ये, युद्धे आणि राजकीय घटना इतकाच मर्यादित नाही. समाजाचे दैनंदिन जीवन, उत्पादन व्यवस्था, व्यापार, उद्योगधंदे, शेती आणि लोकांची आर्थिक स्थिती या सर्व गोष्टींचाही इतिहासाच्या अभ्यासात समावेश होतो. म्हणूनच आधुनिक इतिहास लेखनात आर्थिक इतिहासाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कोणत्याही समाजाच्या घडणीत आर्थिक घटकांचा प्रभाव अत्यंत खोलवर असतो. त्यामुळे समाजाची खरी परिस्थिती आणि त्याचा विकास समजून घेण्यासाठी आर्थिक इतिहासाचा अभ्यास आवश्यक ठरतो.इतिहास लेखनाच्या प्रारंभीच्या टप्प्यात राजकीय इतिहासाला जास्त महत्त्व दिले जात होते. राजे, राज्यकारभार, युद्धे आणि साम्राज्य विस्तार यांभोवतीच इतिहासाचे वर्णन केले जात असे. त्यामुळे इतिहासाचे चित्र काही प्रमाणात अपूर्ण राहिले होते. परंतु १९व्या आणि २०व्या शतकात इतिहास लेखनाच्या पद्धतीत मोठा बदल घडून आला. इतिहासकारांनी समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनाचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. युरोपमधील अनेक इतिहासकारांनी आर्थिक घटकांचा इतिहासावर होणारा परिणाम स्पष्ट केला. त्यानंतर आर्थिक इतिहास हा इतिहास संशोधनाचा एक महत्त्वपूर्ण भाग बनला. आर्थिक इतिहासाच्या

अभ्यासातून एखाद्या काळातील उत्पादन व्यवस्था आणि आर्थिक रचना समजून घेता येते.

प्राचीन भारतात अर्थव्यवस्था मुख्यतः शेतीवर आधारित होती. कृषी उत्पादन, सिंचन व्यवस्था, जमीन महसूल आणि स्थानिक बाजारपेठा यांवर समाजाचे आर्थिक जीवन अवलंबून होते. मौर्यकालीन राज्यव्यवस्थेत शेती आणि महसूल व्यवस्थेला विशेष महत्त्व होते. त्या काळातील प्रशासनाने कृषी उत्पादन वाढविण्यासाठी विविध उपाययोजना केल्याचे उल्लेख प्राचीन ग्रंथ आणि शिलालेखांत आढळतात. या आर्थिक व्यवस्थेचा अभ्यास केल्यास त्या काळातील समाजजीवन आणि राज्यकारभाराची रचना अधिक स्पष्टपणे समजते. मध्ययुगीन काळात व्यापार आणि उद्योगधंद्यांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला. विविध व्यापारी मार्ग, बाजारपेठा आणि बंदरे यांच्या माध्यमातून देशांतर्गत तसेच परदेशी व्यापार वाढला. भारतातील सूरत, कालीकट आणि मसुलीपट्टणम यांसारखी बंदरे आंतरराष्ट्रीय व्यापाराची महत्त्वाची केंद्रे बनली होती. या व्यापारामुळे देशातील आर्थिक देवाणघेवाण वाढली आणि अनेक व्यापारी व कारागीर वर्ग आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले. त्यामुळे त्या काळातील समाजजीवन, शहरांचा विकास आणि सांस्कृतिक देवाणघेवाण समजून घेण्यासाठी आर्थिक इतिहासाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. भारतीय इतिहासात मराठा काळाचाही आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास महत्त्वाचा आहे. मराठा राज्याच्या प्रशासनात महसूल व्यवस्था, शेती उत्पादन आणि स्थानिक व्यापार यांना विशेष स्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत शेतक्र्यांच्या हिताचा विचार करून महसूल धोरण आखण्यात आले होते. जमिनीच्या उत्पादनक्षमतेनुसार महसूल ठरविण्याची पद्धत अवलंबली गेली होती. यामुळे शेतक्र्यांवरील अन्याय कमी झाला आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत राहिली. या आर्थिक धोरणांमुळे मराठा राज्याची आर्थिक पायाभरणी दृढ झाली. त्यामुळे मराठा इतिहासाचा अभ्यास करताना आर्थिक घटकांचा विचार करणे अत्यावश्यक ठरते.

इतिहासातील अनेक महत्त्वाच्या घटनांच्या मागे आर्थिक कारणे कार्यरत असतात. उदाहरणार्थ, युरोपमधील औद्योगिक क्रांती ही केवळ तांत्रिक प्रगतीची घटना नव्हती; ती आर्थिक बदलांचीही प्रक्रिया होती. उद्योगधंद्यांचा विकास, यंत्रांचा वापर आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादन यामुळे समाजात आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन घडून आले. या बदलांमुळे शहरांची वाढ झाली, कामगार वर्ग निर्माण झाला आणि समाजाच्या रचनेत बदल झाले. या सर्व घटनांचा परिणाम पुढील राजकीय आणि सामाजिक घडामोडींवरही झाला. त्यामुळे इतिहासातील बदल समजून घेण्यासाठी आर्थिक घटकांचा अभ्यास अत्यंत आवश्यक आहे.

आर्थिक इतिहासाचा अभ्यास केल्यामुळे सामान्य लोकांच्या जीवनाचा इतिहासही समोर येतो. शेतकरी, कारागीर, व्यापारी आणि कामगार यांचे जीवनमान, त्यांची उपजीविका, त्यांच्या समस्या आणि संघर्ष यांचा अभ्यास आर्थिक इतिहासाच्या माध्यमातून करता येतो. यामुळे इतिहास केवळ


*ISBN-978-93-49938-45-8*

राजे आणि सत्ताधीशांच्या कार्यापुरता मर्यादित राहत नाही, तर तो समाजातील सर्व घटकांचा इतिहास बनतो. आधुनिक इतिहास लेखनात सामान्य लोकांच्या इतिहासाला जे महत्त्व प्राप्त झाले आहे, त्यामध्ये आर्थिक इतिहासाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

इतिहास संशोधनात आर्थिक इतिहासासाठी विविध प्रकारच्या स्रोतांचा उपयोग केला जातो. शिलालेख, नाणी, जमीन महसूल नोंदी, व्यापारी कागदपत्रे, प्रवाशांचे वृत्तांत आणि सरकारी अभिलेख यांसारख्या स्रोतांमधून त्या त्या काळातील आर्थिक परिस्थितीविषयी महत्त्वपूर्ण माहिती मिळते. या स्रोतांच्या आधारे इतिहासकार त्या काळातील उत्पादन, व्यापार, करप्रणाली आणि आर्थिक धोरणांचा अभ्यास करतात. एकूणच पाहता, इतिहास लेखनात आर्थिक इतिहासाचे महत्त्व अत्यंत व्यापक आहे. आर्थिक घटकांच्या अभ्यासामुळे समाजाच्या विकासाची दिशा, लोकांचे जीवनमान आणि विविध परिवर्तनांची प्रक्रिया समजून घेता येते. उत्पादन व्यवस्था, व्यापार, उद्योगधंदे आणि आर्थिक धोरणे यांचा अभ्यास केल्यामुळे इतिहास अधिक वास्तववादी आणि समाजकेंद्रित स्वरूपात मांडता येतो. त्यामुळे आधुनिक इतिहास लेखनात आर्थिक इतिहासाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे.

## निष्कर्ष

इतिहास लेखनाच्या आधुनिक प्रवाहात आर्थिक इतिहासाला अत्यंत मूलभूत आणि अनिवार्य स्थान प्राप्त झालेले आहे. समाजाच्या घडणीतील विविध ऐतिहासिक प्रक्रियांचे स्पष्टीकरण केवळ राजकीय घटनांच्या आधारे करता येत नाही, तर त्या प्रक्रियांमागील आर्थिक शक्तींचे स्वरुप समजून घेणे आवश्यक ठरते. उत्पादन व्यवस्था, संसाधनांचे वितरण, व्यापाराचे जाळे, करप्रणाली आणि श्रमव्यवस्था यांसारखे घटक समाजाच्या विकासाला दिशा देणारे असतात. त्यामुळे इतिहासाच्या समग्र आकलनासाठी आर्थिक घटकांचा अभ्यास हा अपरिहार्य ठरतो. इतिहासशास्त्राच्या विकासाच्या प्रवासात दीर्घकाळ राजकीय घटनांनाच केंद्रस्थानी स्थान देण्यात आले होते. परंतु एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात इतिहासलेखनात झालेल्या बौद्धिक परिवर्तनामुळे इतिहासकारांनी समाजाच्या भौतिक आणि आर्थिक पायाभूत रचनेकडे अधिक लक्ष देण्यास सुरुवात केली. या परिवर्तनामुळे इतिहासाच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू सत्ताधारी वर्गापासून व्यापक समाजजीवनाकडे वळला. आर्थिक इतिहासाच्या अभ्यासामुळे इतिहासातील घटनांचा कार्यकारणभाव अधिक स्पष्टपणे उलगडून येतो आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियांचे अधिक वस्तुनिष्ठ विश्लेषण करता येते.

विविध ऐतिहासिक कालखंडांचा अभ्यास करताना आर्थिक रचना आणि उत्पादन व्यवस्थेतील बदल समाजाच्या स्वरुपावर कसा परिणाम करतात हे स्पष्टपणे दिसून येते. प्राचीन काळातील कृषिप्रधान अर्थव्यवस्था, मध्ययुगीन काळातील व्यापारी जाळ्यांचा विस्तार आणि आधुनिक काळातील औद्योगिक परिवर्तन या सर्व प्रक्रिया समाजाच्या संरचनेत दीर्घकालीन बदल घडवून आणणाऱ्या

ठरल्या. त्यामुळे आर्थिक इतिहास हा केवळ आर्थिक व्यवहारांचा अभ्यास नसून तो समाजाच्या व्यापक ऐतिहासिक परिवर्तनाचा शोध घेणारा अभ्यासक्षेत्र आहे. इतिहास संशोधनात विविध स्रोतांच्या माध्यमातून आर्थिक परिस्थितीचे पुनर्निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. शिलालेख, नाणी, महसूल नोंदी, व्यापारी कागदपत्रे, प्रवाशांचे वर्णन आणि प्रशासकीय अभिलेख यांसारख्या साधनांद्वारे भूतकाळातील आर्थिक व्यवहार, उत्पादन पद्धती आणि देवाणघेवाणीचे स्वरूप स्पष्ट होते. या साधनांच्या तुलनात्मक आणि विश्लेषणात्मक अभ्यासातून इतिहासकारांना त्या त्या कालखंडातील सामाजिक जीवनाची आर्थिक पायाभूत रचना समजून घेता येते.

आर्थिक इतिहासाचा अभ्यास इतिहासलेखनाला अधिक व्यापक आणि समाजाभिमुख स्वरूप प्रदान करतो. याच्या माध्यमातून शेतकरी, कारागीर, व्यापारी आणि श्रमिक वर्ग यांच्या जीवनमानाचा अभ्यास करता येतो आणि त्यामुळे इतिहास केवळ सत्ताधारी घटकांपुरता मर्यादित राहत नाही. उलट तो समाजातील विविध स्तरांच्या अनुभवांचा दस्तऐवज बनतो. एकूणच, आर्थिक इतिहास इतिहासशास्त्राला सैद्धांतिक सखोलता, विश्लेषणात्मक दृष्टी आणि वास्तवाधारित आधार प्रदान करतो. समाजाच्या ऐतिहासिक प्रवाहातील परिवर्तनांची मुळे शोधून काढण्यासाठी आर्थिक घटकांचे विश्लेषण अनिवार्य आहे. त्यामुळे आधुनिक इतिहासलेखनात आर्थिक इतिहास ही केवळ एक शाखा नसून इतिहासाच्या व्यापक आणि समग्र समजासाठी अत्यंत आवश्यक असा अभ्यासक्षेत्र म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे.

### *संदर्भ*

1. Habib, I. (2011). Economic history of medieval India: A survey. New Delhi: Tulika Books.
2. Kosambi, D. D. (1956). An introduction to the study of Indian history. Mumbai: Popular Prakashan.
3. Raychaudhuri, T., Habib, I., & Kumar, D. (Eds.). (1982). The Cambridge economic history of India (Vol. 1). New Delhi: Orient Longman.
4. Raychaudhuri, T., & Habib, I. (Eds.). (1983). The Cambridge economic history of India (Vol. 2). New Delhi: Orient Longman.
5. Chandra, B. (1982). The rise and growth of economic nationalism in India. New Delhi: People’s Publishing House.
6. Kumar, D. (Ed.). (1983). The Cambridge economic history of India: Volume 2 (c. 1757–1970). New Delhi: Orient Longman.
7. Habib, I. (2015). Indian economy 1858–1914. New Delhi: Tulika Books.


*ISBN-978-93-49938-45-8*

# महिला सक्षमीकरण आणि बदलते प्रवाह

**देवकाते स्वाती चंद्रकांत**
एम. ए. II, इतिहास विभाग, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत
Email: mangeshdevade827@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19760208
*DOI: 10.5281/zenodo.19760208*

**प्रस्तावना**

भारतीय महिलांचे सक्षमीकरण करायचे असेल तर प्रथम त्यांच्यामध्ये विकास विषयक जागृती निर्माण करायला हवी .एकदा महिलांची प्रगती झाली की तिच्यासोबत तिच्या गावाची प्रगती होते. आणि पर्यायाने संपूर्ण देशाची प्रगती होते .कारण सर्वसमावेशक विकासाचे ध्येय साध्य करताना विकास प्रक्रियेत सहभाग असलेल्या सक्रिय घटकांसोबत दुर्लक्षित आणि विकास प्रक्रियेपासून दूर असलेल्या घटकांचा देखील समावेश होणे आवश्यक आहे म्हणून महिलांना विकासाविषयी जागृत करून त्यांना विकास प्रक्रियेत सामावून घेणे आवश्यक आहे संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रमात असे म्हटले आहे की समाजातील अनेक घटक त्यांचे लिंग वंश लैंगिक अभिमुक्ता शारीरिक अथवा मानसिक दुर्बलता तसेच गरिबी या कारणामुळे विकास प्रक्रियेतून वगळले जातात शहरी तसेच ग्रामीण भागातील महिलांच्या वाट्याला येणारी गरिबी समाजाच्या मुख्य प्रवाहापासून त्यांना दूर ठेवणे आणि मागासलेपणा यांचे दुःख कमी करून शाश्वत विकासात त्यांचा सहभाग वळविण्यासाठी 1990 पासून महिलांना समान दर्जा देण्यासाठी आणि त्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी प्राधान्याने काही उपाययोजना करण्यात आले आहेत या प्रक्रियेत लिंग समानतेला आणि न्याय विकासाला चालना देण्यासाठी जागतिक पातळीवर महिलांच्या सक्षमीकरणाची संकल्पना राबवण्यात विकास कार्य करणाऱ्या श्रीवादी कार्यकर्त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे

महिलांचे सशक्तिकरण ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यात महिलांचे निवडीचे स्वातंत्र्य वाढते त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या निर्णयाच्या प्रक्रियेत भाग घेण्याचे चर्चा करण्याचे निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचे आणि विविध संस्थांच्या परिचलनात सहभाग होण्याचे स्वातंत्र्य मिळते याची जबाबदारी महिलांना घ्यावी लागणे हेच तिच्या विकासाच्या दिशेने टाकलेले योग्य पाऊल आहे मात्र लिंगभेद टाळून सशक्ति करण्यासाठी प्रयत्नशील राहणे हे महत्त्वपूर्ण ध्येय आधी साध्य करायला हवे हे जेव्हा महिला लक्षात घेतील तेव्हाच महिलांचे सक्षमीकरण होणे शक्य होईल. सन 2014 च्या जागतिक बँकेच्या निरीक्षणानुसार जनतेला निवडलाच अधिकार मिळणे तसेच त्यांच्या आयुष्यावर परिणाम करणाऱ्या निर्णयाच्या प्रक्रियेत भाग घेण्याचे स्वातंत्र्य घेता येणे चर्चा करता येणे आपल्या मताचा

प्रभाव टाकता येणे काही अंशी नियंत्रण ठेवता येणे आणि या सर्वांची जबाबदारी स्वीकारता येणे म्हणजेच महिलांचे सक्षमीकरण किंवा सशक्तीकरण होय . आणि हेच खरे महिलांचे स्वावलंबन होय .
महिला सक्षमीकरण ही अनेक पैलू विविध परिमाणे असलेली अनेक पदरी संकल्पना आहे महिलांचे सक्षमीकरण ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये महिलांना वस्तू व्यक्ती आणि ज्ञान माहिती संकल्पना या साधनावर तसेच पैशासारख्या आर्थिक स्रोतांवर नियंत्रण ठेवता येणे तसेच पैशासंबंधी व्यवहार करता येणे आणि गटात समुदायात समाजाला आणि देशातल्या निर्णयावरती मत मांडण्याची शक्ती प्राप्त होते एवढेच नव्हे तर महिलांना त्यांच्या घरात मत मांडण्याचे स्वतंत्र प्रत्येक बाबतीत योग्यता कामाच्या जागी न्याय चांगली वागणूक श्री पुरुष भेदाभेद तंत्रज्ञानाचे क्षेत्र अवकाश विज्ञान क्रीडाक्षेत्र सशक्त दले इत्यादी प्रत्येक क्षेत्रात त्यांना रोखणाऱ्या काचेच्या अदृश्य भिंती तोडून टाकले आहेत. आता शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागात प्रत्येक पाचवी महिला उद्योजिका आहे.
आज महिलांच्या बाबतीत आईच्या पोटात मुलीच्या गर्भाचे संरक्षण करण्यापासून ते काम करणाऱ्या महिलांपर्यंत सुरक्षित वातावरण तयार करण्यापर्यंत अनेक उपाय योजना शासनाने हातात घेतले आहेत

### शोध निबंधाची उद्दिष्टे

- महिला सक्षमीकरण संकल्पना स्पष्ट करणे
- महिला सक्षमीकरण विषयक कार्यक्रमाचा अभ्यास करणे

### संशोधनाची गृहीतके

- महिलांना आज समाजीभमुख कारणाच्या प्रयत्न समाजाच्या माध्यमातून होत आहे.
- महिला संरक्षण व सुरक्षेच्या दृष्टीने सुधारणा होत आहे.
- महिलांच्या विकासाच्या दृष्टीने विविध योजना विषय कार्यक्रम राबविल्या जात आहेत.

### तथ्यसंकलन

प्रस्तुत लघु संशोधनासाठी द्वितीय आधार सामग्रीचा वापर करण्यात आला आहे.

### महिला सक्षमीकरणाची व्याख्या

- किरण देवेंद्र यांच्या मते श्री सबलीकरणाचा अर्थ श्री हे आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र व स्वयंनिर्भर व स्वावलंबी असणे होय तिला स्वतःबद्दल सकारात्मक दृष्टिकोन असावा जेणेकरून कोणत्याही विपरीत परिस्थितीला सामोरे जाता येईल तसेच तिसरी विकास कार्यास सहभागी होण्यास पात्र ठरेल निर्णय निर्धारण प्रक्रिया सहभागी होऊ शकेल याकरिता श्री हा सबलीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण भूमिका व ठेवणारा घटक आहे


*ISBN-978-93-49938-45-8*

थोडक्यात महिला सक्षमीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये महिलांना वस्तू व्यक्ती आणि ज्ञान माहिती कल्पना या साधनावर तसेच पैशासारखे आर्थिक श्रोतांवर नियंत्रण ठेवता येणे तसेच पैशांसंबंधी व्यवहार करता येणे आणि घरात समुदायात समाजात आणि देशातल्या निर्णयावर मत मांडण्याची शक्ती प्राप्त होते.

**महिला सक्षमीकरणाचे स्वरूप**

आजच्या महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात महत्त्वाचे म्हणजे आज महिला पोटातील गर्भापासून सुरक्षित आहे म्हणजे मातृत्व प्राप्तीच्या कालावधीत तिथे सुशिक्षित करणे हा देखील महत्त्वाचा विषय आहे प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेसारख्या केंद्र सरकारच्या योजनेद्वारे महिलांना त्यांच्या गरोदरपणात आणि स्तनपानाच्या कालावधीत आर्थिक संरक्षण पुरवले जाते यासंदर्भात अत्यंत महत्त्वाचा निर्णय म्हणजे मातृत्व लाभ कायदा सुधारणा करून नोकरी करणाऱ्या महिलांना सहा महिन्यांची भर पगारी मातृत्व रजा मंजूर करण्यात आली आहे यासारख्या अनेक स्त्रिया विकासाच्या योजना शासनाने महिला सक्षम करण्यासाठी चालू केले आहेत याचबरोबर सध्या महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित दादा पवार यांनीही महिलांच्या प्रसूतीच्या संदर्भात एक वर्षांच्या रजेचा विषय घेतला आणि महिला सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र हे एक सक्षम राज्य बनवण्याची संकल्पना त्यांनी मांडली त्यांचा आढावा खालील प्रमाणे केंद्र व राज्य शासनाने महिला सक्षमीकरणा संदर्भात चालू केलेले कार्यक्रम किंवा योजना.

- **महिला शक्ती केंद्र**

सामाजिक सहभागाद्वारे ग्रामीण भागातील महिलांना सक्षम करण्याचे लक्ष समोर ठेवून त्याला आधार देण्यासाठी आणि त्यांना भरू पाठिंबा देण्यासाठी महिला शक्ती केंद्र नावाची नवी उपाययोजना महिलांचे शशक्तीकरण आणि संरक्षण अभियान योजनेच्या क्षेत्राखाली सुरू करण्यात आली.

ग्रामीण भागातील महिलांना त्यांचे अधिकार मिळवण्यासाठी तसेच प्रशिक्षण देऊन आणि नव्या क्षमता विकसित करून त्यांचे सशक्तिकरण करण्यासाठी महिला शक्ती केंद्र माध्यम म्हणून उपयोगी पडेल अशा कल्पनेतून या केंद्राची निर्मिती झाली आहे यासोबत त्यांच्या क्षमतेची नेमकी कल्पना यावी म्हणून देशाच्या निवडक जिल्हा व प्रभागामध्ये ग्राम पंचायत पातळीवर आरोग्य सुविधा दर्जात्मक शिक्षण नोकरी उद्योग आणि व्यवसाय संबंधी मार्गदर्शन रोजगाराच्या संधी आरोग्य सुरक्षा संबंधी जाणीव सामाजिक सुरक्षा आणि डिजिटल व्यवहाराचे शिक्षण या सुविधा सुलभतेने मिळवण्यासाठी आवश्यक एकत्रित पाठिंबा दिला जात आहे ही योजना ग्रामीण महिलांच्या विशेषतः देशाच्या अत्यंत मागासलेल्या 115 जिल्ह्यांमध्ये महिलांच्या सशक्तिकरणा विशेष महत्त्वाची

भूमिका निभवण्यात प्रतिबद्ध आहे.

- **दीनदयाल उपाध्याय अंत्योदय योजना**

आजीविका हा ग्रामीण महिलांना केंद्रस्थानी ठेवून तयार केलेला प्रकल्प आहे आणि ग्रामीण महिलांच्या सहभागाद्वारे सार्वत्रिक समाज जागृती करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे यासाठी निवडलेल्या ग्रामीण भागातील प्रत्येक गरीब घरातील किमान एक श्री सदस्य ठराविक कालंबरे देत स्वयंसहायता गटांच्या कार्यात सहभागी होईल याची निश्चिती करण्यात आली आहे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेतील विशेष धोरणे अशाप्रकारे तयार केली होती की ही योजना समाजातील सर्व दुर्बल घटकांपर्यंत पोहोचून त्यांचे दारिद्र्य निर्मूलन यशस्वीपणे करता येईल व दुर्बल घटकातील महिला सक्षम म्हणेल यातून निश्चितच महिलांचे राहणीमान उंचावेल.

- **निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींचे सशक्तिकरण**

निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींचे सशक्तिकरण करण्याचे उद्देशाने मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्यात आले जेणेकरून गावाचे नेतृत्व करण्यासाठी त्यांच्याकडून अपेक्षित असलेल्या जबाबदार जबाबदाऱ्या पार पाडण्यात त्यांना मदत होईल आणि त्यांच्या गावाच्या अधिक उज्वल भविष्यासाठी गावाला मार्गदर्शन करणे त्यांना सोपे जाईल यापूर्वी गाव पातळीवर असलेल्या अनुभवातून असे लक्षात आले की निवडून आलेल्या श्री प्रतिनिधींमध्ये नवी जबाबदारी पेलण्याची क्षमता निर्माण करणे कर्ज पुरवण्याची व्यवस्था करणे कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे इत्यादी उद्देश आहेत आरोग्य शिक्षक उपजीविका पुरुष प्रतिनिधींकडून हमखास दुर्लक्षित राहणाऱ्या विकास विषयक मुद्द्यांवर केंद्रित झालेले असते.

- **राष्ट्रीय महिला कोष**

राष्ट्रीय महिला कोश अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना उत्पन्न मिळवण्याचे साधन निर्माण करण्यासाठी कोणत्याही अडचणी विना आणि काहीही तारण ठेवायला न लागता ग्राहक स्नेही पद्धतीने छोट्या प्रमाणावर कर्जाची सुविधा देतो अनेक मध्यस्थ संस्थांच्या मदतीने छोटी कर्ज देणे त्यांचे उद्योग विकसित करायला मदत करणे त्यांना काटकसर करून आणि क्रेडिट व्यवहारावरती उद्योग चालवण्याची मार्ग शिकवणे तसेच स्वयं योजना गटांमध्ये नेतृत्व विकासासाठी प्रशिक्षण दिले जाते .

- **महिलांसाठीचे राष्ट्रीय माहिती भंडार**

सरकारने महिलांच्या मदतीसाठी सुरु केलेल्या सर्व कार्यक्रमाने योजना यांची माहिती नागरिकांना सुलभतेने मिळावी यासाठी सरकारने राष्ट्रीय माहिती भंडार नावाने नवीन पोर्टल तयार केले आहे


ISBN-978-93-49938-45-8

महिलांशी संबंधित विधी योजना आणि कार्यक्रम यांच्या बाबतची सर्व माहिती वेळोवेळी या पोर्टलवर अपडेट केली जाते

- **उद्योजिका विकास कार्यक्रम**

हा कार्यक्रम महिलांना त्यांच्या पायावर उभे राहण्यास मदत करतो प्रधानमंत्री मुद्दा योजना स्टॅन्ड अप स्टार्ट अप आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार अभियाना अंतर्गत महिलांचे स्वयंसहाय्यता बचत गट या सर्व योजनांची महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आणि सुरक्षित व्हायला मदत केली आहे महिलांची स्वतःची सुरक्षितता आणि सर्वत्र त्यांचे संरक्षण करणे ही बाब श्री ससेटीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे

- **महिला पोलीस स्वयंसेवक**

स्थानिक पोलिसांच्या तुलनेत हे महिला पोलीस जास्त प्रणामकारक पर्याय म्हणून सिद्ध होतील असा अंदाज आहे नागरिक आणि पोलिसांमधील सभास सुरळीत हवा आणि दुःखी महिलांना मदत हवी आहे हे जुने देशाची सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये महिला पोलीस स्वयंसेवकाची नेमणूक करण्यात आली घरगुती हिंसाचार बालविवाह होण्यासाठी होणारा छळवणूक आणि सार्वजनिक ठिकाणी महिलांना होणारी मारहाण यासंबंधीच्या घटना घडत असतील तर या संदर्भात यामधील पोलीस स्वयंसेवक महत्त्वपूर्ण कार्य करतात .

- **महिला ई हाट**

महिलांना खरेदी विक्री व्यवहारांमध्ये सामावून घेऊन त्यांच्या आर्थिक सशक्तिकरण करण्यासाठी महिला इहाट हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे महिलांचे स्वयंसहाय्यता गट बिगर शास सरकारी संस्था व्यक्तिगत पातळीवर उद्योग चालवणाऱ्या महिलांच्या उत्पादनांच्या विक्री करता सरकारने उपलब्ध करून दिलेला हा नवा मंच आहे या संकेतस्थळाला आतापर्यंत चौदाशे पन्नास व्यक्तींनी भेट देऊन माहिती घेतली आहे देशाच्या 22 राज्यातील महिलांचे स्वयंसहाय्यता गट बिगर सरकारी संस्था उद्योग 1800 उत्पादने आणि सेवा यावर विक्रीसाठी उपलब्ध आहेत या माध्यमातून सहा महिन्यांच्या कालावधीत उद्योजिका स्वयंसहाय्यता गट बिगर सरकारी संस्था यांच्या वीस लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेचे व्यवहार झाले आहेत

## निष्कर्ष

वरीलविश्लेषणावरून असे स्पष्ट होते की कुटुंबातील मुख्य महिला सक्षम झाल्याशिवाय भारतीय महिला सक्षमीकरण शक्य होणार नाही कारण भारतीय लोकसंख्येच्या तुलनेत निम्मेपेक्षा अधिक असलेल्या महिलांना आरोग्य शिक्षण आणि रोजगार मिळाल्याशिवाय त्यांच्या सशक्तिकरणाची

काळजी घेतल्याशिवाय विकासाच्या मार्गावर प्रगती करता येणार नाही महिलांच्या विकासासाठी अनेक देशांनी सुनियोजित प्रयत्न करण्याच्या दृष्टिकोनातून देशाला प्रगतीपथावर पुढे नेता येणार नाही शिवाय भारतातील सर्व सक्षम घटकांची योग्य दिशेने वाटचाल केवळ महिला सक्षमकरणाच्या कल्याणकारी योजना करतील आणि महिलांच्या सक्षम करण्याच्या माध्यमातून नव्या क्षितिजावरती नेऊन ठेवतील अशी आशा आहे .

## *संदर्भ*

1. किरण देवेंद्र, महिला सक्षमीकरण : संकल्पना आणि वास्तव, पुणे : डायमंड पब्लिकेशन, 2012.
2. वसंत साठे, भारतीय समाजातील स्त्रीची स्थिती, मुंबई : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, 2008.
3. World Bank, World Development Report, Washington D.C., 2014.
4. भारतीय समाज आणि स्त्री अभ्यास, पुणे : स्नेहवर्धन प्रकाशन, 2015.


*ISBN-978-93-49938-45-8*

# महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि त्यांचे राजकीय परिणाम – एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. डॉ. ढगे रामदास बाबू**
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत
Email: ramdhage1@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19760290
*DOI: 10.5281/zenodo.19760290*

**प्रस्तावना**

महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास हा विविध सुधारणा चळवळी, समतावादी विचारधारा व परिवर्तनवादी नेतृत्व यांच्या प्रभावाने घडलेला आहे. इतिहासात या चळवळींना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. १९ व्या शतकापासून महाराष्ट्रात उदयास आलेल्या सामाजिक चळवळींनी समाजातील जातीय असमानता, स्त्री-पुरुष असमानता, शिक्षणातील विषमता व धार्मिक अंधश्रद्धा यांसारख्या प्रश्नांवर प्रखर आवाज उठविला. यांमुळे केवळ सामाजिक बदलच घडले नाहीत तर त्यांच्या परिणामस्वरूप महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेलाही नवी दिशा मिळाली. त्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींचा अभ्यास करताना त्यांच्या राजकीय परिणामांचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

१९ व्या शतकात ब्रिटिश सत्तेच्या आगमनानंतर शिक्षणाचा प्रसार, मुद्रणयंत्रे, वृत्तपत्रे आणि पाश्चात्य विचारांचा प्रभाव वाढला. त्यामुळे समाजातील अन्यायकारक परंपरांविरुद्ध आवाज उठू लागला. इतिहासकार अ.र. देसाई यांच्या मते, भारतातील सामाजिक सुधारणा चळवळी ज्या आधुनिक राजकीय चेतनेच्या वाढीशी जवळून जोडल्या जातात.[१] म्हणूनच महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी केवळ सामाजिक सुधारणा करण्यापुरत्या मर्यादित न राहता त्यांनी राजकीय जागृतीही निर्माण केली. महाराष्ट्रातील सर्वात प्रभावी सामाजिक चळवळ म्हणजे सत्यशोधक समाज चळवळ. ही चळवळ मा. फुले यांनी १८७३ मध्ये सुरु केली. या चळवळीचे मुख्य उद्दिष्ट जातीय भेदभाव नष्ट करणे आणि शूद्र-अतिशूद्रांना सामाजिक न्याय मिळवून देणे हे होते. त्यांनी आपल्या गुलामगिरी या ग्रंथात ब्राह्मणवादी व्यवस्थेवर कठोर टीका केली आहे. “शूद्र-अतिशूद्रांच्या दास्याची कारणे धार्मिक आणि सामाजिक रचनेत आहेत.”[२] समाजातील खालच्या घटकांमध्ये राजकीय जागृती निर्माण झाली. पुढे बहुजन राजकारणाच्या निर्मितीस आधार मिळाला. सामाजिक न्यायाचा विचार पुढे महाराष्ट्रातील राजकीय चळवळींमध्ये दिसून आला. राजकीय परिणाम

इतिहासकार Gail Omvedt यांच्या मते “महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर राजकीय चळवळीचा वैचारिक

पाया सत्यशोधक चळवळीने घातला."[३]

१९ व्या शतकात महात्मा ज्योतीराव व सावित्रीबाई फुले यांनी सुरु केलेल्या सत्यशोधक चळवळीने भारतीय समाजातील ब्राह्मणवादी वर्चस्व, जातीय विषमता व स्त्री शिक्षणाच्या प्रश्नावर मूलभूत आव्हान उभे केले. या चळवळीमुळे बहुजन समाजात सामाजिक जागृती निर्माण झाली. पुढे या जागृतीने राजकीय संघटनांच्या निर्मितीस चालना दिली. "शिक्षण हेच खऱ्या अर्थाने शोषितांच्या मुक्तीचे साधन आहे."[४] असे मा. फुलेंनी अधोरेखित केले. या विचारातून सामाजिक परिवर्तनाच्या माध्यमातून राजकीय सशक्तीकरणाची संकल्पना स्पष्ट होते. महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची चळवळ सुरु करण्याचे मोठे कार्य सावित्रीबाई व ज्योतीराव फुले यांनी केले. १८४८ मध्ये पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरु झाली. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगताना लिहिले "विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले."[५] परिणामी स्त्रियांच्या राजकीय सहभागाला चालना मिळाली. पुढे स्त्रियांच्या मतदानाच्या हक्कासाठी चळवळी निर्माण झाल्या. सामाजिक सुधारणा आणि राजकीय हक्क यांचा संबंध स्पष्ट झाला.

याचप्रमाणे २० व्या शतकाच्या सुरुवातीस राजर्षी शाहू महाराज यांनी करवीर संस्थानात केलेल्या सामाजिक सुधारणा, जसे की शिक्षणाचा प्रसार, मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची अंमलबजावणी आणि जातीय भेदभावाविरुद्धची धोरणे, या सर्वांनी सामाजिक समतेचा पाया मजबूत केला. शाहू महाराजांनी सामाजिक न्यायासाठी अनेक सुधारणा केल्या. १९०२ मध्ये त्यांनी आरक्षण धोरण लागू केले. "राज्य धोरणाद्वारे महाराष्ट्राच्या सामाजिक रचनेत परिवर्तन घडवून आणण्याचा शाहू महाराजांनी केलेला प्रयत्न." सामाजिक न्यायाच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरला. वि. का. राजवाडे यांचे विधान महत्वाचे आहे. मागासवर्गीय समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वात वाढ झाली. पुढील काळातील आरक्षण धोरणांना दिशा मिळाली. सामाजिक न्याय हा महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रमुख मुद्दा बनला.या सुधारणा पुढील काळात महाराष्ट्रातील लोकशाही राजकारणाच्या घडणीत महत्त्वपूर्ण ठरल्या. "महाराजांची राजर्षी शाहू धोरणे हि जवळजवळ सामाजिक सुधारणा नव्हती पण ति महाराष्ट्रातील लोकशाही राजकारणाचा पाया रचतात."[६]

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील दलित चळवळीने महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय परिवर्तनाला व्यापक दिशा दिली. अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक न्याय व राजकीय प्रतिनिधित्व या मुद्द्यांवर आधारित या चळवळीमुळे भारतीय राज्यघटनेत समता, स्वातंत्र्य व बंधुता या तत्त्वांना संस्थात्मक स्वरुप प्राप्त झाले. राजकीय सत्ता ही सामाजिक सुधारणांची किल्ली आहे.[७] असे डॉ. आंबेडकरांनी स्पष्टपणे नमूद केले आहे या विधानातून सामाजिक चळवळी आणि राजकीय सत्तेतील परस्पर संबंध स्पष्ट होतो. महाराष्ट्रातील दलित चळवळीचे नेतृत्व राहिलेल्या डॉ. आंबेडकर यांनी केले. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध तीव्र संघर्ष केला. महाड सत्याग्रह (१९२७) हा दलित हक्कांसाठीचा


*ISBN-978-93-49938-45-8*

ऐतिहासिक आंदोलन होता. दलित समाजात राजकीय संघटन निर्माण झाले. पुढे स्वतंत्र राजकीय पक्षांची स्थापना झाली. भारतीय राज्यघटनेत समानता आणि मूलभूत अधिकार समाविष्ट झाले.

स्वातंत्र्यानंतर भाषिक राज्यांच्या निर्मितीसाठी मोठी चळवळ झाली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळ उभी राहिली. या चळवळीत एस.एम. जोशी आचार्य अत्रे यांसारख्या नेत्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. इतिहासकार य.दी. फडके यांनी संयुक्त महाराष्ट्र ही दोन्ही सांस्कृतिक राजकीय चळवळ म्हणून केलेला उल्लेख महत्वपूर्ण आहे.[८] १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची झालेली निर्मिती, प्रादेशिक ओळख व त्यातून अधिक मजबूत झालेले राजकारण, महाराष्ट्रातील राजकीय पक्षांची झालेली पुनर्रचना संयुक्त महाराष्ट्राकरिता फलदायी ठरली.

महाराष्ट्रात शेतकरी व कामगार चळवळींनीही सामाजिक बदल घडवून आणले. शेतकरी आणि कामगारांच्या आर्थिक संघर्षाचे हळूहळू राजकीय क्षणात रुपांतर झाल्याचे डी.डी. कोसंबींनी मानले आहे.[९] परिणामी कामगार कायद्यांमध्ये सुधारणा झाली. शेतकरी प्रश्न राजकीय अजेंड्यावर आला. ग्रामीण राजकारणात नवीन नेतृत्व निर्माण झाले.

महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळ, अस्पृश्यता विरोधी चळवळ, शेतकरी व कामगार चळवळी, स्त्री मुक्ती चळवळ तसेच संयुक्त महाराष्ट्र आंदोलन यांसारख्या विविध सामाजिक चळवळींनी राज्यातील राजकीय संरचना, पक्षव्यवस्था तथा लोकशाही संस्कृती घडविण्यात मोठी भूमिका बजावली. या चळवळींनी समाजातील दुर्बल घटकांना संघटित केले, त्यांच्या प्रश्नांना राजकीय अजेंड्यावर आणले व शासनव्यवस्थेत प्रतिनिधित्व मिळविण्याचा मार्ग खुला केला. म्हणूनच महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींचा अभ्यास हा केवळ सामाजिक इतिहासापुरता मर्यादित न राहता तो राजकीय परिवर्तनाच्या प्रक्रियेशी जोडलेला आहे. सामाजिक चळवळींनी निर्माण केलेल्या विचारप्रवाहांनी व संघर्षांनी महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला समताधिष्ठित तथा लोकशाहीवादी स्वरुप दिले आहे. म्हणूनच “महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि त्यांचे राजकीय परिणाम” हा विषय ऐतिहासिक, सामाजिक व राजकीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा ठरतो. तसेच या चळवळींचा महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेवरही मोठा परिणाम झाला.

महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींनी समाजातील असमानता दूर करण्यासाठी मोठे कार्य केले. सत्यशोधक समाज, स्त्री शिक्षण चळवळ, शाहू महाराजांचे सुधारकार्य, दलित चळवळ आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ या सर्वांनी महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासाला दिशा दिली. या चळवळींमुळे सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाही मूल्ये मजबूत झाली. त्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी केवळ सामाजिक सुधारणा नव्हत्या तर त्या राजकीय परिवर्तनाचेही महत्त्वपूर्ण साधन ठरल्या.

### संदर्भ

1. Desai A. R., "Social Background of Indian Nationalism", Popular Prakashan, Mumbai, 1976, पृ. क्र. ११४.
2. फुले ज्योतिराव, 'गुलामगिरी', समता प्रकाशन, पुणे १८७३/ पुनर्मुद्रण २०००, पृ. क्र. ४२.
3. Omvedt Gail, 'Cultural Revolt in a Colonial Society', Scientific Socialist Education Trust, Mumbai, 1976, पृ. क्र. ९५.
4. पूर्वोक्त, फुले ज्योतिराव, पृ. क्र. ४५.
5. फुले सावित्रीबाई, 'काव्याफुले' पुणे १८५४, पृ. क्र. १२.
6. Rajwade V. K., Marathyanchya Itihasachi Sadhane, Vol. 6, Pune, 1924, पृ. क्र. २१८.
7. Pawar Jayasingrao, 'Shahu Chhatrapati and Social Reform', Padmgandha prakashan, 2001, पृ. क्र. ११२.
8. Ambedkar B.R., Annihilation of Caste, Thacker & Co., Bombay, 1936, पृ. क्र. ६५.
9. Phadke Y. D., 'Politics and Language', Himalaya Publishing House, Mumbai, 1973, पृ. क्र. १६२.
10. Kosambi D. D., An Introduction to the Study of Indian History, Popular Prakashan, Mumbai, 1956, पृ. क्र. २९८.


ISBN-978-93-49938-45-8

# महाराष्ट्रातील किल्ले आणि पर्यटन : ऐतिहासिक, सांस्कृतिक व आर्थिक परिप्रेक्ष्य

**प्रा. बाळासाहेब धांडे**
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत
Email: balasahebdhande653@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19760367
*DOI: 10.5281/zenodo.19760367*

**प्रस्तावना**

महाराष्ट्राचा इतिहास हा प्रामुख्याने किल्ल्यांच्या इतिहासाशी जोडलेला आहे. सह्याद्रीच्या उंच पर्वतरांगांमध्ये, कोकणाच्या किनारपट्टीवर व पठारी प्रदेशात उभारलेले किल्ले हे महाराष्ट्राच्या ऐतिहासिक परंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक मानले जातात. विशेष करून मराठा साम्राज्याच्या उदयात किल्ल्यांनी अत्यंत निर्णायक भूमिका बजावली. मराठा साम्राज्याची उभारणी करताना छत्रपती शिवाजी महाराज यांनी किल्ल्यांचा लष्करी, राजकीय व प्रशासकीय दृष्टीने अत्यंत प्रभावी उपयोग केला.[१] त्यामुळे किल्ले हे केवळ संरक्षणात्मक बांधकाम नसून स्वराज्याच्या शक्तीचे, स्वाभिमानाचे आणि संघटनक्षमतेचे प्रतीक ठरले.

महाराष्ट्रातील किल्ल्यांचे भौगोलिक स्थान हे त्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य मानले जाते. सह्याद्री पर्वतरांगा या नैसर्गिक रचनेमुळे अनेक किल्ले डोंगरमाथ्यावर उभारले गेले. या उंच किल्ल्यांमुळे शत्रूच्या हालचालींवर लक्ष ठेवणे, संरक्षणाची मजबूत व्यवस्था करणे आणि गरज पडल्यास सुरक्षित माघार घेणे सोपे होत असे. किल्ल्यांची निवड करताना नैसर्गिक संरक्षण, पाण्याची उपलब्धता, आसपासच्या प्रदेशावर नियंत्रण आणि दळणवळणाची सोय या बाबींचा विशेष विचार केला जात असे. त्यामुळे मराठा साम्राज्याच्या लष्करी रणनीतीमध्ये किल्ल्यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

किल्ल्यांचे प्रकार पाहिले असता महाराष्ट्रात मुख्यतः तीन प्रकारचे किल्ले आढळतात. डोंगरी किल्ले, भुईकोट किल्ले व समुद्रकिनारी असलेले जलदुर्ग. डोंगरी किल्ले सह्याद्री पर्वतरांगांमध्ये बांधले गेले होते, तर भुईकोट किल्ले सपाट प्रदेशात मजबूत तटबंदी करून उभारले गेले. समुद्रकिनाऱ्यावर बांधलेले जलदुर्ग हे समुद्री मार्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे होते. या सर्व प्रकारच्या किल्ल्यांच्या माध्यमातून मराठा राज्याने संरक्षणाची एक व्यापक आणि प्रभावी व्यवस्था निर्माण केली होती.

इतिहासकारांच्या मते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ताब्यात सुमारे ३५० ते ३६० किल्ले होते.[२] हे किल्ले स्वराज्याच्या प्रशासनाचे, संरक्षणाचे आणि लष्करी हालचालींचे प्रमुख केंद्र होते. "किल्ले हे

मराठा साम्राज्याचे कणा होते." असे यथार्थ वर्णन जदुनाथ सरकार यांनी केले आहे.[३] प्रत्येक किल्ल्यावर किल्लेदार, सबनीस, कारकून, तोफखानाधिकारी अशा विविध अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जात असे. यामुळे किल्ले हे केवळ लष्करी तळ नसून प्रशासनाचे केंद्र म्हणूनही कार्यरत होते.

मराठा साम्राज्याच्या इतिहासात अनेक किल्ल्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. त्यापैकी रायगड किल्ला हा सर्वात महत्त्वाचा किल्ला मानला जातो. हा किल्ला मराठा साम्राज्याची राजधानी होता. इ.स. १६७४ मध्ये येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक झाला आणि स्वराज्याला औपचारिक स्वरूप प्राप्त झाले. रायगडावर असलेला राजवाडा, बाजारपेठ, होळीचा माळ, टकमक टोक आणि जगदीश्वर मंदिर ही ठिकाणे त्या काळातील राजकीय, सामाजिक आणि धार्मिक जीवनाचे प्रतीक मानली जातात.

किल्ल्यांवर आढळणारी स्थापत्यरचना देखील अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. किल्ल्यांवरील तटबंदी, बुरूज, मजबूत दरवाजे, गुप्त मार्ग, पाण्याच्या टाक्या, धान्यकोठारे आणि मंदिरे यांमधून त्या काळातील स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना दिसून येतो. विशेष म्हणजे डोंगराच्या कड्यावर बांधलेली मजबूत तटबंदी आणि शत्रूला अडवण्यासाठी तयार केलेली वक्रद्वारांची रचना ही मराठा स्थापत्यकलेची वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे.[४]

महाराष्ट्रातील किल्ल्यांचा इतिहास हा केवळ युद्ध आणि राजकारणापुरता मर्यादित नाही. तो सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनाशी देखील घनिष्ठपणे जोडलेला आहे. किल्ल्यांवर असलेल्या मंदिरांमुळे धार्मिक जीवनाला चालना मिळाली. तसेच किल्ल्यांभोवती वसलेली गावे, बाजारपेठा आणि व्यापार व्यवस्था यांमुळे स्थानिक अर्थव्यवस्था विकसित झाली. त्यामुळे किल्ले हे त्या काळातील समाजजीवनाचे केंद्र बनले होते.[५]

आजच्या काळात महाराष्ट्रातील किल्ले ऐतिहासिक वारसा म्हणून महत्त्वाचे मानले जातात. इतिहास अभ्यासक, संशोधक आणि पर्यटक यांच्यासाठी हे किल्ले आकर्षणाचे प्रमुख केंद्र ठरले आहेत. आधुनिक पर्यटनाच्या संदर्भात पाहिले असता हे किल्ले ऐतिहासिक पर्यटन (Heritage Tourism) या प्रकारात मोडतात. दरवर्षी लाखो पर्यटक महाराष्ट्रातील विविध किल्ल्यांना भेट देतात. या पर्यटनामुळे इतिहासाची जाणीव वाढते तसेच सांस्कृतिक वारशाचे महत्त्व लोकांना समजते. विशेषतः सह्याद्री पर्वतरांगांमध्ये असलेले किल्ले ट्रेकिंग व गिर्यारोहणासाठी अत्यंत प्रसिद्ध आहेत. त्यामुळे युवकांमध्ये साहसी पर्यटनाची आवड वाढताना दिसते. अनेक युवक ऐतिहासिक किल्ल्यांवर ट्रेकिंग करून इतिहासाचा प्रत्यक्ष अनुभव घेतात. या प्रक्रियेमुळे इतिहासाविषयी जिज्ञासा निर्माण होते तसेच सांस्कृतिक वारशाबद्दल अभिमानाची भावना विकसित होते. किल्ल्यांवर असलेली ऐतिहासिक मंदिरे, स्मारके आणि सांस्कृतिक स्थळे यांमुळे धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनालाही चालना मिळते.[६] अनेक


*ISBN-978-93-49938-45-8*

किल्ल्यांवर वार्षिक उत्सव, जयंती कार्यक्रम आणि सांस्कृतिक उपक्रम आयोजित केले जातात. यामुळे स्थानिक समाजजीवनात सांस्कृतिक एकात्मता निर्माण होते.

किल्ल्यांच्या पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठा फायदा होतो. पर्यटकांच्या आगमनामुळे मार्गदर्शक सेवा, निवास व्यवस्था, वाहतूक, खाद्यपदार्थ विक्री, स्थानिक हस्तकला वस्तूंची विक्री अशा विविध प्रकारच्या रोजगाराच्या संधी निर्माण होतात. त्यामुळे ग्रामीण भागातील आर्थिक विकासाला चालना मिळते. विशेषतः दुर्गम भागातील गावांमध्ये पर्यटनामुळे आर्थिक स्थैर्य निर्माण होण्यास मदत होते.[७] तथा किल्ल्यांच्या वाढत्या पर्यटनामुळे काही समस्या देखील निर्माण होत आहेत. अनेक किल्ल्यांवर पर्यटकांकडून कचरा टाकणे, भित्तींवर नावे कोरणे, ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान करणे अशा प्रकारचे प्रकार घडताना दिसतात. यामुळे किल्ल्यांची झीज व नासधूस वाढत आहे. तसेच अनियोजित पर्यटनामुळे पर्यावरणीय हानी होण्याचा धोका देखील निर्माण झाला आहे. या समस्यांचा विचार करता किल्ल्यांच्या संरक्षणासाठी प्रभावी उपाययोजना करणे अत्यावश्यक ठरते. यासाठी पुरातत्त्व विभाग, स्थानिक प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांचे संयुक्त सहकार्य आवश्यक आहे[८] किल्ल्यांचे वैज्ञानिक पद्धतीने संवर्धन करणे, पर्यटकांसाठी योग्य नियम तयार करणे आणि पर्यावरणपूरक पर्यटनाचा प्रसार करणे ही काळाची गरज आहे.

एकूणच पाहता महाराष्ट्रातील किल्ले हे राज्याच्या इतिहासाचे जिवंत स्मारक आहेत. ते मराठा साम्राज्याच्या शौर्यगाथेचे प्रतीक आहेत. किल्ल्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या इतिहासाचा, संस्कृतीचा आणि स्थापत्यकलेचा समृद्ध वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचतो. त्यामुळे किल्ल्यांचे जतन, संवर्धन आणि योग्य पर्यटन विकास ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

महाराष्ट्रातील हे किल्ले ऐतिहासिक वारशाचे प्रतीक आहेत. राज्याच्या इतिहासाचा अमूल्य वारसा आहेत. पर्यटनाच्या दृष्टीनेही त्यांचे महत्त्व वाढत आहे. ते केवळ ऐतिहासिक स्मारके नसून पर्यटन, सांस्कृतिक जतन आणि आर्थिक विकासाचे महत्त्वाचे साधन आहेत. योग्य नियोजन व संरक्षण धोरणांमुळे किल्ल्यांवर आधारित पर्यटनाचा अधिक विकास होऊ शकतो. आज हे किल्ले इतिहास, संस्कृती आणि पर्यटन यांच्यादृष्टीने महत्वाचे आहे. त्यामुळे किल्ल्यांचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे.

ऐतिहासिक वारशाचे जतन, पर्यटन उद्योगाचा विकास, स्थानिक रोजगार निर्मिती, सांस्कृतिक ओळख टिकवणे आदि गोष्टींना पर्यटनामुळे चालना मिळते. असे असले तरी किल्ल्यांची झीज व नासधूस, पर्यटकांकडून कचरा व प्रदूषण व अनियोजित पर्यटनामुळे पर्यावरणीय हानी सारख्ये प्रश्न निर्माण होवू लागले आहेत. म्हणूनच किल्ल्यांच्या संरक्षणासाठी पुरातत्त्व विभाग, स्थानिक प्रशासन आणि स्वयंसेवी संस्था यांचे सहकार्य आवश्यक आहे.

## *संदर्भ*


1. साने काशीनाथ नारायण, (संपा) 'सभासद बखर', भारतीय इतिहास संशोधन मंडळ. पुणे पृ. क्र. ३६.
2. Ranade Mahadev Govind, 'Rise of the Maratha Power' Punalekar & Company, Bombay, 1900, पृ. क्र. ६५.
3. Sarkar Jadunath, 'Shivaji and His Times', Orient Longman, Delhi, 1964, पृ. क्र.५४.
4. सरदेसाई गो. स., 'मराठी रियासत', खंड १, पुणे, १९६८, पृ. क्र. ११२.
5. देशमुख स. रा. 'शिवाजी महाराज आणि स्वराज्य', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. क्र. ८७.
6. खरे ग. ह., 'महाराष्ट्रातील किल्ले', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९५०, पृ. क्र. २१०.
7. दांडेकर गो. नी., 'दुर्गभ्रमण गाथा' मौज प्रकाशन, पुणे, २००५, पृ. क्र. १८.
8. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ Maharashtra Tourism Report, 2022, पृ. क्र. ६७.



***ISBN-978-93-49938-45-8***

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हैद्राबाद मुक्ती लढ्यातील योगदान - एक ऐतिहासिक परिशीलन

**प्रा. डॉ. सचिन अशोक धेंडे**
इतिहास विभागप्रमुख, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा (महाराष्ट्र)
Email: dsachin100@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19760445
*DOI: 10.5281/zenodo.19760445*

**प्रस्तावना**

ब्रिटिशांनी हिंदुस्थानची फाळणी करून अनुक्रमे १४ व १५ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तान व भारत अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण केली. विलीन होणे अथवा स्वतःचे स्वतंत्र राज्य अस्तित्वात ठेवणे असे पर्याय दिले होते. प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू व गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्त्वाखाली तत्कालीन भारतातील ५६५ पैकी ५६२ संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन झाली. मात्र हैदराबाद, काश्मीर आणि जुनागढ ही तीन संस्थाने स्वतंत्र भारतात सामील झाली नव्हती.

हैद्राबाद संस्थानचा भारतीय संघराज्यात विलीनीकरणाचा लढा हा 'मराठवाडा मुक्तीसंग्राम' या नावाने इतिहासात प्रसिद्ध आहे. या लढयाची उभारणी व बांधणी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, देवीसिंग चौहान, हैद्राबाद स्टेट कांग्रेस, हैद्राबाद स्टेट शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, आर्यसमाज, महाराष्ट्र सभा, विविध विद्यार्थी संघटना यांच्या विचार व कार्यातून सर्वसामान्य जनता या लढ्यात उत्स्फुर्तपणे सहभागी झाल्यामुळे त्यास जनांदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले.

**हैद्राबाद संस्थान-संक्षिप्त आढावा**

मुघल सत्ता काळात दख्खनची अर्थात दक्षिण भारतची प्रशासनाच्या सोयीसाठी विभागणी सहा सुभ्यांत करण्यात आलेली होती. या प्रदेशाचा कारभार पाहण्यासाठी सुभेदार पद निर्माण करून त्यास 'दक्षिणेचा सुभेदार' म्हटले जात होते. या सर्व सहा सुभे यांचे मुख्यालय औरंगाबाद हे होते. मोगल बादशाह फर्रुखशियरने इ.स. १७१३ मध्ये मीर कमरुद्दीन चिन कुलीजखान यास निजाम-उल-मुल्क अशी पदवी देऊन दक्षिणचा सुभेदार म्हणून नियुक्त केले होते. मुघल बादशाह औरंगजेबाच्या मृत्युनंतर वारसा सत्तासंघर्षात केंद्रीय मुघल सत्ता दुर्बल झाली. ही संधी साधून मीर कमरुद्दीनने ३१ जुलै १७२४ रोजी दक्षिणेत स्वतंत्र निजाम राज्यनिर्मितीची घोषणा करून हैदराबादला राजधानी[१] बनविले.

हैद्राबाद संस्थान हे स्वातंत्र्यपूर्व भारतातील भौगोलिकदृष्टया एक विस्तीर्ण संस्थान होते. या संस्थानची

एकूण लोकसंख्या १९४१ सालच्या जनगणनेनुसार सुमारे १,६३,८६,०९४ एवढी होती.[२] तत्कालीन हैद्राबाद संस्थानामध्ये सद्यकालीन महाराष्ट्रातील मराठवाडा, आंध्रमधील तेलंगणा तर कर्नाटकातील बीदर या भागाचा समावेश होता. हैद्राबाद संस्थानातील हिंदू धर्मीय (७८%), दलित (२२%) व मुस्लिम धर्मीय (१०%) असे लोकसंख्येचे[३] प्रमाण असल्याचे दिसून येते. या संस्थानाचा संस्थानिक निजाम हा मुस्लिम धर्मीय होता.

### 'हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम (मराठवाडा मुक्ती लढा) प्रारंभ

हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाचा प्रारंभबिंदू कोणता? याबाबत इतिहासकारांमध्ये मतभिन्नता आढळते. मात्र हा लढा आर्यसमाज, हैद्राबाद स्टेट कांग्रेस, हैद्राबाद स्टेट शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, महाराष्ट्र सभा इ. संघटनांनी आपापल्या पद्धतीने हैद्राबाद संस्थानात चळवळी उभ्या केल्याने विविध टप्प्यामध्ये विभागलेला होता हे स्पष्ट होते. या सर्वच संघटनांनी निजामाच्या दडपशाही विरुद्ध आवाज उठवून जनतेत जागृती करून या उठावाचा प्रारंभ केल्याचे दिसून येते.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हैद्राबाद संस्थान सबंध

डॉ. आंबेडकरांचा हैद्राबाद संस्थानातील जनता व राजवटीशी प्रथम संबंध जगप्रसिद्ध वेरुळची लेणी व देवगिरी किल्ला भेट प्रसंगी[४] (डिसेंबर,१९३४) आलेला आढळतो. याप्रसंगी त्यांना हौद बाटविल्याबद्दलच्या शिवीगाळ प्रकरणावरून हैद्राबाद संस्थानातील अस्पृश्यतेची दाहकता जाणवली.

### दलित प्रजा परिषद-(१९३९)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३० ते ३२ दरम्यानच्या गोलमेज परिषदेत संस्थानानातील सर्वसामान्य प्रजा व दलित समाज याबद्दलची भूमिका अतिशय प्रभावीपणे मांडली होती. 'राजाची सत्ता काढून घेऊन ती प्रजेच्या ताब्यात देण्याची' सूचनाही याप्रसंगी केल्याचे दिसून येते. त्यांनी सर्वसाधारण जनता ही सध्या लोकशाहीच्या तत्वावर सुधारणा मिळविण्याचा प्रयत्नशील असताना 'संस्थानिकांनी आपला दृष्टिकोण बदलून प्रजेला जितके अधिक अधिकार देण्यासारखे असतील तेवढे दिले पाहिजेत'[५] असे मत मांडले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित मुक्तीचे विचार १९३१ सालापासूनच श्री. बी. एस. व्यंकटराव आणि जे. एच. सुबय्या यांचेद्वारे[६] मराठवाड्यात पोहोचल्याचे दिसून येते.

दलित प्रजा परिषदेचे आयोजन औरंगाबादमध्ये करण्याचे योजिले होते मात्र या परिषदेसाठी निजाम सरकारने परवानगी नाकारल्यामुळे ही परिषद औरंगाबाद ऐवजी मखनपूर (मक्कनपूर), ता. चाळीसगांव, जि.पूर्व खानदेश येथे ३० डिसेंबर, १९३८ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. सदर परिषदेचे संयोजक भिकाजी काशीराम थोरात तर एस. बी. जाधव हे स्वागताध्यक्ष होते. या परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. आंबेडकर यांनी आजची ही सभा निजाम स्टेट मधील औरंगाबाद


*ISBN-978-93-49938-45-8*

जिल्ह्यातील दलितांची पहिलीच सभा आहे हे सांगून निजाम सरकारच्या राजवटीत अस्पृश्यता मोठ्या प्रमाणात पाळली जात असल्याबद्दल खेद व्यक्त केला होता. तसेच "येथील राज्य करण्याची पद्धती सदोष आहे. म्हणून तुम्ही आतून काही करु शकत नाही, पण मी बाहेरुन जरुर करीन"[७] असे आश्वासन याप्रसंगी कार्यकर्त्यांना दिलेले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इ.स. १९३९ सालच्या दलित प्रजा परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात अस्पृश्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या संस्थानानिषयी प्रखर टिका केल्याचे आढळते.[८] याशिवाय त्यांनी २३ फेब्रुवारी १९४१ रोजीच्या महार-मांग परिषद (मौजे तडवळे जि. सोलापूर) "हैद्राबादच्या नविन प्रस्तावित राज्यघटनेत अस्पृश्यांनी लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य ते प्रतिनिधित्व मिळविण्याचा प्रयत्न करावा. त्यात जरुर त्या प्रसंगी मी सहाय्य करु शकेन[९] अशी भूमिका मांडलेली होती.

मराठवाड्यातील महार मांग वतनदारांची परिषद तडवळा ढोकी (ता.बार्शी जि.सोलापूर) येथे २३ फेब्रुवारी १९४१ रोजी आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे संयोजक भालेराव गुरुजी हे होते. दीवचंद कदम हे अध्यक्ष व बाबूराव बनसोडे हे स्वागताध्यक्ष होते. या परिषदेत डॉ. बाबासाहेबांनी “हैदराबाद संस्थान देशात श्रीमंत व मोठे संस्थान असूनही दलितांचे कोणतेच प्रश्न सुटलेले नाहीत. आपले प्रश्न सरकारच्या कानावर घालण्यासाठी तुम्ही संघटित झाले पाहिजे. बावन हक्क, गावकीची कामे, वेठबिगारी करणे बंद करा, मृत मांस खाऊ नका, आपल्या मुलामुलींना शाळेत पाठवा.”[१०] अशी भूमिका मांडून निजाम राजवटीतील दलितांच्या बिकट परिस्थितीची कारणमीमांसा केली होती.

## हैद्राबाद संस्थानातील दलित प्रतिनिधित्व व फुटीची सुरुवात

इ.स. १९३६ साली "आंबेडकर तरुण मित्र मंडळ हैदराबाद" या संघटनेची स्थापना बी.एस. व्यंकटराव यांनी केली होती. या संघटनेचे रुपांतर ३१ ऑक्टोबर १९३८ रोजी 'हैदराबाद स्टेट डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशन मध्ये करण्यात आले. या संघटनेचे अध्यक्ष बी. एस. व्यंकटराव, सरचिटणीस के जगभाषम, जे एच. सुबय्या, पी. आर. व्यंकटस्वामी, पालम पिल्ले बी. शामसुंदर, तुकाराम बनसोडे, तुकाराम गाडे, चोखोबा हिवराळे, माधवराव नेरलीकर, हणमंतराव मोरे, सोपानराव धन्ये, गणपतराव वाघमारे, डी.एच. सुरवसे, भालेराव गुरुजी, देवीचंद कदम, बापूराव मास्तर, चोखोबा सिरसाट, एन.डी. पगारे, बी.एस. मोरे, बी.टी. भैरव व माधवराव निबंधे यांनी दलित जागृती व संघटन घडवून आणण्यात महत्त्वाचे योगदान[११] दिलेले आढळते.

ब्रिटिश सरकारने १९३५ सालच्या प्रांतिक कायद्यानुसार स्थानिक जनतेला प्रशासनात लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्याचे आदेश संस्थानिकांनाही दिले होते. त्यानुसार निजामाने जुलै १९३९ मध्ये घटनात्मक सुधारणाची घोषणा करून हैदराबाद संस्थानची राज्यघटना कृष्णा अय्यंगार यांचे मार्फत तयार केली. या घटनेनुसार ऐंशी सदस्यांचे एक मंत्रीमंडळ तयार करुन त्यामधील ५०% जागा हिंदू व ५०% जागा मुस्लिमांना देण्याची तरतूद केली होती. यामध्ये मात्र दलितांच्या प्रतिनिधीत्वाचा

स्वतंत्रपणे विचार प्रारंभी केला नसल्याचे लक्षात आल्यानंतर बी. एस. व्यंकटराव व इतर दलित नेतृत्त्वाने दलितांना मंत्रिमंडळात स्वतंत्र प्रतिनिधीत्व देण्यात यावे अशी मागणी निजामाकडे केली. सदर मागणीस निजामाने दलितांना हिंदूंच्या कोट्यातील ५% जागा मंत्रिमंडळात प्रतिनिधीत्व म्हणून देण्याचे मान्य केले. दिले. परंतु या ५% जागा स्टेट काँग्रेसला की, इत्तेहाद-अल-मुसलमीन या संघटनेस सलग कराव्यात यावरुन दलित नेतृत्त्वात मतभेद निर्माण झाले.[१२] यावेळी बी.एस. व्यंकटरावांनी इत्तेहाद-अल-मुसलमीन' बरोबर युती करून या जागा मिळविल्या मात्र यावेळेपासून राजकीय महत्त्वकांक्षेतून दलित चळवळीत फूट पडल्याचे आढळते.

हैदराबाद शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे नेते जे. एच. सुबय्या हे प्रारंभी निजामविरोधातच होते, मात्र मंत्रिपदाच्या अपेक्षेने त्यांनी आझाद हैद्राराबादला पाठिंबा देणारे पत्रक वृत्तपत्रातून प्रसिद्ध केले होते. याची गंभीर दाखल डॉ. बाबासाहेबांनी घेऊन हैदराबाद संस्थानाने भारतातच विलीन झाले पाहिजे अशी मागणी करणारे पत्रक 'फ्री प्रेस जर्नल' (५ जून १९४७), 'दि बॉम्बे क्रॉनिकल' (१८ जून ४७), 'दि टाइम्स ऑफ इंडिया' (८ जुलै १९४७), 'दि नॅशनल स्टँडर्ड' (२८ नोव्हेंबर १९४७) मधून[१३] प्रसिद्ध केल्याचे दिसून येते.

## शेड्युल्ड कास्ट फेडरेशन व हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' संघटनेचे तत्कालीन प्रांत अध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनी 'निजामाची पदच्युती व्हावी, लोकशाहीवर आधारलेली जबाबदार लोकशाही राज्यपद्धती निर्माण झाली पाहिजे, हे प्रत्येक आंबेडकर अनुयायाचे धोरण असावे, म्हणून अस्पृश्य जनतेने रझाकार संघटनेत जाऊ नये, तसेच मुसलमान धर्मातही प्रवेश करु नये.'[१४] अशा आशयाचे एक पत्रक दलित समाजाला उद्देशून काढलेले होते. सदर आवाहनास अनुसरुन मराठवाड्यातील अनेक दलित बांधवांनी निजामविरोधी संघर्षात सक्रिय सहभाग नोंदवल्याचे दिसून येते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि 'ऑपरेशन पोलो'

तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेलांनी संस्थानाच्या विलिनिकरणासंबंधी कायदामंत्री डॉ. आंबेडकर यांच्याबरोबर अनेकवेळा चर्चा केली होती. त्यांनी भारत सरकारच्या (जुलै, १९४७) हैद्राबाद संस्थानबाबतच्या लष्करी कारवाई निर्णय प्रसंगीदेखील सरदार पटेल यांना पाठींबा[१५] दिल्याचे आढळते. भारत सरकारने मेजर जनरल चौधरी यांच्या नेतृत्वाखाली १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो' ची आखणी करून प्रत्यक्षात हैद्राबाद संस्थानात लष्करी कारवाई सुरु करून अवघ्या चार दिवसांतच हैदराबादचा ताबा मिळविला.[१६]


ISBN-978-93-49938-45-8

## निष्कर्ष

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हैद्राबादचा इतिहास व भूगोल पाहता निजामाचे स्वतंत्र राहणे भारतीय सार्वभौमत्वाला धोका निर्माण करणारे ठरु शकेल हीच भूमिका मांडलेली दिसून येते. भारत सरकारने हैद्राबाद संस्थान पोलीस कारवाई करून भारतीय संघराज्यात विलीन करतेसमयी डॉ. आंबेडकरांनी या कारवाईचे समर्थन करून तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेल यांना पाठिंबा दिलेला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हैदराबाद संस्थान हा मोठा भूप्रदेश आणि तेथील जनता स्वतंत्र व्हावी याकरिता मोठे योगदान दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आणि त्यांच्या 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन'ने निजामाला स्पष्ट विरोध करून हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन व्हावे ही मागणी या संघटनेने शेवटपर्यंत लावून धरलेली होती. वरील सर्व घडामोडीचा व संदर्भाचा बारकाईने अभ्यास केला असता असे स्पष्ट होते की, हैद्राबाद संस्थानाच्या विलिनीकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका व सहभाग प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे महत्वाचा राहिलेला दिसून येतो.

## *संदर्भ*


1. Khan Ysuf, Nizam Ul- Mulk Asafzahi Founder of the Haiderabad State, The Basel Mission Press, Mangalore, 1936, Page No. 157
2. Husain Mazhar, Census of India 1941, Volume Xxi, H.E.H. The Nizam's Dominions (Hyderabad State) Part I., Report, Census Commissioner and Director of Statistics. Page No. 675 Ibid, Page No. 675
3. कांबळे बी. सी, समग्र आंबेडकर चरित्र, खंड १०, सुगावा प्रकाशन,पुणे, १९८७, पृष्ठ क्र. ३०
4. राऊत भीमराव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे गोलमेज परिषदांतील कार्य, निर्मल प्रकाशन, नांदेड, २०२२, पृष्ठ क्र.११६-११८
5. गायकवाड नरेंद्र, मराठवाडयातील दलित चळवळ आणि हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम, सुगावा प्रकाशन पुणे, १९९०,पृष्ठ क्र.३०
6. जनता, दिनांक १४ जानेवारी १९३९
7. जनता, दिनांक १४ जानेवारी १९३९
8. जनता, दि. ८ मार्च १९३९
9. साप्ताहिक- विवेक, दिनांक २५ ऑगस्ट २०२३
10. Swami Venkat P.R., Our Struggle for Emancipation, Vol- I, Hyderabad, 1955, Page No. 32, 35, 36, 131, Ibid, Page No. 219.
11. कठारे अनिल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम, कल्पना प्रकाशन नांदेड, १९९९ पृष्ठ क्र. १३
12. साप्ताहिक- विवेक, दिनांक २५ ऑगस्ट २०२३

13. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृष्ठ क्र. ४४३
14. दिवाण विजय, महाराष्ट्राचे शिल्पकार-गोविंदभाई श्रॉफ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००४, पृष्ठ क्र.३९-४१


***ISBN-978-93-49938-45-8***

# उच्च शिक्षणातील मानव्य विद्याशाखेतील इतिहास विषयातील सद्यकालीन आव्हाने, उपाय व संधी

**प्रा. अभिषेक लक्ष्मण फंड**

सहाय्यक प्राध्यापक, न्यू आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर (स्वायत्त)

Email: abhishekfand96@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19760557

*DOI: 10.5281/zenodo.19760557*

## प्रस्तावना

इतिहास हा केवळ भूतकाळाचा अभ्यास नाही; तो वर्तमानाचे आकलन आणि भविष्याची दिशा निश्चित करणारा महत्त्वपूर्ण विषय आहे. भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेत मानव्य विद्याशाखेचे एक ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थान आहे. तथापि, एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात इतिहास विषयाच्या अध्ययन-अध्यापनावर अनेक बाह्य व अंतर्गत दबाव येत आहेत.

इतिहासाचे शिक्षण हे केवळ तथ्यांचे स्मरण नव्हे, तर गंभीर विचार, पुराव्यांचे विश्लेषण आणि नैतिक निर्णयक्षमता विकसित करण्याचे माध्यम आहे. रोमिला थापर, राष्ट्रीय पुरस्कारविजेत्या इतिहासकार, यांनी उच्च शिक्षणात इतिहास विषयाच्या अभ्यासक्रमाला अधिक जिवंत व समकालीन प्रश्नांशी जोडण्याची गरज अधोरेखित केली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने देखील मानव्य विद्याशाखेच्या पुनर्जीवनासाठी ठोस शिफारशी केल्या आहेत.

या संशोधनाचा उद्देश उच्च शिक्षणातील इतिहास विषयाच्या वर्तमान स्थितीचे त्रिसूत्री आढावा घेणे आहे. आव्हाने, उपाय व संधी. या तीन अक्षांवर विस्तृत चर्चा करताना भारतीय व आंतरराष्ट्रीय संदर्भांचाही उल्लेख केला जाईल.

## सद्यकालीन आव्हाने

### विद्यार्थीसंख्येत घट आणि नामांकन संकट

गेल्या दोन दशकांत भारतातील मानव्य विद्याशाखेत, विशेषतः इतिहास विषयात, विद्यार्थ्यांच्या नामांकनात लक्षणीय घट झाली आहे. All India Survey on Higher Education (AISHE) 2021-22 च्या आकडेवारीनुसार, कला शाखेतील एकूण नामांकन ३२% वरून २४% पर्यंत खाली आले आहे. (AISHE 2022, 45). इंजीनियरिंग, व्यवस्थापन आणि वैद्यकीय अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढल्यामुळे इतिहासासारख्या विषयांना 'रोजगारविरहित' समजले जाते.

इतिहासाचे पदवीधर सरकारी सेवा, पुरातत्त्व, संग्रहालयशास्त्र, पत्रकारिता, चित्रपट उद्योग आणि शैक्षणिक संशोधन अशा विविध क्षेत्रात सक्रिय असतात. (Chakrabarti 112-118).

### अभ्यासक्रमाचे पुराणमतवादी स्वरूप

भारतीय विद्यापीठांमधील इतिहास विषयाचा अभ्यासक्रम अनेक दशकांपासून जवळपास अपरिवर्तित राहिला आहे. घटनात्मक इतिहास, राजकीय इतिहास आणि युद्धांचा इतिहास यांवर अतिरिक्त भर दिला जातो, तर सामाजिक इतिहास, स्त्री इतिहास, पर्यावरण इतिहास (Environmental History), मौखिक इतिहास (Oral History) यांसारख्या नव्या शाखांकडे दुर्लक्ष होते. इतिहास विषयाने समाजशास्त्र, मानसशास्त्र, भूगोल आणि अर्थशास्त्र यांच्याशी संवाद साधणे काळाची गरज आहे.

### तंत्रज्ञानाचा अपुरा वापर

COVID-19 महामारीनंतर ऑनलाइन शिक्षणाचे महत्त्व अधिक स्पष्ट झाले. परंतु इतिहास विभागांमध्ये डिजिटल साधनांचा वापर अजूनही मर्यादित आहे. Seefeldt and Thomas (2009) यांच्या Digital History: A Guide to Gathering, Preserving, and Presenting the Past on the Web या ग्रंथात डिजिटल इतिहास म्हणजे केवळ ऑनलाइन सामग्री नव्हे, तर ऐतिहासिक स्रोतांचे डिजिटल विश्लेषण, GIS मॅपिंग आणि डेटा व्हिज्युअलायझेशन होय असे सांगितले आहे.

### राजकीय हस्तक्षेप व इतिहासलेखनाचे वादविवाद

इतिहास विषयात राजकीय हस्तक्षेपाची समस्या जागतिक स्तरावर दिसून येते. भारतात अभ्यासक्रम पुनर्रचना, पाठ्यपुस्तकातील बदल आणि ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या मूल्यमापनावरून सातत्याने वाद होतात. Guha (2011) यांनी India After Gandhi मध्ये असे सुचवले आहे की इतिहासाचे वास्तुनिष्ठ लेखन हे लोकशाही समाजाचा आधारस्तंभ आहे आणि त्याच्या राजकीयीकरणाने शैक्षणिक गुणवत्तेला धोका निर्माण होतो.

### शिक्षकांचे प्रशिक्षण व संशोधनाची उणीव

UGC च्या अहवालानुसार (2020) भारतातील अनेक विद्यापीठांत इतिहास विभागात पुरेसे प्रशिक्षित शिक्षक नाहीत. Rethinking History या जर्नलमध्ये प्रकाशित अभ्यासात असे दिसून आले की उच्च शिक्षणातील इतिहास शिक्षकांपैकी केवळ ४०% नियमितपणे संशोधन प्रकाशित करतात (Jenkins 89). नव्या संशोधन पद्धती, जसे की postcolonial theory, subaltern studies, oral history methods, यांचे ज्ञान अनेक शिक्षकांना नसते.


*ISBN-978-93-49938-45-8*

## उपाय व धोरणात्मक दृष्टिकोन

### अभ्यासक्रमाचे नवीकरण व आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन

इतिहास विषयाच्या अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल आवश्यक आहेत. NEP 2020 ने Choice Based Credit System (CBCS) अंतर्गत विद्यार्थ्यांना आंतरविद्याशाखीय (Interdisciplinary) विषय निवडण्याची मुभा दिली आहे (Ministry of Education 31). इतिहास विभागाने सामाजिक शास्त्रे, पर्यावरण अभ्यास, लिंगशास्त्र (Gender Studies), डिजिटल मानव्यशास्त्र (Digital Humanities) यांचे घटक अभ्यासक्रमात समाविष्ट करावेत. दलित इतिहास, आदिवासी इतिहास आणि स्त्री इतिहास यांचा अभ्यासक्रमात समावेश केल्याने विद्यार्थ्यांना अधिक समग्र दृष्टिकोन देते.

### डिजिटल तंत्रज्ञान व ई-लर्निंगचा प्रभावी वापर

आधुनिक इतिहास शिक्षणात डिजिटल साधनांचा वापर अनिवार्य झाला आहे. SWAYAM, NPTEL आणि e-PG Pathshala यासारख्या राष्ट्रीय व्यासपीठांवर इतिहास विषयाचे दर्जेदार ऑनलाइन अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. Cohen and Rosenzweig (2006) यांच्या Digital History: A Guide to Gathering, Preserving, and Presenting the Past on the Web या ग्रंथात डिजिटल आर्काइव्ह, ऑनलाइन प्राथमिक स्रोत आणि हायपरटेक्स्ट इतिहास लेखनाचे महत्त्व विस्ताराने सांगितले आहे. Greenblatt (2011) यांच्या म्हणण्यानुसार, The Swerve: How the World Became Modern मध्ये भूतकाळाच्या पुनरुज्जीवनाच्या कल्पनाशक्तीला तंत्रज्ञान एक नवे परिमाण देते.

### अनुभवजन्य शिक्षण व क्षेत्र कार्याचा यांचा समावेश:

इतिहास शिक्षणात प्रत्यक्ष अनुभवावर आधारित शिक्षण (Experiential Learning) अत्यंत परिणामकारक ठरते. पुरातत्त्व उत्खनन, संग्रहालय भेटी, ऐतिहासिक वास्तूंच्या सहली आणि मौखिक इतिहास संकलन (OHC) यांसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक अनुभव अधिक समृद्ध होतात.

### शिक्षकांचे सतत व्यावसायिक विकास

UGC Human Resource Development Centres (HRDC) द्वारे इतिहास शिक्षकांसाठी नियमित Refresher Courses आणि Orientation Programmes आयोजित केले जातात. परंतु त्यांची गुणवत्ता व प्रासंगिकता वाढवणे आवश्यक आहे. शिक्षकाचे सतत व्यावसायिक प्रशिक्षण हे विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या दर्जावर थेट परिणाम करते.

## भविष्यकालीन संधी

### डिजिटल मानव्यशास्त्र (Digital Humanities) चे उदयोन्मुख क्षेत्र

डिजिटल मानव्यशास्त्र हे एकविसाव्या शतकातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या शैक्षणिक क्षेत्रांपैकी एक आहे. ऐतिहासिक दस्तऐवजांचे डिजिटलीकरण, Text Mining, Computational Analysis आणि Online Archives यांनी इतिहास संशोधनाला नव्या शक्यता खुल्या केल्या आहेत. Hockey (2004) यांनी The History of Humanities Computing मध्ये सांगितले की डिजिटल साधने ऐतिहासिक स्रोतांच्या व्याप्तीला अभूतपूर्वरित्या वाढवतात आणि नव्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यास सक्षम करतात.

इतिहास पदवीधरांसाठी Digital Archivist, Information Specialist, Heritage Manager यासारखे नवे रोजगाराचे पर्याय उपलब्ध होत आहेत.

### वारसा पर्यटन व सांस्कृतिक उद्योग

भारत हा जगातील सर्वाधिक ऐतिहासिक वारसा असलेल्या देशांपैकी एक आहे. UNESCO च्या जागतिक वारसा यादीत भारताची ४२ स्थळे आहेत. वारसा पर्यटन क्षेत्रात इतिहास पदवीधरांसाठी Heritage Interpreter, Museum Curator, Tourism Historian, Cultural Resource Manager यासारख्या रोजगाराच्या संधी वेगाने विस्तारत आहेत वारसा व्यवस्थापनासाठी इतिहासाचे ज्ञान, विश्लेषण क्षमता आणि सांस्कृतिक संवेदनशीलता या तिन्ही गोष्टी आवश्यक असतात.

### लोकसेवा, संरक्षण व माध्यम क्षेत्रातील संधी

UPSC, MPSC आणि इतर स्पर्धात्मक परीक्षांमध्ये इतिहास विषय हा अत्यंत महत्त्वाचा व गुणदायी मानला जातो. याशिवाय, वृत्तपत्र पत्रकारिता, टेलिव्हिजन, डॉक्युमेंटरी निर्मिती, ऐतिहासिक कादंबरी लेखन यांसारख्या माध्यम क्षेत्रांत इतिहासाचे ज्ञान निर्णायक ठरते.

### NEP 2020 अंतर्गत नव्या शक्यता

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने Liberal Arts Education ला प्रोत्साहन देत इतिहास आणि इतर मानव्य विद्याशाखेतील विषयांना नवे महत्त्व दिले आहे. Four Year Undergraduate Programme (FYUP), Multiple Entry/Exit, Academic Bank of Credits (ABC) यांसारख्या संरचनात्मक बदलांमुळे इतिहास विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचे मार्ग अधिक लवचिक झाले आहेत.


*ISBN-978-93-49938-45-8*

## निष्कर्ष

उच्च शिक्षणातील इतिहास विषयाचे भविष्य उज्ज्वल असले तरी नामांकन घट, कालबाह्य अभ्यासक्रम, तंत्रज्ञानाचा अपुरा वापर आणि राजकीय हस्तक्षेप ही प्रमुख आव्हाने आहेत. यावर मात करण्यासाठी धोरणनिर्मिति, विद्यापीठे, शिक्षक व विद्यार्थी यांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. डिजिटल मानव्यशास्त्र, वारसा पर्यटन, लोकसेवा आणि NEP 2020 मुळे इतिहासाला नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत. इतिहास हा मृत विषय नसून वर्तमान समजून घेण्यासाठी महत्त्वाचा आधार आहे. इतिहास शिक्षण अधिक समावेशक, तंत्रस्नेही व आंतरविद्याशाखीय केल्यास तो पुन्हा केंद्रस्थानी येऊ शकतो. तसेच, त्र्यंबक शंकर शेजवलकर, महादेव गोविंद रानडे, बापट-केळकर आणि सदाशिव शिवदे पगडी यांच्या ग्रंथांचा अभ्यासक्रमात समावेश केल्यास स्थानिक इतिहासाचे महत्त्व वाढून विद्यार्थ्यांची विषयाशी अधिक जवळीक निर्माण होईल.

## *संदर्भ*

1. AISHE. All India Survey on Higher Education 2021-22. Ministry of Education, Government of India, 2022.
2. Carr, Edward Hallett. What is History? Penguin Books, 1961.
3. Chakrabarti, Dipesh. Provincializing Europe: Postcolonial Thought and Historical Difference. Princeton University Press, 2018.
4. Guha, Ramachandra. India After Gandhi: The History of the World's Largest Democracy. HarperCollins, 2011.
5. Hockey, Susan. "The History of Humanities Computing." A Companion to Digital Humanities, edited by Susan Schreibman, Ray Siemens, and John Unsworth, Blackwell, 2004.
6. Jenkins, Keith. Re-Thinking History. Routledge,
7. पगडी, सेतुमाधवराव. छत्रपती शिवाजी महाराजः एक चिकित्सक अभ्यास. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७९.
8. शेजवलकर, त्र्यंबक शंकर. पेशवाईः एक चिकित्सा. भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३५.
9. देशपांडे, प्रभा. इतिहासाचे तत्त्वज्ञान. स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २०१०.
10. कुलकर्णी, अ. रा. मध्ययुगीन महाराष्ट्रः समाज आणि संस्कृती. डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, १९९७.
11. सरदेसाई, गो. स. मराठी रियासत (खंड १-३). सुधारित आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८८.
12. जोशी, शं. गो. उच्च शिक्षण आणि मराठी माध्यमः आव्हाने व संधी. मराठी अभ्यास परिषद, पुणे, २०१५.
13. फडके, य. दि. आधुनिक भारताचा इतिहास. मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, २००८.

# करमाळा येथील कमलाई देवी: ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक अभ्यास

**श्री. श्रीकेश नागनाथ फरतडे**

एम.ए. II इतिहास विभाग, दादा पाटील महाविद्यालय,कर्जत

Email: abhishekfand96@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19760869

*DOI: 10.5281/zenodo.19760869*

## प्रस्तावना

भारतीय समाजजीवनात धार्मिक श्रद्धा आणि परंपरांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. विशेषतः महाराष्ट्रात ग्रामदैवतांची परंपरा प्राचीन काळापासून रूढ आहे. प्रत्येक गाव किंवा शहरात एखादे देवस्थान हे त्या परिसराच्या सांस्कृतिक जीवनाचे केंद्र म्हणून कार्य करत असते. अशा देवस्थानांमुळे स्थानिक इतिहास, लोकसंस्कृती आणि सामाजिक रचना यांचे दर्शन घडते.

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा शहरामध्ये असलेले कमलाई देवी मंदिर हे एक प्राचीन आणि प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. करमाळा परिसरातील लोकांच्या धार्मिक जीवनात या मंदिराचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. कमलाई देवी ही या भागातील ग्रामदैवत म्हणून मानली जाते. नवरात्रोत्सव, यात्रोत्सव आणि विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे या मंदिराचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व वाढले आहे. या संशोधन लेखात करमाळा येथील कमलाई देवी मंदिराचा इतिहास, स्थापत्य वैशिष्ट्ये, धार्मिक परंपरा, उत्सव आणि स्थानिक समाजजीवनातील योगदान यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. करमाळा शहराचा ऐतिहासिक परिचय- करमाळा हे महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील एक प्रसिद्ध शहर व नगरपालिका आहे. 'करमाळा' हे नाव करमे-मौला नावाच्या एका मौलवीवरून पडले असे मानले जाते. अहमदनगरच्या निजामशाही काळात त्यांनी येथे इस्लामी धर्मोपदेश केला. बार्शी, पंढरपूर आणि मंगळवेढा यांसारख्या इतर गावांप्रमाणेच करमाळा हेही धार्मिक व ऐतिहासिक महत्त्वासाठी प्रसिद्ध आहे. येथे अनेक प्राचीन मंदिरे असून अनेक संतांनी येथे वास्तव्यास राहून या उपासनेच्या स्थळांना महत्त्व प्राप्त करून दिले. करमाळा हे शहर महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील एक महत्त्वाचे ठिकाण आहे. ऐतिहासिकदृष्ट्या हा प्रदेश विविध राजसत्तांच्या अधिपत्याखाली राहिला आहे. यादवकाल, बहमनी सुलतानत, आदिलशाही, मुघल आणि मराठा साम्राज्य या सत्तांनी या प्रदेशावर राज्य केले. मध्ययुगीन काळात सोलापूर परिसर हा व्यापार, शेती आणि धार्मिक क्रियाकलापांचे केंद्र म्हणून ओळखला जात होता. अनेक धार्मिक देवस्थाने, दर्गे आणि मंदिरे या कालखंडात निर्माण झाली. करमाळा परिसरातील कमलाई देवी मंदिर हे त्यापैकी एक महत्त्वाचे देवस्थान मानले जाते. स्थानिक लोकांच्या मते करमाळा शहराच्या विकासामध्ये कमलाई देवी मंदिराचा मोठा वाटा आहे.


*ISBN-978-93-49938-45-8*

यात्रेच्या काळात मोठ्या प्रमाणावर भक्त येथे येतात, त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला देखील चालना मिळते.

## कमलाई देवी मंदिराचा इतिहास

करमाळा येथील कमलाई देवी मंदिराची स्थापना नेमकी कोणत्या कालखंडात झाली याविषयी ठोस ऐतिहासिक पुरावे कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. तथापि स्थानिक परंपरा, स्थापत्य वैशिष्ट्ये आणि लोककथांच्या आधारे हे मंदिर मध्ययुगीन काळातील असल्याचे मानले जाते,काही अभ्यासकांच्या मते मंदिराच्या स्थापत्य रचनेवरून यादवकालीन शैलीचा प्रभाव दिसून येतो. शिल्पकला आणि सुबक स्तंभांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात असे. स्थानिक आख्यायिकेनुसार एका भक्ताला देवीने स्वप्नात दर्शन देऊन येथे मंदिर बांधण्याचा आदेश दिला. त्यानंतर स्थानिक लोकांनी मिळून या मंदिराची स्थापना केली. कालांतराने या मंदिराचा विस्तार करण्यात आला आणि ते करमाळा परिसरातील प्रमुख धार्मिक स्थळ बनले.

## कमलाई देवीची धार्मिक संकल्पना

महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीमध्ये देवी उपासनेला विशेष महत्त्व आहे. तुळजाभवानी, महालक्ष्मी, सप्तश्रृंगी, भवानी या देवतांप्रमाणेच स्थानिक पातळीवर अनेक ग्रामदेवता पूजल्या जातात. कमलाई देवी ही करमाळा परिसरातील ग्रामदैवत मानली जाते. स्थानिक लोक देवीला शक्तीस्वरुप मानतात. शेतकरी, व्यापारी आणि इतर सर्व समाजघटक देवीची पूजा करतात.लोकमान्यतेनुसार देवी गावाचे रक्षण करते, संकटांपासून संरक्षण करते आणि लोकांना सुख-समृद्धी प्रदान करते. त्यामुळे करमाळा परिसरातील लोकांच्या धार्मिक जीवनात कमलाई देवीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. करमाळा शहरातील हे  महत्त्वाचे तीर्थस्थान होय. हे मंदिर कमलादेवीला समर्पित आहे. कमलाईदेवीला तुळजापूर येथील तुळजाभवानी मातेचे  अवतार मानले जाते.  करमाळ्यातील हे मंदिर केवळ करमाळ्यासाठीच नव्हे तर संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील एक महत्त्वाचे ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळ मानले जाते.

## कमलाई भवानी मंदिराचे स्थापत्य

इ.स. १७२७ मध्ये राव राजे निंबाळकर यांनी कमलाई भवानी मंदिराची निर्मिती केली. या मंदिराची वैशिष्ट्यपूर्ण आणि आकर्षक रचना पर्यटकांना विशेष आकर्षित करते. हे मंदिर हेमाडपंती स्थापत्यशैलीत बांधलेले आहे. मंदिराभोवती मजबूत तटबंदी असून त्या तटाला एकूण २१ बुरुज आहेत. दोन बुरुजांमधील अंतर सुमारे ११५ फूट आहे. करमाळा शहराच्या पूर्व बाजूस थोड्याशा उंच पठारावर हे मंदिर वसलेले आहे. मंदिरासमोर होमकुंड असून त्याच्या पुढे एक सुंदर शिखर दिसते. होमकुंडाच्या मागील बाजूस तीन दीपमाळा आहेत. या दीपमाळांपैकी एका दीपमाळेवरून परिसराचे

विहंगम दृश्य पाहता येते.

**मंदिराची रचना**

कमलाई भवानी मंदिराला पूर्व, दक्षिण आणि उत्तर अशा तीन दिशांना प्रवेशद्वारे आहेत. मंदिरावरील गोपुरांपैकी पश्चिमेकडील प्रवेशद्वारावरील गोपुर विशेष भव्य आणि आकर्षक आहे. मंदिराच्या सभामंडपात सुमारे १५० वर्षे जुनी घंटा आहे. त्या घंट्यावर असलेल्या लेखानुसार ती शके १७४० पासून येथे लावलेली आहे.

देवीच्या मूर्तीच्या एका बाजूस महादेव आणि गणपती यांच्या मूर्ती आहेत, तर दुसऱ्या बाजूस विष्णू आणि लक्ष्मी यांच्या मूर्ती स्थापित केलेल्या आहेत.

**'९६' या अंकाचे वैशिष्ट्य**

या मंदिराचे आणखी एक महत्त्वाचे आकर्षण म्हणजे '९६' हा अंक. कमलाई भवानी मंदिराच्या स्थापत्यामध्ये ९६ या अंकाला विशेष महत्त्व आहे. मंदिरात एकूण ९६ खांब, ९६ खिडक्या आणि ९६ पायऱ्या आहेत, ज्या मंदिराच्या प्रवेशद्वारापर्यंत नेतात. तसेच मंदिरातील मोठ्या विहिरीकडे (बारव) जाण्यासाठीही ९६ पायऱ्या आहेत. मंदिराच्या शिखरावर देखील ९६ चित्रे कोरलेली आहेत.

**नवरात्र उत्सव**

कमलाई देवी मंदिरातील सर्वात महत्त्वाचा उत्सव म्हणजे नवरात्रोत्सव होय. या काळात मोठ्या प्रमाणावर भक्त मंदिरात दर्शनासाठी येतात. नवरात्र काळात पुढील कार्यक्रम आयोजित केले जातात :घटस्थापना,देवीची विशेष पूजा,कीर्तन व भजन,धार्मिक प्रवचने या उत्सवामुळे करमाळा शहरात धार्मिक वातावरण निर्माण होते.

**यात्रोत्सव**

कमलाई भवानी मंदिरात नवरात्र उत्सव आणि कार्तिक पौर्णिमा ते गणेश चतुर्थी दरम्यान साजरा होणारा वार्षिक उत्सव विशेष प्रसिद्ध आहे. या काळात अनेक भाविक आणि पर्यटक येथे भेट देतात. मंदिर दररोज सकाळी ६.०० ते सायंकाळी ७.०० या वेळेत खुले असते. मंदिराला भेट देण्यासाठी ऑक्टोबर ते फेब्रुवारी हा कालावधी अधिक अनुकूल मानला जातो, कारण या काळात विविध धार्मिक उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. अनेक भक्त येथे देवीचे दर्शन घेण्यासाठी येतात आणि मंदिराच्या अद्वितीय व सुंदर स्थापत्यकलेचा आनंदही घेतात.

**सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व**

कमलाई देवी मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून सामाजिक जीवनाचे केंद्र देखील आहे. येथे विविध सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जातात. मंदिरामुळे स्थानिक समाजामध्ये एकात्मता निर्माण


*ISBN-978-93-49938-45-8*

होते. विविध जातीधर्मांचे लोक येथे एकत्र येतात. त्यामुळे सामाजिक सलोखा टिकून राहण्यास मदत होते.

**स्थानिक इतिहासाच्या अभ्यासातील महत्त्व**

स्थानिक इतिहासाच्या अभ्यासामध्ये धार्मिक स्थळांना महत्त्वाचे स्थान असते. मंदिरांच्या माध्यमातून त्या परिसरातील सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. कमलाई देवी मंदिराचा अभ्यास केल्यास करमाळा परिसराच्या सांस्कृतिक इतिहासाची माहिती मिळते. त्यामुळे स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी या मंदिराला विशेष महत्त्व आहे.

**निष्कर्ष**

करमाळा येथील कमलाई देवी मंदिर हे स्थानिक इतिहास, संस्कृती आणि धार्मिक श्रद्धेचे महत्त्वपूर्ण प्रतीक आहे. या मंदिरामुळे करमाळा शहराला सांस्कृतिक ओळख प्राप्त झाली आहे. मंदिराच्या स्थापत्य, धार्मिक परंपरा आणि सामाजिक कार्यामुळे ते केवळ धार्मिक स्थळ न राहता समाजजीवनाचे केंद्र बनले आहे. स्थानिक इतिहासाच्या अभ्यासामध्ये अशा देवस्थानांचा अभ्यास केल्यास समाजाच्या सांस्कृतिक विकासाचा अभ्यास करता येतो.

***संदर्भ***

1. कुलकर्णी, अ. रा. – महाराष्ट्राचा इतिहास, पुणे.
2. खरे, ग. ह. – महाराष्ट्रातील प्राचीन देवस्थाने.
3. महाराष्ट्र शासन – सोलापूर जिल्हा गॅझेटिअर.
4. जोशी, ह. र. – महाराष्ट्रातील लोकसंस्कृती.
5. पाटील, एस. डी. – सोलापूर जिल्ह्याचा इतिहास.
6. करमाळा मंदिर व्यवस्थापन समिती – स्थानिक माहिती.

# राहुरी आणि ब्राह्मणी येथील बारव ऐतिहासिक विश्लेषण

**प्रा. डॉ. अमोल दिनकर गायकवाड**

इतिहास विभागप्रमुख, लोकनेते रामदास पाटील धुमाळ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राहुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर पिन-४१३७०५

Email: adgai1969@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19761034

*DOI: 10.5281/zenodo.19761034*

## प्रस्तावना

प्राचीन काळापासून अहिल्यानगर (पूर्वीचा अहमदनगर) जिल्ह्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. महाराष्ट्रामध्ये पहिली मानवी वसाहत याच जिल्ह्यात प्रवरा व गोदावरी नद्यांच्या किनाऱ्यावर झाली, असा निष्कर्ष पुण्याच्या डेक्कन कॉलेजने नेवासातील उत्खननानंतर काढला आहे. भारतीय पुरातत्त्व विभागाने श्रीरामपूर तालुक्यातील दायमाबाद येथे केलेल्या उत्खननातून या जिल्ह्यात सिंधु संस्कृतीचे अस्तित्त्व सिद्ध झालेले आहे. पूर्वीच्या काळात या भागावर असलेल्या निजामशाही व मोगल साम्राज्याचे वर्चस्व लक्षात येते. इ.स. १४८६ मध्ये तत्कालीन बहामनी राज्याचे पाच तुकडे झाले. अहमदशहा, बुऱ्हाणशहा, सुलताना चांदबिबी यांची कारकीर्द असणारी निजामशाही येथे इ.स. १६३६ पर्यंत टिकली.

निजामशाहीच्या पडत्याकाळात शहाजीराजे भोसले यांनी छोट्या मूर्तझा निजामशहाला मांडीवर घेऊन नगरचा कारभार पाहिला. पुढे काही काळ नगरने मराठेशाही व शहाजहान बादशहाची मोगलशाही अनुभवली. इ.स.१७५९ मध्ये अहमदनगर पेशव्यांकडे आले आणि इ.स.१८०३ मध्ये ते इंग्रजांच्या ताब्यात गेले. इ.स. १८१८ पासून अहमदनगर वर पूर्णपणे इंग्रजांचा अंमल होता, इ.स. १८२२ मध्ये ब्रिटिशांनी अहमदनगर जिल्ह्याची स्थापना केली, पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म याच नगर जिल्ह्यातील चौंडी ता. जामखेड या गावी झाला. त्यांनी भारत देशात ठिकठिकाणी मंदिरे, धर्मशाळा, घाट, पाणपोई- विहिरी, बारवे, अन्नछत्रे उभारले.

राहुरीजवळ मुळा नदीच्या पात्रात ३३००० वर्षापूर्वीचा ओंडका सापडला आहे, त्यावरून राहुरीचे प्राचीनत्व सिध्द झाले आहे. पेशवाईच्या अस्तानंतर इ.स. १८२२ मध्ये अहमदनगर जिल्ह्याची निर्मिती झाली. इ.स. १८२८ साली ब्रिटीशकाळात कारभाराच्या सोईसाठी राहुरी तालुक्याची निर्मिती झाली. हरिश्चंद्र गडाजवळून उगम पावणारी मूळगंगा राहुरी तालुक्याच्या सीमेवर चांदगाव येथे प्रवरेला मिळते आणि द-याखो-यातून, डोंगरातून ती त्याच तालुक्यात मैदानात शिरते आणि प्रवरेत विलीन होते. या मूळगंगेच्या परिसरात एकूण ९४ गावे आहेत. त्यात ६० टक्के गावांची नावे वनस्पती किंवा


*ISBN-978-93-49938-45-8*

निसर्गाधिष्टीत आहेत. २० टक्के नावे धार्मिक, ऋषी, देव-देवतांवर तर उरलेली मानवी अवयव, प्राणी इ. अशी विभागणी करण्यात येते. गावाचे प्राचीनत्व शोधणा-या दृष्टीनेही त्याचा उपयोग होऊ शकतो. राहुरी तालुक्यात अनेक ठिकाणी मध्ययुगीन ऐतिहासिक अवशेष मिळतात. त्यापैकी राहुरीतील होळकरकालीन बारव आणि ब्राह्मणी मधील बारव,

- **राहुरी बारव**

राहुरी - देवळाली प्रवरा, श्रीरामपूर या मार्गावर राहुरीपासून सुमारे तीन किमी अंतरावर ऐतिहासिक वास्तू उभी आहे. मात्र नेहमीप्रमाणे ही वास्तू समाजापासून दूर राहून ऐतिहासिक स्थळे अधोरेखित करणारी दिसते. ही वास्तू जपण्यासाठी लोकांनी कोणतेही प्रयत्न केले नसल्याचे दिसून येते. तसेच या वास्तूचा इतिहास जाणून घेण्याचा कोणताही प्रयत्न करण्यात आलेला नाही. तोंडी माहितीनुसार हा बारव होळकरांनी बांधला हे लोकांना माहीत होते. या बारव मध्ये एक शिलालेख आहे. तो खालीलप्रमाणे,

शिलालेखाचा मजकूरः

१.॥ श्री ॥

२.।। श्रीगणेशाय नमः ।। श्री सांबस-

३.।। दाशिवाय नमः ।। सके १७१३ विरोधी-

४.।। कृत नामाद्बे उत्तरायने ग्रिष्म ऋतौ

५.।। जेष्ठ शुध्ध ५ इंदुवासरे राहुरीग्राम वा-

६.।। सि राजश्री आबाजि रणछो (ड) नंद

७.।। प्रकाराथ वापि कृता ।। श्री सीवापण

८. ।। मस्तु ।।

**शिलालेखाचा अर्थ**

हा शिलालेख ८ ओळींचा आहे. त्याची लांबी १५ इंच आणि उंची १० इंच आहे. हा बारवा राजश्री आबाजी रणछोड यांनी बांधल्याचे या शिलालेखावरून दिसून येते. जेष्ठ शुद्ध ५ शके १७१३ विपरित संवत्सरे इंदुवासरे म्हणजेच सोमवार, ७ जून १७९१ ही तारीख दिली आहे. इंदुवसरे म्हणजे सोमवार पण पिल्लई जंत्री सारखा मंगळवार येतो. पण एक दिवस फरक पडू शकतो.

मध्ययुगीन काळात राहुरी-देवळाली प्रवरा, श्रीरामपूर आणि उत्तर महाराष्ट्र यांना जोडणाऱ्या रस्त्याच्या कडेला हा बारव आहे. व्यापारी मार्गामुळे या रस्त्याला विशेष महत्त्व आहे. अनेक व्यापारी व नागरिक या मार्गाचा वापर करत होते. त्यामुळे या रस्त्यावर नेहमीच रहदारी असायची. राहुरीचे रहिवासी सरदार आबाजी रणछोड यांनी नागरिकांना व व्यापाऱ्यांना पिण्याचे पाणी व आराम मिळावा म्हणून हा बारव

बांधला होता, या बारवच्या किंमतीबाबत कोणतीही माहिती नाही.

होळकर स्थापत्यशैलीचा उत्कृष्ट नमुना म्हणून या बारव्याकडे पाहिले जाते. आज हा बारव सुस्थितीत आहे. या बारव्याचे बांधकाम नंदा प्रकारातील इतर बारव्यांसारखेच दिसते. या प्रवेशद्वाराच्या प्रवेशद्वाराची लांबी ४५ मीटर आहे. आणि रुंदी ९ मी. आहे. तर मध्यवर्ती भागाची लांबी ४५ मीटर आहे. आणि रुंदी १४ मी. भिंतींच्या बांधकामात दगडाचा मोठ्या प्रमाणात वापर झाल्याचे दिसून आले आहे. अंगणात उतरण्यासाठी दगडी पाय्र्या आहेत. या पाय्र्या १३ फूट लांब आणि २.५ फूट उंच आहेत, दीप आणि धार्मिक देवतांची पूजा करण्यासाठी ०५ मंदिरे आहेत, प्रत्येक मंदिराची लांबी २.५ फूट आणि उंची ३.५ फूट आहे. नैसर्गिक झय्रांबरोबरच दगडी नळ्याही दिसतात. या दगडी पाईपद्वारे बारव येथे पाणी आणल्याचे निश्चितपणे दिसून येते.



*राहुरी बारव*

- **ब्राह्मणी बारव**

राहुरी तालुक्यातील ब्राह्मणी हे गाव पुरातन परंपरा असलेले गाव आहे. साहजिकच या गावास ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. ब्राह्मणी हे राजमाता जिजाऊ साहेबांचे वडील श्रीमंत लखुजीराव जाधवराव (इ.स.१५९० ते १६२९) यांच्या वतनदारीचे गाव होते. आजही त्यांच्या ऐतिहासिक गढीचे अवशेष गावात पहावयास मिळतात, त्यांचे वंशज आणि जाधव घराण्यातील कर्तबगार पुरुष श्री खंडोजी जाधवराव पाटील (मोकादम) यांनी गावातील मार्तंडभैरव देवाच्या पूजेसाठी प्रशस्त आणि आकर्षक अशी बारव बांधलेली आहे. 'जाधव बारव' म्हणून ती आज प्रसिद्ध आहे. या बारवेच्या दर्शनी कमानीवर श्री बल्लाळ देवीचा उल्लेख असणारा शके १७१४ सालातील (इ.स.१७९२) शिलालेख आहे.


*ISBN-978-93-49938-45-8*



***ब्राह्मणी बारव***

शिलालेखात प्रथमतः बल्लाळदेवीस केलेले नमन विशेष उल्लेखनीय आहे. या देवीच्या पूजेचा मान जाधव कुटुंबीयांकडे आहे. तसेच देवीच्या पुजाव्यवस्था 'घोडके' या गुरव कुटुंबाकडे पिढीजात आहे. त्यांना इनाम म्हणून मिळालेल्या जमिनीच्या मालकी संदर्भाने सन १८३१, १८५२, १८५४ या सालातील ब्रिटीश कालीन दस्तावेज उपलब्ध आहेत. सन १८५४ च्या दस्तावेजामध्ये ब्राह्मणीच्या श्री बल्लाळ आई व मार्तंडभैरव देवास इनाम मिळालेल्या जमिनीच्या वहिवाटीसंदर्भात कैफियत आलेली आहे. अहमदनगर औरंगाबाद मार्गावरील हे गाव मध्ययुगीन महत्वाची बाजारपेठ आणि व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. व्यापारी मार्गामुळे या रस्त्याला विशेष महत्त्व आहे. अनेक व्यापारी व नागरिक या मार्गाचा वापर करत होते. त्यामुळे या रस्त्यावर नेहमीच रहदारी असायची. त्यामुळे या बारवचा उपयोग पाणी पिण्यासाठी तसेच शेतीसाठी निश्चित केला जात असावा,

## निष्कर्ष

अनेक मध्ययुगीन दस्तऐवज, मोडी दस्तऐवज, शिलालेख राहुरी आणि आसपास आहेत. जे वाचले गेले नाही. त्यामुळे राहुरी पंचक्रोशीचा इतिहास सर्वसामान्यांना अज्ञात आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी धर्मशाळा, बारव (विहिरी), धार्मिक हेतूंसाठी नदी घाट, मंदिरे बांधणे आणि दुरुस्ती करणे अशी अनेक कल्याणकारी कामे केली. राजश्री आबाजी रणछोड या अहिल्याबाई होळकरांच्या सैन्यात कार्यरत होते. त्यांनी तत्कालीन लोकोपयोगी काम म्हणून राहुरीमध्ये ही बारव बांधली. ब्राह्मणी श्रीमंत लखुजीराव जाधवराव यांचे वतन गाव म्हणून प्रसिद्धीस आले, त्यांचा वारसदार यांनी तत्कालीन व्यापारी बाजारपेठेची गरज म्हणून बारवेचे निर्माण केले.

## *संदर्भ*

1. य.न. केळकर, 'होळकरांची कैफियत', हनुमान प्रकाशन, पुणे
2. श्री. विजय पवार, मुलाखत दि.२७/०४/२०२३
3. दै. पुण्यनगरी, दि. २०/०४/२०२३

# आधुनिक भारताच्या जडणघडणीत अस्पृश्यता निवारणाकरिता कार्य करणारे थोर समाज सुधारक महात्मा फुले व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य

**गजानन कोंडीबा घोडके**

ग्रामोन्नती मंडळाचे, आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, नारायणगाव ता. जुन्नर जि. पुणे

Email: Gajananghodke2012@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19761111

*DOI:10.5281/zenodo.19761111*

## प्रस्तावना

एकोणिसावे शतक समाजातील दोष दूर करून समता प्रस्थापित करणारे शतक याच काळास मानले गेले. महाराष्ट्रात महात्मा फुले यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य मोठ्या प्रमाणात हाती घेतले. महाराष्ट्रात दलित चळवळीस महात्मा फुले यांच्या कार्यापासून प्रारंभ झाला असे मानले जाते. समाज सुधारण्याचा पहिला प्रयत्न महाराष्ट्रामध्ये दिसून आला. याच पार्श्वभूमीवर पुढे महाराष्ट्रात महाराजा सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू महाराज, न्यायमूर्ती रानडे, विठ्ठल रामजी शिंदे, गोपाळ कृष्ण गोखले, श्री.म. माटे, गोपाळ बाबा वलंगकर, शिवराम जनाबाई कांबळे, किसन भागवत बनसोडे यासारख्या समाजसुधारकांचे कार्य अस्पृश्यता निवारणामध्ये अत्यंत प्रभावी ठरले. समाजसुधारकांनी अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नाबाबत मोठी जागृती यांनी घडवून आणली. संघटना, वृत्तपत्रे, जनजागृती, शैक्षणिक कार्य या सर्वांचा योग्य वापर करून अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला मोठी गती दिली.

मानव मुक्तीचे कार्य, दलित चळवळ स्थिती तसेच सामाजिक समता, न्याय, बंधुता निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केलेले दिसतात. या समाजसुधारकांनी सामाजिक क्रांतीचे बीजारोपण करण्याचा प्रयत्न केला. समाजसुधारकांनी केलेल्या कार्यातून मुक्तीसाठी प्रारंभिक प्रयत्न अर्थातच दलित चळवळीला एक दिशा मिळालेली दिसते. दलित चळवळीत योगदान देणाऱ्या काही सुधारकांपैकी प्रमुख महात्मा जोतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज इ. अनेक सुधारकांचा उल्लेख केला जातो. याच पार्श्वभूमीवर आधारित "आधुनिक भारताच्या जडणघडणीत अस्पृश्यता निवारणाकरिता कार्य करणारे थोर समाज सुधारक महात्मा फुले व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य " अभ्यासणे यासाठी प्रस्तुत शोधनिबंधाची रचना केलेली आहे.

## महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य

- **स्त्री उद्धाराचे कार्य**


*ISBN-978-93-49938-45-8*

- **मुलीची शाळा :** समाजसुधारणेसाठी स्त्री शिक्षण हाच प्रभावी मार्ग आहे हे ओळखून ३ जुलै १८४८ रोजी बुधवार पेठेत भिड्यांच्या वाड्यात पहिली मुलीची शाळा काढली. स्वतंत्रपणे मुलीची शाळा काढणारे ते पहिले भारतीय होते. त्यांनी मुलीची शाळा सुरु करण्याची प्रेरणा अहमदनगरच्या मिशनरी स्कूलच्या मिस फरारबाई यांच्याकडून घेतली त्यांच्या पहिल्या मुलीच्या शाळेतील ६ विद्यार्थीनी - १) अन्नपूर्णा जोशी २) सुमती मोकाशी ३) दुर्गा देशमुख ४) माधवी थत्ते ५) सोनु पवार ६) जनी करडीले यात चार ब्रम्हण, एक धनगर व एक मराठा अशी हजेरी पटसंख्या होती. ४ मार्च १८५१ मध्ये मुलीची बुधवार पेठेत दुसरी शाळा काढली. १७ सप्टेंबर १८५१ मध्ये मुलींची रास्तापेठेत तिसरी शाळा काढली.सन १८५२ मध्ये वेताळपेठेत चौथी मुलींची शाळा सुरु केली. शिक्षणातून जनजागृती, जनजागृतीतून समाजक्रांती, समाजक्रांतीतून नव समाजाची निर्मिती हे महात्मा फुलेंच्या शिक्षणाचे सुत्र होते.[१]
- **विधवा पुनर्विवाहः** महात्मा फुलेंनी विधवांच्या प्रश्नांकडे मानवतेच्या दृष्टिकोनातूनच बघितले. सन १८६४ मध्ये पुण्याच्या बागेत शेणवी जातीतील रघुनाथ जनार्दन नामक विधुराचा नर्मदा या विधवेशी पुनर्विवाह घडवून आणला. विधवांच्या केशवपनाच्या पध्दतीला आळा घालण्यासाठी तळेगाव ढमढेरे तसेच ओतुर येथे सन १८६५ मध्ये न्हाव्याचा संप घडवून आणला. न्हाव्यांचा हा देशातील पहिला संप होता.
- **बालहत्या प्रतिबंधक गृहः** एखाद्या विधवेचे चुकून वाकडे पाऊल पडले तर तिला भ्रूणहत्या किंवा आत्महत्या याशिवाय पर्याय नव्हता. अशा संकटातून विधवांची मुक्ती व्हावी म्हणून जोतीरावांनी आपल्या घरी सन १८६३ मध्ये पंढरपूर येथे 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरु केले. बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन करणारे जोतीराव हे पहिले समाजसुधारक होते.

  विधवांच्या प्रश्नांकडे मानवतेच्या दृष्टिकोनातूनच बघितले, विधवांच्या केशवपनाच्या पध्दतीला आळा घालण्यासाठी सन १८६५ मध्ये न्हाव्याचा संप घडवून आणला. सन १८६३ मध्ये 'बालहत्या प्रतिबंधक गृह' सुरु केले.

### ➢ अस्पृश्यांच्या उध्दाराचे कार्य

अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी पुण्यात १९ मे १८५२ मध्ये वेताळ पेठेत शाळा सुरु केली. १० सप्टेंबर १८५३ मध्ये, महार, मांग इ. लोकांस विद्या शिकविण्याकरिता मंडळी नावाची संस्था काढली. (The society for promoting the education of Manm etc) या संस्थेतर्फे सन १८५८ पर्यंत पुण्यात तीन शाळा काढल्या. अस्पृश्यांना पिण्याच्या पाण्याची अडचण भासू लागली म्हणून सन १८६८ मध्ये आपल्या घरचा हौद सगळ्यांसाठी खुला केला. इ. स. १८७३ साली जोतीरावांनी अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा प्रसिध्द केला. या जाहीरनामामध्ये 'जे शुद्र अगर कोणीही

आपल्या उत्पन्नकर्त्यास मानून, नीतीस अनुसरुन व स्वच्छ उद्योगधंदा करण्याचा निश्चय करुन त्याप्रमाणे आचरण करीत आहेत,. यावरून त्यांचे अस्पृश्यांच्या उध्दाराचे कार्य स्पष्ट होते.

### ➢ सत्यशोधक समाजाची स्थापना

सत्यशोधक समाज (२४ सप्टेंबर १८७३, पुणे) ही समाजसुधारणेची व परिवर्तनाची महाराष्ट्रातील पहिली चळवळ ठरली. सत्यशोधक समाजाविषयी धनंजय कीर असे म्हणतात, 'आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय.' या समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला. सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. 'सार्वजनिक सत्यधर्म' व 'गुलामगिरी' या ग्रंथांत त्यांनी सत्यशोधक समाजाबद्दल विचार मांडले आहे. ते म्हणतात, 'ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इ. लोकांच्या दास्यत्वातून शुद्र लोकांना मुक्त करण्याकरीता व मतलबी ग्रंथाच्या आधारे आज हजारो वर्षे ते शुद्र लोकांना नीच मानून गफलतीने लुटत आहे.'[२] सत्यशोधक समाजाचे कार्य 'दीनबंधू' नावाच्या साप्ताहिकातून प्रसिद्ध केले जात असे तर या समाजातर्फे 'अंबालहरी' हे वृत्तपत्र चालविले जात होते.

### ➢ शेतक्यांची स्थिती सुधारण्यासाठी कार्य

शेतक्यांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी सरकारला सूचना केल्या. त्यात मुख्यत: पाणीपुरवठा योजनेस अग्रक्रम दिला होता. तलाव, बंधारे, विहीरी, धरणे याद्वारे शेतीला पाणीपुरवठा करावा, पशुपालनास जोडधंदा म्हणून चालना द्यावी, माहिती पुस्तिका छापाव्यात, कृषी पद्धती व अवजारात सुधारणा कराव्यात, कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करुन पीक संरक्षणासाठी बंदुकीस परवाने द्यावे, कालव्याचे पाणी वेळेवर मिळावे यांबाबत त्यांनी आपले विचार सरकार दरबारी मांडले. 'ड्युक ऑफ कॅनॉटनच्या कार्यक्रमात ज्योतीराव शेतक्यांच्या वेशात गेले. हिंदुस्थानचे हित करायचे असल्यास शेतक्यांचे अज्ञान घालवावे व त्यासाठी प्राथमिक शिक्षण मोफत द्यावे अशी मागणी केली.[३]

जोतीरावांच्या कार्यामुळे शाहू महारांजानी त्यांना 'महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर किंग' असे संबोधले. तर सयाजीराव गायकवाड यांनी जोतीरावांना 'हिंदुस्थानचा बुकर दी वॉशिंग्टन' ही पदवी दिली. महर्षी वि.रा. शिंदे यांनी जोतीरावांना 'आद्य दलितोद्धारक' असा गौरव केला.

### विठ्ठल रामजी शिंदे

अस्पृश्य वर्गाची सुधारणा व्हावी यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. प्रार्थना समाजाचे ते प्रचारक होते. प्रार्थना समाजाच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक कार्य करण्यासाठी सुरुवात केली. हिंदू धर्मात सुधारणा घडून यावी यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सुरुवातीच्या काळामध्ये मानधनावर प्रार्थना समाजाचे कार्य केले.[४] त्यांच्या मते 'सामाजिक विषमता नष्ट झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही.' ह्याच उद्देशाने ते सातत्याने कार्यरत


*ISBN-978-93-49938-45-8*

राहिले. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे त्यांना प्रोत्साहन व सहाय्य मिळत होते.

इ. स. १९०१ ते १९०३ या कालावधीत त्यांनी मँचेस्टर कॉलेज येथे तौलनिक धर्मशास्त्र, पाली भाषा व बौद्ध धर्म, ख्रिस्ती धर्मसंघाचा इतिहास, समाजशास्त्र या विषयांचा अभ्यास केला. सन १९०३ च्या सप्टेंबरमध्ये ॲमस्टरडॅम येथे भरलेल्या त्रैवार्षिक आंतरराष्ट्रीय उदारधर्म परिषदेस ब्राह्मो समाजाचे भारतातील प्रतिनीधी म्हणून उपस्थित राहून 'हिदुस्थानातील उदारधर्म' या विषयावरील निबंध त्यांनी सादर केला.[५]

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य: १. डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी न्यायमूर्ती नारायण चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली 'ड्रिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेची स्थापना १६ ऑक्टोबर १९०६ मध्ये मुंबई या ठिकाणी केली. डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या शाखा मुंबई, पुणे, हुबळी, सातारा, ठाणे, दापोली, मालवण, मंगळूर, मद्रास, अकोला, अमरावती, इंदूर, भावनगर, कोल्हापूर येथे उभारण्यात आल्या. या संस्थेमार्फत एल्फिस्टन रोडवर पहिली शाळा सुरु केली. 'डिप्रेस्ड क्लासेस स्टुडन्ट्स मिशन' नावाच्या संस्थेमार्फत मुंबईच्या भागात व व्हाड प्रांतात विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वस्तिगृहाची सोय केली. मुंबई प्रांतातील गुन्हेगारी जमातीच्या विकासासाठी त्यांनी आपली योजना गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांच्याकडे मांडली.[६]

थोडक्यात अस्पृश्य मुलांसाठी शाळा, वस्तिगृहे, शिवण वर्ग, प्रबोधनपर व्याख्याने, कीर्तने आयोजित करुन अस्पृश्यांच्या प्रश्नाबद्दल जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. देशभर दौरे करुन समाजजागृती घडवून आणण्याचा प्रयत्न डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या वतीने केला. मिशनच्या स्थपनेनंतर सहा वर्षांतच एकंदर १४ ठिकाणी २३ शाळा, ५५ शिक्षक, १,१०० मुले, ५ वसतिगृहे, अन्य १२ संस्था व ७ आजीव प्रचारक एवढा मिशनच्या कामाचा व्याप महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी पश्चिम आणि दक्षिण भारतातील सात प्रांतांत वाढविला. इ. स. १९१२ मध्ये त्यांनी मिशनचे कार्यालय मुंबईहून पुण्यास हलविले. अस्पृश्यतेचा प्रश्न सोडविण्यासाठी जनजागृती करण्यासाठी महर्षींनी देशभर दौरे केले. इ. स. १९१७ साली कलकत्ता काँग्रेसमध्ये अस्पृश्यता निवारणासंबंधी ठराव संमत व्हावा म्हणून त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. अस्पृश्यांसाठी प्रत्यक्ष कार्य करता यावे म्हणून ते आपल्या कुटुंबियांसह अस्पृश्यांच्या वस्तीत राहावयास गेले होते. इ. स. १९३३ साली 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हे पुस्तक लिहून या प्रश्नाकडे लोकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यता निवारणासाठी अत्यंत तळमळीने कार्य करणारे विठ्ठल रामजी शिंदे होते. राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरुन अस्पृश्यता मानण्यात येऊ नये असा ठराव त्यांच्याच प्रयत्नाने मांडण्यात आला. तर प्रत्यक्ष महात्मा गांधीजी यांच्या नेतृत्वाखाली पुढे अस्पृश्यता निवडण्याचे कार्य त्यांनी केले. निराश्रित स्त्रियांची सेवा करण्यासाठी निराश्रित सेवासदन सुरु केले.

## निष्कर्ष

1. महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक इतिहासामध्ये परिवर्तनाचे १९ वे शतक म्हणून प्रभावी ठरले.
2. महाराष्ट्रात दलित चळवळीस महात्मा फुले यांच्या कार्यापासून प्रारंभ झाला असे मानले जाते.
3. समाजसुधारकांनी अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नाबाबत मोठी जागृती यांनी घडवून आणली.
4. समाजसुधारकांनी संघटना, वृत्तपत्रे, जनजागृती, शैक्षणिक कार्य या सर्वांचा योग्य वापर करून अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला मोठी गती दिली.
5. समाजसुधारकांनी सामाजिक क्रांतीचे बीजारोपण करण्याचा प्रयत्न केला.
6. स्त्री प्रश्नांची सांगड घालून सर्वांगीण परिवर्तनाचा विचार मांडणारे महात्मा फुले हे ख्ऱ्या अर्थाने समाज सुधारणांचे व समाज परिवर्तनाचे अग्रणी, मानव मुक्तीचे ख्ऱ्या अर्थाने समाज सुधारक होते हे स्पष्ट होते.
7. अस्पृश्य वर्गाची सुधारणा व्हावी यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आयुष्यभर प्रयत्न केले.
8. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्य मुलांसाठी शाळा, वस्तिगृहे, शिवण वर्ग, प्रबोधनपर व्याख्याने, कीर्तने आयोजित करून अस्पृश्यांच्या प्रश्नाबद्दल जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.
9. विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक कार्य सामाजिक सुधारणा, समानता आणि सक्षमीकरणासाठी त्यांच्या अतूट बांधिलकीने पिढ्यांना प्रेरणा देते.

## *संदर्भ*


1. डॉ. शिंगारे अनिल व डॉ. घुले विठ्ठल, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास, अरुणा प्रकाशन लातूर, प्रथम आवृत्ती २००९, पृष्ठ क्रमांक २०-२५.
2. प्रा. पाटील व्ही. बी., एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, के सागर प्रकाशन प्रथम आवृत्ती २००४, पृष्ठ क्रमांक १४५-१४८.
3. डॉ. गुंदेकर श्रीराम, महात्मा ज्योतिबा फुले, विचार आणि वाङ्मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती १९९२ पृष्ठ क्रमांक २२५.
4. महर्षी शिंदे वी. रा. भारतीय अस्पृशतेचा प्रश्न, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती १९९३, पृष्ठ क्रमांक १२५.
5. पाटील महेंद्र, महाराष्तील सामाजिक व राजकीय चळवळी आणि प्रशासन, डायमंड प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २०२०. पृष्ठ क्रमांक २२.
6. उपरोक्त, डॉ. शिंगारे अनिल व डॉ. घुले विठ्ठल, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास, पृष्ठ क्रमांक ३५-५०.
7. रा. ना. चव्हाण, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक दर्शन (भाग २), प्रथम आवृत्ती २०१८. पृष्ठ क्रमांक १२०.



*ISBN-978-93-49938-45-8*

# मानव विज्ञान आणि आधुनिक सामाजिक परिवर्तन: एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. घोडके वंदना किसन**
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत
Email: vandana.ghodake14@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19761326
*DOI: 10.5281/zenodo.19761326*

## प्रस्तावना

मानव विज्ञान हे मानवी जीवन, संस्कृती, समाजरचना, परंपरा, मूल्यव्यवस्था आणि मानवी वर्तनाचा अभ्यास करणारे महत्त्वाचे सामाजिक शास्त्र आहे. मानव विज्ञानाच्या अभ्यासातून मानवी समाजातील बदल, सांस्कृतिक विविधता आणि सामाजिक संस्थांचा विकास समजून घेता येतो. आधुनिक काळात औद्योगिकीकरण, तंत्रज्ञान, शिक्षण, जागतिकीकरण आणि विज्ञानाच्या प्रगतीमुळे समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर परिवर्तन झाले आहे. मानवी जीवनशैली, कुटुंब व्यवस्था, अर्थव्यवस्था, संस्कृती आणि मूल्ये या सर्व क्षेत्रांत मोठे बदल दिसून येतात. त्यामुळे आधुनिक समाजातील बदल समजून घेण्यासाठी मानव विज्ञानाचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

## मानव विज्ञानाची संकल्पना

मानव विज्ञान म्हणजे मानवाचा सर्वांगीण अभ्यास करणारे शास्त्र. यात मानवाचे शारीरिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनाचा अभ्यास केला जातो.

मानव विज्ञानाचे मुख्य प्रकार –शारीरिक मानव विज्ञान,सांस्कृतिक मानव विज्ञान,सामाजिक मानव विज्ञान, अनुप्रयुक्त मानव विज्ञान सामाजिक मानव विज्ञान विशेषतः समाजातील संस्था, नातेसंबंध, कुटुंब व्यवस्था, संस्कृती व सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करते.

## सामाजिक परिवर्तन

मानव विद्या सामाजिक परिवर्तनासाठी प्रेरणा देणारे साधन आहे. साहित्य, इतिहास आणि तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून समाजातील अन्याय, विषमता आणि अंधश्रद्धा यांविरुद्ध जागृती निर्माण होते.

भारतात अनेक समाजसुधारकांनी शिक्षण आणि मानव मूल्यांच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणले. उदाहरणार्थ महात्मा फुले , सावित्रीबाई फुले , डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांनी शिक्षण, समता आणि मानवाधिकार यांवर भर देऊन समाजात मोठे परिवर्तन

घडवले.

मानव विद्येमुळे व्यक्तीमध्ये समता, बंधुता, सहिष्णुता आणि लोकशाही मूल्ये विकसित होतात. त्यामुळे सामाजिक सलोखा आणि प्रगती साध्य होते.

सामाजिक परिवर्तन म्हणजे समाजातील रचना, मूल्ये, परंपरा, संस्था, आचार-विचार आणि जीवनपद्धतीमध्ये होणारा बदल. मानवी समाजात सतत परिवर्तन होत असते. काळानुसार समाजाच्या गरजा, विचारसरणी आणि तंत्रज्ञान बदलत जाते आणि त्यानुसार समाजात नवीन व्यवस्था निर्माण होते. आधुनिक समाजातील परिवर्तनआधुनिक काळात संगणक, इंटरनेट, मोबाईल, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यामुळे मानवी जीवनामध्ये मोठे बदल झाले आहेत. संवाद साधनांमध्ये क्रांती, माहिती सहज उपलब्ध,डिजिटल अर्थव्यवस्था विकसित,शिक्षण व व्यवसायात बदल तंत्रज्ञानामुळे लोकांच्या जीवनशैलीत मोठ्या प्रमाणावर बदल झाले असून समाज अधिक जागतिक स्वरूपाचा झाला आहे.कुटुंब व्यवस्थेतील बदल पूर्वी संयुक्त कुटुंब पद्धती प्रचलित होती. परंतु आधुनिक समाजात लहान कुटुंब (न्यूक्लिअर फॅमिली) पद्धती वाढत आहे.मुख्य कारणे शहरीकरण नोकरीसाठी स्थलांतर महिलांचे शिक्षण व रोजगार हे आहे

शिक्षणातील परिवर्तन-आधुनिक शिक्षणामुळे समाजामध्ये जागरूकता वाढली आहे.वैज्ञानिक दृष्टिकोन वाढलासामाजिक समानता वाढली स्त्री-पुरुष समानतेची जाणीव वाढली शिक्षणामुळे सामाजिक विकास आणि आर्थिक प्रगतीला चालना मिळाली आहे. संस्कृती मधील बदल-जागतिकीकरणामुळे विविध संस्कृतींचा प्रभाव वाढला आहे.जीवनशैलीत बदल फॅशन, मनोरंजन व आहारपद्धतीत बदल पारंपरिक मूल्यांमध्ये बदल आजचा समाज अधिक आधुनिक, वैज्ञानिक आणि व्यक्तिवादी झाला आहे.

## मानव विज्ञाना आणि सामाजिक परिवर्तनाचे सिद्धांत

सामाजिक परिवर्तन समजून घेण्यासाठी विविध समाजशास्त्रज्ञांनी सिद्धांत मांडले आहेत.

- **उत्क्रांती सिद्धांत**: या सिद्धांतानुसार समाज साध्या अवस्थेतून जटिल अवस्थेकडे विकसित होतो.
- **संघर्ष सिद्धांत:** या सिद्धांतानुसार समाजातील विविध गटांमधील संघर्षामुळे सामाजिक परिवर्तन घडते. या दृष्टिकोनाचा संबंध Karl Marx यांच्या विचारांशी जोडला जातो.
- **कार्यात्मक सिद्धांत:** या सिद्धांतानुसार समाजातील प्रत्येक संस्था समाजाच्या स्थैर्यासाठी कार्य करते. सामाजिक संतुलन बिघडल्यास परिवर्तन घडते.

## मानव विज्ञान आणि सामाजिक परिवर्तन यांचा संबंध

मानव विद्या समाजातील विचारसरणी बदलण्यास मदत करते. साहित्य, इतिहास आणि तत्त्वज्ञान यांच्या माध्यमातून समाजातील समस्यांवर प्रकाश टाकला जातो.मानव विद्या व्यक्तीमध्ये खालील


*ISBN-978-93-49938-45-8*

मूल्ये विकसित करते. समता,स्वातंत्र्य,बंधुता,सहिष्णुताही मूल्ये सामाजिक परिवर्तनासाठी अत्यंत आवश्यक आहेत.

## मानव विज्ञानाची आधुनिक समाजातील भूमिका

मानव विज्ञान समाजातील बदल समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. मानव विज्ञानाची भूमिका,सांस्कृतिक विविधतेचा अभ्यास,सामाजिक समस्या समजून घेणे,विकास धोरणांमध्ये मदत, सामाजिक समन्वय निर्माण करणे मानव विज्ञानाच्या अभ्यासातून समाजातील संघर्ष, असमानता आणि विकासाच्या प्रक्रियेचा अभ्यास करता येतो. मानव विज्ञानामुळे आधुनिक समाजातील परिवर्तन समजून घेणे शक्य होते. तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण, शिक्षण आणि जागतिकीकरणामुळे समाजात मोठे बदल झाले आहेत. या बदलांमुळे मानवाचे जीवन अधिक आधुनिक, गतिमान आणि वैज्ञानिक झाले आहे.

भविष्यात समाजातील बदल अधिक वेगाने होणार असून त्यांचा अभ्यास करण्यासाठी मानव विज्ञानाची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे.

आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञान, इंटरनेट आणि जागतिकीकरणामुळे समाजात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन घडत आहे.

तंत्रज्ञानामुळे माहिती सहज उपलब्ध होत असल्यामुळे समाज अधिक जागरूक होत आहे. तथापि, सामाजिक मूल्ये टिकवून ठेवण्यासाठी मानव विद्येचे महत्त्व आजही कायम आहे.

## कुटुंब व्यवस्थेतील बदल

आधुनिक समाजात संयुक्त कुटुंब पद्धती कमी झाली आहे आणि लहान कुटुंब पद्धती वाढली आहे.

नोकरी, शिक्षण आणि स्थलांतर यामुळे लोक स्वतंत्र राहू लागले आह स्त्रियांच्या स्थितीतील परिवर्तन,आधुनिक समाजात स्त्रियांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत.पूर्वी स्त्रिया घरापुरत्याच मर्यादित होत्या, परंतु आता त्या शिक्षण, राजकारण, व्यवसाय आणि विज्ञान क्षेत्रातही पुढे येत आहेत.

आधुनिक सामाजिक परिवर्तनाचे सकारात्मक परिणामजीवनमान सुधारले शिक्षण व आरोग्य सुविधा वाढल्या, स्त्रियांचे सशक्तीकरण झाले

वैज्ञानिक दृष्टिकोन वाढलामानव विज्ञानामुळे आधुनिक समाजातील परिवर्तन समजून घेता येते. तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण, शिक्षण आणि जागतिकीकरणामुळे समाजामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत. या बदलांमुळे मानवी जीवन अधिक आधुनिक आणि प्रगत झाले आहे. भविष्यातही समाजात नवीन बदल होत राहतील आणि त्यांचा अभ्यास करण्यासाठी मानव विज्ञानाचे महत्त्व अधिक वाढेल.

### धर्म संस्था

आधुनिक समाजात धार्मिक दृष्टिकोनामध्ये बदल झाला आहे. अंधश्रद्धा कमी झाल्या वैज्ञानिक दृष्टिकोन वाढला.धर्मापेक्षा नैतिक मूल्यांना महत्त्व प्राप्त झाले

### शिक्षण संस्था

आधुनिक समाजात शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला आहे.,ऑनलाइन शिक्षण तांत्रिक शिक्षण,व्यावसायिक शिक्षण या बदलांमुळे मानवी जीवन अधिक आधुनिक आणि प्रगत झाले

### मानव विज्ञान आणि सामाजिक परिवर्तनाचे महत्त्व

मानव विद्या ही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान जरी भौतिक प्रगतीस मदत करत असले तरी समाजातील नैतिक मूल्ये, संस्कृती आणि मानवी संबंध टिकवून ठेवण्याचे कार्य मानव विद्या करते.

- **नैतिक मूल्यांचा विकास** : मानव विद्या व्यक्तीमध्ये प्रामाणिकपणा, सहिष्णुता, सहकार्य आणि जबाबदारीची भावना निर्माण करते.
- **संस्कृतीचे जतन** ; समाजातील परंपरा, भाषा आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी मानव विद्या महत्त्वाची भूमिका बजावते.
- **सामाजिक जागृती** : समाजातील अन्याय, अंधश्रद्धा आणि भेदभाव यांविषयी जागरूकता निर्माण करते.
- **लोकशाही मूल्यांची जपणूक** : समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांचा प्रसार कर

### सामाजिक परिवर्तनातील अडथळे

सामाजिक परिवर्तन घडताना अनेक अडथळे येतात. काही प्रमुख अडथळे खालीलप्रमाणे आहेत:

- **अंधश्रद्धा आणि रूढी** ; जुने आणि अवैज्ञानिक विश्वास समाजाच्या प्रगतीस अडथळा ठरतात.
- **अशिक्षितपणा** : शिक्षणाचा अभाव असल्यामुळे नवीन विचार स्वीकारण्यास समाज तयार होत नाही
- **आर्थिक विषमता** : समाजातील आर्थिक असमानता सामाजिक बदलांना मर्यादा जातीय
- **भेदभाव** : जातिव्यवस्था आणि भेदभावामुळे सामाजिक एकात्मता कमी होते. या अडथळ्यांवर मात करण्यासाठी शिक्षण आणि मानव मूल्यांचा प्रसार आवश्यक आहे.

### आधुनिक सामाजिक परिवर्तनाचे नकारात्मक परिणाम

पर्यावरणीय समस्या वाढल्या पारंपरिक संस्कृतीचा ऱ्हास झाला. सामाजिक ताणतणाव वाढला व्यक्तिवाद वाढला


*ISBN-978-93-49938-45-8*

मानव विद्या म्हणजे मानवी जीवन, संस्कृती, मूल्ये, विचार, वर्तन आणि समाजातील परस्परसंबंध यांचा अभ्यास करणारे ज्ञानक्षेत्र होय. मानव विद्या समाजातील नैतिकता, संस्कृती, भाषा, इतिहास, तत्त्वज्ञान आणि सामाजिक रचना समजून घेण्यास मदत करते. समाजातील परिवर्तन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षण, तंत्रज्ञान, आर्थिक बदल, राजकीय चळवळी आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यामुळे समाजात परिवर्तन घडत असते.

मानव विद्या या परिवर्तन प्रक्रियेला समजून घेण्यासाठी आणि योग्य दिशा देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. विचारवंत आणि समाजसुधारकांनी मानव विद्या आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील असमानता, अज्ञान आणि अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला आहे.

### *संदर्भ*

1. पाटील, एस. (2015). सामाजिक परिवर्तनाचे सिद्धांत. पुणेः विद्या प्रकाशन.देशमुख, आर. (2018). मानव विद्या आणि समाजशास्त्र. मुंबईः लोकवाङ्मय गृह.
2. मराठी विश्वकोश – सामाजिक परिवर्तन.
3. मराठी विश्वकोश – मानवशास्त्र.
4. International Journal of Contemporary Research – Education and social development.
5. Miraz, M.H. – Impacts of Culture and Technology on Society.
6. Vidya Bhushan & Sachdeva – Sociology.
7. Dr. B. R. Ambedkar (1990). Annihilation of Caste.
8. Mahatma Jyotirao Phule (1873). Gulamgiri.
9. S.C. Dube – Indian Society.
10. G.S. Ghurye – Indian Sociology.
11. Mahatma Gandhi (1909). Hind Swaraj.

# महात्मा गांधींचे अहिंसेचे विचार आणि त्यांची आजच्या काळातील गरज

**प्रा. आबासाहेब लक्ष्मण गोरे**

सहाय्यक प्राध्यापक, न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर (स्वायत्त)

Email: abasahebgore100@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19763016

*DOI: 10.5281/zenodo.19763016*

## प्रस्तावना

विसाव्या शतकातील सर्वात प्रभावशाली नेत्यांपैकी एक असलेले महात्मा गांधी यांनी अहिंसेला (Non-Violence) केवळ एक नैतिक तत्त्व म्हणून नव्हे, तर सामाजिक आणि राजकीय बदलाचे एक प्रभावी साधन म्हणून मांडले. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात नमूद केले आहे अहिंसेचे हे तत्त्व त्यांनी भारतीय धर्मग्रंथ, विशेषतः भगवद्गीता, जैन धर्म आणि ख्रिश्चन धर्मातील विचारांमधून आत्मसात केले होते. कुलकर्णी (२०१०) यांच्या मते, गांधींनी या विविध तत्त्वज्ञानांचा समन्वय साधून अहिंसेला एक सर्वसमावेशक सामाजिक दर्शनात रूपांतरित केले.

आज जेव्हा रशिया-युक्रेन युद्ध, इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष, आणि जगभरातील जातीय व धार्मिक हिंसाचाराच्या घटना घडत आहेत, तेव्हा गांधींचे विचार केवळ ऐतिहासिक नाहीत, तर ते वर्तमानकाळासाठीही अत्यंत महत्त्वाचे आहेत. Iyer (१९७३) यांच्या मते, "Gandhi's ahimsa was not passive submission but active resistance through peaceful means".

## अहिंसेची संकल्पना: मूळ आणि अर्थ

संस्कृत भाषेत 'अहिंसा' या शब्दाचा अर्थ 'न हिंसा' असा आहे, म्हणजेच हिंसेचा पूर्णपणे त्याग. हे तत्त्व जैन धर्माने सर्वप्रथम व्यापक स्वरूपात मांडले. महावीर यांनी अहिंसेला जीवनाचा सर्वोच्च धर्म मानले. गांधींनी या प्राचीन तत्त्वाला एका नव्या राजकीय आणि सामाजिक संदर्भात लावले.

गांधींसाठी अहिंसा म्हणजे केवळ शारीरिक हिंसेचा त्याग नव्हता. त्यात मानसिक हिंसा, शाब्दिक हिंसा आणि सांस्थात्मक हिंसेचाही समावेश होता. Bondurant (१९५८) यांनी आपल्या 'Conquest of Violence: The Gandhian Philosophy of Conflict' या ग्रंथात नमूद केले आहे की गांधींनी अहिंसेचे तीन स्तर ओळखले होते: (१) शरीराने हिंसा न करणे, (२) मनाने हिंसक विचार न करणे, आणि (३) भाषेत हिंसक शब्द न वापरणे).

गांधींच्या अहिंसेचे संबंध सत्याशी ज्याला ते 'सत्याग्रह' म्हणत. सत्याग्रह म्हणजे सत्यासाठी आग्रह धरणे, परंतु हिंसेशिवाय. हे तत्त्व त्यांनी प्रथम दक्षिण आफ्रिकेत (१९०७) वापरले, जिथे त्यांनी वर्णद्वेषी


*ISBN-978-93-49938-45-8*

कायद्यांविरुद्ध अहिंसक आंदोलन केले .

### सत्याग्रहः अहिंसेचे व्यावहारिक रूप

गांधींनी सत्याग्रहाला अहिंसेचे व्यावहारिक साधन म्हणून विकसित केले. सत्याग्रही व्यक्ती अन्यायाला प्रत्यक्ष शारीरिक प्रतिकार न करता, कायदेभंग करून आणि त्याचे परिणाम स्वीकारून विरोध नोंदवते. यात आत्मशुद्धी, उपवास, आणि अहिंसक मोर्चे यांसारख्या पद्धतींचा समावेश होतो.

१९३० मधील दांडी यात्रा (Salt March) हे सत्याग्रहाचे सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे. गांधींनी ३८५ किलोमीटर पदयात्रा करून मीठ कायद्याचे उल्लंघन केले आणि ब्रिटिश साम्राज्याला आव्हान दिले. Sharp (२०१२) यांनी आपल्या संशोधनात नमूद केले आहे की गांधींचे हे अहिंसक आंदोलन केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगातील स्वातंत्र्यलढ्यांसाठी प्रेरणादायी ठरले. वाघ (२००८) यांनीही या संदर्भात लिहिले आहे की दांडी यात्रेने अहिंसक प्रतिकाराची एक नवी परंपरा निर्माण केली, ज्यातून भारतातील असंख्य सामान्य नागरिकांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला (वाघ १५६).

मार्टिन ल्यूथर किंग ज्युनिअर यांनी अमेरिकेतील नागरी हक्क आंदोलनात (Civil Rights Movement, १९५०-१९६८) गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वांचा उपयोग केला. King (१९५८) यांनी आपल्या 'Stride Toward Freedom' या ग्रंथात लिहिले, "Gandhi was probably the first person in history to lift the love ethic of Jesus above mere interaction between individuals to a powerful and effective social force".

### अहिंसेचे सामाजिक आणि आर्थिक आयाम

गांधींनी अहिंसेला केवळ राजकीय संघर्षापुरते मर्यादित ठेवले नाही. त्यांनी सामाजिक अहिंसेचीही मांडणी केली. अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री-पुरुष समानता, आणि धार्मिक सद्भावना हे त्यांच्या सामाजिक अहिंसेचे अविभाज्य भाग होते.

आर्थिक क्षेत्रातही गांधींनी हिंसेचे एक रूप ओळखले, ते म्हणजे शोषण. त्यांनी 'स्वदेशी' आंदोलनाद्वारे आर्थिक स्वावलंबनाचा पुरस्कार केला. Parekh (१९९७) यांनी आपल्या 'Gandhi: A Very Short Introduction' या पुस्तकात नमूद केले आहे की गांधींसाठी यंत्रयुगाचे अंधाधुंध औद्योगिकीकरण हेदेखील एक प्रकारची हिंसा होती, कारण ती मानवी श्रमाचे आणि निसर्गाचे शोषण करते (Parekh 78).

गांधींनी 'ट्रस्टीशिप' (Trusteeship) ही संकल्पना मांडली, ज्यानुसार श्रीमंत लोकांनी आपल्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून कार्य करावे आणि ती समाजाच्या कल्याणासाठी वापरावी. ही संकल्पना आजच्या 'Corporate Social Responsibility' (CSR) च्या विचाराशी साधर्म्य दर्शवते. देशमुख (१९९५) यांनी या संदर्भात लिहिले आहे की गांधींची ट्रस्टीशिपची कल्पना ही भांडवलशाही आणि

साम्यवाद या दोन्हींच्या पलीकडे जाणारा तिसरा पर्याय होता (देशमुख ८९).

## आजच्या काळात अहिंसेची प्रासंगिकता

२१व्या शतकात जग अनेक संकटांना सामोरे जात आहे. युद्ध, दहशतवाद, जलवायू बदल, सामाजिक असमानता, आणि राजकीय ध्रुवीकरण. या सर्व समस्यांच्या मुळाशी हिंसा आहे. शारीरिक, मानसिक, सांस्थात्मक किंवा पर्यावरणीय. अशा परिस्थितीत गांधींचे अहिंसेचे विचार अत्यंत प्रासंगिक ठरतात.

Nagler (२०१४) यांनी आपल्या 'The Nonviolence Handbook' या पुस्तकात सांगितले आहे की अहिंसक आंदोलने हिंसक आंदोलनांपेक्षा दुप्पट अधिक यशस्वी होतात. Chenoweth आणि Stephan (२०११) यांनी आपल्या महत्त्वपूर्ण संशोधनात १९०० ते २००६ या कालावधीतील ३२३ आंदोलनांचा अभ्यास केला आणि निष्कर्ष काढला की अहिंसक चळवळींचा यशाचा दर ५३% होता, तर हिंसक चळवळींचा केवळ २६% होता.

पर्यावरणीय संकटाच्या संदर्भातही गांधींचे विचार महत्त्वाचे आहेत. गांधींनी 'पृथ्वी माता' ही संकल्पना मांडली आणि निसर्गाशी सुसंगत जीवनशैलीचा पुरस्कार केला. त्यांचे प्रसिद्ध वाक्य आहे: "Earth provides enough to satisfy every man's need, but not every man's greed." आजच्या जलवायू बदलाच्या संकटात हे विचार अत्यंत प्रासंगिक आहेत.

## डिजिटल युगात अहिंसा: नवे आव्हाने

सोशल मीडिया आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात हिंसेचे नवे प्रकार उदयास आले आहेत. सायबर बुलिंग, ऑनलाइन द्वेषप्रसार (Hate Speech), आणि खोट्या बातम्या (Fake News). या डिजिटल हिंसेचा सामना करण्यासाठी गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वांचा विस्तार करणे आवश्यक आहे.

Cortright (२०१८) यांनी आपल्या संशोधनात सुचवले आहे की गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वांना डिजिटल क्षेत्रात लागू करण्यासाठी 'Digital Satyagraha' ही संकल्पना विकसित केली जाऊ शकते, ज्यात ऑनलाइन प्लॅटफॉर्म्सवर शांततापूर्ण, सत्याधारित संवादाचा पुरस्कार केला जातो.

अनेक तरुण आज सामाजिक न्यायासाठी सोशल मीडियाचा वापर करत आहेत. #BlackLivesMatter, #MeToo, आणि #FridaysForFuture या आंदोलनांनी गांधींच्या अहिंसक प्रतिकाराची डिजिटल आवृत्ती सादर केली आहे. या चळवळींनी हे सिद्ध केले की डिजिटल युगातही अहिंसक संघर्ष प्रभावी असू शकतो. जोशी (२०१५) यांनी आपल्या 'गांधीजींची अहिंसा: एक चिंतन' या ग्रंथात सुचवले आहे की डिजिटल माध्यमे ही आधुनिक सत्याग्रहाची नवी व्यासपीठे बनू शकतात.

## गांधींच्या विचारांवरील टीका आणि त्यांचे उत्तर

गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानावर अनेक टीकाकारांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. डॉ. बाबासाहेब


*ISBN-978-93-49938-45-8*

आंबेडकर यांनी गांधींच्या दलित धोरणावर तीव्र टीका केली आणि असा आरोप केला की गांधी वर्णव्यवस्थेचे समर्थन करत होते. Ambedkar (१९४५) यांनी लिहिले की गांधींचा अहिंसेचा दृष्टिकोन दलितांच्या वास्तविक समस्यांना पुरेसे संबोधित करत नाही.

याशिवाय, काही विचारवंतांनी असा युक्तिवाद केला की अहिंसा केवळ लोकशाही व्यवस्थेतच कार्य करते, हुकूमशाही विरुद्ध नाही. परंतु या टीकेला उत्तर देताना, Ackerman आणि Duvall (२०००) यांनी दाखवले आहे की पोलंड (सॉलिडॅरिटी आंदोलन), दक्षिण आफ्रिका (वर्णभेद विरोधी आंदोलन), आणि फिलिपाईन्स या ठिकाणी अहिंसक आंदोलनांनी हुकूमशाही सरकारांना पराजित केले

## गांधींच्या विचारांचा जागतिक प्रभाव

गांधींच्या अहिंसेच्या विचारांनी संपूर्ण जगावर गहन प्रभाव टाकला. मार्टिन ल्यूथर किंग ज्युनिअर (अमेरिका), नेल्सन मंडेला (दक्षिण आफ्रिका), आँग सान सू की (म्यानमार), आणि दलाई लामा (तिबेट) या नेत्यांनी गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वांचा आपल्या आंदोलनांमध्ये अवलंब केला.

संयुक्त राष्ट्रसंघाने (United Nations) २ ऑक्टोबर हा दिवस गांधींचा जन्मदिवस 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' म्हणून घोषित केला आहे. हे गांधींच्या विचारांच्या जागतिक महत्त्वाचे सर्वात मोठे प्रमाण आहे. Mohandas Gandhi National Memorial (२०२३) नुसार, जगातील ७० हून अधिक देशांमध्ये गांधींच्या विचारांवर आधारित शांतता संस्था कार्यरत आहेत. फडके (२००३) यांनी नमूद केले आहे की गांधींच्या अहिंसक लढ्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर उपेक्षित समाजांना आपला न्याय्य हक्क मागण्याचे धाडस दिले .

## निष्कर्ष

महात्मा गांधींचे अहिंसेचे विचार हे कालातीत आहेत. ते केवळ भारतीय स्वातंत्र्यलढ्यापुरते मर्यादित नसून, मानवजातीसाठी एक सार्वत्रिक मार्गदर्शक तत्त्व आहे. आजच्या हिंसाग्रस्त, विभाजित आणि पर्यावरणीय संकटात सापडलेल्या जगात गांधींची अहिंसा हीच खरी मुक्तीची वाट आहे.

अहिंसेचे हे तत्त्व व्यावहारिक आहे, आदर्शवादी नाही. Nagler (२०१४) यांच्या शब्दांत सांगायचे तर, अहिंसा ही कमजोरांची शस्त्र नसून, ती शूरांची शस्त्र आहे. गांधी स्वतः म्हणत होते: "Nonviolence is not a garment to be put on and off at will. Its seat is in the heart, and it must be an inseparable part of our very being".

शाळा, महाविद्यालये, आणि सरकारी धोरणांमध्ये अहिंसेच्या मूल्यांचा समावेश करणे काळाची गरज आहे. गांधींचे विचार हे केवळ इतिहासाचे पान नाहीत. ते भविष्याचा आधार आहेत. जोपर्यंत मानवजातीसमोर हिंसेचे संकट आहे, तोपर्यंत गांधींची अहिंसा हाच एकमेव टिकाऊ उपाय आहे.

## संदर्भ

1. Ackerman, Peter, and Jack Duvall. A Force More Powerful: A Century of Nonviolent Conflict. St. Martin's Press, 2000.
2. Ambedkar, B. R. What Congress and Gandhi Have Done to the Untouchables. Thacker & Co., 1945.
3. Bondurant, Joan V. Conquest of Violence: The Gandhian Philosophy of Conflict. Princeton University Press, 1958.
4. Brown, Judith M. Gandhi: Prisoner of Hope. Yale University Press, 1989.
5. Chenoweth, Erica, and Maria J. Stephan. Why Civil Resistance Works: The Strategic Logic of Nonviolent Conflict. Columbia University Press, 2011.
6. Cortright, David. Peace: A History of Movements and Ideas. Cambridge University Press, 2018.
7. Gandhi, Mohandas K. An Autobiography: The Story of My Experiments with Truth. Translated by Mahadev Desai, Navajivan Publishing House, 1927.
8. Gandhi, Mohandas K. Non-Violent Resistance (Satyagraha). Schocken Books, 1951.
9. Iyer, R. N. The Moral and Political Thought of Mahatma Gandhi. Oxford University Press, 1973.
10. King, Martin Luther, Jr. Stride Toward Freedom: The Montgomery Story. Harper & Row, 1958.
11. Mohandas Gandhi National Memorial Society. "Gandhi's Global Influence: A Survey of Peace Organizations." Gandhi Research Foundation, 2023, www.gandhifoundation.org/research/global-impact.
12. Nagler, Michael N. The Nonviolence Handbook: A Guide for Practical Action. Berrett-Koehler Publishers, 2014.
13. Parekh, Bhikhu. Gandhi: A Very Short Introduction. Oxford University Press, 1997.
14. Sharp, Gene. From Dictatorship to Democracy: A Conceptual Framework for Liberation. 4th ed., Albert Einstein Institution, 2012.
15. कुलकर्णी, सुमती. महात्मा गांधी: जीवन आणि विचार. मनोविकास प्रकाशन, २०१०.
16. देशमुख, रा. ग. गांधींचे राजकीय तत्त्वज्ञान. व्हीनस प्रकाशन, पुणे, १९९५.
17. फडके, य. दि. लोकमान्य ते महात्मा: स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास. श्रीविद्या प्रकाशन, मुंबई, २००३.


ISBN-978-93-49938-45-8

# शिक्षण आणि मानव विकास: भविष्यकालीन दिशा

**गोरे सत्यम शरद**
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, घारगाव, श्रीगोंदा, अहिल्यानगर.
Email: satyamgore2022@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19763146
*DOI: 10.5281/zenodo.19763146*

**प्रस्तावना**

मानव इतिहासाच्या प्रवासात शिक्षण ही केवळ ज्ञानप्रदान करणारी प्रक्रिया नसून समाजपरिवर्तनाची मूलभूत शक्ती राहिली आहे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये विचारशक्ती, नैतिक जाणीव, सामाजिक बांधिलकी आणि सर्जनशीलता विकसित होते. आधुनिक काळात 'मानव विकास' ही संकल्पना केवळ आर्थिक वाढीपुरती मर्यादित न राहता व्यक्तीच्या सर्वांगीण क्षमताविकासाशी संबंधित मानली जाते. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या मानव विकास अहवालांमध्ये शिक्षणाला विकासाचा प्रमुख निर्देशक मानण्यात आले आहे. या संदर्भात शिक्षण आणि मानव विकास यांचे नाते ऐतिहासिक, सामाजिक आणि धोरणात्मक स्तरावर समजून घेणे आवश्यक ठरते.भारतीय शिक्षणपरंपरेचा ऐतिहासिक आढावा घेतला असता प्राचीन काळातील गुरुकुल व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय कीर्ती प्राप्त विद्यापीठांची परंपरा स्पष्टपणे दिसून येते. बिहारमधील नालंदा विद्यापीठ आणि तक्षशिला येथील तक्षशिला विद्यापीठ या विद्यापीठांनी ज्ञाननिर्मितीचा जागतिक संवाद घडवून आणला. तत्त्वज्ञान, गणित, वैद्यकशास्त्र आणि राज्यशास्त्र यांसारख्या विषयांचा अभ्यास येथे होत असे. उपलब्ध ऐतिहासिक ग्रंथ, प्रवासी विद्वानांचे वृत्तांत आणि पुरातत्त्वीय संशोधन यावरून असे स्पष्ट होते की शिक्षण हे जीवनमूल्यांशी निगडित होते. व्यक्तीच्या नैतिक आणि बौद्धिक विकासावर दिलेला भर हा मानव विकासाच्या संकल्पनेचा प्रारंभिक पाया मानता येईल.

मध्ययुगीन काळात शिक्षणाचे स्वरूप काही प्रमाणात बदलले, परंतु ज्ञानपरंपरेचा प्रवाह खंडित झाला नाही. मदरसे आणि इतर शैक्षणिक केंद्रांमधून धार्मिक तसेच साहित्यिक शिक्षण दिले जाई. सांस्कृतिक देवाणघेवाणीतून ज्ञानाची समृद्धी वाढली. विविध ऐतिहासिक अभ्यास आणि तुलनात्मक विश्लेषणावरून असे आढळते की शिक्षण ही सामाजिक रचनेची प्रतिकृती असली तरी ते समाजातील परिवर्तनालाही चालना देत होते.ब्रिटिश कालखंडात शिक्षणव्यवस्थेत आमूलाग्र बदल झाले.१८३५ मध्ये जाहीर झालेल्या मॅक्युले मिनिट्स नंतर इंग्रजी शिक्षणाला प्राधान्य मिळाले आणि आधुनिक विद्यापीठांची स्थापना झाली. कोलकात्यातील  कोलकत्ता विद्यापीठ यांसारख्या संस्थांनी आधुनिक विज्ञान, तर्कशास्त्र आणि उदारमतवादी विचारसरणीचा प्रसार केला. अनेक संशोधनपर ग्रंथ

आणि औपनिवेशिक दस्तऐवजांच्या अभ्यासावरून असे दिसते की या शिक्षणपद्धतीमुळे भारतीय समाजात नव्या मध्यमवर्गाची निर्मिती झाली, ज्याने पुढे स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. तथापि, पारंपरिक ज्ञानप्रणालीचे दुय्यमीकरण ही त्याची मर्यादा होती.स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेत शिक्षणाला समानता आणि सामाजिक न्यायाचे प्रभावी साधन मानण्यात आले. २००९ मध्ये लागू झालेल्या शिक्षणाचा मूलभूत हक्कामुळे प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क ठरला. उच्च शिक्षण क्षेत्रात पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सारख्या संस्थांनी संशोधन, ज्ञाननिर्मिती आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम घडवून आणला. शासकीय अहवाल, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे आणि मानव विकास निर्देशांकाच्या आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास केल्यास शिक्षणातील वाढीमुळे साक्षरतेत सुधारणा, स्त्री-शिक्षणाचा प्रसार आणि आरोग्यविषयक जागरूकता वाढल्याचे दिसून येते.मानव विकासाच्या सैद्धांतिक चर्चेत अमर्त्य सेन यांनी मांडलेल्या 'क्षमता दृष्टिकोन'ला विशेष महत्त्व आहे. त्यांच्या मते विकास म्हणजे व्यक्तीच्या संधी आणि स्वातंत्र्यांचा विस्तार होय. शिक्षणामुळे व्यक्ती केवळ आर्थिक दृष्ट्या सक्षम होत नाही, तर सामाजिक आणि राजकीय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याची क्षमता प्राप्त करते. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या अहवालांमध्ये शिक्षणाचा स्तर आणि जीवनमानातील सुधारणा यांचा थेट संबंध दर्शविण्यात आला आहे. उपलब्ध सांख्यिकीय आकडेवारी आणि तुलनात्मक अभ्यास सूचित करतात की ज्या समाजांत शिक्षणाचा प्रसार व्यापक आहे, तेथे सामाजिक स्थैर्य आणि लोकशाही मूल्यांची पायाभरणी अधिक मजबूत असते.

**भविष्यकालीन दिशांचा विचार करताना काही मूलभूत मुद्दे अधोरेखित होतात**

- शिक्षण अधिक समावेशक आणि न्यायाधिष्ठित असणे आवश्यक आहे. ग्रामीण-शहरी तफावत, लिंगभेद आणि आर्थिक असमानता या समस्या दूर केल्याशिवाय मानव विकास साध्य होणार नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये बहुविषयक शिक्षणावर दिलेला भर ही सकारात्मक बाब आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानव्य विषय यांचा समन्वय साधल्यास शिक्षण अधिक व्यापक आणि परिणामकारक होऊ शकते.
- डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव. कोविड-१९ नंतर ऑनलाइन शिक्षणाची व्याप्ती वाढली आहे. तथापि, डिजिटल दरीमुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतात. विविध संशोधन अहवालांवरून असे स्पष्ट होते की तंत्रज्ञानाचा समतोल आणि सर्वसमावेशक वापर सुनिश्चित करणे ही भविष्यातील शिक्षणव्यवस्थेची प्राथमिक गरज आहे.
- मूल्याधिष्ठित शिक्षणाची आवश्यकता. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आर्थिक स्पर्धा वाढली असली तरी सामाजिक सहिष्णुता, पर्यावरणीय जबाबदारी आणि लोकशाही मूल्ये जपणे


*ISBN-978-93-49938-45-8*

तेवढेच महत्त्वाचे आहे. इतिहास, राज्यशास्त्र आणि तत्त्वज्ञान यांसारख्या मानव्य विषयांमुळे चिकित्सक विचारसरणी आणि सामाजिक बांधिलकी विकसित होते. विविध शैक्षणिक अभ्यास आणि संशोधन लेखांवरून असे आढळते की मानव्य शिक्षण सामाजिक ऐक्य आणि मानवतावादी दृष्टिकोनासाठी अत्यावश्यक आहे.

- संशोधन संस्कृतीचा विस्तार. उच्च शिक्षण संस्थांनी समाजाभिमुख संशोधनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. पर्यावरणीय संकट, सामाजिक विषमता आणि लोकशाहीतील आव्हाने यांवर अभ्यास केल्यास शिक्षणाचा प्रत्यक्ष सामाजिक परिणाम साधता येतो. आंतरराष्ट्रीय अहवालांच्या तुलनात्मक विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की संशोधनाधिष्ठित शिक्षण मानव विकासाला अधिक परिणामकारक दिशा देते.

### भविष्यकालीन दिशा आणि आव्हाने

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या वेगाने बदलणाऱ्या युगात शिक्षण आणि मानव विकास यांच्यातील संबंध अधिकाधिक महत्त्वाचा होत चालला आहे. भविष्यातील समाज हा ज्ञानाधारित (Knowledge-based Society) असणार असल्यामुळे शिक्षण व्यवस्थेमध्ये गुणवत्तेला, नवोपक्रमाला आणि कौशल्याधारित शिक्षणाला विशेष महत्त्व दिले जाणार आहे. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीमध्ये केवळ माहिती देण्याऐवजी समस्या सोडविण्याची क्षमता, संशोधन वृत्ती, सर्जनशीलता आणि सामाजिक जबाबदारी विकसित करणे आवश्यक ठरेल.भविष्यकालीन शिक्षण व्यवस्थेमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. ऑनलाइन शिक्षण, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), आभासी वास्तव (Virtual Reality) आणि मिश्र शिक्षण (Blended Learning) यांसारख्या नव्या पद्धती शिक्षण अधिक सुलभ आणि प्रभावी बनवतील. यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील शिक्षणातील दरी कमी करण्यास मदत होईल. तथापि, डिजिटल साधनांची उपलब्धता आणि डिजिटल साक्षरता वाढविणे ही मोठी गरज असेल.मानव विकासाच्या दृष्टीने शिक्षणाने सामाजिक समता आणि न्याय प्रस्थापित करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे. समाजातील वंचित, दुर्बल आणि आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे हे भविष्यातील धोरणांचे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे. मुलींचे शिक्षण, ग्रामीण शिक्षण, आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजातील शिक्षण या क्षेत्रांमध्ये विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक समावेशन (Social Inclusion) आणि समान संधी (Equal Opportunities) सुनिश्चित केल्यास मानव विकासाची प्रक्रिया अधिक व्यापक आणि प्रभावी होऊ शकते.तसेच, पर्यावरणीय आव्हाने, हवामान बदल, शाश्वत विकास यांसारख्या विषयांबाबत जागरूकता निर्माण करणे हीही शिक्षणाची महत्त्वाची जबाबदारी आहे. शाळा आणि

महाविद्यालयांमध्ये पर्यावरण शिक्षण, शाश्वत जीवनशैली आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली तर भविष्यात जबाबदार नागरिक घडू शकतात. यामुळे केवळ आर्थिक विकास नव्हे तर पर्यावरणीय आणि सामाजिक संतुलन राखणेही शक्य होईल. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 सारख्या धोरणांनी शिक्षण क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. बहुविषयक शिक्षण (Multidisciplinary Education), कौशल्याधारित अभ्यासक्रम, संशोधनाला प्रोत्साहन आणि स्थानिक ज्ञान प्रणालींचा समावेश यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. शिक्षण आणि रोजगार यांच्यातील दरी कमी करण्यासाठी उद्योग-शिक्षण सहकार्य (Industry-Academia Collaboration) वाढविणेही अत्यंत महत्त्वाचे ठरेल.

भविष्यातील शिक्षण व्यवस्थेसमोर अनेक नवीन आव्हाने उभी राहणार आहेत. बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक परिस्थितीमुळे शिक्षण क्षेत्राला सतत नव्या धोरणांची आणि पद्धतींची गरज भासणार आहे. विशेषतः तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढणाऱ्या वापरामुळे शिक्षण पद्धतीत मोठे परिवर्तन होत आहे. त्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांनीही नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेणे आवश्यक ठरणार आहे. डिजिटल शिक्षणाच्या वाढत्या वापरामुळे शिक्षण अधिक सुलभ झाले असले तरी सर्व विद्यार्थ्यांना समान पातळीवर या सुविधा उपलब्ध करून देणे हे एक मोठे आव्हान आहे.तसेच, भविष्यातील समाजात ज्ञानाबरोबरच कौशल्ये आणि नवोपक्रमाची क्षमता अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, विचारक्षमतेला आणि समस्या सोडविण्याच्या क्षमतेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. बदलत्या रोजगाराच्या संधी आणि औद्योगिक गरजा लक्षात घेऊन शिक्षण प्रणाली अधिक लवचिक आणि कौशल्याधारित करणे गरजेचे ठरेल. याशिवाय, सामाजिक समता, पर्यावरणीय जबाबदारी आणि नैतिक मूल्ये यांचा समतोल राखत शिक्षणाचा विकास करणे ही देखील एक मोठी जबाबदारी असेल. अशा प्रकारे शिक्षण क्षेत्राने भविष्यकालीन आव्हानांना सामोरे जाताना नव्या संधींचा योग्य उपयोग करून मानव विकासाला अधिक व्यापक दिशा देणे आवश्यक आहे.

समग्र विचार करता शिक्षण आणि मानव विकास यांचा संबंध परस्परावलंबी आणि सातत्यपूर्ण आहे. इतिहासातील अनुभव, शासकीय धोरणांचे विश्लेषण, आंतरराष्ट्रीय अहवाल आणि विविध संशोधनग्रंथांच्या अभ्यासावरून असे स्पष्ट होते की शिक्षणाशिवाय शाश्वत मानव विकासाची कल्पना अपूर्ण आहे. भविष्यकालीन दिशांच्या संदर्भात शिक्षण अधिक समताधिष्ठित, तंत्रज्ञानस्नेही आणि मूल्यनिष्ठ असणे आवश्यक आहे.मानव्य विद्याशाखेच्या संदर्भात विचार केल्यास समाजाच्या नैतिक आणि बौद्धिक विकासासाठी तिचे योगदान अपरिहार्य आहे. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून मानव विकास अधिक व्यापक, समावेशक आणि न्यायाधिष्ठित करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे ही


*ISBN-978-93-49938-45-8*

काळाची गरज आहे.

### *संदर्भ*


1. आळतेकर, ए. एस. (२००९). प्राचीन भारतीय शिक्षणपद्धती. मुंबई: पॉप्युलर प्रकाशन.
2. पाटील, बी. व्ही. (२०१५). शिक्षणशास्त्राचे तत्त्वज्ञान. पुणे: नूतन प्रकाशन.
3. कुलकर्णी, सु. रा. (२०१८). भारतीय शिक्षणाचा इतिहास. पुणे: विद्या बुक्स पब्लिशर्स.
4. देशपांडे, शं. ना. (२०१९). शिक्षण आणि समाजपरिवर्तन. कोल्हापूर: फडके प्रकाशन.
5. जाधव, आर. एन. (२०१४). मानव विकास आणि भारत. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.
6. सावंत, ग. प्र. (२०१७). भारतीय राज्यघटना आणि शिक्षण. नागपूर: संजीवनी प्रकाशन.
7. कदम, एम. जी. (२०२१). राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : एक चिकित्सक अभ्यास. पुणे: लोकवाङ्मय गृह.
8. जोशी, वि. ना. (२०२१). मानव्य विद्याशाखा आणि सामाजिक विकास. मुंबई: मौज प्रकाशन.
9. पवार, एस. डी. (२०१९). शिक्षण, लोकशाही आणि विकास. औरंगाबाद: प्रेरणा प्रकाशन.
10. भोसले, के. डी. (२०१२). आधुनिक भारतातील शिक्षणविचार. पुणे: मेहता पब्लिशिंग हाऊस.
11. Sen, A. (1999). Development as Freedom. Oxford: Oxford University Press.
12. Nussbaum, M. C. (2011). Creating Capabilities: The Human Development Approach. Cambridge, MA: Harvard University Press.
13. https://hdr.undp.org (United Nations Development Programme (UNDP). (2024). Human Development Reports.)
14. https://www.unesco.org (UNESCO. (2024). Education for Sustainable Development.)
15. https://www.education.gov.in (Ministry of Education, Government of India. (2020). National Education Policy 2020.

# जागतिक शांततेसाठी बौद्ध धर्माचे योगदान

**श्री. जाधव शंकर कुलदीप**

सहाय्यक प्राध्यापक, रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेज,श्रीरामपूर(स्वायत्त)

Email: shankarjadhav1582@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19763341

*DOI: 10.5281/zenodo.19763341*

## प्रस्तावना

सतत चालू असलेले संघर्ष, अण्वस्त्रांचा धोका, हवामानातील बदल आणि समाजातील वाढते विभाजन या पार्श्वभूमीवर टिकाऊ जागतिक शांततेचा शोध आज पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाचा ठरला आहे. पारंपरिक उपाययोजना प्रामुख्याने राजकीय करार, आर्थिक निर्बंध किंवा लष्करी प्रतिबंध यांवर भर देतात; परंतु या उपाययोजना अनेकदा समस्यांच्या मूळ कारणांऐवजी केवळ त्यांच्या लक्षणांवर उपाय करतात. बौद्ध धर्म मानवाच्या चेतनेत परिवर्तन घडवून आणण्यावर आधारित असा एक वेगळा दृष्टिकोन मांडतो. इ.स.पूर्व पाचव्या शतकाच्या सुमारास प्राचीन भारतात उदयास आलेल्या सिद्धार्थ गौतम (बुद्ध) यांच्या शिकवणीत दुःखाचे मूळ लोभ, द्वेष आणि अज्ञान यांत असल्याचे सांगितले आहे, हीच ती शक्ती आहेत ज्या हिंसा आणि युद्धाला कारणीभूत ठरतात. नैतिक आचरण, ध्यान आणि प्रज्ञा यांच्या साहाय्याने या मानसिक विषांचा नाश केला तर व्यक्ती आणि समाज खऱ्या अर्थाने सौहार्द प्राप्त करू शकतात, असे बौद्ध धर्म मांडतो.

बौद्ध धर्माला "शांततेचा धर्म" म्हणून ओळख मिळण्याचे कारण निष्क्रिय अलिप्तता नसून सक्रिय अहिंसा आणि करुणेवर आधारित सहभाग आहे. इतिहासातील पुरावे दर्शवितात की बौद्ध धर्माचा राज्यकारभारावरही प्रभाव पडला होता. विशेषतः मौर्य साम्राज्याचे सम्राट अशोक यांनी बौद्ध तत्त्वांचा स्वीकार केल्यानंतर युद्धाचा त्याग केला आणि शांततेचा मार्ग स्वीकारला. आधुनिक काळात चौदावे दलाई लामा आणि व्हिएतनाममधील भिक्षू थिच नात हान यांसारख्या नेत्यांनी मानवी हक्क, पर्यावरणीय न्याय आणि अंतरधर्मीय सामंजस्य यांसारख्या प्रश्नांवर कार्य करत प्राचीन बौद्ध विचारांना जागतिक स्तरावर पोहोचवले.

शांतता अभ्यासाच्या क्षेत्रातील विद्वान आज बौद्ध धर्मातील विचारांना अधिक महत्त्व देऊ लागले आहेत, कारण ते वैयक्तिक, परस्पर, संरचनात्मक आणि सांस्कृतिक अशा विविध स्तरांवरील शांततेला एकत्रितपणे समजून घेण्यास मदत करतात. केवळ युद्धाचा अभाव म्हणजे शांतता अशी स्थिर व्याख्या न मानता बौद्ध धर्म न्याय, समता आणि सर्व प्राणिमात्रांचे कल्याण यांचा समावेश असलेली सकारात्मक शांततेची संकल्पना मांडतो, जी परस्परावलंबी संबंधांद्वारे साध्य होते. या संशोधन


*ISBN-978-93-49938-45-8*

निबंधात ऐतिहासिक नोंदी, तात्त्विक ग्रंथ आणि समकालीन उदाहरणांचा अभ्यास करून बौद्ध धर्माची आजच्या काळातील उपयुक्तता स्पष्ट केली आहे. टिकाऊ जागतिक शांततेची सुरुवात अंतर्मनातील शांततेपासून होते आणि अस्तित्वाच्या परस्परसंबंधित स्वरूपाची जाणीव करून घेतल्याने ती विकसित होते, हे बौद्ध धर्माचे वैशिष्ट्यपूर्ण योगदान असल्याचा या अभ्यासाचा मुख्य निष्कर्ष आहे.

## ऐतिहासिक योगदान

बौद्ध धर्माची शांततेला प्रोत्साहन देणारी परंपरा स्वतः बुद्धांपासूनच सुरु होते. क्षत्रिय कुटुंबात जन्मलेल्या सिद्धार्थ गौतम यांनी ज्ञानप्राप्तीच्या शोधात असताना मानवी दुःख अनुभवले आणि त्यानंतर हिंसेचा त्याग केला. सारनाथ येथे दिलेल्या त्यांच्या पहिल्या उपदेशात त्यांनी मध्यम मार्ग मांडला. भोगवाद आणि कठोर तपश्चर्या या दोन्ही टोकांपासून दूर राहण्याचा मार्ग. हा विचार संघर्ष निवारणालाही लागू होतो, कारण तो आक्रमकता आणि निष्क्रिय शरणागती या दोन्ही टोकांचा त्याग करण्याचा संदेश देतो. धम्मपदासारख्या प्रारंभीच्या बौद्ध ग्रंथांमध्ये अहिंसेवर वारंवार भर दिला आहे: "द्वेषाने द्वेष कधीही शांत होत नाही, द्वेष प्रेमानेच शांत होतो." भिक्षुसंघाच्या समुदायांनी लोकशाही पद्धतीने सभा घेऊन मतैक्याच्या आधारे वाद सोडविण्याची परंपरा निर्माण केली, ज्यातून शांततामय सहअस्तित्वाचा आदर्श दिसून येतो.

इतिहासातील सर्वात महत्त्वपूर्ण उदाहरण मौर्य साम्राज्याचे सम्राट अशोक यांच्या काळात दिसून येते (इ.स.पूर्व २६८–२३२). कलिंगाच्या युद्धात झालेल्या प्रचंड विनाशानंतर आणि मानवी दुःख पाहून अशोकांनी बौद्ध धर्म स्वीकारला. त्यांनी आपल्या विशाल साम्राज्यात दगडांवर आणि स्तंभांवर कोरलेल्या शिलालेखांद्वारे धर्मनिष्ठ आचरण, सर्व धर्मांप्रती सहिष्णुता, प्रजाजन आणि प्राण्यांच्या कल्याणासाठी उपाययोजना तसेच विजयासाठी युद्धाचा त्याग यांचा संदेश दिला.

नंतरच्या शतकांमध्ये श्रीलंका, थायलंड आणि तिबेट येथे बौद्ध धर्माचा शासनव्यवस्थेवर प्रभाव दिसून येतो, जिथे राजे नैतिक शासनासाठी भिक्षूंचा सल्ला घेत असत. पूर्व आशियात झेन आणि शुद्धभूमी परंपरांनी समुराईंच्या आचारसंहितेत आणि राजकीय धोरणांमध्ये शांततेची नैतिकता समाविष्ट केली. या ऐतिहासिक उदाहरणांमधून असे दिसून येते की बौद्ध धर्माने संपूर्ण समाजाला लष्करी प्रवृत्तीपासून दूर नेऊन करुणा आणि न्यायाच्या दिशेने वळविण्याची क्षमता दाखवली आहे. या परंपरा आजच्या आंतरराष्ट्रीय मानवाधिकारांच्या विचारांशीही सुसंगत वाटतात.

## तात्त्विक पायाभूत तत्त्वे

बौद्ध धर्माच्या केंद्रस्थानी प्रतित्यसमुत्पाद ही संकल्पना आहे. या तत्त्वानुसार सर्व घटना आणि अस्तित्वे परस्परावलंबी कारणसाखळीतून उदयास येतात. कोणतीही गोष्ट स्वतंत्रपणे अस्तित्वात नसते. एका जीवाला झालेली हानी संपूर्ण व्यवस्थेवर परिणाम घडवते. हा दृष्टिकोन स्वतंत्र "स्व" या

भ्रमाला नाकारतो आणि सामूहिक कल्याणासाठी सहानुभूती व जबाबदारी वाढवतो. शांतता अभ्यासाच्या विद्वानांच्या मते हा विचार आधुनिक व्यवस्थात्मक सिद्धांतांशी आणि संरचनात्मक तसेच सांस्कृतिक हिंसेच्या संकल्पनांशी साम्य दर्शवतो. चार आर्यसत्ये संघर्ष समजून घेण्यासाठी निदानात्मक आणि उपचारात्मक चौकट देतात. पहिले आर्यसत्य सांगते की दुःख सर्वत्र आहे. दुसरे आर्यसत्य दुःखाचे मूळ तृष्णा, द्वेष आणि अज्ञान यात असल्याचे स्पष्ट करते. हीच हिंसेची मानसिक कारणे आहेत. तिसरे आर्यसत्य दुःखाचा अंत शक्य असल्याचे सांगते, तर चौथे आर्यसत्य अष्टांगिक मार्ग सुचवतेः सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका, सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी. नैतिक आचरणाच्या या तत्त्वांचे रूपांतर गृहस्थांसाठी पंचशीलामध्ये झाले आहे. प्राणहिंसा टाळणे, चोरी न करणे, दुराचार टाळणे, असत्य भाषण टाळणे आणि मादक द्रव्यांपासून दूर राहणे. ही तत्त्वे सामाजिक अन्याय कमी करून आर्थिक न्याय आणि पर्यावरणीय संतुलनाला प्रोत्साहन देतात.

बौद्ध धर्म हिंसेचे मानसशास्त्रीय विश्लेषणही करतो. बाह्य हिंसेचे मूळ अंतर्गत दोषांमध्ये असते. अंतर्दृष्टी ध्यानाच्या माध्यमातून अज्ञान दूर केले तर साधक समत्वभाव आणि प्रतिक्रियारहित सजगता विकसित करतो. अंतर्मनातील ही निःशस्त्रीकरणाची प्रक्रिया बाह्य शांततेचा पाया घालते. मध्यम मार्ग मितव्ययी आणि संतुलित जीवनपद्धतीचा पुरस्कार करतो, ज्यामुळे संसाधनांच्या टंचाईसारख्या आधुनिक संघर्षांच्या कारणांवरही उपाय सुचतो. या सर्व शिकवणी एकत्रितपणे वैयक्तिक नैतिकतेपासून जागतिक परस्परसंबंधापर्यंत शांततेचे सर्वसमावेशक तत्त्वज्ञान निर्माण करतात.

## महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्वे आणि आधुनिक चळवळी

विसाव्या आणि एकविसाव्या शतकात "सक्रिय बौद्ध धर्म" या संकल्पनेद्वारे बौद्ध धर्माने शांततेच्या कार्याला नवे बळ दिले. ही संज्ञा थिच नात हान यांनी लोकप्रिय केली. व्हिएतनाम युद्धाच्या काळात त्यांनी आणि त्यांच्या सहकारी भिक्षूंनी कोणत्याही पक्षाला पाठिंबा न देता युद्धग्रस्त लोकांना मदत, हिंसेविरुद्ध आंदोलन आणि कार्यकर्त्यांसाठी सजगता प्रशिक्षण यांसारखी कामे केली. १९६६ मध्ये निर्वासित झाल्यानंतर त्यांनी फ्रान्समध्ये "प्लम व्हिलेज" केंद्र स्थापन केले आणि शंभरहून अधिक ग्रंथ लिहून "प्रत्येक पावलात शांतता" हा संदेश दिला. त्यांच्या विचारांचा प्रभाव मार्टिन ल्यूथर किंग यांच्यावरही पडला आणि त्यांनी त्यांना शांततेसाठीच्या सर्वोच्च जागतिक पुरस्कारासाठी नामनिर्देशित केले. आज शाळा, कारागृहे आणि विविध संस्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सजगता कार्यक्रमांवरही त्यांच्या विचारांचा प्रभाव आहे. चौदावे दलाई लामा जागतिक पातळीवर अहिंसक प्रतिकाराचे उदाहरण मानले जातात. १९५९ मध्ये तिबेटवर चीनने नियंत्रण मिळवल्यानंतर त्यांनी सशस्त्र संघर्षाऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारला आणि तिबेटसाठी चीनच्या चौकटीत खऱ्या स्वायत्ततेचा "मध्यम मार्ग" प्रस्तावित केला. १९८९ मध्ये त्यांना शांततेसाठीचा सर्वोच्च जागतिक


*ISBN-978-93-49938-45-8*

सन्मान प्रदान करण्यात आला. त्यांनी सार्वत्रिक करुणा, धर्मनिरपेक्ष नैतिकता आणि तिबेटला अहिंसेचे क्षेत्र बनवण्याचा विचार मांडला.

थायलंडमधील सामाजिक कार्यकर्ते सुलक सिवारक्षा यांनी सक्रिय बौद्ध धर्माचे आंतरराष्ट्रीय जाळे निर्माण करून दारिद्र्य, पर्यावरणीय विनाश आणि हुकूमशाहीविरुद्ध लोकआधारित विकासाला प्रोत्साहन दिले. श्रीलंकेत सर्वोदया श्रमदान चळवळीने बौद्ध मूल्यांवर आधारित ग्रामविकास, आपत्ती निवारण आणि शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य केले. तैवानमधील त्झू ची संस्था आणि जपानमधील सोका गक्काई आंतरराष्ट्रीय संस्था मानवतावादी मदत, शिक्षण आणि अण्वस्त्र निःशस्त्रीकरणाच्या मोहिमांद्वारे करुणेचा प्रसार करतात. या चळवळींमधून बौद्ध धर्माच्या विविध परंपरांमध्ये असलेली लवचिकता आणि व्यापकता स्पष्ट होते.

## व्यावहारिक उपयोग आणि उदाहरणे

आज बौद्ध साधना आणि तत्त्वे अनेक शांतता प्रस्थापित करण्याच्या उपक्रमांमध्ये वापरली जात आहेत. अंतर्दृष्टी ध्यानावर आधारित तणाव कमी करणाऱ्या पद्धतींमुळे युद्धातील सैनिक, निर्वासित आणि आघातग्रस्त लोकांना भावनांवर नियंत्रण ठेवण्यास आणि हिंसेच्या चक्रातून बाहेर पडण्यास मदत होते. मैत्री ध्यानाच्या कार्यक्रमांमुळे संघर्षानंतरच्या समाजांमध्ये परस्पर समज आणि सामंजस्य वाढते. दारिद्र्य, हवामान बदल आणि शांतता यांतील परस्परसंबंध लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय पातळीवरही परस्परावलंबनाच्या विचारांना महत्त्व दिले जाऊ लागले आहे. कंबोडियामध्ये भिक्षूंनी संघर्ष निवारणाचे प्रशिक्षण घेऊन गावांतील वाद मिटवले आणि भूतकाळातील हिंसेनंतर सामंजस्य निर्माण करण्यास मदत केली. म्यानमारमध्ये करुणेच्या तत्त्वांवर आधारित संस्थांनी विविध समुदायांमध्ये शांततेसाठी प्रयत्न केले. जागतिक पातळीवर दलाई लामा आणि इतर नेत्यांच्या संवाद उपक्रमांनी उच्चस्तरीय राजनैतिक चर्चांनाही दिशा दिली. जगभर उभारलेली शांतता स्तूपे आणि ध्यान केंद्रे संवादासाठी तटस्थ जागा म्हणून कार्य करतात. या उदाहरणांमधून बौद्ध धर्माच्या शिकवणींचे प्रत्यक्ष परिणाम दिसून येतात.

## आव्हाने आणि टीका

बौद्ध धर्माच्या सामर्थ्यांबरोबर काही आव्हानेही आहेत. काही समीक्षकांच्या मते अंतर्मनातील शांततेवर अधिक भर दिल्यामुळे सामाजिक अन्यायाविरुद्ध निष्क्रियता वाढू शकते, परंतु सक्रिय बौद्ध धर्म ही टीका खोडून काढतो. तसेच या तत्त्वांची अंमलबजावणी दीर्घकालीन बांधिलकी मागते, आणि अल्पकालीन सजगता कार्यक्रम कधी कधी सामाजिक बदलाच्या व्यापक प्रश्नांकडे दुर्लक्ष करतात. तरीही बौद्ध धर्माचे लवचिक आणि अविचल नसलेले स्वरूप त्यात सतत सुधारणा आणि नव्या दिशांचा शोध घेण्याची क्षमता निर्माण करते.

## निष्कर्ष

जागतिक शांततेसाठी बौद्ध धर्माचे योगदान कालातीत आणि समकालीन दोन्ही स्वरूपाचे आहे. सम्राट अशोकांच्या शिलालेखांपासून ते आजच्या सजगतेवर आधारित राजनैतिक प्रयत्नांपर्यंत बौद्ध धर्माच्या शिकवणी शांततेकडे नेणारा सर्वसमावेशक मार्ग दर्शवतात. शांतता हा बौद्ध धर्माचा आग्रह पारंपरिक राजकीय उपाययोजनांना पूरक ठरतो आणि अनेकदा त्यापेक्षा अधिक परिणामकारक मार्ग सुचवतो. जागतिक स्तरावर वाढत चाललेल्या विविध आव्हानांच्या पार्श्वभूमीवर प्रज्ञा आणि मैत्रीभाव यांवर आधारित सकारात्मक शांततेची बौद्ध धर्मातील संकल्पना आशा आणि व्यावहारिक मार्गदर्शन प्रदान करते. बुद्धांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. खरी सुरक्षितता वर्चस्वातून नव्हे, तर सामायिक मानवता आणि जागृत अंतःकरणातून निर्माण होते. जागतिक शांतता साध्य करण्यासाठी सामूहिक अंतर्मनपरिवर्तन आवश्यक आहे, सजगतेच्या प्रत्येक पावलातून पुढे जाणारे.

## *संदर्भ*


1. Dalai Lama. (1989). Nobel Peace Prize acceptance speech. The Nobel Foundation.
2. Daskon, C. (2019). Buddhist approaches to local peacebuilding and development. Peace Review, 31(1), 1–10.
3. Harvey, P. (2013). An introduction to Buddhism: Teachings, history and practices (2nd ed.). Cambridge University Press.
4. Jnawali, D. (2007). Buddhism and global peace: Perspectives on cultural geography. The Third Pole: Journal of Geography Education, 5–7, 28–36.
5. King, S. B. (2009). Socially engaged Buddhism. University of Hawaii Press.
6. Mun, C. (Ed.). (2006). Buddhism and peace: Theory and practice. Blue Pine Books.
7. Queen, C. S. (Ed.). (2013). A companion to Buddhist philosophy. Wiley-Blackwell.
8. आंबेडकर,भि. रा. (१९५७). बुद्ध आणि त्यांचा धम्म. मुंबई: सिद्धार्थ प्रकाशन.
9. दलाई लामा. (२०१२). नीतीमूल्यांची नवी दिशा. पुणे: मेहता पब्लिशिंग हाऊस.
10. धम्मानंद, भिक्षू. (२०१५). बौद्ध धर्म आणि मानवी मूल्ये. पुणे: सुगावा प्रकाशन.
11. धम्मपद. (२०१०). धम्मपद (मराठी अनुवाद). पुणे: धम्मदीप प्रकाशन.
12. नात हान, थिच. (२०१८). शांततेचा मार्ग: सजग जीवनाची साधना. पुणे: मेहता पब्लिशिंग हाऊस.
13. राहुल सांकृत्यायन. (२०११). बौद्ध धर्माची रुपरेषा. नवी दिल्ली: लोकभारती प्रकाशन.



*ISBN-978-93-49938-45-8*

# कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य

**प्रा. डॉ. मनिषा माणिकराव जगदाळे**
रयत शिक्षण संस्थेचे, दादा पाटील महाविद्यालय कर्जत जिल्हा-अहिल्यानगर
Email: jagdalem83@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19763592
*DOI: 10.5281/zenodo.19763592*

**सारांश**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात शैक्षणिक दृष्ट्या जे काम केले आहे. त्याला तोड नाही कर्मवीरांनी अनेक सिद्धांत निर्माण केले. त्यांनी आपल्या संस्थेत जात धर्म गोत पंथ आदी मानवनिर्मित भेदांना थारा दिला नाही. मानवता हाच धर्म मानला व गोरगरीब, अपेक्षित समाजाची निष्काम सेवा हीच परमेश्वराची पूजा मानवी तसेच शिक्षण क्षेत्रात श्रमाला कष्टाला प्रतिष्ठा मिळवून दिली.

## प्रस्तावना

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या क्रांती कारक कार्याचा व समाज उद्धारक राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याचा वारसा घेऊन कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रात रयत शिक्षण संस्था स्थापन करून मोठे कार्य केले. भाऊरावांच्या शैक्षणिक कार्य अगोदर महाराष्ट्राच्या शिक्षण संस्था होत्या त्या संस्था विशेष करून आपल्या जाती-जमातींचा विचार करूनच चालविल्या जात होत्या. त्याशिवाय मोठ्या शहरातच चालू होत्या. शिक्षण हेच परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. शिक्षणाशिवाय प्रगती अशक्य आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, संत गाडगे महाराज यांच्या वाटेवर चालत शिक्षण प्रसार व समाज प्रबोधन यासाठी कर्मवीरांनी हयात वेचली अन्न, वस्त्र, निवारा, ही मूलभूत गरज आहे व सर्वांना शिक्षणाची संधी लाभली पाहिजे या ध्येयाने प्रेरित होऊन जात धर्म पंथ इत्यादी सामाजिक भेद नष्ट करून समता, बंधुता व मानवता यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून मोठे कार्य केले.

## उद्दिष्टे

- कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.
- निधर्मी तत्वावर आधारित वस्तीगृहे याची माहिती करून घेणे.
- शिक्षणाबरोबर कमवा आणि शिका या अभिनव योजनेद्वारे श्रमाची प्रतिष्ठा जाणून घेणे.

जन्म व बालपण-कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ अण्णा यांचे पूर्ण नाव भाऊराव पायगोंडा पाटील असे होते. यांचे मूळ गाव वारणा नदीकाठचे सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील ऐतवडे बुद्रुक हे होते. भाऊरावांचा जन्म 22 सप्टेंबर 1887 रोजी कुंभोज या त्यांच्या मामाच्या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण तेथेच झाले. बालपणी आई-वडिलांचे चांगले संस्कार त्यांच्यावर झाले. राजाराम हायस्कूलमध्ये भाऊरावांचे नववी पर्यंतचे शिक्षण झाले. कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्यात व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होण्याच्या दृष्टिकोनातून पौगंडावस्थेचा कालखंड महत्त्वाचा असतो. या वयातच भाऊराव कुंभोज मध्ये असताना त्यांना सत्याप्पा भोसले या क्रांतिकारक व्यक्तीचा सहवास लाभला. दीनदुबळ्यांना आणि असाह्य बाया बापड्यांना छळणाऱ्या, अत्याचार करणाऱ्या जमीनदार आणि सावकारांचा ते कर्दनकाळ होते. तसेच सत्याप्पा भोसले दिन दुबळयांचा कैवारी या नात्याने ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंडखोरी करत होते. त्या क्रांतिकारकाच्या सहवासात असंख्य कथा त्यांच्याच तोंडून बहुरावांना ऐकावयास मिळाल्या होत्या. या सर्व रोमांचकारक गोष्टी बाल भाऊ रावांना फार आवडत. आपणही मोठेपणी असेच करावे अशी सुप्त इच्छा त्यांच्या मनात बीज धरु लागली. आणि त्यांच्या पुढील कार्यासाठी प्रेरणा ठरली.

## रयत शिक्षण संस्थेची स्थापना

कर्मवीर भाऊराव यांना समाजासाठी काहीतरी चांगले कार्य करावे असे, सतत वाटत होते. हे जर करायचे असेल तर शिक्षण प्रसारानेच करता येईल असे वाटल्याने 1910 च्या सुमारास वाळवा तालुक्यातील दुधगाव येथे विद्यार्थी वस्तीगृह सुरु करून समाजसेवेस प्रारंभ केला. या कार्यात राजर्षी शाहू महाराजांचे सहकार्य व बहुमोल मार्गदर्शन त्यांना मिळाले. 5 सप्टेंबर 1919 रोजी कार्ले ता. कराड जिल्हा सातारा येथे सत्यशोधक समाजाच्या परिषदेमध्ये भाऊरावांनी प्रभावी भाषण केले आणि दोन दलित बहुजन समाजातील लोकांच्या दुःखामुळे मूळ अज्ञान आहे. ते दूर करण्यासाठी बहुजनांच्या सर्व स्तरांमध्ये शिक्षण पोहोचवण्यासाठी शिक्षण संस्था काढली पाहिजे हा विचार मांडला. तो मंजूर करून घेऊन 4 ऑक्टोबर 1919 रोजी विजयादशमीच्या मुहूर्तावर रयत शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. वस्तीगृहातून निधर्मी व राष्ट्रीय एकात्मतावादी शिकवण-कर्मवीर भाऊरावांनी आपल्या कार्याची सुरुवात वस्तीगृहयुक्त शिक्षकाने केली. कर्मवीरांचे मार्गदर्शक असलेले राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापुरात वस्तीगृहांचा प्रयोग केला होता. सर्व जाती धर्मांची मुले एकाच वस्तीगृहात एकत्र राहिला तयार नसल्यामुळे शाहू महाराजांनी प्रत्येक जातीसाठी वेगवेगळी वसतिगृहे सुरु करून त्यांच्या शिक्षणाची सोय केली होती. परंतु कर्मवीर भाऊरावांचे वैशिष्ट्य हे की, त्यांनी सर्व जाती धर्माच्या मुलांसाठी एक असे वस्तीगृहाची सुरुवात 1924 ला सातारा येथे केली एक हरिजन विद्यार्थी घेऊन या वस्तीगृहाची सुरुवात केली. जात, गोत, धर्म, पंथ , भेद रहित वस्तीगृहाचा आधुनिक भारतातील प्रथमच प्रयोग होता. भाऊरावांनी चालविलेल्या वस्तीगृहास महात्मा गांधींनी 1927 ला


ISBN-978-93-49938-45-8

भेट दिली त्यावेळी वस्तीगृहास त्यांच्या हस्ते श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस असे नाव देण्यात आले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी व अस्पृश्यता निवारणासाठी जे बहुमोल कार्य केले होते त्याची आठवण म्हणून वस्तीगृहाचे नामकरण राजर्षी शाहू महाराज असे केले. सर्व जाती-धर्माची मुले या वस्तीगृहात एका कुटुंबातील भावंडांप्रमाणे, गुण्यागोविंदाने एकत्र राहतात, एकत्र स्वयंपाक करतात, एकत्र जेवण करतात, एकत्र बसून अभ्यास करतात, हे पाहून महात्माजींना फार आनंद झाला तेव्हा ते म्हणाले बहुराओ साबरमती आश्रमात जे मला शक्य झाले नाही ते या ठिकाणी तुम्ही यशस्वी करून दाखविले आहे तुमच्या कार्यास माझे आशीर्वाद आहेत. असे गौरव उद्गार महात्मा गांधींनी त्यावेळी काढले होते.

## कमवा आणि शिका योजनेचा मंत्र व स्वावलंबी शिक्षण योजना

कर्मवीर आपल्या कार्याचा प्रचार खेडोपाडी जाऊन करीत गोरगरीब हुशार मुले निवडून ती वस्तीगृहात आणि जीवन शिक्षणाची एक अद्भुत प्रयोगशाळाच भाऊरावांनी सुरु केली. कमवा आणि शिका हे तिथं सूत्र होते. श्रम योजना हा मंत्र होता. (हॅन्ड विथ लॅंड) हा कर्मवीरांचा संदेश होता. 1927 साली कर्मवीरांनी सातारचे छत्रपती शाहू महाराज यांच्याकडून त्यांच्या मालकीची सातारा येथील धनीणीचीबाग वस्तीगृहासाठी म्हणून 1927 साली वार्षिक खंडाने घेतली. वस्तीगृहातील सर्व कामे शेती, स्वयंपाक, भांडी घासणे, साफसफाई स्वच्छता, विद्यार्थीच करीत असे असूनही हे विद्यार्थी आपल्या शैक्षणिक प्रगती वरच्या दर्जाची गुणवत्ता दाखवीत. शिक्षणाचा आणि कामाचा संबंध जोडून भाऊरावांनी शिक्षणाला जीवनभिमुख केले.

## निष्कर्ष

कर्मवीरांची थोरवी ही त्यांनी शेकडो शाळा व महाविद्यालये, वस्तीगृह काढली आहे असे न म्हणता त्यांनी महाराष्ट्रात बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी एक फार मोठी शैक्षणिक क्रांती केली आहे. त्यासाठी कर्मवीरांच्या शिक्षण संस्था या सामाजिक क्रांतीच्या प्रयोगशाळा बनल्या हे मौलिक सत्य आहे. शिक्षणाच्या प्रसाराशिवाय बहुजन समाजाची खऱ्या अर्थाने प्रगती होणार नाही ही जाणीव अनेक समाजसुधारकांना झाली होती. परंतु सर्व समाजासाठी अगदी तळागाळापर्यंत व महाराष्ट्रभर शिक्षण प्रसार करण्याचे कार्य होणे गरजेचे होते व ते आव्हान भाऊरावांनी स्वीकारले होते. भाऊरावांवर महात्मा फुले व छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. समाजातील मागासलेपण, जातीयता, आर्थिक मागासलेपण, धार्मिक अंधश्रद्धा व जीवनाची अधोगती यावरील उपाय आहे ते म्हणजे शिक्षण होय हे ओळखले होते. कर्मवीरांचा शिक्षण प्रसार हा केवळ साक्षरता प्रसार नव्हता तर तो बहुजन समाजाच्या प्रगतीचा मूलमंत्र व समाज परिवर्तनाचा मार्ग होता शिक्षण घ्या शहाणे व्हा ही त्यातील सूत्र होते. जे आर्थिक दृष्ट्या दुर्बल होते त्यांना कर्मवीरांनी

काम करा, घाम गाळा व शिक्षण घ्या हा नवा मार्ग दाखविला त्यांच्या कमवा आणि शिका या योजनेतून हजारो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले व मोठमोठ्या पदांपर्यंत पोहोचले. कर्मवीरांच्या शैक्षणिक चळवळीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी जातीयता निर्मूलन व सामाजिक समता या कार्याची जोड आपल्या शिक्षण प्रसार आला दिली होती. ते फक्त बोलून किंवा सांगून राहिले नाहीत. प्रत्यक्ष कृती हेच त्यांच्या कार्याचे सूत्र होते. अशा थोर सुपुत्राला भारत सरकारने 26 जानेवारी 1959 रोजी पविभूषण हा किताब देऊन त्यांचा गौरव केला. यातूनच त्यांच्या शैक्षणिक कार्याची समाज परिवर्तनातील ओळख दिसून येते.

## *संदर्भ*

1. जाधव रमेश, कर्मवीर भाऊराव पाटील गंधर्ववेद प्रकाशन, संपादक टिकेकर अरुण, धनागरे द.ना, परांजपे पण.ना,२०१०.
2. नाईकवाडे अशोक, आधारवड, कर्मवीर भाऊराव पाटील गौरवग्रंथ, विद्याभारती प्रकाशन तिसरी आवृत्ती, २०१२.
3. पाटील पी.जी. रयतपुत्र.
4. फडके य.दी. विसाव्या शतकातील महाराष्ट्राचा राजकीय इतिहास, विद्या प्रकाशन, पुणे १९८९.
5. दैनिक संचार, २०१६/९/२२


***ISBN-978-93-49938-45-8***

# भारतीय इतिहास लेखनावर प्रसार माध्यमांचा प्रभाव – एक चिकित्सक, अभ्यास

**प्रा. डॉ. किशोर नागनाथ जोगदंड**
वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर
Email: kishorjogdand@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19763635
*DOI: 10.5281/zenodo.19763635*

**प्रस्तावना**

इतिहास लेखन हे केवळ भूतकाळाचे वर्णन नसून ते वर्तमानातील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक शक्तींनी प्रभावित होणारी प्रक्रिया आहे. अर्थात  इतिहास हा केवळ भूतकाळातील घटनांचा साधा वृत्तान्त नसून तो त्या घटनांचे विश्लेषण, त्यामागील कारणमीमांसा व त्या घटनांचा समाजावर झालेला परिणाम यांचा अभ्यास असतो. त्यामुळे इतिहास लेखन ही एक सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे. प्रत्येक काळातील सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीनुसार इतिहासाच्या मांडणीची पद्धत बदलत जाते. या प्रक्रियेत प्रसार माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. प्रसार माध्यमे समाजातील माहितीचे प्रसारण करतात. व लोकांच्या ऐतिहासिक जाणिवा घडवण्यास मोठ्या प्रमाणात प्रभाव टाकतात. वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट सारख्ये प्रसार माध्यमे व आधुनिक काळातील डिजिटल माध्यमे इतिहासाच्या आकलनावर मोठा प्रभाव टाकतात. या माध्यमांमुळे ऐतिहासिक घटनांची निवड, मांडणी व अर्थ लावण्याची प्रक्रिया बदलते. त्यामुळे इतिहास लेखनात वस्तुनिष्ठता, राजकीय प्रभाव तथा सांस्कृतिक पूर्वग्रह यांचे चिकित्सक विश्लेषण करणे आवश्यक ठरते. या विचारातून असे स्पष्ट होते की, इतिहास लेखनावर वर्तमान काळातील घटकांचा प्रभाव पडतो. आजच्या काळात प्रसार माध्यमे ही त्या घटकांपैकी एक प्रभावी साधन ठरली आहेत. सामाजिक माध्यमे यांमुळे इतिहासातील घटना लोकांपर्यंत पोहोचतात. त्या घटनांविषयीची लोकांची समज तयार होते. काही वेळा माध्यमे इतिहासातील घटनांचे सुलभीकरण करतात, तर काही वेळा त्या घटनांना विशिष्ट दृष्टिकोनातून सादर करतात.

इतिहास म्हणजे भूतकाळातील घटनांचा वैज्ञानिक व तर्कशुद्ध अभ्यास. इतिहास लेखनाची प्रक्रिया स्रोतांचा अभ्यास, त्यांचे विश्लेषण व तर्काधिष्ठित मांडणी यावर आधारित असते. ई.एच. कार म्हणतात,' इतिहास म्हणजे इतिहासकार आणि त्याच्या तथ्यांमधील सतत चालणारा संवाद असून तो वर्तमान आणि भूतकाळ यांमधील अखंड संवाद आहे'.[१] यावरून असे दिसते की इतिहास लेखन पूर्णपणे निष्पक्ष असतेच असे नाही तर समाजातील विचारप्रवाहांवर अवलंबून असते. प्रसार माध्यमे म्हणजे माहिती, विचार आणि सांस्कृतिक संदेश समाजापर्यंत पोहोचवणारी साधने. मार्शल मॉकलुहन

यांनी “Medium is the Message” ही संकल्पना मांडून माध्यमांच्या प्रभावाचे महत्त्व स्पष्ट केले आहे.[२] त्याचप्रमाणे लेओपोल्ड वोन रांके यांनी इतिहास लेखनाचा उद्देश सांगताना म्हटले आहे “इतिहासकाराचे काम म्हणजे भूतकाळ प्रत्यक्षात कसा घडला हे दाखवणे.”[३] परंतु आधुनिक काळात प्रसार माध्यमांमधून सादर होणाऱ्या माहितीमुळे इतिहासाचे विश्लेषण आणि मांडणी यावर विविध विचारधारा व राजकीय प्रभाव पडताना दिसतो.

‘इतिहासाचे अर्थ लावणे अनेकदा वर्तमानातील चिंतांवर व परिस्थितींवर अवलंबून असते’. असे इतिहासकार रोमिला थापर म्हणतात. या पार्श्वभूमीवर प्रसार माध्यमे इतिहासाच्या अर्थ लावण्यावर व त्याच्या लोकप्रियतेवर मोठ्या प्रमाणात परिणाम करतात. चित्रपट, मालिकांमधून सादर होणारा इतिहास, वृत्तपत्रांमधील ऐतिहासिक लेख, तसेच सोशल मीडियावर प्रसारित होणारी माहिती यांमुळे लोकांच्या ऐतिहासिक जाणिवांमध्ये बदल घडून येतात. काही वेळा माध्यमांमुळे इतिहासातील विस्मृतीत गेलेल्या घटना व व्यक्तिमत्त्वे प्रकाशात येतात. मात्र दुसरीकडे काही प्रसंगी चुकीची किंवा अपूर्ण माहितीही प्रसारित होण्याची शक्यता असते. इतिहासाच्या महत्त्वाबद्दल लिहिताना मार्क ब्लोच यांच्या मते, इतिहासकाराने सत्याचा शोध घेण्याची आवश्यकता अधोरेखित केली आहे. त्यामुळे प्रसार माध्यमांमधून सादर होणाऱ्या इतिहासाचे चिकित्सक विश्लेषण करणे आवश्यक ठरते. त्यामुळे भारतीय इतिहास लेखनावर प्रसार माध्यमांचा प्रभाव हा अभ्यासाचा महत्त्वाचा विषय ठरतो. प्रसार माध्यमे इतिहासाच्या लोकप्रियतेस हातभार लावतात, परंतु त्याचबरोबर इतिहासाच्या मांडणीमध्ये पक्षपातीपणा किंवा विकृती निर्माण होण्याची शक्यता देखील असते. म्हणूनच या संशोधनात भारतीय इतिहास लेखनावर प्रसार माध्यमांचा झालेला प्रभाव, त्याचे सकारात्मक आणि नकारात्मक पैलू, तसेच इतिहासाच्या वैज्ञानिकतेवर त्याचा झालेला परिणाम यांचा चिकित्सक अभ्यास केला आहे.

भारतीय इतिहास लेखनावर अर्थात राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासावर प्रसार माध्यमांचा प्रभाव जाणवतो. विशेषतः स्वातंत्र्यपूर्व काळात वृत्तपत्रांनी राष्ट्रवादी विचारांचा प्रसार केला. अर्थात इतिहासकार एरिक हॉब्सबाम यांच्या मते आधुनिक राष्ट्रवादाने इतिहासाच्या मांडणीवर मोठा प्रभाव टाकला आहे.[४] बाळ गंगाधर टिळक यांचे केसरी व महात्मा गांधी यांचे यंग इंडिया व हरिजन सारख्या अनेक माध्यमांमुळे स्वातंत्र्य चळवळीचे इतिहास लेखन राष्ट्रवादी दृष्टिकोनातून घडले. इतिहासकार बिपीन चंद्रा यांच्या मते राष्ट्रवादी पत्रकारितेने भारतीय इतिहासाला स्वातंत्र्य संघर्षाच्या दृष्टिकोनातून नवी दिशा दिली.[५] बिपन चंद्रा यांच्या मते राष्ट्रीय चळवळीची वर्तमानपत्रे केवळ प्रचाराचे साधन नव्हती तर महत्त्वाची ऐतिहासिक स्रोत देखील होती.”[६] चित्रपट व दूरदर्शन मालिका इतिहासाच्या लोकप्रिय मांडणीस कारणीभूत ठरल्या. परंतु अनेकदा मनोरंजनासाठी इतिहासात बदल केले जातात. त्यामुळे जनसामान्यांच्या मनात चुकीचे ऐतिहासिक आकलन निर्माण होण्याची शक्यता असते.


*ISBN-978-93-49938-45-8*

चित्रपट व मालिकांनी लोकांच्या ऐतिहासिक समजुतीवर मोठा प्रभाव टाकला आहे. या माध्यमांमुळे इतिहास लोकप्रिय झाला, मात्र अनेकदा नाट्यमयता व काल्पनिकता वाढवली जाते. इतिहासकार रोमिला थापर  यांनी सांगितले आहे की लोकप्रिय माध्यमांतील इतिहास अनेकदा राजकीय आणि सांस्कृतिक हेतूंनी बदलला जातो.[७] आधुनिक काळात सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्म इतिहासाच्या प्रसारात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. यु टूब, फेसबुक या माध्यमांमुळे इतिहास अधिक लोकांपर्यंत पोहोचतो, तसेच चुकीची माहिती पसरवण्याचा धोका देखील वाढतो. राजकीय प्रचारासाठी इतिहासाचा वापर, ऐतिहासिक तथ्यांचे विकृतीकरण, सांप्रदायिक किंवा राष्ट्रवादी पूर्वग्रह सारख्ये नकारात्मक प्रभाव जाणवत असला तरी इतिहास जनसामान्यांपर्यंत पोहोचतो, ऐतिहासिक विषयांमध्ये लोकांची रुची वाढते, विविध दृष्टिकोन उपलब्ध होतात. असे सकारात्मक प्रभावही आढळतात. इतिहासकाराचे कर्तव्य म्हणजे या माहितीची चिकित्सक तपासणी करून सत्य शोधणे.

## निष्कर्ष

भारतीय इतिहास लेखनावर प्रसार माध्यमांचा प्रभाव अत्यंत महत्त्वाचा आहे. माध्यमांमुळे इतिहासाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला असला तरी त्याचवेळी राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक शक्तींनी इतिहासाच्या मांडणीवर प्रभाव टाकला आहे. भारतीय इतिहास लेखनावर प्रसार माध्यमांचा प्रभाव अत्यंत व्यापक आहे. प्रसार माध्यमांनी इतिहास जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे. परंतु त्याच वेळी इतिहासाचे विकृतीकरण होण्याची शक्यता देखील वाढली आहे. त्यामुळे इतिहासकाराने प्रसार माध्यमांतील माहितीचे चिकित्सक परीक्षण करूनच त्याचा उपयोग करणे आवश्यक आहे. त्यामुळे इतिहासकारांनी स्रोतांची चिकित्सक तपासणी करून वस्तुनिष्ठ इतिहास लेखन करणे अत्यावश्यक आहे.

## *संदर्भ*

1. E.H. Carr, “What Is History?”, Penguin Books, London, 1961, पृ. क्र. ३०.
2. Ranke Leopold von, The Theory and Practice of History, Routledge, London, 2011, पृ. क्र.  ५७.
3. Marshall McLuhan, “Understanding Media: The Extensions of Man”, Hill McGraw, New York 1964, पृ. क्र.
4. Hobsbawm Eric, “Nations and Nationalism since 1780”, Cambridge University Press, 1990, पृ. क्र. १०.
5. Chandra Bipan, “India’s Struggle for Independence”, Penguin Books, New Delhi, 1988, पृ. क्र. ४५. कित्ता, पृ. क्र. ९२.
6. Thapar Romila, “Early India: From the Origins to AD 1300”, Penguin Books, New Delhi, 2002, पृ. क्र. १२.

# मराठेकालीन मोडी लिपीतील आर्थिक इतिहासाच्या अभ्यास पद्धती

**प्रा. अक्षय तानाजी काकडे**
इतिहास विभाग, सी के गोयल महाविद्यालय दापोडी, पुणे
Email: akshaykakade10@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19763827
*DOI: 10.5281/zenodo.19763827*

## प्रस्तावना

मराठा साम्राज्याच्या इतिहासाच्या अभ्यासात आर्थिक इतिहासाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. राज्याची प्रशासनव्यवस्था, महसूल पद्धती, व्यापार-उद्योग, चलनप्रणाली, तसेच विविध कारखाने आणि सरकारी खर्च यांचा अभ्यास केल्याशिवाय मराठेकालीन राज्यरचनेचे स्वरुप पूर्णपणे समजत नाही. या आर्थिक घडामोडींची माहिती प्रामुख्याने मोडी लिपीतील कागदपत्रांमध्ये उपलब्ध आहे. मराठा आर्थिक व्यवस्थेची पायाभरणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात झाली. त्यांनी उभारलेले हिंदवी स्वराज्य हे केवळ राजकीय स्वातंत्र्याचे स्वप्न नव्हते, तर सुव्यवस्थित प्रशासन आणि न्याय्य आर्थिक व्यवस्थेवर आधारलेले राज्य होते. शिवाजी महाराजांनी महसूल वसुलीची शिस्तबद्ध पद्धत निर्माण केली, शेतक-यांचे संरक्षण केले आणि महसूल व्यवस्थेत पारदर्शकता आणली. हा विस्तार करताना अर्थव्यवस्थेतील महसूल आणि खंडणी या दोन प्रमुख घटकांची भूमिका निर्णायक ठरली. मराठेकालीन  मराठ्यांच्या आर्थिक प्रशासनात 'जमा-खर्च' पद्धतीद्वारे शासनाच्या उत्पन्न-खर्चाच्या नोंदी ठेवल्या जात असत. यामुळे आर्थिक शिस्त, करप्रणालीची सातत्यपूर्णता आणि शासनाच्या दीर्घकालीन टिकावाचा विचार दिसून येतो. प्रस्तुत लेखातून  मराठ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करताना मुलकी परिस्थितीचा देखील विचार अपरिहार्य ठरतो, कारण मुलकी व लष्करी अशा दोन्ही घटकांवरच मराठेकाळातील  मराठा राज्याची घडी बसलेली दिसून येते. त्यामुळे 'मराठेकालीन आर्थिक व्यवस्था' ही केवळ युद्धप्रधान नसून, ती  प्रशासन, महसूल, राजनैतिक व्यवहार यांचा एकत्रित आविष्कार म्हणून समजून घेणे आवश्यक ठरते.

## मराठेकालीन  आर्थिक दफ्तरांचा आढावा

मराठेकालीन आर्थिक व्यवस्था समजावून घेताना मराठेकालीन दफ्तरखाने तपासावे लागतात. हे दफ्तरखाने सरकारी व खासगी स्वरुपाचे आहेत. सरकारी दफ्तरखान्यात पुणे पुराभिलेखागर, कोल्हापूर, मुंबई   आणि या दफ्तरांमध्ये रुमाल स्वरुपात कागदपत्रे उपलब्ध आहेत. अंदाजे एका रुमालात सरासरी ६०० ते १२०० पर्यंत कागदपत्रे किंवा कागदपत्रांची पाने असलेले दिसतात.

मराठेकालीन  काळातील आर्थिक रचनेचा अभ्यास करताना, पेशव्यांच्या दफ्तरातील कागदपत्रे आणि त्यातील दफ्तरे ही अतिशय महत्त्वाची साधने ठरतात. या दफ्तरांमधील कागदपत्रे, महसूल नोंदी, खर्चवही, जमाबंदी  असे प्रकार आहेत. या आर्थिक दस्तऐवजांच्या  विश्लेषणातून मराठा साम्राज्याचा राजकीय, आर्थिक इतिहास  समजून घेता येतो.

## पुणे पुराभिलेखागार

पुण्यातील पेशवे दफ्तर  हे जुन्या सरकार दरबारी नोंदींचा एक महत्त्वाचा संग्रह आहे, ज्यामध्ये 'ऐतिहासिक' व 'प्रशासकीय' अशा दोन्ही प्रकारच्या कागदपत्रांचा समावेश आहे. माऊंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनी हा दफ्तरखाना व ती माहिती मुख्य दख्खन आयुक्तांकडे जतनार्थ सोपवली. यानंतर ही कागदपत्र सरदारांचे एजंट आणि नंतर इनाम आयोगाकडे हस्तांतरित झाली. आणि Alienation Office स्थापन झाले,  तेव्हा वर्गीकृत व व्यवस्थीत केलेले दफ्तर त्या कार्यालयाकडे सोपवण्यात आले.  सुरुवातीला हे नाना फडणीसांच्या वाड्यात ठेवण्यात आले होते  आणि  1890 साली हे सर्व दस्तावेज आधुनिक दगडी इमारतीत हलवण्यात आले. पेशवे दफ्तरात असलेली कागदपत्रे मराठ्यांच्या कारभारात पंतप्रधान पदी असलेल्या पेशव्यांच्या अखात्यीत असलेले दिसते. यांच्याकडे असलेले कागदपत्रे त्यांच्याकडे असलेला दरख हा पुढे एक शतकापेक्षा जास्त काळ टिकल्याने त्यांच्या दफ्तराकडे एकसलग कागदपत्रे आढळतात. मराठ्यांच्या आर्थिक इतिहासाच्या प्रातिनिधिक अभ्यास करण्यास त्यांच्या दफ्तराचा अभ्यास पुरेसा ठरु शकतो.

## आर्थिक कागदपत्रांचे महत्वाचे विभाग

### प्रांत आजमास

'प्रांत आजमास' हा पेशवे दफ्तरातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि विस्तृत विभाग होता, ज्यातून मराठा प्रशासनाची आर्थिक दूरदृष्टी आणि नियोजनशक्ती अधोरेखित होते. 'प्रांत आजमास' म्हणजे प्रत्येक प्रांत किंवा उपप्रांतासाठी तयार केलेले संभाव्य महसुलाचे 'वार्षिक अंदाजपत्रक' किंवा 'आर्थिक मांडणीपत्र' होय. या दस्तऐवजांमध्ये प्रांतातील उत्पन्नाचे स्रोत जमिनीवरील कर, इनाम महसूल, उद्योगधंदे, बाजारपेठा, इत्यादी यांचे वार्षिक अंदाज व नोंदी नमूद केलेल्या असतात. हे विवरणपत्रे प्रांतानुसार वर्गीकृत केली जात आणि प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्रपणे तयार केली जात, त्यामुळे त्या काळातील महसुली धोरणे, प्रादेशिक आर्थिक स्थिती, तसेच शासकीय नियोजन पद्धती यांचा अभ्यास करता येतो. या विभागातील दस्तऐवजांमधून मराठा राज्यातील प्रशासनाची आर्थिक शिस्त, विकेंद्रित महसुली यंत्रणा यांची माहिती मिळते.

## घडणी

'घडणी' ही पेशवे दफ्तरातील एक वैशिष्ट्यपूर्ण दस्तावेज मालिका असून ती रोजकीर्द व इतर विविध खात्यांमधील तपशीलांची विभागवार व प्रकारवार नोंद ठेवण्यासाठी तयार करण्यात आली होती . या दस्तावेजांची एक महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणजे त्यातील माहितीचे वर्गीकरण हे तत्कालीन ब्रिटीश प्रशासनाच्या दृष्टीने 'आर्थिक दृष्ट्या निरुपयोगी' समजल्या गेलेल्या, परंतु संशोधनाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त अशा बाबींनुसार केले गेले आहे. यामध्ये अनेक प्रकारांतील व्यवहार, खर्च, स्थानिक पातळीवरील घटनांची नोंद, व्यक्तीनिहाय वा विभागनिहाय माहिती अशा स्वरूपात संग्रहित आहे. 'घडणी' दस्ताऐवजांमधून शासकीय लेखनिकांचे कामकाज, कारभारातील सूक्ष्म पैलू आणि समाजजीवनाचे प्रतिबिंबदेखील दिसते.

## रोजकीर्द

'रोजकीर्द' हा पेशवे दफ्तरातील सर्वांत प्राचीन आणि मूलभूत विभाग मानला जातो, ज्याचे उल्लेख शिवकाळात, विशेषतः शाहाजी महाराजांच्या पत्रव्यवहारातही आढळतात. पेशव्यांच्या दैनंदिन व्यवहारांची नोंद ठेवण्यासाठी वापरले जाणारे हे 'रोजकीर्द' मुख्यतः दैनंदिन उत्पन्न व खर्चाचे लेखावही असून, हे सर्व व्यवहार पेशवे किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या आदेशावरून दररोज नोंदवले जात. या नोंदींमुळे तत्कालीन प्रशासनाच्या खर्चाची दिशा, दैनंदिन गरजा, तसेच सामाजिक-राजकीय परिघ स्पष्ट होतो . 'घडणी' हा दस्तऐवज 'रोजकीर्द'चा समांतर आणि पूरक भाग म्हणून कार्य करत होता. इ.स. १७१९ ते १८१७ या जवळपास शतकभराच्या कालखंडातील ही दस्तऐवज मालिका उपलब्ध आहेत.

## मेस्तक

यादवकाळ आणि पेशवेकाळ यांमध्ये तीन ते चार शतकांचे अंतर असूनही "मेस्तक" या लेखनपद्धतीचा सातत्याने वापर झालेला दिसतो, हे भारतीय ज्ञानपरंपरेतील संवहन आणि सातत्याच्या सिद्धांताचे कागदपत्रे  उदाहरण आहे. हेमाडपंतकृत यादवकाळीन मेस्तकाने घातलेली जमाखर्च लेखनाची शिस्त, पुढे पेशवेकाळातही तितक्याच टिकून राहिली. मराठेकालीन  प्रशासनाने महसूल, लष्करी खर्च, वतनव्यवस्था आणि कोषीय व्यवहार यांचे कागदपत्रे "मेस्तक" पद्धतीतच नोंदवले, ज्यातून राज्यकारभारातील लेखनिक परंपरेची अखंडता दिसते . विशेष म्हणजे, पहिल्या माधवराव पेशव्यांच्या काळातील मोडी लिपीतील मेस्तक कागदपत्र आज उपलब्ध असून, ती या परंपरेचा ठोस पुरावा आहेत. या दस्तऐवजांमुळे आपणास समजते की भारतीय प्रशासनाने ज्ञान, तंत्र आणि भाषिक अभिव्यक्ती यांचा वारसा शतकानुशतके झिरपत जपला हेच "मेस्तक" पद्धतीचे खरे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे.


*ISBN-978-93-49938-45-8*

## राज्याचे उत्पन्न व खर्च

मराठेकालीन  आर्थिक व्यवस्था समजून घेताना जमा, खर्च आणि बाकी या तीन सदरांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. या तीन घटकांमधूनच एखाद्या राज्याचे संपूर्ण आर्थिक धोरण स्पष्ट होते. उपलब्ध नोंदींवरून साधारण इ.स. १७७५ च्या सुमारास एका मोडी कागदपत्रात  मेस्तकाची रचना केली गेली.  पेशवे दफ्तरात वर नोंद केलेल्या अनेक कागदपत्रांत मेस्ताकाचे मूर्त अस्तित्वात असल्याचे दिसते . या मेस्तकामध्ये जमा, खर्च आणि बाकी यांची स्वतंत्र व क्रमबद्ध नोंद ठेवलेली आढळते व असंख्य कागदपत्रे आढळतात. त्यामुळे जमा, खर्च व बाकी यांच्या आधारे दिसणारी आर्थिक मांडणी ही मराठेकालीन  राज्याच्या स्थैर्य आणि विस्तारासाठी महत्त्वाची ठरली होती.

## उत्पन्नाचे विभाग

### महालनिहाय

या चालू सालाच्या तपशिलात प्रांतांतील कररुपी आलेला महसूल त्यांच्या नावनिशीनुसार नोंदवला जाई. उदा.  मेस्तक कागदपत्रानुसार पेशव्यांच्या ताब्यात असलेले तत्कालीन महालांचा त्यामध्ये उल्लेख केला आहे. यामध्ये  वरघाट, खानदेश, कर्नाटक, कोंकण, गंगथडी, गुजरात, कर्नाटक, हिंदुस्तान, प्रांतनिहाय फुटगाव इत्यादी प्रांतातून आलेले उत्पन्न यांच्या नोंदी यामध्ये असत.

### खेरीज महालनिहाय

या विभागात कमावीस जमा हे सदर लागते व या कामाविसीतून विविध स्वरुपातील कामाविसी कर घेतल्याच्या नोंदी केल्या जात यामध्ये भेट, नजर, शेरणी, पैदास, हरकी, मसाला, डाक, कर्ज चौथाई, भाऊबीज, गडगणेर, किता कमावीस यांच्या नोंदी असत . तसेच शासनाने आकारलेली जकात, जप्ती व खंडणी अशा विविध मार्गांनी आलेला पैसा 'खेरीज महालानिहाय' या सदरात जातो. यामध्ये असणाऱ्या अत्यंत छोट्या गोष्टींच्या नोंदी देखील यामध्ये दिसतात. यातूनच स्वारी मजकूरचे दोनही भाग मराठ्यांच्या इतिहासाचा पाया मजबूत आर्थिक पायावर उभा असलेला दिसतो.

## राज्याचा खर्च विभाग

राज्याचा एकूण उत्पन्नाच्या बाबी पाहिल्यानंतर आता आपणास खर्चाच्या बाबी पाहणे महत्वाचे ठरेल. मेस्तकानुसार खर्च खाते देखील एकबेरजी आणि दुबेरजी या खात्यांमध्ये विभागले गेले होते असे दिसते. मराठेकालीन  दफ्तरातील खर्च विभागाच्या सदरामध्ये पेशव्यांच्या स्वतःच्या खर्चासह "हुजरात आज्ञा प्रधान सुधा" या अंतर्गत पेशव्यांकडून छत्रपतींकडे करण्यात आलेले खर्च दिसतो. म्हणजे पेशव्यांना वैयक्तिक खर्चासोबत पंतप्रधान म्हणून संपूर्ण राज्यासाठी देखील खर्च करावा लागत असल्याचे दिसते. याचा पुरावा म्हणून १७९१ साली पेशव्यांनी सुमारे ३ लाख ८४ हजार २०४

रुपये ८ आणे ८ पैसे व ४ पै इतका खर्च केलेला दिसतो .

## शाहीरू

'शाहीरू विभाग' हा पेशवे काळातील आर्थिक आणि प्रशासकीय व्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण घटक होता. या विभागात 'बदल मुशाहिरा' म्हणजे दरबारातील अधिकारी, सेवक व कर्मचाऱ्यांना दिले जाणारे पगार समाविष्ट होत, तर 'खेरीज मुशाहिरा' अंतर्गत शासनाने सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यांसाठी केलेल्या खर्चाची नोंद केली जाई.

## समारोप

मराठेकालीन आर्थिक इतिहासाचा अभ्यास करताना मोडी लिपीतील दफ्तरांचा उपयोग अत्यंत महत्त्वाचा ठरतो. पुणे पुराभिलेखागारासारख्या दफ्तरखान्यांमध्ये जतन झालेली कागदपत्रे ही केवळ प्रशासकीय नोंदी नसून मराठा राज्याच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय जीवनाचे प्रत्यक्ष पुरावे आहेत. पेशवे दफ्तरातील प्रांत आजमास, घडणी, रोजकीर्द आणि मेस्तक यांसारख्या विभागांमधून मराठा प्रशासनाची आर्थिक रचना आणि नियोजनशक्ती स्पष्टपणे दिसून येते. 'मेस्तक' पद्धतीमधील जमा, खर्च आणि बाकी या तीन प्रमुख घटकांवर आधारित आर्थिक नोंदी राज्याच्या आर्थिक व्यवस्थेतील शिस्त, पारदर्शकता आणि सातत्य अधोरेखित करतात. यावरून असे दिसून येते की मराठा राज्याची आर्थिक व्यवस्था ही व्यवस्थित लेखापद्धती, स्पष्ट महसुली स्रोत, आणि शिस्तबद्ध खर्च व्यवस्थापन यांवर आधारित होती. मोडी लिपीतील या कागदपत्रांच्या अभ्यासातून मराठा साम्राज्याचा आर्थिक पाया सुदृढ व संघटित स्वरुपाचा होता हे स्पष्ट होते.

## *संदर्भ*

1. कुलकर्णी, अ. रा. महाराष्ट्राचा इतिहास : मराठ्यांचा कालखंड. पुणे: डायमंड पब्लिकेशन, पृ. ६५–७२.
2. राजवाडे, वि. का. मराठ्यांच्या इतिहासाची साधने. खंड २. प्रस्तावना. पुणे.
3. सरदेसाई, गो. स. (संपा.). Hand Book to the Records in the Alienation Office, Poona. पुणे, 1933, पृ. ८–११.
4. वाकसकर, वि. स. (संपा.). सभासदाची बखर. पुणे: व्हीनस प्रकाशन, 1960, पृ. 99.
5. पनजी बाबा. मोल्सवर्थ शब्दकोश. मुंबई: एज्युकेशन सोसायटी प्रेस, भायखळा, 1863.
6. भारत इतिहास संशोधक मंडळ. वार्षिक इतिवृत्त. शके 1832. पुणे.
7. अभिलेखीय साधने
8. पुणे पुराभिलेखागार. घडणी दफ्तर, रुमाल क्र. 739
9. पुणे पुराभिलेखागार. कित्ते,
10. पथके लष्कर, रुमाल क्र. 231.


*ISBN-978-93-49938-45-8*

# इंदापूर तालुक्याचा ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. बाळासाहेब काळे**
इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे
Email: akshaykakade10@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19763934
*DOI: 10.5281/zenodo.19763934*

**प्रस्तावना**

इंदापूर तालुक्याचा इतिहास हा महाराष्ट्राच्या मध्ययुगीन राजकीय आणि आर्थिक जडणघडणीचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. भीमा आणि निरा नद्यांच्या खोऱ्यात वसलेला हा प्रदेश केवळ भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा नव्हता, तर ऐतिहासिक घटनांचा साक्षीदारही होता. मराठा सत्तेच्या उदयाचा पायाही येथेच रचला गेला.

महाराष्ट्र राज्याच्या इतिहासात विविध प्रदेश, जिल्हे, तालुके, शहरे आणि गावांनी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे. पुणे जिल्ह्यातील सर्वात पूर्वेकडील इंदापूर तालुका हा ऐतिहासिक, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या महत्त्वाचा प्रदेश मानला जातो. भीमा आणि नीरा या नद्यांच्या खोऱ्यात वसलेला हा परिसर प्राचीन काळापासून मानवी वस्तीचा केंद्रबिंदू राहिला आहे. सुपीक जमीन, पाण्याचे स्रोत आणि व्यापारमार्ग यांमुळे या प्रदेशाचा विकास प्राचीन काळापासून झालेला पाहायला मिळतो.

इंदापूरच्या तालुक्याच्या उत्तर व पूर्व दिशेला भीमा नदी तर दक्षिणेकडे नीरा नदी वाहत जात इंदापूरच्या आग्नेयला नृसिंगपूर येथे दोन्ही नद्यांचा संगम होतो. या दोन नद्यांमुळे या प्रदेशात शेतीसाठी आवश्यक पाण्याची सोय उपलब्ध झाली आहे. भौगोलिकदृष्ट्या हा प्रदेश प्रामुख्याने सपाट, माळरान असा आहे. येथील माती काळी व सुपीक असल्यामुळे ऊस, केळी, द्राक्ष, डाळिंब, पेरु, ज्वारी, गहू, मका इत्यादी प्रकारचे उत्पादन घेतले जाते. ऐतिहासिकदृष्ट्या देखील या प्रदेशाचे स्थान महत्त्वाचे राहिले आहे. कारण पुणे, सोलापूर, पंढरपूर, अहमदनगर या भागांना जोडणारे मार्ग या प्रदेशातून जात होते. भौगोलिक स्थितीमुळे व्यापार, शेती आणि लोकसंस्कृतीच्या विकासाला चालना मिळाली. त्यामुळे इंदापूर हा केवळ प्रशासकीय तालुका नसून आर्थिक दृष्ट्या सक्षम तालुका म्हणून विकसित झालेला आहे.

इंदापूर परिसराचा इतिहास प्राचीन काळापर्यंत मागे जातो. इंदापूरात इंद्रेश्वराचे मंदिर असून ते इंदापूरचे ग्रामदैवत आहे. त्यावरून इंद्रपूर वरुण इंदापूर असा अपभ्रंश होऊन इंदापूर असे नाव झालेले आहे. दख्खनच्या पठारावर असलेल्या अनेक प्रदेशांप्रमाणेच या भागावरही सातवाहन राजवटीचा

प्रभाव होता. सातवाहन काळात व्यापारी मार्गांची निर्मिती झाली आणि कृषी अर्थव्यवस्थेचा विकास झाला. यानंतर चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव या राजघराण्यांच्या काळात या प्रदेशाचा सांस्कृतिक व राजकीय विकास झाला. पळसदेव येथील पळसनाथ मंदिर हे १२ व्या शतकात निर्माण झाले असून ते स्थापत्यशैलीच्या दृष्टीने अतिशय उत्कृष्ट नमूना आहे. नृसिंगपूर येथील नृसिंहाचे मदिर, निरवांगी येथील नंदिकेश्वराचे मंदिर, पिटकेश्वर येथील पिटकेश्वराचे मंदिर, सिद्धेश्वर निंबोडी येथील सिद्धेश्वराचे मंदिर इत्यादी मंदिरे 'मंदिर शैलीचा' उत्कृष्ट नमूना आहेत. शिलालेख आणि प्रथा-परंपरा यांमधून या कालखंडाचा प्रभाव दिसून येतो. या काळात धार्मिक आणि सामाजिक जीवन सक्रिय होते. स्थानिक देवालये, उत्सव आणि धार्मिक परंपरा यांमुळे समाजजीवनात एकात्मता निर्माण झाली होती.

मध्ययुगीन कालखंडात इंदापूर परिसर दिल्लीच्या सुलतान राजवटीत व पुढे बहमनी राजवटीच्या अधिपत्याखाली आला. बहमनी साम्राज्याने प्रशासन अधिक कार्यक्षम करण्यासाठी प्रदेशांचे विभाग केले आणि

महसूल संकलनासाठी परगणा ही व्यवस्था विकसित केली. बहमनी सत्तेच्या विघटनानंतर हा प्रदेश कधी विजापूरच्या आदिलशाही तर कधी अहमदनगरच्या निजामशाही राजवटीखाली गेला. यांच्या काळात महसूल वसुली, लष्करी नियंत्रण आणि स्थानिक प्रशासन अधिक संघटित करण्यात आले. या काळात शेती, कारागिरी आणि व्यापार यांचा विकास झाला. बाजारपेठा आणि व्यापारी मार्ग यांमुळे इंदापूरचा संपर्क इतर प्रदेशांशी वाढला.

छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांच्या जहागिरीचा प्रदेश म्हणून इंदापूर परगणा ओळखला जातो. १५ व्या शतकाच्या अखेरीस निजामशाही कडून काळात मालोजीराजेंना इंदापूर जहागीर मिळाली होती. मालोजीराजे यांनी इंदापूर येथे एक तलाव बांधला आहे त्याचे नाव भार्गवराम तलाव आहे. इंदापूरमध्ये मालोजीराजे यांचे वास्तव्य होते. इंदापूरमध्ये मालोजीराजे यांची गढी होती, त्याचे नूतनीकरण करण्याचे काम सध्या चालू आहे. इंदापूर येथे आदिलशाही आणि निजामशाही यांच्यामध्ये युद्ध झाले होते. यामध्ये निजामशाही कडून लढताना मालोजीराजे यांना वीरमरण आले. तेथे त्यांची समाधी आहे. पुढे मालोजीराजे यांचे पुत्र शहाजीराजे भोसले यांच्याकडे पुणे, सुपे, चाकण आणि इंदापूर परगण्याची जहागिरी आली होती. शहाजीराजे कर्नाटकला गेले त्यावेळी पुणे, सुपे, चाकण आणि इंदापूर परगण्याची जबाबदारी शिवाजी महाराजांवर सोपविण्यात आली होती. राजकीय संघर्ष आणि सत्तांतरांमध्ये इंदापूर परगणा हा वारंवार निजामशाही, आदिलशाही आणि मुघल यांच्यातील संघर्षाचा केंद्रबिंदू ठरला. सन १६६० च्या सुमारास मुघल सरदार शाहीस्तेखान पुण्यावर चाल करून आला त्यावेळेस तो इंदापूर मार्गे गेला होता. शाहिस्तेखानाने इंदापूर, बारामती आणि पुणे परिसर ताब्यात घेतला होता. इंदापूरमध्ये काहीकाळ शाहिस्तेखानचे वास्तव्य होते. शाहीस्तेखानाने इंदापूरमध्ये एक विहीर बांधली आहे. सन १६७० मध्ये


*ISBN-978-93-49938-45-8*

सिंहगडच्या विजयानंतर शिवाजी महाराजांनी गनिमी काव्याचा वापर करून अवघ्या १५ दिवसांत इंदापूर, बारामती आणि सुपे हा परिसर मुघलांकडून स्वराज्यात परत आणला.

मराठा प्रशासनात परगण्यांना महत्त्वाचे स्थान होते. इंदापूर परगण्यातील जमीन महसूल व्यवस्था प्रामुख्याने शेतीवर आधारित होती. मलिक अंबरच्या 'धारा' पद्धतीचा प्रभाव या प्रदेशावर होता, ज्यामध्ये पिकाच्या प्रत्यक्ष पाहणीनुसार कर आकारला जाई. परगण्यातील मोठ्या गावाला 'कसबा' म्हटले जाई, जिथे बाजारपेठ (पेठ) असे. इंदापूर हे एक कसबा गाव होते. महसूल व्यवस्थापनासाठी पाटील, कुलकर्णी, देशमुख आणि देशपांडे यांसारख्या स्थानिक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जात असे. अष्टप्रधान मंडळातील मुख्यप्रधान मोरोपंत पिंगळे यांचा वाडा इंदापूर होता. गावपातळीवरील स्वायत्त प्रशासनामुळे स्थानिक समाजव्यवस्था मजबूत झाली. मराठा काळात शेती आणि व्यापाराला चालना मिळाली तसेच धार्मिक आणि सांस्कृतिक परंपराही अधिक बळकट झालेल्या पाहायला मिळतात. याला इंदापूर देखील अपवाद नाही.

पेशव्यांच्या काळात इंदापूर परगण्याचे प्रशासन अधिक संघटित झाले. पुणे हे पेशव्यांचे मुख्यालय असल्यामुळे पुणे जिल्ह्यातील परगण्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. पेशवे काळात इंदापूर हे लष्करी तळ म्हणून उदयाला आले. हैदराबादच्या निजमावर वचक निर्माण करण्यासाठी हे लष्करी ठाणे महत्त्वाचे होते. या काळात महसूल गोळा करण्याच्या पद्धतीत सुधारण्यात करण्यात आली. शेती विकासासाठी सिंचन व्यवस्था, पाण्याचे स्रोत आणि स्थानिक संसाधनांचा उपयोग करण्यात आला. पेशवाई काळात अनेक मंदिरे, घाट, विहिरी आणि बाजारपेठा निर्माण करण्यात आल्या. संत तुकाराम महाराज यांच्या पालखी इंदापूर तालुक्यातील पिटकेश्वर येथून पूर्वी जात होती. त्या मार्गावर पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. तो सोडविण्यासाठी अहिल्याबाई होळकर यांनी एक बारव पिटकेश्वर मध्ये बांधली होती. अजूनही ती बारव (विहीर) चांगल्या अवस्थेत आहे. त्यामुळे या प्रदेशाच्या आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनात मोठी प्रगती झाली.

१८१८ मध्ये पेशवाई संपुष्टात आल्यानंतर ब्रिटिशांनी महाराष्ट्रात सत्ता प्रस्थापित केली होती. मुंबई इलाख्याचा गव्हर्नर म्हणून माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याने अतिशय प्रभावीपणे काम केले होते. त्याच्यावर उदारमतवादी विचारांचा प्रभाव होता. या काळात इंदापूर परगण्याचे प्रशासन ब्रिटिश पद्धतीने पुनर्रचित करण्यात आले. महसूल व्यवस्था, न्यायव्यवस्था आणि शिक्षण प्रणाली यामध्ये अनेक बदल घडवून आणले गेले. १८२९ ते १८३१ दरम्यान ब्रिटिश अधिकारी प्रिंगल याने इंदापूरमध्ये महसूल सुधारणा राबवण्याचा प्रयत्न केला, परंतु तो अयशस्वी ठरला. पुढे १८३६ मध्ये नवीन 'रेव्हेन्यू सर्व्हे' पद्धतीने महसूल निश्चित करण्यात आला. ब्रिटिशांनी शेती सुधारणा, कालवे आणि पाणलोट प्रकल्प यांवर लक्ष दिले. १८७६-७७ मध्ये महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळेस इंग्रज सरकारने दुष्काळ निवारणाचे काम हाती घेतले होते. त्याचाच एक भाग म्हणून भादलवाडी येथे ५४

फुट उंचीचा व पाऊण किलोमीटर लांबीचा एक तलाव बांधला गेला. त्यामुळे दुष्काळग्रस्त नागरिकांच्या हाताला काम मिळाले होते. या तलावामध्ये १८८१ मध्ये पाणी साठविण्यास सुरुवात झाली. त्यामुळे भादलवाडी परिसतील शेती उत्पादनात वाढ झाली. भाटघर धरण बांधल्यानंतर पुढे १९०९-१० च्या सुमारास इंदापूर तालुक्यात शेटफळ हवेली येथे एक तलाव बांधण्यास सुरुवात केली. या तलावाचा आराखडा भारताचे पहिले इंजिनियर एम. विश्वेश्वरय्या यांनी केला होता. त्यामुळे बहुतांश भाग सिंचनाखाली आला. तसेच रस्ते आणि वाहतूक व्यवस्था सुधारल्यामुळे व्यापारालाही चालना मिळाली.

इंदापूर तालुक्याच्या सामाजिक जीवनात विविध प्रथा-परंपरा आणि संस्कृतींचे मिश्रण होते. येथे अनेक धार्मिक सण-उत्सव, यात्रा, जत्रा मोठ्या प्रमाणात साजऱ्या केल्या जात. त्यामध्ये समजातील सर्व घटकांचा समावेश असायचा. त्यामुळे सामाजिक सलोखा टिकून असायचा. मंदिर, मस्जित आणि धार्मिक स्थळे हे स्थानिक समाजजीवनाचे केंद्र राहिले आहेत. लोककला, कीर्तन, भजन आणि लोकनाट्य यांसारख्या परंपरा या प्रदेशात आजही जतन केल्या जातात. शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे सामाजिक परिवर्तनालाही चालना मिळाली. आधुनिक काळातील इंदापूर स्वातंत्र्यानंतर इंदापूर तालुक्याचा विकास विविध क्षेत्रांत झाला. शेती, उद्योग, शिक्षण आणि पायाभूत सुविधा यांमध्ये लक्षणीय प्रगती झाली. नीरा आणि भीमा नदीवरील सिंचन प्रकल्पांमुळे शेतीला मोठा फायदा झाला. भीमा नदीवर उजनी धरण झाल्यामुळे इंदापूर तालुक्याबरोबरच सोलापूर जिल्ह्यात माढा, करमाळा, माळशिरस तालुके व अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुका सुपीक बनला आहे. उजनी धरण झाल्यामुळे इंदापूर तालुक्यात साखर कारखाने, विविध बँका, सहकारी संस्था, शिक्षण यांचा विकास होऊन तालुक्याचा झपाट्याने विकास झालेला पाहायला मिळतो. आज इंदापूर हा पुणे जिल्ह्यातील महत्त्वाचा तालुका असून औद्योगिक, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात प्रगती करत आहे.

इंदापूर तालुक्याचा इतिहास प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत विविध राजसत्तांच्या आणि सामाजिक बदलांच्या प्रभावाखाली विकसित झाला आहे. सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, बहमनी, निजामशाही, आदिलशाही, मराठेशाही आणि ब्रिटिशकाळ या सर्व काळांमध्ये या प्रदेशाने वेगवेगळ्या ऐतिहासिक टप्प्यांचा अनुभव घेतला असून शेती, व्यापार, प्रशासन आणि संस्कृती या सर्व क्षेत्रांत इंदापूर तालुक्याचे महत्त्व अनन्यसाधारण राहिले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासात इंदापूर तालुक्याचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे.

### *संदर्भ*

1. गो. स. सरदेसाई, मराठ्यांचा इतिहास
2. वि. का. राजवाडे, मराठ्यांच्या इतिहासाची साधने


*ISBN-978-93-49938-45-8*

3. ग. ह. खरे, महाराष्ट्राचा इतिहास
4. अ. रा. कुलकर्णी, मराठ्यांचा इतिहास आणि संस्कृती
5. महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, पुणे जिल्हा
6. दत्तात्रय जाधव, महाराष्ट्रातील परगणे आणि त्यांचा इतिहास
7. जाधव, वसंत, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास

# आर्थिक इतिहास आणि मानवी जीवन

**प्रा. राहुल विलास कांबळे**
साईकृपा कला महाविद्यालय, घारगाव, ता. श्रीगोंदा जि.अहमदनगर
Email:
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19764177
*DOI: 10.5281/zenodo.19764177*

## प्रस्तावना

आर्थिक इतिहास ही मुख्य प्रवाहातील अर्थशास्त्राची शाखा नाही किंवा आर्थिक विचारांच्या इतिहासाशी संबंधित बौद्धिक इतिहासाची शाखा नाही. मूलभूत भाषेत, आर्थिक इतिहास (जपानी भाषेत) हा मानवी अस्तित्वाच्या आर्थिक पैलूंचा ऐतिहासिक अभ्यास आहे. या विषयाची विस्तृत बौद्धिक श्रेणी त्याला पूर्णपणे आर्थिक विषयांच्या पलीकडे (जसे की उत्पादन आणि वितरणाचे संघटन, राज्य आणि उद्योगाचे संबंध , व्यापार आणि वाणिज्यचे पैलू) विस्तारण्यास सक्षम करते आणि म्हणून इतर गोष्टींबरोबरच असमानता, राहणीमान , कल्याण, सामाजिक परिवर्तन, विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षण यांचा विचार करते. नवोपक्रम, वाढ आणि विकासाच्या जगात मानवजातीच्या अस्तित्वावर लक्ष केंद्रित करून, आर्थिक इतिहास हा एक असा विषय आहे ज्याच्या मुख्य तत्त्वांमध्ये एक शक्तिशाली मानवी आयाम आहे. फ्रेंचमध्ये histoire économique , जर्मनमध्ये Wirtschaftsgeschichte , चिनीमध्ये jinji shi , जपानीमध्ये kaizái shiआर्थिक इतिहासाच्या उद्दिष्टे आणि पद्धतींशी संबंधित एका मोठ्या विषयावर हा एक छोटासा लेख आहे. विसाव्या शतकाच्या मध्यात आर्थिक इतिहासाचे सामाजिक वैज्ञानिक औपचारिकीकरण हे या चर्चेचे केंद्रबिंदू आहे. यामुळे पारंपारिक आर्थिक इतिहासापासून 'नवीन' आर्थिक इतिहासाकडे या शाखेचे संक्रमण झाले आणि त्यामुळे आर्थिक विज्ञानाच्या पद्धतीमध्ये या शाखेचे मूळ निर्माण झाले. असे केल्याने, ऐतिहासिक पद्धतीत प्रशिक्षित विद्वान आणि आर्थिक सिद्धांतात प्रशिक्षित असलेल्यांमध्ये कायमस्वरूपी 'सर्जनशील तणाव' निर्माण झाला .

## आर्थिक इतिहासाचे भविष्य

आज आर्थिक इतिहास कुठे उभा आहे? हे स्पष्ट आहे की, दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीपासून, आर्थिक इतिहासात इतिहास-प्रशिक्षित/आधारित आर्थिक इतिहासकारांपेक्षा अर्थशास्त्र-प्रशिक्षित/आधारित आर्थिक इतिहासकारांचे वर्चस्व दिसून आले आहे. हे नाकारता येत नाही - आर्थिक इतिहासाचे आधुनिक स्वरुप आर्थिक सिद्धांताच्या वापराद्वारे समर्थित आहे.

आर्थिक इतिहासाची सध्याची स्थिती आणि स्वरुप मानवशास्त्रात खूपच खालच्या दर्जाचे आहे. या मुद्द्याचे थोडक्यात परीक्षण करताना आपण दोन प्रमुख विषय लक्षात घेऊ शकतो. पहिला विषय सुरुवातीच्या हवामानशास्त्रज्ञांच्या (१९६० आणि १९७० च्या दशकात) क्रियाकलापांशी संबंधित आहे ज्यांनी गूढ आर्थिक आणि परिमाणात्मक पद्धतींच्या आंधळ्या धाडीद्वारे स्थापित व्याख्यांचा पुनर्व्याख्या करून इतिहासकारांना त्यांची नवीन पद्धत जास्त विकली. दुसरा विषय १९८० च्या दशकापासून इतिहासाच्या अभ्यासातील महत्त्वाच्या घडामोडींची ओळख आहे, ज्यामध्ये मार्क्सवादी विश्लेषणाशी संबंधित आर्थिक निर्धारवादाचा नकार, विशिष्ट थीम आणि केस स्टडीजवर लक्ष केंद्रित करणाऱ्या उपविभागांमध्ये इतिहासाचे विभाजन आणि परिमाणात्मक विश्लेषणापेक्षा साहित्यिक आणि भाषिक विश्लेषणावर भर देणाऱ्या 'सांस्कृतिक वळणाची' प्रेरणा यांचा समावेश आहे. अशाप्रकारे, आर्थिक इतिहास व्यापार, वाणिज्य, औद्योगिकीकरण आणि वाढीच्या (घाणेरड्या) जगाशी संबंधित असताना, १९८० च्या दशकापासून सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासकारांचे संशोधन अजेंडे वंश, लिंग, ओळख, जाणीव आणि सार्वजनिक स्मृती यासारख्या विषयांवर अधिकाधिक लक्ष केंद्रित करत आहेत. वरील दोन्ही विषय - 'नवीन आर्थिक इतिहास'च्या सुरुवातीच्या अभ्यासकांच्या वृत्तींवर आणि १९८० पासून इतिहासाच्या पद्धतीतील घडामोडींवर कायमस्वरुपी प्रतिक्रिया - इतिहासकारांना आर्थिक इतिहासाच्या अभ्यासाबद्दल द्वेषपूर्ण बनवतात.

आधुनिक (सांस्कृतिक) इतिहासकाराच्या दृष्टिकोनातून, आर्थिक इतिहासाच्या क्षेत्रातील संशोधकांना अनुचित, अरुंद पद्धतशीर चौकट वापरल्याबद्दल सहजपणे नाकारले जाते जे मानवतेला ऐतिहासिक कथेपासून दूर करते ! आर्थिक इतिहास 'नवीन आर्थिक इतिहास'शी संबंधित कठोर पद्धतशीर तत्त्वाच्या पलीकडे गेला आहे (आणि म्हणून भूतकाळातील आर्थिक घटना, संस्था, सामाजिक संरचना आणि सांस्कृतिक बदल यांच्यातील संबंधांवर लक्ष केंद्रित करत आहे) या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून, विषय - खरंच, असा युक्तिवाद केला जाऊ शकतो, आर्थिक मुद्द्यांशी संबंधित काहीही! - अनेक इतिहासकारांच्या दृष्टीने अजूनही खूप कलंकित आहे.

सामाजिक शास्त्रांच्या संदर्भात, आर्थिक इतिहास हा संशोधनाचा एक समृद्ध आणि सक्रिय क्षेत्र आहे आणि हे नाकारता येत नाही की एकविसाव्या शतकातील या शाखेत विविध पद्धतींचा समावेश आहे. संशोधन कार्यक्रमांची भविष्यातील दिशा सांगणे अशक्य असले तरी, हे स्पष्ट आहे की सध्याचे अभ्यासक औपचारिक सिद्धांत (केवळ अर्थशास्त्रच नव्हे तर सामाजिक शास्त्रांमधील शाखांमधून घेतलेले), परिमाणात्मक पद्धती आणि ऐतिहासिक तंत्रे यांच्यात संतुलन साधण्यासाठी जाणीवपूर्वक काम करत आहेत. सध्याच्या संशोधनाची भौगोलिक श्रेणी आता उत्तर अमेरिका आणि पश्चिम युरोपच्या पारंपारिक क्षेत्रांच्या पलीकडे विस्तारते ज्यामध्ये समाविष्ट आहे.

- मध्ययुगीन, प्रारंभिक आधुनिक आणि आधुनिक कालखंडातील आर्थिक विकासाचा इतिहास

- कर्ज, कर आकारणी आणि पत संबंधांचा इतिहास
- भांडवलशाही समाजांमधील आर्थिक संकटांची कारणे आणि परिणाम
- शेती, लोकसंख्याशास्त्रीय बदल, वाहतूक आणि दळणवळण, कामगार बाजारपेठ , शिक्षण आणि शहरीकरण यासह विविध क्षेत्रे आणि प्रक्रियांचे तपशीलवार केस स्टडीज
- आशिया आणि पश्चिम युरोपमधील राहणीमानातील मोठी तफावत (आणि विस्ताराने, संशोधनाचे प्रमुख क्षेत्र म्हणून आशियाई आर्थिक इतिहासाचा उदय
- आर्थिक विकास, राहणीमान आणि जैविक कल यांच्यातील संबंधांचे परिमाणात्मक विश्लेषण ; आणि
- आर्थिक विकासाला पर्यावरणीय-ऱ्हासाशी जोडण्यावरील वादविवाद

या विषयांचा अगदी सरसकट अभ्यास केला तरी हे दिसून येईल की आर्थिक इतिहासाचा आधुनिक केंद्रबिंदू नाही ऐतिहासिक डेटावर अर्थमितीय पद्धतींच्या सोप्या वापराशी संबंधित !

या लेखाच्या प्रस्तावनेत असे नमूद केले आहे की आर्थिक इतिहासात एक शक्तिशाली मानवी आयाम आहे. आर्थिक क्रियाकलाप ही मानवी क्रियाकलाप आहे आणि पॅट्रिक ओ'ब्रायन यांनी अधोरेखित केल्याप्रमाणे, हे मुख्य तत्व आर्थिक इतिहासाला "इतिहासकारांनी जवळजवळ दुर्लक्षित करणे इतके मूलभूत आणि क्रॉस-कंट्री मल्टीपल-रिग्रेशनमध्ये शॉर्टकट असलेल्या अर्थशास्त्रज्ञांवर सोडणे इतके गुंतागुंतीचे बनवते" ( लायन्स एट अल., २००८ : ४४३). पॅट हडसन यांच्या टिप्पण्यांमध्ये असेच विषय प्रतिबिंबित होतात, ज्यांनी असा युक्तिवाद केला आहे की आज आर्थिक इतिहासकारांना "ब्याच समकालीन आर्थिक सिद्धांताच्या अरुंद कार्यक्षेत्रावर टीका करण्याची" तसेच "अर्थव्यवस्था काय आहे हे विसरलेल्या अनेक सांस्कृतिक इतिहासकारांवर हल्ला करण्याची" संधी दिली जाते ( हडसन, २०१० : २४९). म्हणूनच, आर्थिक इतिहासकारांना उपलब्ध असलेल्या मोठ्या संधी सामाजिक विज्ञान आणि मानविकींच्या संस्कृतींमधील शिस्तीच्या स्थितीतून उद्भवतात आणि म्हणूनच आर्थिक जीवनाच्या ऐतिहासिक अभ्यासात त्यांचे योगदान सतत महत्त्व देऊ शकते.

## आर्थिक विचार

आर्थिक प्रश्न हा मानवापुढे आदिकालापासून उभा रहात आलेला आहे.  प्राचीन भारतीय व ग्रीक वाङ्मयात आर्थिक प्रश्नांचा विचार झालेला आढळून येतो. अठराव्या शतकात सुरू झालेली औद्योगिक क्रांती व त्यानंतर गेल्या काही दशकांत प्रगत देशांत स्पष्ट दिसणारी औद्योगिक विकासाची नवी क्रांतिकारक गती यांमुळे आर्थिक प्रश्नांचा

साक्षेपी व उत्तरोत्तर सूक्ष्मतर होत जाणारा विचार होणे स्वाभाविक होते.  म्हणूनच आर्थिक विचाराच्या विकासाचा उगम आपण पंधराव्या शतकाच्या मागे शोधावयाचे कारण नाही तसा शोध करावयाचा,


ISBN-978-93-49938-45-8

तर केवळ ऐतिहासिक कुतूहल म्हणून करावा, परंतु त्या विचारधारेचा नंतरच्या विचारधारेशी संबंध जोडण्याचा खटाटोप करु नये, असा एक मतप्रवाह आहे.

आर्थिक विचारांच्या विकासाकडे भिन्न भिन्न दृष्टिकोनांतून पाहिले जाते . जॉन इन्ग्रॅम, कार्ल मार्क्स, एरिक रोल यांनी आर्थिक घटनांच्या आधारे विवेचन केले. बदलत गेला याचा मागोवा घेतला. रोशर, स्पॅन, इ्वाईग यांनी मतप्रणालीवर आधारित विवेचन केले डूहरिंग, हेनी, शुंपेटर यांनी तात्त्विक दृष्टिकोनांतून अभ्यास केला आणि सॅलिन, झोंबार्ट यांनी पद्धतिशास्त्रातील विकासाचा मागोवा घेतला. तरी विशिष्ट मतप्रणालीच्या आग्रहामुळे झालेले तत्त्वमंथन आणि केवळ वस्तुनिष्ठ भूमिकेतून आलेले तत्त्वमंथन या गंगायमुनांच्या अपरिहार्य संगमात, हे दोन प्रवाह जितके अधिक दूरवर आपल्याला वेगवेगळे पाहता येतील, तितके पाहण्याचा प्रयत्न करणे केवळ कुतूहलजनकच नव्हे, तर उपयुक्तही ठरेल.

### प्राचीन काळ

पाश्चिमात्य जगातील आर्थिक विचाराचा उगम प्राचीन ग्रीसमध्ये आढळून येतो. प्राचीन ग्रीसचा काळ एक विचारवैभवाचा काळ होता. अर्थशास्त्रीय प्रश्नांचे विवेचन त्या काळात नीतिविषयक व राज्यविषयक प्रश्नांशी निगडित होते.

प्लेटो, ॲरिस्टॉटल व झेनोफन यांनी आर्थिक प्रश्नांविषयी विवेचन केले आहे. सामाजिक जीवनाचे एक अविभाज्य अंग म्हणून ते आर्थिक प्रश्नांकडे पाहात होते. कृषकवर्ग, क्षत्रियवर्ग यांवर आधारित अशी ग्रीक समाजरचना होती. या व्यवस्थेशी अनुरुप अशीच विचारधारा त्या काळात प्रसृत होणे स्वाभाविक होते. वैश्यवृत्तीला तुलनेने गौण स्थान होते. गुलामांचा वर्ग हा तर सामान्यपणे विचाराच्या कक्षेबाहेरच रहात असे. ग्रीक संस्कृतीचा इतर दृष्टींनी उत्कर्ष झालेला असला, तरी त्या संस्कृतीचे वैभव गुलामगिरीच्या संस्थेवर उभे होते. एक आवश्यक संस्था या दृष्टीनेच ग्रीक विचारवंत गुलामगिरीच्या संस्थेकडे पाहात असत. त्या संस्थेचे समर्थनही ॲरिस्टॉटलने केले आहे.

### मध्ययुगीन काळ

ग्रीक विचारसरणीची छाया रोमच्या वैभवाच्या कालखंडातही राहिली. रोमन साम्राज्याच्या विघटनानंतर आलेल्या असुरक्षिततेच्या व अस्थिरतेच्या काळात छोटेमोठे सरंजामदार सर्व यूरोपभर निर्माण झाले. या सरंजामशाहीला अनुरुप अशी अर्थव्यवस्था निर्माण होऊ लागली. वस्तूंचे मूल्य मागणी-पुरवठ्याच्या तत्त्वाप्रमाणे ठरविले जाण्याऐवजी समाजातील प्रचलित चालीरीतींच्या अनुरोधाने ठरु लागले.

या काळात यूरोपमध्ये ख्रिश्चन धर्माचा सार्वत्रिक प्रसार झालेला होता. ऐहिक व्यवहारांतही चर्च लक्ष घालू लागले होते. या काळातील बहुतेक विचारवंत धर्मोपदेशकांच्या वर्गातील होते. ॲरिस्टॉटलचा

नीतिशास्त्रावरील ग्रंथ हा त्यांचा विज्ञान व व्यवहार यांच्या बाबतीत प्रमाणग्रंथ होता.

## व्यापारवाद

पंधराव्या शतकापासून जागतिक व्यापाराच्या विकासाला सुरुवात झाली. नवीन प्रदेशांचा शोध लागला होता. अमेरिका, ऑस्ट्रेलिया यांसारखी खंडे इतर जगाला प्रथमच ज्ञात झाली. केप ऑफ गुड होपला वळसा घालून पश्चिम यूरोपकडून सरळ पूर्वेकडील देशांना नेणारा जलमार्ग सापडला. नव्या प्रदेशांतून सोने व चांदी यांचा प्रवाह यूरोपकडे वाहू लागला व त्यावर आधारीत चलनाच्या पुरवठ्यात वाढ झाली. त्या काळच्या पुढारलेल्या सर्व देशांत व्यापारी हालचाली जोरात सुरु झाल्या. या व्यापाराच्या वेगवान विकासाचा परिणाम अर्थव्यवस्थेवर व आर्थिक विचारप्रणालीवर होणे अपरिहार्य होते.

## प्रकृतिवाद

व्यापारवाद आणि प्रकृतिवाद यांच्या संधिकालात झालेल्या दोन अर्थशास्त्रज्ञांचा येथे निर्देश करणे आवश्यक आहे. विचारवंताच्या कार्याचे महत्त्व त्याच्या स्वतःच्या काळात ओळखले जातेच असे नाही हा इतर क्षेत्रात येणारा अनुभव अर्थशास्त्राच्याही संदर्भात वारंवार आलेला आढळून येतो.

## समारोप

आर्थिक इतिहास आणि मानवी जीवन मध्ययुगीन, प्रारंभिक आधुनिक आणि आधुनिक कालखंडातील आर्थिक विकासाचा इतिहास आपणाला अभ्यासता येतो प्रमुख्याने आर्थिक इतिहास एक शक्ती शाली मानवी आयाम आहे असे म्हणता येईल.

## *संदर्भ*

1. उत्तम पठारे, अर्थचिंतन : १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील आर्थिक विचार, सनय प्रकाशन, पुणे,२०१०.
2. भारती नवथर, मराठ्यांचा आर्थिक इतिहास, यश प्रकाशन पुणे,२०१९.
3. अ. रा. कुलकर्णी, भारतीय समाजाचा इतिहास, डायमंड प्रकाशन पुणे,२००५.


*ISBN-978-93-49938-45-8*

# जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर इतिहास लेखनातील बदल: संधी की संकट?

**दिपेश काशिनाथ केकाणे**

एम. ए. (इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इंग्रजी), इतिहास विभागप्रमुख, द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव-रायगड. ४०२१०४.

Email: dipeshkekane08@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19764618

*DOI: 10.5281/zenodo.19764618*

## प्रस्तावना

जागतिकीकरण (Globalization) ही संकल्पना आर्थिक देवाणघेवाण, तांत्रिक प्रगती आणि सांस्कृतिक संवाद यांपुरती मर्यादित नसून ती ज्ञानशास्त्राच्या स्वरुपालाही प्रभावित करते. इतिहास हा समाजाच्या सामूहिक स्मृतीचा शास्त्रीय अभ्यास असल्यामुळे जागतिकीकरणाचा त्यावर परिणाम होणे स्वाभाविक आहे. पूर्वी इतिहास लेखन मुख्यतः राष्ट्रराज्य, राजकीय घटना आणि अभिजन वर्ग यांभोवती केंद्रित होते; परंतु आज इतिहास लेखन अधिक बहुविध, समावेशक आणि आंतरराष्ट्रीय बनले आहे. या बदलामुळे इतिहास विषयाला नवी ऊर्जा मिळाली आहे का, की त्यातून शास्त्रीयतेला धोका निर्माण झाला आहे? या प्रश्नाचे उत्तर शोधणे हे या लेखाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विशेषतः १९९० नंतर जागतिक पातळीवर उदयास आलेल्या जागतिकीकरण प्रक्रियेमुळे राजकारण, अर्थव्यवस्था, संस्कृती आणि ज्ञाननिर्मिती या सर्व क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल झाले. World Trade Organization ची स्थापना (१९९५), माहिती-तंत्रज्ञान क्रांती, इंटरनेटचा प्रसार आणि भांडवलाच्या मुक्त वहनामुळे जग अधिक परस्परावलंबी झाले. या बदलांचा परिणाम इतिहास लेखनावर देखील झाला. त्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे इतिहास लेखनात कोणते बदल घडले, ते संधी आहेत की संकट याचे सखोल विश्लेषण करणे आवश्यक आहे.

## जागतिकीकरण : संकल्पना आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी

जागतिकीकरण म्हणजे आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि बौद्धिक पातळीवर राष्ट्रांच्या सीमांच्या पलीकडे निर्माण झालेली परस्परसंवादाची प्रक्रिया. जागतिकीकरण ही केवळ आर्थिक प्रक्रिया नसून ती सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक आणि तांत्रिक परस्परसंवादाची बहुआयामी प्रक्रिया आहे. १९९५ मध्ये World Trade Organization (WTO) ची स्थापना झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय व्यापार आणि मुक्त बाजारव्यवस्था अधिक बळकट झाली. त्याचप्रमाणे World Bank (WB) आणि

International Monetary Fund (IMF) यांनी विकसनशील देशांमध्ये उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिक बाजाराशी एकात्मता यासाठी धोरणे राबवली.

**पारंपरिक इतिहासलेखनाची चौकट**

आधुनिक इतिहासलेखनाची पायाभरणी प्रामुख्याने युरोपमध्ये झाली. लिओपोल्ड व्हॉन रांके यांनी इतिहास "जसा घडला तसा" (as it actually happened) मांडण्याचा आग्रह धरला. त्यांच्या दृष्टिकोनात स्रोतसमीक्षा आणि दस्तऐवजी पुराव्याला महत्त्व होते. तथापि, हा इतिहास राष्ट्रकेंद्री आणि राजकीय घटनांवर आधारित होता. यानंतर कार्ल मार्क्स यांनी ऐतिहासिक भौतिकवादाची संकल्पना मांडली. वर्गसंघर्ष आणि उत्पादनसंबंध यांवर आधारित इतिहासलेखनाने आर्थिक घटकांचे महत्त्व अधोरेखित केले.

विसाव्या शतकात फर्नांन्ड  ब्रौडेल यांनी 'Longue durée' संकल्पना मांडून दीर्घकालीन सामाजिक व आर्थिक संरचनांचा अभ्यास महत्त्वाचा असल्याचे सांगितले. तर एरिक हॉब्सबाव्म यांनी आधुनिक जगाच्या सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास केला. ही सर्व प्रवाह महत्त्वाची असली तरी त्यांच्यावर युरोकेन्द्रितता आणि वसाहतवादी दृष्टिकोनाचा आरोप केला जातो.

**जागतिकीकरण आणि इतिहास लेखनातील नवे प्रवाह**

- **ग्लोबल हिस्ट्रीचा उदय**

जागतिकीकरणानंतर इतिहास अभ्यासकांनी राष्ट्रराज्याच्या चौकटी पलीकडे जाऊन सीमारेषा ओलांडणाऱ्या घटनांचा अभ्यास सुरु केला. व्यापार, स्थलांतर, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि साम्राज्यवादी विस्तार या विषयांना नव्या दृष्टीने पाहिले गेले. जागतिक इतिहासामुळे आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील समाजांना इतिहासाच्या मुख्य प्रवाहात स्थान मिळाले.

- **उपनिवेशोत्तर इतिहासलेखन**

एडवर्ड सीड यांच्या 'Orientalism' ग्रंथाने पश्चिमी ज्ञानरचनेतील पूर्वग्रह उघड केले. त्यांनी दाखवून दिले की पश्चिमेकडील अभ्यासकांनी पूर्वेकडे एक विशिष्ट, पूर्वग्रहदूषित दृष्टीने पाहिले. भारतात रणजीत गुहा यांच्या नेतृत्वाखाली 'Subaltern Studies' चळवळ सुरु झाली. या प्रवाहाने शेतकरी, कामगार, आदिवासी, स्त्रिया आणि उपेक्षित समूहांच्या इतिहासाला महत्त्व दिले. ही प्रवृत्ती जागतिकीकरणामुळे शक्य झाली, कारण विविध देशांतील अभ्यासकांमध्ये संवाद आणि सहकार्य वाढले.


*ISBN-978-93-49938-45-8*

- **राष्ट्रवादी इतिहासलेखन**

१९व्या शतकात लिओपोल्ड व्हॉन रांके यांनी "इतिहास जसा घडला तसा लिहावा" ही संकल्पना मांडली. राष्ट्रराज्यांच्या निर्मितीच्या काळात इतिहास हा राष्ट्रीय ओळख दृढ करण्याचे साधन बनला. भारतात आर. सी. मुजुमदार आणि जदुनाथ सरकार यांनी राष्ट्रवादी दृष्टीकोनातून इतिहास लिहिला.

- **मार्क्सवादी इतिहासलेखन**

कार्ल मार्क्स यांच्या ऐतिहासिक भौतिकवादावर आधारित इतिहास लेखनाने वर्गसंघर्षावर भर दिला. भारतात डी. डी. कोसंबी आणि रोमिला थापर यांनी सामाजिक-आर्थिक घटकांचा अभ्यास केला.

- **बहुसांस्कृतिक आणि तुलनात्मक दृष्टिकोन**

जागतिकीकरणामुळे इतिहासकारांनी समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानवशास्त्र, पर्यावरणशास्त्र यांचा वापर सुरु केला. जागतिकीकरणामुळे विविध संस्कृतींचा परस्परसंवाद वाढला. इतिहासलेखनात तुलनात्मक अभ्यास महत्त्वाचा ठरला. उदा. औद्योगिक क्रांतीचा जागतिक प्रभाव, वसाहतवादाचा तुलनात्मक अभ्यास, स्थलांतरित समुदायांचा इतिहास इत्यादी.

- **डिजिटल इतिहास**

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे इतिहास संशोधनात मोठा बदल झाला आहे. डिजिटल आर्काइव्ह्स, ऑनलाइन डेटाबेस, ई-जर्नल्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांचा वापर वाढला आहे. संशोधन अधिक जलद आणि सुलभ झाले आहे. तथापि, माहितीच्या अतिरेकामुळे स्रोतांची विश्वसनीयता तपासणे हे मोठे आव्हान बनले आहे.

**जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या संधी**

- **समावेशकता आणि बहुसांस्कृतिकता**

इतिहास लेखनात स्त्रीवादी, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याक समूहांना स्थान मिळाले. इतिहास अधिक लोकशाहीवादी आणि समावेशक बनला आहे.

- **आंतरराष्ट्रीय सहकार्य**

संशोधकांना जागतिक परिषद, आंतरराष्ट्रीय जर्नल्स आणि संयुक्त संशोधन प्रकल्पांमुळे व्यापक मंच उपलब्ध झाला आहे. विविध देशांतील स्रोत आणि दृष्टिकोनांचा तुलनात्मक अभ्यास शक्य झाला आहे.

- **ज्ञानप्रसाराची सुलभता**

Open Access चळवळीमुळे संशोधन सर्वांसाठी उपलब्ध झाले आहे. विद्यार्थी आणि संशोधकांना

दुर्मिळ स्रोत सहज मिळू लागले आहेत.

- **जागतिक दृष्टीकोन**

स्थानिक घटनांचा जागतिक घडामोडींशी संबंध जोडला जातो, उदा. व्यापार, स्थलांतर आणि संस्कृतींची देवाणघेवाण.

- **नवीन स्रोत आणि तंत्रज्ञान**

डिजिटल आर्काइव्व्ज, ऑनलाइन संसाधने आणि माहिती तंत्रज्ञानामुळे जगाच्या पाठीवरील विविध स्रोत उपलब्ध झाले आहेत.

**जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली संकटे**

- **इतिहासाचे राजकीयकरण**

राष्ट्रवादाच्या वाढत्या प्रभावामुळे इतिहासाचा राजकीय वापर वाढला आहे. स्मारकांचे पाडकाम, पाठ्यपुस्तकांतील बदल आणि ऐतिहासिक घटनांचे पुनर्मूल्यांकन यांमुळे वाद निर्माण झाले आहेत.

- **माहितीची विश्वसनीयता**

डिजिटल माध्यमांमुळे चुकीची माहिती आणि बनावट दस्तऐवज सहज पसरतात. इतिहास संशोधकांसाठी स्रोतांची काटेकोर पडताळणी करणे अत्यावश्यक झाले आहे.

- **स्थानिक इतिहासाचे गौणपण**

जागतिक इतिहासाच्या प्रवाहात स्थानिक परंपरा आणि लहान समुदायांचा इतिहास दुर्लक्षित होण्याचा धोका आहे. जागतिकीकरणामुळे सांस्कृतिक एकरूपता वाढण्याची शक्यता आहे.

- **पाश्चात्य वर्चस्व**

इतिहास लेखनात पाश्चात्य दृष्टिकोनाचा प्रभाव वाढून विकसनशील देशांचा दृष्टिकोन दुय्यम ठरण्याची भीती असते.

**व्यावसायिकता आणि विकृतीकरण**

जागतिकीकरणामुळे माहितीच्या अतिरेकात इतिहासाचे चुकीचे अन्वयार्थ किंवा सोयीस्कर लिखाण होण्याची शक्यता असते. जागतिकीकरणामुळे इतिहास लेखनाला नवनवीन दृष्टीकोन मिळत असले, तरी स्थानिक संस्कृतीचे संवर्धन करून समतोल इतिहास लिहिण्याचे आव्हान उभे राहिले आहे.


ISBN-978-93-49938-45-8

## संधी की संकट? – तुलनात्मक विश्लेषण

जागतिकीकरणामुळे भारतीय इतिहास लेखनात संधी आणि संकट दोन्ही दिसून येतात. संधी म्हणून, इतिहास आता राष्ट्रीय चौकटीपुरता मर्यादित राहून जागतिक संदर्भात अभ्यासला जातो, ज्यामुळे बहुआयामी दृष्टिकोन आणि नवीन दृष्टीकोन प्राप्त होतात. दलित, महिला, आदिवासी यांसारख्या उपेक्षित गटांचा इतिहास पुढे आला आहे. डिजिटल साधने आणि आंतरराष्ट्रीय संशोधनामुळे अभ्यास अधिक सुलभ आणि व्यापक झाला आहे. परंतु संकटेही आहेत. पाश्चात्त्य दृष्टिकोनाचा अति प्रभाव आणि राजकीय हस्तक्षेपामुळे इतिहासाचे वस्तुनिष्ठ स्वरूप धोक्यात येऊ शकते. पारंपरिक स्रोत आणि स्थानिक परंपरा दुर्लक्षित होण्याची भीती आहे. इतिहासाचे बाजारीकरण आणि लोकप्रियतेवर अवलंबून लेखनही चिंताजनक आहे. त्यामुळे जागतिक दृष्टीकोन स्वीकारताना स्थानिक भान आणि राष्ट्रीय ओळख जपणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

जागतिकीकरणामुळे भारतीय इतिहास लेखनाची पारंपारिक रूपरेषा बदलली आहे. इतिहास आता केवळ राजकीय घटनांवर केंद्रित नसून सामाजिक चळवळी, आर्थिक बदल, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि सामान्य लोकांच्या अनुभवांवर देखील लक्ष देतो. जागतिक अभिलेख आणि आंतरराष्ट्रीय संशोधन नेटवर्कमुळे इतिहास अधिक तुलनात्मक आणि बहुआयामी झाला आहे. डिजिटल साधनांचा वापर संशोधन प्रक्रियेला गतिमान बनवतो, ज्यामुळे अज्ञात किंवा दुर्लक्षित स्रोतांवर देखील अभ्यास करता येतो.

संधींच्या दृष्टीने, जागतिकीकरणामुळे उपेक्षित गटांचा इतिहास समोर आला, आंतरशाखीय पद्धतींचा अवलंब वाढला आणि भारतीय इतिहासाचे जागतिक संदर्भात पुनर्मूल्यांकन शक्य झाले. संकटे म्हणून, पाश्चात्त्य दृष्टिकोनाचा प्रभाव, राजकीय हस्तक्षेप, स्थानिक ओळखीचे दुर्लक्षण आणि इतिहासाचे संभाव्य बाजारीकरण या गोष्टी गंभीर चिंतेच्या विषय आहेत. यातून स्पष्ट होते की, जागतिकीकरणामुळे इतिहास लेखनाला समृद्ध संधी मिळाल्या आहेत, परंतु स्थानिक भान आणि वस्तुनिष्ठता जपल्याशिवाय हा प्रगत दृष्टिकोन टिकवणे कठीण आहे.

थोडक्यात, जागतिकीकरण हे एकतर्फी प्रक्रिया नाही. त्यातून निर्माण होणाऱ्या संधी आणि संकट यांचा परस्परसंबंध आहे. म्हणूनच, जागतिकीकरण हे इतिहासासाठी संधी आणि संकट या दोन्हींचे मिश्रण आहे.

## भारतीय संदर्भातील परिणाम

जागतिकीकरणामुळे भारतीय इतिहास लेखनाचा आशय आणि पद्धती दोन्ही बदलले आहेत. यामुळे इतिहास अधिक समग्र आणि बहुआयामी झाला आहे. परंतु जागतिक प्रवाहांमध्ये स्थानिक परंपरा आणि राष्ट्रीय ओळख दुर्लक्षित होऊ नये, हीही तितकीच महत्त्वाची बाब आहे. म्हणूनच जागतिक दृष्टीकोनासोबत स्थानिक भान जपणे आवश्यक ठरते. भारतामध्ये १९९१ नंतरच्या उदारीकरणामुळे

जागतिकीकरण वेगाने वाढले. पारंपरिक राजकीय इतिहासाबरोबरच सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक इतिहासालाही महत्त्व प्राप्त झाले आहे. जागतिक संदर्भात भारताचे स्थान, वसाहतवाद, व्यापारजाळे, स्थलांतर आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांचा नव्याने अभ्यास केला जात आहे. डिजिटल साधने आणि आंतरराष्ट्रीय संशोधन सहकार्यामुळे नवीन स्रोत उपलब्ध झाले असून अभ्यास अधिक चिकित्सक व व्यापक झाला आहे.

## निष्कर्ष (Conclusion)

जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर इतिहास लेखनात मोठे परिवर्तन झाले आहे. पारंपरिक राष्ट्रकेंद्रित इतिहासाच्या चौकटी मोडून आता जागतिक, तुलनात्मक आणि बहुसांस्कृतिक दृष्टिकोन उदयास आला आहे. जागतिकीकरणामुळे इतिहास लेखनात व्यापकता, तुलनात्मकता आणि समावेशकता आली आहे. परंतु त्याच वेळी ज्ञानाचे केंद्रीकरण, बाजारपेठेचा प्रभाव आणि सांस्कृतिक असमतोल यांसारखी संकटेही निर्माण झाली आहेत. डिजिटल तंत्रज्ञानामुळे संशोधन सुलभ झाले असले तरी माहितीची विश्वसनीयता आणि सांस्कृतिक वर्चस्व यांसारखी संकटे देखील निर्माण झाली आहेत. म्हणूनच जागतिकीकरण हे इतिहास लेखनासाठी केवळ संधी किंवा केवळ संकट नसून ते एक द्वंद्वात्मक प्रक्रिया आहे. योग्य पद्धतशास्त्र, समीक्षात्मक दृष्टीकोन आणि स्थानिकतेचा आदर राखून इतिहासलेखन केले तर जागतिकीकरण हे ज्ञानवृद्धीचे प्रभावी साधन ठरू शकते. म्हणून जागतिकीकरण ही एक द्वंद्वात्मक प्रक्रिया (Dialectical Process) आहे. योग्य पद्धतशास्त्र, समीक्षात्मक दृष्टी आणि स्थानिकतेचा आदर राखल्यास ते इतिहासलेखनासाठी मोठी संधी ठरू शकते. अर्थात, जागतिकीकरण हे इतिहासासाठी ना पूर्णपणे संधी आहे, ना पूर्णपणे संकट; ते इतिहासकारांच्या दृष्टिकोन आणि पद्धतीवर अवलंबून आहे.

## *संदर्भ*

1. चिटणीस, के. एन. (2005). इतिहासलेखन पद्धती. पुणे: कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
2. कुलकर्णी, अ. रा. (2010). इतिहास: सिद्धांत आणि पद्धती. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.
3. पाटील, एस. बी. (2012). इतिहास संशोधन पद्धती. कोल्हापूर: फडके प्रकाशन.
4. नाडरे, प्र. ज. (2024). इतिहासलेखनपद्धती (Historiography). BOIP प्रकाशन.
5. शिधायें, पि. (2022). जागतिकीकरण (Globalization). मराठी विश्वकोश
6. कोसंबी, डी. डी. (1956). “भारतीय इतिहास अभ्यासाचा परिचय”. पुणे: पॉप्युलर प्रकाशन.
7. उपाध्याय, श. भु. (2016). इतिहासलेखन: भारतीय आणि पाश्चात्य दृष्टिकोन (Historiography in the Modern World: Western and Indian Perspectives). पुणे: Oxford University Press India.


*ISBN-978-93-49938-45-8*

# कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे वृत्तपत्रातील योगदान : एक अभ्यास

**राणी एकनाथ खळेकर**
इतिहास विभाग, न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहमदनगर.
Email: ranikhalekar@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19764788
*DOI: 10.5281/zenodo.19764788*

**सारांश**
कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर' उर्फ काकासाहेब खाडिलकर हे मराठी पत्रकारिता आणि साहित्य क्षेत्रातील एक प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून राष्ट्रीय जाणीवा जागृत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या वृत्तपत्रीय कार्याचा मुख्य उद्देश स्वातंत्र्य, सामाजिक सुधारणा आणि जनजागृती हा होता.खाडिलकरांनी आपल्या पत्रकारितेची सुरुवात 'केसरी' या वृत्तपत्रातून केली. यानंतर त्यांनी 'नवाकाळ' या वृत्तपत्राची स्थापना करुन स्वातंत्र्यलढ्याला बळकटी दिली. 'नवाकाळ' हे राष्ट्रवादी विचारांचे प्रमुख व्यासपीठ ठरले. या माध्यमातून त्यांनी लोकमान्य टिळकांच्या विचारांचा प्रसार केला आणि समाजातील विविध प्रश्नांवर परखड भाष्य केले. एकूणच, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे वृत्तपत्रातील योगदान हे मराठी पत्रकारितेच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण पर्व मानले जाते. त्यांच्या कार्यामुळे पत्रकारिता ही केवळ व्यवसाय न राहता राष्ट्रनिर्मितीचे साधन ठरली.

## वृत्तपत्रीय कार्य : केसरी

सप्टेंबर 1896 या दिवशी कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांची टिळकांशी प्रथमच प्रत्यक्ष भेट विंचूरकरांच्या वाड्यात झाली आणि त्याच दिवशी लोकमान्य यांनी आपल्यापेक्षा सोळा वर्षांनी लहान असलेल्या ऐन चोवीशीतल्या या तरुणावर केसरीच्या उपसंपादक पदाची जबाबदारी सोपवली. उभयतांची प्रत्यक्षही पहिलीच भेट असली, तरी एखाद्या तरुण राष्ट्रीय बाण्याच्या निःस्वार्थी आणि निःस्पृह वृत्तीच्या बुद्धिमान तरुणाची ' केसरी' ला आवश्यकता असल्याचा विचार लोकमान्य यांनी त्यांचे मध्यस्थ स्नेही असलेल्या नारायण बापूजी कानिटकर यांच्याकडे व्यक्त केला होता. त्यामुळे लोकमान्य व खाडिलकर यांच्या भेटीचा योग कानिटकरांनी जुळवून आणला होता. त्यामुळे खाडिलकरांवर एकदम केसरीच्या उपसंपादकाची जबाबदारी पडली असे काही नव्हते.

1 सप्टेंबर 1896 पासून ते 1909 च्या डिसेंबर अखेरपर्यंत खाडिलकर केसरी - मराठा वृत्तपत्र समूहात होते. मध्यंतरी 1902 ते 1905 हा अपवादात्मक काळ होता, कारण या काळात खाडिलकर कौलांच्या

कारखान्याची विद्या शिकवण्यासाठी टिळकांच्या आदेशावरुन नेपाळमध्ये गेले होते. 1897 फेब्रुवारी ते एप्रिल या काळात पुण्यात प्लेगची साथ जोरात असल्याने त्यांचा मुक्काम सांगलीस होता. या अवधीत त्यांनी 'कांचनगडची मोहना' हे नाटक लिहिले. मे महिन्यामध्ये टिळकांनी तातडीने बोलवल्यामुळे ते पुण्यात आले. या काळात श्री. न. ची. केळकर मराठा चे कामकाज पाहत होते. कर्लाईलच्या ' हिरो अँण्ड हिरोवर्शिप' या पुस्तकातील विचारांना अनुसरुन 'विभूतिपूजा' शीर्षकाचा लेख खाडिलकरांनी लिहिला.

त्या वर्षीच्या 'शिवजयंती' उत्सवाविषयीच्या 'केसरी' तील लेखनावर राजद्रोहात्मक लेख म्हणून सरकारने शिक्का मारुन टिळकांवर खटला भरला होता, त्यात खाडिलकरांच्या या लेखाची आणि स्फूट सूचना सदराखाली केलेल्या लेखनाची भर पडली. त्यातच 22 जून 1897 रोजी रॅड या अधिकाऱ्याचा खून झाला होता. टिळकांना तुरुंगाची शिक्षा झाली, तेव्हा 'केसरी'चे संपादक पद अधिकृतपणे केळकर यांच्या नावावर असले, तरी प्रत्यक्ष सर्व कामे खाडिलकर पाहत होते. विशेषता: या काळातले अग्रलेख पाहिले की, टिळकांच्या संपादकीय व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. म्हणून वाचकांनाही टिळकांची उणीव भासत नसे. इ. स.1899 मध्ये टिळक तुरुंगातून सुटले आणि 'पुनश्च हरि ॐ' या शीर्षकाचा सुप्रसिद्ध लेख त्यांनी लिहिला. परंतु खाडिलकर नव्हते म्हणून केसरीचे संपादक हे केळकर झाले.

टिळकांनी काकासाहेबांना इ. स. 1900 मध्ये पुढील शिक्षण घेण्यासाठी मुंबईला पाठवले ते इ. स. 1902 पर्यंत मुंबईत होते, त्यामुळे त्यांना केसरीत काम करता आले नाही. 'केसरी' जर बंद पडले तर उदरनिर्वाहाची सोय असावी असेही त्यांचे धोरण होते. काही कालखंडानंतर इ. स. 1918 मार्चमध्ये अधिकृतपणे काकासाहेब उर्फ कृष्णाजी यांना केसरीचे संपादक करण्यात आले. इ. स. 1920 जून पर्यंत ते केसरीत होते. त्या काळातही आधीच काकासाहेबांना प्रतिकूल असलेल्या घटकांनी उपद्रवक्षमता सुरु ठेवलीच होती, परिणामतः टिळकांच्या निधनानंतर केसरीच्या ट्रस्टी मधून खाडिलकरांना वगळले गेले. त्यानंतर त्यांनी नवीन वृत्तपत्राची सुरुवात केली.

## वृत्तपत्रीय कार्य : लोकमान्य आणि नवाकाळ

खाडिलकर केसरीतून बाहेर पडले. ही संधी समजून काही टिळक पक्षीय यांनी 'लोकमान्य पब्लिशिंग कंपनी' ही संस्था मुंबईला चालू केली आणि आता खाडिलकर मोकळे झालेच आहेत तर 'लोकमान्य' या नवीन वृत्तपत्राची जबाबदारी त्यांच्यावर सोपवावी असे ठरले. त्यानुसार काकासाहेबांना विचारले असता त्यांनीही होकार दिला आणि वृत्तपत्रसृष्टीत 'पुनश्च हरि ॐ' करीत 9 मार्च 1921 ला 'लोकमान्य' चा पहिला अंक 'कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर' यांच्या संपादकत्वाखाली प्रकाशित झाला. पगार जरी प्रत्यक्षात 500 ठरला असला तरी ते प्रत्यक्षात 300 रुपये घेत, काम सुरु झाले. दिवसेंदिवस लोकमान्य वृत्तपत्राचा खप मोठ्या संख्येने वाढत होता, तो 20,000 पर्यंत पोहोचला होता.


*ISBN-978-93-49938-45-8*

लोकमान्यचा खप हा त्या काळातला उच्चांक होता. मात्र 'लोकमान्य' मध्येही फार काळ राहण्याचा योग नव्हता असे पुढे सिद्ध झाले. लोकमान्यांच्या निधनानंतर महाराष्ट्रात आणि एकूणच भारतीय राजकारणात खूप मोठे बदल झाले. भारताच्या राष्ट्रीय क्षितिजावर महात्मा गांधी यांचे आगमन झाले होते. राजकारणात काही व्यक्तींचे येणे - जाणे हे केवळ एका व्यक्तीचे येणे - जाणे नसते तर, ती व्यक्ती आपली वृत्ती आणि विचारधारा घेऊन येत असते आणि जनता जेव्हा त्या व्यक्तीला स्वीकारते, तेव्हा तो स्वीकार त्या व्यक्तीच्या विचारधारेचा आणि वृत्तीचा असतो. गांधीजींनी राजकारणात प्रवेश केल्यानंतर त्यांनी असहकार तत्त्वाचा अवलंब केला त्यामुळे जहाल गट मागे पडू लागला. पुढील एक-दीड वर्षात गांधी यांचे सत्याग्रह बाबत धोरण धरसोडीचे आहे, असे ब्याच लोकांना वाटले. वल्लभभाई पटेल यांच्या पुढाकाराने बार्डोलीच्या सत्याग्रहाची तयारी झाली, तेव्हा चौरीचौरा येथे दंगे झाले, तेव्हा बार्डोलीचा सत्याग्रह गांधी यांनी रहित केला. त्यामुळे गांधी यांच्या विषयीचा त्यांचा विश्वास डगमगू लागला. त्यामुळे आधीच गांधीच्या विरोधात असलेल्या काँग्रेसवाल्यांनी गांधी यांचे अनुयायित्व सोडण्याचा विचार सुरु केला. गांधी यांनी कायदेमंडळावर बहिष्कार पुकारला होता.
'लोकमान्य' मध्ये फेरवादी विचारांचे प्राबल्य असल्याने येथेही आता फार काळ राहणे योग्य नाही, असे नाफेरवादी खाडीलकरांना मनमोहन वाटले आणि ते 'लोकमान्य' मधून बाहेर पडले.

**नवाकाळ**

लोकमान्य सोडल्यानंतर अवघ्या चार आठवड्यांच्या काळात ही सगळी जुळवाजुळं करुन 7 मार्च 1923 रोजी स्वतःच्या स्वतंत्र मालकीचा 'नवाकाळ' वृत्तपत्राचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. त्यात खालील करांच्या लेखाचे शीर्षक होते 'स्वतः संबंधी!' या लेखातून स्वतःच्या भूमिकेचे आणि संकल्पनांचे संकल्पना विवेचन त्यांनी केले. पुढे 'नवाकाळ' ला खूप लोकप्रियता मिळाली, खप वाढला. त्यांनी नवाकाळच्या पहिल्या अंकात कंपनीच्या मालकांना संपादकास पूर्ण स्वातंत्र्य देणे अडचणीचे होऊ लागल्याचा उल्लेख केला होता. यापूर्वी पुण्यात 'केसरी' मध्ये असाच कटू अनुभव पदरी आलेला असल्यामुळे असल्या खोच्या डावातील मानसिक कलेश टाळण्याकरता स्वतःचे स्वतंत्र आसन नवाकाळ पत्राच्या रुपाने घालण्याचा निश्चय खाडिलकर यांनी केला, आणि इष्ट मित्रांच्या मदतीमुळे नवाकाळ पत्राच्या द्वारे आपले विचार वाचकांपुढे मांडण्याची संधी खाडिलकर यांना मिळाली. संपादक आणि लेखक या नात्याने आपल्या आयुष्यातील शेवटच्या पायरीवर उभे राहून आम्ही आजपासून लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांचेच विचार आपल्या वेड्यावाकड्या पद्धतीने बोलून न दाखवणार आहोत ते बोल म्हणजे सद्गुरुंची संतांची उद्दिष्टे होत, हे आमच्या वाचकास माहीत असल्यामुळे पूर्वीच्या स्वरुपातील आमचे लेख ज्याप्रमाणे महाराष्ट्रातील वाचकांनी गोड करुन घेतले तसेच नवाकाळ मधील लेख वाचक गोड करुन घेतील, असा नवाकाळ पत्रास भरवसा आहे असा त्यांनी सर्वसामान्य लोकांना उद्देश आपल्या वृत्तपत्रातून केला. सुरुवातीला गांधी

विचारांचे एकही वृत्तपत्र नसल्याने नवाकाळ सुरु झाला आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. त्या काळामध्ये वृत्तपत्राची साप्ताहिक आवृत्ती हे एक मोठे आकर्षण होते. इ. स. 1925 मध्ये विजयादशमीच्या मुहूर्तावर 'नवाकाळची साप्ताहिक' ची आवृत्ती सुरु करण्यात आली. या पहिल्या अंकाच्या छपाईच्या संदर्भातली एक आठवण उद्बोधक होती

वृत्तपत्र क्षेत्रातील अशा घटनांवरून त्यांचा स्वीकृत कार्याबद्दल निर्दोष पणाचा आग्रह, त्याची अंमलबजावणी करताना तन-मन धनाची परवा न करणे आणि सहकार्यानाही ती शिकवण ते देत असत. असे कितीतरी गुण त्यांच्यात दिसतात. आपण लिहिलेल्या संवादाचे नीट प्रक्षेपण नटाने करावे म्हणून नाटकांच्या तालमी करून घेणारे तालीम - मास्तर दिग्दर्शक म्हणून ते आग्रही होते.

## वृत्तपत्रांचा समाजावर झालेला परिणाम

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या वृत्तपत्रीय कार्यामुळे मराठी समाजात अनेक महत्त्वपूर्ण बदल झाले. त्यांच्या लेखनामुळे जनतेमध्ये राजकीय आणि सामाजिक जागरूकता वाढली; लोक आता ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांबाबत सजग झाले आणि स्वराज्याची महत्त्वाकांक्षा प्रबळ झाली. तरुण पिढीमध्ये देशभक्तीची भावना आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली, ज्यामुळे अनेकांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला.

खाडिलकरांच्या लेखनामुळे समाजातील अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि सामाजिक अन्यायावरही चर्चा सुरु झाली. त्यांच्या अग्रलेखांमुळे लोकांनी पारंपरिक रुढीधर्म आणि अज्ञानामुळे होणाऱ्या समस्यांकडे नव्याने पाहण्यास सुरुवात केली. शिक्षण आणि संस्कृतीसंबंधी जागरूकतेत वाढ झाली, समाजातील नैतिक आणि बौद्धिक स्तर उंचावला गेला.

त्यांनी सामान्य लोकांना राजकीय घटना, निर्णय आणि त्यांच्या परिणामांची सविस्तर माहिती दिली. त्यामुळे जनतेचा राजकीय सहभाग वाढला आणि लोकशाही मूल्यांची पायाभरणी झा झाली.समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, विषमता आणि अशिक्षण यांसारख्या समस्यांवर त्यांनी भाष्य केले. शिक्षणाचा प्रसार, सामाजिक समता आणि नैतिक मूल्यांची जपणूक यांचा पुरस्कार केला. त्यांच्या ओजस्वी आणि ज्वलंत शैलीमुळे तरुणांमध्ये देशभक्तीची भावना प्रबळ झाली. अनेक तरुण स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले. त्यांनी स्वतंत्रपणे विचार मांडण्याचे धैर्य दाखवले. त्यामुळे समाजात बौद्धिक चर्चा, मतभेदांची देवाणघेवाण आणि वैचारिक परिपक्वता घडून आणली. विविध प्रांत, भाषा आणि समाजघटक यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न त्यांच्या लेखनातून दिसून येतो. त्यामुळे राष्ट्रीय ऐक्याची भावना दृढ झाली.त्यांनी पत्रकारितेला केवळ बातम्या देण्याचे साधन न मानता समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनवले. सत्य, धैर्य आणि जबाबदारी या मूल्यांवर आधारित पत्रकारितेची परंपरा त्यांनी मजबूत केली

अशा प्रकारे खाडिलकरांच्या वृत्तपत्रकारितेमुळे समाजात राजकीय जागृती, सामाजिक सुधारणा,


*ISBN-978-93-49938-45-8*

राष्ट्रीय भावना आणि वैचारिक क्रांती यांचे व्यापक परिवर्तन घडून आले.

### *संदर्भ*


1. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे : ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर 1972
2. कुलकर्णी वा., 'नाटककार खाडिलकर: एक अभ्यास' पॉप्यु लर प्रकाशन, मुंबई- 1, आवृत्ती, 1965
3. खाडीलकर यशवंत कृष्ण, संपादित – प्रकाशित, ' खाडिलकर स्मरणी' श्री दत्तात्रेय प्रिंटिंग प्रेस 13 शेणवी वाडी, मुंबई चार – 4, यांनी संपादित, मुद्रित,प्रकाशित केलेले पुढील ग्रंथ
4. ' खाडिलकरांचा लेखसंग्रह भाग 1', आ. 1' 1949, ( कृ. प्र. खाडेलकर यांचे 896 ते 1910 मधील निवडक लेख
5. 'खाडिलकरांचा लेखसंग्रह भाग 2', आ.1 1949 कृ. प्र. खाडिलकर यांचे 1996 ते 1910 मधील निवडक लेख, अध्यक्षीय भाषणे यांचा संग्रह')
6. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर (संपा.). केसरीतील निवडक अग्रलेख. पुणे: केसरी प्रकाशन.
7. खाडिलकर, कृष्णाजी प्रभाकर. सत्तेचे गुलाम. पुणे: (प्रथम आवृत्ती).
8. खाडिलकर, कृष्णाजी प्रभाकर. केसरीतील अग्रलेख (निवडक लेखसंग्रह). पुणे: केसरी प्रकाशन.
9. खाडिलकर, कृष्णाजी प्रभाकर. राजकीय व सामाजिक लेखसंग्रह. पुणे: (प्रकाशक माहिती उपलब्धतेनुसार).
10. खाडिलकर, कृष्णाजी प्रभाकर (संपादक). मराठा (विविध अंक). पुणे: मराठा कार्यालय.

# अहिल्याबाई होळकर यांचे धार्मिक व सामाजिक कार्य

**प्रा. डॉ. रघुराज मुगुटराव कुरुमकर**
दौंड तालुका कला व वाणिज्य महाविद्यालय दौंड जिल्हा पुणे
Email: Kurumkar81@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19765027
*DOI: 10.5281/zenodo.19765027*

## प्रस्तावना

मराठ्यांच्या इतिहासामध्ये सुवर्ण अक्षरांनी आपल्या दैदिप्यमान स्वकर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या काही स्त्रिया दिसून येतात यामध्ये अहिल्याबाई होळकर यांचे नाव अग्रक्रमाने येते. त्यांचे कर्तुत्व आणि योग्यता खूप मोठी होती. अत्यंत प्रेमाने त्यांनी सामान्य माणसाची हित बघितले. प्रजेतील गरिबांना जास्तीत जास्त सुखाने जगता यावे याकडे लक्ष दिले अहिल्याबाई म्हणजे एक चालती बोलती माणुसकीची गाथा होती. त्या धार्मिक होत्या अनेक ठिकाणी मंदिरे उभारली. त्यांनी परमेश्वरांचे चिंतन व जनहितरक्षण या दोन तत्वांचा स्वीकार केला. सदर संशोधन पेपर मधून अहिल्याबाई होळकर यांच्या धार्मिक व सामाजिक कार्यावर अल्पसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

## पूर्वचरित्र

होळकर हे महाराष्ट्रातील पुण्याजवळील वाफेगावचे रहिवासी होते. त्यांचे मूळ नाव वीरकर असून होळ या गावी राहण्यास आल्यानंतर मूळचे वीरकर आडनाव जाऊन होळकर हे नाव पुढे कायम झाले. या घराण्यातील अनेक महत्त्वाच्या व्यक्तींपैकी अहिल्याबाई होळकर हे एक होय. सौ. सुशिलाबाई व माणकोजी शिंदे या दांपत्यांच्या पोटी ३१/५/१७२५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या गावी अहिल्याबाईंचा जन्म झाला. वडील माणकोजी शिंदे यांनी त्यांना लहान वयातच लिहिण्याचे व वाचण्याचे शिक्षण दिले. माळवा स्वारी वरुन परत येत असताना पहिले बाजीराव पेशवा मल्हाररावास अहिल्या विषयी बोलून गेले, मुलगी अवतारी दिसते, "मल्हार वास हिजला सून करुन घ्यावी, तुमचे घराण्याचा उद्धार करील"अशाप्रकारे दिनांक 20 मे 1733 रोजी वयाच्या आठव्या वर्षी खंडेराव व अहिल्याबाई यांचा विवाह संपन्न झाला. मल्हारवांच्या पत्नी गौतमीबाई यांचा प्रभाव अहिल्याबाई वर पडणे सहाजिकच होते. प्रशासन, राजकारण, न्यायव्यवस्था, लष्करी व मुलकी व्यवस्था यांचे शिक्षण अहिल्याबाई मिळत गेले.

सन 1745 रोजी अहिल्याबाईंना मालेराव हे पुत्ररत्न झाले. सन 1748 रोजी कन्या मुक्ताबाई चा जन्म


*ISBN-978-93-49938-45-8*

झाला.दि.१७ मार्च रोजी कुंभेरी लढाईत खंडेराव धारातीर्थी पडले हे मोठे दुःख अहिल्याबाईंना सहन करावे लागले. यावेळी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. तर दि.२९/९/१७६१ रोजी सासू गौतमाबाई अचानक मृत्युमुखी पडल्या. अहिल्यादेवींना प्रत्येक निर्णय प्रक्रियेत सासू गौतमा बाईचा फार मोठा आधार होता. तो कायमचा निखळला गेला.१७६६ मध्ये सासरे मल्हारराव यांचा मृत्यू झाला. याही संकटाला अहिल्या बाई धाडसाने सामोरे गेल्या. पुढे अहिल्याबाईंनी स्वतःकडे सत्तेची सर्व सूत्रे हाती घेऊन राज्यकारभार केला.

## सामाजिक कार्य

शेती विकास -प्रत्येक गावचे जमीन क्षेत्र मोजून प्रथम लागवडीखाली क्षेत्रासाठी शेतीचा विकास केला. शेती विकास करून शेतकऱ्यांना पट्टे दिले. बलुतेदार, शेतकरी यांना अवजारे, सुधारित बी बियाणे, बैल फाटा आणि कर्जाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. पडीक जमीन पिकाखाली आणली शेतीच्या प्रतवारीनुसार वेगवेगळ्या पिकांची लागवड केली. त्यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला. कलाकार, शिल्पकार ,कलावंत, साहित्यिक, शाहीर, इत्यादी स्वयंरोजगारातून पोट भरणाऱ्या श्रमकऱ्यांसाठी विशेष अर्थसाह्य योजना लागू केली. त्यांना उत्तम प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली. परंपरागत शेती पद्धती बंद करून अहिल्यादेवींनी शेतीसाठी नदी नाल्यावर बंधारे बांधले. विहिरी खोदल्या पाण्याखालील जास्तीत जास्त शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन, दुग्ध व्यवसाय, फळ शेती, चारा निर्मिती, फुल शेती, भाजीपाला इत्यादींना प्रेरणा दिली.

## भटक्यांचे पुनर्वसन

जंगलात राहणारे, भटके, आदिवासी प्रवाशांची लूट करीत व त्यांना काही वेळा ठार मारीत. त्यामुळे राज्यात आदिवासी, भिल्ल, कातकरी, कोळी, पेंढारी, यांची जबरदस्त दहशत होती. अहिल्यादेवींनी स्वतः जंगलात, आदिवासी भागात फिरून त्यांचे प्रबोधन केले. त्यांच्या विरोधात शस्त्राचा वापर न करता त्यांचा स्वाभिमान फुलवला. पेंढाऱ्यांनाही विश्वासात घेऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून दिला. शासन दरबारी आदिवासी, पेंढारी, भिल्ल, कोळी, वाटमारी करणारे लुटेरे अशा सर्वांचे अहिल्यादेवींने परिवर्तन करून त्यांचे पुनर्वसन केले त्यामुळे राज्यात शांतता नांदू लागली.

## निराधारांना आधार

अहिल्यादेवींनी वाटसरूंना संरक्षण देण्यासाठी सैन्य ठेवले. तसेच रात्री मुक्काम पडल्यास त्यांच्यासाठी निवारे बांधले. रस्त्यावर ठिकठिकाणी संरक्षण चौक्या बांधल्या. धर्मशाळा बांधल्या, अन्नपाणी यांची सोय केली. यामुळे वाटसरूंना बिनधास्त प्रवास करणे, सुलभ झाले. कुटुंबात वयोवृद्ध, निराधार, अपंग, अंध, दरिद्री असतात त्यांच्यासाठी अहिल्यादेवींनी प्रशासनाला विशेष

आदेश देऊन त्यांना एकत्रित केले. त्यांच्यासाठी आश्रम बांधले, तेथे अन्नछत्र उघडण्यात आली, दरिद्री लोकांना दान धर्म करून त्यांना आर्थिक सहकार्य केले. हे सर्व सत्कार्य करण्यासाठी आपल्या खाजगी उत्पन्नातून खर्च केले.

### स्त्रियांसाठी विशेष योजना

विषमतावादी तत्त्व, धार्मिक परंपरा आणि धर्मपुरोहितांना डावलून अत्यंत शिताफीने अहिल्यादेवींनी समाज जागृती करून स्त्रीविरोधी अनेक कायदे स्पष्ट आदेश काढून बंद केले. हुंडाबंदी विधवा विवाह प्रोत्साहन, धर्मविधीस महिलांना अधिकार, सती प्रथा बंद करण्याचा प्रयत्न, दत्तक योजनेचा अधिकार याबाबत जनजागृती केली. निराधार स्त्रियांसाठी महिलाश्रम, अनाथाआश्रम, स्त्रियांसाठी स्वावलंबी जीवन जगण्यासाठी कुटिर उद्योग उभारण्यात आले स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असाव्यात हीच अहिल्यादेवींची योजना होती.

### दळणवळण व्यवस्था

प्रजा व राज्यांमध्ये समृद्धी, श्रीमंती, शांती व सुरक्षितता असली की विविधांगी विकासाला चालना मिळते. त्यातूनच उद्योग, व्यापार वाढवून आर्थिक व सामाजिक परिवर्तन होते. यासाठी गाव रस्ते, पाऊलवाटा, गाडी रस्ते, सैन्यांसाठी रस्ते, व्यापारासाठी रस्ते, आयात निर्यातीसाठी इतर राज्यांना जोडणारे रस्ते आवश्यक असतात. या सर्व दृष्टिकोनांचा विचार करून अहिल्यादेवींनी इंदोर राज्यांतर्गत उत्तम प्रकारच्या प्रवासी तसेच वाहतुकीस योग्य रस्त्यांचे जाळे निर्माण केले होते. अहिल्यादेवींनी त्या काळात दिल्ली ते कोलकत्ता आणि बनारस (काशी -वाराणसी) ते कोलकत्ता या प्रमुख व मोठ्या रस्त्यांचे बरेच काम केलेले होते. कोलकत्ता आहे त्याकाळी फार मोठे व्यापारी बंदर होते. त्यामुळे होळकर संस्थानातील वस्तूंची निर्यात होण्यासाठी उत्तम रस्त्यांची गरज होती ते अहिल्यादेवींनी गरज पूर्ण केली. त्यांनी होळकर संस्थानात मोठे रस्त्यांचे जाळेच निर्माण केले होते. एवढेच नव्हे तर त्यांनी शेजारच्या मित्रत्वांचे संबंध असणाऱ्या राज्यांनाही रस्त्यांची जोडणी केली होती. त्यामुळेच होळकर संस्थानात दळणवळण व्यवस्था सुलभ व महत्त्वपूर्ण ठरली.

### नगर विकास

अहिल्यादेवींच्या शांततामय धोरणामुळे इंदोर राज्यात सामाजिक राजकीय सुरक्षितता होती. प्रत्येकास काम मिळाल्यामुळे आर्थिक सुबत्ता होती. त्यातूनच नगर विकासाला प्रोत्साहन देण्यात आले. गावे, बाजारपेठा, दवाखाने, रुंद रस्ते, प्रार्थना स्थळे, स्वच्छतागृहे, पाणीपुरवठा, धर्मशाळा, शासकीय कार्यालय, इत्यादींचे योग्य नियोजन होत असे. गृहबांधणीसाठी भूखंड व अर्थसाह्य दिले जाई. जनतेच्या आरोग्यासाठी आयुर्वेदिक किंवा युनानी वैद्यांच्या नेमणुका केल्या जात मोफत व माफक दरात वैद्यकीय सेवा गावापर्यंत उपलब्ध होत्या. नर्मदा काठी महेश्वर हे राजधानीचे शहर


*ISBN-978-93-49938-45-8*

आजही अद्यावत सोयीने नटलेले आहे.

## धार्मिक कार्य

हातून पुण्य कार्य झाले की जीवनाचे सार्थक झाले असे अहिल्याबाईंना वाटत असे. अहिल्याबाईंनी आंबा गाव या ठिकाणी मंदिरामध्ये तेल वातीची व्यवस्था केली. त्यांनी अनेक धर्मशाळा बांधल्या अयोध्या या ठिकाणी श्रीराम मंदिर बांधले. अमरकंटक या ठिकाणी धर्मशाळा बांधली आनंद कांचन या ठिकाणी विश्वेश्वराच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला. मल्हारवांची छत्री बांधून त्यासमोरच खंडेराव मार्तंडाचे देवालय बांधले आहे. काशी येथील घाटाला २५०००/- रुपये खर्च केला. गंगा नदीच्या उगमस्थानी विश्वेश्वर, केदारनाथ, भैरव आणि अन्नपूर्णा अशी चार मंदिरे बांधली. गरिबांना दान देण्यासाठी चिंचवड या ठिकाणी व्यवस्था केली. अहिल्याबाईंनी चिखलदरा, पैठण, रामेश्वर येथे अन्नछत्र सुरु केले, चित्रकूट येथे राम मंदिर बांधून तेथे मूर्ती स्थापन करण्यासाठी सुनेला गावच्या खंडो अनंत याचे नाव सुचवले होते. त्यांना त्यांनी पत्र केले की, मूर्ती कशी तयार करणार त्याचा नकाशा पाठवावा. सुनेला गावी संगमरवरी दगड पाठविण्याकरता तोफखान्यातले दोन छकडे पाठवून दिले. मूर्ती तयार करण्याचे काम दोन वर्ष चालले. मूर्ती सन१७७८ ला पूर्ण झाल्या. राम वनवासात निघताना भरत आणि अखेरची भेट घेतली त्या ठिकाणी मूर्तीची स्थापना होणार होती. सुनेला गाव ते चित्रकूट हे अंतर लांब होते. त्यामुळे त्या संरक्षण दिले. अहिल्याबाईंनी मंदिराची देखभाल व पूजाअर्चा करण्यासाठी व्यवस्था केली. पुजाऱ्याला काही गावे इनाम दिली. अनेक जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार केला. बीड, परळी येथील वैजनाथ, वेरुळ येथील घृष्णेश्वर या मंदिराचा जीर्णोद्धार केला. आपल्या माहेर गावी नदीवर घाट, महादेवाचे मंदिर बांधले. रामदास स्वामींच्या मठाला मदत केली. पंढरपूर येथे राम मंदिर बांधले. इंदूर परगण्यात खजराणा महालात पीर मशीदीस १५ बिघे जमीन फकिरास इनाम वंशपरंपरेने त्याच्या शिष्याकडे जावे अशी दिली. नर्मदा तीरावर घाट बांधला. संगमेश्वर येथे राम मंदिर बांधले. अहिल्याबाई ह्या संपूर्ण भारत खंडाच्या राजकारणावर विचार करीत होत्या. अहिल्याबाई चे हिमालयातील केदारेश्वर पासून दक्षिणेतील रामेश्वर पर्यंत आणि पूर्वेच्या जगन्नाथ पुरी पासून पश्चिमेच्या द्वारकेपर्यंत सर्व त्यांच्या कृपेने कथा किर्तने चालू होती. अहिल्याबाईंनी या देशाच्या चारी दिशांना उभी केलेली मंदिरे या भूमीची सुंदर लेणी आहेत. वरील कार्याकडे पाहता आपणास असे म्हणता येईल की, सुधारणा नुसत्या धार्मिक नाही तर त्या वेगवेगळ्या दृष्टीने सामाजिक असल्याचे म्हणता येते कारण तीर्थयात्रा करणाऱ्या सर्वसामान्य भक्तांना राहण्याची, जेवणाची, नदीपात्रात उतरण्यासाठी राहायची सोय या सोयींचा कायदा सर्वसामान्यांना मोठ्या प्रमाणात होत आहे.

## समारोप

अहिल्याबाईंनी आपल्या तीस वर्षाच्या कारकिर्दीत आदर्श जीवनाचा मंत्र आपल्या प्रजेस दिला. राजाने प्रजेच्या जीविताचे व मालमत्तेचे रक्षण केले पाहिजे ही त्याची प्रथम जबाबदारी आहे. राज्यातील प्रजा असंतुष्ट असेल तर ती राजाला घोर नरकात घातल्याशिवाय राहणार नाही. हेच सूत्र डोळ्यासमोर ठेवून त्यांनी राज्यकारभार केल्याचा दिसतो. पुढे अहिल्याबाईंच्या सन्मान व स्मृतिप्रित्यर्थ भारत सरकारने दि.२५/८/१९९६ या दिवशी एक डाक तिकीट जारी केले. अशा या शासनकीर्तीस मानवंदना म्हणून इंदोरच्या विमानतळाचे नाव"देवी अहिल्याबाई विमानतळ"असे ठेवण्यात आले. तसेच इंदूर विद्यापीठास"देवी अहिल्या विश्वविद्यालय"असे नाव देण्यात आले.

भारत स्वतंत्र झाल्यावर ही पुढील अनेक वर्ष शेजारील भोपाळ, जबलपूर, किंवा ग्वाल्हेर या शहरांपेक्षा इंदूर सर्व बाबतीत प्रगतिशील राहिले. याच्या मागे अहिल्याबाईंची दूरदृष्टी होती. अहिल्याबाईंनी सासरे मल्हारराव होळकर, पती खंडेराव होळकर, मुलगा मालेराव याशिवाय सासु, आई, वडील, मुलगी, जावई अशा आप्तेष्टांचे मृत्यू त्यांनी पाहिले होते. याबाबत सुलोचना पाटील म्हणतात. कोणतेही पुरुष मंडळी नसताना एखाद्या स्त्रीने २९ वर्ष जिद्द व शौर्याने यशस्वी कारभार केल्याचे भारताच्या इतिहासातील एकमेव उदाहरण असेल वयाच्या ७० व्या वर्षी दि.१३/८/१७९५ रोजी अहिल्याबाईंची प्राणज्योत मालवली.

## *संदर्भ*


1. बेडदे धनंजय, परिवर्तनाची गौरवगाथा, लोकमाता अहिल्यादेवी होळकर (गौरव ग्रंथ) विद्याभारती प्रकाशन, लातूर २०००
2. गावडे के.आर, तर राष्ट्रमाता अहिल्याबाई होळकर (जीवन व कार्य) पंचफुला प्रकाशन, औरंगाबाद २०१४.
3. भुजाडे होमेश, पुरोगामी राष्ट्रमाता अहिल्याबाई होळकर, श्रीनिधी प्रकाशन, नागपूर, २००४.
4. पाटील सुलोचना, होळकर कुलभूषण अहिल्यादेवी, अहिल्याबाई होळकर प्रगती मंडळ, जळगाव २०००.
5. मोडक प्रमिला, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जीवन व कार्य, वसुंधरा प्रकाशन अहमदनगर, २००५.
6. केळकर य.न.(संपा.) होळकरांची कैफियत, हनुमान प्रकाशन पुणे १९५४.
7. जहागीरदार विजया, तेजस्विनी अहिल्याबाई होळकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई २००३.



*ISBN-978-93-49938-45-8*

# इतिहासाचे सहाय्यकारी शास्त्र म्हणून भूगोल: एक अभ्यास

**प्रा. लगड सुरेखा रामदास**
इतिहास विभाग प्रमुख, रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर
Email: surekhalagad1@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19765129
*DOI: 10.5281/zenodo.19765129*

**प्रस्तावना**

इतिहास विषय मानवी जीवनात सर्वांगाने स्पर्श करणारा विषय आहे इतिहासाच्या माध्यमातून मानवी जीवनाला विविध पैलूंच्या अध्ययन होते इतिहासाचा अभ्यास केल्यामुळे मानवाला अष्टपैलू स्वरुपाचे ज्ञान मिळते इतिहास म्हणजे भूतकालीन घटना घडामोडींची माहिती अशी इतिहासाची सामान्यपणे व्याख्या केली जाते कोणतीही घटना भूपृष्ठावरच घडतात त्या घटना साठी भौगोलिक चढउतार कारणीभूत ठरतात म्हणूनच भूतकालीन घडामोडींचा अभ्यास करताना भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेणे उचित ठरते थोडक्यात ऐतिहासिकता बघणे हे अपरिहार्य आहे सत्यान्वेषण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे इतिहास शास्त्र की कला असाही प्रश्न निर्माण केला जातो शास्त्रीय दृष्टिकोन जर फक्त स्वीकारला तर इतिहास कंटाळवाणा वाटतो आणि फक्त वांग्मयीन सौंदर्याचा मुलांना दिला तर तो रंजक वाटतो म्हणून विज्ञान व कला यांची सांगड घालून घटनेची सत्यता यथार्थता वास्तवता आपल्या प्रतिभेच्या जोरावर मांडण्याची प्रक्रिया सुरु असते

इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन आधुनिक काळात बदलला वेगवेगळी शास्त्री विकसित झाली इतिहासाला उपयुक्त असणाऱ्या इतर साह्यकारी शास्त्रांचा अभ्यास संदर्भ देण्याची प्रक्रिया सुरु झाली. इतिहासात फक्त राजकीय घटना न मांडता सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून इतिहासाची मांडणी सुरु झाली त्यातूनच इतिहास आणि सामाजिक शास्त्रे यांचा असलेला जवळचा संबंध स्पष्ट झाला. राजा, राणी, युद्धे यांची रसभरीत वर्णने हा मध्ययुगीन दृष्टीकोन मागे पडला. आधुनिक काळात इतिहास लेखनात शास्त्रीय दृष्टिकोण आला. वैचारिक प्रवाह संकल्पनात्मक लेखन सुरु झाले थोडक्यात सर्वांगीण अभ्यास करणे सुरु झाले. आधुनिक काळातील इतिहास लेखनात वर्णनात्मक इतिहासाऐवजी बोधात्मक, ज्ञानात्मक, वैचारिक विचार प्रणालीतून लेखन छापू लागले. त्यातूनच इतिहास व सामाजिक शास्त्रे यांचा संबंध, सहाय्यकारी शास्त्रे यांचाही अभ्यास करणे इतिहासात अभिप्रेत आहे. उदाहरणार्थ मराठ्यांना गडकोट, डोंगर वने यांचा अनुभव होता तर शाही राजवटींना दुर्गम खोऱ्यातील रणनीती माहित नव्हती. रशियातील थंडीची जाणीव नेपोलियन बोनपार्टला आली नाही या घटना उलगडताना भूगोल पर्यावरण याचाही विचार करावा लागतो.

इतिहास म्हणजे मानवी जीवनाचा समग्र आलेख रेखाटने यात मानवी जीवनाचा विचार करावा लागतो. इतिहास लेखन करताना ज्या शास्त्रांची मदत इतिहासकारायला घ्यावी लागते त्याला इतिहासाची सहाय्यकारी शास्त्र असे म्हणतात. इतिहास अभ्यासकाला निसर्ग नियम, पर्यावरण, भूमी, शासन संस्था व नियम समाजव्यवस्था, चालीरीती, परंपरा त्याचबरोबर आर्थिक स्थिती उद्योगधंदे, व्यापार इत्यादी अभ्यास करून स्पष्ट करावे लागते. म्हणजेच इतिहास संशोधकाला बहुभाषिक होणे काळाची गरज झाली आहे. इतिहासाला सामाजिक शास्त्राची जननी असे म्हणतात. तत्त्वज्ञान, कायदा मानवशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल, निसर्गशास्त्र, समाजशास्त्र याची मदत घेऊन इतिहासलेखन त्याला करावे लागते.

## इतिहास म्हणजे काय

पृथ्वीच्या निर्मितीपासून मानवी इतिहासाचा आरंभ होतो. मानवाची झालेली उत्क्रांती, उत्क्रांतीचे विविध टप्पे, मानवी संस्कृतीचा उदय आणि अस्त यांसारख्या घटनांचा अभ्यास इतिहासात केला जातो. थोडक्यात मानवाच्या गतकालाची माहिती इतिहासाद्वारे प्राप्त होते. इतिहास हा मूळ ग्रीक शब्द असून त्याचा अर्थ

चौकशी, संशोधन आणि माहितीचे संकलन असा होतो. इतिहासाची संकल्पना प्रथम ग्रीकांनी मांडली मानवी मनाच्या प्रगतीचे दर्शन इतिहासात घडून येते. मानवी मूल्यांचे शास्त्रीय पद्धतीने वर्गीकरण करून त्याचा अन्वयार्थ लावण्याचे कार्य इतिहास करतो. इतिहास या शब्दाची फोड इति+ ह+आस = इतिहास म्हणजे असे - असे घडले. स्थूलमानाने इतिहास म्हणजे भूतकाळ आणि भूतकाळात घडलेल्या घटनांचे तपशीलवारपणे केलेले वर्णन होय. मानवी जीवनात भूतकाळात ज्या घटना, प्रसंग घडून गेले त्याचा शास्त्रशुद्ध व तपशीलवार स्वरुपात केलेला अभ्यास म्हणजे इतिहास होय. थोडक्यात भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची माहिती पुरवणे एवढाच इतिहासाचा अर्थ मर्यादित नाही तर घटनांमागील संदर्भ व त्यातील सहसंबंध याचे विवेचन देखील इतिहासात केले जाते.

## हिरोड़ोट्स

'गतकाळातील मनोरंजन आणि अविस्मरणीय घटनांचा शोध म्हणजे इतिहास होय'

## ई एच कार

'वर्तमान काळ आणि भूतकाळ यांच्यातील कधी न संपणारा संवाद म्हणजे इतिहास होय'

## हेन्री जॉन्सन

'जे घडले ते जसेच्या तसे सांगणे म्हणजे इतिहास होय'


*ISBN-978-93-49938-45-8*

**रेनियर**

'समाजात राहणाऱ्या लोकांची हकीकत सांगणे म्हणजे इतिहास होय'

**प्रा. फिडले**

'गतकालीन घटनांमध्ये सुसंगती लावून त्यांचा परस्पर संबंध प्रस्थापित करणारी विद्या शाखा म्हणजे इतिहास होय'

थोडक्यात विविध ज्ञान शाखांपैकी इतिहास ही अशी एक ज्ञान शाखा आहे की, तिची सर्वमान्य एकच व्याख्या करणे अशक्य आहे. मानव आणि निसर्ग यांच्यातील बदलांचा अभ्यास सातत्याने इतिहासामध्ये केला जातो. बदल हा इतिहासाचा स्थायी स्वभाव आहे. इतिहास म्हणजे मानवी प्रगतीला पूरक असलेल्या आवश्यक तो हातभार लावणाऱ्या शक्ती होय. मग त्या सामाजिक मानसिक किंवा आर्थिक शक्ती असतील तरी त्यांची नाळ भूतकाळाशी कायम जोडलेली असते. या भूतकालीन घटना समजावून घेऊन त्यांचे पृथ:करण अतिशय सामंजसपणे व चातुर्याने करता येणे आवश्यक आहे. मानवी व्यवहाराची आणि माणसांची सर्वांगाने ओळख करून घेणे हे इतिहासाचे मुख्य काम आहे

भूगोल हा विषय सर्वसामाजिक शास्त्रांचा पाया आहे हा इतिहासाचा रंगमंच आहे. भूगोलाने आणि इतिहास घडवला असे म्हटले जाते. भौगोलिक परिस्थिती नैसर्गिक साधन संपत्ती यामुळे मानवाची जडणघडण होत असते. मानव व निसर्ग आणि ज्या भूमीवर तो पाय ठेकून उभा राहतो त्याचे अतूट असे नाते आहे. भौगोलिक परिस्थितीमुळे अनेक ऐतिहासिक घटनांवर परिणाम झालेला दिसून येतो. उदा. महाराष्ट्राच्या भूगोलाने इतिहास घडविला. हिंदवी स्वराज्याचे रक्षण सह्याद्रीच्या डोंगररांगांनी केले. भौगोलिक परिस्थितीमुळे मानवामध्ये संघर्ष करण्याची क्षमता निर्माण झाली. भौगोलिक ज्ञान असल्याशिवाय इतिहास संशोधन करणे शक्य नाही. या संदर्भात इतिहासकार प्रा. माईकेलेट असे म्हणतात की, भौगोलिक परिस्थितीची माहिती असल्याखेरीज इतिहासाला घडविताना मानवाचे त्याचे अस्तित्व अधांतरीत असेल. भूमी ही केवळ घटना स्थळ नाही तर ती अन्नपाणी व हवा यांची कारक आहे. भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव मानवी जडणघडणीवर पडत असतो जशी सभोवतालची परिस्थिती असेल तसा माणूस घडतो. जर इतिहास लेखन करताना भौगोलिक घटनांचा संदर्भ घेतला नाही तर ते लिखाण काल्पनिक ठरेल प्रत्येक देशाच्या इतिहासावर समुद्र, बंदरे, आक्रमणाचे मार्ग, व्यापारी ठिकाणे, युद्धभूमी हे घटक प्रभाव टाकतात. आणि या प्राकृतिक घटनांचे ज्ञान भूगोलाच्या अभ्यासाद्वारे आपणास प्राप्त होते.

देशाची सुरक्षितता त्या देशाला लाभलेल्या भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असते. जर देशाच्या इतिहासावर त्या देशाला लाभलेला समुद्रकिनारा, बंदरे, व्यापारी ठिकाणे आणि देशातील पर्वतरांगा

या घटकांचा प्रभाव पडतो. सह्याद्री पर्वतास महाराष्ट्राचा इतिहास निर्माता म्हणतात. भौगोलिक परिस्थितीमुळे मानव आणि देश दोन्ही घटकांची प्रगती किंवा अधोगती होते. उदा. जपान सारखा छोटासा आशियायी देशाचे भौगोलिक स्थान आणि त्यास लाभलेली नैसर्गिक परिस्थिती यामुळे जपानी लोक सहासी, धाडसी, दीर्घोउद्योगी बनले. मानवी भूगोल विषयांतर्गत मानवाच्या उत्क्रांतीचा व विकासाचा सर्वांगीण अभ्यास केला जातो. इतिहासात घडून गेलेल्या अनेक घटना, राज्याची निर्मिती, लढाया, संस्कृतीचा उदय व अस्त, एखाद्या समाज घटकाची प्रगती, अप्रगत अवस्था या सर्वांचे स्पष्टीकरण भूगोलाच्या अभ्यासाधारे देता येते. लष्करी व राजकीय इतिहासाचा गाभाच भूगोलात समाविष्ट झालेला असतो. पृथ्वीवरील वातावरण, हवामान, जमिनीचे चढ-उतार, नद्या–नाले, पर्वत या सर्वांचा परिणाम मानवी जीवनावर होतो आणि त्यातूनच इतिहास घडतो. त्यामुळे भूगोलाचा अभ्यास ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरण देण्यासाठी उपयुक्त ठरतो. हिप्पोक्रेटिस या ग्रीक तत्वेत्याच्या मते भौगोलिक परिस्थितीचा संबंध मानवाची शारीरिक ठेवण, मानवी प्रवृत्ती, मानवी स्वभाव, मानवी आवडी निवडी, यांच्याशी असतो. उदा. डोंगराळ भागातील माणूस काटक, चिवट, दणकट व चपळ असतो. संकटाला तोंड देण्याची सामर्थ्य त्याच्यात असते. सुपीक मैदानी भागातील लोक उंच धिप्पाड शरीरयष्टीचे असून ते मंद धीमे व आळशी प्रवृत्तीचे असतात.

थोडक्यात भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव मानवी जडणघडणीवर पडत असतो. जशी सभोवतालची परिस्थिती असेल तसा माणूस घडत असतो.

इतिहासाचा अभ्यास करत असताना आणि लेखन करताना सहाय्यकारी शास्त्राचा अभ्यास करावा लागतो. तेव्हाच ऐतिहासिक घटनांचा अर्थ इतिहासकाराला समजतो. यावरून त्याने काढलेले निष्कर्ष चिकित्सक आणि वास्तववादी असतात. आधुनिक काळात इतिहास विषयात वेगवेगळ्या घटकांचा समावेश झाला असून त्याच्या ज्ञान कक्षा रुंदावल्या आहेत. या प्रक्रियेत विविध सहाय्यकारी शास्त्रांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. प्रा फीमन यांच्या म्हणण्याप्रमाणे इतिहासकाराला तत्त्वज्ञान, भूगोल, कायदा, मानवशास्त्र, अर्थशास्त्र, व नैसर्गिक शास्त्राची माहिती हवी. त्यांच्या मते, सर्वच शास्त्र इतिहासाला पुरक ठरत नाहीत काही शास्त्रे इतिहासाला खूप जवळची आहेत. त्यांच्या मदतीशिवाय इतिहास लेखन शक्य नाही. उदा. भूगर्भशास्त्र, भूगर्भशास्त्राची माहिती असल्याशिवाय उत्खनन शक्य नाही. आधुनिक काळात इतिहासकार इतर सहाय्यकारी शास्त्रांचा आधार घेऊन भूतकालीन घडामोडींचा अभ्यास करतात. त्यामुळे वास्तववादी स्वरुपाचे लिखाण करता येते. परिणामी यामधून नव इतिहास या संकल्पनेचा उदय झाला. त्यामुळे इतिहासाविषयीचे संकुचित दृष्टिकोन नाहीसे झाले. त्यामुळे पूर्वीसारखा केवळ राजकीय इतिहास लिहिला जात नाही तर सामाजिक इतिहास, आर्थिक इतिहास, सांस्कृतिक इतिहास, सामाजिक परिवर्तनाचा इतिहास अशा प्रकारचे इतिहास आता लिहिले जात आहेत. त्यामुळे इतिहासाच्या स्वरुपात व्याप्तीत बदल होताना


*ISBN-978-93-49938-45-8*

आहेत. हा बदल इतिहासाचा अभ्यास करत असताना अनेक साहाय्यकारी शास्त्रांची मदत घेतल्यामुळेच होत आहे. सहाय्यकारी शास्त्रांमुळे इतिहासाला अनेकांतवादी स्वरुप प्राप्त झाले. यावरुन आपणास असे लक्षात येईल की, सहाय्यकारी शास्त्र ही इतिहासासाठी किती महत्त्वाची आहेत या सहाय्यकारी शास्त्रांशिवाय इतिहास लेखन अपुरे आहे.

मानवी जीवनात इतिहासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण इतिहास म्हणजे मानवी संस्कृतीचा उदय, विकास आणि ऱ्हास. इतिहास मानवाचे वास्तववादी चित्र रेखाटत असतो त्याच्या अनुषंगाने मानवाला भूतकाळातील मानवी जीवन ज्ञात होते. असे असले तरी मानवी संस्कृतीचा इतिहास उभा करण्यास व लेखनास इतर सामाजिक शास्त्रे ही सहाय्यभूत ठरतात. त्यात प्रामुख्याने प्राकृतिक दृष्टिकोनातून भूगोल महत्त्वाचा ठरतो. या शाखेचा परिणाम म्हणजे मानवी जीवनात अनेक स्थित्यंतरे घडून येतात. म्हणूनच इतिहासात भौगोलिक घटकांचा परिणाम मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात दिसून येतो. इतिहास लेखन करताना या घटकांची दखल घ्यावी लागते. इतिहास लेखनात जसे भूगोल या सामाजिक विद्याशाखेला महत्त्व आहे तसेच इतर सहाय्यकारी सामाजिक शाखांची ही मदत घ्यावी लागते. उदा. मानववंशशास्त्र, पुरातत्वीयविद्या, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, सामाजिकशास्त्र, तत्वज्ञान, लिपीशास्त्र, भूगर्वशास्त्र इ. थोडक्यात इतिहास सामाजिक शास्त्राची जननी असला तरी इतर सामाजिक शास्त्रांची मदत घेतल्याशिवाय इतिहास लेखन पूर्णत्वास येऊ शकत नाही

### *संदर्भ*


1. मोरे अरुणा, नवथर भारती, काळभोर स्वाती, शेख जमाल 'इतिहासाची ओळख', सक्सेस पब्लिकेशन पुणे.
2. शेख गफूर ' इतिहास लेखनशास्त्र', प्रीतम पब्लिकेशन, जळगाव. २००७
3. चव्हाण कल्याण, मोरे अरुणा, भामरे राजेंद्र.'इतिहासाची ओळख' के एस पब्लिकेशन, पुणे २००६
4. राजदेरकर सुहास,. 'इतिहास लेखन शास्त्र' विद्या प्रकाशन, पुणे.
5. खरे, ग. ह. – इतिहास संशोधन पद्धती – कॉन्टिनेंटल प्रकाशन - पुणे – २०१२
6. कुलकर्णी, अ. रा. – महाराष्ट्राचा इतिहास – डायमंड पब्लिकेशन्स - पुणे - २००८.
7. थापर, रोमिला – Ancient India – पेंग्विन पब्लिकेशन्स - नवी दिल्ली - २००२.
8. चंद्र, बिपिन – India's Struggle for Independence - पेंग्विन बुक्स - नवी दिल्ली – १९८९.
9. ढेरे, रा. चिं. - भारतीय संस्कृतीचा इतिहास - पगंधा प्रकाशन - पुणे - २०१०.

# ज्ञानप्रकाश वृत्तपत्र आणि असहकार चळवळ

**प्रा. डॉ. चंद्रभान मेंगाने**
इतिहास विभाग, दौंड तालुका कला व वाणिज्य महाविद्यालय ,दौंड
Email: cmengane@mail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19765306
*DOI: 10.5281/zenodo.19765306*

## प्रस्तावना

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळीला आनन्य साधारण महत्त्व आहे. राष्ट्रवाद निर्मितीमध्ये या चळवळीसह विविध घटकांनी कामगिरी केलेली आहे. त्यामध्ये वृत्तपत्रांची मोलाची भूमिका असून त्याच्या कामगिरीचे स्वरूप विविध अंगी आहे. स्वातंत्र्यलढा ही राजकीय चळवळ असली तरी तिची वैचारिक बाजूही महत्त्वाची असते. या दृष्टीने वृत्तपत्रांची कामगिरी अर्थपूर्ण ठरते ज्ञानप्रकाश या मराठीतील सुप्रसिद्ध वृत्तपत्राने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सर्वांगीण कामगिरी केलेली आहे. ज्ञानप्रकाश वृत्तपत्र श्रीकृष्णाची त्रिंबक रानडे यांनी दिनांक १२ फेब्रुवारी १८४९ रोजी सुरु केले.[१] तेच त्यांचे पहिले चालक व मालक होते. ज्ञानप्रकाश वृत्तपत्राच्या वाटचालीत अनेक स्थित्यंतरे झाली तरी ते या स्थित्यंतरातही टिकून राहिले. साप्ताहिका पासून ते दैनिकापर्यंतची वाटचाल ज्ञान प्रकाशने अनुभवलेली आहे.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या भूमिका युद्घातील महत्त्वपूर्ण चळवळ म्हणजे असहकार चळवळ होय. या आंदोलनाने भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अग्रभागी असलेल्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या कार्यपद्धतीला नवी दिशा प्राप्त करून दिली. असहकार आंदोलनाची सुरुवात करून गांधीजींनी नैतिक आणि अध्यात्मिक सिद्वांताला राजकीय सत्याग्रह आंदोलनाचा आधार बनवून हिंसात्मक संघर्षाचे तंत्र प्रथमच राजकीय स्तरावर वापरले. या आंदोलनामुळे स्वातंत्र्याची चळवळ देशाच्या कानाकोप्यात पसरून जनतेचा स्वाभिमान व आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. त्यातून स्वातंत्र्याची भावना निर्माण होण्यास मदत झाली.[२]

रोलेट एक्ट, जालियनवाला बागेतील कत्तल आणि पंजाब मधील लष्करी कायदा यामुळे युद्व काळात दिलेल्या उदार आश्वासनांवर पाणी फिरवण्याचे काम ब्रिटिशांनी केले. सुधारणा कायद्याने मोजक्या भारतीयांचे समाधान झाले होते. तसेच पहिल्या महायुध्दानंतर तुर्कस्तान प्रश्नावर भारतात सुरु झालेल्या असहकार आंदोलनाच्या पार्श्वभूमी तयारी झाली. पहिला महायुद्वानंतर दैनंदिन गरजेच्या वस्तू महाग झाल्या. किंमत वाढल्यामुळे सर्वसामान्य जनतेचे मोठ्या प्रमाणात हाल होऊन जनतेत असंतोष निर्माण होऊ लागला. युद्वजन्य परिस्थितीमुळे शेतक्यांवर करायचा वाढता बोजा पडला.


*ISBN-978-93-49938-45-8*

अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे आंदोलने होऊ लागली. व्यापारी वर्गातही मोठ्या प्रमाणात नाराजीचा सूर निघत होता परिणामी या सर्वांनीच असहकार आंदोलनात महत्त्वपूर्ण योगदान दिले. अशा प्रकारे ब्रिटिश विरोधी जन आंदोलनाची पार्श्वभूमी तयार झाली दिनांक १ ऑगस्ट १९२० रोजी या आंदोलनास औपचारिक सुरुवात झाली दिनांक २२ जून १९२० रोजी व्हाईस राय ला लिहिलेल्या एका पत्रात गांधीजींनी आंदोलनाचा इशारा दिला होता. चुकीच्या मार्गाने राज्यकारभार करणाऱ्या राज्यकर्त्यांशी सहकार्य करण्यास नकार देण्याचा प्रजाजनांचा हक्क पूर्वपार परंपरेने चालत आलेला आहे, असे त्यांनी पत्रकार ठणकावून सांगितले. महात्मा गांधींनी सुरु केलेल्या असहकार आंदोलनात संघर्षात्मक व विधायक असे दोन पैलू होते. संघर्षात्मक कार्यक्रमात सरकारमान्य शाळा, महाविद्यालये, विधिमंडळे, कोर्ट-कचेऱ्या व परदेशी कापड यावरील बहिष्कार याला प्रमुख स्थान होते. याशिवाय सरकारने दिलेल्या सन्मानदर्शक पदव्या, किताब यांचा त्याग करावा आणि सरकारमार्फत भरविलेल्या दरबारात भाग घेऊ नये असे आव्हान करण्यात आले. आंदोलनाच्या विधायक कार्यक्रमात स्वदेशीचा विशेषता खादीचा अंतर्भाव होता. उत्पादनासाठी चरखे वाटण्याचे कार्यक्रम हाती घेण्यात आले. हिंदू मुस्लिम ऐक्य, दारूबंदीचा प्रचार, अस्पृश्यता निवारण इत्यादी विधायक कार्यक्रमांचा समावेश होता. आचार्य जावडेकर चळवळीच्या कार्यक्रमाविषयी असे म्हणतात, की पूर्वीच्या बहिष्कार युगाची तुटलेली साखळी असकाराच्या रुपाने जोडण्यात आली.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली लढल्या गेलेल्या असहकार चळवळीची दखल ज्ञानप्रकाश या वृत्तपत्राने देखील घेतली. ब्रिटिश सरकारच्या मते असहकारतावादी पक्ष लोक शहाणपणाने वागतील या एकाच आशेवर सरकारने सुरुवातीला असहकार चळवळीकडे दुर्लक्ष केले. परंतु दिवसेंदिवस तिचा भारतीय समाज मनावर वाढणारा प्रभाव बघून सरकारने दडपशाहीने चळवळ बंद पाडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. या चळवळीची सुरुवात करण्यामागे महात्मा गांधींचा ब्रिटिशांच्या मते सुरु असलेला देश विघातक मार्ग मान्य नसला तरी सरकारने आपल्या अधिकाऱ्यांच्या अरेरावीला आळा घातला पाहिजे या गोष्टीची सरकारने अंमलबजावणी करावी. असहकार चळवळीच्या वाढत्या प्रभावा विषयी सर कॉमर्सजी वाडिया म्हणतात, 'कायदा व सुव्यवस्था यांच्या नावाखाली अत्याचार करणाऱ्याकडे हिंदुस्तान सरकार जर दुर्लक्ष करेल तर सरकारशी असहकारिता करणाऱ्यांचा विश्वासही ढळमळणे संभवनीय आहे'. हे सरकारने लक्षात ठेवावे.[३] म्हणजेच सर कॉमर्सजी वाडीया यांना असकार चळवळीच्या माध्यमातून समाजामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये असे वाटते. त्याचप्रमाणे अहिंसक मार्गाने सुरु असलेल्या चळवळीच्या कार्यकर्त्यांकडून शांतता भंग होऊ नये असे त्यांना वाटते.

सदर चळवळीच्या प्रारंभा संदर्भात सरकारने काही वाटाघाटी कराव्या अशी अपेक्षा महात्मा गांधीना नव्हती. त्यासाठी वाटाघाटी शक्य न झाल्यास चळवळ सुरु करण्यासंदर्भातील अपरिहार्यतेचा

निर्वाणीचा खलिता महात्मा गांधींनी पाठवला होता त्यास व्हाईसरॉयने कोणत्याही प्रकारची दखल न घेता नुसतेच उत्तर पाठविले. अशा खलीत्याला महात्मा गांधींनी पुन्हा आपले उत्तर दिले. महात्मा गांधी म्हणतात की असहकार चळवळ म्हणजे दडपशाही व स्वातंत्र्य यामधील लढा होय. अशाप्रकारचे उत्तर महात्मा गांधींनी व्हाईसरॉय ला दिले. कारण भारतीय लोक आपल्या न्याय हक्कासाठी स्वातंत्र्याची मागणी करत होते. परंतु सरकारने दडपशाही सुरु केली. म्हणून असहकारितावाद्यांना नाईलाजाने सदर चळवळ सुरू करावी लागली असे महात्मा गांधींनी स्पष्ट केले. सरकारच्या अशा वर्तनामुळे चढाईचा कायदेभंग करणे दूरच पण बचावा करता कायदेभंग करणे जनतेला भाग पडल्याचे दिसते अशी महत्त्वपूर्ण मांडणी ज्ञानप्रकाशने केलेली आहे.

अहिंसात्मक मार्गाने सुरु असलेल्या असहकार्याला देशाच्या सर्व कानाकोपऱ्यातून पाठिंबा मिळत होता. चळवळ प्रचंड यशस्वी मार्गावर असताना गोरखपूर जिल्ह्यात चौरी चौरा येथे सरकारी पोलीस व असहकारितावादी यांच्यात धूम चक्री झाली व अहिंसात्मक मार्गाने चाललेल्या चळवळीस हिंसेचे गालबोट लागले त्यामुळे महात्मा गांधींनी सन १९२२ मध्ये असहकार चळवळ मागे घेतले ज्ञानप्रकाश वृत्तपत्रांनी सदर घटनेचा घेतलेला परांश असा महात्मा गांधींचे चिरंजीव मिस्टर देवदास गांधी हे स्वतः गोरखपूर येथे गेले आहेत. त्यांनी लीडरकडे पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की गोरखपूर येथील अत्याचारा संबंधाने सरकारने प्रसिद्ध केलेली बहुतेक माहिती खरी आहे. पोलीस सेक्रेटरी डेप्युटी सुपर कलेक्टर हे तेथे वेळीच येऊन त्यांनी शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. म्हणून कित्येक लोकांची जीव वाचले. नाही तर याहून भयंकर अनर्थ घडले असते. असहकारी पक्षाचे काही पुढारीही तेथे आले आहेत. पण त्यांना गोरखपूर जिल्ह्यत येण्यास अधिकाऱ्यांनी बंदी केली आहे. म्हणजेच या घटनेनंतर महात्मा गांधींच्या असे लक्षात आले की अगोदर असहकार लढ्याविषयी तिच्या कार्यक्रमाविषयी जनतेला पुरेसे प्रशिक्षण देणे गरजेचे होते. तसे न झाल्यामुळेच सदर घटना घडली आहे. म्हणून महात्मा गांधींनी असहकार चळवळ मागे घेण्याचा निर्णय घेतला.[४] असहकार चळवळ अचानक मागे घेण्याच्या महात्मा गांधींच्या निर्णयावर देशभरातून टीका होऊ लागली. ज्ञानप्रकाश वृत्तपत्राने देखील दिनांक १२ फेब्रुवारी १९२२ रोजी महात्मा गांधींचे नावे 'केव्हा उघडतील अशा आशयाचा संपादकीय लेख लिहिला, त्यामध्ये गांधीजींच्या वर गोरखपूर येथील अत्याचार संबंधाने टीका करण्यात आली. गोरखपुर जिल्ह्यात चौरी चौरा येथे कॉंग्रेसच्या स्वयंसेवकांच्या प्रभुत्वाखाली घडलेल्या अत्याचाराने येथील कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्षांचे डोळे उघडले गेले आहेत. तसेच चळवळीविषयी अज्ञानी जनतेमध्ये असहकारितेच्या चळवळीचे परिणाम कसे घातक होतात हे चौरिचौराच्या घटनेवरुन कळते. या राक्षशी अत्याचाराने गोरखपुर कॉंग्रेस पुढाऱ्यांचे डोळे उघडले आहेत. परंतु या खेळाची नैतिक जबाबदारी ज्यांच्या शिरावर येते त्या महात्मा गांधींचे डोळे केव्हा उघडणार अशा आशयाचा संपादकीय लेख लिहून टीकाटिप्पणी केलेली दिसते. अशा प्रकारे दिनांक


*ISBN-978-93-49938-45-8*

12 फेब्रुवारी 1922 रोजी असहकारितेची चळवळ संपुष्टात आली. गांधीजींच्या निर्णयाने काँग्रेसमध्ये काही लोकांमध्ये नाराजी झाली. पंडित मोतीलाल नेहरू, बॅरिस्टर चित्तरंजन दास, सुभाष चंद्र बोस यांनी त्यावर नाराजी व्यक्त केलेली आहे. जनतेचा राजकीय उत्साह मारून टाकण्याची टीका गांधीजींवर केली गेली. पण महात्मा गांधींना मात्र तत्वांचा बळी देऊन स्वराज्य मिळवणे मान्य नव्हते. वास्तविक राजकारणाला त्यांना नैतिक चौकट प्राप्त करून द्यावयाची होती. प्रसिद्ध ब्रिटिश साहित्यिक एक्स ले यांनी आपल्या एन्ड्स अँड मीन्स या ग्रंथात गांधीजींच्या साधन सूचीतेच्या तत्त्वांचा पुरस्कार केला आहे.

असहकार आंदोलनाच्या स्थगितीच्या निर्णयावर टीकेस उत्तर देताना गांधीजी लिहितात, अशा प्रकारच्या हिंसक घटनेमुळे भारतीय जनता अहिंसक लढ्यासाठी सज्जन असल्याचे दिसते. अनेक ठिकाणी अशा घटना घडल्यास त्यास आवर घालण्याचे निमित्त करून सरकार दमन निधीचा कठोर उपाय करील आणि त्यामुळे होणारे अत्याचार हाल अपेष्टा सामान्य माणसाला सोसणे शक्य होणार नाही. एकदा नैतिक धैर्य खचले की सरकार विरोधी लढ्यात सामील होण्यास जनता दजावत नाही म्हणून निर्णय तडकाफडकी बदला आंदोलन माघारी घेण्याच्या मुद्द्याचे समर्थन करताना महात्मा गांधी म्हणतात की आंदोलन हिंसात्मक होण्यापासून वाचवण्यासाठी मी अनेक अपमान यातना बहिष्कार तसेच मृत्यूही पत्करेल. यावरून महात्मा गांधींच्या मनावरील अहिंसेचा प्रभाव स्पष्ट जाणवतो.[५] यावरून राष्ट्रवादी भावना जोपासण्याबाबत ज्ञानप्रकाश वृत्तपत्राने मोलाची कामगिरी केलेली आहे. ज्ञानप्रकाश वृत्तपत्राने अनेक विषयांवर मौलिक मार्गदर्शन केलेले आहे.

असहकार आंदोलन हे भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण आंदोलन होते. लोकांच्या मनावर ताबा मिळवून ब्रिटिशांच्या धुरीनत्वाला सुरुंग लावण्याचे कार्य या चळवळीने केले. लोकांची मने राजकारणाने भारावून त्यांना कृती प्रवण करण्याचे कार्य याद्वारे करण्यात आले. सत्य ,अहिंसा, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण या तत्त्वांच्या आधारे मातीतील प्रश्नांना मातीतच उत्तरे शोधण्याचा प्रयत्न गांधीजींनी करून एक प्रकारे ब्रिटिशांच्या विरोधी भूमिका युद्धच पुकारले. हे सत्य आहे की या आंदोलनाने स्वराज्य मिळविण्यास अपयश आले असले तरी चळवळीच्या कार्यक्रमामुळे आत्मिक शक्ती व भौतिक शक्ती मधील संघर्षाने जनतेमध्ये त्यांच्या राजकीय अधिकाऱ्यांबाबत जागृती निर्माण झाली. या आंदोलनाने जे जे एका वर्षात मिळवले ते यामागील काळात मिळवता आले नाही म्हणून असहकार आंदोलनाची दोन वर्ष भारतीय इतिहासातील भारतीय राष्ट्रवादाची महत्त्वाची वर्ष होती की जेव्हा संपूर्ण भारत ब्रिटिशक्ती विरुद्ध उभा राहिला.

## निष्कर्ष

- ज्ञानप्रकाशने राजकीय सामाजिक आर्थिक आणि इतर क्षेत्रातील बातम्या लोकांपर्यंत पोहोचविल्या.

- या बातम्या पोहोचविताना राष्ट्रवादी वृत्तीही जोपासली.
- वृत्तपत्र स्वातंत्र्याचे भान ठेवले स्वातंत्र्य आंदोलनाला पूरक भूमिका घेताना वेळप्रसंगी परखड चिकित्साही केली.
- ज्ञानप्रकाश वृत्तपत्राने आंतरराष्ट्रीय घडामोडींचा वेध घेऊन आंतरराष्ट्रीय राजकारणाची जाणीव करून देण्याचे काम केले आहे.
- ज्ञानप्रकाश वृत्तपत्र 31 डिसेंबर 1950 रोजी शेवटचा अंक प्रसिद्ध करून बंद होणार अशी जेव्हा बातमी प्रसिद्ध झाली त्यावेळी वेगवेगळ्या वृत्तपत्रांनी हे वृत्तपत्र बंद करणे अशी भूमिका घेतलेली दिसते. कारण या वृत्तपत्राचे कार्य लोकप्रियता, सत्यनिष्ठता कार्यपद्धती खूप चांगली होती. त्यामुळे लोकांनी ते बंद करणे असा आग्रह धरला. यावरून ज्ञानप्रकाश या वृत्तपत्राच्या कार्याची ओळख होते.
- ज्ञानप्रकाशकारांना देश बांधवांमध्ये ऐक्य निर्माण करायचे होते. त्यासाठी वृत्तपत्र हे राष्ट्रीय जागृतीचे प्रभावी साधन ठरेल असे त्यांना वाटत होते. त्यांच्या माध्यमातूनच लोक मताची जाणीव सरकारला करून देऊ शकतो असा विश्वास त्यांना होता.
- ज्ञान, मनोरंजन आणि जागृती या तिहेरी अंगाने आपले वृत्तपत्रीय कार्य पार पाडले.

### *संदर्भ*

1. रा.के. लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे द्वितीय आवृत्ती ऑगस्ट 2007 पृ. 9
2. जावडेकर श.द., आधुनिक भारत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ,2001पृ.215
3. ज्ञानप्रकाश, पुणे दिनांक 10 फेब्रुवारी 1922 अग्रलेख पृ.2
4. किता, पृ.2
5. बिपन चंद्र, भारताचा स्वातंत्र्य संघर्ष, के. सागर प्रकाशन, पुणे 2003 पृ. 216
6. कित्ता, पृ. 216


*ISBN-978-93-49938-45-8*

# महात्मा जोतीराव फुले यांचे मानवी हक्क आणि सामाजिक सुधारणेतील योगदान

**प्रा. प्रवीण बाळासाहेब मोरे**
के.जे. सोमैया महाविद्यालय, कोपरगाव
Email:

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19765352
*DOI:* *10.5281/zenodo.19765352*

## १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील परिस्थिती

१९ वे शतक हे प्रामुख्याने सुधारणांचे शतक म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रामध्ये इ.स. १८१८ नंतर सामाजिक सुधारणा चळवळीचा इतिहास दिसू लागतो. या काळातील महाराष्ट्राचा विचार केला तर, या काळात स्त्रीयांना, अस्पृश्यांना, शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कापासून जाणूनबुजून दूर ठेवले होते. जातीप्रथा प्रभावीपणे पाळली जात होती. अंधश्रद्वा, रुढी, परंपरा यांसारख्या गोष्टी मोठ्या प्रमाणावर पाळल्या जात होत्या. अस्पृश्य आणि तळागाळातील लोकांना समाजात मनाचे स्थान नव्हते. स्त्रियांची स्थिती करुणाजनक बनलेली होती. स्त्रियांना, विधवांना शिक्षणाचा कुठलाही अधिकार नव्हता. त्यांचे सर्व हक्क नाकारले गेले होते. बालविवाह, पुनर्विवाह अमान्य, हुंडा पद्धती या प्रथांमुळे स्त्रियांना समाजात जगणे असह्य झाले होते. अस्पृश्यता प्रथा, बहुपत्नीत्व प्रथा, विधवा केशवपन, अशा अनिष्ट प्रथा समाजात मूळ धरून होत्या. अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणे, धर्मस्थळे, देवळात प्रवेश नव्हता. अनिष्ट प्रथा परंपरांचे स्तोम माजलेले होते. भारतात १९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळापासून एका नवयुगाची सुरुवात झाली. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त होऊन ब्रिटीशांचे राज्य भारतात सुरु झाले. त्यांनी भारतात इंग्रजी शिक्षण सुरु केले. आणि यातूनच भारतात अस्तित्वात असलेल्या या रुढी परंपरांना दूर सारून समाजातील सर्व घटक, दलित, अस्पृश्य यांना बरोबर घेऊन एका नवीन समाजाच्या उभारणीसाठी काहीजण पुढे आले. यातीलच एक म्हणजे महात्मा जोतीराव फुले हे एक होय. ज्यांनी स्त्रिया, शेतकरी, कामगार, अस्पृश्यता आणि दलितोद्वारासाठी आपले संपूर्ण जीवन वाहिले.

## जीवन परिचय

महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म इ.स. १८२७ मध्ये पुणे येथे झाला. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. त्यांचे मूळ नाव 'गोऱ्हे' हे होते. त्यांचे वडील गोविंदराव आणि आई चिमणाबाई पुण्यात वास्तव्यास होते. त्यांचा फुलांचा व्यवसाय असल्याने त्यावरुनच त्यांचे नाव 'फुले' असे पडले होते. त्यांचे शिक्षण स्कॉटीश मिशनच्या इंग्रजी शाळेत झाले. महात्मा फुले यांच्यावर

थॉमस पेनच्या विचारांचा प्रभाव होता.

## महात्मा फुलेंनी समाज सुधारणेसाठी केलेले कार्य

- **स्त्री हक्कासाठी केलेले कार्य**

१९ व्या शतकामध्ये स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय बनलेली होती. या काळात महाराष्ट्रातच नाही संपूर्ण देशभरात स्त्रियांना कुठेही शिक्षणाची सुविधा नव्हती. स्त्रीला शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. शिक्षण ही फक्त पुरोहित वर्गाचीच मक्तेदारी होती. शिक्षणाला मूलभूत मानवी हक्क मानून शिक्षण हे सर्वांसाठी खुले असावे असा आग्रह धरला. महात्मा फुलेंनी सर्वात अगोदर आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले आणि स्त्रियांच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांनी त्यांच्यावर सोपविली. पुरुषप्रधानता व जातिव्यवस्थेच्या या दोन्हीच्या कात्रीत सापडलेल्या मुलींसाठी इ.स. १८४८ मध्ये पुण्यातील भिडेवाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली[१]. यानंतर त्यांनी अनेक शाळा उघडल्या आणि स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांनी सुरु केलेल्या या शाळांना अनेक सुशिक्षितांनी मदत केली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी त्यांच्या मुला मुलींनी, कारागिरांनी, अस्पृश्य बांधवांच्या मुलांनी शाळेत यावे त्यांनी शिक्षण घ्यावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. स्त्रियांना समाजात पुरुषांच्या बरोबरीने हक्क, अधिकार मिळावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भारतीय समाजात पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या बालविवाह प्रथा, जरठबाला विवाह प्रथा, केशवपन, विधवा स्त्रियांना जगावे लागणारे कुंठीत जीवन या सर्व गोष्टींना त्यांनी विरोध केला. बहुपत्नीत्व प्रथा( एकापेक्षा जास्त बायका करणे) लहान वयात मुलींचा विवाह करणे या गोष्टीवर या बंधने घालणारा कायदा असावा असे त्यांना नेहमी वाटत. त्यादृष्टीने त्यांनी प्रयत्न देखील केले होते. विधवांसाठी आश्रम सुरु करून त्यांना सन्मानाने जगण्याचा हक्क त्यांनी मिळवून दिला. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना देखील केली. त्यांनी स्वतः एका विधवा स्त्रीच्या मुलाला दत्तक घेतले व त्याचे नाव 'यशवंत' असे ठेवले. स्त्रियांना शिक्षण मिळाले पाहिजे तसेच स्त्रिया व शूद्र-अतिशूद्र यांना शिक्षण नाकारणे हे अमानवी असल्याचे मत त्यांनी मांडले. त्यांचे हक्क त्यांचे अधिकार त्यांना मिळाले पाहिजे हा त्या काळातील क्रांतिकारक विचार त्यांनी मांडला. १८५५ साली 'तृतीय रत्न ' हे नाटक लिहिले. 'शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे', हा संदेश त्यांनी या नाटकातून दिला.

- **अस्पृश्यांचे हक्क व अस्पृश्यता निर्मूलनासाठी केलेले कार्य**

अस्पृश्यता व जातीभेद ही १९ व्या शतकातील एक महत्वाची समस्या बनलेली होती. अस्पृश्य समाजातील लोकांना तळागाळातील लोकांना समाजात मानाचे स्थान नव्हते. त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. कित्येक पिढ्यांपासून ते शिक्षणापासून वंचित राहिलेले होते. सार्वजनिक ठिकाणे, पाणवठे, मंदिर अशा ठिकाणी त्यांना प्रवेश नव्हता. एकूणच या काळात भारतीय समाजाला


ISBN-978-93-49938-45-8

अस्पृश्यतेच्या समस्येने पोखरून काढले होते. त्यांना त्यांच्या हक्कापासून दूर ठेवण्यात आले होते. 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा असूड' यांसारख्या ग्रंथांतून शोषितांच्या हक्कांवर त्यांनी प्रकाश टाकला. बहुजन समाजातील लोकांनी शिक्षण का घ्यावे हे सांगताना ते म्हणतात कि, त्यांना चांगल्या प्रतीचे शिक्षण देऊन तिजपासून त्यास आपले बरेवाईट समजण्याची शक्ती यावी यासाठी त्यांनी शिक्षण घ्यावे. शिक्षणाबाबत जोतीरावांचे असे मत होते की, 'कनिष्ठ वर्गातील लोकांना शिक्षण दिल्याने मानवी मुलभूत हक्कांसाठी झगडण्यास ते तयार होतील'[२]. बहुजन समाजतील लोकांनी शिक्षण घ्यावे व आपले हक्क अधिकार जाणून घ्यावे यासाठी ते प्रयत्न करत होते. जातीभेदाच्या समस्येने एक विशिष्ट वर्ग होरपळून निघाला होता. महात्मा फुले यांनी त्यांना त्यांचे हक्क, अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला. पुरोहित वर्गाच्या वर्चस्वाला त्यांनी विरोध केला. दलित बांधवांच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी यासाठी त्यांनी दलित व मागासवर्गीय मुलांसाठी मुलांसाठी शाळा सुरु केल्या. समाजात असलेली असमानता, अस्पृश्यतेच्या प्रथेविरोधात त्यांनी आवाज उठविला. इ.स. १८६८ मध्ये आपल्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यासाठी खुला केला. सर्वांना समान शिक्षणाचा हक्क मिळावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. 'गुलामगिरी' या ग्रंथातून जातीय गुलामगिरीचे वास्तव उघड करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. इग्रजी राजवटीकडे या परंपरा प्राप्त गुलामगिरीतून मुक्त होण्याची एक चांगली संधी या दृष्टीने ते पाहत होते'[३]. बहुजन वर्गातील अज्ञान निरक्षरता पूर्वग्रह आणि जातीविषयक दृढबंधने दूर करून परंपरागत मानसिक गुलामगिरीतून व पुरोहितांच्या प्रभावातून कनिष्ट वर्गाला मुक्त करावे असा त्यांचा विचार होता. देशातील अस्पृश्य समाजातील लोकांत शिक्षणाची गोडी निर्माण केलीच पाहिजे असा त्यांनी निश्चय केला.आणि इ.स. १८५१ साली पुणे मुक्कामी नाना पेठेत अस्पृश्यांची पहिली शाळा सुरु केली[४]. त्यांनी "विद्या शिकताच पावाल ते सुख | घ्यावा माझा लेख | जोती म्हणे ||" असा स्त्री शुद्राती शूद्रांना उपदेश करून सर्व प्रकारच्या गुलामगिरीविरुद्ध निशाण फडकावले.[५]

- **शेतक्यांच्या हक्कासाठी दिलेला लढा शेतकरी उद्धारासाठी केलेले कार्य**

१९ व्या शतकात शेतक्यांची स्थिती अतिशय वाईट बनलेली होती. 'शेतक्यांचा असूड' या ग्रंथाच्या सुरुवातीलाच त्यांनी शुद्रांची अज्ञानामुळे कशी दुरवस्था झाली हे स्पष्ट केले आहे. 'शेतक्याचा असूड' या ग्रंथातून शेतक्यांच्या मानवी हक्कांबाबतची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. 'शेतक्यांचा असूड' या ग्रंथातून त्यांनी शेतक्यांच्या दयनीय अवस्थेचे हुबेहूब चित्र रेखाटले आहे. चैनी जीवन जगणाऱ्या ब्रिटीश सरकार आणि त्यांच्या अधिकारी वर्गाला शेतक्यांशी काही घेणे देणे नाही. या अधिकाऱ्यांना शेतकरी आणि शुद्रातीशुद्राबद्दल अजिबात कळवळा नाही. सावकार, सरकारी नोकरीतील कामगार यांच्या शोषणामुळे शेतक्यांची परिस्थिती भयावह बनली. या पिडीत आणि शोषित शेतक्यांचे जीवन तसेच त्यांच्या समस्या त्यांनी 'शेतक्यांचा असूड', 'गुलामगिरी' या ग्रंथात मांडल्या. व्याज,कर,

शेतसारा, दक्षिणा यामुळे शेतकरी पार खचून गेला होता. त्याला दारिद्र्यात जीवन जगावे लागले.अज्ञानामुळे त्याच्यावर ही वेळ आली. शेतकरी हा खरा अन्नदाता असूनदेशाच्या ख्ऱ्या सुधारणेसाठी सरकारने त्यांना शिक्षण द्यावे, शेतीसाठी सोई सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, सुधारणा कराव्यात,शेतीसाठी पाणी व्यवस्था करावी. विहिरी, नदी, शेतपीके औजारे, शेतक्ऱ्यांसाठी जोडधंदा, शेतकी शाळा यासारख्या सोयी सुविधा शेतक्ऱ्यांना द्याव्यात[६]. संकटात सापडलेल्या शेतक्ऱ्यांना सर्वोतोपरी सहकार्य करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे असे त्यांनी मत मांडले. यासाठी त्यांनी सरकार दरबारी शेतकरी वेशात जाऊन शेतक्ऱ्याच्या समस्या मांडल्या. शेतक्ऱ्यांचा असूड या ग्रंथातून शेतक्ऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम महात्मा फुलेंनी केले.

- **सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून पिडीत व शोषितांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी केलेले प्रयत्न**

भारतीय समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी महात्मा फुलेंनी वर्षानुवर्षे दुःखाच्या खाईत लोटलेल्या तळागाळातील लोकांना त्यांचे हक्क त्यांचे अधिकार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. भारतीय समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी ज्या सामाजिक धार्मिक सुधारणा चळवळी सुरु झाल्या होत्या त्यात सत्यशोधक समाजाची भूमिका देखील अतिशय महत्वाची होती. २४ सप्टेंबर १८७३ मध्ये महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाने समाज जागृतीचे कार्य केले. या समाजाच्या माध्यमातून त्यांनी पुरोहित वर्गाच्या वर्चस्वाला विरोध केला. ते म्हणतात 'सर्वसाक्ष जगत्पती । त्याला नको मध्यस्थी'. त्यांनी धर्मातील ढोंगीपणा, पुरोहित वर्गाकडून होणारी शेतकरी आणि शुद्रांची फसवणूक यावर हल्ला केला. धनंजय कीर यांच्या मते, "महाराष्ट्रातील ग्रामीण भागात राहणाऱ्या मागासवर्गीय आणि वंचित घटकांना शिक्षण देणारी, सत्यशोधक समाज ही पहिली संस्था होती." सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी दालितोद्वार, स्त्रियांच्या व शेतक्ऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी लढा उभारला. या कामी त्यांना त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांचे देखील मोलाचे सहकार्य लाभले. ब्राम्हणांचे कसब, गुलामगिरी या ग्रंथातून त्यांनी प्रचलित समाज व्यवस्थेवर प्रहार केला. कनिष्ठ जातीतील लोकांनी संघर्ष केल्याशिवाय त्यांचे न्याय्य हक्क त्यांना मिळणार नाही असे त्यांचे मत होते आणि संघर्ष करण्यासाठी बहुजनाची संघटना असावी या उद्देशाने पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातूनच त्यांनी अन्याय तसेच धर्माच्या नावावर चाललेले शोषण याविरुद्ध आवाज उठविला.

## समारोप

महात्मा ज्योतीराव फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य पिडीत, शोषित आणि अंधाराच्या खाईत बुडालेल्या दीनदुबळ्या बहुजन समाजाच्या उद्धारासाठी वाहिले.बहुजन समाजात जनजागृती घडवून


*ISBN-978-93-49938-45-8*

आणली व त्यांचे हक्क , अधिकार यांची जाणीव या लोकांना करून दिली. ज्या महिलांना घराबाहेर पडण्याची परवानगी नव्हती, शिक्षणापासून वंचित राहावे लागत होते अशा महिलासाठी शिक्षणाची कवाडे त्यांनी खुली करून दिली. शेतकऱ्याचा असूड, गुलामगिरी, ब्राम्हणाचे कसब, सार्वजनिक सत्यधर्म, इशारा, अस्पृश्यांची कैफियत या ग्रंथामधून त्यांनी शेतकरी, स्त्रिया, अस्पृश्यांच्या समस्या सर्वांसमोर मांडल्या. शेतकऱ्यांची दुःखे सरकारने कशी वेशीवर टांगली आहे, उच्चवर्णीय व सरकरी अधिकारी शेतकऱ्यांचे कसे शोषण करतात हे त्यांनी 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथातून दाखवून दिले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर भर देऊन त्यांच्या समस्या पोटतिडकीने ब्रिटीश सरकार दरबारात मांडणारे ते पहिले सुधारक होते. हंटर कमिशन पुढे साक्ष देऊन बहुजन समाजाची शिक्षणाची जबाबदारी सरकारने उचलली पाहिजे असे म्हणणारे ते पहिले नेते होते. 'गुलामगिरी' या ग्रंथातून त्यांनी जातीय गुलामगिरीचे वास्तव लोकांसमोर मांडले. स्त्रियांना समाजात सन्मानाची वागणूक मिळावी यासठी त्यांनी प्रयत्न केले. बालविवाह, केशवपन, जरठबाला विवाह, विधवांच्या समस्या सोडविण्यावर भर दिला. एकूणच भारतीय समाज सुधारणेच्या क्षेत्रात महात्मा फुले यांचे योगदान अतिशय महत्वपूर्ण आहे.

### *संदर्भ*

1. महात्मा जोतीराव फुले, महाराष्ट्र चरित्र- ग्रंथमाला, उमेश बगाडे, गंधर्व वेद प्रकाशन,२०१० पृ. ३७.
2. जोतीचरित्र, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, नॅशनल बुक्स ट्रस्ट, इंडिया १९९१ पृ. १५
3. १९ वे शतकः सुधारणावाद व मराठी साहित्य, डॉ सुधाकर शेलार,स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद २००८, पृ. ६३.
4. महात्मा जोतीराव फुले, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, श्री प.स.पाटील, १९८५ पृ. १७.
5. डॉ अ. नाईकवाडे, युगप्रवर्तक महात्मा फुले, गौरवग्रंथ, विद्याभारती प्रकाशन,लातूर, २०१२ पृ. ७४.
6. महात्मा जोतीराव फुले यांचे चरित्र, पांडुरंग बालाजी कवडे, यशवंत प्रिंटींग प्रेस, नाशिक पृ. १२१.

# मलिक अंबर आणि गनिमी युद्धतंत्र: एक चिकित्सक अभ्यास (1549 ते 1626 )

**प्रा. डॉ. राम निवृत्ती मोरे**

नायगाव एज्युकेशन सोसायटी मुंबईचे, दौंड तालुका कला व वाणिज्य महाविद्यालय दौंड जि. पुणे

Email: moreram46@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19765540

*DOI: 10.5281/zenodo.19765540*

## पूर्व चरित्र

अहमदनगरच्या निजामशाहीतील एक कर्तबगार आणि मुत्सद्दी वजीर त्याचा जन्म एका सामान्य हबशी (अबिसीनीयन) कुटुंबामध्ये झाला. चंगेज खानाच्या आकस्मित मृत्यूनंतर मलिक अंबरची पुढील वीस वर्ष अहमदनगर आणि विजापूर येथील शाही फौजेत एक सामान्य शिपाई म्हणून चाकरी करण्यात गेली. त्यावेळी त्याने चांदबिबीला मदत करून बहादूर निजामशाहाला (1595 ते 1600) गादीवर बसवण्यास सक्रिय सहाय्य केले व मुघलांचा प्रतिकार केला.[१] पुढे मलिक अंबरने आपल्या पराक्रमाने 150 घोडेस्वारांच्या पथकाचे सेनापती पद मिळवले. निजामशाहीतील अंतर्गत कलहामुळे त्यास संधी मिळाली व त्याने दोन ते चार हजार सैन्य जमवून निजाम शाहीत प्रवेश केला. तो मुघलांचा प्रतिकार करु लागला. चांदबिबीच्या खुनानंतर मुघलांनी अहमदनगर ताब्यात घेतले. (16 ऑगस्ट 1600) आणि बहादूरशाहाला कैद करून पुढे गाल्हेरच्या किल्ल्यात ठेवले.[२] (1607) मुघलांशी मुकाबला करण्यासाठी त्यांनी दुसरा इब्राहिम आदिलशहा बरोबर मैत्रीचा करार केला. आदिलशहाने सुरुवातीला अंबरला सहकार्य देऊन मुघलांचा पराभव करून तह केला.( 1610) त्यानंतर अहमदनगर व व्हाड हे भाग मुघलांपासून परत मिळवले. राजधानीचे ठिकाण दौलताबाद येथे नेले. या प्रतिकार व लढ्यात लखुजी जाधव व मालोजीराजे भोसले व शहाजीराजे भोसले या मराठा सरदारांचे गनिमी युद्ध तंत्र त्यास उपयोगाचे ठरले.[३] गनिमी युद्धतंत्रचे कौशल्य हे मुळात मराठा सरदारांकडेच होते. मालोजीराजे भोसले आणि शहाजीराजे भोसले हे गनिमी युद्ध तंत्राच्या लढ्यात निष्णात होते. मराठा सरदारांना गनिमी युद्ध तंत्राने लढणे नवीन नव्हते. मलिक अंबरने आपल्या मुसद्देगिरीचा वापर करून मराठा सरदारांच्या साह्याने निजामशाहीचा राज्यविस्तार करून प्रशासन व्यवस्था अधिक कार्यक्षम केली. 1595 ते 16231 या काळात निजामशाही दरबारात हुकूमत गाजवणारा मुख्य प्रधान/ वजीर म्हणून आपला वेगळा ठसा त्याने उमटवला. जमीन महसुलाच्या बाबतीत अनेक सुधारणा केल्या. मलिक अंबर ने"अंबरीधारा "व्यवहारात आणली. दौलताबाद जवळ खडकी हे नवीन शहर वसवले.



*ISBN-978-93-49938-45-8*

## गनिमी युद्धतंत्र

शत्रु सैन्यावर झपाट्याने हालचाली करणे, शत्रू सैन्याची रसद तोडणे, शत्रूची संपत्ती लुटणे, शत्रू सैन्याला विस्कळीत करणे हे मराठा सैन्याची अंगभूत वैशिष्ट्य होते. दक्षिणेत गनिमी युद्धाची पद्धत परंपरेने चालत आलेली होती. मुस्लिम सैन्य व सरदारांना ही पद्धती अवगत नव्हती. मुघलांना व्हाड अहमदनगर व बालाघाट मध्ये आपली सत्ता मजबूत करण्यास अजिबात संधी मिळणार नाही याची मलिक अंबरने काळजी घेतली होती. त्यासाठी त्याला मराठा सरदारांचा व त्यांच्या सैन्याचा अतिशय उपयोग झाला.[४] मराठा सरदारांच्या साह्याने गनिमी युद्धतंत्राचा प्रभावी वापर करून अनेक लढाया मलिकअंबर ने जिंकल्या सुरुवातीच्या काळात 1601 अब्दुल रहीम खान इ खाना हा मुघल सैन्याचा दक्षिणेतील सेनापती अत्यंत चतुर आणि मुत्सद्दी, राजनीतिज्ञ आणि कुशल सेनापती होता.1601 मध्ये त्यांने तेलंगणातील नांदेड येथे मलिक अंबरचा पराभव केला. मात्र नंतरच्या काळात दोघांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित झाले. दोघांमध्ये सहकार्याचा करार झाला.[५] याच काळात अहमदनगरच्या निजामशाहानीत मालोजीराजे भोसले यांना पुणे परगण्याची जहागिरी दिली. (1595 )पुढे मालोजीराजांच्या मृत्यूनंतर (1606) शहाजीराजांना निजामशाहीतील मनसबदारी मिळाली.[६] मोलोजी राजे हे मलिक अंबरचे अत्यंत विश्वासू सहकारी होते. पुढे हे स्थान शहाजीराजांना मिळाले. मालोजीराजांची दोन मुले शहाजी व शरीफजी तसेच विठोजी राजे( मालोजी राजे यांची धाकटे बंधू )यांची आठ मुले संभाजी खेळूजी, मल्लाजी, मुंबाजी ,नागोजी, परसोजी, त्रंबकजी व वक्काजी हे मलिक अंबरच्या पक्षात राहून निजामशाहीचे संरक्षण करत होते.[७] आपल्या पराक्रमाने निजामशाहीतील सरलष्कर या पदापर्यंत शहाजीराजे पोचले. फार कमी मुस्लिमेतर सरदारांना दिला जाणारा हा किताब निजामशाहीत शहाजीराजांना दिला गेला. पुढे आदिलशाही देखील त्यांचा पराक्रम लक्षात घेऊन भातवडीच्या लढाईनंतर 1624 त्यांना सरलष्कर हा किताब देण्यात आला. आदिलशाहीतील ते पहिले मराठा सरदार होते की ज्यांना सरलष्कर हा किताब देण्यात आला.[८] लखुजी जाधव मालोजी राजे व शहाजीराजे भोसले यांना निजामशाहीतील स्थान कायम राहिले. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांच्याकडे असलेलं युद्ध कौशल्य गनिमी युद्धतंत्र हे होय. या युद्धतंत्राचा प्रभावीपणे वापर निजामशाह व आदिलशहाने वेळोवेळी करून घेतला. त्यामुळेच मुघलांना दक्षिणेकडील प्रदेशावर पूर्णतः वर्चस्व कधीही मिळवता आले नाही.

युद्धनीतीचा एक भाग म्हणून अकबराच्या मृत्यूनंतर सलीम तथा जहांगीर खुसरोच्या बंडाचा बिमोड करण्यात गुंतल्याच्या संधीचा फायदा घेऊन मलिक अंबरने मुघलांना व्हाड, बालाघाट आणि अहमदनगर मधून बाहेर उसकावून देण्याची एक जबरदस्त लष्करी मोहीम उघडली.1608 मध्ये जहांगीराने पुन्हा एकदा अब्दुल रहीम खान इ खाना वर दक्षिणेची जबाबदारी सोपवली. फक्त दोन वर्षाच्या काळातच मलिक अंबरने जिंकलेले सर्व भूप्रदेश परत जिंकून आणू इतकेच नव्हे तर

विजापूरलाही शाही साम्राज्यात म्हणजेच मुघल साम्राज्य सामील करू असे अशक्य कोटीतील आश्वासन त्याने बादशाह दिले. हे संकट उभे राहताच मलिक अंबरने आदिलशहाची मदत घेतली. विजापूरच्या पाठिंब्याने आणि मराठ्यांच्या सक्रिय मदतीने मलिक अंबरने लवकरच खान इ खानाला ब्हाणपूर पर्यंत माघार घेण्यास भाग पाडले. अकबर आणि दक्षिणेत मिळवलेला सर्व भूप्रदेश 1610 पर्यंत मलिक अंबरने ताब्यात घेतला. नंतर जहांगीराने शहजाद परवेजला म्हणजेच आपल्या मुलाला एका विशाल फौजेसह दक्षिणेत स्वारीवर पाठवले. परंतु तो मलिक अंबरने उभ्या केलेल्या आव्हानाचा सामना करू शकला नाही. इतकेच नव्हे तर मुघलांना अहमदनगर सुद्धा गमवावे लागले. शहादा परवेज ला मलिक अंबर बरोबर अपमानास्पद अटीवर तह करावा. लागला.[१] पुढे 1611 मध्ये जहांगीराने दख्खनला दोन सैन्याच्या तुकड्या रवाना केल्या. त्यातील एका सैन्याच्या तुकडीचे नेतृत्व खान जहाँ लोधीकडे सोपवण्यात आले. त्यात राजा मानसिंगाचाही समावेश होता. दुसऱ्या सैन्य तुकडीचे नेतृत्वअब्दुल्ला खान यांच्याकडे होते. दोन्ही सैन्य दोन बाजूंनी हल्ला करतील व दौलताबाद जवळ एकत्र येतील अशी रचना ठरली होती. परंतु आपसातील स्पर्धा, वाद आणि सामंजस्याचा अभाव यामुळे ही मोहीमही पूर्णता अपयशी झाली. यामुळे मलिक अंबरच्या प्रगतीची घोडदोड तशीच सुरु राहिली. जोपर्यंत त्याला मराठ्यांचा व दक्षिणेतील अन्य घटकांचा खंबीर पाठिंबा होता तोपर्यंत मुघल आपले गमावलेले भूप्रदेश पुन्हा जिंकू शकले नाहीत. परंतु पुढे मलिक अंबरचा स्वभाव अहंकारी बनल्यामुळे त्यांनी आपल्या ब्याच मित्रांचे समर्थन गमावले. खान इ खानाची दक्षिणेचा सुभेदार म्हणून पुन्हा जहांगीराने नेमणूक केली. खान इ खानाने नव्याने निर्माण झालेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन हबशी सरदारांना व मराठा सरदारांना (जगदेवराय, बाबाजी काटे, उदाजीराव, मालोजी व कानोजी भोसले) यांच्यासारख्या मराठा सरदारांना आपल्या बाजूला वळवले. स्वतः जहांगीरानलाण देखील मराठा सरदारांचे महत्त्व माहित होते. जहांगीरने आपल्या आठवणी मध्ये मराठ्यांचे केलेले निरीक्षण नोंदवून ठेवलेले अआहे. त्यात त्याने म्हटले आहे की 'मराठे हे कठोर परिश्रम घेणारे आणि दिलदार स्वभावाचे पराक्रमी लोक आहेत आणि त्या प्रदेशातील विरोधकांचे प्रमुख केंद्रबिंदू आहेत.' मराठा सरदारांच्या साह्याने खान इ खानाने 1616 मध्ये अहमदनगर, विजापूर व गोवळकोंड्याच्या संयुक्त सेनेचा पराभव केला. यावेळी मुघलांनी निजामशाहीची राजधानी असलेले खडकी हे शहर काबीज केले. या पराभवामुळे मुघलांविरुद्धच्या दक्षिण आघाडीला मोठा हादरा बसला. या विजयाला पूर्ण आकार देण्यासाठी 1617 मध्ये जहांगीराने आपला मुलगा शहाजान उर्फ खुर्रम यांच्या नेतृत्वाखाली एक विशाल सैन्याची रवानगी केली. यावेळी मलिक अंबरला मुघलांबरोबर तह करावा लागला. अकबराने पूर्वी जिंकलेल्या प्रदेशाव्यतिरिक्त कुठल्याही प्रदेशाची मागणी जहांगीराने यावेळी केली नाही. यामागील मुख्य कारण म्हणजे जहांगीराला दक्षिणेत अधिक जबाबदारी वाढवायची नव्हती.


*ISBN-978-93-49938-45-8*

तसेच दक्षिणेत गुंतूनही पडायचे नव्हते. यामागे त्याने व्यवहारिक चातुर्य वापरले. आदिलशहाला फर्जद (मुलगा) असे संबोधन एक आशीर्वाद पर फर्मान पाठवले. विजापूरला आपल्या पक्षात घेण्याचा प्रयत्न केला.१६ निजामशाहीतील अनागोंदीमुळे व कटकारस्तानाला कंटाळून लखोजीराजे मुघलांकडे निघून गेले. त्यानंतर अल्पावधीतच 1624 ला भातवडीची प्रसिद्ध लढाई झाली. लखुजीराव व उदाराम यांनी या लढाईत मुघलांच्या बाजूने भाग घेतला. मात्र प्रत्यक्ष लढाईमध्ये जाधव व उदाराम यांच्या फौजा लढा न देताच निघून गेल्याचा उल्लेख इकबाल लाम्यातील वर्णनांमध्ये आढळतो. संख्येने कमी असलेल्या निजामशाही फौजांनी आदिलशहा व मुघल फौजाचा अतिशय दारुण पराभव केला. या युद्धात शहाजीराजांनी प्रचंड पराक्रम गाजवून विजयश्री खेचून आणली. याच युद्धामुळे शहाजीराजांचे नाव सर्वतोमुखी झाले.[१०] भातवडीच्या लढाईनंतर निजामशाही दरबारातील अंतर्गत कट कारस्थानाला कंटाळून शहाजीराजे आदिलशाहीत दाखल झाले. शहाजीराजे आदिलशाही दाखल झाल्याचा आनंद आदिलशाला इतका झाला की त्यांने आज पावेतो कुठल्याही हिंदू सरदाराला न दिला गेलेला सरलष्कर हा किताब शहाजीराजांना देऊन त्यांचा बहुमान केला.१८ एकूणच या सर्व विश्लेषणावरुन गनिमी युद्धतंत्र हे मराठ्यांचेच युद्धतंत्र असून मराठी सरदारांच्या माध्यमातून याचा प्रभावी वापर मलिक अंबर सारख्या मातब्बर वजीराने वेळोवेळी करुन मुघलांना तर कधी आदिलशाला नामोहरण केले. याउलट काही वेळा मुघलांनी व आदिलशहाने देखील मराठा सरदारांना बरोबर घेऊन निजामशाहीचा पराभव केला.

## *संदर्भ*


1. Tamaska B.G., the life and work of Malik Ambar, Delhi,1978 N-1
2. विश्वकोश, online page
3. विशाल खुळे ,प्रणव महाजन आणि इतर ,इतिहासाच्या पाऊल खुणा, भाग दोन, राफ्टर पब्लिकेशन ,मुंबई ,2021 पृष्ठ 33
4. विश्वकोश, online page
5. सतीश चंद्र, मध्ययुगीन भारत, के सागर पब्लिकेशन, खंड दोन, पृष्ठ. 257
6. कित्ता, पृष्ठ. 257
7. Datar sayali , sutradhara's Lales,"political terrorism",leads to the darkest time in pune's history, Article,P.N.-1
8. विशाल खुळे ,प्रणव महाजन आणि इतर, पूर्वक्त, पृष्ठ, 34
9. कित्ता ,पृष्ठ 37, 38
10. सतीश चंद्र ,पूर्वक्त,पृष्ठ, 257, 258

# महाराज सयाजीराव गायकवाड यांचे शेती व उद्योग सुधारणेचे विचार व कार्य

**डॉ. सचिन मोरे**
इतिहास विभाग, अहमदनगर कॉलेज अहिल्यानगर
Email: moreram46@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19765714
*DOI: 10.5281/zenodo.19765714*

## सारांश

भारताच्या इतिहासात राज्य करण्याऱ्या अनेक राज्यकर्त्यांनी राज्याला समृद्ध करणारी अर्थनीती अवलंबिली. त्यांपैकी काही राजांनी जनतेचे आर्थिक दमन करून राज्याचा विकास साधला तर; काहींनी लोककल्याणकारी योजनेत राज्याचा विकास घडविला. भारतात ब्रिटिश सामाज्यांतर्गत संस्थानाचे अधिपती असणारे अनेक राजे-राजवाडे ऐश्वर्यात लोळत, पश्चिमात्य प्रलोभने आणि व्यसनांचे शिकार झाले होते. त्याकाळात महाराज सयाजीराव यांनी दुःखाचे मूळ आर्थिक अडचणीत आहे हे ओळखले. वसाहतवादी राजवटीतले आर्थिक शोषण, सतत पडणारे दुष्काळ यामुळे अनिश्चित असणाऱ्या अर्थव्यवस्थेस निश्चित आणि टिकाऊ आर्थिक धोरणाची स्थिर चौकट दिली. त्यांच्या अर्थविचारात समग्र भारताची आर्थिक पुनर्घटनां कशी करता येईल या ध्यासातून हा विचार उत्क्रांत झाला आहे.

राज्यव्यवस्था समृद्ध असण्यासाठी अर्थव्यस्था स्थिर आणि शाश्वत पायावर उभी असणे गरजेचे असते. भारतामध्ये शेती हा प्राचीन काळापासून अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे साहजिकच लोककल्याणकारी राज्यकर्त्यांनी शेती या घटकावर लक्ष दिले आहे. शेती, पाणी आणि उद्योगधंदे हे भारतीय अर्थव्यवस्थेतील अविभाज्य घटक बनून गेले आहेत. त्यामुळे कुठलाही राजाला राज्यपदावर आल्यानंतर; जर तो राजा लोककल्याणकारी असेल तर, त्यास या तीन घटकांवर प्रामुख्याने लक्ष द्यावे लागते. बडोदे संस्थानाचे अधिपती महाराज सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या राज्यात वरील तिन्ही घटकात सुधारणा करीत असताना त्यास आधुनिकीकरणाची जोड दिली. प्रजाहित, प्रजेची प्रगती आणि प्रजेचे सुख एवढेच स्वप्न आयुष्यभर त्यांनी बाळगले. त्यामुळे इतिहासातील अनेक राजांच्या मांदियाळीत महाराज सयाजीराव यांचे कार्य अतुलनीय ठरते. त्यांनी केलेला अर्थकारणाचा तात्त्विक विचार आणि त्यातून साधलेले लोकोपयोगी व सर्वसमावेशक धोरण महत्वाचे होते. याचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.

१६व्या व १७व्या शतकात नव्याने उदयास आलेल्या आधुनिक जागतिक अर्थकारणामध्ये निर्माण झालेले उद्योगधंदे, वसाहतवादी धोरण आणि साम्राज्यवाद याचा सयाजीरावांनी अभ्यास केलेला


*ISBN-978-93-49938-45-8*

होता. त्यामध्ये शेती आणि उद्योगधंदे हा त्यांच्या विचाराचा मुख्य गाभा होता. या दोन क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. शेतक्यांमधील निरक्षरता हे त्यांच्या आजवरच्या अधोगतीचे प्रमुख कारण असल्याचे त्यांनी ओळखले होते. त्यांच्या भाषणातून त्यासंदर्भात त्यांनी विचार व्यक्त केले आणि कार्यातून या सुधारणेचा दृश्य अविष्कार आपल्या राज्यात सुधारणा घडवून आणल्या. शेती सुधारणा हा सयाजीरावांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. प्रगत शेतीसाठी ते शिक्षणाचा आग्रह करताना दिसतात. "मनुष्यप्राण्याने प्रथमावस्थेत जनावरे पाळून व नंतर शेतकी करून आपली अधिकाधिक उन्नती ज्ञानाच्याद्वारे करून घेतली आहे. ज्ञानाचा उपयोग केला नाही तर आपली स्थिती फार वाईट होईल. दुःखस्थितीची करणे अनेक असली तरी विद्येचा अभाव हे एक मोठे कारण आहे."[१] असे विचार मांडीत त्यांनी शेतीसाठी ज्ञानाचे महत्व नमूद केले. शिष्यवृत्ती घेऊन परदेशात शिक्षण घेऊन परत आलेल्या अनेक विद्यार्थ्यांचा लाभ येथील लोकांना व्हावा म्हणून बडोद्यात नोकरी करणे सयाजीरावांनी बंधनकारक केले. 'त्यातून इंग्लंडमध्ये ऑक्सफर्डमधून कृषी पदविका घेऊन आलेल्या खासेराव जाधव यांना त्यांनी पदवी संपल्यानंतर भारतात येण्याची सूचना केली.'[२] राज्यातील कृषीव्यवस्थेचे भविष्य पाहणाऱ्या या राजाची दूरदृष्टी असाधारण होती. 'सन १८८३ साली भूमापन व पाहणी हे नवे खाते त्यांनी सुरु केले.[३] शेतीचे सर्वांगीण महत्व जाणून असणाऱ्या महाराजांनी शेतीचा सर्वांगीण विकास करण्याचे व्रत घेतले होते. 'जमिनीची प्रतवारी ठरवून शेतसारा निश्चित केला, नद्यांचे पाणी अडवून, धरणे बांधून बागाईत शेतीची वाढ करण्यात आली. दुष्काळात गरीब शेतक्यांना रोजगार पुरवून त्यांच्याच जमिनी शास्त्रीय पद्धतीने सपाट करून नालाबर्डीगचीकामे त्याच्याकडून सक्तीने करून घेतली. जंगलतोड थांबवून उजाड जमिनीवर नवीन पद्धतीने जंगलाची लागवड केली. शेतीच्या क्षेत्रातील प्रयोगशाळा बडोदा व नवसारी येथे सुरु केल्या. शेतक्यांना नवीन अवजारे, हत्यारे, खते, बियाणे वगैरे बाबतीत प्रशिक्षण व सल्ला देण्याचे काम सुरु केले.'[४] शेतीसाठी इतकी मेहनत घेणारा राजा इतिहासात विरळाच असेल. या काळात अवर्षण मोठ्या प्रमाणात पडत असे. चारापाण्याच्या अभावाने गुरे मृत्युमुखी पडत. 'यावर उपाय म्हणून गावोगावी विहिरी खोदण्याचे काम स्रुरु केले. महाराजांनी बारा हजाराहून अधिकी विहिरी खोदल्या. त्यास तीस लाक्षांहून अधिक रक्कम खर्च केली. दोनशे जुन्या विहिरी दुरुस्त करविल्या. यासाठी दोन लक्ष रुपयांची मदत केली. सुधारित औजारे व बीबियाणे दिली. कृषीप्रदर्शने भरवून शेतक्यांना प्रोस्ताहन दिले...पशूवैद्यकीय क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्यासाठी शिष्यवृत्ती सुरु केली. शेतक्यांच्या मुलांसाठी शेतकी शाळा सुरु केली.'[५] राज्यातील शेतक्यांची काळजी वाहण्यासाठी पारंपरिक व आधुनिकता यांची सांगड घालून महाराजांनी राज्यव्यवस्थेचा आदर्श घालून दिला. अर्थात 'महात्मा फुले यांच्यासोबत त्यांनी शेतक्यांच्या हीन-दीन स्थितीबद्दलचे अनेक विचारांवर चर्चा'[६] करुन शेतीसुधारणेचे उपक्रम हाती घेतले होते. हे लक्षात घ्यावे लागते.

दुष्काळ निवारण्याचा महाराजांनी केलेला प्रयोग हा प्रयोगशील आणि अफलातून होता. शेतीवर अवलंबून असणारी भारतासारख्या देशाची अर्थव्यवस्था ही नेहमीच अनिश्चिततेच्या भोव्यात सापडलेली असते. वेळोवेळी पडणाऱ्या दुष्काळामुळे माणसे गुरेढोरे व शेती यांचे अतोनात नुकसान होते या संकटांचा सामना करण्यासाठी महाराजांनी प्रासंगिक आणि शाश्वत अशा उभय अंगांनी प्रतिबंधक उपाययोजना कार्यान्वित केल्या. दुष्काळी कामांचे त्यांनी तीन वर्ग केले.[७]

- **तत्कालीक मदत:** नागरिकांचे प्राण वाचवण्याला प्राधान्य त्यासाठी कंगाल खाणे उघडणे निर्वाह पुरते धान्य देऊन आगाऊ पैसे देणे.
- **आपत्ती निवारणात अप्रत्यक्षरीत्या फलदायीन होणारी कामे:** रेल्वे व रस्त्यांचे नवीन दळणवळणाचे मार्ग तयार करणे दैनंदिन दळणवळणाच्या सोयीप्रमाणेच आपत्कालीन परिस्थितीत एका प्रांतातले शिलकी धान्य दुस्या प्रांतात नेण्यासाठी भविष्यात या मार्गांचा उपयोग होईल ही दूरदृष्टी या योजनेमागे होती.
- **शाश्वत विकासाची कामे:** पाटबंधारे ची कामे विहिरी खणणे धरणे बांधणे कालवे काढणे. सरकारची मदत आणि शेतक्यांचे स्वावलंबन या दोन्हीचा समन्वय साधून ही कामे केली जात. व्यापार उद्योगधंदे वाढवणे व नवीन उपक्रमांना उत्तेजन देऊन दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अर्थव्यवस्था गतिशील ठेवण्याची त्यांची भूमिका होती.

आधुनिक काळात उद्योगांना अन्यनसाधारण महत्व आले होते. सयाजीराव गायकवाड केवळ भारताच्या आर्थिक अवनीतीचे दुःख उगाळत बसणारे स्थितीशील राजे नव्हते त्यांनी या दुर्दशेतून बाहेर येण्याचा चंग बांधला व त्यानुसार आर्थिक विकासाचा सूत्रबद्ध नकाशा विकसित केला त्यांच्या आर्थिक विकास निधीची सर्वसाधारण सूत्रे[८] पुढील प्रमाणे दिसतात.

- **कृषी आणि उद्योग यात समतोल साधने:** पाश्चिमात्य व्यापाराच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आपल्या नैसर्गिक साधनांचा उपयोग करून साखर उद्योगासाठी बीट आणि ऊस, वस्त्रोद्योगासाठी कापसाचे पिक वाढविणे आणि मालाची गुणवत्ता वाढविणे यावर त्यांचा भर होता. व्यवहारीक सुधारणा करण्यासाठी शेतकी संघ स्थापन करणे व बुद्धिवान आणि धाडसी लोकांना शेतीकडे वळविण्यासाठी अभियान चालवणे अशा विविध योजनांवर सयाजीराव गायकवाड यांनी भर दिला होता.
- **जड उद्योग आणि लघुउद्योग यांची परस्परपूरक साखळी:** शेती आणि उद्योग क्षेत्रातील तफावत दूर करून त्यांच्या परस्पर समतोल राखण्यासाठी तसेच मोठे उद्योग आणि लघुउद्योग यांचा सांधा जोडण्यासाठी महाराजांनी काही उपाय शोधले. लहान वस्तू तयार करण्यावर आधी भर द्यायचा व नंतर क्रमाने मोठ्या व खर्चाच्या वस्तू तयार करण्याकडे वळायचे. अर्थशास्त्रीय परिभाषेत सांगायचे तर कामगार वर्गाच्या कार्यक्षेत्रातील स्थानांतरासाठी 'proto input-output mode'


ISBN-978-93-49938-45-8

च्या स्वरूपाची नवी व्यवस्था निर्माण करायला हवी मोठ्या जड उद्योगांसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ घरगुती जोडधंदे व लघु उद्योगातून तयार होईल अशी अशाच काही काहीशी कल्पना महाराजांच्या मनात असावी. लघु उद्योग व मोठे उद्योग यांच्यात एकसूत्रीपणा आणला.

- **विदेशी वस्तूंना पर्याय निर्माण करणे:** परदेशात आपण हाडे निर्यात करतो या हाडांपासून ते खत तयार करतात व बीटा साठी वापरतात. हीच बीटाची साखर आपण विकत घेतो त्या ऐवजी आपणच हाडांपासून खत तयार केले व उसाची मात्रा वाढवली तर आपण साखरेच्या बाबतीत स्वालंबी होऊ याच पद्धतीने काच, कागद त्यांचे कारखाने काढून विदेशी आयात रोखायची.
- **औद्योगिक शिक्षणाचा पाया रचने:** औद्योगिक शिक्षणाचा पाया भक्कम करायचा महाराजांनी जपानचा नमुनादर्श ठेवला. जपानप्रमाणे आपल्या औद्योगिक प्रगती घडविण्यासाठी काही विद्यार्थी प्रदेशात शिकायला पाठवले. इसवी सन 1888 राज्याच्या औद्योगिक व ग्रामीण उद्योगधंद्यांसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी एक कार्य गट नियुक्त केला या समितीच्या शिफारसीनुसार बडोदा 1890 मध्ये कला भवन स्थापन करण्यात आले. औद्योगिक शिक्षणाची जर्मनी फ्रान्स इटली लंडन अमेरिका जपान इत्यादी देशांतील कार्यपद्धती काय आहे याचीही महाराजांनी बारकाईने तपास केला होता.
- **देशी व्यापार धंद्यांना संरक्षण देणे:** अर्थशास्त्राच्या नियमानुसार खुल्या व्यापाराचे तत्त्व अमलात आणले तर माल स्वस्त होतो हे खरे असले तरी विकसनशील देशांतील उद्योगांसाठी ही निती व्यवहारीय नाही असे महाराजांचे मत होते. ही स्वस्तता देशी उद्योगांना मारक असून ती येत देशी यांना परावलंबी बनवते म्हणून परदेशी उद्योगांचा स्वदेशात शिरकाव होणार नाही असे संरक्षण सरकारने दिले पाहिजे तसेच उत्साही व्यापारी व उद्योजकांना कर्जाऊ रकमा देण्यासाठी बँका व को-ऑपरेटिव्ह संस्थांची स्थापना करणे वाहतुकींची साधने इत्यादीवरही महाराजांनी भर दिला.
- **रेल्वे आणि रस्ते:** महाराजांनी बडोदे संस्थानात रेल्वेचे जाळे विणण्यामागे राज्याचा सर्वांकष विकासाचे स्वप्न दडलेले होते. रेताड जमिनीत रस्ते बांधकामाचे काम जिकीरीचे असूनही त्यांनी अग्रक्रम दिलेला दिसतो.
- **बडोदा बँक:** आर्थिक विकासासाठी काय कायमस्वरुपी पतपुरवठा करणारी यंत्रणा निर्माण करण्याचे हेतूने १९०८ साली सयाजीरावांनी बडोदा बँक स्थापन केली दिवाण बहादूर अंबालाल साकरलाल, सर विठ्ठलराव ठाकरसी या प्रतिष्ठित लोकांचा त्यात सहभाग होता.[१] जनतेला उद्योगासाठी कर्ज दिले तर राज्याचा विकास होईल अशी त्यामागे धारणा होती. 'महाराजांच्या प्रेरणेने बडोद्यात कापडाची गिरणी सुरु झाली. त्यात जाड सुताचे धोतरजोड,रुमाल, चादरी, मांजरपाट वगैरे गरीब लोकांच्या उपयोगाचे कापड तयार होऊ लागले. या कारखान्यामुळे तीन ते चार हजार लोकांना रोजगार मिळाला. गणदेवी येथे बंद पडलेला कारखाना परत सुरु करण्यात

आला. अशा अनेक लहान-मोठ्या कारखान्यांना बडोदा बँकेच्या माध्यमातून कर्ज मिळण्याची व्यवस्था केली गेली.'[१०]

सहकारी चळवळ, जनतेला आर्थिक सहाय्य आणि जनतेवर तान येणार नाही अशी करप्रणाली अशा अनेक माध्यमातून सयाजी महाराजांनी राज्याच्या आर्थिक विकासाचा मुहर्तमेढ रोवला. महाराजांच्या अर्थ विचारात फक्त आर्थिक बाबींचे एकसत्विकरण झालेले नव्हते. तर त्यात राजकीय सामाजिक व औद्योगिक क्षेत्रे जी एकमेकांवर अवलंबून आहेत त्याचाही त्यांनी विचार केलेला होता. त्यामुळे शेती पाणी उद्योगधंदे या सर्वांचा त्यांनी साकल्याने विचार करून त्यांचा परस्पर संबंध स्पष्ट करीत आपला आर्थिक नीतीचा मार्ग आखून घेतलेला होता.

## *संदर्भ*

1. रमेश वरखेडे, (संपा.), सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, खंड ४, शेती, पाणी आणि उद्योग, साकेत प्रकाशन, पुणे, २०१४, पृ. २८.
2. देवदत्त कदम, महाराजा सयाजीराव आणि शेती विकास, महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन संस्था, औरंगाबाद, २०२१, पृ. ७.
3. बाबा भांड, लोकपाळ राजा सयाजीराव, साकेत प्रकाशन, पुणे २०१३. पृ. ३६.
4. निंबाजीराव पवार, जेव्हा गुराखी राजा होतो, राजहंस प्रकाशन, पुणे, २००८, पृ. ५२.
5. बाबा भांड, लोकपाळ राजा सयाजीराव, साकेत प्रकाशन, पुणे २०१३. पृ. ४४,४५.
6. निंबाजीराव पवार, जेव्हा गुराखी राजा होतो, राजहंस प्रकाशन, पुणे, २००८, पृ. ५४.
7. रमेश वरखेडे, (संपा.), सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, खंड ४, शेती, पाणी आणि उद्योग, साकेत प्रकाशन, पुणे, २०१४, पृ. १३.
8. रमेश वरखेडे, (संपा.), सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, खंड ४, शेती, पाणी आणि उद्योग, साकेत प्रकाशन, पुणे, २०१४, पृ. १३,१४.
9. कित्ता, पृ. १८.
10. निंबाजीराव पवार, जेव्हा गुराखी राजा होतो, पूर्वोक्त, पृ. १२४.


*ISBN-978-93-49938-45-8*

# संगमनेर तालुक्यातील जंगल सत्याग्रह

**श्री. राजेंद्र विठ्ठल पानसरे**
संशोधक विद्यार्थी, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर
Email:
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19765903
*DOI: 10.5281/zenodo.19765903*

**प्रस्तावना**

सविनय कायदेभंग चळवळ ही भारतीय राष्ट्रवादाच्या इतिहासातील मुलभूत चळवळींपैकी एक आहे. सन १९१९ साली लागू केलेल्या सुधारणा कायद्याच्या अंमलबजावणीच्या पाहणीसाठी सन १९२७ मध्ये 'सायमन कमिशन' भारतात आले. कॉंग्रेसने या कमिशनवर बहिष्कार टाकला. त्यामुळे भारतमंत्री बर्कनहेड यांनी 'भारतातील सर्व पक्षांना मान्य होईल अशी राज्यघटना जर भारतीयांनी निर्माण केली तर ब्रिटीश सरकार तिचा स्वीकार करेल.' असे आव्हान कॉंग्रेस व इतर पक्षांना दिले. कॉंग्रेसने बर्कनहेड यांचे आव्हान स्वीकारले. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने तयार केलेला अहवाल 'नेहरू अहवाल' नावाने ओळखला जातो. ब्रिटिशांनी ३१ डिसेंबर १९२९ पर्यंत हा अहवाल स्वीकारावा अन्यथा देशव्यापी चळवळ सुरु करण्याचा इशारा महात्मा गांधींनी दिला. अर्थात त्या तारखेपर्यंत काहीच निष्पन्न झाले नाही. डिसेंबर १९२९ मध्ये पंडित नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली लाहोर येथे कॉंग्रेस अधिवेशन भरले. या अधिवेशनात कॉंग्रेसने संपूर्ण स्वराज्याचा ठराव पास केला. त्याचबरोबर २६ जानेवारी १९३० हा दिवस देशाचा स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्याचे जनतेला आवाहन केले. सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

लाहोर अधिवेशनातील कॉंग्रेसच्या निर्णयामागे संपूर्ण देश उभा राहिला. २६ जानेवारी १९३० हा दिवस सर्व देशभर 'स्वातंत्र्यदिन' म्हणून साजरा करण्यात आला. महात्मा गांधींनी ब्रिटीश व्हाईसरॉयकडे केलेल्या मागण्यांना प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी प्रथम मिठाचा कायदा मोडून सविनय कायदेभंग चळवळ सुरु करण्याचा निर्णय घेतला. १२ मार्च १९३० रोजी महात्मा गांधीनी साबरमती आश्रमातून दांडीयात्रेस प्रारंभ केला. दांडी यात्रा सुरु असतानाच २१ मार्च रोजी अहमदाबादमध्ये अखिल भारतीय कॉंग्रेस समितीची बैठक घेण्यात आली. बैठकीत देशभरातील प्रांतिक कॉंग्रेस समित्यांनी योग्य वाटेल अशा पद्धतीने सविनय कायदेभंगाची चळवळ चालवावी असे आदेश प्रांतिक कॉंग्रेस समित्यांना देण्यात आले. त्यानुसार महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस समितीने 'महाराष्ट्र सत्याग्रह मंडळ' स्थापन केले. त्याचे मुख्य कार्यालय विलेपार्ले येथे उघडण्यात आले. विलेपार्ले येथे

महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीने मिठाचा सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. या सत्याग्रहात अहिल्यानगर जिल्ह्यातील आणि विशेषतः संगमनेर तालुक्यातील अनेक सत्याग्रही सहभागी झाले.

मिठाचा कायदा मोडण्याचा कार्यक्रम राबविल्यानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी जंगलाविषयीचे कायदे मोडण्याची मोहीम हाती घेतली. ब्रिटीश सरकारने सन १८६६ नंतर जंगलाबाबत कायदे करून अनेक निर्बंध घातले होते. सन १९२७ मध्ये सरकारने 'भारतीय वन अधिनियम कायदा' पास केला होता. या कायद्याद्वारे वनांमधील झाडे तोडणे, लाकूड तोडणे, वन उत्पादन गोळा करणे, राखीव वनातील गवत कापणे, गुरे चारणे, वनात शिकार करणे इत्यादी बाबींवर बंदी घालण्यात आली. वन कायद्यातील या अन्यायकारक तरतुदींमुळे शेतकरी व आदिवासी यांच्यामध्ये असंतोष होता. हा असंतोष लक्षात घेऊन मिठाच्या कायद्याप्रमाणे जंगलासंबंधीचे कायदे मोडून सत्याग्रह मोहिमेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीने घेतला.

महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीने अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर व अकोले तालुक्यातील डोंगराळ भाग जंगल सत्याग्रहासाठी निश्चित केला. तसेच या भागात जंगल सत्याग्रहाच्या कार्याकरिता डॉ. अंत्रोलीकर, श्रीपाद नवरे व रामकृष्ण महाराज यांची एक समिती स्थापन केली. या समितीने एक पत्रक प्रसिद्ध करून शेतक्यांच्या रास्त मागण्या मांडल्या तसेच अन्यायी वन अधिनियम कायद्याविरुद्ध कायदेभंग करणे किती आवश्यक आहे हे स्पष्ट केले. जंगल सत्याग्रहाच्या तयारीसाठी वैकुंठलाल मेहता यांनी १,५०० रुपयांची मदत केली त्याचबरोबर स्थानिक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी या सत्याग्रहासाठी राहुरी, बेलापूर, राहता या भागातून १,००० रुपयाहून अधिक किमतीचे धान्य जमा केले.

संगमनेर–अकोले येथील नियोजित जंगल सत्याग्रहाचे कार्यालय संगमनेर शहरातील गोरक्षण संस्थेच्या जागेवर सुरु करण्यात आले. महाराष्ट्र प्रांतिक समितीने या जंगल सत्याग्रहाचा प्रचार अहिल्यानगर जिल्ह्याबरोबरच जिल्ह्याबाहेर केल्याने अहिल्यानगर, पुणे, मुंबई, नाशिक, खानदेश या भागातून अनेक तरुण सत्याग्रही संगमनेरमध्ये जमा झाले. संगमनेर तालुक्यासाठी भैयासाहेब कुलकर्णी आणि अकोले तालुक्यासाठी संत वकील यांची प्रमुख सत्याग्रह संचालक नेमणूक म्हणून करण्यात आली. संगमनेर येथील जंगल सत्याग्रह शिबिराचे उद्घाटन सदाशिव खंडो आळतेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटनानंतर संगमनेर शहरातून एक भव्य मिरवणूक काढण्यात आली व तिचा समारोप गोरक्षण संस्थेच्या मैदानावर करण्यात आला.

जंगल सत्याग्रहासाठी नेमलेल्या प्रचारकांनी तालुक्यात विविध लहानमोठ्या गावांमध्ये सत्याग्रहाचा प्रचार केला. शेतकरी व आदिवासी लोकांना अन्यायी जंगल कायद्याची माहिती करून दिली आणि त्यांना या कायद्याविरुद्ध सत्याग्रह करण्यास तयार केले. जंगल सत्याग्रहात सरकारला वनचराई कर देण्याचे बंद करणे आणि जंगलात गुरे चरण्यास सोडण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार


*ISBN-978-93-49938-45-8*

गावोगावी शेतक्र्यांची जनावरे अनिर्बंधपणे जंगलात सोडण्यात आली. पुढे गुरांचा कळप आणि त्यामागे कोयतेबंद गुराख्यांची टोळी असे दृश्य सर्वत्र दिसू लागले. जंगलातील हे दृश्य पाहून जंगल अधिकारी चक्रावले. त्यांनी सुरुवातीला पोलिसांची मदत घेऊन त्यांच्या मदतीने जंगलातून गुरे हाकलण्याचे काम सुरु झाले. परंतु पोलिसांनी एका बाजूची गुरे हाकलून दिली तर सत्याग्रही दुस्र्या बाजूने जनावरांचा कळप घेऊन जंगलात घुसत असत. या लपंडावात जंगल अधिकारी व पोलीस यांना हताश होण्याची वेळ आली. शेवटी पोलिसांनी जंगल सत्याग्रहाचे नेते रामकृष्ण महाराज यांना अटक केली.

रामकृष्ण महाराज यांना अटक होताच बापूसाहेब परेगावकर, वामनराव कुलकर्णी, श्री. ग. सरदेसाई, भाई सथ्थ्या, श्रीपाद नवरे यांनी या सत्याग्रहाचे नेतृत्व केले. परंतु पोलिसांनी या सर्वांना एकामागोमाग एक अशी अटक केली व त्यांच्या बरोबर अनेक सत्याग्रहींना पकडण्यात आले. तरीही इतर सत्याग्रहींनी मागे न हटता ठिकठिकाणी सत्याग्रह सुरु ठेवला. त्यामुळे पोलिसांनी सत्याग्रह करणार्‍या नेत्यांना पकडण्याचे आपले धोरण बदलून सरसकट सत्य्राग्रहींना पकडण्याचे सत्र सुरु केले. त्यामुळे गावोगाव अनेक सत्याग्रहींना अटक होऊन शिक्षा ठोठविण्यात आल्या. सत्याग्रहींनी उस्फुर्तपणे २३ जुलै १९३० रोजी संगमनेर अकोले तालुक्यात आषाढी एकादशीच्या निमित्ताने एकाच वेळी वीस-बावीस ठिकाणी सत्याग्रह केला. या सत्याग्रहाचे विराट दृश्य बघून अधिकारी व पोलीस हताश झाले. त्यांना प्रेक्षकांच्या भूमिकेशिवाय काही करता आले नाही. नंतर मात्र त्यांनी गावोगावच्या अनेक स्थानिक सत्याग्रहींना अटक करण्यास सुरुवात केली.

संगमनेर हे जंगल सत्याग्रहाचे मुख्य केंद्र होते. येथे झालेल्या सत्याग्रहात सुमारे २००हून अधिक सत्याग्रहींनी भाग घेतला होता. त्याचबरोबर चंदनापुरी, पेमगिरी, घारगाव, राजापूर, जवळे बाळेश्वर, सारोळे, सावरगाव घुले, कौठे वनकुटे, माळेगाव या तालुक्यातील गावांमध्येही अनेक लोक उस्फुर्तपणे सहभागी झाले त्यातील अनेकांना पोलिसांना अटक केली.

संगमनेर तालुक्यातील जंगल सत्याग्रह संपूर्ण महाराष्ट्राबरोबर भारतभर गाजला. यामध्ये स्थानिक सत्याग्रहींबरोबरच बाहेरगावाहून आलेले अनेक सत्याग्रही सहभागी झाले होते. यातील अनेकांना पोलिसांनी अटक केली. या सत्याग्रहाचे नेतृत्व करणारे प्रमुख नेते पकडले गेले. पोलिसांच्या दडपशाहीमुळे लोक भयभीत झाले. त्यांना प्रभावी नेत्यांचे पाठबळ उरले नाही. अनेक स्थानिक सत्याग्रहींना अटक झाल्यामुळे उत्तरोत्तर ही चळवळ थंडावत गेली.

### *संदर्भ*

1. बिपिनचंद्र, अनुवादक डॉ. काळे एम. व्ही., इंडियाज् स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स, के. सागर पब्लिकेशन, पुणे, २००८.
2. दर्शनिका विभाग (का. संपादक व सचिव), स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश (खंड १), महाराष्ट्र शासन,

मुंबई प्रथमावृत्ती, १९७९.

3. पाठक विठ्ठल नाथ, अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य-संग्राम, अहमदनगर संग्रालय प्रकाशन, अहमदनगर, १९९३.
4. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र राजकीय इतिहास (१९३०-३९), खंड-४, श्रीविद्या प्रकाशन पुणे.


*ISBN-978-93-49938-45-8*

# मौर्यकालीन भारतातील बौद्ध धर्म: सम्राट अशोक यांची भूमिका

**श्री. रवींद्र पुनाजी पारधी**

सहाय्यक प्राध्यापक, कळंब, तालुका-आंबेगाव, जिल्हा-पुणे

Email: ravindrapardhi2@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19778543

*DOI: 10.5281/zenodo.19778543*

## प्रस्तावना

मौर्य साम्राज्य हा दक्षिण आशियाच्या इतिहासातील पहिला मोठा राजकीय एकीकरणाचा टप्पा होता. चंद्रगुप्त मौर्य आणि सम्राट अशोक यांच्या काळात हे साम्राज्य विस्तारले आणि प्रशासकीय तसेच सांस्कृतिक दृष्ट्या बळकट झाले. सिद्धार्थ गौतम यांनी स्थापन केलेला बौद्ध धर्म प्रारंभी सुधारक चळवळ म्हणून विकसित झाला होता, परंतु अशोकांच्या आश्रयामुळे त्याला व्यापक प्रसार मिळाला. कलिंग युद्धानंतर अशोकांच्या विचारांत मोठा बदल झाला आणि त्यांनी हिंसेऐवजी 'धम्म' या नैतिक तत्त्वांवर आधारित राज्यकारभार स्वीकारला. त्यांच्या शिलालेखांद्वारे करुणा, सहिष्णुता आणि लोककल्याण यांचा प्रचार करण्यात आला. त्यांनी स्तूप, विहार उभारले, धर्मदूत पाठवले आणि बौद्ध धर्माला संघटित आधार दिला, तरीही 'धम्म' ही सर्वांसाठी स्वीकारार्ह व्यापक संकल्पना होती. इतिहासकार रोमिला थापर यांसारख्या अभ्यासकांनी अशोकांच्या धोरणांना सामाजिक विविधतेला दिलेला प्रतिसाद मानले आहे. सांची आणि तक्षशिला येथील पुरातत्त्वीय पुराव्यांमुळे त्या काळातील धार्मिक सहअस्तित्व स्पष्ट होते. अशोकांनी नैतिकतेवर आधारित आदर्श शासनाची परंपरा निर्माण केली, ज्याचा प्रभाव पुढील बौद्ध परंपरा आणि आधुनिक विचारसरणींवरही दिसून येतो.

## मौर्य साम्राज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

मौर्य साम्राज्याचा उदय सिकंदराच्या भारतातून माघारी गेल्यानंतर निर्माण झालेल्या राजकीय अस्थिरतेशी घट्टपणे संबंधित आहे. त्या काळात मगधातील नंद वंशाची सत्ता कमकुवत झाली होती. चाणक्य या ब्राह्मण विद्वानांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रगुप्त मौर्य यांनी इ.स.पू. सुमारे ३२१ मध्ये नंद वंशाचा पराभव करून केंद्रीकृत राज्यव्यवस्थेची स्थापना केली. या व्यवस्थेत परकीय प्रशासकीय पद्धती आणि स्थानिक परंपरांचा समन्वय करण्यात आला. इ.स.पू. सुमारे ३०५ मध्ये सेल्युकस निकेटर याच्याशी झालेल्या राजनैतिक समझोत्यामुळे उत्तर-पश्चिमेकडील सीमाभाग सुरक्षित झाला आणि गांधार प्रदेश साम्राज्यात समाविष्ट झाला.

चंद्रगुप्त मौर्य यांचा नातू बिंदुसार यांनी दक्षिणेकडे साम्राज्याचा विस्तार केला. पुढे अशोकांच्या

काळात साम्राज्याचा सर्वोच्च विस्तार झाला. सुमारे पन्नास लाख चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असलेल्या या साम्राज्यात पाच कोटींपेक्षा अधिक लोक राहत होते. विविध वंश, भाषा आणि धर्म असलेले लोक या साम्राज्यात एकत्र नांदत होते. प्रशासनाच्या दृष्टीने मौर्यांनी अत्यंत संघटित व्यवस्था उभारली. पाटलिपुत्र येथील राजा सर्वोच्च सत्ता धारण करत असे आणि त्याला मंत्रिपरिषद मार्गदर्शन करत असे. प्रांतांचे प्रशासन कुमार या राजपुत्रांकडे असे, तर जिल्हास्तरावर महामात्र अधिकारी काम पाहत असत. राज्यातील घडामोडींवर लक्ष ठेवण्यासाठी गुप्तहेर व्यवस्था अस्तित्वात होती. शेती हा करव्यवस्थेचा मुख्य आधार होता आणि त्यातून धान्यकोठारे, सैन्य आणि सार्वजनिक कामांसाठी निधी उपलब्ध होत असे. आर्थिक दृष्ट्या साम्राज्य अत्यंत समृद्ध होते. उत्तरापथ आणि दक्षिणापथ या व्यापारी मार्गांमुळे विविध प्रदेशांमध्ये व्यापार वाढला आणि तक्षशिला व उज्जैन यांसारखी महत्त्वाची शहरे विकसित झाली. धार्मिक जीवनातही मोठी विविधता होती. ब्राह्मण धर्मातील वैदिक यज्ञविधी राजसत्तेच्या वैधतेशी जोडलेले होते; परंतु श्रमण परंपरा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बौद्ध धर्म आणि जैन धर्म यांनाही मोठा पाठिंबा मिळत होता. जैन धर्मातील कठोर अहिंसा या तत्त्वाचा प्रभाव चंद्रगुप्तांच्या उत्तरायुष्यातील संन्यासावर दिसून येतो. बौद्ध धर्माने कर्मसिद्धांत आणि शिस्तबद्ध भिक्षुसंघाच्या माध्यमातून नगरातील सामान्य लोकांना आकर्षित केले.

साम्राज्य विशाल असल्यामुळे भाषिक आणि सांस्कृतिक विविधता मोठ्या प्रमाणावर होती. शिलालेखांमध्ये प्राकृत, ग्रीक आणि अरामाइक भाषा वापरल्या गेल्या. या विविधतेत एकात्मता राखण्यासाठी एक व्यापक नैतिक तत्त्व आवश्यक होते. अशोकांनी मांडलेली ‘धम्म’ ही संकल्पना या गरजेची पूर्तता करत होती. ती विविध धर्मांना न नाकारता त्यांच्यात समन्वय साधणारी होती. पुरातत्त्वीय पुरावे, जसे की चिन्हांकित नाणी आणि अशोक स्तंभ, या काळातील स्थैर्याची साक्ष देतात. तथापि प्रांतीय बंड आणि ब्राह्मण धर्मीयांचा असंतोष यांसारख्या काही अंतर्गत समस्या देखील अस्तित्वात होत्या. अशा परिस्थितीत अशोकांनी बौद्ध धर्माच्या माध्यमातून साम्राज्य स्थिर ठेवण्याचा आणि नैतिक आधार देण्याचा प्रयत्न केला.

## अशोकपूर्व काळातील बौद्ध धर्माचा उदय

इ.स.पू. सहावे आणि पाचवे शतक हे भारतीय इतिहासातील बौद्धिक जागृतीचे महत्त्वाचे कालखंड होते. गंगेच्या खोऱ्यात शहरीकरण वाढत होते आणि समाजात मोठे बदल घडत होते. या पार्श्वभूमीवर सिद्धार्थ गौतम यांचा जन्म लुंबिनी येथे एका क्षत्रिय राजघराण्यात झाला. जीवनातील दुःख पाहून त्यांनी सांसारिक जीवनाचा त्याग केला आणि बोधगया येथे बोधीवृक्षाखाली त्यांना ज्ञानप्राप्ती झाली. त्यांच्या शिकवणुकीत चार आर्यसत्ये आणि अष्टांगिक मार्ग यांचा समावेश होता. या तत्त्वांनुसार नैतिक आचरण, ध्यान आणि प्रज्ञा यांच्या साहाय्याने मनुष्य जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्त होऊ शकतो. ही शिकवण वैदिक कर्मकांड आणि अतिरीक्त यज्ञसंस्कृतीपेक्षा वेगळी होती. इ.स.पू.


ISBN-978-93-49938-45-8

चौथ्या शतकापर्यंत भिक्षुसंघ व्यवस्थित संघटित झाला होता. पहिल्या बौद्ध संगीतीत भिक्षूंच्या आचारसंहितेचे आणि बुद्धांच्या उपदेशांचे संकलन करण्यात आले. दुसऱ्या संगीतीत संघातील मतभेदांवर चर्चा झाली. मगधचे राजा बिंबिसार यांनी भिक्षूंना बांबूवन विहार दान दिले, तर अनाथपिंडिकाने जेतवन विहार उभारला. यामुळे बौद्ध संघाला स्थैर्य मिळाले.

सामान्य लोकांच्या सहभागामुळे बौद्ध धर्माचा प्रसार वाढला. उपवास, दान आणि नैतिक जीवन यांसारख्या आचारांचे मार्गदर्शन करणारे अनेक उपदेश प्रचलित झाले. व्यापारी वर्गाने या धर्माला विशेष पाठिंबा दिला, कारण त्यात वर्णव्यवस्थेच्या कठोर मर्यादा नव्हत्या. स्त्रियांनाही भिक्षुणी संघामध्ये प्रवेश मिळाला. तथापि बौद्ध धर्माला काही आव्हानेही होती. ब्राह्मण परंपरेचा प्रभाव पुन्हा वाढत होता आणि इतर तत्त्वप्रणालीदेखील समाजात अस्तित्वात होत्या. त्यामुळे बौद्ध धर्म प्रामुख्याने पूर्व भारतात मर्यादित राहिला. तरीही त्याची नैतिक आणि सामाजिक विचारसरणी साम्राज्याच्या उदयोन्मुख गरजांशी सुसंगत होती. अशोकांच्या काळात या धर्माला व्यापक राजाश्रय मिळण्यासाठी योग्य परिस्थिती निर्माण झाली होती.

## अशोकांचा धर्मपरिवर्तन आणि वैयक्तिक परिवर्तन

अशोकांचा प्रारंभीचा काळ कठोर आणि विस्तारवादी होता असे अनेक कथांमध्ये वर्णन आढळते. सिंहासनावर आरूढ झाल्यानंतर त्यांनी साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी अनेक मोहिमा केल्या. परंतु इ.स.पू. सुमारे २६१ मध्ये झालेल्या कलिंग युद्धाने त्यांच्या जीवनात मोठा बदल घडवून आणला. या युद्धात हजारो लोकांचा मृत्यू झाला आणि असंख्य लोक विस्थापित झाले. या हानीमुळे अशोकांच्या मनात तीव्र पश्चात्ताप निर्माण झाला. त्यांनी हिंसात्मक विजयाचा मार्ग सोडून नैतिक विजयाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या शिलालेखांमध्ये या भावनेचे स्पष्ट वर्णन आढळते. त्यांनी बौद्ध धर्मातील पंचशील तत्वांमध्ये हिंसा न करणे, चोरी न करणे, दुराचार टाळणे, असत्य न बोलणे आणि मद्यपान टाळणे या तत्त्वांचा स्वीकार केला. अशोकांच्या व्यक्तिमत्त्वात या काळानंतर मोठा बदल झाला. त्यांना पूर्वी “चंडाशोक” असे संबोधले जात असे. परंतु नंतर त्यांना “धर्माशोक” म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांनी राजकीय वैभवापेक्षा नैतिक जीवनावर भर दिला. शिकार आणि विलासी जीवन सोडून त्यांनी धर्मयात्रा आणि लोककल्याणकारी कामांना प्राधान्य दिले. त्यांच्या कुटुंबीयांचाही या प्रक्रियेत सहभाग होता. त्यांचा पुत्र महेंद्र आणि कन्या संघमित्रा यांनी बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी संन्यास स्वीकारला. अशा प्रकारे अशोकांचे वैयक्तिक परिवर्तन केवळ धार्मिक नव्हते, तर ते त्यांच्या संपूर्ण राज्यकारभारात प्रतिबिंबित झाले.

## अशोकांची धम्मनीती आणि तिचा प्रसार

अशोकांनी मांडलेली ‘धम्म’ ही संकल्पना नैतिक आणि सामाजिक आचारसंहितेवर आधारित होती.

या तत्त्वांमध्ये अहिंसा, दया, सत्य, सहिष्णुता आणि लोककल्याण यांना महत्त्व दिले गेले. प्राण्यांच्या बलिदानावर मर्यादा घालणे, मानव आणि प्राण्यांसाठी आरोग्यसेवा उपलब्ध करणे, औषधी वनस्पतींची लागवड करणे आणि प्रवाशांसाठी विश्रांतीगृहे उभारणे यांसारख्या उपाययोजना करण्यात आल्या. धम्म प्रचारासाठी 'धम्म महामात्र' या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. हे अधिकारी लोकांच्या नैतिक आचाराचे निरीक्षण करत आणि समाजात सदाचाराचा प्रसार करत. न्यायव्यवस्थेतही दयाळूपणा आणि सुधारणा यांना प्राधान्य देण्यात आले.

अशोकांनी सर्व धर्मांप्रती सहिष्णुता राखण्याचा आग्रह धरला. त्यांच्या शिलालेखांमध्ये विविध संप्रदायांबद्दल आदर व्यक्त करण्याचे आवाहन केलेले आढळते. त्यामुळे साम्राज्यातील विविध धार्मिक समुदायांमध्ये शांतता आणि सहकार्य टिकून राहिले.

## अशोकांच्या काळातील बौद्ध धर्माचा प्रसार

अशोकांनी बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. पाटलिपुत्र येथे तिसरी बौद्ध संगीती आयोजित करण्यात आली. या संगीतीत संघातील मतभेद दूर करण्याचा आणि धर्मग्रंथांचे संकलन करण्याचा प्रयत्न झाला. साम्राज्यभर स्तूप आणि विहार उभारण्यात आले. सांची येथील स्तूप हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण मानले जाते. अशोकांनी धर्मप्रसारासाठी अनेक प्रदेशांत दूत पाठविले. त्यांच्या पुत्र महेंद्र यांनी श्रीलंकेत बौद्ध धर्माचा प्रसार केला, तर कन्या संघमित्रा यांनी तेथे बोधीवृक्षाची फांदी नेली. तसेच, पश्चिम आशिया, मध्य आशिया आणि दक्षिण भारतातील राज्यांमध्येही धर्मदूत पाठविण्यात आले. व्यापारमार्गांच्या साहाय्याने बौद्ध विचार दूरवर पोहोचले. परिणामी बौद्ध धर्म भारताबाहेरही प्रभावीपणे पसरला आणि अनेक प्रदेशांमध्ये तो प्रमुख धर्म बनला. अशोकांच्या या प्रयत्नांमुळे बौद्ध धर्माचा प्रभाव भारतीय समाजावर आणि आशियातील अनेक संस्कृतींवर दीर्घकाळ टिकून राहिला. त्यांच्या शिलालेखांमधून व्यक्त झालेली नैतिक शिकवण आजही इतिहासातील महत्त्वाचा वारसा मानली जाते.

## निष्कर्ष

मौर्यकालीन बौद्ध धर्माच्या इतिहासात सम्राट अशोक यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. कलिंग युद्धानंतर झालेल्या पश्चात्तापामुळे त्यांनी नैतिकतेवर आधारित राज्यकारभार स्वीकारला. त्यांच्या धम्मनीतीमुळे अहिंसा, करुणा आणि सहिष्णुता यांना प्राधान्य मिळाले आणि लोककल्याणकारी साम्राज्य उभे राहिले. अशोकांनी बौद्ध धर्माला राजाश्रय देऊन त्याचा प्रसार भारताबाहेरही केला. भिक्षुसंघाला मदत, धर्मदूतांची पाठवणी आणि लोकहिताच्या उपाययोजनांमुळे बौद्ध धर्म अधिक व्यापक झाला. त्यांच्या धोरणांमुळे नैतिक मूल्ये समाजजीवनात दृढ झाली. त्यांच्या मृत्यूनंतर मौर्य साम्राज्य कमकुवत झाले आणि ब्राह्मण परंपरेचा प्रभाव वाढला. तरीही बौद्ध धर्माचा प्रभाव इतर


*ISBN-978-93-49938-45-8*

प्रदेशांत टिकून राहिला. अशोकांचा वारसा आजही शांतता आणि नैतिक शासनाचा आदर्श म्हणून महत्त्वाचा मानला जातो.

## *संदर्भ*


1. थापर, रोमिला. (२०१३). अशोक आणि मौर्य साम्राज्याचा ऱ्हास. नवी दिल्ली: ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रकाशन.
2. सिंह, उपिंदर. (२०१६). प्राचीन आणि आरंभीच्या मध्ययुगीन भारताचा इतिहास. नवी दिल्ली: पिअर्सन प्रकाशन.
3. कोसांबी, डी. डी. (१९७५). प्राचीन भारताची संस्कृती आणि सभ्यता. मुंबई: लोकवाङ्मय गृह.
4. शर्मा, रामशरण. (२००६). प्राचीन भारत. नवी दिल्ली: ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रकाशन.
5. थेर, नरसिंहाचार्य. (१९९५). बौद्ध धर्माचा इतिहास. पुणे: भारतीय विद्या प्रकाशन.
6. लमोट, एटियेन. (१९८८). भारतीय बौद्ध धर्माचा इतिहास. दिल्ली: मोतीलाल बनारसीदास प्रकाशन.
7. महावंस. (१९९२). महावंस : श्रीलंकेचा प्राचीन इतिहास. कोलंबो: बौद्ध प्रकाशन संस्था.
8. भारत सरकार. (२०१४). सम्राट अशोकाचे शिलालेख. नवी दिल्ली: पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग.
9. नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग. (२०२१). प्राचीन भारत. नवी दिल्ली: एनसीईआरटी.

# मानव आणि पर्यावरण यांचे ऐतिहासिक संबंध: प्राचीन ते आधुनिक काळ

**शाहूराव पवार**
सहा. प्रा. इतिहास विभाग प्रमुख, राष्ट्रपिता महात्मा गांधी महाविद्यालय,खेड
Email: shahuraopawar123@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19778629
*DOI: 10.5281/zenodo.19778629*

**सारांश**

पृथ्वीतलावरील सर्व प्राणीमात्रांमध्ये मानव हा सर्वात बुद्धिमान आणि अनुकूलक्षम प्राणी समजला जातो. प्रारंभिक कालखंडापासून मानवाने पर्यावरणाशी संवाद संघर्ष आणि समन्वयद्वारे आपल्या विकासाची वाटचाल केलेली दिसते. मानवाचे आणि पर्यावरणाचे संबंध फक्त जैविक किंवा भौतिक स्वरूपाचे नसून ते सामाजिक, राजकीय, आर्थिक, आणि सांस्कृतिक दृष्टीनेही अधिक गुंतागुंतीचे आहेत. मानवाने निसर्गाशी कोणत्या पद्धतीने व्यवहार केला आणि निसर्गावर त्याचा काय परिणाम झाला याचा चिकित्सक अभ्यास पर्यावरण इतिहासामध्ये केला जातो.

## प्रस्तावना

प्राचीन काळापासून मानव आणि पर्यावरणाचे अतिशय धनिष्ठ संबंध आहेत. मानवी संस्कृतीच्या विकासामध्ये पर्यावरणाचा महत्त्वपूर्ण वाटा राहिलेला आहे. प्राचीन कालखंडापासून मानवाने आपले जीवन, उपजीविका, शेती, उद्योग वसाहतींची रचना ही नैसर्गिक साधन संपत्तीच्या उपलब्धतेनुसार केली. त्यामुळे इतिहासाचा अभ्यास करताना पर्यावरणीय घटकांचा विचार करणे आवश्यक ठरते. ऐतिहासिक दृष्टिकोनातून पर्यावरणीय अभ्यास हा मानव आणि पर्यावरण यांच्यातील परस्पर संबंधाचा अनुक्रमिक अभ्यास करतो. या अभ्यासाद्वारे विविध कालखंडातील नैसर्गिक संसाधनांचा वापर, पर्यावरणीय बदल, मानवी हस्तक्षेप तसेच त्यांचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिणाम यांचे विश्लेषण केले जाते. प्राचीन काळापासून आधुनिक कालखंडातील औद्योगिक कालखंडापर्यंत पर्यावरणावर प्रचंड मानवी प्रभाव पडलेला आहे. विशेषतः अठराव्या शतकातील औद्योगिक क्रांतीनंतरच्या कालखंडामध्ये नैसर्गिक साधन संपत्तीचा मानवाने केलेला अमर्याद वापर, वृक्षतोड, प्रदूषण आणि हवामानातील बदल अशा समस्या तीव्र झाले आहेत.

ऐतिहासिक पर्यावरणीय अभ्यासातून भूतकाळातील पर्यावरणीय बदलांची कारणे आणि त्यांचे परिणाम समजतात. तसेच गतकाळातील अनुभवातून वर्तमानातील समस्यांवर उपाय शोधता येतो. त्यामुळे पर्यावरणाचा शाश्वत वापर व संरक्षणासाठी ऐतिहासिक दृष्टिकोनातून पर्यावरणाचा अभ्यास


*ISBN-978-93-49938-45-8*

महत्त्वाचा ठरतो.

## ऐतिहासिक पर्यावरणाची वैशिष्ट्ये

- **प्राचीन संस्कृती आणि पर्यावरण**

मेसोपोटेमिया, इजिप्त, हडप्पा, माया आणि नाईल यासारख्या प्राचीन संस्कृती नद्या आणि सुपीक प्रदेशांमध्ये वसलेल्या होत्या. या संस्कृतींचा कृषी आणि आर्थिकपाया यांच्या नैसर्गिक संसाधनावर आणि पर्यावरण अवलंबून होता, नाईल नदीवर प्राचीन इजिप्शियन संस्कृती उदयास आली. त्यामुळे या संस्कृतीमध्ये सुपीक जमीन, अमर्याद कृषी संसाधने उपलब्ध झाली. तसेच हडप्पा संस्कृती सिंधू नदी जवळ विकसित झाली. त्यामुळे त्यांचे जीवन समृद्ध झाले आणि व्यापारात भरभराट झाली.

या कालखंडातील संस्कृतीमधील शेतीसाठी बांधकामासाठी आणि इंधनासाठी जंगलाचा वापर केला गेला. तसेच लोकसंख्येमध्ये वाढ झाल्यानंतर जमिनीचा वापर वाढला. खनिजे धातू यासारख्या नैसर्गिक संशोधनाचा वापर पुढील कालखंडात वाढत गेला. त्यामुळे समाजाच्या लष्करी आणि औद्योगिक विकासामध्ये भर पडली.

ऐतिहासिक दृष्ट्या मानवी समाजांनी जंगलाचा वापर शेती, बांधकाम आणि इंधनासाठी केला. लोकसंख्येमध्ये वृद्धी झाल्यामुळे जंगलतोड करण्यात आली. आणि शेती करण्यासाठी जमिनीचा वापर वाढल्याने विविध कालखंडामध्ये खनिजे आणि आणि धातू अशा नैसर्गिक संसाधनाचा वापर वाढला. परिणामी समाजाच्या औद्योगिक व लष्करी विकासाला चालना मिळाली.

- **औद्योगिक क्रांतीचा प्रभाव**

18 व्या शतकातील इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीचा प्रसार संपूर्ण युरोपमध्ये झाल्यामुळे कोळसा, तेल यांचा मोठ्या प्रमाणात उपयोग सुरु झाला. परिणामी प्रदूषण व पर्यावरणीय हानी वाढली. जंगलामधून वृक्षतोड, जलप्रदूषण व वायू प्रदूषण अशा पर्यावरणीय असंतुलनामुळे औद्योगिक देशांमध्ये गंभीर स्वरूप प्राप्त झाले.

- **वसाहतवादी काळ आणि संसाधनांचे शोषण**

युरोप खंडातील साम्राज्यवादी देशांनी आशिया, आफ्रिका आणि अमेरिकेतील नैसर्गिक संसाधनांचे अमर्याद शोषण केले. जंगलतोड आणि खनिज संसाधनांच्या अमर्याद वापरामुळे पर्यावरणाची प्रचंड हानी झाली. आपल्या आर्थिक फायद्यासाठी वसाहतवादी युरोपीय सत्तांनी आशिया, आफ्रिका आणि अमेरिका खंडातील वन्यजीव आणि नैसर्गिक साधन संपत्तीचे अति-शोषण केले. परिणामी स्थानिक परिसंस्थेचे प्रचंड नुकसान झाले.

- **पर्यावरणीय आपत्ती आणि त्यांचा ऐतिहासिक प्रभाव**

दुष्काळ, पूर, ज्वालामुखीचा उद्रेक आणि भूकंप इत्यादी नैसर्गिक आपत्तींचा जगातील प्राचीन संस्कृतींवर परिणाम झाला. उदाहरणार्थ रोमन संस्कृतीवर पूर आणि दुष्काळ या नैसर्गिक आपत्तींचा प्रभाव पडला. तसेच इटली मधील प्राचीन रोमन शहर पोम्पइ शहर ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे नष्ट झाले.

अशा विनाशकारी गोष्टींपासून प्रभावी झालेल्या समाजाला शेती पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल करावे लागेल. तसेच मूलभूत पायाभूत सुविधांचाही नव्याने विचार करावा लागला.

- **धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोन**

प्राचीन संस्कृतींनी आणि धर्मांनी पर्यावरण संरक्षण आणि नैसर्गिक संतुलनावर विशेष भर दिलेला दिसतो. प्राचीन भारतीय वैदिक कालखंडामध्ये पृथ्वी, जल, वायू, आणि अग्नी यासारख्या निसर्गातील देवतांना पूजनीय मानले होते. तसेच आदिवासी समुदायांमध्ये ही निसर्गाचे संरक्षण आणि सन्मान या गोष्टींना अतिशय महत्त्वपूर्ण स्थान दिलेले आहे. वन्यजीव, जलस्रोत व नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण करणाऱ्या पारंपारिक ज्ञानाचे आणि प्रथा परंपराचे पालन करत आले आहेत.

- **हवामान बदलाचे ऐतिहासिक पुरावे**

गतकाळामध्ये हवामान बदलाचा परिणाम अनेक संस्कृतीच्या विकासावर आणि ह्रासावर झालेला आहे. उदाहरणार्थ लहान हीमयुग (1300-1850) या थंड हवामानाच्या कालखंडामध्ये हिमनद्यांचे प्रमाण वाढले. आणि पिकांचे नुकसान झाले. दुष्काळ, अतिवृष्टी यासारख्या बदलांमुळे अन्नाची कमतरता निर्माण झाली. तसेच मध्ययुगीन उबदार कालावधी (900-1300) मध्ये नैसर्गिक कारणांमुळे युरोप आणि काही भागात तापमानात वाढ झाल्याने लोकसंख्येमध्ये प्रचंड वाढ झाली. नवीन प्रदेशांमध्ये वसाहती स्थापन झाल्या.

- **हरितक्रांती आणि शेती**

20 व्या शतकातील हरित क्रांतीमुळे कृषी उत्पादनात प्रचंड वाढ झाली. ही वाढ करण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञान आणि रासायनिक खतांचा वापर सुरु झाला. परिणामी अन्नधान्याच्या उत्पादनामध्ये प्रचंड वाढ झाली असे असले तरी या हरितक्रांतीमुळे जैवविविधतेवर विपरीत परिणाम झाले. रासायनिक खतांच्या प्रचंड वापरामुळे मृदा प्रदूषित झाली तसेच कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे जैविक साखळी धोक्यात आली.

- **पर्यावरणीय चळवळी आणि संरक्षण**

मानवाच्या उत्पत्ती पासूनच मानव आणि पर्यावरण यांचे संबंध अतिशय घनिष्ठ राहिले आहेत.


*ISBN-978-93-49938-45-8*

औद्योगिकीकरण, लोकसंख्येमध्ये झालेली वाढ आणि नैसर्गिक साधन संपत्तीच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरणावर मोठ्या प्रमाणावर दुष्परिणाम झाले. त्यामुळे पर्यावरण रक्षणासाठी सामाजिक आणि लोक चळवळी निर्माण झाल्या. या चळवळींनी पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती केल्यामुळे शासनाला पर्यावरण केंद्रित धोरणे राबवायला भाग पाडले.

भारत देशामध्ये पर्यावरण संरक्षणाची परंपरा प्राचीन कालखंडापासून असलेली दिसते. वृक्ष, नद्या आणि पर्वतांना भारतीयांच्या अनेक समुदायांमध्ये पवित्र समजले जाते. सांस्कृतिक परंपरेमुळेही पर्यावरणाचे संरक्षण करण्याची जबाबदारी निर्माण झालेली दिसते. 1730 मधील राजस्थानमध्ये अमृता देवींच्या नेतृत्वाखाली बिश्नोई समाज बांधवांनी झाडांचे रक्षण करण्यासाठी खूप मोठा संघर्ष केला. परिणामी समाजात पर्यावरण संरक्षणाबाबत प्रचंड जागृती निर्माण झाली.

1970 मध्ये सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्वाखाली उत्तराखंड राज्यात सुरु झालेले 'चिपको आंदोलन' ही भारतातील पर्यावरण चळवळ समजली जाते. या आंदोलनामुळे स्थानिक निसर्गप्रेमी लोकांनी जंगलतोडीला विरोध करण्यासाठी झाडांना मिठी मारुन आंदोलन केले. परिणामी सरकारला जंगल संवर्धनाची नवीन धोरणे अमलात आणावी लागली. नर्मदा नदीवरील धरण प्रकल्पामुळे होणारे सामाजिक आणि पर्यावरणीय ह्रास सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांच्या नेतृत्वामध्ये सुरु झालेले 'नर्मदा बचाव आंदोलन' ही चळवळ होय.1973 मध्ये केरळमधील पलक्कड जिल्ह्यातील 'सायलेंट व्हॅली' चळवळीमुळे जैवविविधतेने समृद्ध असणाऱ्या जंगलांचे संरक्षण करता आले.

- **जागतिक पर्यावरणीय कायदे**

पर्यावरणाची समस्या ही कोणा एका देशाची समस्या नाही तर पर्यावरणाचे संपूर्ण जगावर परिणाम होत असतात. हवामान बदल, जैवविविधतेचा ऱ्हास, समुद्र प्रदूषण आणि ओझोनथर नुकसान अशा समस्यांवर उपाय करण्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय करार आणि कायदे केले आहेत.

1972 मध्ये स्वीडन देशातील स्टॉकहोम शहरामध्ये परिषद घेण्यात आली. या परिषदेमध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत चर्चा झाली आणि इथून पुढेच पर्यावरण संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याची सुरुवात झाली.

1837 मध्ये झालेल्या मॉन्ट्रियल प्रोटोकॉल या करारामुळे ओझोन थराचे संरक्षण करणे हा होता. तसेच ओझोनला हानी पोहोचणाऱ्या रसायनांच्या उत्पादनावर नियंत्रण ठेवण्यात आले.

1992 च्या शिखर परिषदेतील जैवविविधतेच्या संवर्धनासाठी चा एक आंतरराष्ट्रीय करार करण्यात आला.

अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय करारामुळे आणि कायद्यान्वये जगातील सर्व देशांनी एकत्र येऊन पर्यावरण संरक्षण, हवामान बदल नियंत्रण आणि जैवविविधता संवर्धनासाठी प्रयत्न सुरु केले.

## निष्कर्ष

मानव आणि पर्यावरण यांचे संबंध मानवाच्या उत्क्रांती पासूनच परस्परावलंबी आहेत प्राचीन काळातील संस्कृती नदीकिनारी उदयास आलेल्या दिसतात. या संस्कृत त्यांनी पर्यावरणाची एकरूप होऊन शेती व्यापार आणि सामाजिक व्यवस्था निर्माण केली. तसेच या संस्कृतीमुळे उपलब्ध नैसर्गिक भौगोलिक परिस्थिती, नैसर्गिक साधनसंपत्ती, हवामान याद्वारे आपली जीवनशैली विकसित केली.

मध्ययुगीन कालखंडामध्येही मानवाने जमीन, पाणी, जंगल व खनिजे इत्यादी नैसर्गिक संसाधनाचा वापर केलेला दिसतो. तसेच या कालखंडामध्ये लोकसंख्या वाढ, युद्ध, खनिजे संसाधनांचा वापर जास्त प्रमाणात करण्यात आला. 18 व्या शतकामध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे मोठ्या प्रमाणावर जंगलतोड, प्रदूषण, जमिनीची धूप, हवामान बदल अशा समस्या निर्माण झाल्या. परिणामी निसर्गाचा समतोल बिघडला.

आधुनिक कालखंडामध्ये निर्माण झालेल्या समस्या दूर करण्यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात येऊ लागले. आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पर्यावरणवादी पुढे आले. आणि त्यांनी पर्यावरण रक्षणासाठी चळवळी उभ्या केल्या. त्यामुळे शाश्वत विकास संकल्पना पुढे आली. पर्यावरणीय इतिहासाचा अभ्यास केल्यास मानवी कृतीतून पर्यावरणावर झालेले परिणाम अभ्यासता येतात. तसेच भविष्यकाळा साठी योग्य धोरणे राबवता येतात.

ऐतिहासिक दृष्टिकोनातून पर्यावरणीय अभ्यासातून मानव आणि निसर्गाचे महत्त्व स्पष्ट होते. शाश्वत विकासासाठी पर्यावरणाचे रक्षण, नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य वापर करणे आणि जगभरात पर्यावरणाची जागृती करणे गरजेचे आहे.

## *संदर्भ*


1. Thapar Romila, Early India, Penguin Book, 2002.
2. Rangarajan Mahesh, India's environmental history, Parmanand black, 2012
3. वैद्य सुमन, आधुनिक जग, साईनाथ प्रकाशन, 2002
4. कुलकर्णी अ.रा, इतर, आधुनिक जगाचा इतिहास, स्नेहवर्धन, पुणे, 2001.
5. सांगळे शैलजा, पर्यावरण भूगोल, डायमंड प्रकाशन, पुणे, 2008.
6. bioexplorer.net
7. Environmental-ecology.com
8. https://www.unep.org
9. https://www.unep.org
10. https://pompeiisites.org



*ISBN-978-93-49938-45-8*

# स्त्री शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी काळाची गरज

**डॉ. प्रविण बाळासाहेब पिसे**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा,अहिल्यानगर.

Email:

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19778860

*DOI: 10.5281/zenodo.19778860*

**प्रस्तावना**

स्त्री शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी ही आजच्या प्रगत समाजाची नितांत गरज आहे, कारण शिक्षित स्त्री केवळ स्वतःचेच नाही, तर संपूर्ण कुटुंबाचे आणि पिढ्यांचे भविष्य उज्ज्वल करते तसेच राष्ट्राचा विकास घडवून आणते. आर्थिक स्वावलंबन, आरोग्य, साक्षरता आणि लिंगसमानता वाढवते, ज्यामुळे बालविवाह आणि गरिबी कमी होते आणि राष्ट्रनिर्मितीला गती मिळते. यासाठी महिलांचे शिक्षण आर्थिक स्वावलंबन, आरोग्य सुधारणा, बालविवाह रोखणे आणि लिंग समानता (Gender Equality) आणण्यासाठी आवश्यक आहे .

स्त्री शिक्षण हे केवळ वैयक्तिक प्रगती नसून, सामाजिक सक्षमीकरणाचा आणि राष्ट्राच्या विकासाचा कणा आहे. सावित्रीबाई फुले यांच्या कार्यापासून प्रेरित होऊन, शिक्षणामुळे महिलांना आत्मसन्मान, आरोग्य आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळते. साक्षर स्त्री संपूर्ण कुटुंबाला व समाजाला प्रगत करते, ज्यामुळे सामाजिक बांधिलकी साध्य होते.

भारतातील महिला शिक्षण आणि सामाजिक सुधारणांच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आणि कार्यावर केंद्रित आहे. मुली आणि खालच्या जातींच्या शिक्षणाचे महत्त्व उघडपणे बोलणाऱ्या त्या पहिल्या महिलांपैकी एक होत्या. ज्या काळात महिलांना शाळेत जाण्याची परवानगी नव्हती, त्या काळात सावित्रीबाई फुले यांनी त्यांचे पती ज्योतिबा फुले यांच्यासोबत पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा उघडली. त्यांचा असा विश्वास होता की शिक्षण हे एक शक्तिशाली साधन आहे जे लोकांना अज्ञान, गरिबी आणि सामाजिक असमानतेच्या साखळ्यांपासून मुक्त होण्यास मदत करु शकते. सावित्रीबाईंनी जुन्या, अरुंद शिक्षण व्यवस्थेला आव्हान दिले ज्याने अनेक लोकांना, विशेषतः महिला आणि मागासवर्गीय लोकांना वगळले होते. त्यांना एक नवीन प्रकारचे शिक्षण हवे होते - सर्वांसाठी खुले, न्याय्य आणि समानतेवर आधारित. त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला, ज्यात बदल नको असलेल्या लोकांकडून धमक्या आणि अपमान यांचा समावेश होता. परंतु त्यांनी धैर्याने आणि दृढनिश्चयाने काम सुरु ठेवले. या अभ्यासाचे उद्दिष्ट शिक्षणाचे तत्वज्ञान, स्त्रीवादी विचार आणि समाजसुधारक म्हणून तिची भूमिका स्पष्ट करणे आहे.

२१ व्या शतकात त्यांचे योगदान अजूनही कसे महत्त्वाचे आहे हे देखील पहिले जाते . त्यांची मूल्ये - जसे की समानता, न्याय आणि समावेश - आजची शिक्षण व्यवस्था अधिक अर्थपूर्ण आणि सर्वांसाठी उपयुक्त बनवण्यासाठी आपल्याला मार्गदर्शन करू शकतात. त्यांच्या जीवनातून आणि कार्यातून शिकून, आपण अधिक समान आणि शिक्षित करण्याच्या दिशेने वाटचाल करू शकतो.

**भारतीय स्त्री शिक्षणाचा थोडक्यात इतिहास**

भारतीय स्त्री शिक्षणाचा इतिहास हा अत्यंत संघर्षाचा आणि प्रेरणादायी आहे. त्याचे मुख्य टप्पे खालीलप्रमाणे आहेत:

- **प्राचीन काळ:** वैदिक कालखंडात स्त्रियांना शिक्षणाचे समान अधिकार होते. गार्गी, मैत्रेयी यांसारख्या विदुषींनी वेदांचा अभ्यास केला होता. मात्र, उत्तर-वैदिक काळात सामाजिक निर्बंधांमुळे हे प्रमाण कमी झाले.
- **मध्ययुगीन काळ:** या काळात परकीय आक्रमणांमुळे आणि सामाजिक बंधनांमुळे स्त्री शिक्षणाची मोठी पीछेहाट झाली. मात्र, काही मोजक्या स्त्रियांनी (उदा. गुलबदन बेगम) वैयक्तिक पातळीवर शिक्षण घेतले होते.
- **ब्रिटीश काळ व आधुनिक सुरुवात:**

  **पहिली मुलींची शाळा:** १ जानेवारी १८४८ रोजी महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्याच्या भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरु करून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. 'सावित्रीबाई फुले' ह्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका आणि मुख्याध्यापिका ठरल्या.
- **महत्त्वाचे टप्पे:** पहिली पदवीधर महिला: १८७८ मध्ये कलकत्ता विद्यापीठाने महिलांना पदवी परीक्षेसाठी प्रवेश दिला, जे भारतातील महिला उच्च शिक्षणातील मोठे पाऊल होते.
- **महिला विद्यापीठ:** १९१६ मध्ये महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महिलांसाठी भारतातील पहिले स्वतंत्र विद्यापीठ (SNDT) स्थापन केले.
- **महत्त्वाच्या संस्था:** पंडिता रमाबाईंनी ' शारदा सदन ' तर महर्षी कर्वेंनी १९०७ मध्ये हिंगणे येथे मुलींची शाळा सुरू केली.
- **समाजसुधारकांचे योगदान:** विष्णुशास्त्री पंडित,गोपाळ गणेश आगरकर, गोपाळ कृष्ण गोखले आणि राजा राममोहन रॉय यांसारख्या सुधारकांनी स्त्री शिक्षणासाठी कायदेशीर आणि सामाजिक लढा दिला.
- **स्वातंत्र्योत्तर काळ:** १९४७ मध्ये महिला साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी (सुमारे ६%) होते, जे २०२३ च्या अंदाजानुसार ७७% पर्यंत पोहोचले आहे. शासनाने 'कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय' (२००४) सारख्या विविध योजनांद्वारे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले आहे.


ISBN-978-93-49938-45-8

आजचे महिला शिक्षणाचे प्रमाण २०२५ च्या आकडेवारीनुसार, भारतात शालेय स्तरावर मुलींचे नावनोंदणी प्रमाण (Enrolment) ४८.३% पर्यंत पोहोचले आहे. उच्च शिक्षणात महिलांचा सहभाग ५०% च्या जवळ (सुमारे २.०७ कोटी) झाला आहे. STEM (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित) शाखेत महिला पदवीधरांचे प्रमाण ४३% इतके आहे. महिला साक्षरतेचे प्रमाण साधारण ६२.३% (जागतिक स्तरावर ७९.९%) असल्याचे दिसून येते.

**स्त्री शिक्षणाचे महत्त्व ( Importance of Female Education )**

- **आर्थिक स्वावलंबन व सक्षमीकरण**

शिक्षणामुळे स्त्रियांना नोकरी व व्यवसायाच्या संधी मिळून त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम बनतात, कुटुंबाच्या उत्पन्नात भर टाकतात. ज्यामुळे त्या आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होतात आणि कुटुंबावर अवलंबून राहत नाहीत.

- **आरोग्य आणि सुधारित जीवनमान**

शिक्षित महिलांना स्वतःचे आणि मुलांचे आरोग्य, पोषण आणि स्वच्छता अधिक चांगल्या प्रकारे समजते.

- **कुटुंबाचा विकास व भविष्यातील पिढ्या**

'एक मुलगी शिकली तर एक कुटुंब शिकते' हे खरे आहे, कारण सुशिक्षित महिला कुटुंबाचे आरोग्य, पोषण आणि मुलांच्या शिक्षणाकडे उत्तम लक्ष देतात. एक शिक्षित आई आपल्या मुलांच्या शिक्षणाला अधिक महत्त्व देते, ज्यामुळे पुढची पिढी सुजाण नागरिक बनते.

- **सामाजिक समता**

स्त्री-पुरुष समानता साधण्यासाठी, रुढी-परंपरांना विरोध, हुंडाबळी आणि सामाजिक अत्याचार रोखण्यासाठी महिलांचे सुशिक्षित असणे गरजेचे आहे.

**सामाजिक बांधिलकीचे महत्त्वाचे मुद्दे**

- **सामाजिक बांधिलकी**

सुशिक्षित महिलांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून अन्य महिलांना सक्षम करणे, बालविवाह रोखणे आणि सामाजिक जागरुकतेसाठी योगदान देणे आवश्यक आहे .

राष्ट्राच्या विकासात सक्रीय सहभाग :

साक्षर महिला देशाच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवून, भारताला प्रगत बनविण्यासाठी कायम सक्रीय असणे आवश्यक आहे .

- **काळाची गरज**

ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाबाबत अजूनही उदासीनता आहे, ती बदलून प्रत्येक मुलगी शाळेत जाईल आणि उच्च शिक्षण घेईल, याची खात्री करणे हे समाजाचे कर्तव्य आहे . सरकारी योजना (उदा. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ') आणि लोकांची मानसिकता बदलून स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे.

**सामाजिक बांधिलकी आणि काळाची गरज ( Social Responsibility and Necessity)**

- **मानसिकता बदल**

केवळ शाळा-कॉलेज पुरेसे नाही, तर समाजाने स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून तिला समान संधी देणे ही काळाची गरज आहे .

- **बालविवाह व असमानता निर्मूलन**

मुलींना अधिक काळ शाळेत ठेवल्यास बालविवाह आणि अकाली मातृत्व टाळले जाऊ शकते , तसेच महिलांवरील अत्याचार कमी होऊ शकतात.

- **ग्रामीण विकास**

ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी सरकारी योजनांच्या (उदा. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ') प्रभावी अंमलबजावणीसाठी सामाजिक पुढाकार आवश्यक आहे.

थोडक्यात सांगायचे झाले तर , "एक मुलगी शिकली तर दोन कुटूंब शिकतात." स्त्री शिक्षण हे केवळ हक्क नसून समाजाच्या प्रगतीसाठी एक महत्त्वपूर्ण गुंतवणूक आहे, हे प्रत्येकाने लक्षात घेणे आवश्यक आहे. देशाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रगतीमध्ये महिलांचा समसमान वाटा उचलण्यासाठी स्त्री शिक्षण अपरिहार्य आहे .थोडक्यात, स्त्री शिक्षण ही सुदृढ समाज आणि प्रगत राष्ट्राची गुरुकिल्ली आहे. फक्त याची सुरुवात प्रत्येकाने स्वतःपासून आपल्या कुटुंबापासून करायला हवी. प्रत्येक गोष्टीसाठी सरकारवर विसंबून न राहता प्रत्येकाने आपले कर्तव्य जबाबदार नागरिक म्हणून पार पडवीत , तरच प्रत्येक घरातील स्त्री , मुलगी ही स्वावलंबी होईल सुशिक्षित व सुरक्षित होईल ,यातच खरे राष्ट्रहित दडले आहे हे प्रत्येकाने समजून घ्यावे .

***संदर्भ***


1. श्री.स.पंडित. " विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांचे चरित्र " प्रकाशन विधवाविवाह मंडळ , पुणे ,१९३६.
2. प्रा.व्ही.बी.पाटील, "एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील समाज सुधारणेचा इतिहास, के.सागर प्रकाशन पुणे प्र.आ.२००४



*ISBN-978-93-49938-45-8*

3. गं.भा. सरदार, "महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी" सुनंदा प्रकाशन पुणे.
4. डॉ.प्रसन्न प्रकाश बगडे, " North Asian International Research Journal of Social Science & Humanities" 454-9827 Vol. 8, Issue-1 January -2022 125 ISSN: 2454-9827 Vol. 9, Issue-3, March-2023
5. आग्रवाल. एस. पी. आणण आग्रवाल जे. सी. (1994). भारतातील स्त्री शिक्षण , खंड. 1, नवी दिल्ली
6. मराठी विश्कोश , " स्त्रीशिक्षण, भारतातील " लेख २०१९
7. Gupta, N. L. Women Education through the Ages, New Delhi, 2000.
8. बाबर, सरोजिनी, स्त्री-शिक्षणाची वाटचाल, मुंबई, १९६८.

# मानव्य विद्याशाखेपुढील आव्हाने व संधी: पर्यावरण आणि इतिहास

**श्री. पोटे विशाल छबू, डॉ. गिरमकर कान्हू लक्ष्मण**

[१]संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर इतिहास अध्ययन व संशोधन केंद्र, न्यू आर्ट्स कॉमर्स व सायन्स महाविद्यालय, अहिल्यानगर.

[२]संशोधक मार्गदर्शक, पदव्युत्तर इतिहास अध्ययन व संशोधन केंद्र, न्यू आर्ट्स कॉमर्स व सायन्स महाविद्यालय, अहिल्यानगर.

Email:

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19778963

*DOI: 10.5281/zenodo.19778963*

## प्रस्तावना

मानव्य विद्याशाखा म्हणजे केवळ साहित्य, इतिहास किंवा तत्त्वज्ञान नव्हे, तर माणूस, समाज, संस्कृती आणि इतिहास यांचा सखोल अभ्यास होय. विज्ञान 'कसे?' याचे उत्तर देते, तर मानव्य शाखा 'का?' आणि 'त्याचा परिणाम काय?' हे स्पष्ट करते. माधव गाडगीळ यांच्या मते, निसर्ग आणि माणसातील नाते समजण्यासाठी इतिहास, संस्कृती आणि लोकजीवन महत्त्वाचे आहे. डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञान वाढले असले तरी मानव्य शाखेचे महत्त्व कमी झालेले नाही; उलट नैतिकता, विचारशक्ती आणि प्रश्न विचारण्याची क्षमता यासाठी तिची गरज अधिक वाढली आहे. पर्यावरण आणि इतिहास यांचा घनिष्ठ संबंध आहे. रामचंद्र गुहा यांनी 'The Unquiet Woods' मध्ये दाखविल्याप्रमाणे, समाजाचा पर्यावरणाशी असलेला संबंध त्याच्या संस्कृती आणि विकासाला आकार देतो. त्यामुळे मानव्य विद्याशाखा आजही अत्यंत महत्त्वाची आणि पुनर्परिभाषित होत असलेली शाखा आहे.

## मानव्य विद्याशाखेपुढील प्रमुख आव्हाने

- **व्यावसायिकतेचा समज आणि वास्तव**

मानव्य विद्याशाखेसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे 'या शाखेत भवितव्य नाही' हा व्यापक समज. पालक आणि विद्यार्थ्यांना वाटते की STEM किंवा वाणिज्य शाखेत शिकले तरच नोकरी मिळते. मानव्य विद्याशाखेत शिकण्यात वेळ वाया जातो, असा एक गैरसमज समाजात खोलवर रुजला आहे. परंतु हे पूर्णतः खरे नाही. आज कंपन्यांना केवळ तंत्रज्ञ नव्हे, तर चांगले संवाद साधणारे (Communicators), नैतिक निर्णय घेणारे (Ethical Thinkers) आणि सर्जनशील विचारवंत (Creative Thinkers) हवे आहेत आणि या सर्व गुणांचे बीज मानव्य विद्याशाखेत असते.


*ISBN-978-93-49938-45-8*

Google, Apple यांसारख्या कंपन्यांचे सर्वेक्षण सांगते की त्यांना मानव्य विद्याशाखेचे पदवीधर हवे असतात कारण ते 'वेगळ्या प्रकारे विचार' करतात.

- **कमी होत चाललेला विद्यार्थ्यांचा कल**

गेल्या दशकात मानव्य विद्याशाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या घटत आहे. याची अनेक कारणे आहेत. पारंपरिक अभ्यासक्रम कालबाह्य झाले आहेत, शिकवण्याच्या पद्धती रुक्ष आहेत, आणि नव्या तंत्रज्ञानाशी सांगड घातलेली नाही. विद्यार्थ्यांना हे विषय 'आजच्या काळाशी संबंधित' वाटत नाहीत. याशिवाय, महागड्या इंजिनिअरिंग किंवा MBA शिक्षणाच्या तुलनेत मानव्य विद्याशाखेतील पदव्यांना बाजारात कमी महत्त्व दिले जाते. ही परिस्थिती बदलण्यासाठी अभ्यासक्रमाचे आमूलाग्र नूतनीकरण गरजेचे आहे.

- **अनुदान आणि संशोधन निधीचा अभाव**

भारतात आणि जगभरात मानव्य विद्याशाखेतील संशोधनासाठी मिळणारे अनुदान (Grant) विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखांच्या तुलनेत अत्यल्प आहे. University Grants Commission (UGC) च्या आकडेवारीनुसार, विज्ञान शाखेला मिळणाऱ्या संशोधन निधीच्या तुलनेत मानव्य विद्याशाखेला साधारण १/५ निधी मिळतो. यामुळे मूलभूत संशोधन होत नाही आणि नवीन ज्ञाननिर्मिती खुंटते.

**पर्यावरण आणि इतिहासाच्या संदर्भातील विशेष आव्हाने**

- **ऐतिहासिक वारशाचा ऱ्हास**

जगभरात ऐतिहासिक वास्तू, हस्तलिखिते, शिलालेख आणि पुरातत्त्वीय साधने यांचा वेगाने ऱ्हास होत आहे. यामागे दोन प्रमुख कारणे आहेत. एक म्हणजे वाढते शहरीकरण, आणि दुसरे म्हणजे हवामान बदल (Climate Change). UNESCO च्या अहवालानुसार (२०२३), जगातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त World Heritage Sites हवामान बदलाच्या धोक्यात आहेत. अतिवृष्टी, पूर, वाढत्या तापमानाने दगडांची झीज आणि समुद्राच्या पाण्याच्या वाढत्या पातळीमुळे किनारपट्टीवरील ऐतिहासिक ठिकाणे धोक्यात आहेत. भारतात हम्पी, अजंठा-एलोरा, मोहेंजो-दाडो यांसारख्या ठिकाणांवरही हा धोका आहे. "जेव्हा एखादी ऐतिहासिक वास्तू नष्ट होते, तेव्हा केवळ एक इमारत नाही, तर एक संस्कृती नष्ट होते."

- **पर्यावरणाच्या इतिहासाकडे दुर्लक्ष**

'पर्यावरणाचा इतिहास' ही एक अत्यंत महत्त्वाची विद्याशाखा आहे, परंतु भारतात अजूनही या विषयाला मुख्य प्रवाहातील अभ्यासात पुरेसे स्थान मिळालेले नाही. पर्यावरणाचा इतिहास म्हणजे माणूस आणि निसर्ग यांच्यातील आदानप्रदानाचा इतिहास होय. माणसाने निसर्गाला कसे बदवले

आणि निसर्गाने माणसाला कसे बदवले, हे सांगणारी शाखा होय.. ब्रिटिश राजवटीत जंगलांचे कसे व्यापारीकरण झाले आणि त्याचे पर्यावरणीय आणि सामाजिक परिणाम काय झाले, हे त्यांनी सांगितले आहे. असा अभ्यास आपल्या शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमात नाही, हे मोठे आव्हान आहे.

- **माहितीचे जतन एक तांत्रिक आव्हान**

प्राचीन हस्तलिखिते, जुने नकाशे, पर्यावरणीय नोंदी आणि ऐतिहासिक कागदपत्रे जतन करणे हे आजच्या काळातील एक मोठे आव्हान आहे. कागद नाशवंत आहे, शाई फिकी होते, उष्णता आणि ओलाव्यामुळे हस्तलिखिते नष्ट होतात. भारतातील हजारो मंदिरांमध्ये, मठांमध्ये आणि खाजगी संग्रहांमध्ये अशी असंख्य मौल्यवान कागदपत्रे धोक्यात आहेत.

**मानव्य विद्याशाखेपुढील संधी**

- **आंतरविद्याशाखीय अभ्यास (Interdisciplinary Approach)**

मानव्य विद्याशाखेसाठी आज सर्वात मोठी संधी म्हणजे इतर शाखांशी जोडणे. 'इको-क्रिटिसिझम' हे एक उत्तम उदाहरण आहे. साहित्यात निसर्गाचे चित्रण कसे होते आणि त्यातून माणसाच्या पर्यावरणाबद्दलच्या भूमिकेचे काय दर्शन घडते, हा या शाखेचा अभ्यास असतो. 'पर्यावरणीय इतिहास' (Environmental History) ही आणखी एक नवीन पण अत्यंत महत्त्वाची शाखा आहे. यात इतिहासकार, पर्यावरणशास्त्रज्ञ, भूगोलतज्ज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञ एकत्र येऊन काम करतात. अशा आंतरविद्याशाखीय संशोधनात करिअरच्या प्रचंड संधी आहेत. UNEP (United Nations Environment Programme) सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांना अशा तज्ज्ञांची गरज असते.

- **डिजिटल ह्युमॅनिटीज (Digital Humanities)**

डिजिटल ह्युमॅनिटीज म्हणजे तंत्रज्ञान आणि मानव्य विद्याशाखा यांचा सुवर्णमध्य. यात संगणक, इंटरनेट आणि डेटा विश्लेषणाच्या साहाय्याने इतिहासाचे दस्तावेजीकरण, भाषांचा अभ्यास, साहित्याचे विश्लेषण आणि पर्यावरणीय माहितीचे जतन केले जाते. उदाहरण द्यायचे तर, Google Arts & Culture या प्रकल्पाने जगभरातील शेकडो संग्रहालयांतील लक्षावधी कलाकृती डिजिटल स्वरुपात जतन केल्या आहेत. डिजिटल ह्युमॅनिटीजमध्ये पुढील करिअर संधी उपलब्ध आहेत: डेटा क्युरेटर (Data Curator), डिजिटल आर्किव्हिस्ट, कल्चरल हेरिटेज मॅनेजर या सर्व क्षेत्रांत मानव्य विद्याशाखेच्या पदवीधरांना मागणी आहे.


*ISBN-978-93-49938-45-8*

- **वारसा संवर्धन आणि इको-टुरिझम**

भारत हा इतिहास आणि निसर्गसंपदेने समृद्ध देश आहे. UNESCO च्या यादीत भारतातील ४२ World Heritage Sites आहेत. याशिवाय, हजारो राज्यस्तरीय ऐतिहासिक वास्तू आणि राष्ट्रीय उद्यानेही आहेत. या वारशाचे संवर्धन करून 'इको-टुरिझम' (Eco-tourism) आणि 'हेरिटेज टुरिझम' (Heritage Tourism) यातून रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होऊ शकतात. पर्यटन उद्योग हा भारताच्या GDP मध्ये ७.५% योगदान देतो. वारसा संवर्धन तज्ज्ञ, पर्यावरण पर्यटन मार्गदर्शक, सांस्कृतिक व्यवस्थापक आणि स्थानिक इतिहासकार यांची गरज सतत वाढत आहे. मानव्य विद्याशाखेचे विद्यार्थी या क्षेत्रात मोठी भूमिका बजावू शकतात.

- **धोरण निर्मिती (Policy Making)**

हवामान बदलाशी लढणे, जैवविविधता जपणे, नद्यांचे संरक्षण करणे या सर्व गोष्टींसाठी केवळ वैज्ञानिक माहिती पुरेशी नाही. ऐतिहासिक दृष्टिकोन अत्यंत आवश्यक आहे. 'भूतकाळात आपण कुठे चुकलो?' हे समजले तर भविष्यातील धोरणे अधिक प्रभावी होतात. केरळ सरकारने 'People's Planning Campaign' राबवताना स्थानिक पर्यावरणाचा इतिहास, जल-व्यवस्थापनाच्या पारंपरिक पद्धती आणि स्थानिक समुदायांचे ज्ञान यांचा उपयोग केला. याचे परिणाम अत्यंत सकारात्मक आले. NITI Aayog सारख्या संस्थांमध्ये, पर्यावरण मंत्रालयात आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये इतिहासकार आणि पर्यावरण अभ्यासकांची गरज वाढत आहे.

## निष्कर्ष

मानव्य विद्याशाखा संपत नसून बदलत्या काळानुसार रूपांतरित होत आहे. पर्यावरण, हवामान बदल आणि सांस्कृतिक ओळख यांसारख्या प्रश्नांची उत्तरे केवळ विज्ञान देऊ शकत नाही; त्यासाठी मानवी दृष्टिकोन आणि ऐतिहासिक समज आवश्यक आहे. माधव गाडगीळ यांच्या मते, शाश्वत विकासासाठी विज्ञान आणि पारंपरिक ज्ञान यांची सांगड आवश्यक असून हे ज्ञान जपण्याचे कार्य मानव्य विद्याशाखा करते. माणसाची मुळे त्याच्या इतिहासात आणि पर्यावरणाशी असलेल्या नात्यात आहेत, आणि ती जपण्याचे काम हीच शाखा करते. त्यामुळे मानव्य विद्याशाखेचे भविष्य उज्ज्वल असून ती पुढील काळात अधिक महत्त्वाची ठरणार आहे.

## उपाययोजना / शिफारशी

### विद्यार्थी आणि शिक्षण संस्थांसाठी

- मानव्य विद्याशाखेचा अभ्यासक्रम डिजिटल ह्युमॅनिटीज, पर्यावरण इतिहास आणि Policy Analysis यांचा समावेश करून अद्ययावत करावा. त्यात प्रत्यक्ष प्रकल्प (Project-Based

Learning) असावेत.

- विद्यार्थ्यांना ऐतिहासिक ठिकाणे (Forts, Caves, Heritage Sites), जंगले, धरणे, राष्ट्रीय उद्याने यांना भेटी द्याव्यात जेणेकरून पर्यावरण आणि इतिहास हे विषय जिवंत होतात.
- इतिहास + पर्यावरणशास्त्र, साहित्य + समाजशास्त्र, भाषाशास्त्र + संगणकशास्त्र असे एकत्रित अभ्यासक्रम (Integrated Courses) सुरु करावेत.
- पर्यावरण इतिहास, लोककला, स्थानिक परंपरा यांवर विद्यार्थी-स्तरावर लघु-संशोधन प्रकल्प (Mini Research Projects) सुरू करावेत. यासाठी UGC, ICHR यांनी अनुदान द्यावे.

**सरकार आणि धोरणकर्त्यांसाठी**

- मानव्य विद्याशाखेतील संशोधनासाठी स्वतंत्र निधी ठेवावा. पर्यावरण इतिहास आणि वारसा संवर्धन या क्षेत्रांसाठी विशेष अनुदान द्यावे.
- राष्ट्रीय स्तरावर हस्तलिखिते, ऐतिहासिक कागदपत्रे आणि पर्यावरणीय नोंदींचे डिजिटलीकरण मोठ्या प्रमाणावर राबवावे.
- पर्यावरण आणि विकास धोरणे ठरवताना इतिहासकार, पर्यावरण अभ्यासक आणि मानवशास्त्रज्ञ यांचा सल्ला घेणे अनिवार्य करावे.

***संदर्भ***

1. गाडगीळ, माधव आणि गुहा, रामचंद्र. या नदीचे नाव सांगा. पुणे: मेहता पब्लिशिंग हाऊस, २०१०.
2. कुलकर्णी, अ. र. भारतीय पर्यावरणाचा इतिहास. पुणे: महाराष्ट्र साहित्य परिषद, २०१५.
3. देशपांडे, पुरुषोत्तम. मानव्य विद्याशाखा: आव्हाने आणि संधी. मुंबई: लोकवाङ्मय गृह, २०१८.
4. Gadgil, Madhav and Guha, Ramachandra. Ecology and Equity: The Use and Abuse of Nature in Contemporary India. New Delhi: Penguin Books, 1995.
5. Guha, Ramachandra. The Unquiet Woods: Ecological Change and Peasant Resistance in the Himalaya. New Delhi: Oxford University Press, 2000.
6. Guha, Ramachandra and Martinez-Alier, Juan. Varieties of Environmentalism: Essays North and South. London: Earthscan, 1997.
7. Guha, Ramachandra. This Fissured Land: An Ecological History of India. New Delhi: Oxford University Press, 1992.
8. Guha, Ramachandra. Environmentalism: A Global History. New York: Longman, 2000.
9. Guha, Ramachandra. India After Gandhi: The History of the World's Largest Democracy. New Delhi: Pan Macmillan, 2007.


*ISBN-978-93-49938-45-8*

# मनोरंजनाचे माध्यम नाटक : इतिहास, विकास व उपयोजिता

**प्रा. राजगुरू गौतम धनाजी**

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत

Email: gtmrajguru@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19779059

*DOI: 10.5281/zenodo.19779059*

## प्रस्तावना

मनोरंजन हा मानवी जीवनाचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि अविभाज्य घटक आहे. मानवी जीवनातील ताणतणाव, दैनंदिन कामाचा थकवा आणि मानसिक दडपण कमी करण्यासाठी मनोरंजनाची गरज भासते. म्हणूनच प्राचीन काळापासून मानवाने विविध माध्यमांच्या साहाय्याने मनोरंजनाची साधने विकसित केली आहेत. समाजाच्या सांस्कृतिक, आर्थिक आणि तांत्रिक विकासानुसार मनोरंजनाची साधनेही बदलत गेली आहेत.

मनोरंजनाची माध्यमे व्यक्तीचे वय, राहण्याचे ठिकाण, शिक्षण, आर्थिक स्थिती आणि सामाजिक वातावरण यांवरही अवलंबून असतात. प्राचीन काळात लोक गोट्या, विटीदांडू, लपंडाव, बैलांच्या शर्यती, कोंबड्यांच्या झुंजी, लोकगीत, कीर्तन, प्रवचन, पोवाडे, भजन, नृत्य यांसारख्या पारंपरिक माध्यमांतून मनोरंजन करत असत. पुढे काळाच्या ओघात नाटक, चित्रपट, रेडिओ, दूरचित्रवाणी, वृत्तपत्रे, संगणक, इंटरनेट, सामाजिक माध्यमे आणि विविध खेळ यांचा समावेश मनोरंजनाच्या साधनांमध्ये झाला.

आजच्या आधुनिक युगात मनोरंजन हे केवळ विरंगुळा नसून शिक्षण, माहिती, समाजप्रबोधन आणि जनमत निर्मितीचे प्रभावी साधन बनले आहे. विशेषतः नाटक हे मनोरंजनाचे एक महत्त्वपूर्ण माध्यम असून ते समाजातील विविध प्रश्न, समस्या आणि मूल्ये प्रभावीपणे मांडणारे कलारूप आहे.

## भारतातील मनोरंजन व प्रसारमाध्यम उद्योग

मानवी समाजाच्या विकासासोबत संप्रेषण आणि प्रसारमाध्यमांचा विकास झाला. प्राचीन काळात संदेशवहनासाठी निरोप्यांचा वापर केला जात असे. एका गावातून दुसऱ्या गावात किंवा एका राज्यातून दुसऱ्या राज्यात माहिती पोहोचविण्यासाठी दूतांची मदत घेतली जात असे.

छपाईयंत्राचा शोध लागल्यानंतर प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात मोठी क्रांती घडली. वृत्तपत्रे आणि मासिके यांचा उदय झाला आणि माहितीचा प्रसार अधिक वेगाने होऊ लागला. त्यानंतर रेडिओ, दूरचित्रवाणी, चित्रपट आणि इंटरनेट या माध्यमांनी समाजातील माहिती आणि मनोरंजनाचा चेहरामोहरा बदलून

टाकला.

माध्यम तज्ज्ञ मार्शल मॅकलुहान यांनी आधुनिक संप्रेषण तंत्रज्ञानामुळे संपूर्ण जग एकमेकांशी जोडले गेले असून जग "वैश्विक खेडे" बनले आहे असे मत मांडले. आज उपग्रह संप्रेषणामुळे जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील घटना घरबसल्या पाहता येतात.

प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून समाजाला माहिती देणे, शिक्षण देणे, मनोरंजन करणे, सामाजिक जागृती घडविणे आणि लोकमत तयार करणे अशी अनेक कार्ये केली जातात. रेडिओ, दूरचित्रवाणी आणि चित्रपट यांनी ग्रामीण व शहरी भागात ज्ञान आणि मनोरंजन पोहोचविण्यात मोठे योगदान दिले आहे.

## नाटकाची संकल्पना आणि स्वरूप

नाटक हा एक संमिश्र आणि प्रभावी कलाप्रकार आहे. साहित्य, अभिनय, संगीत, नृत्य, नेपथ्य, प्रकाशयोजना आणि रंगभूषा या सर्व कलांचा संगम नाटकामध्ये दिसून येतो. त्यामुळे नाटकाला दृश्य व श्राव्य वाङ्मयप्रकार असे म्हटले जाते.

"नट" या शब्दाचा अर्थ अभिनय करणे, नृत्य करणे किंवा रूप बदलणे असा होतो. इंग्रजी भाषेत नाटकाला "Drama" असे म्हणतात. Drama हा ग्रीक शब्द असून त्याचा अर्थ "to act" किंवा "to do" असा होतो. त्यामुळे नाटक म्हणजे मानवी जीवनातील घटना, प्रसंग आणि अनुभवांचे अभिनयाद्वारे केलेले सादरीकरण होय.

नाटक आणि रंगभूमी या संकल्पना एकमेकांशी निगडित आहेत. नाट्यसंहितेचे प्रभावी सादरीकरण करण्यासाठी रंगभूमीची आवश्यकता असते. रंगमंचावर कलाकार संवाद, हालचाली आणि अभिनय यांच्या माध्यमातून कथा प्रेक्षकांसमोर सादर करतात.

## नाटकाची पार्श्वभूमी

भारतीय नाट्यपरंपरेचा इतिहास अत्यंत प्राचीन आहे. वैदिक काळातही नाट्यप्रकार अस्तित्वात होते. संस्कृत नाटकांच्या परंपरेत अश्वघोष, भास, कालिदास, शूद्रक, भवभूती, विशाखादत्त यांसारख्या नाटककारांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

भरतमुनी यांनी लिहिलेल्या "नाट्यशास्त्र" या ग्रंथात नाट्यकलेचे नियम, तत्त्वे आणि सैद्धांतिक मांडणी केली आहे. नाट्यशास्त्राला भारतीय रंगभूमीचा मूलभूत ग्रंथ मानले जाते.

मराठी नाटकाचा उदय जरी उशिरा झाला असला तरी त्याची मुळे लोकनाट्यपरंपरेत आढळतात. कीर्तन, भारूड, पोवाडे, दशावतारी खेळ, कळसूत्री बाहुल्यांचे खेळ या लोककलांमधून मराठी नाट्यपरंपरेचा विकास झाला.

## मराठी नाटकाचा उदय


ISBN-978-93-49938-45-8

मराठी रंगभूमीचा औपचारिक उदय इ.स. १८४३ मध्ये सांगली येथे झाला. विष्णुदास भावे यांनी "सीता स्वयंवर" हे नाटक सादर केले. हे मराठीतील पहिले गद्य-पद्य मिश्रित नाटक मानले जाते.
भावे यांच्या नाटकांना प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आणि मराठी नाट्यपरंपरेला नवी दिशा मिळाली. पुढे पुणे आणि मुंबई येथेही नाट्यप्रयोग होऊ लागले.

**नाटकाचा विकास**

तंजावरची नाटके-तंजावर येथे मराठी संस्कृतीचा प्रभाव असल्यामुळे तेथे मराठी नाट्यलेखनाची परंपरा निर्माण झाली. सरफोजी भोसले यांनी नाट्यकलेला आश्रय दिला. तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयात अनेक मराठी नाट्यहस्तलिखिते आजही जतन केलेली आहेत.

**पौराणिक नाटके**

मराठी रंगभूमीच्या प्रारंभीच्या काळात पौराणिक विषयांवर आधारित नाटके प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय होती. रामायण, महाभारत आणि पुराणांतील कथानकांवर आधारित नाटके सादर केली जात असत.

**ऐतिहासिक नाटके**

१९व्या शतकात राष्ट्रभक्तीची भावना वाढल्यामुळे ऐतिहासिक नाटकांची परंपरा विकसित झाली. मराठ्यांच्या इतिहासातील वीरपुरुषांवर आधारित नाटके लिहिली गेली. संभाजी महाराज, माधवराव पेशवे, झाशीची राणी यांसारख्या ऐतिहासिक व्यक्तींवर अनेक नाटके लिहिली गेली.

**सामाजिक नाटके**

सामाजिक सुधारणा चळवळींच्या प्रभावामुळे मराठी रंगभूमीवर सामाजिक प्रश्नांवर आधारित नाटके निर्माण झाली. विधवाविवाह, स्त्रीशिक्षण, बालविवाह, जातिभेद यांसारख्या विषयांवर प्रकाश टाकणारी नाटके लिहिली गेली.
महात्मा फुले यांचे "तृतीयरत्न" हे नाटक सामाजिक आशयामुळे विशेष महत्त्वाचे मानले जाते.

**कल्पनाप्रधान नाटके**

काही नाटककारांनी कल्पनारम्य कथानकांवर आधारित नाटके लिहिली. या नाटकांमध्ये अद्भुत आणि काल्पनिक घटकांचा समावेश आढळतो.

**दलित नाटके**

२०व्या शतकात दलित साहित्य चळवळीच्या प्रभावामुळे दलित नाट्यचळवळ उदयास आली. प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, रामनाथ चव्हाण यांसारख्या नाटककारांनी दलित जीवनातील संघर्ष आणि सामाजिक अन्याय यांचे चित्रण केले.

## १९२० ते १९५० या कालखंडातील नाटके

या कालखंडात भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव नाटकांवर दिसून येतो. सामाजिक आणि राजकीय प्रश्नांवर आधारित नाटके मोठ्या प्रमाणात लिहिली गेली.

वि. दा. सावरकर, न. चिं. केळकर, वि. वा. जोशी, वि. त्रि. मोडक यांसारख्या नाटककारांनी या काळात महत्त्वपूर्ण नाटके लिहिली.

## १९५० नंतरची मराठी नाटके

१९५० नंतर मराठी रंगभूमी नव्या जोमाने विकसित झाली. आधुनिक सामाजिक प्रश्न, व्यक्तिमत्त्वाचे संघर्ष आणि मानवी नातेसंबंध यांवर आधारित नाटके लिहिली जाऊ लागली.

पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, वसंत कानेटकर, बाळ कोल्हटकर, श्री. ना. पेंडसे यांसारख्या नाटककारांनी मराठी नाट्यपरंपरेला समृद्ध केले.

विजय तेंडुलकर यांच्या "शांतता! कोर्ट चालू आहे", "सखाराम बाईंडर" यांसारख्या नाटकांनी समाजातील वास्तव उघड केले. वसंत कानेटकर यांच्या "रायगडला जेव्हा जाग येते" या ऐतिहासिक नाटकाने प्रेक्षकांमध्ये मोठी लोकप्रियता मिळवली.

## नाटकाचे कार्य

- **मनोरंजन:** नाटकाचा मूलभूत उद्देश समाजाचे मनोरंजन करणे हा आहे. विविध कथानक, संवाद आणि अभिनय यांच्या माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन होते.
- **सामाजिक प्रबोधन:** नाटक समाजातील अंधश्रद्धा, रूढी, अन्याय यांवर प्रकाश टाकून समाजप्रबोधन करते.
- **ऐतिहासिक मूल्ये:** ऐतिहासिक नाटकांमुळे इतिहासाविषयी आकर्षण निर्माण होते आणि राष्ट्रीय अभिमान जागृत होतो.
- **व्यक्तिमत्त्व विकास:** नाटक विचारशक्ती वाढवते आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देते.
- **रोजगार निर्मिती:** नाटकामुळे लेखक, कलाकार, दिग्दर्शक, संगीतकार आणि तंत्रज्ञ यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.
- **इतिहास अध्यापनात नाटकाची उपयोजिता:** इतिहास विषय शिकविताना नाटकाचा उपयोग प्रभावी शिक्षण साधन म्हणून करता येतो. विद्यार्थी स्वभावतः अनुकरणप्रिय असल्यामुळे ते ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांची भूमिका साकारताना त्या काळातील वातावरण अनुभवू शकतात.

उदाहरणार्थ, शिवाजी महाराज आणि अफजलखान भेट, दांडी यात्रा, स्वातंत्र्य चळवळ यांसारख्या घटनांचे नाट्यरूपांतर केल्यास विद्यार्थ्यांना इतिहास अधिक समजण्यास सोपा होतो.

नाटकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि सर्जनशीलता वाढते.


*ISBN-978-93-49938-45-8*

त्यामुळे इतिहास विषय अधिक रंजक आणि प्रभावी बनतो.

## निष्कर्ष

मनोरंजनाची माध्यमे समाजाच्या विकासासोबत बदलत गेली असली तरी नाटकाचे महत्त्व आजही कायम आहे. नाटक हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजप्रबोधन, सांस्कृतिक जतन आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे.

मराठी नाट्यपरंपरा समृद्ध असून तिने समाजातील अनेक प्रश्न मांडले आहेत. आजच्या डिजिटल युगातही नाटकाचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट आधुनिक तंत्रज्ञानामुळे नाट्यप्रयोग अधिक प्रभावी झाले आहेत. त्यामुळे नाटक हे मनोरंजन, शिक्षण आणि समाजपरिवर्तन यांचे प्रभावी साधन म्हणून पुढेही महत्त्वपूर्ण राहील.

## *संदर्भ*

1. कीर, धनंजय – मराठी रंगभूमीचा इतिहास, मुंबई.
2. कुलकर्णी, अ. रा. – मराठी नाटकाची वाटचाल, पुणे.
3. जोशी, रा. ग. – भारतीय नाट्यपरंपरा, पुणे.
4. भरतमुनी – नाट्यशास्त्र.
5. तेंडुलकर, विजय – मराठी नाटकांचे सामाजिक संदर्भ.
6. कानेटकर, वसंत – मराठी रंगभूमी आणि नाटक.
7. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ – भारतीय संस्कृती आणि नाट्यपरंपरा.

# सांस्कृतिक वारसा आणि मानवी हक्क

**अश्विनी नानासाहेब शिंदे**
इतिहास विभाग प्रमुख, स्व. किसनदास गुलाबचंद कटारिया महाविद्यालय, दौंड जिल्हा पुणे
Email: ashwininanashebshinde@Gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19779129
*DOI: 10.5281/zenodo.19779129*

## प्रस्तावना

सांस्कृतिक वारसा सार्वजनिक आंतरराष्ट्रीय कायद्यात समाविष्ट करण्यात आला आहे कारण त्याचे मूल्यमानवतेच्या इतिहासाचा भाग आहे; म्हणूनच केवळ राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील त्याच्या कायदेशीर संरक्षणाची आवश्यकता आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यात, विशेषतः मानवतावादी कायद्यात, 'सांस्कृतिकमालमत्ता' ही संकल्पना संरक्षणाचा स्रोत म्हणून दीर्घकाळ वापरली जात होती. सांस्कृतिक मालमत्तेची संकल्पना अशा वस्तूंना संबोधली जात असे ज्यांचे मूल्य प्रामुख्याने वस्तू म्हणून होते ज्या खरेदी आणि विक्री करता येतात. मालकी आणि मालकाचे हक्क हे मध्यवर्ती होते आणि वस्तूंवरील नियंत्रण आणि त्यांच्यावरील प्रवेशाशी थेट संबंधित होते. समुदायाच्या किंवा व्यक्तीच्या सांस्कृतिक वारशाचा भाग म्हणून या वस्तूंचे मूल्य, जरी कधीकधी उल्लेख केला जात असला तरी, या दृष्टिकोनात मध्यवर्ती नव्हते.

'सांस्कृतिक वारसा वर्तमानात महत्त्वाचा आहे, भूतकाळातील संदेश म्हणून आणि भविष्याकडे जाण्याचा मार्ग म्हणूनही. मानवी हक्कांच्या दृष्टिकोनातून पाहिले तर ते केवळ स्वतःच नाही तर त्याच्या मानवी परिमाणांच्या संदर्भातही महत्त्वाचे आहे,' असे करिमा बेनौन म्हणतात. सांस्कृतिक हक्कांच्या क्षेत्रातील संयुक्त राष्ट्रांच्या विशेष प्रतिनिधी म्हणून, त्यांनी सांस्कृतिक वारशाच्या जाणूनबुजून केलेल्या विनाशाला तातडीचे प्राधान्य म्हणून संबोधित करण्याचा निर्णय घेतला. २७ ऑक्टोबर २०१६ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेला सादर केलेला त्यांचा पहिला विषयगत अहवाल , जो त्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेला सादर करतात, तो त्या मुद्द्यावर समर्पित आहे.

## सांस्कृतिक वारशाची संकल्पना

सांस्कृतिक वारसा म्हणजे पिढ्यान् पिढ्या हस्तांतरित होणारी मूल्यव्यवस्था, परंपरा, कला, लोकजीवन आणि भौतिक-अभौतिक संपत्ती. मानवसमाजाची ओळख त्याच्या सांस्कृतिक वारशावर अवलंबून असते. भाषा, परंपरा, कला, लोकसाहित्य, वास्तू, धार्मिक स्थळे, जीवनपद्धती, उत्सव, आहारसंस्कृती इत्यादी घटक समाजाची सांस्कृतिक रचना घडवतात. दुसरीकडे, मानवी हक्क हे प्रत्येक व्यक्तीला केवळ मानव म्हणून मिळणारे मूलभूत अधिकार आहेत. सांस्कृतिक वारसा


*ISBN-978-93-49938-45-8*

जपण्याचा अधिकार हा देखील मानवी हक्कांच्या परिघात येतो. त्यामुळे सांस्कृतिक वारसा आणि मानवी हक्क यांच्यात परस्परपूरक नाते आढळते.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात सांस्कृतिक विविधतेवर एकसाचीकरणाचा दबाव वाढत आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक संस्कृती, आदिवासी परंपरा, लोककला, पारंपरिक ज्ञान यांचे संरक्षण करणे हे मानवी हक्कांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

सांस्कृतिक वारसात

- **भौतिक वारसा:** किल्ले, मंदिरे, स्मारके, वस्तुसंग्रहालये
- **अभौतिक वारसा:** लोककला, भाषा, लोकगीते, नृत्य, प्रथा, पारंपरिक ज्ञान
- **नैसर्गिक वारसा:** वनसंपदा, जैवविविधता, पवित्र स्थळे. युनेस्कोने अभौतिक सांस्कृतिक वारशाला विशेष महत्त्व दिले असून तो मानवी ओळखीचा मुख्य घटक मानला जातो. मानवी हक्क हे सर्व व्यक्तींना जन्मतः मिळणारे, सार्वत्रिक व अविचल अधिकार आहेत. सांस्कृतिक वारसा हा गतिमान परस्परसंवादाच्या जगात विकसित, निर्माण, अर्थ लावला जातो आणि पुनर्व्याख्यान केला जातो. सांस्कृतिक वारशाच्या संकल्पनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लोकांशी, समुदायांशी आणि सांस्कृतिक ओळखींशी त्याचा संबंध महत्त्वाचा आहे.

### मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीयीकरण व संयुक्त राष्ट्रे

'मानवी हक्क' या संकल्पनेचा विचार विविध देशात प्राचीन काळापासून केलेला आढळतो. तसेच या देशांनी आपल्या नागरिकांना काही हक्क दिल्याचेही आढळते. पण यामध्ये सर्व देशात, राज्यात समानता नव्हती. एखाद्या देशाने एखादा विशिष्ट हक्क 'मानवी हक्क' म्हणून दिलेला आहे व तोच हक्क दसऱ्या नव्हती. एखाद्या देशाने एखादा विशिष्ट हक्क 'मानवी हक्क' म्हणून दिलेला आहे व तोच हक्क दुसऱ्या एखाद्या देशाने नाकारलेला असेल असे चित्र होते. कारण जगातील या विविध देशांनी त्यांच्यावर ज्या परंपरांचा, विबारधारेचा प्रभाव आहे, त्यानुसार आपल्या देशासाठी, राज्यासाठी मानवी हक्कांची निश्चिती केली होती. साहजिकच त्यामुळे देशा देशातील, राज्या-राज्यातील 'मानवी हक्क' संदर्भात एकवाक्यता नव्हती.

तथापि, संपूर्ण जगच दोन जागतिक महायुद्धांच्या भयावह व गंभीर परिणामांना सामोरे गेले. मानवी हक्कांच्या उल्लंघनाने परिसिमा गाठली होती. जागतिक शांतता व सुरक्षितता तसेच व्यक्तीस्वातंत्र्य व हक्कांची जागतिक स्तरावर पुर्नस्थापना करण्याची, यामध्ये एकवाक्यता आणण्याची गरज निर्माण झाली. याच उद्देशाने १९४५ ला स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रांनी मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेला सुरवात केली व तिचा विकास केला. त्याकरिता आयोग, विधेयके, विविध संस्था स्थापन केल्या, त्या माध्यमातून मानवी हक्कांची सर्वसमावेशक यादी तयार करणे, जाहिरनामा तयार करणे, आंतरराष्ट्रीय करारनामे तयार करणे व त्यांच्या अंमलबजावणीची यंत्रणा

कार्यान्वित करणे हे कार्य मानवी हक्कांच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रांनी केले.

**सांस्कृतिक वारशाच्या रक्षकांचे संरक्षण**

सन १९४६ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी स्थापन केलेला 'मानवी हक्क आयोग' हा मानवी हक्कांच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. या आयोगाची निश्चित केलेली उद्दिष्टे व कार्ये यावरून हे अधिक स्पष्ट होईल. तथापि, या आयोगाचे मुख्यालय 'जिनिव्हा' येथे होते. एक महत्त्वाचा आणि संबंधित प्रश्न म्हणजे सांस्कृतिक वारशाच्या रक्षकांच्या संरक्षणाशी संबंधित आहे जे धोक्यात आहेत, जसे की ज्यांनी दशकांच्या युद्धात अफगाणिस्तानच्या राष्ट्रीय संग्रहालयाचे संवर्धन आणि संरक्षण केले आहे ज्यामध्ये सर्व आवश्यक साहित्य आणि तांत्रिक सहाय्य समाविष्ट आहे, आवश्यकतेनुसार त्यांना आश्रय द्यावा आणि विस्थापित झाल्यावर ते त्यांचे काम सुरु ठेवू शकतील आणि त्यांच्या देशाच्या सांस्कृतिक वारशाच्या संरक्षण आणि पुनर्बांधणीत भाग घेऊ शकतील याची खात्री करावी. सांस्कृतिक वारशाच्या संरक्षणासाठी मी पूर्णपणे लिंग-संवेदनशील दृष्टिकोनाला प्रोत्साहन देतो, ज्यामध्ये हे समाविष्ट असावे: महिला सांस्कृतिक वारसा रक्षकांच्या कार्याची ओळख पटवणे, ज्यांना लिंग भेदभावाचा सामना करावा लागू शकतो आणि महिलांना भेदभाव न करता सांस्कृतिक वारसा मिळवण्यात येणाऱ्या विशिष्ट आव्हानांचा सामना करणे आणि अगदी त्यांच्या वारशाची प्रथम ओळख पटवणे देखील सुनिश्चित करणे. सांस्कृतिक वारसा हा इतर मानवी हक्कांसाठी एक मूलभूत स्रोत आहे. सांस्कृतिक वारशाचा वापर आणि उपभोग हा आंतरराष्ट्रीय कायद्याने हमी दिलेला मानवी हक्क आहे आणि तो गांभीर्याने घेतला पाहिजे. मानवाधिकार परिषदेने 'सांस्कृतिक हक्क आणि सांस्कृतिक वारशाचे संरक्षण' यावरील त्यांच्या अलिकडच्या ठराव ३३/२० (२०१६) मध्ये भर दिल्याप्रमाणे, 'सांस्कृतिक वारशाचा नाश किंवा नुकसान सांस्कृतिक हक्कांच्या उपभोगावर हानिकारक आणि अपरिवर्तनीय परिणाम करू शकते.'

२००३ मध्ये स्वीकारलेल्या सांस्कृतिक वारशाच्या हेतुपुरस्सर विनाशाबाबतच्या युनेस्कोच्या घोषणेमध्ये, आंतरराष्ट्रीय समुदाय कोणत्याही स्वरूपात सांस्कृतिक वारशाच्या हेतुपुरस्सर विनाशाविरुद्ध लढण्याची आपली वचनबद्धता पुन्हा व्यक्त करतो जेणेकरून तो पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवता येईल. 'हेतुपुरस्सर विनाश' म्हणजे 'संपूर्ण किंवा अंशतः सांस्कृतिक वारसा नष्ट करण्याचा हेतू असलेली कृती, ज्यामुळे त्याच्या अखंडतेशी तडजोड केली जाते, अशा प्रकारे जी आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करते किंवा मानवतेच्या तत्त्वांना आणि सार्वजनिक विवेकाला निर्देशित करणारा अन्याय्य गुन्हा आहे'.

संघर्षाच्या काळात वारसा संरक्षणाचे नियमन करणारी विशेष संरक्षण व्यवस्था अस्तित्वात असूनही, या निकषांची अंमलबजावणी करण्यासाठी बरेच काही करायचे आहे. मुख्य मानकांमध्ये युनेस्को १९५४ हेग कन्व्हेन्शन आणि त्यासंबंधीचे प्रोटोकॉल समाविष्ट आहेत. हेग कन्व्हेन्शननुसार, राज्यांनी


ISBN-978-93-49938-45-8

सांस्कृतिक मालमत्तेचा आदर करावा आणि तिच्याविरुद्ध निर्देशित केलेल्या कोणत्याही शत्रुत्वाच्या कृतीपासून किंवा तिच्या वापरापासून दूर राहावे ज्यामुळे अशा कृत्यांचा सामना करावा लागू शकतो, केवळ अत्यावश्यक लष्करी गरजेच्या अधीन राहून (कलम

## युनेस्को सांस्कृतिक वारसा साधने आणि मानवी हक्क

युनेस्को सांस्कृतिक वारशाच्या संरक्षणाच्या क्षेत्रात त्याच्या कार्यासाठी प्रसिद्ध आहे. त्याच्या स्थापनेपासून या संस्थेने सांस्कृतिक वारशाच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन दिले आहे, मुख्यतः राज्यांनी सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करावे या कल्पनेतून, कारण त्याचे महत्त्व मानवतेसाठी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याचे साधन म्हणून आहे, ज्यामुळे परस्पर समजूतदारपणा वाढतो आणि आंतरराष्ट्रीय संघर्षांना प्रतिबंधित करतो. युनेस्को वारसा साधनांमध्ये, सांस्कृतिक ओळख निर्माण आणि अभिव्यक्तीसाठी आणि सांस्कृतिक वारसा आणि सांस्कृतिक विविधता यांच्यातील दुव्यासाठी सांस्कृतिक वारशाचे महत्त्व वाढत्या प्रमाणात दिले जाते. दुसऱ्या शब्दांत, मोठ्या प्रमाणात जनतेसाठी सांस्कृतिक वारशाचे रक्षण करण्यापासून ते संबंधित समुदायांच्या आणि त्यांच्यासाठी सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करण्याकडे एक बदल झाला आहे. त्यानुसार, मानवी हक्क दृष्टिकोनाचे घटक, मानवी प्रतिष्ठेचे मूल्य आणि सहभाग, योगदान आणि प्रवेशाची तत्त्वे यांचा समावेश आहे. अधिवेशनांमध्ये व्यक्ती आणि/किंवा समुदायांना सांस्कृतिक वारशाच्या मूलभूत अधिकारांसाठी प्रदान करणारा उभ्या स्वरूप नाही. या आंतरराज्यीय लक्ष या अधिवेशनांच्या देखरेख प्रणालीमध्ये देखील प्रतिबिंबित होते,

## सांस्कृतिक वारसा अधिवेशने

युनेस्कोच्या सदस्य राष्ट्रांनी तीन सांस्कृतिक वारसा अधिवेशने स्वीकारली आहेत: जागतिक सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाच्या संरक्षणाशी संबंधित अधिवेशन (१९७२); पाण्याखालील सांस्कृतिक वारशाच्या संरक्षणावरील अधिवेशन (२००१); आणि अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या संरक्षणावरील अधिवेशन (२००३). हे अधिवेशने सांस्कृतिक वारशाच्या विविध श्रेणींच्या व्याख्या प्रदान करतात आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सांस्कृतिक वारशाचे रक्षण करण्यासाठी आहेत. व्यापक राज्य समर्थन, विशेषतः भौतिक आणि भौतिक वारशाचे मूल्य समजण्यासाठी ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भात ठेवणे आवश्यक आहे. सांस्कृतिक वारशाच्या संकल्पनेच्या व्याख्येत अमूर्त घटकांचा समावेश केल्याने सांस्कृतिक वारशाचा मानवी आयाम वाढला आहे आणि त्यामुळे सांस्कृतिक वारशाकडे मानवी हक्कांचा दृष्टिकोन बळकट झाला आहे. सांस्कृतिक वारशाच्या अमूर्त घटकांचा समुदायाच्या किंवा राष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीच्या बांधकामाशी थेट संबंध असतो. सांस्कृतिक वारशाच्या भौतिक किंवा भौतिक पैलूंकडे पाहण्याचा मूळ दृष्टिकोन प्रामुख्याने वस्तूंचे

संरक्षण आणि राज्यांच्या सार्वभौमत्वाशी संबंधित होता, तर अमूर्त घटकांनी सांस्कृतिक समुदायांशी असलेल्या संबंधाचा दृष्टिकोन अधिक बळकट केला, ज्यामध्ये त्यांच्या सांस्कृतिक ओळखीचा भाग म्हणून सांस्कृतिक वारशाशी असलेले त्यांचे नाते समाविष्ट आहे. सांस्कृतिक ओळख मानवी प्रतिष्ठेचा भाग मानली जात असल्याने, मानवी हक्कांशी, विशेषतः सांस्कृतिक हक्कांशी, त्याचा संबंध अधिक दृढपणे स्थापित झाला आहे. सांस्कृतिक वारसा आता केवळ मानवतेसाठी उत्कृष्ट मूल्य मानला जात नाही तर व्यक्ती आणि समुदायांसाठी त्यांच्या ओळखीचा भाग म्हणून महत्त्वपूर्ण महत्त्वाचा मानला जातो.

## निष्कर्ष

जागतिक सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा अधिवेशनाच्या कलम २७ मध्ये, की राज्य पक्षांनी लोकांमध्ये सांस्कृतिक वारशाची प्रशंसा आणि आदर वाढविण्यासाठी शैक्षणिक कार्यक्रम विकसित करावेत आणि त्यांनी सांस्कृतिक वारशाला धोका निर्माण करणाऱ्या धोक्यांबद्दल जनतेला माहिती द्यावी. अमूर्त सांस्कृतिक वारसा अधिवेशनहा नियम अधिक विशिष्ट आहे आणि त्यात सांस्कृतिक समुदायांच्या संबंधात घ्यावयाच्या विशेष उपायांचा देखील समावेश आहे. कलम १४ मध्ये असे म्हटले आहे की राज्यांनी समाजात अमूर्त सांस्कृतिक वारशाची ओळख, आदर आणि वाढ सुनिश्चित करण्यासाठी समुदायांसह शैक्षणिक, प्रशिक्षण, जागरूकता वाढवणे आणि माहिती कार्यक्रम अंमलात आणावेत.

## *संदर्भ*


1. लोटे रा. ज. २००८, भारतातील स्थानीक स्वराज्य संस्था, पिंपळापूरे ॲड. कं. पब्लीशर्स नागपुर.
2. सौ. क्षीरसागर शोभादेवी द्वारा प्रकाशीत, २०१३ समग्र मानवी हक्क, के सागर पब्लीकेशन्स पुणे.
3. प्रा. बोरजेस जॉन्सन, २०११, (संपादक) संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना, डायमंड पब्लीकेशन्स पुणे.
4. डॉ. साबळे, २००४, भारतीय शासन आणि राजकारण, हिमालया पब्लिशिंग हाऊस.
5. डॉ. वी. एन. सिंह, २००७. भारतीय सामाजिक अधिनियम एवं समाज कल्याण ज्ञानोदय प्रकाशन, कानपूर राष्ट्रीय मानवाधिकार नई दशाएँ, भारत सरकार.
6. डॉ. पी.व्ही. भुताळे, डॉ. पी.के. एकबेकर, १९९३, भारतीय प्रशासनाची रुपरेपा,मानवाधिकार संरक्षण अधिनियम.
7. मा.कृष्णा भोगे (माजी आयुक्त) यांचा वर्तमानपत्रातील लेख योजना एप्रिल २०११
8. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग (प्रक्रिया) निनियम १९९४.



*ISBN-978-93-49938-45-8*

# राजर्षी शाहू महाराज कार्य व योगदान

**प्रा. डॉ. सोनवणे सुजाता रामदास**
कला व विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ब्रुहाणनगर.
Email: sonawanesujata391@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19779210
*DOI: 10.5281/zenodo.19779210*

## प्रास्ताविक

राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूरचे लोक कल्याणकारी राजा आणि थोर समाज सुधारक होते ज्यांनी जातीभेद निर्मूलन अस्पृश्यता निवारण शिक्षण प्रसार आणि स्त्रियांच्या हक्कासाठी महत्वकार्य केले त्यांनी बहुजन समाजाच्या उधारासाठी राज सत्तेचा वापर केला आणि प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले विधवा पुनर्विवाहाचा कायदा आणला ज्यामुळे ते त्यांना लोकमान्य म्हणून ओळखले जाते आणि त्यांचा जन्मदिन सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो

बीज शब्द  नाव छत्रपती राजर्षी शाहू महाराज आबासाहेब महाराज जन्म 26 जून 1874 कागलच्या घाटगे घराण्यात मूळ नाव यशवंतराव  राज्य कारभार 1874 ते 1922 कोल्हापूर संस्थानाचे राजे 1920 मध्ये कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय सभेने राजर्षी ही पदवी प्रदान केली कार्यक्षेत्र सामाजिक शैक्षणिक कृषी आणि धार्मिक सुधारणा

प्रस्तावना  ब्रिटिश राज सत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी या काळात शाहू महाराजांनी प्रयत्न केले. सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करुन दिली तसेच समाजातील उच्च वर्गाच्या विरोधाला जो मानतात दलित व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली महाराजांना राजर्षी ही पदवी त्यांच्या राज्याभिषेकाच्या वेळी त्यांच्या शास्त्रज्ञ शास्त्र गुरुने दिली महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वारसा लाभल्यामुळे अन वारसा लाभला असल्याने या राज्यात फुले शाहू आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतातख्य

## उद्दिष्टे

- शिक्षण प्रसार शिक्षण हे समाजाच्या उन्नतीचे साधन आहे हे ओळखून प्रत्येकासाठी शिक्षणाची सोय केली
- शेतकरी स्वावलंबन कृषी विकासासाठी राधानगरी धरण 1909 आणि सहकार चळवळ रुजविणे
- स्त्री सक्षमीकरण विधवा पुनर्विवाह ला कायदेशीर मान्यता आणि स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देणे

- सामाजिक समता अस्पृश्यता नष्ट करणे आव दलितांना व बहुजनांना मानवी हक्क मिळवून देणे

## मूलभूत गृहीतके

- समतावादी समाज विषमतेवर आधारित समाज व्यवस्था मोडून समतेवर आधारित नवीन समाज घडविणे
- स्वावलंबी बहुजन मागासलेल्या समाजाला स्वावलंबी बनविण्यासाठी वस्तीगृह आणि शैक्षणिक सुविधा पुरविणे
- शिक्षण हेच खरे सामर्थ्य सक्तीचे आणि मोफत प्राथमिक शिक्षण हे सुजाण नागरिकांसाठी आवश्यक आहे राज्य हे जनतेसाठी
- राजर्षी शाहू महाराजांनी 1909 मध्ये दिलेल्या आरक्षणामुळे महाराष्ट्रातील मागासवर्गीय समाजाच्या सामाजिक दर्जात लक्षणीय सुधारणा झाली आहे
- डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पुढील चळवळीच्या पाया ठरले
- महाराजांनी सुरु केलेल्या आंतरजातीय विवाह कायद्यामुळे समाजातील जातीय उतरण कमी होण्यास मदत झाली
- शाहू महाराजांनी सुरु केलेल्या सक्तीच्या आणि मोफत प्रार्थमिक शिक्षणामुळे बहुजन समाजातील साक्षरतेचे प्रमाण वाढण्यास मदत झाली कोल्हापूरच्या संस्थानातील विविध जातीच्या वस्तीगृहामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची द्वारे खुली झाली
- राधानगरी धरणाच्या निर्मितीमुळे कोल्हापुर परिसरातील शेतीचे स्वरुप कोरडवाहू कडून बागायती कडे वळले ज्यामुळे शेतक्र्यांचे उत्पन्न वाढले
- महाराजांनी केलेल्या विधवा विवाह आणि घटस्फोटेच्या कायद्यामुळे स्त्रियांना समाजात कायदेशीर संरक्षण आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली तसेच श्री शिक्षण चळवळीला गती मिळाली

## संशोधन प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे

सामाजिक समतेच्या कार्याचा अभ्यास करणे आरक्षणाचे जनक म्हणून त्यांच्या 1902 च्या ऐतिहासिक निर्णया ची महत्त्व स्पष्ट करणे राजश्री शाहू महाराजांनी जातीभेद निर्मूलनासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे

आर्थिक आणि कृषी विकासाचे मूल्यमापन करणे राधानगरी धरणाची निर्मिती आणि त्यामुळे कोल्हापूरच्या शेतीमध्ये झालेला बदल अभ्यासणे सहकारी संस्था आणि बाजारपेठेच्या माध्यमातून शेतक्र्यांना आर्थिक स्थैर्य कशी मिळाली याची विश्लेषण करणे

शैक्षणिक क्रांतीचे विश्लेषण करणे शिक्षणाद्वारे सामाजिक परिवर्तन कसे घडले हे शोधणे सतीश आणि मोठे मोफत प्राथमिक शिक्षण सुरु करण्यामागील महाराजांची भूमिका तपासणी स्त्री


ISBN-978-93-49938-45-8

सक्षमीकरणाच्या धोरणाचा शोध घेणे स्त्री शिक्षणासाठी त्यांनी दिलेल्या प्रोत्साहणाचे मूल्यमापन करणे शाहू महाराजांनी केलेला विधवा विवाह कायदा 1917 आणि घटस्फोटाच्या कायद्याचे कायद्याचा स्त्रियांच्या स्थितीवर झालेला परिणाम अभ्यासणे.

### संशोधन पद्धती

- वर्णनात्मक वर्णनात्मक संशोधन पद्धती
- विश्लेषणात्मक संशोधन पद्धती
- ऐतिहासिक संशोधन पद्धती

राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानांचे प्रजाहितदक्ष पुरोगामी आणि समाज सुधारक राजे होते त्यांनी समाजातील अस्पृश्यता जातीभेद आणि अन्याय दूर करण्यासाठी मोठे कार्य केले ते शिक्षण सामाजिक समता आणि आरक्षण धोरणाची पुरस्कर्ते होते समाजसुधारक म्हणून राजश्री शाहू महाराज यांचे कार्य व योगदान जातीभेद निर्मूलन व अस्पृश्यता निवारण आपल्या राज्यात जातीभेद्वास पुरुषीतविरुद्ध कायदे केले आणि समाजातील वंचित घटना न्याय मिळवून आरक्षण व सामाजिक समता 1902 सरकारी नोकऱ्यांमध्ये बहुजन दलित आणि मागासवर्गीय समाजाला 50 टक्के आरक्षण देऊन प्रशासनातील एकाधिकारशाही नष्ट केली

### शैक्षणिक सुधारणा

प्राथमिक शिक्षण सक्तीचे आव मोफत केले कोल्हापुरात सर्व जाती धर्माच्या मुलांसाठी वस्तीगृह स्थापन केली 1917 मध्ये प्राथमिक शिक्षण मोफत करण्याचा निर्णय घेतला

### अस्पृश्यता निवारण

दलितांना स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांना स्वतंत्र व्यवसाय दुकाने आणि हॉटेल सुरु करण्यासाठी प्रोत्साहन व आर्थिक मदत केली

### महिला सक्षमीकरण

कोल्हापूर राज्यात विधवा पुनर्विवाहाला कायदेशीर मान्यता 1917 मध्ये दिली देवदासी प्रथा बंद केली व स्त्री शिक्षणाला चालना दिली

### कृषी व आर्थिक सुधारणा

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी पतपेढीया बँका आणि बाजारपेठा उदाहरणार्थ राजपुरी स्थापन केल्या तसेच बोलवितात बंद करून कामगारांना न्याय दिला

आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला व त्या संबंधी कायदा आणला आपल्या कृतीतून संदेश

जावा म्हणून आपले चुलत बहिणीचा विवाह त्यांनी आंतरजातीय केला

### राजश्री शाहू महाराजांनी सुरू केलेल्या शाळा

प्राथमिक शाळा माध्यमिक शाळा पुरोहित शाळा बालवीर शाळा युवराज व सरदारांच्या शाळा उद्योग शाळा डोंबारी मुलांच्या शाळा संस्कृत शाळा शोधक शाळा सैनिक शाळा कला शाळा

सर्वांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण सुरु केली मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले वस्तीगृह व शिष्यवृत्ती योजना सुरु केल्या 1917 मध्ये प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले इतर योगदान शेतकऱ्यांच्या हितासाठी कर्जमाफी व आर्थिक सुधारणा केल्या कला व क्रीडा व उद्योगांना प्रोत्साहन दिले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणाला मदत केली

शाहू महाराजांनी सुमारे 28 वर्ष राज्य कारभार केला शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी तळमळ होती म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला तसेच 5000 ते 1000 लोक वस्तीच्या गावामध्ये शाळा काढल्या जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रति महिना एक रुपया दंड आकारण्याची कायदेशीर तरतूद केली त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले अस्पृश्यांच्या आर्थिक स्थिती सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी म्हणायचे ठरविले त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले दुकान हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले तसेच आर्थिक मदत देखील देऊ केली अस्पृश्यांना शिवण यंत्र देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली. गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्यवस्तीत चहाचे दुकान काढून दिले अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्ती व्हावी म्हणून त्यांनी महार पहिलवानाला पहिलवान चांभार यांना सर दार अभंग यांना पंडित अशा पदव्या दिल्या अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली त्याकाळच्या धर्माच्या नावाखाली देवांना मुले मुली वाहण्याची विचित्र पद्धत भारतात चालू होती परंतु राजाने आपले संस्थानात जोगत्या मुरळी प्रतिबंधक कायदा करून ही पद्धत बंद पडली जातीभेताची प्रस्ताव नष्ट व्हावी म्हणून आपले संस्थानात आंतरजाती व आंतरधर्मीय विवाह कायदेशीर मान्यता दिली तसा कायदा प्रारित केला आणि याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना आपले सुनील बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले एवढेच नव्हे तर संस्थानात जवळजवळ शंभर मराठा धनगर विवाह घडून आणले अशा अनेक कार्याच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांना सन्मानाची वागणूक व दर्जा मिळवून दिला.

### निष्कर्ष

राजर्षी शाहू महाराज यांनी केवळ विचार मांडले नाहीत तर ते प्रत्यक्ष कृतीत उतरवले त्यामुळेच त्यांना


*ISBN-978-93-49938-45-8*

सामाजिक न्यायाचे शिल्पकार हा मानाचा किताब मिळाला तसेच जातीभेद विरुद्ध लढा देऊन समाजात समानतेची बीजेपी रली 1996 च्या दुष्काळ व नंतर आलेली प्लेगची साथ या काळात त्यांच्या कार्याची कसोटी लागली त्याला ती पूर्णपणे उतरली दुष्काळी कामे इतर काही वाटप स्वस्त धान्य दुकाने निराधार आश्रमाची त्यांनी स्थापना केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठी सहकार्य केले त्यांनी चित्रकार आबालाल रहिमान यासारख्या कलावंतांना राजेश्री देऊन प्रोत्साहन दिले शाहू महाराजांना राजश्री ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली.

## *संदर्भ*

1. भगत रा.तु., २०१६, राजर्षी शाहू महाराज,जीवन व शिक्षण कार्य, कोल्हापूर रिया पब्लिकेशन.
2. भगत प्राचार्य भगत रा.तु., २०१६, राजर्षी शाहू महाराज,जीवन व कार्य, कोल्हापूर रिया पब्लिकेशन.

# शिक्षण, ज्ञान आणि मानवी विकास

**डॉ. जाधव मनीषा विजय**

संत दासगणू कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, अकोळनेर, अहिल्यानगर

Email: jadhavmv1981@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19779286

*DOI: 10.5281/zenodo.19779286*

**सारांश**

मानवी विकास हा कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा महत्त्वाचा निर्देशक मानला जातो. शिक्षण आणि ज्ञान हे मानवी विकासाचे मूलभूत आधारस्तंभ आहेत. शिक्षणामुळे व्यक्तीच्या बौद्धिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षमतांचा विकास होतो. ज्ञानामुळे व्यक्तीमध्ये विचारशक्ती, नवकल्पना आणि समस्या सोडविण्याची क्षमता वाढते. आधुनिक जागतिकीकरणाच्या युगात शिक्षण आणि ज्ञान हे केवळ वैयक्तिक प्रगतीचे साधन नसून सामाजिक आणि राष्ट्रीय विकासाचे मुख्य साधन बनले आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये शिक्षण, ज्ञान आणि मानवी विकास यांच्यातील परस्परसंबंध सविस्तरपणे स्पष्ट करण्यात आले आहेत.

## प्रस्तावना

शिक्षण ही समाजाच्या प्रगतीची किल्ली मानली जाते. प्राचीन काळापासून मानवाच्या बौद्धिक आणि नैतिक विकासासाठी शिक्षणाला अत्यंत महत्त्व दिले गेले आहे. शिक्षणामुळे व्यक्तीच्या जीवनमानात सुधारणा होते तसेच समाजामध्ये सामाजिक समता आणि प्रगती साध्य होते.

आजच्या ज्ञानाधारित समाजात शिक्षण हे केवळ माहिती मिळविण्याचे साधन नसून विचारशक्ती विकसित करणारी प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला समाजातील समस्या समजून घेता येतात आणि त्यावर उपाय शोधण्याची क्षमता विकसित होते.

मानवी विकास ही संकल्पना आर्थिक विकासाच्या पलीकडे जाऊन व्यक्तीच्या जीवनातील विविध घटकांचा विचार करते. यात शिक्षण, आरोग्य, सामाजिक समानता, आर्थिक संधी आणि जीवनमान यांचा समावेश होतो.

## संशोधनाची उद्दिष्टे

- शिक्षणाचे मानवी विकासातील महत्त्व स्पष्ट करणे.
- ज्ञान आणि शिक्षण यांचा परस्परसंबंध अभ्यासणे.



*ISBN-978-93-49938-45-8*

- शिक्षणामुळे समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासावर होणारा परिणाम समजून घेणे
- ज्ञानाधारित समाजाच्या निर्मितीत शिक्षणाची भूमिका स्पष्ट करणे.
- मानवी विकासामध्ये शिक्षणाचे योगदान विश्लेषित करणे.
- शिक्षणाचे मानवी विकासातील महत्त्व स्पष्ट करणे.
- ज्ञान आणि शिक्षण यांचा परस्परसंबंध अभ्यासणे.
- शिक्षणामुळे समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासावर होणारा परिणाम समजून घेणे.
- ज्ञानाधारित समाजाच्या निर्मितीत शिक्षणाची भूमिका स्पष्ट करणे.
- मानवी विकासामध्ये शिक्षणाचे योगदान विश्लेषित करणे.

## शिक्षणाची संकल्पना

शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या ज्ञान, कौशल्य, मूल्ये आणि वृत्ती यांचा विकास करण्याची प्रक्रिया होय. शिक्षणामुळे व्यक्तीला योग्य-अयोग्य याची जाणीव होते आणि समाजात जबाबदार नागरिक म्हणून वागण्याची क्षमता निर्माण होते.

शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीमध्ये आत्मविश्वास वाढतो, नेतृत्वगुण विकसित होतात आणि समाजासाठी सकारात्मक योगदान देण्याची प्रेरणा मिळते.

शिक्षणाचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत:

- औपचारिक शिक्षण – शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठांमध्ये दिले जाणारे शिक्षण.
- अनौपचारिक शिक्षण – कुटुंब, समाज आणि अनुभवातून मिळणारे शिक्षण.
- गैरऔपचारिक शिक्षण – प्रौढ शिक्षण, प्रशिक्षण कार्यक्रम आणि कौशल्य विकास कार्यक्रम.

शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या ज्ञान, कौशल्य, मूल्ये आणि वृत्ती यांचा विकास करण्याची प्रक्रिया होय. शिक्षणामुळे व्यक्तीला योग्य-अयोग्य याची जाणीव होते आणि समाजात जबाबदार नागरिक म्हणून वागण्याची क्षमता निर्माण होते.

## ज्ञानाचे काही प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत

- **सैद्धांतिक ज्ञान:** पुस्तकांमधून आणि अभ्यासातून मिळणारे ज्ञान.
- **व्यावहारिक ज्ञान:** अनुभवातून मिळणारे ज्ञान.
- **वैज्ञानिक ज्ञान:** संशोधन आणि प्रयोगांवर आधारित ज्ञान.
- **तांत्रिक ज्ञान:** तंत्रज्ञानाशी संबंधित कौशल्ये आणि माहिती.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञान हे आर्थिक आणि सामाजिक विकासाचे प्रमुख साधन बनले आहे.

ज्ञान म्हणजे माहिती, अनुभव आणि समज यांचा एकत्रित परिणाम होय. ज्ञानामुळे व्यक्तीला नवीन

कल्पना सुचतात आणि समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता वाढते.

### मानवी विकासाची संकल्पना

मानवी विकास म्हणजे व्यक्तीच्या जीवनातील संधी वाढविणे आणि त्याच्या क्षमतांचा विकास करणे. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने (UNDP) मानवी विकासाची संकल्पना मांडली आहे.
मानवी विकासामध्ये तीन प्रमुख घटकांचा विचार केला जातो:

- शिक्षण
- आरोग्य
- आर्थिक जीवनमान

मानवी विकास निर्देशांक (HDI) च्या माध्यमातून देशाच्या विकासाचे मापन केले जाते.

### शिक्षण आणि मानवी विकास यांचा संबंध

शिक्षणामुळे व्यक्तीचे कौशल्य आणि क्षमता वाढतात. त्यामुळे व्यक्ती अधिक उत्पादक बनते आणि समाजाच्या प्रगतीत योगदान देते.
शिक्षणामुळे रोजगाराच्या संधी वाढतात, आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होते, सामाजिक समानता वाढते आणि लोकशाही मूल्ये मजबूत होतात.
शिक्षित समाज हा प्रगत आणि स्थिर समाज मानला जातो.

### निष्कर्ष

शिक्षण, ज्ञान आणि मानवी विकास हे एकमेकांशी घट्टपणे जोडलेले घटक आहेत. शिक्षणामुळे ज्ञानाची वाढ होते आणि ज्ञानामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो.
गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे व्यक्ती सक्षम बनते आणि समाजाच्या तसेच राष्ट्राच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देते.
म्हणूनच भविष्यातील प्रगतीसाठी सर्वांना समान आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे.

### *संदर्भ*

1. UNDP Human Development Report
2. UNESCO Education Report
3. National Education Policy 2020
4. भारतीय शिक्षण व्यवस्था – विविध शैक्षणिक संशोधन लेख


*ISBN-978-93-49938-45-8*

# भारतातील प्राचीन मंदिरांचा आर्थिक इतिहास

**डॉ. विकास भानुदास टकले**
इतिहास विभाग प्रमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय, राहू
Email:
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19779353
*DOI: 10.5281/zenodo.19779353*

## प्रस्तावना

हिंदू मंदिरे नेहमीच समाज आणि भारतीय संस्कृतीचे केंद्रबिंदू राहिली आहेत. मंदिरे ही आध्यात्मिक आणि इतर धार्मिक कामकाजांसाठी तसेच विविध सामाजिकदृष्ट्या फायदेशीर कामकाजांसाठी एक प्रमुख केंद्र राहिली आहेत. इतिहासावरून असे दिसून येते की प्राचीन काळापासून अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकापर्यंत, ही मंदिरे ज्ञान, विज्ञान, कला आणि इतर महत्त्वाच्या आर्थिक घडामोडींचे आश्रयदाता आणि नियामक म्हणून काम करत होती. भारताच्या आर्थिक इतिहासात मंदिरांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आजही, आपण पाहू शकतो की आपली मंदिरे अफाट संपत्तीचे भांडार आहेत. तिरुपती मंदिराचे वार्षिक उत्पन्न असो किंवा प्राचीन पनाभ मंदिरात सापडलेले खजिना असो, मंदिरांमध्ये संपत्तीचा प्रवाह अखंडपणे सुरु आहे.

## भारतातील प्राचीन मंदिरांचा आर्थिक इतिहास

भारतीय इतिहासाच्या सुरुवातीच्या मध्ययुगीन काळात, मंदिरांनी तीर्थक्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावली. मंदिरे ही संपत्तीचे भांडार होती. त्यांच्याकडे नाणी, दागिने, मौल्यवान दगड आणि सोन्याच्या बारांच्या स्वरुपात प्रचंड संपत्ती होती. मंदिरांची मालकी दुकाने होती आणि त्यांना विविध स्त्रोतांकडून देणग्या मिळत होत्या. देणग्यांमध्ये व्यापारावरील कर आकारण्याचा अधिकार देखील समाविष्ट होता. मंदिरांमध्ये केलेल्या ठेवी त्यांच्या पावित्र्यामुळे सुरक्षित मानल्या जात होत्या. लोक परस्पर मान्य केलेल्या अटींवर त्यांचे निधी जमा करत होते. कौटिल्याने उल्लेखित केलेला 'देवताध्यक्ष' राज्यातील सर्व मंदिरांमधून महसूल गोळा करत असे, संकटाच्या वेळी राजे देखील मंदिराच्या मालमत्तेतून कर्ज घेत असत. मंदिर व्यवस्थापन समितीला 'गोष्ठी' असे म्हटले जात असे. त्याचे अस्तित्व दुसऱ्या शतकापासून आहे. 'गोष्ठी' हे परिसरातील सर्वात प्रतिष्ठित व्यक्तींमधून निवडले जात होते. धार्मिक संस्थांच्या देखभालीसाठी राज्य सीमाशुल्क कार्यालयामधून काही देणग्या देखील गोळा केल्या जात होत्या. मोठ्या मंदिरांमध्ये मोठ मोठ्या जमिनी आणि प्रचंड मालमत्ता होत्या. राष्ट्रीय संपत्तीचा एक महत्त्वपूर्ण भाग या संस्थांमध्ये जमा होत असे.

मंदिराच्या मालमत्तेचे व्यवस्थापन प्रामुख्याने ब्राह्मण आणि इतर शेतकरी, व्यापारी आणि कारागीर जातींमधील प्रमुख व्यक्ती करत असत. वेंकटेश्वर मंदिरातील शिलालेखांचा अभ्यास केल्यावर असे दिसून येते की मंदिराची जमीन शेतक्यांना देण्यात आली होती, जे भागधारक असल्याचे दिसून येते, मंदिराचा वाटा ५१% ते ७१% पर्यंत होता. मंदिरातील सेवक आणि पुजाऱ्यांना पगार देण्याच्या सूचना आहेत. जैन मंदिरांमध्येही हीच पद्धत होती. स्थानिक रहिवाशांकडून कर वसूल केले जात होते. अनेक शिलालेखांमध्ये मंदिरांना जमीन देणगी दिल्याचा उल्लेख आहे. मंदिरांमध्ये मोठ्या प्रमाणात जमीन होती. तिमाना (देणगी) शिलालेखात उदरनिर्वाहासाठी मंदिराला जमीन दान केल्याचा उल्लेख आहे. त्यात जमिनीसोबत हस्तांतरित केलेल्या किंवा ती लागवड करण्यासाठी नियुक्त केलेल्या शेतक्यांची नावे देखील नमूद आहेत. या शिलालेखात वार्षिक रोख देणग्या नोंदवल्या आहेत. तिमाना शिलालेखात असेही म्हटले आहे की गोष्टी च्या महसूलाचे व्यवस्थापन करण्यासाठी गोष्टीकाची नियुक्त केली गेली होती.

मंदिराच्या कामांवर राजाचे नियंत्रण दर्शवते आणि मंदिरातील अधिकाऱ्यांपैकी एक "श्रीकार्य" होता हे उघड करते. कर्नाटकात, मठ आणि मंदिरे वाढत्या उदार देणग्यांमुळे श्रीमंत होत गेली. जमीनदार म्हणून मंदिरांची भूमिका, त्यांची अफाट संपत्ती आणि भौतिक शक्ती, उत्तर आणि दक्षिण भारतातील असंख्य शिलालेखांमध्ये दस्तऐवजीकरण केलेली आहे. कर्नाटकात, भातशेतीतून मिळणारे अतिरिक्त उत्पादन अतिरिक्त मंदिरे बांधण्यासाठी वापरले जात असे. राजस्थानमधील ताम्रपट आणि चालुक्य शिलालेख मध्ये शेतक्यांनी मंदिरांना दिलेल्या देणग्यांची नोंद आहे. शेतकरी-सरंजामी संबंध प्रस्थापित करण्यासाठी गणित आणि मंदिरे अनुकूल परिस्थिती निर्माण करतात. मिळालेल्या देणग्यांद्वारे, गणित आणि मंदिरे जणू काही सामंत बनले.

प्रतिहारांच्या काळात, राजस्थानच्या मंदिरांनी त्यांच्या जमिनी एकत्रित केल्या आणि स्वयंपूर्णता प्राप्त केली. गावातील रहिवाशांनी सर्व प्रकारच्या सेवा देऊन मोठ्या मठांची स्वयंपूर्णता राखण्यास मदत केली. प्रतिहारांच्या काळात धार्मिक देणग्या मोठ्या प्रमाणात होत्या. आणि गुजरात व राजस्थानच्या अनेक भागांमध्ये, देणगीदार जमीनदार म्हणून उदयास आले, जे पोलिस आणि आर्थिक प्रशासनाचे प्रभारी देखील होते. पुरोहितांना दिलेल्या या देणग्यांची तुलना मध्ययुगीन युरोपमधील चर्चना दिलेल्या फायद्यांशी करता येते. ओरिसामध्ये, ब्राह्मणांना देण्यात येणाऱ्या जमीन अनुदानाचा परिणाम आदिवासी लोकांना प्रबुद्ध करण्याचा आणि राजाप्रती त्यांची निष्ठा जागृत करण्याचा होता. या ब्राह्मण जमीनदारांना सर्व आर्थिक अधिकार देण्यात आले. त्यांनी स्वावलंबी अर्थव्यवस्था राखली. राष्ट्रकुटांच्या राजवटीत ब्राह्मणांना व मंदिरांना देणग्याही दिल्या जात होत्या. त्यांना आणखी मोठी धर्मादाय आणि प्रशासकीय शक्ती मिळाली.

राष्ट्रकुटांच्या काळात धार्मिक जमीनदारांची संख्या मोठी होती. सरंजामशाही स्थितीमुळे मंदिरांचा


ISBN-978-93-49938-45-8

विस्तार होण्यास मदत झाली आणि सरंजामशाही धार्मिक संस्थांना करमुक्त जमीनदार बनवत होत्या. जमीन अनुदान आणि गाव अनुदानाच्या परिणामी, एक सामंती संबंध प्रस्थापित झाला ज्याने शेतकऱ्यांवर अत्याचार केले. मंदिर अधिकाऱ्यांच्या अतिरेकांविरुद्ध शेतकरी आणि कर्मचारी आवाज उठवू लागले. या उदाहरणांवरून असे दिसून येते की शेतकरी आणि कर्मचारी मोठ्या कष्टात जगत होते. मंदिरांच्या नावाखाली नवीन कर आकारले जात होते. अनेकदा, अनेक कर देणग्या देखील मंदिरांना हस्तांतरित केल्या जात होत्या. राज्य अधिकाऱ्यांनी मंदिरांच्या खात्यांचे ऑडिट केले. कोकण प्रदेशातील आठव्या शतकातील एका शिलालेखातून असे दिसून येते की मंदिरांना दान केलेली गावे आणि मालमत्ता गावातील पाच किंवा दहा व्यापाऱ्यांद्वारे व्यवस्थापित केल्या जात होत्या, जे वार्षिक धार्मिक समारंभांचे निरीक्षण करत होते आणि त्यांना अन्न पुरवठा करण्यापासून आणि राज्य अधिकाऱ्यांना कर भरण्यापासून सूट देण्यात येत होती. अनेक शिलालेखांवरून असे दिसून येते की दक्षिण भारतातील ग्रामीण शेतकरी शोषणाच्या परिस्थितीच्या निषेधार्थ इतर ठिकाणी पळून जात होते.

आठव्या शतकापासून पल्लव आणि चोळांनी विविध मंदिरांना असंख्य मौल्यवान देणग्या दिल्या आणि मंदिर कर्मचाऱ्यांची संख्या वाढू लागली. चोळ प्रशासनाखाली या सार्वभौमत्व आणि शाही उदारतेमुळे मंदिरांना मुबलक शाही देणग्या मिळाल्या आणि ब्रह्मदयांची स्थापना झाली. लोकांना सार्वभौमत्व दाखवण्यात मंदिर बांधकामाने महत्त्वपूर्ण आणि शक्तिशाली भूमिका घेतली. भारतातील बौद्ध मठांनी (जसे की नाशिक, जुन्नर, कार्ले, नानाघाट इ.) प्रचंड संपत्ती जमा केली, जी त्यांनी व्यापार आणि वाणिज्य क्षेत्रात गुंतवली. त्यांच्या व्यावसायिक क्रियाकलापांमध्ये व्यापारी काफिल्यांना भांडवल आणि पैसे देणे समाविष्ट होते. व्यावसायिक संघटनांना मंदिरांकडून कडक स्पर्धेचा सामना करावा लागला असावा, कारण मंदिरातील नेत्यांना कायमस्वरूपी ठेवी व्यवस्थापित करण्यात अधिक विश्वासार्ह मानले जात असे. चौहान शिलालेखांमध्ये, आपल्याला मंदिरे ठेवी स्वीकारताना आणि व्याज देत असल्याचे आढळते. मंदिराच्या मालमत्तेवरील लोकांच्या भक्तीमुळे, मंदिरात ठेवी जमा करणे इतर संस्थांमध्ये जमा करण्यापेक्षा सुरक्षित मानले जात असे. दक्षिण भारतातील मंदिरांच्या जमिनी विशेषतः व्यापक आणि सुव्यवस्थित होत्या. मंदिराच्या मालमत्तेचे विभाजन केले जात नव्हते; त्याऐवजी, ते राजे, सामंत आणि गावकऱ्यांकडून सर्व प्रकारच्या देणग्या गोळा करून त्यांची संपत्ती वाढवण्याचा प्रयत्न करत होते.

मंदिरांना दिलेली जमीन करमुक्त होती आणि इतर विविध फायदे देत होती. जमीन महसूल देण्यापासून सूट होती. मंदिरांना अविभाजित गावांचे देणगे मिळणे ही एक सामान्य पद्धत होती, जिथे गावकरी पुजारी आणि मठाधीशांसाठी शेत म्हणून काम करायचे. मंदिरे जमीन महसूल गोळा करत असत आणि शेतकऱ्यांना धार्मिक विधींसाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य मंदिराला पुरवणे

बंधनकारक होते. दक्षिण भारतातील मंदिरे आर्थिक जीवनाचे केंद्र बनले. भव्य मंदिरे बांधण्यासाठी बचतीचा वापर केला जात असे आणि विद्वानांसाठी 'धाटिकांची' व्यवस्था केली जात असे. तंजावर मंदिर हे भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मूलभूत स्रोत असलेल्या संपत्ती आणि पशुधनाच्या हालचालीचे केंद्र बनले. मंदिराचे हिशेब शास्त्रीयदृष्ट्या राखले जात होते आणि राजर्ष किंवा लेखापरीक्षकाद्वारे ऑडिट केले जात होते. मंदिरातील अधिकाऱ्यांनी सामंती अर्थव्यवस्थेच्या विकासातही महत्त्वाची भूमिका बजावली. इसवी सन 73 मधील पुरातत्वशास्त्र पुष्टी करते की गावातील मंदिरे आणि मठांना, ज्यामध्ये रहिवाशांचा समावेश आहे, देणग्या देशभरात पसरल्या होत्या. सुरुवातीच्या मध्ययुगीन दक्षिण भारतीय मंदिरांचे सामंती स्वरुप मोठ्या प्रमाणात कायमस्वरूपी दिल्या जाणाऱ्या देणग्यांमुळे चालत असे. देणग्या म्हणून जमीन मंदिरांची होती. अशी जमीन करमुक्त होती आणि काही ठिकाणी जीवितापासूनही मुक्त होती.

जमीन नियंत्रणाच्या संघर्षात मंदिरे एक शक्ती म्हणून उदयास आली. मागील मालकांचे हक्क रद्द करण्यात आले, कारसावांना बेदखल करण्यात आले आणि मालकी मंदिरांकडे हस्तांतरित करण्यात आली आणि राजघराण्याचा अक्षय आणि कायमचा देणगी मंदिरात जमा करण्यात आला. तंजावर मंदिर देवता पंचेचाळीस गावांमधील सर्व जमिनीचा मालक बनला आणि गावातील प्रभावशाली वर्ग केवळ देवतेचे अधिकृत प्रतिनिधी मानले गेले.

## समारोप

सिंचन योजनांद्वारे शेतीयोग्य जमिनीचा विकास हा भारतीय मंदिरांच्या, विशेषतः दक्षिण भारतातील अनेक आर्थिक घडामोडींपैकी एक होता. प्रत्येक मंदिर त्याच्या प्रभावक्षेत्रात एक महत्त्वाची आर्थिक संस्था होती. मंदिरे स्थानिक उत्पादनांचे प्रमुख ग्राहक देखील होती. अनेक शिलालेखांमध्ये मंदिरे व्यक्तींना किंवा ग्रामीण समुदायांना कर्ज देत असत, उत्पन्नाच्या बदल्यात त्यांची जमीन तारण ठेवत असत आणि उत्पन्नाचा व्याज म्हणून वापर करत असत असे वर्णन केले आहे. अशाप्रकारे, आपल्याला आढळते की मंदिरांचे इतर स्थानिक संस्थांशी खोल आर्थिक संबंध होते, केवळ देणग्या प्राप्त करणारे म्हणूनच नव्हे तर जमीन मालक, मालक, ग्राहक आणि कर्ज देणारी एक मजबूत आर्थिक संस्था म्हणून देखील. मंदिरे केवळ धार्मिक केंद्रे नव्हती तर मजबूत आर्थिक केंद्रे देखील होती.

## *संदर्भ*

1. Das, S.K., Economic History of Ancient India, Calcutta-1921
2. Dutta, B.N., Studies in Indian Social Polity, Calcutta-1944
3. Gopal Krishna, P.K., Development of Economic Ideas in India, New Delhi 1959
4. Gopal, S. V., Economic Life of Northern India (AD 700. 1200) Delhi 1965


*ISBN-978-93-49938-45-8*

5. Mukherjee, R. K., Local Government in Ancient India Oxford-1920
6. History of Indian Shipping and Maritime Activities from the Earliest Times, London 1912
7. Morris and Steyn - Two Economic History of India A. B. E. Lyographic Essay (in The Journal of Economic History, 1961 XXI)

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्री शिक्षणातील योगदान

**प्रा. रमेश नरसिंग थोरात**

इतिहास विभाग प्रमुख, महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा. जि. अहिल्यानगर

Email:

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19779585

*DOI: 10.5281/zenodo.19779585*

## प्रस्तावना

भारतीय समाजात दीर्घकाळ स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जात होते. शिक्षणाचा अभाव, बालविवाह, विधवांवरील अन्याय आणि सामाजिक बंधने यामुळे स्त्रियांची प्रगती मर्यादित राहिली होती.अशा परिस्थितीत राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले,सावित्रीबाई फुले, महाराजा सयाजीराव गायकवाड दयानंद सरस्वती, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समाजसुधारकांनी स्त्रियांचे उन्नतीसाठीखूप प्रयत्न केले. त्यामध्ये सयाजीराव गायकवाड महाराज यांचे कार्य विशेष महत्त्वाचे आहे. सयाजीराव महाराज हे बडोदा संस्थांची प्रगतशील आणि दूरदर्शी राजे होते. त्यांनी समाजातील स्त्रियांना शिक्षण,समान हक्क आणि सन्मानाचे स्थान मिळावे यासाठी विविध सुधारणा केल्या. स्त्री शिक्षणाचा प्रसार, बालविवाहाला विरोध आणि स्त्रियांच्या सामाजिक उन्नतीसाठी त्यांनी अनेक योजना राबवल्या. त्यामुळे स्त्रियांच्या विकासासाठी आणि समाजातील समता निर्माण करण्यासाठी सयाजीराव महाराजांचे  विषयक विचार अत्यंत प्रगत आणि  स्त्री प्रणाली मानले जातात.

## शोधनिबंधाचा  उद्देश

- महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या जीवनकार्याचा अभ्यास करणे
- महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या स्त्री विषयक कार्याचा अभ्यास करणे.
- महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक योगदानाचा अभ्यास करणे.

## स्त्रियांना सक्तीचे मोफत शिक्षण

सयाजीराव गायकवाड महाराज  यांनी स्त्रियांना मोफत शिक्षण योजना लागू केली. जोपर्यंत शिक्षण सक्तीचे मोफत केले जात नाही.तोपर्यंत स्त्रियांचा विकास होणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते.शिक्षण व्यवस्था माहिती नसलेल्या समाजाला सक्तीचे शिक्षण देणे गरजेचे आहे. त्याशिवाय समाज जागृत होणार नाही.म्हणून महाराजा सयाजीराव  गायकवाड  यांनी आपल्या संस्थानामध्ये सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यासाठी कायद्याने मंजुरी दिली.इ.स.1892 मध्ये अमरोली  गावात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याबद्दल  कायदा लागू केला होता.त्याकरता महाराजांनी 31


*ISBN-978-93-49938-45-8*

हजार रुपयेहून अधिक मंजूर केले.नऊ गावात सुरू झालेल्या या सक्तीच्या व मोफत शिक्षणाची भरभराट इ.स. 1906 पर्यंत संपूर्ण बडोदा संस्थानात अमलात आली.

इ स. 1906 पासून आठ ते बारा वर्ष वयाच्या मुलींना सक्तीचा मोफत शिक्षण देण्याचा कायदा केला.स्त्री शिक्षण सक्तीच्या शिक्षणामध्ये मुलींचा सहभाग होता.मात्र तरीसुद्धा स्त्री शिक्षणाच्या अंमल बजावणीसाठी राज्यभर राज्यकारभार हातात घेतल्यावर सयाजीराव गायकवाड महाराजांनी 20 ऑगस्ट 1885 मध्ये स्त्री शिक्षणासाठी हुकूम काढून त्यामध्ये महाराज म्हणतात की, भावी पिढ्यांच्या सर्वतोपरी संवर्धनाची जबाबदारी स्त्रियांवरच आहे. स्त्रिया सुविधा असल्या तरच त्या उत्तम नागरिक निर्माण करू शकतील.निरक्षर निरबुद्ध शिक्षणामुळे संसार निरस होण्याचा संभव असतो.गृहिणी शिकलेल्या व  सुसंस्कृत असली तर ती पुरुषांना चांगल्या प्रकारे मदत करू शकते.पुरुषांची सहकार्य करून त्यांच्याशी असलेली सहकार्यचेनाते यथार्थ करून दाखविणे हाच विवाहाचा श्रेष्ठ हेतू मानला जातो.हे सर्वसाधारण यासाठी स्त्रियांना योग्य शिक्षण देणे हा एकमेव मार्ग आहे.या विचारांवरून समाजाच्या उद्धारासाठी किती महत्त्वाचे आहे दिसून येते आणि यासाठी सयाजीराव महाराजांनी व्हर्नाक्युलर एज्युकेशन ऍक्ट 1993 प्रमाणे स्त्री शिक्षणाच्या संदर्भात काही महत्त्वाचे कायदे करून त्या कायद्यामध्ये स्त्रियांसाठी खास शारीरिक शिक्षणाची विशेष नियुक्ती करून विद्यार्थ्यांनी कडून व्यायाम खेळ व कसरत करून घेण्यात येत होती.स्त्रियांच्या आरोग्यासाठी शिक्षणासाठी आरोग्य विषयक शिक्षण दिले जात होते.

## मुलींना व्यवसाय शिक्षण

शाळेच्या अभ्यासाव्यतिरिक्त मुलींना भरतकाम,शिवणकाम आणि विणकाम करण्याचे असे शिक्षण सुद्धा शाळेमध्ये देण्याची व्यवस्था करण्यात आली होती.सोबतच पाकशास्त्र,गरबा अशा वेगवेगळ्या विषयात मुलींना  शिक्षण दिला जात होते.हे सर्व शिक्षण मोफत आणि सक्तीचे होते.

## मुलींसाठी मिश्र शाळा

ज्या ठिकाणी मुलींसाठी  स्वतंत्र शाळा नव्हत्या.अशा ठिकाणी मुलींसाठी शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करताना मिश्र शिक्षणाच्या प्रयोगही बडोदा संस्थांमध्ये करण्यात आला आणि तो यशस्वी झाला.दहा वर्षावरील मुलींना शाळेकडे अधिक अधिक येण्यासाठी प्रलोभन म्हणून शिष्यवृत्तीची योजना ही चालू करण्यात आली होती. राज्याच्या अनेक भागात ही योजना यशस्वी ठरली.

## पडदानसीन स्त्रियांना शिक्षण

ज्या मुली व स्त्रिया सर्वसामान्य शाळांमध्ये सामाजिक व धार्मिक बंधनामुळे येऊ शकत नव्हत्या,मात्र त्यांना शिक्षणाची आवड होती.अशा पडदानशील असलेल्या स्त्रियांना ठिकठिकाणी वर्ग काढण्यात आले होते.या वर्गामध्ये वयाचे कुठले बंधन नव्हते.चाळीस वर्षांच्या वरील स्त्रियांनाही  या वर्गामध्ये

प्रवेश दिला जात होता.जीवन जगताना उपयोगी पडणारे विविध क्षेत्राशी संबंधित वेगवेगळे शिक्षण या वर्गामध्ये दिला जात होते.

## मुस्लिम  स्त्रियांसाठी शिक्षण

हिंदू प्रमाणेच मुस्लीम महिला मधेही शिक्षणाचा अभाव होता.मुस्लिम समाजातील स्त्री शिक्षणासाठी असलेली उदासीनता लक्षात घेऊन महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी मुस्लिम मुलींसाठी अनेक उर्दू शाळा काढल्या.इ.स.1892- 93 मध्ये अमरोली तालुक्यात दोन उर्दू शाळा उघडण्यात आल्या होत्या. पुढे तर ही संख्या 28 पर्यंत वाढली होती त्या शाळेतील मुलींची संख्या 2800 पर्यंत पोहोचली होती. यावरून महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी समाजातील प्रत्येक स्तरावर जाऊन शिक्षणाची गंगा सामान्य  लोकांपर्यंत पोहोचवण्याची काम केले होते.

## मागासवर्गीय मुलींसाठी निवासी शाळा

इ.स.1897 मध्ये सोनगड विभागातील मुलींसाठी निवासी शाळा सुरु करण्यात आली होती. या शाळा इयत्ता सातवी पर्यंत होती खास करून समाजातील मागासलेल्या जाती  व जमातीतील स्त्रियांच्या शिक्षणाकडे सयाजीराव महाराजांनी विशेष लक्ष दिले होते. त्यामुळेच या शाळेची निर्मिती केलेली होती निवासी शाळेमध्ये नियमित शिक्षणा व्यतिरिक्त लेस बनवण्याची प्रशिक्षण रेशमाचे उत्पादन करणे,रेशीम धागा तयार करणे  या निवासी शाळेमधून मुलींना दिल्या जात होते.निवासी शिक्षणात मुलींना अशा शिक्षणाची सुविधा देणारे बडोदा पहिले राज्य होते.त्यामुळे मुलींना अर्थाजन करणे शक्य झाले.

## आदिवासी व उपेक्षित मुलींना शिक्षण

शिक्षण ही सर्वांसाठी समान असले पाहिजे या विचारांचे सयाजीराव महाराज होते.त्यामुळे विद्या एकाच व्यक्तीला, वर्गाला किंवा समाजाला मिळून फायदा नाही ती सार्वत्रिक असली पाहिजे.या भूमिकेतून त्यांनी बडोदा संस्था आदिवासी व  उपेक्षित घटकांसाठी विद्यालय काढली होती. सामाजिक रुढी आणि परंपरेतून घडलेल्या समाज मानसिकता व या वर्गाच्या शिक्षण प्रसारणाला मोठा अडचण असल्याचे सूक्ष्म निरीक्षण महाराजांनी आपल्या भाषणातून नोंदवले होते.यासंबंधी त्यांनी आलेल्या अनुभव कथन करताना महाराज म्हणाले होते की, अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या वर्गावरील शिक्षकांचे काम करणे काही लोकांना जमत नाही अशा पुष्कळ लोक आजही आहेत.त्यामुळे मला पुरुषांच्या शाळांसाठी ख्रिश्चन व मुसलमान शिक्षकांची मदत बाहेरून मागवावी लागते. वास्तविक शिक्षणात  स्पृश्य अस्पृश्य  असण्याचे कारण नाही.तरीही हा भेदभाव होतो तो केवळ शिक्षणाच्या अभावामुळे होतो.


*ISBN-978-93-49938-45-8*

### कष्टकरी स्त्रियांना शिक्षण

कष्टकरी लोक शिक्षणासाठी उदासीन असतात.त्यामुळे अशा श्रमजीवी लोकांना शिक्षणाचे महत्त्व तसेच शिक्षणातून अर्थ प्राप्ती या गोष्टींकडे महाराजांनी विशेष लक्ष दिले. कष्टकरी,कामगार व गरीब लोक यांच्या कुटुंबातील मुले व मुली शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण उपाययोजना केल्या.महाराजांच्या मते शिक्षण हे सर्वांसाठी समान हक्काचे असावे.बडोद्याला कष्टकरी मुलांसाठी निवासी वस्तीवर काढणे सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा कायदा केल्यानंतर च्या शाळां कष्टकरी शाळांची संख्या 27 पर्यंत आणि विद्यार्थी संख्या 9269 पर्यंत वाढली होती.

### शारीरिक शिक्षणाचे महत्त्व

सयाजीराव महाराजांनी शिक्षण व्यवस्थेत बदल करताना आणि शिक्षण व्यवस्था आपल्या राज्यामध्ये लागू करताना दुसऱ्या देशात चालणाऱ्या शिक्षण पद्धतीचा सखोल अभ्यास केला होता.त्यामुळे ग्रीस,रोम या प्राचीन राष्ट्रांनी शरीर संवर्धनाकडे आणि क्रीडा प्रवृत्तीकडे विशेष लक्ष दिले होते.ऑलम्पिक खेळाची परंपरा त्या देशांनी खेळायला दिलेली प्रतिष्ठेची धोतक होते.महाराजांनी पौरात्य आणि पाश्चिमात्य जगातील खेळांच्या या महत्त्वपूर्ण भूमिकामुळे शारीरिक शिक्षणाचे महत्त्व जाणले होते.स्त्रियांबरोबर पुरुषांनाही शारीरिक शिक्षणाचे महत्त्व पटावे म्हणून त्यांना शारीरिक शिक्षणाचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली होती.

### मुलींच्या औद्योगिक शिक्षणावर भर

स्वावलंबी शिक्षणासाठी औद्योगिक शिक्षणाबाबत सयाजीराव महाराजांचे असे मत होते की, मुलींना केवळ पारंपरिक शिक्षण देऊन चालणार नाही तर त्यांना उद्योगधंद्याशी संबंधित कौशल्य शिकवली पाहिजेत. त्यामुळे ते आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनू शकतील.त्यामुळे बडोदा संस्थानात मुलींसाठी औद्योगिक शिक्षण देणाऱ्या शाळा सुरु करण्यात आल्या.या शाळांमध्ये शिवणकाम, विणकाम,हस्तकला, घरगुती उद्योग इत्यादी. विषयांचे प्रशिक्षण दिले जात होते. महाराजांनी मुलींच्या शिक्षणात व्यवहारी कौशल्यांचा समावेश केला होता.त्यामुळे शिक्षणाचा उपयोग प्रत्यक्ष जीवनात आणि रोजगारासाठी होऊ शकतो असे त्यांचा विचार होता. स्त्रियांच्या आर्थिक उन्नतीसाठी औद्योगिक शिक्षण गरजेचे असे त्यांचे मत होते. त्यामुळे स्त्रियांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होते.समाजात त्यांचा मानसन्मानही होते असे महाराजांची मत होते.

### स्त्रीयांसाठी ग्रंथालय

सयाजीराव महाराजांच्या मते शिक्षणाचा खरा विकास वाचनातून होतो.त्यामुळे मुलींमध्ये ज्ञान वाढावे आणि विचारशक्ती विकसित व्हावी यासाठी त्यांनी ग्रंथालयाची स्थापना केली. बडोदा संस्थानात मुलींच्या शाळांमध्ये आणि स्त्रियांसाठी स्वतंत्र ग्रंथालय सुरु करण्यात आली.यामुळे

स्त्रियांना सहजपणे पुस्तक उपलब्ध होऊ लागली. मोठ्या प्रमाणामध्ये ग्रंथालयाची उभारणी करण्यात आली.या ग्रंथाचा लाभ स्त्रियांना आणि मुलींना मिळू लागला. स्त्री शिक्षणासाठी चालना ग्रंथालयामुळे मुलींना विविध विषयांची पुस्तके वाचण्याची संधी मिळाली.त्यामुळे त्यांचे ज्ञान वाढले आणि समाजात स्त्रियांच्या प्रगतीस मदत झाली. बौद्धिक विकास त्यामुळे होऊ लागला. स्वतःचे मत मांडू शकतात असा महाराजांचा विश्वास होता

**मुलींसाठी उच्च शिक्षण**

सयाजीराव महाराजांनी मुलींसाठी उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली होती.त्या काळात फार कमी मुलांना संधी मिळत होती.मुलींना महाविद्यालयीन शिक्षण देऊन प्रोत्साहन दिले.मुलींना महाविद्यालय शिक्षण सहज मिळावे यासाठी त्यांनी शिष्यवृत्ती योजना सुरु केली.त्यामुळे अनेक मुलींना शिक्षण घेणे शक्य झालं. स्त्री शिक्षणामुळे समाजाची जागृती निर्माण होते आणि कुटुंबाचा विकास होता असा त्यांचा ठाम विश्वास होता. मुलांप्रमाणे मुलींनाही उच्च शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते.

**उच्च शिक्षणाची समान संधी**

बडोदा संस्थानात सयाजीराव महाराजांनी मुलींच्या उच्च शिक्षणासाठी त्यांना समान संधी उपलब्ध करून दिली.हे त्या काळातील अत्यंत प्रगत आणि क्रांतीकारक पाऊल होते. मुलांप्रमाणे मुलींनाही उच्च शिक्षणात समान संधी मिळावी असा त्यांचा आग्रह होता.त्यामुळे समाजातील स्त्रियांच्या प्रगतीला चालना मिळाली.ती केवळ महाराजांमुळे बडोदा संस्थानात उच्च शिक्षणासाठी विविध शैक्षणिक संस्था आणि प्रशिक्षण संस्था सुरु करण्यात आली.ज्यामध्ये मुलींनाही प्रवेश देण्यात आला होता.मुलींना उच्च शिक्षणात समान संधी मिळावी म्हणून त्यांनी शिष्यवृत्ती योजना सुरु केली मुलींना परदेशी शिक्षणासाठी ही त्यांनी मोठी आर्थिक मदत केली.मुलींना उच्च शिक्षण मिळावे म्हणून वसतीगृह, ग्रंथालय आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राजाने खर्च केला.

**निष्कर्ष**

सयाजीराव महाराज हे स्त्रियांच्या उन्नतीसाठी कार्य करणारे दूरदर्शी समाज सुधारक होते.त्यांनी स्त्रियांना शिक्षण स्वावलंबन आणि समाजात सन्मानाचे स्थान मिळावे यासाठी अनेक सुधारणा केल्या. मुलींसाठी शाळा,उच्च शिक्षणासाठी संधी,औद्योगिक शिक्षण,ग्रंथालय चळवळ आणि शिष्यवृत्ती यासारख्या उपक्रमामुळे स्त्री शिक्षणाला मोठे चालना मिळाली. तसेच गरीब व श्रमजीवी कुटुंबातील मुली शिक्षणापासून वंचित राहू नये. यासाठी त्यांनी आर्थिक मदत आणि मोफत शिक्षणाची व्यवस्था केली. म्हणून सयाजीराव महाराजांची स्त्री विषय कार्य भारतीय समाजातील स्त्रियांच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले. त्यांच्या प्रयत्नामुळे स्त्री शिक्षणाचा प्रसार झाला


*ISBN-978-93-49938-45-8*

आणि समाजात स्त्री पुरुष समानतेचा पाया अधिक मजबूत झाला असे म्हणता येईल.

## *संदर्भ*


1. पगार एकनाथ महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ 2018,मुंबई.
2. भांड बाबा, आधुनिक भारताचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड साकेत प्रकाशन 2019 औरंगाबाद.
3. पवार निंबाजीराव,जेव्हा गुराखी राजा होतो,सयाजी प्रकाशन महात्मा गांधी रोड 2018 नाशिक
4. गायकवाड फत्तेसिंहराव सयाजीराव ऑफ बरोडा पॉप्युलर प्रकाशन बॉम्बे.
5. नेणे दा.वी (दादुमिया) श्रीमंत सयाजीराव गायकवाड श्री गंधर्व वेद प्रकाशन पुणे.

# एकोणिसाव्या शतकातील ब्राह्मणेतर चळवळीचा इतिहास: एक चिकित्सक अभ्यास

**गायकवाड दिपक दगडू**
संशोधक, न्यु आर्ट्स,कॉमर्स& सायन्स कॉलेज, अहिल्यानगर.
Email: deepakdgaikwad83@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19779757
*DOI: 10.5281/zenodo.19779757*

## प्रस्तावना

एकोणिसावे शतक हे भारतीय समाजाच्या इतिहासात मूलगामी बदलांचे शतक मानले जाते. या काळात सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात अनेक परिवर्तनवादी चळवळी उदयास येवून उभ्या राहिल्या. विशेष करून महाराष्ट्रात ब्राह्मणेत्तर चळवळ ही सामाजिक न्याय, समता व स्वाभिमानाच्या मूल्यांवर उभी असलेली एक प्रभावी चळवळ म्हणून अस्तित्वात आली. या चळवळीने पारंपरिक ब्राह्मणप्रधान सामाजिक व्यवस्थेतील असमानता, अस्पृश्यता तथा शिक्षणातील विषमता यांना आव्हान दिले.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी या चळवळीचे वैचारिक नेतृत्व करताना शूद्र-अतिशूद्रांच्या हक्कांसाठी आवाज उठविला. त्यांनी "शिक्षण हेच खरे मुक्तीचे साधन मानले शिक्षणाशिवाय समाजाचा उद्धार अशक्य आहे."[१] या विचारातून त्यांनी समाजातील खालच्या स्तरातील दुर्लक्षित व वंचित लोकांना शिक्षणाच्या माध्यमातून सशक्त करण्याचा प्रयत्न केला. शिवाय सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत ब्राह्मणेत्तर चळवळीला व्यापक सामाजिक आधार दिला. त्यांच्या मते, "विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले." या उक्तीतून शिक्षणाच्या अभावामुळे होणाऱ्या सर्वांगीण अधोगतीचा प्रत्यय येतो.

एकोणिसाव्या शतकातील ब्राह्मणेत्तर चळवळ ही केवळ सामाजिक विरोधाची अभिव्यक्ती नव्हती, तर ती एक वैचारिक क्रांती होती. या चळवळीने धार्मिक ग्रंथांच्या व रूढी, परंपरांच्या नावाखाली चालणाऱ्या अन्यायकारक प्रथांना विरोध करून सामाजिक समतेची नवी संकल्पना मांडली. छत्रपती शाहू महाराज यांनी पुढे या चळवळीला राजकीय तथा प्रशासकीय पाठबळ देत आरक्षण धोरण, शिक्षणातील सवलती व सामाजिक सुधारणा यांची अंमलबजावणी केली. इतिहासकारांच्या मते, "ब्राह्मणेत्तर चळवळ ही भारतीय लोकशाहीच्या सामाजिक पाया घडविणारी चळवळ होती."[२] या चळवळीमुळे सामाजिक स्तरावर नवचैतन्य निर्माण झाले. व वंचित घटकांना आत्मसन्मानाची जाणीव झाली. चिकित्सक दृष्टीकोनातून पाहता, या चळवळीचे मूल्यमापन करताना तिचे यश-अपयश, मर्यादा आणि परिणाम यांचा सखोल विचार करणे आवश्यक आहे. काही


*ISBN-978-93-49938-45-8*

अभ्यासकांच्या मते, ही चळवळ विशिष्ट सामाजिक घटकांपुरती मर्यादित राहिली, तर काहींच्या दृष्टीने ती व्यापक सामाजिक परिवर्तनाची सुरुवात होती.

एकंदरीत एकोणिसाव्या शतकातील ब्राह्मणेतर चळवळ ही भारतीय समाजाच्या परिवर्तनातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. ही चळवळ केवळ सामाजिक नव्हे तर बौद्धिक क्रांतीही होती. आणि "समाजातील खरा विकास हा समानतेवर आधारित असतो."[३] या चळवळीचा इतिहास हा केवळ घटनांचा आलेख नसून तो सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा अभ्यास आहे. या विषयाचा चिकित्सक अभ्यास केल्यास भारतीय समाजातील विषमता, संघर्ष आणि परिवर्तन यांचे वास्तव चित्र स्पष्ट होते.

१९ व्या शतकातील भारतीय समाजरचनेत जातीय विषमता, धार्मिक अंधश्रद्धा व सामाजिक अन्याय यांचे प्राबल्य होते. एकोणिसाव्या शतकात भारतीय समाजात वर्णव्यवस्था अत्यंत कडक होती. ब्राह्मण वर्चस्वामुळे शूद्र-अतिशूद्र वर्गाला शिक्षण, राजकारण व धार्मिक क्षेत्रात प्रवेश नव्हता. या पार्श्वभूमीवर ब्राह्मणेत्तर चळवळी उदयास आल्या. या चळवळींचे मुख्य उद्दिष्ट सामाजिक समता, शिक्षणाचा प्रसार व ब्राह्मण वर्चस्वाला आव्हान देणे हे होते. महात्मा ज्योतिराव फुले म्हणतात. "शिक्षण हे शूद्र-अतिशूद्रांच्या उद्धाराचे प्रभावी साधन आहे."[४] या विचारातून ब्राह्मणेतर चळवळीचा मूलभूत हेतू स्पष्ट होतो. आणि याच विचारातूनच ब्राह्मणेत्तर चळवळींची वैचारिक पायाभरणी झाली. ब्राह्मणेतर चळवळीची सुरुवात प्रामुख्याने महाराष्ट्रात झाली.

ब्रिटिश सत्तेमुळे आधुनिक शिक्षणाचा प्रसार झाला. सामाजिक सुधारणांची चळवळ सुरु झाली. जातीय विषमता व ब्राह्मण वर्चस्वाविरुद्ध असंतोष वाढला. अर्थात ब्रिटिश राजवटीने सामाजिक बदलासाठी संधी दिली असली तरी त्यांनी जातीय विभाजन कायम ठेवून आपले राज्य मजबूत केले. त्यामुळे ब्राह्मणेत्तर चळवळी या केवळ सामाजिक नव्हे तर अप्रत्यक्ष राजकीय प्रतिक्रियाही होत्या.

"सत्याचा शोध घेऊन समाजातील अन्याय दूर करणे हेच आमचे ध्येय आहे."[५] मानून सामाजिक समता, शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन सारख्या उद्दिष्टातून महात्मा ज्योतिराव फुले यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाज स्थापना केली. आणि चळवळीला संघटित स्वरुप दिले. समाजाने विधवा विवाह, स्त्री शिक्षण आणि जातिभेद निर्मूलनासाठी कार्य केले. फुले त्यांच्या "गुलामगिरी" ग्रंथात ते म्हणतात "ब्राह्मणांनी शूद्रांना अज्ञानात ठेवून त्यांचे शोषण केले."[६] त्यांनी बहुजनाच्या विकासतील मुख्य अडथळा ओळखून त्यांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार, विधवा पुनर्विवाह समर्थन, जातीय भेदभावाविरुद्ध लढा उभारुन महत्वपूर्ण कार्य केले. फुले यांच्या विचारांमध्ये क्रांतिकारकता असली तरी ग्रामीण भागात त्यांचा प्रभाव मर्यादित राहिला.

मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरु करणाऱ्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले मानून "विद्या हीच खरी मुक्तीची किल्ली आहे." मानत सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण क्षेत्रात मोठे

योगदान दिले. सावित्रीबाईंचे हे कार्य ब्राह्मणेत्तर चळवळीला व्यावहारिक दिशा देणारे ठरले, असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही.

समाजातील प्रगती ही सर्व घटकांच्या समान सहभागावर अवलंबून असते."[७] यातून स्पष्ट होते की सामाजिक विषमता ही प्रगतीस अडथळा होती आणि त्याविरुद्धच ही चळवळ उभी राहिली. लोकांच्या प्रगतीचे खरे मर्म जाणणाऱ्या राजर्षिनी कोल्हापूर संस्थानात आरक्षण धोरण (१९०२) जाहीर करून शिक्षण व सामाजिक समतेसाठी प्रयत्न करणारे शाहू महाराज म्हणतात की, "समाजातील दुर्बल घटकांना संधी दिल्याशिवाय समता शक्य नाही."[८] हे ओळखून समतेसाठी आग्रह धरणाऱ्या शाहू महाराजांनी चळवळीला राजकीय व प्रशासकीय आधार दिला, म्हणूनच ती व्यापक तत्वावर उभी राहीली.

ब्राह्मणेत्तर चळवळींमुळे समाजातील खालच्या वर्गाला आवाज मिळाला. व सामाजिक न्यायाची संकल्पना  मजबूत झाली. सामाजिक समतेचा आग्रह, शिक्षणावर भर, ब्राह्मण वर्चस्वाविरुद्ध संघर्ष, स्त्री मुक्तीचा पुरस्कार करणाऱ्या या चळवळींची वैशिष्ट्ये महत्वाची आहेत. अर्थात ही केवळ जातीय नव्हती, तर सामाजिक न्यायाची व्यापक चळवळ होती.[९]

चळवळ प्रामुख्याने शहरी भागापुरती मर्यादित राहिली सर्व स्तरांपर्यंत पोहोचण्यात अडचणी आल्या. या ब्राह्मणेत्तर चळवळींचा ग्रामीण भागात मर्यादित प्रभाव, काही इतिहासकारांच्या मते, ही चळवळ पूर्णपणे सर्वसमावेशक नव्हती. काही ठिकाणी जातीभेदाविरोधात लढा देतानाच नवीन सामाजिक गट निर्माण झाले. अंतर्गत मतभेद, तर काही ठिकाणी जातीय द्वेष वाढला अशा मर्यादा व टीका होताना दिसते. असे असले तरी या चळवळींनी समतेचा विचार मांडला, मात्र त्यात काहीवेळा प्रतिक्रियावादी स्वरूपही दिसते.

## समारोप

ब्राह्मणेत्तर चळवळी या भारतीय समाजपरिवर्तनाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहेत. त्यांच्या चिकित्सक अभ्यासातून सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेचे सखोल आकलन होते. एकोणिसावे शतक हे भारतीय समाजजीवनातील आमूलाग्र बदलांचे शतक मानले जाते. प्रामुख्याने महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळीने सामाजिक समता, शिक्षण, व न्यायाच्या मूल्यांना चालना दिली.

या चळवळींनी भारतीय समाजात सामाजिक न्याय, समता व शिक्षण यांचे महत्त्व अधोरेखित केले. या चळवळींनी पुढील काळातील दलित चळवळी, सामाजिक सुधारणा आणि भारतीय लोकशाहीच्या विकासाला दिशा दिली. हा अभ्यास दर्शवितो की ब्राह्मणेतर चळवळ ही केवळ सामाजिक आंदोलन नव्हती, तर ती भारतीय समाजाच्या समतेच्या दिशेने झालेली क्रांतिकारी वाटचाल होती.


ISBN-978-93-49938-45-8

### *संदर्भ*

1. फुले महात्मा 'गुलामगिरी', १८७३ स्थानिक छापखाना, पुणे, पृ. क्र. ३७.
2. कठारे अनिल, 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास' विद्या बुक्स, पुणे, २०११, पृ. क्र. १०६.
3. कीर धनंजय, 'महात्मा फुले', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६९, पृ. क्र. ७६.
4. फुले ज्योतिराव, शेतकऱ्यांचा आसूड, स्वखर्चाने प्रकशित, पुणे १८८३, पृ. क्र. ४५.
5. सत्यशोधक समाज दस्तऐवज, पृ. क्र. २३.
6. पूर्वोक्त, फुले ज्योतिराव, 'गुलामगिरी', पृ. क्र. १५.
7. शाहू महाराज, भाषण संग्रह, कोल्हापूर, पृ. क्र. ११०
8. पवार जयसिंगराव, 'राजर्षी शाहू महाराज', मौज प्रकाशन, कोल्हापूर १९८४, पृ. क्र. १०२.
9. omvedt Gail, 'Cultural Revolt in a Colonial Society' Scientific Socialist Education Trust, Mumbai, 1976, पृ. क्र. ५९.

# वारकरी संप्रदाय आणि सामाजिक समतेची संकल्पना: एक चिकित्सक अभ्यास

**साळवे अविनाश लिंबाजी**
संशोधक, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत.
Email: amsalave06@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19779866
*DOI: 10.5281/zenodo.19779866*

## प्रस्तावना

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व धार्मिक इतिहासात वारकरी संप्रदायाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. हा संप्रदाय केवळ धार्मिक न राहता सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांच्या पुनर्रचनेचा एक प्रभावी माध्यम ठरला आहे. १३ व्या शतकापासून विकसित झालेल्या या भक्तीपरंपरेने समाजजीवनावर मोठा परिणाम घडवून आणला. मध्ययुगीन काळात भारतीय समाज जातिव्यवस्थेच्या कठोर चौकटीत अडकलेला होता. अशा परिस्थितीत वारकरी संप्रदायाने "समता, बंधुता आणि भक्ती" या तत्त्वांवर आधारित एक नवीन सामाजिक दृष्टिकोन मांडला. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ व संत तुकाराम यांसारख्या संतांनी भक्तीमार्गाद्वारे सामाजिक समतेचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवला. वारकरी संप्रदायाचा केंद्रबिंदू असलेले विठ्ठल हे दैवत सर्वांना समानतेने स्वीकारणारे प्रतीक म्हणून ओळखले जाते.

मध्ययुगीन समाजात जातिव्यवस्था ही सामाजिक विषमतेचे प्रमुख कारण होती. वारकरी संतांनी या व्यवस्थेला विरोध केला. या संप्रदायाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे त्याचा सर्वसमावेशक दृष्टिकोन महत्वाचा आहे. जातीभेद, उच्च-नीचता, संपत्ती-दारिद्र्य यांसारख्या सामाजिक विषमतांना नाकारून "भक्तीमध्ये सर्व समान" ही संकल्पना या परंपरेत दृढपणे मांडली जाते. "जेथे जात नाही, तेथे पात नाही" या तत्त्वज्ञानातून सामाजिक समतेचा सुस्पष्ट संदेश दिला गेला. वारकरी परंपरेतील वारी, अभंगगायन, कीर्तन या माध्यमांतून समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याचे कार्य घडते.

या संप्रदायातील संतांनी फक्त आध्यात्मिक नव्हे तर सामाजिक सुधारणांचाही पुरस्कार केला. त्यांनी अस्पृश्यता, अंधश्रद्धा आणि अन्यायकारक सामाजिक प्रथा यांचा निषेध करून मानवतावादी मूल्यांना प्राधान्य दिले.[१] विशेष करून संत तुकाराम यांच्या अभंगांमध्ये आणि संत एकनाथ यांच्या कृतींमध्ये समतेची भावना स्पष्टपणे दिसून येते.

वारकरी संप्रदाय हा केवळ धार्मिक चळवळ नसून सामाजिक समतेच्या विचारांचा प्रभावी प्रवाह आहे. या संप्रदायाने समाजात बंधुभाव, सहिष्णुता आणि समता यांची जाणीव निर्माण करून एक सुसंवादी सामाजिक व्यवस्था घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे "वारकरी

संप्रदाय आणि सामाजिक समतेची संकल्पना" हा विषय ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून अभ्यासण्यास अत्यंत उपयुक्त आणि महत्त्वपूर्ण ठरतो. "वारकरी संप्रदाय म्हणजे एक सामाजिक क्रांतीच होय" असे स्पष्टपणे नमूद केले जाते. या पार्श्वभूमीवर या संप्रदायाने सामाजिक समतेची संकल्पना कशी विकसित केली, याचा चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक ठरते.

वारकरी संप्रदाय हा वैष्णव भक्तीपरंपरेतील एक महत्त्वाचा प्रवाह आहे. हा भक्तीमार्गावर आधारित असून नामस्मरण (राम कृष्ण हरि), साधेपणा व नैतिक जीवन, सर्वांप्रती समान दृष्टी आणि "भजन-कीर्तन" ही त्याची प्रमुख तत्त्वे आहेत. ज्ञानेश्वरी मध्ये संतांनी सांगितले आहे की, "सर्वभूते एकच आत्मा आहे" यावरून सर्वांमध्ये समानता आहे. ही संकल्पना सामाजिक समतेचा आध्यात्मिक पाया तयार करते. सर्व माणसे एकाच परमात्म्याची निर्मिती असल्याने कोणीही उच्च किंवा नीच नाही. शिवाजीराव मोहिते यांच्या "संत साहित्य आणि वारकरी संप्रदाय" मध्ये नमूद केल्याप्रमाणे, "वारकरी परंपरा ही लोकधर्माची सजीव अभिव्यक्ती आहे."[२]

वारकरी संप्रदायाची पायाभरणी संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांनी केली. या संतांनी समाजातील जातीय भेदभावावर प्रखर टीका केली. ज्ञानेश्वरांनी "अमृतानुभव" व "भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी)" मध्ये सर्व जीव समान असल्याचे प्रतिपादन केले. "सर्व भूतांमध्ये एकच आत्मा आहे" (ज्ञानेश्वरी, अध्याय ५, पृ. १२३) अर्थात संत ज्ञानेश्वरांनी समाजातील वर्णव्यवस्थेला नाकारले आणि सर्वांना ज्ञानाचा अधिकार दिला. "आत्मा तो सर्वांमध्ये समान आहे."[३] ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी मध्ये गीतेचे भाषांतर सर्वसामान्य लोकांसाठी केले, जे ब्राह्मणांपुरते मर्यादित नव्हते. डॉ. अनिल सिंह यांच्या संशोधनानुसार, ज्ञानेश्वरांनी भक्तीमार्ग सर्वांसाठी खुला केला .नामदेवांनी देवाच्या दृष्टीने सर्व समान असल्याचे सांगितले. "कुळाभिमान नाही, भक्तीच श्रेष्ठ" (नामदेव गाथा, पृ. ६७) संत नामदेवांनी देवभक्तीत कोणताही भेदभाव नसावा असे सांगितले. "कुळाभिमान न धरावा, भक्ति सर्वांसाठी आहे."[४] नामदेवांनी शूद्र व दलितांबरोबर कीर्तन केले, ज्यामुळे सामाजिक भिंती कमी झाल्या. संत एकनाथांनी अस्पृश्यांशी संवाद साधून सामाजिक समतेचा प्रत्यक्ष आचरण केला. "देव सर्वांचा आहे, तो कोणाचाही खास नाही" (एकनाथी भागवत, पृ. २१०) संत तुकारामांनी जातिव्यवस्थेवर कठोर टीका केली: "जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले" (तुकाराम गाथा, अभंग क्र. १३२) संत तुकारामांनी सामाजिक विषमतेवर कठोर टीका केली. "जातपात विचार न करता हरिभजन करावे."[५] तुकारामांच्या अभंगांमध्ये गरीब, शेतकरी, दलित यांच्या दुःखांचे वर्णन आहे. संत चोखामेळा हे दलित संत असून त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध आवाज उठवला. "आम्हीही माणूस आहोत, आम्हालाही देवाचा हक्क आहे."[६] चोखामेळा मंदिराबाहेर उभे राहूनही विठ्ठलाची भक्ती करत होते. यामुळे समाजात समतेची जाणीव निर्माण झाली. भक्ति चळवळीने सामाजिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. व यातून समतेचा संदेश मिळतो.

वारकरी संप्रदायात कोणत्याही जातीचा व्यक्ती सहभागी होऊ शकतो. या भावनेतून भक्ति सर्वांसाठी खुली केली. यामुळे धार्मिक क्षेत्रातील भेदभाव कमी झाला. सर्वजण एकत्र चालतात, एकाच अन्नाचा स्वीकार व समान वागणूक अर्थात वारी ही सामाजिक समतेची प्रत्यक्ष प्रयोगशाळा आहे. नामस्मरणाने व्यक्तीचे आध्यात्मिक शुद्धीकरण होते आणि सामाजिक भेदभाव कमी होतो. वारकरी संप्रदायात बाह्य आडंबरांना महत्त्व नाही, तर नैतिक आचरणाला प्राधान्य आहे. वारीमुळे सामूहिक अनुभव, अभंगांमधून सामाजिक संदेश, भजन-कीर्तनातून लोकजागृती अशाप्रकारे वारकरी संप्रदायाने समाजात एकात्मता निर्माण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. डॉ. श्रेया दाणी यांच्या "इतिहास वारकरी संप्रदायाचा" या ग्रंथानुसार, वारकरी परंपरेने ग्रामीण समाजात सामाजिक ऐक्य निर्माण केले.[७]

आजच्या काळातही वारकरी संप्रदायाचे महत्त्व कायम आहे. सामाजिक एकात्मता निर्माण केली. पूर्ण सामाजिक क्रांती घडली नाही. जातिव्यवस्थाही पूर्णपणे नष्ट झाली नाही. भक्तीवर अधिक भर, सामाजिक बदलावर तुलनेने कमी दिला. जरी वारकरी संप्रदायाने सामाजिक समतेचा विचार मांडला, तरी काही मर्यादा दिसून येतात. तत्त्वतः समता मानली, पण व्यवहारात जातीय भेद कायम राहिले. वारीत समता दिसते, पण दैनंदिन जीवनात नाही. सामाजिक रचना बदलण्यासाठी ठोस राजकीय कार्यक्रम नव्हता. केवळ आध्यात्मिक स्तरावर बदल आदि मर्यादा असल्या तरी सामाजिक समतेचा आध्यात्मिक पाया घातला गेला. किंबहुना वारकरी संप्रदायाने भारतीय समाजात समतेची बीजे पेरली. ती केवळ धार्मिक चळवळ नसून एक सामाजिक क्रांती म्हणून ओळखला जाऊ शकते. अस्पृश्यता व जातिव्यवस्थेविरुद्ध आवाज उठविला गेला. स्त्री-पुरुष समानतेचा प्रचार केला गेला. संतांनी समतेची शिकवण दिली, पण समाजव्यवस्था पूर्णपणे बदलली नाही तरीही, या संप्रदायाने सामाजिक परिवर्तनाची पायाभरणी केली, हे नाकारता येत नाही.

सामाजिक समतेचा संदेश आजही लागू आहे, जातीय भेदभाव कमी करण्यासाठी प्रेरणा यातूनच मिळताना दिसते. लोकशाही मूल्यांशी सुसंगत तत्वज्ञान माडले. महात्मा ज्योतिराव फुले यांनीही सामाजिक समतेचा विचार पुढे नेला. त्यांच्या कार्यात संतपरंपरेचा प्रभाव दिसून येतो.

एकंदरीत वारकरी संप्रदायाने मानसिक व आध्यात्मिक समतेचा मार्ग दाखवला, परंतु प्रत्यक्ष सामाजिक रचनेत बदल मर्यादित राहिला. वारकरी संप्रदाय हा सामाजिक समतेचा एक महत्त्वपूर्ण स्रोत आहे. संतांच्या विचारातून आणि वारीसारख्या परंपरांमधून समतेचा संदेश दिला गेला. "भक्ति म्हणजे समता आणि मानवतेचा मार्ग आहे." वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या संप्रदायाने: भक्तीच्या माध्यमातून समतेचा विचार मांडला. व जातिव्यवस्थेला आव्हान दिले


***ISBN-978-93-49938-45-8***

## *संदर्भ*

1. मोहिते, शिवाजीराव (संपा.), 'संत साहित्य आणि वारकरी संप्रदाय, कर्मवीर प्रकाशन, २००८, पृ. ११५.
2. कित्ता, पृ. क्र. ५७.
3. राजवाडे वि.का. (संपा), 'ज्ञानेश्वरी', महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई, १९९०, पृ. क्र. ४५.
4. गोडसे द.ग. (संपा), 'नामदेवांची अभंग गाथा', पुणे, १९८५, पृ. क्र. ७८.
5. तुकाराम गाथा, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई, १९९०, पृ. क्र. ५६.
6. चोखामेळा अभंग, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई, १९९२, पृ. क्र. १०२.
7. डॉ. दाणी श्रेया, "इतिहास वारकरी संप्रदायाचा", २०२३, पृ. क्र. ९५.

# इतिहास विषयातील अध्यापन व संशोधनावर नव्या तंत्रज्ञानाचा प्रभाव

**डॉ. राजू घोलप**

सहयोगी प्राध्यपक विभाग प्रमुख, इतिहास विभाग, दादा पाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय, आदिनाथनगर.

Email: amsalave06@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19780237

*DOI: 10.5281/zenodo.19780237*

## प्रस्तावना

भारतातील पारंपरिक इतिहास अध्यापन हे पाठ्यपुस्तकावर आणि फार फार तर संदर्भ ग्रंथांवर आधारित राहिले असून ते अनेकदा वास्तव जीवनातील गरजा व उपयोजनाशी निगडित राहिलेले नाही. इतिहास अभ्यासक्रमाच्या या पारंपरिक अध्यापनात आकलन व विश्लेषणात्मक कौशल्यांच्या विकासावर अपुरे लक्ष केंद्रित केले जाते. विद्यार्थ्यांच्या माहिती संपादन व तथ्य पडताळणीतील सक्रिय सहभागाकडेही दुर्लक्ष केले जाते. या पद्धतीत अनेकदा तथ्यांचे पाठांतर होते, परंतु विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त होत नाही. ही अध्यापन पद्धती परीक्षा-आधारित मूल्यमापन प्रणालीमुळे अधिक दृढ होते. यामध्ये अंतर्गत मूल्यमापन किंवा कृती-आधारित शिक्षणाला कमी महत्त्व दिले जाते. दुर्दैवाने, यामुळे वरवरचे शिक्षण प्रोत्साहित होते आणि सखोल शिक्षणाची दखल घेतली जात नाही. परिणामी, शिकणारे इतिहासाला कंटाळवाणा विषय मानतात.

सांस्कृतिक व भाषिक कारणांमुळे तयार होणारा प्रमाणित अभ्यासक्रम आणि त्यामुळे शहरी व ग्रामीण असा निर्माण होणारा भेद तसेच विद्यापीठ व स्थानिक पातळीवरील विद्यार्थी यांच्यात निर्माण होणाऱ्या दुराव्यामुळे इतिहासाचे पाठ (धडे) कमी आकर्षक ठरतात. उच्च शिक्षणाच्या पातळीवर सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील अध्यापन पद्धतींची अंमलबजावणी करण्याची तीव्र गरज आहे. नव्या तंत्रज्ञानाच्या झपाट्याने होणाऱ्या वाढीमुळे व प्रगतीमुळे या अभ्यासक्रमीय मर्यादा हाताळण्यासाठी एक व्यवहार्य मार्ग उपलब्ध झाला आहे. कोविड-१९ महामारीने आपल्या शिक्षण व्यवस्थेत डिजिटल व कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) स्वीकारण्याची आवश्यकता अधोरेखित केली आहे. त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना २१व्या शतकातील अज्ञात गुंतागुंतींसाठी तयार करण्यासाठी इतिहास अध्यापनात बदल करणे अपरिहार्य ठरते.

ज्ञानाच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर झपाट्याने परिवर्तन होत आहे. बिग डेटा, मशीन लर्निंग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या शाखांमध्ये होत असलेल्या वेगवान प्रगतीमुळे अकुशल श्रमप्रधान कार्ये आता मानवी हातांऐवजी यंत्रांद्वारे पार पाडली जात आहेत. याउलट गणित,

संगणकशास्त्र आणि डेटा विज्ञान यांसारख्या क्षेत्रांतील उच्च कौशल्य असलेल्या तज्ज्ञांची मागणी सातत्याने वाढत आहे. त्याचबरोबर, विज्ञान, समाजशास्त्र आणि मानव्य विद्या यांचा बहुशाखीय दृष्टिकोन आत्मसात केलेल्या कुशल कर्मचाऱ्यांना जागतिक रोजगार बाजारात विशेष महत्त्व प्राप्त होईल. 'भारत विकसित देश होण्याकडे वाटचाल करत असताना, तसेच जगातील सर्वांत मोठ्या तीन अर्थव्यवस्थांपैकी एक होत असताना मानव्यशास्त्रे आणि कलेची मागणी वाढत जाईल.'

रोजगाराच्या परिस्थिती आणि वैश्विक परिसंस्थेत होत असलेल्या वेगवान बदलांच्या पार्श्वभूमीवर, मुलांनी केवळ ज्ञान आत्मसात करणे पुरेसे ठरणार नाही; तर कसे शिकायचे हे शिकणे अधिक महत्त्वाचे ठरेल. त्यामुळे शिक्षणाची दिशा केवळ मजकूराधारित अध्यापनावर मर्यादित न राहता, तार्किक विचारसरणी विकसित करणे, समस्या सोडविण्याची क्षमता वाढविणे, कल्पकता आणि बहुशाखीय दृष्टिकोन आत्मसात करणे, नाविन्यपूर्णता साधणे, बदलत्या परिस्थितींशी जुळवून घेणे, तसेच नव्या क्षेत्रांतील उदयोन्मुख ज्ञान आत्मसात करण्याची क्षमता निर्माण करणे याकडे वळली पाहिजे. यासाठी अध्यापनशास्त्राचे स्वरुप उत्क्रांत होणे आवश्यक आहे, जेणेकरून शिक्षण अधिक अनुभवाधारित, सर्वसमावेशक, एकात्मिक, जिज्ञासाप्रेरित, संशोधनकेंद्रित, लवचिक आणि अर्थातच आनंददायी ठरेल.

खरी साक्षरता म्हणजे केवळ अक्षरज्ञान नव्हे, तर सतत बदलणाऱ्या जगात शिकण्याची, जुन्या गोष्टी विसरण्याची आणि नव्याने शिकण्याची क्षमता.  अल्विन टॉफलर (Alvin Toffler) यांच्या मते, एकविसाव्या शतकामध्ये ज्यांना लिहिता वाचता येत नाही त्यांना निरक्षर म्हणता येणार नाही, तर जे शिकू शकत नाहीत, शिकलेले विसरू शकत नाहीत (unlearn) आणि पुन्हा शिकू (relearn) शकत नाहीत अशांनाच निरक्षर म्हणता येईल.

शिक्षण व्यवस्थेतील मूलभूत सुधारणांच्या केंद्रस्थानी शिक्षक असणे आवश्यक आहे. नवीन शिक्षण धोरणाने शिक्षकाला सर्व स्तरांवर समाजातील सर्वाधिक आदरणीय आणि अपरिहार्य घटक म्हणून पुनर्स्थापित करण्यास सहाय्य करणे अत्यावश्यक आहे, कारण तोच प्रत्यक्षात पुढील पिढीच्या नागरिकांना आकार देतो. शिक्षकांना सक्षम करण्यासाठी आणि त्यांनी आपले कार्य शक्य तितक्या प्रभावीपणे पार पाडावे यासाठी या धोरणाने सर्वतोपरी उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच, सर्व स्तरांवर सर्वोत्तम आणि बुद्धिमान व्यक्तींना शिक्षकी पेशात आकर्षित करण्यासाठी धोरणाने ठोस पावले उचलली पाहिजेत. यासाठी त्यांच्या उपजीविकेची सुरक्षितता, सामाजिक आदर, व्यावसायिक सन्मान आणि शैक्षणिक स्वायत्तता सुनिश्चित केली पाहिजे. याशिवाय, शिक्षण व्यवस्थेत गुणवत्ता नियंत्रणाच्या मूलभूत पद्धती आणि दायित्वाची स्पष्ट चौकट स्थापित करणेही अत्यावश्यक आहे.

नवोन्मेषी तंत्रज्ञान वर्गात शिस्तबद्ध आणि संरचित पद्धतीने अंमलात आणले पाहिजे. प्रथम, अभ्यासक्रमाच्या गरजा ओळखून स्पष्ट उद्दिष्टे निश्चित केली जातात. द्वितीय, आवश्यक पायाभूत

सुविधांची व्यवस्था केली जाते. तृतीय, शैक्षणिक तंत्रज्ञान साधनांच्या साहाय्याने शिक्षकांची क्षमता-वृद्धी केली जाते. त्यानंतर नवोन्मेषी साधनांचे अध्यापन प्रक्रियेत एकत्रीकरण केले जाते. पुढे, शिकणाऱ्यांना सहकारी आणि सहयोगी गटांमध्ये शिकण्यास प्रोत्साहित केले जाते, ज्यामुळे ज्ञाननिर्मिती अधिक सखोल आणि अनुभवाधारित होते.

तांत्रिक विकासाच्या तीव्र वेगाला, तंत्रज्ञानाचे जाणकार शिक्षक आणि उद्योजक वृत्ती असलेल्या विद्यार्थ्यांच्या कल्पकतेची जोड मिळाल्यावर, शिक्षण क्षेत्रावर तंत्रज्ञानाचा बहुआयामी परिणाम होणार हे निश्चित आहे; सध्या त्यातील केवळ काही परिणामांचा अंदाज लावता येतो. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, ब्लॉकचेन, स्मार्ट बोर्ड्स, हस्तचलित संगणकीय उपकरणे, विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अडॅप्टिव्ह संगणकीय चाचण्या तसेच विविध प्रकारचे सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर यांसारख्या नव्या तंत्रज्ञानांमुळे, विद्यार्थ्यांनी वर्गात काय शिकावे यामध्येच नव्हे तर ते कसे शिकतात यामध्येही आमूलाग्र बदल घडून येईल. म्हणूनच, तांत्रिक आणि शैक्षणिक आघाडीवर या क्षेत्रांमध्ये तसेच इतर उदयोन्मुख शाखांमध्ये व्यापक संशोधन करणे अत्यावश्यक ठरते.

इतिहास अध्यापनात पारंपरिक व्याख्यान पद्धती दीर्घकाळ प्रभावी ठरली असली तरी, आधुनिक काळात स्मार्ट बोर्ड्स, इंटरॅक्टिव्ह प्रेझेंटेशन्स आणि व्हर्च्युअल टूर यांचा वापर करून विद्यार्थ्यांना अधिक सजीव अनुभव दिला जात आहे. उदाहरणार्थ, सिंधु संस्कृती शिकवताना केवळ पाठ्यपुस्तकातील चित्रे दाखवण्याऐवजी 3D मॉडेल्सद्वारे हडप्पा शहराचे पुनर्निर्मित दृश्य सादर करता येते. यामुळे विद्यार्थ्यांना इतिहासातील घटनांचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो आणि त्यांची जिज्ञासा वाढते. MOOCs (Massive Open Online Courses), वेबिनार्स आणि ऑनलाइन कोर्सेसमुळे इतिहास विषयाचे अध्यापन जागतिक स्तरावर उपलब्ध झाले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळण्याची संधी निर्माण झाली आहे. Coursera, edX आणि SWAYAM सारख्या प्लॅटफॉर्म्सवर इतिहासाचे विविध अभ्यासक्रम उपलब्ध असून, भारतीय स्वातंत्र्य चळवळीवरील अभ्यासक्रम अमेरिकेतील विद्यापीठांमधून ऑनलाइन उपलब्ध आहेत, ज्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक दृष्टिकोन प्राप्त होतो.

चित्रफिती, माहितीपट, नकाशे आणि ऑडिओ-व्हिज्युअल साधनांचा वापर करून इतिहासातील घटनांचे सजीव चित्रण करता येते. डॉक्युमेंटरी फिल्म्स विद्यार्थ्यांना घटनांचा भावनिक अनुभव देतात; ऑडिओ क्लिप्सद्वारे ऐतिहासिक भाषणे ऐकवता येतात; तर इंटरॅक्टिव्ह नकाशे साम्राज्यांचा विस्तार स्पष्ट करतात. व्हर्च्युअल रिॲलिटी (VR) आणि ऑगमेंटेड रिॲलिटी (AR) यांसारख्या नव्या तंत्रज्ञानामुळे इतिहास अध्यापनात क्रांतिकारी बदल घडत आहेत. विद्यार्थी VR हेडसेटच्या साहाय्याने प्राचीन रोमच्या रस्त्यांवर फिरू शकतात, तर AR ॲप्सद्वारे पाठ्यपुस्तकातील चित्रे जिवंत होतात. उदाहरणार्थ, दिल्लीतील लाल किल्ल्याचा अभ्यास करताना AR ॲप्सद्वारे त्याचे १७व्या शतकातील


ISBN-978-93-49938-45-8

स्वरूप पाहता येते.

इतिहास संशोधनासाठी पुराभिलेखागार आणि ग्रंथालये ही महत्त्वाची साधने आहेत. पूर्वी संशोधकांना दुर्मिळ हस्तलिखिते, शिलालेख आणि दस्तऐवज पाहण्यासाठी प्रत्यक्ष प्रवास करावा लागत असे; परंतु आज डिजिटल आर्काइव्हजमुळे ही सामग्री ऑनलाइन उपलब्ध झाली आहे. उदाहरणार्थ, National Digital Library of India (NDLI) मध्ये हजारो ऐतिहासिक दस्तऐवज, हस्तलिखिते आणि संशोधन सामग्री उपलब्ध आहे. यामुळे संशोधन अधिक व्यापक झाले आहे, तरीही सामग्रीची प्रामाणिकता तपासणे हे महत्त्वाचे आव्हान राहते. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) च्या सहाय्याने मोठ्या प्रमाणातील ऐतिहासिक दस्तऐवजांचे वर्गीकरण, भाषांतर आणि विश्लेषण सुलभ झाले आहे. फारसी व मराठी भाषेतील दस्तऐवजांचे स्वयंचलित भाषांतर संशोधकांना सामग्री समजणे सोपे करते, वेळ वाचतो आणि संशोधन अधिक सखोल होते. तथापि, AI प्रणालींमध्ये त्रुटी संभवतात, त्यामुळे मानवी तपासणी अपरिहार्य ठरते.

ही साधने वापरकर्त्यांना संवादकौशल्ये, संशोधनकौशल्ये आणि चिकित्सक विचारसरणी विकसित करण्यास सहाय्य करतात. प्रौढ विद्यार्थी स्रोतांची विश्वासार्हता आणि पक्षपात ओळखण्याची क्षमता वाढवू शकतात, गुंतागुंतीच्या ऐतिहासिक आख्यानांचे चिकित्सक विश्लेषण करू शकतात, तसेच भूतकाळ आणि वर्तमानाचे स्वतःचे अर्थ लावून भविष्यातील प्रवृत्तींचा अंदाज बांधू शकतात.

भारतामध्ये Digital Library of India (DLI), National Mission for Manuscripts (NAMAMI), Sahapedia, Digital South Asia Library (DSAL), Library of Congress, Google Scholar, ऑनलाईन मराठी विश्वकोश आणि JSTOR या डिजिटल साधनांचा इतिहास संशोधनामध्ये व्यापक वापर केला जातो. ही साधने संशोधन लेख आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण दस्तऐवज मोफत उपलब्ध करून देतात. इतिहास संशोधन आता केवळ ग्रंथांपुरते मर्यादित राहिलेले नाही. जागतिक स्तरावर संशोधन सामग्री सहज उपलब्ध होत असल्याने आंतविद्याशाखीय संशोधनाला चालना मिळते आणि संशोधन अधिक सखोल व वैज्ञानिक पद्धतीने करता येते. संशोधकांना सहयोगी प्रकल्पांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते. तथापि, डिजिटल दरीमुळे ग्रामीण भागातील संशोधकांना समान संधी मिळणे कठीण ठरते. माहितीची प्रामाणिकता तपासण्याचे आव्हान कायम राहते. तांत्रिक साधनांच्या वापरासाठी आवश्यक प्रशिक्षणाचा अभाव जाणवतो. शिवाय, AI आणि डेटा विश्लेषण साधनांवर अतिनिर्भरता केल्यास मानवी विश्लेषण कौशल्य कमी होण्याची शक्यता निर्माण होते.

इतिहासाचा अभ्यास हा तथ्ये व तारखा पाठांतर करण्याशी संबंधित मानला जातो. ग्रामीण भागातील अनेक पदवी महाविद्यालयांत विद्यार्थी अजूनही पाठांतरात गुंतलेले असतात. सहयोग, सर्जनशीलता, चिकित्सक विचारसरणी व सक्रिय शिक्षणासाठी मर्यादित संधी असतात. वर्गातील

व्यवहार २१व्या शतकातील कौशल्यांच्या विकासाकडे वळविला गेला पाहिजे. दुर्गम भागांत डिजिटल पायाभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे शिक्षक माहिती व तंत्रज्ञानाचा (ICT) वापर करून शिकवू शकत नाहीत किंवा विद्यार्थ्यांना ICT योग्यरीत्या वापरण्यास मार्गदर्शन करू शकत नाहीत. शिवाय, तथ्य पडताळणी व प्रबंधासाठी डिजिटल संग्रहालयांचा वापर करण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना शिकवले जात नाही. यामुळे कमी खर्चात प्रामाणिक स्रोतांपर्यंत पोहोचण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकतेचा अभाव राहतो. विद्यार्थ्यांची डिजिटल साक्षरतेची कमतरता ही एक अडथळा ठरते.

Digital Library of India (DLI) हा भारतीय सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून तो साहित्यिक, ऐतिहासिक आणि वैज्ञानिक कार्यांचे जतन व डिजिटायझेशन करण्यासाठी स्थापन करण्यात आला आहे. हे एक विशाल सार्वजनिक-सुलभ भांडार आहे, जिथे विविध दस्तऐवज आणि पुस्तके सहज उपलब्ध होतात. अनेक दुर्मिळ तसेच मुद्रणबाह्य ग्रंथ येथे संग्रहित आहेत. परिणामी, हे व्यासपीठ भारताच्या मूर्त आणि अमूर्त बौद्धिक वारशाचे ऑनलाइन संग्रहालय म्हणून कार्य करते, जिथे संशोधन व अध्ययनासाठी सामग्री विनामूल्य उपलब्ध आहे.

Sahapedia हे भारतीय कला, संस्कृती आणि वारसा यांचा ऑनलाइन विश्वकोश असून, मल्टिमीडिया स्वरूपातील सामग्रीचे संकलन व सादरीकरण यासाठी ते विशेषतः ओळखले जाते. या व्यासपीठावर व्हिडिओ, लेख, नकाशे तसेच तज्ज्ञांच्या मुलाखतींचे ध्वनिमुद्रण संदर्भासाठी उपलब्ध असते. National Mission for Manuscripts (NAMAMI) हा भारत सरकारचा प्रमुख उपक्रम असून त्याचा उद्देश भारतातील सर्व भाषांतील हस्तलिखितांचे डिजिटायझेशन आणि जतन करणे आहे. हा उपक्रम इंडॉलॉजी, प्राचीन इतिहास अभ्यास आणि मध्ययुगीन अभ्यास यांचे केंद्र म्हणून कार्य करतो. या व्यासपीठावर ऑनलाइन अभ्यागतांना हस्तलिखितांची उच्च-रिझोल्यूशन प्रतिमा वाचता येते, तसेच आवश्यक हस्तलिखिते सोप्या डेटाबेसद्वारे शोधता येतात. काही हस्तलिखितांचे लिप्यंतरणही उपलब्ध आहे. हे व्यासपीठ भाषाशास्त्रज्ञ आणि इतिहासकारांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते, कारण ते घरबसल्या प्रामाणिक संशोधन करू शकतात. डिजिटल स्वरूपात संग्रहित मजकूर नैसर्गिक किंवा कृत्रिम कारणांमुळे होणाऱ्या हानीपासून सुरक्षित राहतो. Digital South Asia Library (DSAL) हा जगभरातील ग्रंथालये आणि विद्यापीठांचा संयुक्त प्रयत्न असून, दक्षिण आशियाच्या सामाजिक-वैज्ञानिक पैलूंच्या अभ्यासासाठी उच्च दर्जाची साधने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देतो. यामध्ये उपलब्ध असलेला ऑनलाईन मोल्सवर्थ शब्दकोश संशोधकांसाठी अतिशय उपयुक्त आहे.

Google Scholar हे मोफत वापरता येणारे शोधयंत्र असून जगभरातील शैक्षणिक साहित्य येथे उपलब्ध आहे. सर्व शाखांतील संशोधकांसाठी हे एक अमूल्य साधन ठरले आहे. या व्यासपीठावर प्रबंध, नियतकालिके, संशोधन लेख, परिषद कार्यवाही, ग्रंथ, मोनोग्राफ आणि सारांश सहज


*ISBN-978-93-49938-45-8*

मिळतात. Google Scholar स्वतः नवीन सामग्री तयार करत नाही; परंतु विविध संशोधन कार्य एका क्लिकमध्ये उपलब्ध करून देते. JSTOR हे एक प्रसिद्ध ऑनलाइन ग्रंथालय असून ते विशाल शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देते, ज्यामध्ये दुय्यम तसेच प्राथमिक स्रोतांचा समावेश आहे. JSTOR मधील सामग्री काटेकोरपणे तपासलेली आणि निवडलेली असल्यामुळे उच्च दर्जाची शैक्षणिक काटेकोरता राखली जाते.

नवीन तंत्रज्ञान अभ्यासक्रम अधिक व्यवहार्य बनवून त्याला उपयुक्तता प्रदान करते. Augmented Reality (AR) आणि Virtual Reality (VR) यांसारख्या तंत्रज्ञानामुळे ऐतिहासिक सहानुभूती आणि घटनांशी भावनिक संबंध विकसित होतो. त्यामुळे इतिहास हा अमूर्त न राहता जीवंत अनुभवामध्ये रूपांतरित होतो. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) विद्यार्थ्यांना आणि इतिहास अभ्यासकांना वैयक्तिकरित्या शिकण्याचे मार्ग उपलब्ध करून देते. राष्ट्रीय शिक्षण धोरणा 2020 (NEP 2020) ने सर्व स्तरांवर शिक्षण परिणाम साध्य करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन दिले आहे. प्राध्यापक आणि अतिथी प्राध्यापकांना गतिशील शैक्षणिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यासाठी व्यापक आणि नियमित तंत्राधारित प्रशिक्षण तसेच क्षमता-वृद्धी कार्यक्रम आवश्यक आहेत.

तंत्रज्ञानामुळे वाङ्मयचौर्य (plagiarism) आणि ऐतिहासिक एकांगीपणा किंवा पूर्वग्रहदूषित वृत्तीला आळा घालण्याची संधी मिळते, तसेच समाजातील सर्व घटकांना सुरक्षितपणे आपली बाजू मांडण्याचे व्यासपीठ उपलब्ध होते.

## *संदर्भ*

1. Mishra, Ishita, Swagatika Meher, Debabrata Bagui, and Dipanshu Sharma. 2026. “Transforming History Pedagogy: The Role of Innovative Technologies in Undergraduate Education in Odisha”. Indian Journal of Educational Technology 8 (1). India:194-95. https://journals.ncert.gov.in/IJET/article/view/1776.
2. भारत सरकार, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (नवी दिल्ली: शिक्षण मंत्रालय, २०२०), ३, https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/nep/2020/MARATHI.pdf (Accessed March 3, 2026).
3. कित्ता.
4. Eli Amdur, “The Illiterate of the 21st Century...,” Forbes, October 04, 2022, https://www.forbes.com/sites/eliamdur/2022/10/04/the-illiterate-of-the-21st-century/
5. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, ४.
6. कित्ता., ७६.
7. Mishra, Ishita, 199-200.

# महाराष्ट्रातील संत परंपरा व समाज सुधारक एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. राजेंद्र अरुण गायकवाड**

साईकृपा कला महाविद्यालय, घारगाव, श्रीगोंदा

Email: gaikawadrajendra664@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19780793

*DOI: 10.5281/zenodo.19780793*

## प्रस्तावना

संत परंपरा व समाजसुधारक यांचा अपआपासतील संबंध अत्यंत जवळचा आहे. संतांच्या विचारांचा पाया व समाजसुधारकांच्या कृतीमुळे महाराष्ट्रामध्ये सामाजिक बदलाची एक परिपूर्ण अशी परंपरा निर्माण होण्यास मदत झाली. महाराष्ट्रातील संतांची ही परंपरा केवळ धार्मिक आंदोलन नव्हते तर ती सामाजिक परिवर्तनाची एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया होती. या परंपरेने समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश दिला.

महाराष्ट्राची संत परंपरा ही भारतीय सांस्कृतिक इतिहासातील एक अद्वितीय व प्रभावी परंपरा मानली जाते. महाराष्ट्रातील सांस्कृतिक परंपरा अत्यंत समृद्ध असून तिच्या केंद्रस्थानी संत परंपरा व समाजसुधारकांचे कार्य महत्त्वपूर्ण ठरते. १३ व्या ते १७ व्या शतकांदरम्यान उदयास आलेल्या संतांनी मध्ययुगीन काळात समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता व धार्मिक दुराग्रह यांचे जाळे पसरलेले होते. अशा परिस्थितीत संतांनी आपल्या अभंग, ओवी, कीर्तन व प्रवचनांच्या माध्यमातून समाजाला नवी दिशा दिली. त्यांनी भक्तीमार्गाच्या आधारे समता, बंधुता व मानवतेचा संदेश दिला. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांसारख्या संतांनी मराठी साहित्याद्वारे ज्ञान व भक्ती सामान्य लोकांपर्यंत पोहोचवली, समाजातील अन्यायकारक प्रथांवर कठोर टीका केली. ज्यामुळे महाराष्ट्राची संस्कृती समृद्ध झाली. तथा भक्ति आंदोलनाच्या माध्यमातून सामाजिक समता व मानवतेचा संदेश दिला.

संत परंपरेचा मुख्य आधार भक्ति, समता व मानवता हा होता. त्यांनी “भक्तीमध्ये सर्व समान आहेत” ही संकल्पना मांडून जातिभेदाला आव्हान दिले. याच विचारसरणीने पुढे महाराष्ट्रातील समाजसुधारकांना प्रेरणा दिली. ही संत परंपरा आजही महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीत प्रेरणादायी भूमिका बजावत आहे. संत परंपरेतील विचार पुढे नेण्याचे कार्य आधुनिक काळातील समाजसुधारकांनी केले. महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, सामाजिक न्याय व समतेसाठी संघर्ष केला. त्यांनी संतांच्या समतावादी विचारांना आधुनिक सामाजिक व राजकीय रूप दिले.

“जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा.” संत तुकाराम यांनी या अभंगातून संत तुकारामांनी समाजातील दुर्बल घटकांप्रती करुणा व सहानुभूती ठेवणाऱ्यालाच खरा साधू मानले आहे.तसेच संत ज्ञानेश्वर यांनी आपल्या विचारांतून सार्वभौम मानवतेचा संदेश दिला आहे. “आता विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे” या ओवीतून सर्व विश्व एकच आहे तथा सर्वांमध्ये परमात्मा आहे, ही भावना व्यक्त होते.

समाजसुधारकांच्या कार्यातही हाच मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो. महात्मा ज्योतिराव फुले यांनी शूद्र-अतिशूद्रांच्या शिक्षणासाठी केलेले कार्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समतेचा व न्यायाचा संदेश हे संत परंपरेच्या विचारांचेच आधुनिक प्रतिबिंब आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील संत परंपरा व समाजसुधारक यांचा अभ्यास केल्यास समाजपरिवर्तनाची एक सलग परंपरा लक्षात येते. ही परंपरा केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक नसून सामाजिक, शैक्षणिक व राजकीय परिवर्तनाचीही प्रेरणादायी शक्ती आहे. प्रस्तुत शोधनिबंधात या परंपरेचा ऐतिहासिक, तात्त्विक आणि चिकित्सक अभ्यास केला आहे.

महाराष्ट्रातील संत परंपरेचा आरंभ १३ व्या शतकात झाला. संत ज्ञानेश्वर यांनी भावार्थ दीपिका (ज्ञानेश्वरी) या ग्रंथाद्वारे भगवद्गीतेचे लोकभाषेत स्पष्टीकरण केले. “अवघा रंग एक झाला” ज्ञानेश्वर या वाक्यातून सर्वांमध्ये एकत्वाचा संदेश दिला आहे. लोकभाषेचा (मराठी) वापर, जातिभेदाचा विरोध, वैयक्तिक भक्ती व सर्वसमावेशकता यावर भर दिला. संत नामदेव यांनी उत्तर भारतातही भक्ति चळवळीचा प्रसार केला. संत एकनाथ यांनी समतेचा विचार प्रत्यक्ष कृतीतून मांडला. संत तुकाराम हे संत परंपरेतील सर्वात प्रभावशाली समाजचिंतक मानले जातात. त्यांच्या अभंगांमध्ये समाजातील ढोंगीपणा, अन्याय आणि भेदभावावर कठोर टीका आढळते. त्यांनी जातिभेदाचा निषेध, श्रमाची प्रतिष्ठा व नैतिक मूल्यांचा प्रचार केला.

संत परंपरेने स्त्रियांच्या प्रश्नांवरही विचार मांडला. जनाबाई व मुक्ताबाई यांनी स्त्रीच्या आत्मसन्मानाचा प्रश्न उपस्थित केला. “आम्ही जातो देवाच्या दारी” जनाबाई यांनी यातून स्त्री-पुरुष समानतेचा विचार दिसून येतो.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षण आणि सामाजिक समतेचा पुरस्कार केला. सत्यशोधक समाजाची स्थापना करतानाच त्यांनी स्त्री शिक्षणाचा प्रचार केला. सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. छत्रपती शाहू महाराज यांनी आरक्षण धोरणाची अंमलबजावणी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्याय आणि समतेचा लढा दिला. अर्थात संत परंपरेचा समाजसुधारणेवर प्रभाव जाणवतो.

संत परंपरेने समाजात समतेचा संदेश दिला असला तरी काही मर्यादा देखील नजरे आड करता येणार नाही. यात सामाजिक रचनेत मूलभूत बदल मर्यादित, धार्मिक चौकटीत सुधारणा व आर्थिक

विषमता दूर करण्याचा अभाव असला

तरीही संत परंपरेने मानसिक क्रांती घडवून आणली, जी पुढील समाजसुधारणेचा पाया ठरली.

संत परंपरा आणि समाजसुधारक यांचा परस्पर संबंध अत्यंत घनिष्ठ आहे. संतांनी दिलेला विचारांचा पाया व समाजसुधारकांनी केलेली कृती यामुळे महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तनाची एक समृद्ध परंपरा निर्माण झाली. महाराष्ट्रातील संत परंपरा ही केवळ धार्मिक चळवळ नसून सामाजिक परिवर्तनाची एक महत्त्वाची प्रक्रिया होती. या परंपरेने समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश दिला. पुढील समाजसुधारकांनी या विचारांना व्यावहारिक स्वरूप दिले.

### *संदर्भ*


1. वि. का. राजवाडे (संपा), ज्ञानेश्वरी, भारतीय इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९८५.
2. तुकाराम गाथा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९०.
3. द. ग. गोडसे (संपा), एकनाथी भागवत, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८.
4. नामदेवांची अभंग गाथा, गीता प्रकाशन मुंबई, १९८८.
5. महात्मा ज्योतिराव फुले, गुलामगिरी, स्वयंप्रकाशित, १८७३.
6. महात्मा फुले, 'शेतक्याचा असूड', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८८.
7. Dr. Babasaheb Ambedkar, 'Annihilation of Caste', Government of Maharashtra Education Department 1979.



*ISBN-978-93-49938-45-8*

# Virtual Museums and the Democratization of Heritage: Challenges in Preserving Material Culture

**Dr. Pramila Dasture**
Associate Professor, Dept. of History, Nowrosjee Wadia College, Pune-411001
Email: ppdasture@nowrosjeewadiacollege.edu.in
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19780853
*DOI: 10.5281/zenodo.19780853*

## Abstract

The rapid evolution of digital technologies has ushered in the era of the "Virtual Museum," offering unprecedented opportunities for the democratization of cultural heritage. In a country as diverse and geographically vast as India, virtual platforms serve as a bridge, connecting remote populations to the nation's material culture. However, this transition is not without significant hurdles. This paper explores the "Virtual Museum" as a tool for inclusivity while critically examining the inherent problems of digital decay, technical obsolescence, and the "digital divide" in the Indian context. By analyzing current initiatives like the National Museum's digital repository and regional case studies from Maharashtra, such as the Raja Dinkar Kelkar Museum's metaverse project, the article identifies key challenges-ranging from a lack of national legislative frameworks to technical manpower shortages. Finally, it proposes a multi-stakeholder approach to ensure that the digitization of material culture leads to genuine heritage democratization rather than mere digital elitism.

## The Digital Shift in Heritage

For centuries, museums have functioned as the "cathedrals of culture"—grand, physical repositories where history was curated behind glass and restricted by geography. The democratization of heritage refers to the process of making these cultural narratives accessible to all, regardless of socio-economic status or location. In the 21st century, the primary vehicle for this democratization is the Virtual Museum (VM). A VM is not merely a website with photographs; it is an integrated digital environment that uses 3D modeling, Augmented Reality (AR), and high-resolution archiving to preserve and present material culture. This shift represents a transition from "collections-based" institutions to "connection-based"

experiences.

**The Indian Landscape: Context and Issues**

India possesses one of the world's most extensive collections of tangible and intangible heritage, scattered across thousands of sites and state-run institutions. However, the physical preservation of these artifacts faces the "Triple Threat" of climate-induced deterioration, urban encroachment, and a lack of display space. Most Indian museums can only display about 5% to 10% of their total collections; the rest remains in storage, often in environmental conditions that accelerate decay.

A primary issue in India is the "Gatekeeper Effect." Physical museums remain predominantly urban and elite spaces. A student in a rural village in Gadchiroli or a researcher in a remote part of the Northeast may never have the financial means to visit the National Museum in Delhi. Furthermore, much of India's heritage documentation is fragmented. Many smaller regional museums still rely on handwritten registers, making it nearly impossible to track provenance or protect artifacts from illegal international trafficking. True democratization requires a unified digital database that is multilingual, reaching beyond the English-speaking urban population to include India's diverse linguistic demographics.

**Challenges India Faces in the Virtual Transition**

While the potential is vast, the road to a "Digital India" for heritage is fraught with technical and structural challenges.

- **Technical Obsolescence and "Bit Rot"**

Digital data is surprisingly more fragile than stone or parchment. While a Chola bronze can last a millennium with basic care, a digital file (like a 3D scan) can become unreadable in a decade due to changing file formats—a phenomenon known as "Bit Rot." India currently lacks a robust, centralized "migration policy" to ensure that heritage data is periodically updated to modern formats.

- **The Digital Divide**

Democratization assumes that the "user" has high-speed internet and a modern smartphone. While mobile penetration in India is high, the data required for immersive 360-degree VR tours is still a luxury for many. These risks creating a new form of "digital elitism" where only the tech-savvy population consumes heritage, leaving rural communities further behind.


*ISBN-978-93-49938-45-8*

- **Lack of Trained Manpower**

Digitizing a museum requires a multidisciplinary team: digital archivists, 3D metadata specialists, and legal experts in Intellectual Property Rights (IPR). Current academic curricula in Indian universities often separate "History" from "Information Technology." This creates a significant skill gap, where historians lack technical tools and IT professionals lack the historical context needed for accurate digital reconstruction.

- **Legislative and Policy Gaps**

India lacks a comprehensive National Digital Preservation Policy. Without standardized metadata—the "tags" that describe an object—different digital projects cannot "talk" to each other. This leads to isolated "digital silos" where data from one museum cannot be searched alongside data from another.

**Case Studies from Maharashtra**

Maharashtra provides several pioneering models for how these challenges can be addressed through local innovation. The Chhatrapati Shivaji Maharaj Vastu Sangrahalaya (CSMVS) in Mumbai addresses the digital divide through its "Museum on Wheels." This hybrid model uses physical buses equipped with digital touchscreens and VR headsets, bringing the "Virtual Museum" experience directly to schools and villages across the state. This takes the digital archive to the user, ensuring that technology serves those without personal high-speed access.

In Pune, the Raja Dinkar Kelkar Museum has moved toward the cutting edge by joining the BharatVerse Metaverse. By creating a "Digital Twin" of its extensive collection, the museum allows global users to navigate its galleries as avatars. This addresses the challenge of physical space; while the museum can only display a fraction of its 22,000 artifacts at its physical location, the virtual environment offers an infinite gallery for interaction without the risk of physical wear on the objects.

Academic preservation is also visible at Deccan College Post-Graduate and Research Institute in Pune. Their massive manuscript digitization project focuses on preserving fragile Sanskrit and Marathi documents. By converting these into high-resolution digital formats, they have democratized research, allowing scholars worldwide to access rare texts previously restricted to physical archives.

Furthermore, the technical backbone of many national efforts stems from C-DAC Pune, which developed JATAN: Virtual Museum Builder. This software provides the standardized digital repository needed to unify collections across various

national institutions, ensuring that India's material culture is searchable and protected for future generations.

**Probable Solutions and the Way Forward**

To turn these challenges into opportunities, several strategic shifts are required:

- **Open Access Policies:** Publicly funded museums should adopt "Open Access" for low-resolution digital copies of artifacts in the public domain. This encourages educational use and prevents the "commercialization" of public heritage.
- **Infrastructure for "Low-Bandwidth" Access:** Virtual museums should be designed with "lite" versions that can run on older smartphones and 4G networks to ensure rural reach.
- **Public-Private Partnerships (PPP):** The government should collaborate with tech giants and local startups to leverage advanced 3D scanning and cloud storage, which are often too expensive for individual museum budgets.
- **Integrating Indian Knowledge Systems (IKS):** Digital heritage should not just be visual. Integrating the "knowledge" behind the object-traditional craft techniques, local folklore, and medicinal uses-preserves the context alongside the object.

**Conclusion**

The virtual museum is not a replacement for the physical museum but a powerful extension of it. For India, the democratization of heritage is a democratic necessity. By addressing the technical challenges of digital preservation and bridging the digital divide, India can ensure that its material culture is not just "saved" but "shared." The future of Indian history lies in the delicate balance between the ancient stone and the modern silicon.

***References***

1. Agrawal, O. P. (2020). Conservation of Indian Heritage: Challenges and Prospects. New Delhi: National Book Trust.
2. C-DAC (2026). JATAN: Virtual Museum Builder and the Standardisation of Indian Heritage Metadata.
3. Cameron, F., & Kenderdine, S. (2007). Theorizing Digital Cultural Heritage: A Critical Discourse. MIT Press.
4. Government of India. (2025). National Digital Library of India Project Report. Ministry of Education.



*ISBN-978-93-49938-45-8*

5. Ministry of Culture (2026). Annual Report on the National Portal and Digital Repository for Indian Museums.
6. Ranade, S. (2023). The Raja Dinkar Kelkar Museum Metaverse: A Case Study in Digital Twins.
7. UNESCO. (2024). Charter on the Preservation of Digital Heritage.

# Economic History and Human Life

**Mr. Gadade Dipak Ganpat**
Research Student, Department of History, Savitribai Phule Pune University Pune Affiliated by Marutraoji Ghule Patil Art, Commerce and Science College, Ahilyanagar
Email: dipakgadade93@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19781080
*DOI:* 10.5281/zenodo.19781080

## Introduction

A discipline closer to history is economics. Financial transactions are a very important part of human life. From the time when human beings lived in a barbaric state to the present day, human beings have made continuous efforts to improve human life materially. Due to this, economic aspects like agriculture, industry, trade, communication and transportation system, production and distribution system, working system of surplus, market system, taxation system etc. have an important place in human life. Due to this, the scholars like Condorcet, Buckle, Karl Marx, Engels etc. have interpreted the past human life with special emphasis on economic transactions. Economic transactions determine the nature of political and social life through a materialistic interpretation of human life in the past. Karl Marx scientifically proved that there is an economic reason behind commercialism, colonialism and imperialism.

This led to the interpretation of historical tons from an economic point of view from the nineteenth century. For example, the controversy over Negro slavery was the ostensibly the cause of the U.S. Yadav. Historians like Faulkner posit that the underlying reason was the conflicting economic interests of the northern and southern states.

To understand the economic motives behind social affairs, a historian must have the knowledge of economics. To understand the concepts like balance of trade, free trade, controlled economy, free market system, it is imperative to know the economic theory.

Economists also have to step forward by tracing history and 'erasing the path' of history. Economists have to understand the beginning of trade, the establishment of colonies, the industrial revolution, if they want to present a general theory about capitalism. So, these two disciplines are interrelated.


*ISBN-978-93-49938-45-8*

**Human Life**

According to George Limatre's Big Bang theory, the universe formed 13.5 billion years ago, with Earth emerging 4.5 billion years ago. Human evolution began in the Pleistocene Ice Age (~2.5 million years ago), during which humans discovered fire, the wheel, and language, later developing agriculture and settling into permanent communities. By 4500 BCE, the Indus Civilization emerged, followed by the Vedic period (1500–500 BCE) with the varna system and migration into the Gangetic Plain, leading to urbanization, religious reform, and the rise of Jainism, Buddhism, and later Hinduism.

Chandragupta Maurya established the Maurya Empire, with Ashoka promoting Buddhism and non-violence. Subsequent dynasties, including the Shungas and Guptas, oversaw India's Golden Age of culture, administration, and science, influencing Asia. From the 8th century, Islamic invasions led to the Delhi Sultanate and southern sultanates like Vijayanagara, while Hindu kingdoms also flourished. The Mughal Empire (16th–18th centuries) brought proto-industrialization and economic dominance, eventually declining under Maratha and British expansion.

The British East India Company and subsequent colonial rule prompted the 1857 revolt, leading to direct British governance. Independence movements under Mahatma Gandhi and the Indian National Congress, alongside demands from the All-India Muslim League, culminated in India and Pakistan's independence in 1947. Human history thus reflects continuous evolution socially, economically, politically, and culturally, shaping modern Homo sapiens. **Economic History**

Economic history is the study of the economic aspects of human society, such as living standards, production, distribution, and trade, over time. It uses qualitative sources and quantitative information to understand historical events. It combines both the disciplines of economics and history. It helps in understanding the development of various economic systems. The first definition of history was given by the German philosopher Karl Marx in the 19th century, after a very deep consideration and detailed analysis of the economic side of life. Economic history tells us why and how the current economic situation came about. A historian must have knowledge of the economic affairs of the time. "Without money, human life has no meaning." It studies the changes from the agricultural system to the modern industrial and digital economy.

**Relationship Between Economic History and Human Life**

Humans are social animals. Sociology is the pillar of human development. The process of economic development of India has been going on since before the

Harappan civilization. The information about the ancient society like agriculture, animal husbandry, trade, coins is known. The economic development made by the Harappan civilization was unparalleled. Excellent urban planning, sewage system, roads, metallurgy, baths, granaries, ship docks, burial rituals, trade, clay seals, clay pots and their living conditions were all not possible without a good economic planning. Later, the Aryans combined spiritual and material progress through the creation of the Vedas. Although the Aryans were animal husbandry, they did not neglect agricultural industry and scientific progress.

After the Aryans, various invaders invaded India. This includes many from Alexander to the Turks. The cultures of all of them merged with the Indian culture. Also, the economic development that took place from the Maurya dynasty to the medieval Muslim period. It was important. Because Indian culture was effective until the medieval period. The education system of Indians was also effective. Even though India was invaded many times. Still, India used to regain its economic progress during the peaceful times in between.

But in the 17th century, Europeans set foot in India. They used to take advantage of the political chaos of that time for their economic interests. For more economic benefits, mainly the British entered Indian politics and built their empire. They also ended the first effective education system of Indians and started an education system that produced clerks. They made all the changes in India for their economic interests. They used all this financial wealth for the industrial revolution and developed themselves. India had to suffer from economic exploitation until it gained independence.

This economic exploitation was first described by Dadabhai Naoroji. For almost 200 years, the British exploited India economically and plunged India into the abyss of poverty. The economic problems we are facing today have their seeds in our history.

**Conclusion**

The main purpose of human life is to attain happiness by balancing material and spiritual pursuits, ultimately achieving freedom and bliss. Purusharthas—Dharma, Artha, Kama, and Moksha—guide this path. Artha encompasses wealth, knowledge, skills, and worldly stability, enabling fulfillment of desires and eventual spiritual liberation. Sustainable development aligns with this principle, ensuring the well-being of humans and all living beings, reflecting the Indian worldview of the entire world as family. Studying economic history helps the new generation appreciate India's ancient prosperity in economy, architecture, science, and spirituality. While medieval decline reduced this awareness, British


*ISBN-978-93-49938-45-8*

acknowledgment shows its enduring value. Today, challenges like poverty, communalism, terrorism, and natural disasters affect the economy indirectly. Addressing these requires understanding wealth and development in a broad, holistic sense, reviving India's ancient wisdom to achieve sustainable development and global leadership.

***References***

1. Early India, Romila Thapar.
2. India's Ancient Past, प्रारंभिक भारत का परिचय, R. S. Sharma.
3. A brief history of Modern India, Spectrum.
4. Modern India – Adhunik Bharat (Marathi), Bipin Chandra. Translate by Dr. M. V. Kale.
5. Itihas Tantra ani Tatwadnyan , Shanta Kothekar.
6. आधुनिक भारताचा इतिहास , डॉ.बी.एल. ग्रोवर आणि डॉ. एन. के. बेल्हेकर , एस. चन्द.
7. मध्यकालीन भारताचा इतिहास(1550 - 1750) , प्रा. मदन मोहन मार्डीकर, विद्या पब्लिकेशन.
8. आधुनिक भारताचा इतिहास, डॉ.जयसिंगराव पवार, डायमंड पब्लिकेशन.
9. भारतीय अर्थव्यवस्था, रंजन कोळंबे, भगीरथ प्रकाशन.
10. Monetary Economic, Suraj B. Gupta, S. Chand.
11. Economic History of India, Ramesh Chandra Datta.

# Revolution In Agriculture: Organic Farming

**Prof. Sunita Subhash Satale**
Shri. Amarnath Jr. college, Karjat, Tal. Karjat, Dist. Ahilyanagar, Pin. -414402
Email: sunitasatale2021@gmail.com

*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19781169
*DOI: 10.5281/zenodo.19781169*

**Abstract**

The organic farming revolution involves a shift away from conventional agriculture, emphasizing natural processes and sustainable practices to produce food. This shift is driven by concerns about the environmental and health impacts of synthetic fertilizers, pesticides and genetically modified organisms (G.M.O.S.). Organic farming aims to build healthy soil, promote biodiversity and reduce pollution, ultimately contributing to more sustainable food system.

Organic farming has emerged as an important priority in India to promote environmental sustainability and food safety. With only 1.5%of total agricultural land under organic cultivation. There is immense scope for growth. Organic farming avoids use of synthetic fertilizers and pesticides and focuses on traditional practices that nurtures the soil through crop rotation, organic manures, green manures and biological pest control. This review article improves farm income. Organic practices build soil health, conserve biodiversity, reduce pollution and mitigate climate change impacts. Organic farming challenges includes transition costs, certification burdens, lack of awareness, supply chain gaps and insufficient institutional support. Government schemes to maintain organic farming through farmer incentives, market development and extension services have shown positive impacts. Further policy support, public private partnerships, farmer collectives and participatory guarantee systems can help tap the full potential of organic farming towards building sustainable food production systems in India.

## Introduction

Organic farming is ecofriendly technique which originates due to adverse effect of chemical farming. It is best possible relationship between mankind and earth. It is universal production management system which stimulates ecosystem health. Which includes biodiversity, biological cycle and soil biological activity.

Organic farming is another way to overcome the problems of sustainability,


*ISBN-978-93-49938-45-8*

global warming and food security. The worldwide growth of organic farming is comparatively very slow. It is easy way to be in touch with nature. It depends on certain standards, specifically derived for producing food and focus on achieving agro ecosystem which are socially and ecologically sustainable. Today organic farming is based on simple combination of traditional knowledge, modern science and innovation. Organic farming is much productive as conventional farming. Many countries are now focusing on organic farming because of healthy crops, fruits and vegetables that are produced purely by organic means, free from any harmful chemical fertilizers and pesticides and ecofriendly.

In short, organic farming is termed as sustainable use of land that does not involve synthetic fertilizers and chemical pesticides and systematically enhancing the conventional farming as it not only promises higher yields but also ensures security of health and long life.

**Need of Organic Farming**

The rate at which the knowledge of organic farming is spreading in India is very slow. The farmers are preferring conventional farming over organic farming because conventional farming gives product early and more easily by using harmful chemical fertilizers and pesticides.

**Benefits of Organic Farming**

The various benefits of organic farming are as follows;

- Improves soil health and fertility-Avoiding chemical inputs and adopting practices like intercropping, crop rotation, green manures improve physical, chemical and biological properties of soil.
- Reduces water and air pollution-Eliminating synthetic fertilizers and pesticides reduces water contamination and greenhouse gas emissions associated with their manufacture, transport and application.
- Conserve Biodiversity-Organic polycultures support greater species diversity compared to chemical monocultures. Natural pest control methods help preserve populations of beneficial insects and pollinators. Soil health and habitat diversity further adds to on-farm biodiversity in organic system.
- Produces safe and nutritious food-Organic production is free of pesticide residue and has lower nitrate content. Several studies have found higher antioxidant activity, vitamin c, phenolics, proteins and sugar content in organically grown crops.

- Boosts farm incomes through price premiums-Organic production fetches 30200%higher market prices in India, which directly beneficial to farmers. Despite lower yields initially, net incomes are higher due to premium prices.
- Economic Opportunities-Organic farming can create new market opportunities for farmers.
- Social Benefits-Organic farming can promote community resilience, support local economies and contribute to food security.

**Government Initiatives to Promote Organic Farming**

- **National Programme for Organic Production:** Launched in 2000, the national programme for organic production provides standards, certification, accreditation systems and logo for organic products through Agricultural and Processed Food Products Export Development Authority and National Centre of Organic Farming.
- **Paramparagat Krishi Vikas Yojana**: it provides traditional organic products through farmer clusters with 50% subsidy for inputs and certification.
- **Mission Organic Value Chain Development for North Eastern Region**: A central government scheme initiated in 2015 aims to develop certified organic production in northeast India through value chains connecting small producers to markets.
- **Rashtriya Krishi Vikas Yojana**: The national agriculture development programme under this scheme supports organic farming through activities like cluster formation, capacity building input production and certification.
- **Network of Organic Farming Resource Centres:** A total of 174 resource centres across India have been established to promote organic practices through training, demonstrations and extension activities.
- **DAC and FW Organic Farming Policy:** The national policy announced in 2019 aims to promote organic farming through value chain approach integrating production, certification and marketing.
- **Bhartiya Prakritik Krishi Padhati Programme:** This promotes traditional organic inputs drawing from India’s ancient texts on natural farming.
- **National Project on Organic Farming:** It ensures end to end support to organic production, quality assurance, market development and branding.
- **Future Outlook and Recommendations:** India has strong potential to emerge as a global leader in organic agriculture given its large farming population, agroecological diversity, millenia-old traditional practices and


ISBN-978-93-49938-45-8

growing domestic and export markets. However, realizing this potential requires long term policy support and public private partnerships.

**Conclusion**

India is best known as agriculture-oriented country since ancient times. Demand of organic agricultural methods increases, especially in areas where the present farming system has degraded resources essential to agricultural production perticularly land, soil and environment. Factors such as farmers health, consumers health are also mentioned as reasons for shifting to organic methods As conventional farming results in various health and environmental hazards and also social, economic problems, awareness of environmental costs of agriculture such as declining quality of drinking water and soil, the impact of agriculture on landscape and wildlife have shifted consumers interest towards organic agriculture.

The entire agricultural community is trying to find a solution to overcome the short comings of conventional farming, which can socially, economically beneficial for mankind.

Hence, organic farming is only solution to overcome these problems.

***References***

1. Howord A, An agricultural testament, oxford university press,1940.
2. Stockdale EA, Lampkin NH, Hovi McKeating R, Lennartsson EK, Agronomic and environmental implications of organic farming systems.
3. Chandrashekhar HM. Changing scenario of organic farming in India; An overview.
4. Bhattacharya Chakraborty Current status of organic farming in India and other countries. Indian journal of fertilizers,2005;111.
5. Food and agriculture organization, organic agriculture FAO;2019.
6. Indian institute of organic farming, area under government certification. Government of India ;2022
7. Government of India, ministry of commarce and industry, national programme for organic production containing the standards for organic products (2000).

# Human Creativity and Artificial Intelligence

**Prof. Vasave Kirta O.**
Dada Patil Mahavidyalaya, Karjat, Tal.Karjat Dist Ahilyanagar
Email: sunitasatale2021@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19781314
*DOI:* *10.5281/zenodo.19781314*

### Abstract

Human creativity is originated from human mind; it is human intelligence. It has the abilities like imagination, emotional feelings, sympathy and the ability to generate new ideas in artistic ways. Artificial Intelligence is machine-based abilities made by human mind. It is able to produce text, images, music, and other creative works very quickly. This article focuses on the concept of human creativity and artificial intelligence. The paper discusses the differences between human creativity and Artificial Intelligence how both the concepts are related and different to each other. The study also focuses the roles of both the abilities in creativities and other works like art, literature music, science, medical and education. The study emphasises on the nature and influence of human creativity and AI with each other. This rooted in emotional experience and cultural context and AI-generated creativity is based on algorithms, data processing and pattern. This study also focuses the possibilities of collaboration between humans and Artificial Intelligence in literature, art, design and scientific innovation. Artificial Intelligence can generate innovative solution. This still depends on human guidance and interpretation. Therefore, rather than replacing human creativity, artificial intelligence must be understood as a supportive tool that help to creative power. This article also highlights the future of creativity lies in the productive collaboration between human imagination and technological intelligence.

**Keywords:** Human Creativity, Artificial Intelligence, Technology, Creative thinking

### Introduction

Artificial Intelligence is one of the new and latest branches of technology works on computer. It is machine intelligence system like human intelligence. It works on thinking like human mind, language process, problem solving and making decision. On the other hand, human creativity is an aspect human intelligence it is

a natural ability, it creates new things, creative thinking, imagination, creation of art and literature.

Human creativity is original ability of thinking, imagine and creating new things. This is work on imagination, emotion, experience. Machine Intelligence that is Artificial Intelligence is a technology that works on computer system. Artificial Intelligence thinks and performs like humans. This AI works using data, algorithms and computer programs to solve different problems, to learn patterns, and make some decisions.

**Discussion**

Human creativity is connected with human mind, human consciousness, emotions, imagination and experience. This originated from an individual's experiences, cultural background and intellectual power. Human creativity is the ability to produce unique ideas new ways of thinking power. It is the capacity to visualize possibilities beyond reality means power of imagination. Human creativity often expresses human feelings and experiences. Creative works reflect social and cultural contexts. Many Artists, author, scientists and philosophers have demonstrated that creativity is not only technical ability but also a reflection of human consciousness.

Artificial Intelligence is a man-made machine-based ability. It is originated recently and has advanced significantly in the 21st century. This system can analyse the large data and identify patterns and system that allow them to generate new things. Artificial Intelligence can write many articles and stories, it generates images and digital art and music, this also translate languages, it helps in scientific discovery

This capability has led to the emergence of what is sometimes called computational creativity. Artificial Intelligence can imitate artistic styles, combine existing ideas and produce new things that appear innovative. But, Artificial Intelligence creativity differs fundamentally from human creativity. Artificial Intelligence does not possess emotions, imagination, personal experiences or consciousness.

Human creativity is original and natural ability of human mind. Human Creativity comes from human imagination, emotions, mind and many personal experiences. Originally, Humans creativity creates completely new and unique ideas. Human Creativity is influenced by human feelings, empathy and cultural experiences. In thinking process human creativity is flexible, intuitive and sometimes unpredictable. Human Creativity learns through life experiences, observation and reflection. Humans create literature, music, paintings with deep

meaning. Human Creativity is limited by human time, memory, and knowledge.
Artificial Intelligence (AI) is man-made and machine-based technology created by humans mind. Artificial Intelligence comes from algorithms, programming and data. Artificial Intelligence usually generates ideas based on existing data, patterns and systems. Artificial Intelligence AI has no human emotions, empathy, sympathy or personal experience. In terms of thinking process Artificial Intelligence is logical, structured and many rule-based. Artificial Intelligence learns through machine learning and large datasets. Artificial Intelligence is limited by programming, data quality and human instructions. Artificial Intelligence can generate art or text but it imitates patterns from data.
Humans create new and original ideas. It helps in art, literature, music and innovation. Humans use imagination, emotions, and experiences to solve problems. Creativity helps in developing culture, stories, and new inventions.
Artificial Intelligence (AI) helps to analyse large amounts of data very quickly. AI can automate tasks and save time.AI help humans in research, education, healthcare, and technology. It can help in generating text, images, music, and designs using data.
Though instead of many differences, human creativity and artificial intelligence can influence to each other. Artificial Intelligence can help humans by generating ideas, analysing information very quickly and that too automatic ways. This allows human creators to focus more on conceptual thinking and artistic expression in the field like literature, design and visual arts, film and media, science and technology, research and Education

## Conclusion

Human creativity and artificial intelligence is representing two different interconnected forms of innovation. Human Creativity originated from new thinking, imagination, emotion, empathy and cultural experience, artificial intelligence is based on computational analysis and data-driven learning. Artificial intelligence (AI) can generate creative things, but it has the lacks of the consciousness and emotional depth that characterize human creativity.
The creative production will likely depend on collaboration between human creativity and artificial intelligent. By combining human imagination with the analytical power of AI, new possibilities for artistic, scientific and intellectual advancement can emerge. Therefore, artificial intelligence must be viewed not only as a competitor to human creativity but also as a tool that expands the boundaries of human creative power today and in future.


*ISBN-978-93-49938-45-8*

***References***

1. Ways of Being – Bridle, J. Ways of Being: Beyond Human Intelligence. New York: Farrar, Straus and Giroux. (2022)
2. The Alignment Problem – Christian, B. The Alignment Problem: Machine Learning and Human Values. New York: W. W. Norton. (2020)
3. Koivisto, M., & Grassini, S. “Best Humans Still Outperform Artificial Intelligence in a Creative Divergent Thinking Task.” Scientific Reports, (2023)
4. Murari, A. “Artificial Intelligence: Advancing the State of Creativity or Replacing Human Talent?” Journal of Information and Knowledge, (2025)
5. Haase, J., & Pokutta, S. Human-AI Co-Creativity: Exploring Synergies Across Levels of Creative Collaboration. (2024)
6. Bidgoli, A., Kang, E., & Llach, D. Machinic Surrogates: Human-Machine Relationships in Computational Creativity. (2019)
7. Linares-Pellicer, J. et al.We Are All Creators: Generative AI and the Path Toward Human-AI Synergy. (2025)

# Humanity in Conflict: Satara District during the 1962 Sino-Indian War

**Dr. Kiran Ganpat Kumbhar**
Assistant Professor, Department of History, Arts and Commerce College, Pusegaon
Email:
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19781483
*DOI:* *10.5281/zenodo.19781483*

## Introduction

India and China have shared cultural, religious, and economic ties since ancient times, with Buddhism spreading from India to China and Chinese scholars studying at Nalanda and Takshashila. Medieval and modern trade continued, but colonial-era boundary demarcations, particularly the disputed McMahon Line, sowed seeds of conflict. Britain's lack of seriousness in settling borders left the dispute unresolved after India's independence in 1947.

On 20 October 1962, China launched a sudden attack on India, declaring a unilateral ceasefire on 21 November after achieving its objectives. The Sino-Indian War, fought in harsh Himalayan terrain with key battles at Tawang, Rezang La, Bum La, Namkachu, and Walong, resulted in Chinese occupation of Indian territory. Though India was defeated, the war provided crucial lessons in defence preparedness, military organization, and national security.

## Contribution of the Citizens of Satara District in the Sino-Indian War

During the Sino-Indian War, the Prime Minister of India, Jawaharlal Nehru, and the Chief Minister of Maharashtra, Yashwantrao Chavan, appealed to the citizens of the country to extend full support to the Indian soldiers who were fighting on the front lines. At this moment of humanity in conflict, the people of India were called upon to stand firmly behind the armed forces and to contribute in every possible way to strengthen national defence. In response to this appeal, the Government of Maharashtra established a National Defence Fund, and initiatives to collect contributions for this fund were launched throughout the state.

The fund received enthusiastic support from different sections of society. Citizens contributed generously with a strong sense of patriotism and national responsibility. During this difficult period of humanity in conflict, it was widely believed that every Indian citizen had a duty to demonstrate solidarity with the


*ISBN-978-93-49938-45-8*

government and the armed forces through concrete actions. The residents of Satara district responded actively to this call and expressed their support through various fund-raising initiatives.

Efforts were undertaken to collect contributions for the National Defence Fund from almost every village in Satara district. Even in remote areas where the campaign initially progressed slowly, special measures were taken to ensure wider participation. Local leaders such as village sarpanches, deputy sarpanches, chairpersons of cooperative institutions, and representatives of farmers' organizations played an important role in mobilizing the people and encouraging them to contribute as much as possible from their respective villages.

These efforts reflected the strong sense of civic responsibility among the citizens of the district. At a time when the nation was facing a serious external challenge and the realities of humanity in conflict were clearly visible, the people of Satara district extended their support to the soldiers who were bravely defending the country on the front lines. Through financial contributions and collective participation, the citizens sought to uphold the values of democracy, national independence, and national pride.

The Sino-Indian War began on 20 October 1962. Because of the sudden attack by China, the Indian Army did not have sufficient time to make complete preparations. Gradually, the conflict assumed a serious and intense form. As news of the war appeared in newspapers, people across the country became aware of the crisis faced by the nation. In response, ordinary citizens came forward to support the country in different ways and expressed their solidarity with the soldiers defending the borders.

**National Defence Fund Collected from Satara District**

In order to resist the aggressive attack carried out by China on the motherland, the people of Satara district came forward with a strong sense of patriotism and readiness to assist the nation in every possible way. The citizens showed remarkable enthusiasm in contributing to the National Defence Fund. People donated money, gold, blood, and other forms of assistance. A spirit of healthy competition was also visible among citizens to offer support for the national cause.

By 26 November 1962, a total of Rs.3, 29,841.21 had been collected from Satara district for the National Defence Fund. In addition to this amount, approximately 864.350 grams of gold and 115 grams of silver were also contributed. The people of the district had resolved to raise Rs.12 lakh for the fund before 26 January 1963, reflecting their strong commitment to support the country during the crisis.

Responding to the appeal of the Satara District Citizens' Defence Committee, contributions were received from various talukas of the district in the form of money and gold. The following details show the taluka-wise contributions collected up to 26 November 1962.

| Sr. No. | Taluka | Amount (Rs.) | Gold | Silver |
|---|---|---|---|---|
| 1 | Satara | 71,040.10 | 33 g | 115 g |
| 2 | Patan | 20,129 | 207 g | – |
| 3 | Jawali | 4,926 | – | – |
| 4 | Koregaon | 26,912.50 | 207 g | – |
| 5 | Khatav | 13,804 | 20 g | – |
| 6 | Phaltan | 33,448.50 | 63 g | – |
| 7 | Man | 9,853 | 7 g | – |
| 8 | Khandala | 11,472.35 | 16.5 g | – |
| 9 | Wai | 8,767.95 | 350 mg | – |
| 10 | Mahabaleshwar | 6,881.50 | 48.5 g | – |
| 11 | Karad | 1,22,603.31 | 262 g | – |
| **Total** | | **3,29,838.21** | **864.350 g** | **115 g** |

Further contributions continued to increase. By 16 December 1962, the amount collected from Satara district had reached Rs. 5, 41,855, along with 1,375.330 grams of gold. Taluka-wise contributions during this period are as follows:

| Sr. No. | Taluka | Amount (Rs.) | Gold |
|---|---|---|---|
| 1 | Satara | 90,661 | 90 g |
| 2 | Patan | 77,561 | 325 g |
| 3 | Jawali | 15,170 | – |
| 4 | Koregaon | 38,221 | 106 g |
| 5 | Khatav | 32,338 | 120 g |
| 6 | Phaltan | 11,659 | 163 g |
| 7 | Man | 51,478 | 7 g |
| 8 | Khandala | 40,978 | 118 g |
| 9 | Wai | 30,996 | 330 mg |
| 10 | Mahabaleshwar | 17,473 | 102 g |
| 11 | Karad | 1,35,320 | 344 g |
| **Total** | | **5,41,855** | **1,375.330 g** |

17 December 1962, the total contribution from Satara district to the National Defence Fund had reached Rs. 8, 71,693.21, along with 2,239.700 grams of gold and 115 grams of silver. These contributions clearly demonstrate the patriotic spirit and collective support extended by the citizens of Satara district during the


ISBN-978-93-49938-45-8

Sino-Indian War of 1962.

**Participation of Satara District in the Small Savings Campaign**

In 1962, under the Small Savings Campaign, the Mahabaleshwar division was expected to raise an amount of Rs.75, 000. However, by 28 November 1962, Mahabaleshwar had not only achieved its target but had also secured a leading position in Satara district by successfully fulfilling its share in the campaign. Through this initiative, the Mahabaleshwar division collected a total of Rs.92, 565.20 by 28 November 1962, which clearly reflected the active participation and patriotic response of the local people during that period.

**Organization of First Aid Classes and Blood Donation Camps**

At the Government Hospital in Satara, two special training classes for women, namely Home Nursing and First Aid, were started on 28 November 1962. The process of registering the names of women participants for these classes began at the Civil Hospital. This initiative was taken by Civil Surgeon Dr. M. V. Parange and Mrs. Meherbai Deshmukh, the Secretary of the Satara District Citizens' Defence Committee. During the war, many citizens from Satara district voluntarily came forward to donate blood in order to save the lives of injured Indian soldiers. For this purpose, lists of potential blood donors were prepared in several villages across the district. At the Government Hospital in Satara, blood testing of citizens was conducted daily from 3:00 p.m. to 6:00 p.m. By 3 December 1962, blood samples of around 200 persons had been tested, and 178 bottles of blood had been collected at the hospital.

**Conclusion**

The study "Humanity in Conflict: Satara District during the 1962 Sino-Indian War" highlights the patriotic and humanitarian response of Satara's citizens during the conflict. They contributed to the National Defence Fund through money, gold, silver, and blood donations, and actively participated in the Small Savings Campaign, exceeding targets. Women received First Aid and Home Nursing training, and blood donation drives supported injured soldiers.

These efforts demonstrate that Satara's people provided financial, practical, and moral support, reflecting collective responsibility, national unity, and social solidarity, making the district a notable example of civilian participation during the war.

***References***

1. Prasad, S. N. (Ed.). (1992). History of the conflict with China, 1962. New

Delhi: History

2. Division, Ministry of Defence, Government of India, pp. 113–114, 116.
3. Gramodhdhar Saptahik. (1962, November 5). p. 1.
4. Gramodhdhar Saptahik. (1962, November 26). p. 1.
5. Gramodhdhar Saptahik. (1962, December 17). p. 3.
6. Gramodhdhar Saptahik. (1962, November 29). p. 4.
7. Gramodhdhar Saptahik. (1962, December 3). p. 1.


*ISBN-978-93-49938-45-8*

# The Analysis of Modern Technology in Agriculture: A Study in Ahilyanagar District

**Ambika S. Kusalkar**
P.G and research Center, Department of Geography, New Arts, Commerce and Science College Ahmednagar (Autonomous) MH 414001
Email: ambikalashkar@gmail.com
*Article DOI Link:* https://zenodo.org/uploads/19781572
*DOI: **10.5281/zenodo.19781572***

## Abstract

Agriculture has always been a key sector in Indian Economy, Providing Employment to a significant portion of the population. Over the past few decades, technological advancements have reshaped agricultural practices, improving productivity, efficiency and sustainability. However, the adoption of modern technology varies across regions due to factors such as Socio – economic conditions, Landholding Patterns and awareness levels.

This research aims to analyze the impact of modern agricultural technologies on farming in Ahilyanagar District. The study will assess the extent of technological adoption, its effects on productivity, and the challenges faced by farmers in integrating modern techniques into traditional farming systems.

Modern Agriculture technology encompasses a range of innovation that improve efficiency and sustainability in farming. These include: Mechanization – use of tractors, harvester and Modern plowing equipment. Precision Agriculture –GPS, Drones and Remote Sensing for real time monitoring. Irrigation Techniques – Drip Irrigation, Sprinklers and rainwater harvesting. Biotechnology – Genetically modified crops, high yields seeds varieties and bio fertilizers. Digital Agriculture – Use of mobile apps, Al and IOT for decision making. These technologies help farmers improve crop yield, reduced resources wastage and adapt to climate change.

***Keywords:*** Precision, productivity, efficiency, fertilizer, sustainability.

## Introduction

Modern Agriculture technology has transformed farming practices worldwide, leading to increased productivity, efficiency, and sustainability, to provide an overview of existing research on modern agriculture technology, its impact, adoption pattern, and challenges, with focus on Ahilyanagar District. The review

includes studies on precision agriculture, mechanization, irrigation techniques, biotechnology, digital farming, and their socio-economics and environmental effects. Several studies have examined the role of modern technology in Agriculture.

**Aims and Objective**

This research aims to analyze the impact of modern agricultural technologies on farming in Ahilyanagar District.

For the fulfillment of above aim following objectives are considered.

- To assess the levelof adoption of Modern agricultural technologies among farmers in Ahilyanagar District.
- To Analyze the impact of modern technology on agricultural productivity and income levels.
- To identify the Socio-economic and infrastructural challenges in the adoption of modern farming technologies.
- To Explore the role of government policies and extension Services in Promoting technological adoption.
- To provide recommendations for improving the adoption and effectiveness of modern agricultural technologies in the region.

**Research Metodology**

This study will adopt a mixed – method approach, combining Qualitative and Quantitative research methods to gain a comprehensive understanding of modern technology in Agriculture.

1. **Sampling Methods**

A stratified random sampling technique will be used to select farmers from different regions within Ahilyanagar District. The sample will include:

- Small and marginal farmers.
- Medium and large - Scale farmers.
- Farmers using traditional methods.
- Farmers adopting modern technologies.

A Sample size of approximately 250-300 farmers will be chosen to ensure statistical reliability.

2. **Data Collection**

**Primary Data**

- **Surveys and Questionnaires:** Structured Questionnaires will be used to collect data on farming practices, technology adoption, Productivity and


ISBN-978-93-49938-45-8

income levels.

- **Interviews:** In – depth interviews with farmers, agricultural officers and policymakers will provide qualitative insights.
- **Field observations:** Visits to farms will help assess the actual usage of modern technologies

**Secondary Data**

- Government Reports and Agricultural department records and Krishi Vigyan Kendras (KVKS)
- Research papers and articles on modern agriculture.
- Statistical data from institutions like ICAR, NABARD and FAO.

**3. Data Analysis**

- **Quantitative Analysis**

SPSS and Excel will be used for statistical analysis of Survey data, correlation and Regression analysis will be applied to study the relationship between technology adoption and agricultural productivity.

- **Qualitative Analysis**

Thematic analysis will be conducted on interviews and field observation to understand farmer's perspectives.


**Study Area**

Ahilyanagar district (previously known as Ahmednagar) is one of the largest districts in the state of Maharashtra, India both in terms of area and historical significance which consist of 14 tehsils that are: Akole, Jamkhed, Karjat Kopergaon, Nagar, Newasa, Parner, Pathardi, Rahata, Rahuri, Sangamner, Shevgoan, Shrigonda, and Shrirampur..lies between 18.2O and 19.9O north latitude and 73.9O and 75.5O east longitude. Ahilyanagar is known for its rich history, especially during the medieval period, and is home to several historical monuments such as the Ahilyanagar Fort, which once served as a prison for Jawaharlal Nehru during the British colonial era. The district has a diverse geography, including the Sahyadri mountain ranges in the west and the Deccan plateau in the east.

The economy of Ahilyanagar is primarily based on agriculture, with sugarcane, cotton, and millet being key crops. It also has a growing industrial base and a strong cooperative movement, particularly in the sugar industry. Ahilyanagar District, known for its diverse agricultural practices, will be the study Area, The Region has varying landholding patterns and farming systems, making it an ideal

location for studying technology adoption.

**Location of Study Area**




**Ahilyanagar District**

The study aims to analyze the adoption impact and potential of modern technology in Ahilyanagar, focusing on: Assessing the availability and accessibility of digital infrastructure, including internet connectivity mobile networks and digital platforms. Investigating the adoption rates of modern technologies, such as smartphones, e-commerce and digital payment system, among resident's businesses and government policy.

Economic development Analyzing the impact of modern technology on education, healthcare, agriculture and entrepreneurship in Ahilyanagar. Identifying the challenges and opportunities associated with modern technology adoption in Ahilyanagar.

Modern technology offers a wide scope for improvement agriculture practices in Ahilyanagar District, particularly addressing challenges like drought-prone areas, low soil fertility, and water scarcity. Key areas, where technology can be beneficial include precision farming, water management, and efficient resource utilization. These sensors can monitor soil moisture, temperature, and nutrients level, enabling farmers to optimize irrigation and fertilizer application.


*ISBN-978-93-49938-45-8*

Drones can be used for mapping, surveying, and crop monitoring, providing data for planning and decision-making. Real-time weather data can significantly improve water use efficiency especially in areas with limited water resources.

Significance of the study

This study will help policy makers, agricultural extension agencies and farmers by providing data – driven insights into technology adoption in Agriculture. The Findings can contribute to designing better policies and interventions to support farmers in adopting modern technology.

Agriculture technology plays a crucial role in modern agriculture by enhancing efficiency, productivity and sustainability Key areas include precision farming Automation, biotechnology, data analytics and the use of the Internet of Things (IoT). These technologies empower farmers to optimize resource usage increase yields and improve overall farm management. Technology helps farmers increase their yields by optimizing resource usage and improving farming practices technology provides farmers with access to information, resource and markets empowering them to make informed decision and improve their livelihood automation and efficient resource management help reduce labor cost and operational expenses leading to increased profitability.

Modern agriculture technologies, like precision farming and genetically modified crop, allow farmers to achieve higher yields with fewer inputs, making them more profitable and efficient, drip irrigation, water sensors and precision application of fertilizers and pesticides help farmers use resources more effectively, reduce waste and environmental damage. By promoting efficient resource use and reducing chemical application, modern technologies help minimize the Environmental footprint of agriculture, contributing to a more sustainable food system. Crop quality through better irrigation, pest control, and fertilization strategies, leading to higher –quality produce and increased market value.

**Limitations of the Study**

- The study may be limited by Farmer's Willingness to share information.
- External factors like climate change, market fluctuations and government policies may influence finding.

***References***

1. Lowenberg – De Boer J and Erickson B (2019) "Precision Agriculture Technology Adoption": The Role of Economics, Agricultural System.
2. Pingali, P. (2012) "Green Revolution: Impacts, Limits and the path Forward,"

Proceedings of the National Academy of Science.
3. Sharma, P, and Singh, A (2021) “Digital Agriculture in India: Opportunities and challenges” Journal of Rural Studies.
4. Swaminathan, M. S. (2010) From Green to Evergreen Revolution: Indian Agriculture at Crossroads. Academic Foundation.
5. Government of India (2020) Agricultural policy Report on Technology Adoption in India.
6. Pierce, F. J., and Nowak, P. (1919) Aspects of Precision Agriculture. Advances in Agronomy, 67, 1-85.
7. Shamshiri, R. R., et al. (2018) Advances in Greenhouse Automation and Controlled Environment Agriculture International Journal of Agricultural and Biological Engineering, 11(1), 1–22.
8. Mahatma Phule Krishi Vidyapeeth (MPKV), Rahuri. (n.d.). Retrieved from: https://en.wikipedia.org/wiki/Mahatma_Phule_Krishi_Vidyapeeth


*ISBN-978-93-49938-45-8*

Nature Light Publications
309 West 11, Manjari VSI Road, Manjari Bk.,
Haveli, Pune- 412 307.
Website: www.naturelightpublications.com
Email: naturelightpublications@gmail.com
Contact No: +919822489040 / 9922489040

Nature- 101

ISBN: 978-93-49938-45-8
Price- 999/-